
म. ग्रं. सं. ठाणें.
विषय जिवधा
सं. क. 2609


REFBK-0020934

प्रभाकर वैद्य

महात्मा फुले आणि त्यांची परंपरा

(प्रेरणा–शिक्षण–विपर्यास)


REFBK-0020934

महात्मा फुले आणि त्यांची परंपरा

© प्रभाकर वैद्य

मुखपृष्ठ । अक्षर रचना । प्रकाश विश्वासराव


किंमत । तीस रुपये

प्रथमावृत्ती । आक्टोबर ७४

मुद्रक । एच. बी. घाणेकर
न्यू एज प्रिंटिंग प्रेस,
८५, पी. बाळू मार्ग, प्रभादेवी,
मुंबई ४०० ०२५.

प्रकाशक । एच. बी. घाणेकर
लोक वाङ्मय गृह प्रा. लि.,
१९० बी, खेतवाडी मेन रोड,
गिरगाव, मुंबई ४०० ००४.

प्रभाकर वैद्य



महात्मा फुले आणि त्यांची परंपरा

(प्रेरणा–शिकवण–विपर्यास)

लोक वाङ्मय गृह

। मनोगत ।

प्रस्तावनेदाखल

हे पुस्तक लिहावयास मी का प्रवृत्त झालो याबद्दल, माझे कविमित्र श्री. नारायण सुर्वे यांच्याशी मी नेहमी चर्चा करीत असे. या चर्चेमध्ये सहजच माझे अनेक व्यक्तिगत अनुभव आणि त्यांतून व्यक्त होणारी माझी वैचारिक वाटचाल यांचा उल्लेख येत असे.


पुस्तक लिहून पुरे झाल्यानंतरही काही खुलासे करणारे एक वैयक्तिक निवेदन आवश्यक आहे, असे मला वाटू लागले. तेव्हा 'तुम्ही असे निवेदन जरूर लिहून काढा; तेच आपण प्रस्तावनेदाखल छापू या' अशी सुर्वे यांनी आग्रहाची सूचना केली आणि या निवेदनाचे शीर्षकही त्यांनी अगोदरच ठरवून टाकले. 'मनोगत!'

मी हे 'मनोगत' लिहावयाला घेतले आणि ते एवढे लांबले की, अगोदरच अपेक्षेबाहेर लांबलेल्या या पुस्तकात त्याचा समावेश करणे अशक्य झाले. म्हणून ते आत्म-निवेदन सध्या अजिबात बाजूला ठेवून, प्रस्तावनेदाखल दोन शब्द लिहीत आहे.



या पुस्तकाचा विषय गेली दहा वर्षे तरी माझ्या डोक्यात घोळत आहे. त्यासंबंधी वेळोवेळी काही व्याख्यानेही मी दिली आहेत; किंवा थोडेफार लिहिलेलेही आहे. पण ते सारे प्रासंगिक किंवा औपचारिक होते.

या पुस्तकातील विषया-आशयासंबंधी, माझे मनन–चिंतन मात्र सतत चालूच आहे. या मननातून माझ्यापुढे अनेक समस्या उभ्या राहिल्या; त्यांची उत्तरे शोधण्यासाठी बरीच झटापटही करावी लागली.—कधी माझ्याच जुन्या पूर्वग्रहांशी; कधी माझ्या आवडत्या विचारवंतांशी—नेत्यांशीसुद्धा. या झटापटीमधूनच माझे



विचार निश्चित आकार घेऊ लागले; काही जटिल समस्या सुटल्यासारख्या वाटू लागल्या; काही नवी उत्तरे मिळू लागली, आणि मग माझ्या एकूण विचारांना काहीएक निश्चित दिशा लागली. एक प्रकारे या पुस्तकातील विषयाचा एक आराखडा मनात तयार होऊ लागला; वेळोवेळी त्यातील तपशील भरले जाऊ लागले,— आणि मग दोन वर्षांपूर्वी सत्यशोधक समाजाच्या शताब्दि-महोत्सवाच्या निमित्ताने काही तरी प्रकट चिंतन करावे, अशी एक प्रबळ उर्मी निर्माण झाली. नंतर माझ्या विचारांच्या निश्चितीसाठीच केवळ काही कच्ची टिपणेही मी तयार केली.

प्रत्यक्ष पुस्तक लिहिण्याइतपत आपली तयारी झालीसे वाटल्यानंतर, त्यासंबंधी काही मित्रांशी–सहकाऱ्यांशी थोडीफार चर्चाही केली. पण ती चर्चा बहुतेक एकतर्फी म्हणजे फक्त माझ्याच तर्फे होत असल्याचा अनुभव येऊ लागला! म्हणजे असे की, माझे निवेदन ऐकल्यानंतर, 'वा :–वा :, जरूर लिहून काढा' येवढे उत्तेजनपर शब्द बहुधा ऐकू येऊ लागले; पण खरे म्हणजे, मला हवी असलेली चर्चा किंवा टीका–टिप्पणीमात्र फारशी होईना! त्या चर्चेला आवश्यक इतपत माहिती किंवा निदान जिज्ञासा हव्या तितक्या प्रमाणात आढळेना! या विषयाचे आजही काही विशेष महत्त्व आहे, आजही त्याचा काही खास संदर्भ आहे, याची पुरेशी जाणीव दिसून येईना. म्हणून हा नाद मी नंतर सोडून दिला.

आपल्या मनात जे काय घोळत आहे, ते एकदा लिहून काढावे; प्रसिद्ध करावे; मग त्यावर जी काय चर्चा-किंवा टीका व्हावयाची असेल ती जाहीरपणेच होऊ द्यावी असे मला वाटू लागले. विरोधकांच्या टीकेप्रमाणेच, मित्रांची–सहकाऱ्यांची सुद्धा टीका होणार असेल तर तीही होऊ द्यावी: अर्थात् हे सर्व जाहीर रीत्याच होणार. पण तशी जाहीर चर्चा झाली तर त्यामुळे काहीच बिघडणारे नव्हते; किंबहुना चर्चेचाच तो एक अभिनव प्रकार समजावा असे वाटू लागले. सत्यशोधक समाजाची शताब्दी केवळ औपचारिक रीत्या साजरी करण्यापेक्षा, अशा प्रकारे

एका चर्चेला चालना देऊनच, ती अधिक चांगल्या रीतीने साजरी होईल; फुल्यांच्या श्रेष्ठ प्रेरणांचा आणि मूलगामी विचारांचा आदर अशा सडेतोड चर्चेमुळेच होऊ शकेल, अशी माझी धारणा झाली आणि त्या दृष्टीने मी कामाला लागलो.

अर्थात या ठिकाणी मला एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे. एखादा विद्वत्ताप्रचुर किंवा संशोधनपर ग्रंथ लिहिण्याचा हा प्रयत्न मुळीच नाही. पण एक दावा मात्र मी नक्की करू शकतो;—तो हा की, संबंधित विषयासंबंधी आणि व्यक्तीसंबंधीचे बहुतेक मूळ लिखाण मी बारकाईने वाचीत आलो आहे; त्यावर सतत मनन–चिंतन केलेले आहे. कोणत्याही पूर्वग्रहाच्या पलीकडे जाऊन कोणाचेही आणि प्रत्येकाचे मूळ विचार समजून घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न मी निश्चित केला आहे. त्याचप्रमाणे गेल्या शंभर वर्षांतील ठळक घटनांचा आणि त्यांच्याशी संबंधित असलेल्या थोरथोर व्यक्तींच्या–विभूतींच्या भूमिका आणि त्यासंबंधी वेळोवेळी माजलेले वाद यांचाही विचार, कोणतेही पूर्वग्रह मनात न ठेवता मी केलेला आहे. धर्म-जात-पंथ-पक्ष यासंबंधीच्या कोणत्याही अनुकूल–प्रतिकूल पूर्वग्रहांपासून आणि खऱ्या–खोट्या अभिमानापासून शक्य तेवढे अलिप्त राहण्याचा मी कसोशीने प्रयत्न केलेला आहे. अशा प्रयत्नांमधून जी माझी मते अखेर बनली, ती मात्र अगदी प्रांजलपणाने मी या ठिकाणी नमूद केली आहेत. योग्य असेल त्याला योग्य म्हटले आहे; अयोग्य वाटले त्याला अयोग्य म्हटले आहे. आणि या दोन्ही गोष्टी सारख्याच मनमोकळेपणाने केल्या आहेत. कोणाच्याही संभाव्य रागा–लोभाचा परिणाम होऊ दिलेला नाही.

अर्थात्‌च हे सर्व लिखाण माझे स्वतःचे व्यक्तिगत मतप्रदर्शन आहे; आणि त्याची संपूर्ण जबाबदारी माझी माझ्यावरच आहे.

खरे म्हणजे हे पुस्तक सत्यशोधक समाजाच्या शताब्दीच्या निमित्ताने प्रसिद्ध करण्याची प्रथम कल्पना होती. पण माझ्या इतर दैनंदिन कामाच्या रगाड्यांमध्ये

या कामासाठी आवश्यक तेवढा वेळ आणि स्वस्थता मिळू शकली नाही; त्याचप्रमाणे आवश्यक ती संदर्भ-साधनेही वेळच्या वेळी उपलब्ध होऊ शकली नाहीत. त्यामुळे शताब्दि-महोत्सवाचा मुहूर्त टळला. पण त्यामुळे फारसे बिघडले असे मात्र मुळीच नाही. उलट एक फायदाच झाला. या महोत्सवाच्या निमित्ताने जे साहित्य प्रसिद्ध झाले, किंवा वेगवेगळ्या समारंभांत वेगवेगळ्या हौशी किंवा प्रतिष्ठित महोत्सव-मूर्तींनी जी वक्तव्ये केली, त्यांचाही एकत्रिक विचार करण्याची संधी मला अनायासे लाभली. या सर्व साहित्यांमध्ये, काय पाहिजे ते फारसे मिळाले नसले, तरी काय नको, हे मात्र मला नक्की समजून चुकले ! आणि तेही महत्त्वाचे होते. कारण पूर्वी फुल्यांचा विपर्यास विरोधकांनी केला होता; आता सारेच सवंग फुलेभक्त बनले आहेत आणि घाऊक फुलेभक्ती हा एक राजकीय-सामाजिक क्षेत्रात परवलीचा शब्द बनलेला आहे ! पण त्यामुळेच तर फुल्यांचा विपर्यास अधिकच होण्याचा धोका निर्माण झाला आहे !

शताब्दि-महोत्सव संपल्यानंतर अर्थातच सर्व हौशी, प्रतिष्ठित किंवा धंदेवाईक महोत्सवमूर्ती आता नव्या नव्या शताब्दयांच्या शोधाला लागल्या आहेत ! अशावेळी जे कोणी फुल्यांचे इमान (केवळ उत्सव समारंभात नव्हे तर,) जन्मभर व्रत म्हणून पाळू इच्छितात, त्यांच्याशी बोलण्यासाठीच फुले-साहित्याची चर्चा अगदी वेगळ्याच रीतीने होणे जरूर आहे. त्या दृष्टीने हा एक प्रयत्न समजावा.



गेल्या वर्षी या पुस्तकातील काही लिखाणाचा एक कच्चा खर्डा मी तयार केला आणि 'युगांतर' साप्ताहिकाचा 'फुले–विशेषांक' म्हणून जाहीर चर्चेसाठी म्हणून मी तो प्रसिद्ध केला. वेगवेगळ्या विचारांच्या काही मित्रांनी त्या लिखाणाचे

स्वागत केले; त्यात काही ज्येष्ठी आणि श्रेष्ठीही होते. चार-दोन वृत्तपत्रांनीही त्या लिखाणाची प्रशस्ती केली. पुस्तकातील मूळ विषयाकडे दुर्लक्ष करून, एकूण चर्चेला भलतेच फाटे फोडण्याचाही उपद्व्याप काही सद्गृहस्थांनी केला !

एक प्रकट चिंतन म्हणून हा कच्चा खर्डा प्रसिद्ध करण्याचा माझ्या मनातील मूळ हेतू मात्र साध्य झाला नाही, याचा खेद वाटतो. खरे म्हणजे विचार करण्याजोगे या लिखाणात थोडेफार तरी होते; वादग्रस्त ठरण्याजोगेही काही तरी त्यात होते. पण दोन्हींची एकूण उपेक्षाच झाली. तरीही काही मित्रांनी मात्र हे लिखाण (जरूर त्या सुधारणांसह) ग्रंथरुपाने प्रसिद्ध करण्याचा आग्रह धरला आणि खुद्द मलाही या विषयासंबंधीचे माझे संपूर्ण निवेदन लिहून प्रसिद्ध केल्याखेरीज आता मनःस्वास्थ्य लाभण्यासारखे नव्हतेच ! म्हणून आता हे लिखाण मी प्रसिद्ध करीत आहे.

हे पुस्तक लिहीत असतानाच मला अनेक संबंधित घटनांचा, विचारांचा आणि व्यक्तींच्या कार्याचा पुन्हा एकदा मागोवा घ्यावा लागला. विशेषतः टिळक-सावरकर-आंबेडकर यांचा आणि त्यांच्या विचारांचा–कार्याचा. या पुस्तकात त्या सर्वांचा संपूर्ण परामर्ष घेणे शक्य झालेले नाही.

या पुस्तकाच्या मर्यादित कक्षेत तसे करणे शक्यही नव्हते, पण टिळक-सावरकर-आंबेडकर यांच्या एकूण भूमिकेबद्दल आणि त्यांच्या जीवित-कार्याबद्दल सविस्तर लिहिण्यावाचून मला मात्र आता गत्यंतर उरलेले नाही.

त्यांपैकी डॉ. आंबेडकर यांच्यासंबंधीचे काही ढोबळ विचार मी या पुस्तकातील एका प्रकरणात ग्रथित केले आहेत. पण त्यांचा सविस्तर आणि अधिक तपशीलवार विचार करण्यासाठी ' डॉ. आंबेडकर आणि त्यांची झालेली कोंडी (समजून घेण्याचा एक प्रयत्न)' या शीर्षकाखाली एक लहानसे पण वेगळेच पुस्तक लिहून जवळजवळ पुरे केले आहे. ते लवकरच प्रसिद्ध होऊ शकेल अशी आशा वाटते.

'लो. टिळक आणि भारतीय राष्ट्रवाद' त्याचप्रमाणे 'सावरकर आणि हिंदू राष्ट्रवाद' या दोन्ही पुस्तकांचा तपशीलवार आराखडाही आकार घेत आहे.

खरे म्हणजे अव्वल इंग्रजीपासून तो स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंतच्या शे-दीडशे वर्षांतील सर्व विचारप्रवाह, प्रमुख घटना आणि त्या घटनांचे शिल्पकार या एकूण विषयांसंबंधी, नव्याने काहीतरी निश्चित संगती लावणे—आज अगदी अत्यावश्यक झाले आहे. कोणत्याही राजकीय-सामाजिक कार्यकर्त्यांच्या शिबिरांमध्ये या विषयासंबंधी व्याख्याने दिली किंवा चर्चा छेडली तर ही गोष्ट तावडतोब स्पष्ट होते.

खरे म्हणजे आचार्य शं. द. जावडेकर यांनी सुमारे चाळीस वर्षांपूर्वी केला, तसा प्रयत्न पुन्हा एकदा होणे आज अत्यावश्यक आहे.



'आधुनिक भारत' हा आपला ग्रंथ लिहिण्याची श्री. जावडेकरांची कल्पना अगदी योग्य होती, आणि त्यांनी त्यांच्या धारणेप्रमाणे, त्यांच्या दृष्टीतून त्यांना जसे दिसले, त्याप्रमाणे इंग्रजांच्या आगमनापासून तो थेट भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंतच्या घटनांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला. श्री. जावडेकरांच्या प्रयत्नाला भारतीय प्रबोधनाचा इतिहास असे जे म्हटले जाते, ते मात्र बरोबर नाही. खरे म्हणजे केवळ प्रबोधनाच्या इतिहासापेक्षा त्यांच्या ग्रंथाची व्याप्ती आणि झेप किती तरी अधिक आहे. जावडेकरांनी 'भारतीय संस्कृतीचे तत्त्वमंथन' करून 'भारतीय राष्ट्रीय क्रांतिशास्त्र' सांगितले आहे. 'भारतीय संस्कृतीचे अमृततत्त्व' शोधण्याच्या प्रयत्नात अखेर जावडेकरांनी 'सत्याग्रही समाजवादाचा सिद्धांत, साक्षेपाने मांडला आहे.

जावडेकर यांच्या ग्रंथांचे महत्त्व त्याच्या अभिनव संकल्पनेमध्ये तर आहेच; पण त्या संकल्पनेनुसार दीडशे वर्षांतील विविध घटनांचे सर्वांगीण आलोडन करून,

इतिहासातील शेकडो धागेदोऱ्यांना एका सूत्रांत गुंफण्याच्या कामी त्यांनी जी चतुरस्र साक्षेपी दृष्टी दाखविली आणि जे अपार कष्ट घेतले आहेत, त्याला तुलना नाही.

पण तरीही जावडेकरांचा बहुमोल ग्रंथ मला पूर्ण समाधानकारक कधीच वाटला नाही आणि आजही वाटत नाही, ही गोष्ट प्रांजलपणाने कबूल केली पाहिजे. पहिली गोष्ट म्हणजे स्वातंत्र्य-संग्रामाच्या ऐतिहासिक संदर्भात, त्यांनी भारतीय राष्ट्रवाद, गांधीवाद, समाजवाद यांचा 'समन्वय' साधून सत्याग्रही समाजवादाचे नवीन तत्त्व प्रस्थापित करण्याचा जो प्रयत्न केला तोच मला मान्य होण्यासारखा नाही.

जावडेकरांनी आपल्या ग्रंथांची जुळवाजुळव व रचना साधारणतः १९३२–३४ च्याच सुमारास केली. त्यामुळे त्यांच्या ग्रंथांत नंतरच्या निर्णायक कालखंडांतील घटनांचा परामर्ष नाही. त्याचप्रमाणे स्वातंत्र्योत्तर काळात तर सर्वस्वी नवीनच परिस्थिती निर्माण झाली. त्या परिस्थितीने प्रत्येकापुढे–वर्ग-पक्ष यापुढे त्याचप्रमाणे वेगवेगळ्या विचारप्रणालीपुढे सर्वस्वी नवीन असे आव्हान उभे केले. आपल्या सर्व इतिहासमीमांसेचे सारसर्वस्व म्हणून जावडेकरांनी 'सत्याग्रही समाजवाद' म्हणून जो सिद्धांत प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला, त्यालाही नवे आव्हान निर्माण झाले. तेव्हा स्वातंत्र्य-संग्रामाचे अखेरचे पर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील पहिले पाव शतक या सर्वस्वी वेगळ्या कालखंडांच्या कसोटीवर आपली इतिहास-मीमांसा कितपत उतरते, याचा विचार, मला वाटते खुद्द जावडेकरांनी सुद्धा जरूर केला असता. कदाचित तो 'फेर'–विचारसुद्धा ठरला असता! पण जावडेकरांनी काय विचार किंवा फेरविचार केला असता, याचा अंदाज करणे कदाचित् शक्य असले, तरी तो तसा करणे योग्य ठरणार नाही. जावडेकरांसारख्या साक्षेपी आणि विकासशील प्रतिभावंताचा तो अवमान ठरेल.

जावडेकरांच्या एकूण प्रयत्नामधील एक कच्चा दुवा म्हणजे त्यांनी राज-

कारणाला दिलेले प्रमाणाबाहेर महत्त्व, हा होय. जनमानस खरोखर घडविणाऱ्या, राजकारणाव्यतिरिक्त इतर ऐतिहासिक–सामाजिक–सांस्कृतिक गोष्टींना त्यांनी दिलेले गौणत्व विशेष लक्षणीय आहे. परिणामी चिपळूणकर–टिळक संप्रदायाच्या अनेक चुकीच्या धारणा जावडेकरांनी गृहीतच धरल्या आणि त्यामुळे त्यांचे विवेचन त्याच-प्रमाणात मर्यादित, अपुरे, एकांगी आणि चुकीचेच राहिले. फुले यांच्या प्रेरणेची आणि कार्याची बोळवण जावडेकरांनी ज्या पद्धतीने केली आहे, त्यावरून ही गोष्ट अगदी स्पष्ट दिसते.

पण तरीही जावडेकरांच्या प्रयत्नांचे मोल मुळीच कमी होत नाही; पण त्यांच्या ग्रंथाला काही काळ जी प्रमाणग्रंथाची प्रतिष्ठा लाभली होती, ती मात्र आज तरी टिकण्यासारखी नाही. जावडेकरांच्या ग्रंथांतील बहुविध त्रुटी भरून काढणारा दुसरा तेवढ्या तोलामोलाचा ग्रंथ, त्यांच्यानंतर आजवर कुणीही विचारवंत लिहून सिद्ध करू शकला नाही. तसा प्रयत्नसुद्धा कोणीही केलेला नाही, हीही एक तितकीच चिंतनीय गोष्ट आहे. कोणत्या एखाद्या भंपक हिंदू राष्ट्रवाद्याने असा प्रयत्न करण्याचा प्रश्नच नव्हता; पण कोण्या समाजवादी-मार्क्सवादी विचारवंतानेही अशी हिंमत आजवर दाखविली नाही, ही जितक्या आश्चर्याची तितकीच खेदाचीही गोष्ट आहे!

खरी गरज अशा प्रयत्नांची आहे. हे कार्य कोण्या एकाने करतो म्हणणे केवळ धाष्टर्याचेच ठरेल. पण तसा संघटित प्रयत्न काही सम-विचाराच्या मित्रांनी निर्व्याज, सहकार भावनेने केला आणि तसे करताना पंथ-पक्ष त्याचप्रमाणे जात-धर्म यांच्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष दडपणाला यत्किंचितही धूप न घालण्याची हिंमत त्यांनी सर्वांनी मिळून दाखविली, तर केवळ तसा प्रयत्नसुद्धा लाख लाख मोलाचा ठरेल. अशा प्रयत्नात सहभागी होण्याचे भाग्य मला लाभले, तर मी स्वतःला धन्य समजेन.

गांधीजयंती,
२ ऑक्टोबर १९७४, नासिक.

— प्रभाकर वैद्य

अनुक्रम

पृष्ठ

भाग पहिला : **महात्मा फुले : प्रेरणा-शिकवण** १ ते ७७

प्रकरण १ ले–सत्यशोधक समाजाची शताब्दी १

प्रकरण २ रे–महात्मा फुल्यांचा सार्वजनिक सत्यधर्म आणि ब्राम्हणांच्या वर्ण-वर्चस्वाविरुद्ध लढा १८

प्रकरण ३ रे–महात्मा फुले आणि राजकारण ३६

प्रकरण ४ थे–'आधी'चा एक भ्रामक वाद : सामाजिक की–आणि–विरुद्ध राजकीय ? ६०

प्रकरण ५ वे–भारतीय राष्ट्रीय पुनरुत्थान : स्वप्न की दुःस्वप्न ? ७०

भाग दुसरा : **महात्मा फुल्यांचा वारसा** ७७ ते २२४

प्रकरण १ ले–फुल्यांच्या मृत्युनंतरची स्थगितता आणि पुनरुज्जीवन ७७

प्रकरण २ रे–शाहु-छत्रपतींचे कार्य–मर्यादा ८८

प्रकरण ३ रे–जेधे-जवळकरांची ऐतिहासिक बंडखोरी ! १०१

प्रकरण ४ थे–जवळकर : फुले-प्रेरणेचा विकासशील आविष्कार १०९

प्रकरण ५ वे–डॉ. आंबेडकर : ज्योतीवर पेटलेली ज्योती ! ११६

पृष्ठ

प्रकरण ६ वे–म. फुले आणि पुरोगामी आंदोलन १५५

प्रकरण ७ वे–महात्मा फुले आणि स्त्री-मुक्ति-आंदोलन :—एका शतकातील वाटचाल १७१

प्रकरण ८ वे–हिंदु-सुधारक–दोन नमुने २००

(१) सुधारक सावरकर-त्यांची शोकांतिका

(२) गोळवलकर गुरुजींचा चातुर्वर्ण्यवाद २०९

प्रकरण ९ वे–मुस्लिम सत्यशोधक चळवळ २१७

परिशिष्टे २२५ ते २५८

परिशिष्ट । १ म. फुले आणि इतिहास २२७

परिशिष्ट । २ म. फुले आणि राष्ट्र-लोकशाही-मताधिकार वगैरे २३२

परिशिष्ट । ३ म. फुले आणि शिवाजी २३४

परिशिष्ट । ४ विष्णुबुवा ब्रम्हचारी आणि त्यांचे कल्पनाचित्र : इतके मौलिक विचार वांझ का ठरले ? २४०

परिशिष्ट । ५ 'जोती म्हणे'– फुल्यांची काव्य-रचना २४५

परिशिष्ट । ६ आंबेडकरांच्या अगोदरचा, आधुनिक महाराष्ट्रातील पहिला बौद्धजन : प्रा. धर्मानंद कौसांबी २५७

क्षमस्व

* प्रथम योजिल्यापेक्षा पुस्तकाचा विस्तार फारच वाढल्यामुळे काही विषय अगदी त्रोटकपणे येऊन गेले आहेत. उदा. शिक्षण. वास्तविक इंटर आयोगापुढे मूलगामी विचारांनी ओतप्रोत भरलेली जी कैफीयत म. फुल्यांनी सादर केली, तिच्या प्रकाशात, गेल्या शंभर वर्षांतील शिक्षण क्षेत्रातील घडामोडींचा आढावा घेणे, आवश्यक होते. त्याच प्रमाणे 'शेतकऱ्याचा आसूड'मध्ये फुल्यांनी मांडलेल्या ग्रामीण अर्थरचनेसंबंधीच्या भूमिकेच्या प्रकाशात गेल्या शंभर वर्षांतील घडामोडी तपासून बघण्यासारख्या आहेत; अगदी आजही तथाकथित-हरित क्रांतीनंतरही आणि शंभर वर्षांतही न पडलेल्या दुष्काळानंतर! अर्थात्च या त्रुटीची मला तीव्र जाणीव आहे. मध्यंतरी कोण्या अधिकारी लेखकांनी ही त्रुटी भरून काढली तर मला आनंदच वाटेल.

* माझ्या दैनंदिन कामाच्या आणि पुस्तक-लेखनाच्या, छपाईच्या घबडग्यात, मजकुराबाबत थोडेसे आगेमागे झालेले आहे! विशेषतः परिशिष्टांबाबत. म. फुले आणि स्त्री-मुक्ति-आंदोलन या प्रकरणातील पं. रमाबाईच्या कार्यासंबंधीचा मजकूर वास्तविक परिशिष्टांमध्ये येणे अधिक युक्त ठरले असते. त्याचप्रमाणे 'जोती म्हणे–फुल्याची काव्यरचना' हे परिशिष्ट क्रमांक तीन म्हणून यावयाला हवे होते, आणि त्याप्रमाणे इतर परिशिष्टांचे क्रमांक बदलणे आवश्यक होते.

* शुद्धिपत्र–सूची वगैरे दिलेले नाही. वाचकांनी चूकभूल समजून घ्यावी!

* आणि आभार! किती जणांचे आणि किती किती परींनी मानावे? मी वाचलेले सर्व पूर्वसूरी-सर्व विचारांचे; ज्यांनी माझ्या मनाची मशागत केली; विचारांची जडण-घडण केली. पण त्याहीपेक्षा गेल्या चाळीस–पंचेचाळीस वर्षांतील विविध घटनांमधून आलेल्या अनुभवांची महती अधिकच. मी वाचले पुष्कळ, मनन केले पुष्कळ–पण अखेर विचार घडतात; बदलतात ते मुख्यतः घटनांनी–माणसांनी केलेल्या बऱ्यावाईट कृतींनीच! त्याबद्दल आभार कोणाचे आणि कोणी मानावे!

—प्रभाकर वैद्य

भाग पहिला : महात्मा फुले–प्रेरणा : शिकवण

प्रकरण १ ले

सत्यशोधक समाजाची शताब्दी

प्रास्ताविक

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. शंभर-सव्वाशे वर्षे चाललेला स्वातंत्र्यलढा यशस्वी होऊन इंग्रजांचे राज्य गेले.

● लोकमान्य टिळकांसारख्या आधी राजकीय म्हणून राजकारणाला प्राधान्य देणाऱ्यांचा म्हटला तर हा विजय समजावयाला हरकत नसावी; त्याचप्रमाणे तथाकथित राजनिष्ठांचाही हा पराभव म्हटला तर म्हणावे.

● मार्गाच्या दृष्टीने पाहिले तर अर्ज-विनंत्या, लोकजागृती, सामुदायिक चळवळ, प्रत्यक्ष प्रतिकार, सार्वत्रिक उठाव–अखेर सशस्त्र बंड–हे सर्वच प्रकार स्वातंत्र्य–लढ्याच्या प्रदीर्घ इतिहासात यथाक्रम यथाशक्ती हाताळले गेले; त्यांचा पुरस्कार व पुढाकार करणाऱ्या नेत्यांना त्या त्या वेळी सर्वसामान्य जनतेने कमीजास्त प्रमाणात पाठिंबाही दिला.

● पण टिळकांच्या लढाऊ राजकीय आंदोलनाच्या विजयाप्रमाणेच त्यांचा पराभवही तितकाच स्पष्ट आहे. जवळजवळ टिळकांच्या मृत्यूनंतर ब्राह्मणांचे राजकीय पुढारीपण साफच संपले; पुढील दहा-पाच वर्षातच त्यांचे उरले सुरले सामाजिक-सांस्कृतिक नेतृत्वही संपुष्टात येत गेले.

याचाच अर्थ असा की, म. फुल्यांनी सुरू केलेला (आणि विष्णुशास्त्र्यांनी ज्याला नष्ट केल्याचा दावा केलेल्या) ब्राह्मण वर्चस्वाविरुद्ध लढा, म्हटले तर संपूर्णतया यशस्वी झाला, असे म्हटल्यास हरकत नसावी.

पण त्याचबरोबर हेही खरे की, राजकारणातून व समाजकारणातून हकालपट्टी झालेले ब्राह्मण पुढारीपण पुन्हा नव्या स्वरूपात अवतीर्ण झाले! सावरकर-गोळवलकरांच्या हिंदु-राष्ट्रवादाच्या नव्या स्वरुपात-संघ-जनसंघाच्या नव्या अवतारात! प्रथम महाराष्ट्राबाहेर विस्तार पावून हे पुढारीपण गेल्या काही वर्षांत पुन्हा महाराष्ट्रात परत येत आहे; आणि जनमानसाची पकड घेण्याचा आटोकाट प्रयत्न करीत आहे. सावरकर-गोळवलकरांची छुपी लागण राज्यकर्त्या पक्षात किंवा बहुजनसमाजाच्या काही उच्चवर्णीय-वर्गीय वरिष्ट विभागांत होतच आहे! थोडे खरवडून पाहिले तर त्याचा प्रत्यय एका क्षणांत कोठेही येऊ शकतो! (पाकिस्तानच्या निर्मितीच्या वेळीही महाराष्ट्रात होऊ न शकलेल्या जातीय दंगली गेल्या काही वर्षांत जितक्या सहजतेने आणि सुकरतेने अगदी कुठेही होऊ शकतात आणि ज्यात ब्राह्मणांबरोबरच ब्राह्मणेतरही मोठ्या प्रमाणावर भाग घेतात, हे कशाचे प्रत्यंतर आहे?)

स्वातंत्र्यानंतर ब्राह्मणांचे एकुण पुढारीपण सर्वत्रच संपुष्टांत आले. पण तरीही स्वातंत्र्यानंतरची सत्ता ज्या विशिष्ट सामाजिक-आर्थिक गटांच्या ताब्यात गेली ते ब्राह्मणेतर उच्चवर्णीय–उच्चवर्गीयच होते.

म. फुल्यांचा ब्राह्मणवर्चस्वाविरुद्ध लढा हा खरोखर व मूलतः सर्वच जन्मजात विषमतेविरुद्ध-जातीवादाविरुद्ध सर्वंकष लढा होता. पण ही मूळ प्रेरणा बाजूला सारून ब्राह्मण पुढारीपणाऐवजी उच्च–कुलोत्पन्न ब्राह्मणेतर पुढारीपण प्रस्थापित करणे, असा सोयीस्कर गैरसमज ज्या काही स्वार्थसाधु-संधिसाधु पुढारीपणाने करून घेतला त्यांचाही म्हटले तर एकप्रकारे प्रत्यक्षांतच विजय झाला! पण हा तथाकथित विजय म्हणजे म. फुल्यांच्या महान् प्रेरणांचा खरोखर पराभवच होता! विजय असलाच तर तो फुल्यांच्या विपर्यासाचाच विजय होता!

विशेषतः संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर तर ब्राह्मणेतरांतील काही विशिष्ट स्वार्थसाधु-संधीसाधु सामाजिक-आर्थिक गटांनी बड्या भांडवलदारांशी लाचारीची आश्रित सोयरीक पत्करून मंत्रिमंडळापासून तो तहत जिल्ह्या-तालुका-ग्रामपातळीपर्यंत आपले सर्वंकष राजकीय-सामाजिक-आर्थिक वर्चस्व प्रस्थापित केले. त्याहूनही भयानक गोष्ट म्हणजे पुरातन ब्राह्मणवर्चस्वाच्या काळातील सर्व दुष्ट, घृणास्पद दुर्गुणांच्या प्रकर्षाचे प्रात्यक्षिक त्यांनी दाखविले! वर्ण वर्गश्रेष्ठत्व, राजकीय-सामाजिक-आर्थिक सत्तेची सर्वंकष मक्तेदारी, सामान्य जनतेवद्दलचा–विशेषतः म. फुल्यांना सदा प्रिय असलेल्या ग्रामीण गोरगरीब, भूमिहीन, हरिजन-गिरीजन आणि स्त्रिया यांवद्दलचा कमालीचा तिरस्कार, आम्ही कितीही भ्रष्ट असलो तरी श्रेष्ठच आहोत, ही नवी ब्राह्मणी उन्मत्त वृत्ती–नव्या निघृण ब्राह्मण्याचेच हे विविध आविष्कार होत!

● स्वातंत्र्यानंतर आणखीही एक महान् घटना घडली. मनुस्मृती जाळणाऱ्या तथाकथित धर्मद्रोही, देशद्रोही डॉ. आंबेडकरांना आधुनिक स्मृतिकार म्हणून, स्वतंत्र भारताच्या संविधानाचे शिल्पकार म्हणून गौरविण्यात आले आणि अस्पृश्यता

हा घटनासिद्ध गुन्हा ठरविण्यात आला.–म्हटले तर हा फुलेवादाचाच नव्हे तर आंबेडकरवादाचाही महान् विजयच समजला पाहिजे.

–पण तरीही अस्पृश्यता नष्ट तर झाली नाहीच; या नाही त्या स्वरूपात तर सर्वत्र ती दिसतच आहे. नव्या उच्चवर्णीय-उच्चवर्गीय अहंकारात नवी विषमता–नवी अस्पृश्यताही डोळ्यासमोर अवतार घेत आहे. हरिजन–गिरीजन स्त्रियांवरील दिवसाढवळ्या चाललेले विविध स्वरूपातील वैयक्तिक आणि सामुदायिक अत्त्याचार ही त्याची ढळढळीत प्रात्यक्षिके होत.

पण ही नवी अस्पृश्यता विषमता टिकविण्याचा आणखीही एक अभावित विलक्षण प्रकार म्हणजे अस्पृश्यता–मागासपणा हा एक नवा राजकीय-सामाजिक-आर्थिक प्रस्थापित हितसंबंध आहे, अशी मागास वर्गातील काही स्वार्थसाधु-संधिसाधु पुढारी-गटांनी करून घेतलेली समजूत व तद्नुसार त्यांनी चालविलेले प्रयत्न ही होय ! निवडणुका आणि सत्ताबाज राजकारण यांमध्ये उच्चवर्णीय-वर्गीय सत्तागटांनी दिलेले सौदेबाज उत्तेजन हे अर्थातच याच्या मुळाशी आहेच ! याचीच आणखी एक प्रतिक्रिया म्हणजे तथाकथित 'इतर' वादाचे राजकारण ही होय. प्रथम ब्राह्मणा-विरुद्ध ब्राह्मणेतर, नंतर मराठेतर, नंतर महारेतर असे मधून मधून उठणारे आवाज !

या सर्व प्रकारचा एकूण अर्थ काय ? खरोखर कोणाचा विजय झाला ? कोणाचा पराभव झाला ? टिळकांचा ? फुल्यांचा ? आंबेडकरांचा ?

की सर्वांचाच विजय झाला अन् सर्वांचाच पराभवही झाला ? की खरोखर आम्ही सर्वच जिंकलो ? अन् आम्ही सर्वच हरलो ? असाच खरोखर हा एकूण प्रकार आहे काय ?

वस्तुस्थितीच्या या किंचीत अतिशयोक्त वर्णनात थोडेफार तथ्य आहे, यात मात्र मुळीच संशय नाही.

पण मग खरोखर घडले आहे तरी काय ?

फुले, टिळक, आंबेडकर या सर्वांचाच अंशतः विजय झाला आहे, आणि सर्वांचाच अंशतः पराभवही झाला आहे, असे खरोखर म्हणण्याची पाळी आली आहे.

खरी गोष्ट अशी आहे की, या महान् नेत्यांच्या मूळ प्रेरणा आपण नीट समजलोच नाही; त्या आपण जितक्या मानल्या; तितकाच त्यांचा विपर्यासही आम्ही केला आणि तो विपर्यासच खरा मानला आणि त्यासाठी या द्रष्ट्याचेनेत्याचे नाव व प्रतिष्ठा आपण खुशाल वापरली !

शिवाय, एका विपर्यासाविरुद्ध दुसरा विपर्यासही आम्ही उभा केला; या आणि त्या नेत्यांच्या नावाने त्याचीच द्वाही फिरविली !

लंबकाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत; त्याचप्रमाणे एका विपर्यासा-पासून दुसऱ्या विपर्यासापर्यंत आम्ही बेभानपणे हेलकावे खात राहिलो !

आमच्या क्रिया खरे म्हणजे क्रिया नसून पुष्कळदा प्रतिक्रियाच होत्या! मूळ प्रेरणांची समज आमच्या अंगी बाणण्याऐवजी आम्ही पुष्कळदा गैर-समज-विपर्यासच अंगी बाणविले;–हट्टाने, हिकमतीने, हिंमतीने!

मूळ प्रेरणेचा निखळ स्वीकार आणि त्यांच्या विपर्यासांचा निःस्संदिग्ध धिक्कार केल्याचे काही सुवर्ण क्षणही आम्ही निःसंशय बघितले. वरील सर्वच नेत्यांच्या नेतृत्वाखाली असे मूळ शुद्ध प्रेरणाचे द्विव्य दर्शन आम्हाला घडले! पण ते अगदी अत्यल्प काळच. त्यानंतर पुन्हा प्रतिक्रिया–पुन्हा विपर्यास–पुन्हा लंबकाचे हेलकावे!

आज वेगवेगळ्या द्रष्ट्यांशी–नेत्यांशी संबंधित असे शताब्दी महोत्सव वारंवार येत आहेत. या निमित्तांने शंभर–सव्वाशे वर्षांच्या इतिहासाचे एकत्रित-समग्र-संकलित दर्शन घेण्याची संधी मिळत आहे.

म. फुले यांनी शुद्ध ज्ञान-विज्ञान निष्ठेचा आणि प्रखर बुद्धिवादाचा सतत आग्रह धरला. मूर्तिपूजा, कर्मकांड, नवस, व्रत–वैकल्ये, भोळसटपणा, भाकडकथा, अवतारबाजी, बुवाबाजी या सर्वांचा त्यांना अतिशय तिटकारा होता. पण फुल्यांचे नाव घेणारे मोठमोठे नेते, समाजसेवक, मंत्रि, अधिकारी आज जेव्हा वेगवेगळ्या बुवांचे, भाकडकथांचे, चमत्कारांचे, स्थानमहात्म्याचे जाहीरपणाने स्तोम माजवितात, तेव्हा ते फुल्यांच्या शिकवणीतील एका अत्यंत महत्त्वाच्या आदेशाची उघड पायमल्ली करीत आहेत हे लक्षात ठेवले पाहिजे. विशेषतः बहुजनसमाजाच्या नेत्यांकडून असे वर्तन होणे, हे तर अधिकच घातक ठरत आहे.

फुल्यांचे 'अनधिकृत' वारसदार

● शंभर वर्षांचा इतिहास पाहिला तर आणखी एक विलक्षण गोष्ट नजरेस येते, ती म्हणजे ज्यांचे नाव फुल्यांशी फारसे निगडित नाही अशांनीच खरोखर फुल्यांच्या मूळ प्रेरणा बदलत्या काळाच्या संदर्भात पुढे नेल्या आहेत.

● उदाहरणार्थ; फुल्यांच्या डोळ्यासमोर मुंबईमध्ये कामगारवर्ग अगदी नव्यानेच निर्माण होत होता,हळूहळू पण निश्चित आकार घेत होता. फुल्यांचे एक आद्य शिष्य श्री. लोखंडे यांनी फुल्यांच्या प्रेरणेवरूनच त्या नवोदित कामगारवर्गात प्राथमिक कार्य सुरू केले.

पुढे फुल्यांचे तथाकथित वारसदार या नव्या क्रांतिकारक कामगार शक्तीला विसरले किंवा पुढे वेइमानही झाले. पण कम्युनिस्टांनी वर्गलढ्यांचे–वर्गसंघटनांचे महान् कार्य केले आणि त्याला कामगारवर्गाच्या क्रांतिकारक तत्त्वज्ञानाची भरभक्कम बैठक देण्याचा प्रयत्न केला. फुल्यांच्या महान् प्रेरणांचा हा खरोखरच विधायक विकासक्रमच समजला पाहिजे. श्री. दिनकरराव जवळकरही काही वर्षांनंतर त्याच मार्गाकडे वळले होते आणि शे. का. पक्षाच्या दाभाडी प्रबंधानंतर महाराष्ट्रातील ग्रामीण विभागातही ते लोण हळूहळू पण निश्चितपणे सर्वत्र पोचले.

ज्यांनी आदिवासी विभागात, ठाणे, कुलाबा, नगर-नाशिक, खानदेश, अमरावती वगैरे जिल्ह्यांतील वेगवेगळ्या आदिवासी जमातींत प्रथम जागृती, संघटना, लढे केले; त्याचप्रमाणे तथाकथित गुन्हेगार जमाती, भटक्या, अर्धभटक्या जमाती यांच्यामध्ये ज्यांनी अत्यंत निष्ठेने, कष्टाने, जिद्दीने, इमानाने कार्य केले आणि या सर्वांना व्यापक क्रांतिकारक लढ्यांमध्ये सामावून घेण्याचा प्रयत्न केला– त्या कम्युनिस्ट-सोशालिस्ट व इतर डाव्या शक्तींनीच खरोखर फुल्यांच्या मूळ प्रेरणा व शिकवण पुढे नेली आहे.

त्याचप्रमाणे स्त्रियांमध्ये विशेषतः त्याच्या वेगवेगळ्या श्रमिक, दलित, पीडित, उपेक्षित विभागांमध्ये ज्यांनी कार्य केले, त्यासाठी जन्म जन्म खर्ची घातले त्यांनीही खरोखर फुल्यांच्या शिकवणींतील एक सर्वांत कठीण, सर्वांत उपेक्षित, असे कार्यच निःसंशय पुढे नेले आहे.

● तेव्हा फुल्यांच्या एकूण प्रेरणांचा, शिकवणीचा व परंपरेचा विचार करताना केवळ अधिकृत ठेकेदारांचा आणि तथाकथित वारसदारांचाच विचार न करता कामगार, भूमिहीन, शेतमजूर, आदिवासी, मागास जाति-जमाती व स्त्रिया यामध्ये ज्यांनी ज्यांनी निष्ठेने, इमानाने, चिकाटीने काम केले त्या सर्वांचा आवर्जून विचार झाला पाहिजे.

सत्यशोधक समाजाच्या स्थापनेच्या शताब्दीमहोत्सवाच्या निमित्ताने म. फुले आणि त्यांची कार्य-परंपरा याबाबत सध्या बरेच लिखाण प्रसिद्ध होत आहे.

गेल्या काही वर्षात इतरही काही महत्त्वाचे शताब्दी-समारोह साजरे झाले. न्या. रानडे, लो. टिळक, आगरकर, गोखले व कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांचे जन्मशताब्दी महोत्सव साजरे झाले. आणि राजर्षी शाहू छत्रपति यांचा सुरू आहे. याशिवाय महात्मा फुले, लोकहितवादी, न्या. रानडे, टिळक, आगरकर, गोखले, कर्वे, राजर्षी शाहू, सावरकर, आंबेडकर वगैरेंची सविस्तर चरित्रे प्रसिद्ध झाली आहेत; किंवा त्यांच्या नव्या आवृत्त्या निघत आहेत.

या साऱ्या साहित्यांमध्ये शताब्दी महोत्सव म्हणून गुणगौरवाला प्राधान्य मिळणे,–त्यात क्वचित अतिशयोक्ती होणे अपरिहार्य आहे.

पण त्यामध्येच मधून मधून कोणा एकाचा गुणगौरव करताना दुसऱ्या कोणाचे अवमूल्यन करण्याचे प्रयत्नही होत आहेत! कित्येकदा तर कोणाच्या गुणगौरवापेक्षा कोणाच्या तरी निंदेलाच अधिक महत्त्व मिळाल्याचेही चमत्कारिक प्रकार बघायला मिळत आहेत!

● यातूनच गेल्या शे–सव्वाशे वर्षांत होऊन गेलेल्या वादांचा वृत्तांत सांगताना, काही लेखक ते वाद नव्या आवेशाने परत लढविण्याचे, चालू ठेवण्याचेही कार्य पुन्हा नव्यानेच सुरू करीत आहेत की काय, अशी शंका येण्याइतपत परिस्थिती निर्माण होत आहे!

● शिवाय शताब्दीविषय झालेली विभूति किंवा तिचे कार्य यांचा केवळ गुण–गौरव करणे म्हणजे संपूर्ण सत्य किंवा इतिहास सांगणे असा अर्थ नसतोच. म्हणजेच या महोत्सवाच्या निमित्ताने अनेक अर्धसत्ये सांगितली जाण्याचाही संभव असतो!

हे प्रकार थोडे प्रासंगिक, थोडे अत्युत्साहाचे, थोडे विभूती-पूजेचे किंवा थोडे पूर्वग्रहाचे असे मानून, ते मनावर न घेणे शक्य आहे.

● पण यातच आणखी एका गोष्टीची भर कधी कधी पडते. ती म्हणजे चालू वादांच्या संदर्भात जुन्या वादांचा किंवा घटनांचा किंवा विभूतींचा उल्लेख–किंबहुना उपयोग करू पाहणे ही होय! आणि अशा गोष्टी वारंवार घडू लागल्या, त्यात एक पद्धतशीरपणा दिसू लागला तर मग मात्र अधिक सावधान होण्याची गरज भासते. विशेषतः विशिष्ट प्रस्थापित हितसंबंधांच्या–वर्गाच्या पुढारीपणाच्या, त्यांच्या आजच्या धोरणांच्या राजकारणाच्या संबंधांत असे प्रयत्न पद्धतशीरपणे होऊ लागले तर त्यांची गंभीरपणे दखल घेणे अपरिहार्यच होते.

यातही आणखी एक महत्त्वाची गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे; ती म्हणजे महाराष्ट्राची आजची जी एकूण वास्तव परिस्थिती आहे, जी काय त्याची जडण-घडण होत आलेली आहे, त्यातून जे वेगवेगळे वर्गीय–आर्थिक-राजकीय-सामाजिक हितसंबंध निर्माण झालेले आहेत, त्यांच्यात जे परस्पर सहकार्य किंवा संघर्ष आहेत, त्यांचेपैकी प्रत्येकाचे धागेदोरे गेल्या शंभर-सव्वाशे वर्षांच्या इतिहासात उभे-आडवे गुंफलेले–गुंतलेले आहेत!

त्यामुळे कोणताही इतिहास किंवा वाद किंवा व्यक्ति-विभूती यांच्यासंबंधी बोलायचे तर त्यांचा संबंध प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे आजच्या कोणाशी तरी कशाशीतरी येऊन भिडतोच! आणि त्याच्या अनुकूल प्रतिक्रिया ताबडतोब उमटू लागतात; संवादी-किंवा विसंवादी तारा छेडल्या जातात!

आणि यात गैर किंवा अस्वाभाविक असे काहीच नाही. आपण सगळीच जिवंत माणसे आहोत; आपल्या सगळ्यांनाच जुना-नवा इतिहास आहे, त्यांमध्ये आपण सगळ्यांनीच काहीतरी बरे वाईट केलेले आहे, घडविलेले आहे! त्याचे इष्ट-अनिष्ट परिणाम झालेले आहेत. त्यामुळे काही ग्रह-पूर्वग्रह, आळ्या–गाठी गंड निर्माण झालेले आहेत; अभिमान-दुरभिमान वाढीला लागलेले आहेत.

तेव्हा कोणीही, केव्हाही, काहीही चांगले केले असेल तर त्याला आता तरी चांगले म्हटले पाहिजे; वाईट केले असेल तर वाईटही म्हटले पाहिजे. हा इतिहासाच्या न्यायाचाच केवळ प्रश्न नाही, तर अत्यावश्यक आत्मपरिक्षणाला अत्यंत उपयुक्त अशी ती गोष्ट आहे. विशिष्ट काळी विशिष्ट व्यक्तीने किंवा (सामाजिक) गटाने काय केले या गोष्टीची वास्तव नोंद घेणे, त्याला बरेवाईट म्हणणे याला तसे महत्त्व आहेच, पण त्याने तेव्हा तसे का केले, तेव्हा ते टाळण्यासारखे होते काय? निदान

आज तसेच काही घडण्याचा धोका असेल तर ते टाळता येण्याच्या दृष्टीने जुना भला-बुरा अनुभव उपयोगी पडतो काय ? या दृष्टीने विचार करणे ही खरी महत्त्वाची गोष्ट आहे, ती खरी आजची गरज आहे.

त्याचप्रमाणे विशिष्ट व्यक्ती, गट, समाज यांच्या विशिष्ट प्रसंगी घडलेल्या वर्तनाचा विचार त्या त्या वेळच्या परिस्थितीच्या संदर्भातच केला पाहिजे. आणि तो संदर्भही जर नीट समजून घ्यावयाचा असेल तर इतिहासाचा मुख्य प्रवाह; त्याची वळणे, त्या प्रवाहाची गती, तिची प्रेरणा यांचा संकलित विचार आवश्यक ठरतो. इतिहासाच्या प्रवाहाचा–गतिमानतेचा, त्यामागील प्रेरणांच्या दृष्टीने विचार केला तर विशिष्ट व्यक्तीची-गटाची विशिष्ट कृती व तिचे परिणाम हे सर्व एका वेगळ्याच संदर्भात–वेगळ्याच प्रकाशात दिसायला लागतात आणि त्यांतून प्रकट होणारा अन्वयार्थही वेगळाच वाटतो.

म्हणून सध्या वेगवेगळ्या विभूती, प्रसंग, आंदोलने यांचा जो सुटा–सुटा, वेगवेगळा विचार चालतो, तो एकत्रित संकलित स्वरूपात करणे आवश्यक आहे. त्यामागे काही इतिहासाचे सूत्र सापडते काय इ. बघणे, विशिष्ट सामाजिक गट तेव्हा जरी धर्म, जात, भाषा, प्रदेश यावरून वेगवेगळे ओळखले गेले असले तरी त्यामागे काही वर्गीय प्रेरणा दिसते काय, हे तपासण्याची वेळ आता आली आहे. कारण, तेव्हा नसलेले किंवा अगदी पुसट असलेले वर्ग आज स्पष्ट झाले आहेत, पुष्ट–बलिष्ट झाले आहेत. त्यांचे आपापसातील वर्गसंघर्ष अधिक तीव्र होत आहेत; या वर्गसंघर्षाचा परिणाम साऱ्या समाजावर, त्याच्या भवितव्यावर घडत आहे; अधिकाधिक घडणार आहे आणि म्हणूनच जुन्या इतिहासाचा, त्यातील लागेबांध्यांचा फायदा आजच्या संघर्षासाठी घेण्याचे प्रयत्न चालू आहेत !

विशेषतः उच्चवर्णीय-उच्चवर्गीय सत्ताधारी गट जुन्या विभाजक इतिहासाचा–त्यातील वंश, धर्म, जात, भाषा प्रदेश यावर माजलेल्या वादांचा-संघर्षांचा उपयोग आजच्या श्रमिक–शोषित–दलित जनतेत फाटाफूट पाडण्याच्या कामी पद्धतशीरपणे, योजनापूर्वक करू लागला आहे. जुन्या विभूतींचा–त्यांच्या विभूतीमत्वाचा, त्यांच्या कार्याचा, शिकवणीचा विपर्यास करण्यास हे सत्ताधारीवर्ग कमी करीत नाहीत ! किंबहुना ही त्यांची नीतीच आहे ! तो त्यांचा नेहमीचाच डावपेच आहे !

म्हणून महाराष्ट्रातील गेल्या शंभर-सव्वाशे वर्षांचा त्यातील विचारप्रवाहांचा, वादांचा, विभूतींच्या कार्याचा-शिकवणीचा एकत्रित. संकलित विचार, इतिहासाच्या मुख्य सूत्राच्या संदर्भात करणे आज अत्यंत आवश्यक झाले आहे. असा तो केला तर प्रत्येक विभूतीची मूळ प्रेरणा, शिकवण, कार्य;–त्याचा विपर्यास, त्याचा एकूण परिणाम, त्यातील इष्ट, अनिष्ट भाग आणि त्याचा आजचा खराखुरा संदर्भ समजावयाला सोपे होईल.

● या दृष्टीने गेल्या शंभर वर्षांतील विचारमंथनांचा आणि सामाजिक संघर्षांचा आढावा घेण्याचा अल्प प्रयत्न सध्या मी करीत आहे. त्या प्रयत्नाचा एक भाग म्हणून महात्मा फुले आणि त्यांची मूळ प्रेरणा, त्यांची शिकवण आणि तिचा झालेला विपर्यास, त्यांच्या विरोधकांनी आणि अनुयायांनीही त्यात टाकलेली भर यांचा थोडासा आढावा घेण्याच्या दृष्टीने काही टिपणे मी केली आहेत; काही ढोबळ निष्कर्षही त्यातून निघतात असे मला वाटते.

मी उपस्थित केलेले प्रश्न जरूर वादग्रस्त आहेत. काही नाजूक गोष्टींसंबंधी बोलणे जेव्हा अगदी आवश्यक आणि अपरिहार्य वाटले तेव्हा मी त्यांचाही उल्लेख केला आहे.

या लिखाणात माहितीच्या किंवा तपशिलाच्या दृष्टीने काही चूक आढळल्यास अर्थात मी ती ताबडतोब दुरुस्त करीन. पण मताचा प्रश्न असल्यास त्याबद्दल वाद होईल व तो झालाच पाहिजे.

● या विवेचनात आलेल्या कित्येक प्रश्नांबाबत कम्युनिस्ट चळवळीने अधिकृत किंवा रीतसर असा फारसा विचार केलेला दिसत नाही. तेव्हा येथे व्यक्त झालेली मते माझी वैयक्तिक समजावी. त्यावर जी काय बरीवाईट टीका होईल, त्याची संपूर्ण जबाबदारी माझी आहे.

हा विषय आणि त्यावरील चर्चा अर्थातच आताच एवढ्याने संपणारी नाही. कदाचित ती अधिकच वाढणार आहे; जिवंत होणार आहे;—कदाचित ज्वलंतसुद्धा! कारण शंभर वर्षांत वादविषय झालेले अनेक प्रश्न आजही वादग्रस्त आहेत—जिवंत आहेत, ज्वलंत आहेत. त्यांचा आजचा संदर्भ, त्यांची आजची परिभाषा, त्यातील जनतेचे आजचे हितसंबंध हे सर्व ध्यानात घेऊनच आज चर्चा झाली पाहिजे. तशी चर्चा आजचे महत्त्वाचे तात्त्विक सामाजिक-वर्गीय प्रश्न सोडविण्याच्या कामी उपयुक्त ठरू शकेल. या दृष्टीने या लिखाणाची चर्चा व्हावी एवढीच अपेक्षा आणि प्रार्थना!

सत्यशोधक समाजाचा नवा जाहिरनामा

महात्मा ज्योतीराव फुले, त्यांनी प्रतिपादिलेला सार्वजनिक सत्यधर्म आणि स्थापन केलेला सत्यशोधक समाज यांचे गुणगान करण्याची एक आता प्रथा पडत आहे. फुले यांची जयंती आणि पुण्यतिथी दरवर्षी नियमितपणे साजरी केली जाते. सामाजिक समतेचा प्रश्न निघाला की फुल्यांच्या कार्याची महत्ता न चुकता गायिली जाते.

म. फुले यांचे पुतळे महाराष्ट्राच्या प्रत्येक शहरात—सामान्यतः मंडईमध्ये उभारले जात आहेत. (गावोगाव मंडईमध्येच फुले स्मारक का? याचा मात्र फारसा

विचार सहसा कुणी करत नाही!) त्यांचे नावही मंडईला देण्याची जणू प्रथाच पडली आहे. महाराष्ट्र शासनाच्या व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व कार्यालयात म. फुल्यांची प्रतिमा लावली जाते.

इतर समाजसुधारकांच्या कार्याचा गौरव करतानाही म. फुल्यांच्या प्रेरणेचा उल्लेख आवर्जून होतो.

फुले यांच्या या गुणसंकीर्तनात सामान्यतः समाजाचे सर्वच विभाग, वेगवेगळ्या मतांचा आग्रह धरणारे विचारवंत, विचारपंथ, राजकीय पक्ष सारेच सामील होत असतात.

गेले वर्षभर तर सत्यशोधक समाजाचा स्थापनाशताब्दी महोत्सव महाराष्ट्रभर चालू होता. इतर प्रांतातील लोकांनाही फुल्यांच्या महान् कार्याचा परिचय करून देण्याचे थोडेफार प्रयत्न होत आहेत. पोस्ट खात्यामार्फत त्यचवेळी फुल्यांच्या नावाने पोस्टाचे तिकिट काढण्याचा निर्णयही भारत सरकारने घेतला.

महाराष्ट्र सरकारने पुढाकार घेऊन फुले-महोत्सवाला लोकमान्यतेप्रमाणेच राजमान्यता देऊन यथाशक्ती मदतही केली. त्यामुळे सर्व समारंभांत मुख्य वक्ते म्हणून मंत्रिगण किंवा राज्यकर्त्या पक्षाचे प्रमुख नेते हजेरी लावण्यास सहसा चुकत नाहीत.

म. फुले यांच्या महान् कार्याला मिळणारी ही लोकमान्यता आणि राजमान्यता योग्यच आहे. पण त्यामध्ये आता एक प्रकारची औपचारिकता येऊं लागली आहे. देव्हाऱ्यात देवाची प्रतिष्ठापना केली की बाकी सर्व जबाबदाऱ्यांतून मुक्तता झाली, असे समजण्याची प्रवृत्ती बळावत आहे! फुल्यांना लोकमान्यता आणि राजमान्यता मिळाली म्हणजे त्यांच्या जीवितकार्याचे आता साफल्य झाले; आता फक्त त्यांच्या स्मृतीचे जतन करणे तेवढे बाकी राहिले, असा आभास निर्माण होण्याइतपत आता मजल जात आहे.

म. फुले यांच्या वादळी व्यक्तिमत्वाला आणि त्यांच्या ज्वलंत क्रांतिकारक सदा युयुत्सु वृत्तीला ही पूजा स्वचित मानवली नसती. या एकमताच्या लोकमान्यतेपेक्षा आणि राजमान्यतेपेक्षा जन्मभर सोसलेली वादग्रस्तता नक्कीच त्यांनी पसंत केली असती!

सत्यशोधक समाजाच्या स्थापनाशताब्दीच्या निमित्ताने शंभर वर्षांनंतर त्या समाजाचा नवा जाहीरनामा काढण्याची कल्पना निघाली, आणि काही विचारवंतांनी तसा प्रयत्नही केला. या नव्या जाहिरनाम्यालाही लोकमान्यता व राजमान्यता मिळण्याची कल्पना असावी ही कल्पना व हा प्रयत्नही स्वतः म. फुल्यांना कितपत पसंत पडला असता, हा प्रश्नच आहे! फुले यांच्या कार्याची सांगता होण्याची वेळ आली आहे; त्यांची क्रांतिकारक शिकवण एकूण समाजाने व शासनाने स्वीकारलेली आहे, आत्मसात केलेली आहे, पचनी पाडलेली आहे असा ध्वनी यामध्ये उमटतो.

स्पष्टच बोलायचे तर मला या सर्व प्रकारात फार मोठा धोका दिसतो; मतलबी स्थापित हितसंबंधांचा हा एक वरवर भाबडा दिसणारा पण वस्तुतः मतलबी असा कावा यात मला दिसतो !

सत्यशोधक समाजाचा शंभर वर्षांनंतर नवा जाहिरनामा काढावयाचा आणि तोही एकमताने काढावयाचा–त्याला लोकमान्यता आणि राजमान्यता मिळेल अशा अपेक्षेने हे करायचे, याला धाडस म्हटले तर म्हणावे. मला तर एक दुसराच शब्द सुचत आहे !

खरी गोष्ट अशी आहे की, ज्यांनी सर्वसंमत जाहीरनामा लिहावयाचा आणि ज्यांनी तो अंमलात आणावयाचा त्या सर्व संबंधितांनी आपण फुल्यांच्या स्मृतीने हे करीत आहोत; त्यांच्या प्रखर सत्यप्रीतीला साक्षी ठेवून हे करीत आहोत, कृती-वाचून बोल व्यर्थ आहेत, असे मानणाऱ्या आणि या निष्ठेपायी जीवनाचा क्षणा-क्षणाने व कणाकणाने होम करणाऱ्या महात्मा फुल्यांचे नाव आणि प्रतिष्ठा आपण वापरीत आहोत, या गोष्टीचा क्षणभर तरी विचार करावा आणि मगच हे उर्मट धारिष्ट दाखवावे.

आता चार माणसांनी बसावयाचे आणि चार सर्वसाधारण तत्त्वे लिहून काढावयाची आणि त्यांना लोकमान्यता व राजमान्यता मिळेल, या समाधानात महोत्सवाची सांगता करावयाची, इतकी ही साधी किंवा भोळीभाबडी बाब नाही ! एक तर ती वंचना किंवा आत्मवंचना तरी ठरेल, किंवा त्यातूनही वाईट म्हणजे ती एक प्रतारणाच ठरेल !

असा नवा जाहीरनामा लिहिण्याची पूर्वतयारी व पूर्वअट म्हणजे गेल्या शंभर वर्षांच्या संबंधित इतिहासाचे कठोर परिक्षण व्हावयाला हवे; आणि त्याहूनही अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे सर्व संबंधितांनी त्याहूनही कठोर असे आत्मपरीक्षण करावयाला पाहिजे. म. फुल्यांच्या पवित्र स्मृतीपुढे आणि इतिहासापुढे विनम्र होण्याचा हा क्षण आहे. त्याला आत्मगौरवाची, स्वयंतुष्टतेची, आत्मवंचनेची, किंवा प्रतारणेची बाधा होता कामा नये ! अशी ज्यांची तयारी असेल त्यांनीच नवा जाहीरनामा लिहिण्याचे धाडस करावे; त्यांनाच शताब्दी साजरी करण्याचा खरा अधिकार प्राप्त होईल.

पन्नास वर्षांपूर्वी महात्मा फुल्यांच्या जन्मशताब्दीची परवड !

ज्योतिरावांच्या या महोत्सवाच्या प्रसंगी काही जुन्या गोष्टी आठवणे अपरि-हार्य आहे. त्यांनी स्थापिलेल्या सत्यशोधक समाजाची शताब्दी आपण आज सर्वजण एकदिलाने साजरी करीत आहोत, ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. पण खुद्द ज्योतिरावांची जन्मशताब्दी सुमारे ५० वर्षांपूर्वी आपण कशी काय साजरी केली

होती ? तर पुण्याच्या नगरपालिकेने त्यांचा पुतळा उभारावा, हा प्रस्ताव त्यावेळी वादग्रस्त ठरला होता. त्यावर अनेक दिवस रणे माजली होती आणि आज आपला विश्वासही बसणार नाही; पण पुण्याच्या तत्कालीन नगरपालिकेने हा ठराव तेव्हा फेटाळून लावला होता ! फेटाळून लावण्यात पुढाकार घेणारे अर्थातच केसरीनिष्ठ पांढरपेशे होते. पण त्यांना साथ कुणी द्यावी ? तर खुद्द ज्योतिरावांचे निकटचे पौत्रसमान आप्त श्री. बाबुराव फुले यांनी ! आणि हा ठराव ज्यांनी फेटाळला ते स्वतःला देशभक्त म्हणवत आणि महाराष्ट्राचे पुढारीपण करीत असल्याचा तेव्हा दावा सांगत ! आणि फुले हे छुपे खिस्ती होते आणि ब्रि. सरकारशी राजनिष्ठ होते, असा कुत्सित आरोप करण्यात त्यांच्या दोन पिढ्या खर्ची पडल्या होत्या ! * ऐतिहासिक वस्तुस्थिती अशी होती की, ज्या पुणे नगरपालिकेने फुले-स्मारकाचा ठराव फेटाळला होता, त्याच नगरपालिकेत स्वतः फुले ५०–७५ वर्षापूर्वीचे एक सन्माननीय, लोकहितदक्ष आणि बाणेदार सभासद म्हणून गाजले होते. इंग्रजी गव्हर्नराला मानपत्र देण्यासाठी नगरपालिकेने कवडीही खर्च करू नये, असे निर्भयपणाने मांडणारे म. फुले हेच एकमेव तथाकथित 'राजनिष्ठ' तेव्हा निघाले होते ! फुल्यांच्या स्मारकाला विरोध करणाऱ्या 'केसरी'निष्ठांनी निदान फुल्यांच्या खुद्द 'केसरी'बद्दलच्या थोर वर्तणूकीचा तेव्हा तरी विचार करावा. पण त्यासाठी आणखीन थोड्या आठवणींना उजाळा दिला पाहिजे.

फुल्यांचा थोरपणा आणि 'केसरी'चा कोतेपणा !

महात्मा फुल्यांच्या लेखनाबद्दल आणि मताबद्दल 'केसरी'चे गुरू श्री. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी निबंधमालेत अत्यंत अज्ञानमूलक,, अनुदार, निरर्गल, विपर्यस्त टीका केली होती. फुल्यांवर खिस्ती मिशनऱ्यांचे व सरकारचे हस्तक असल्याचे खोटे आरोप केले होते आणि फुल्यांना कायमचे निकालात काढल्याच्या समाधानात ते शास्त्रीबोवा तेव्हा मग्न झाले होते. पण थोड्याच वर्षानंतर त्याच विष्णुशास्त्र्यांचे तरुण अनुयायी, टिळक–आगरकर यांच्यावर सरकारने खटला भरून शिक्षा दिली (१८८२) तेव्हा विष्णुशास्त्र्यांची टीका विसरून म. फुल्यांनी या दोन तरुण त्यागी निर्भय देशभक्तांचा जाहीर सत्कार करण्यात पुढाकार घेतला होता. (त्यावेळी म. फुले हे नामवंत ज्येष्ठ नेते होते; आणि टिळक-आगरकर हे ऐन पंचविशीतले तरणेबांड होतकरू कार्यकर्ते होते, ही गोष्ट लक्षात घेतली म्हणजे फुल्यांच्या मनाचा दिलदारपणा, गुणग्राहकता अधिकच नजरेत भरते). फुल्यांच्या मनाचा थोरपणा कुणीकडे आणि त्यानंतर ५० वर्षांनी फुल्यांच्या जन्मशताब्दीच्या वेळीही त्यांचे स्मारक उधळून लावणाऱ्या 'केसरी'निष्ठांचा मनाचा कोतेपणा कुणीकडे ?

इतिहासाने उगविलेला सूड !

याहूनही महत्त्वाची गोष्ट म्हणजे फुल्यांचे स्मारक उधळून लावले गेले त्यावेळीही, पुढारीपणाची जन्मजात मक्तेदारी सांगणाऱ्या या तथाकथित नेत्यांचे

पुढारीपण झपाट्याने संपुष्टात येत होते; पण त्याची त्यांना शुद्धसुद्धा नव्हती ! पुढील पाच-सात वर्षांतच या जन्मजात, पिढीजाद परंपरागत नेते घराण्यांचे पुढारीपण अक्षरशः मोडीत निघाले ! आणि फुल्यांचे नाव अभिमानाने सांगणाऱ्या नव्या दमदार श्रमिक जनतेशी जिवंत संबंध असणाऱ्या तरुण नेत्यांकडे महाराष्ट्राचे पुढारीपण गेले !

पुढील काही वर्षांतच पुणे नगरपालिकेने प्रथम फेटाळलेले फुले स्मारक दिमाखात उभे राहिले; पुण्यातच नव्हे, तर महाराष्ट्राच्या प्रत्येक नगरपालिकेत ! आणि ज्या विष्णुशास्त्र्यांच्या अज्ञानमूलक, कोत्या दृष्टीने महाराष्ट्राच्या पुढारीपणाची दृष्टी सतत ५० वर्षे दूषित आणि संकुचित करून सोडली होती, त्याच विष्णुशास्त्र्यांचे स्मारक कसेबसे सांभाळणे पुढे कठीण होत गेले !

हा केवळ विष्णुशास्त्री व फुले या व्यक्तींचा प्रश्न नाही, किंवा केवळ काळाने उगवलेला सूड असे म्हणण्याइतकाच हा केवळ ऐतिहासिक न्यायाचाही प्रश्न नाही.

प्रश्न खरा असा आहे की, इतिहासाची अशी भूल होते तरी कशी ? पिढ्यान् पिढ्या ती चालू राहते तरी कशी ? आणि ५० वर्षांनी ती भूल नजरेस आल्यानंतर तरी ती खरोखरच सुधारली गेली आहे काय ? खरी गोष्ट अशी आहे की, 'वर्णांना ब्राह्मणो गुरु' आणि 'कितीही भ्रष्ट असला तरी ब्राह्मण श्रेष्ठच' हा पुढारीपणाच्या जन्मजात मक्तेदारीचा कैफ खरोखर फारसा कधीच उतरलेला नाही !

'लोकहितवादी'चा जिवंत मृत्यू !

तशी अनेक ब्राह्मण विचारवंतांनी आत्मटीका–किंबहुना आत्मनिंदासुद्धा काही कमी केलेली नाही. अव्वल इंग्रजीच्या पहिल्या भरात तर अशी टीका फारच मोठ्या प्रमाणावर झाली. म. फुल्यांचे समकालीन 'लोकहितवादी' गोपाळ हरी देशमुख या सरदार घराण्यातील एका विचारवंताने ब्राह्मणांवर जन्मभर सतत टीका केली; तीही अगदी सडेतोड, तपशीलवार आणि तितकीच मूलगामी. या टीकेतील तळमळ, त्वेष, ब्राह्मणांच्या पोकळ अहंकाराबद्दलचा तिरस्कार फुल्यांच्या लिखाणातच शोभून जाण्याइतपत आहे ! पण या टीकेची दखल एकूण ब्राह्मणवर्गाने काय घेतली ? ज्या ब्राह्मणांनी ती प्रत्यक्ष वाचली ते चरफडले, भडकले. इतरांनी लोकहितवादीनाच मूर्खात काढले ! थोड्याच दिवसात लोकहितवादींचे लिखाण अक्षरशः मृतवत् झाले. विष्णुशास्त्र्यांनी निबंधमालेत त्यावर नेहमीप्रमाणे विषारी, विपर्यस्त टीका करून ब्राह्मणांच्या दृष्टीने लोकहितवादींना, फुल्यांना काढले त्याप्रमाणेच, कायमचे निकालात काढले ! तेव्हापासून जवळजवळ ७५ वर्षे लोकहितवादी हे नाव आणि त्यांचे मोलाचे मूलगामी लिखाण संपूर्णपणे पडद्याआड गेले ! पुढील तीन पिढ्यांनी विष्णुशास्त्री चिपळूणकरांना डोक्यावर घेतले,–त्यांचे कोत्या बुद्धीचे विपर्यस्त आत्म-संतुष्ट लिखाण प्रमाणभूत मानले; आणि ब्राह्मणाच्या आत्मटीकेचा मार्गच कायमचा बंद करून टाकला ! न्या. रानडे–भांडारकर एवढे मोठे प्रकांड पंडित; त्यांचे एवढे

उत्तुंग व्यक्तिमत्व; त्यांना दीर्घकाळ लोकमान्यता व राजमान्यता दोन्ही लाभलेली. पण त्यांनी मांडलेली अगदी सौम्य मवाळ सुधारक मतेसुद्धा ब्राह्मणवर्गाने गुपचूप बासणात बांधून ठेवली !

सनातनी आणि सुधारक–दोघेही ब्राह्मणच !

त्यानंतर आले टिळक-आगरकर. दोघांच्याही प्रेरणा एकच; अभ्यासाचे गुरूग्रंथ एकच; प्रारंभी दोघांची मतेही एकच; ती मते इतकी बुद्धिवादी व सुधारकी की, दोघांनी मिळून न्या. रानाड्यांसारख्या सर्वमान्य जेष्ठ नेत्याला सनातनी, श्रद्धावादी ठरवून त्याच्यावर जाहीर टीका केली होती.

पण थोड्याच वर्षांत आधी राजकीय की सामाजिक जसा खोटा भ्रामक वितंडवाद घालून टिळकांनी आगरकरांची संगत सोडली आणि पुढील दहा वर्षे सनातनीविरुद्ध सुधारक असा नसता वाद माजविला ! वास्तविक हा वाद फारच मर्यादित अर्थाने मूलभूत असा होता आणि त्याची व्याप्ती मुख्यतः पांढरपेशावर्गापुरतीच सीमित होती. मुख्यतः विधवाविवाह, बालविवाह, स्त्री-शिक्षण या स्वरुपातच तो फारतर शहरी पांढरपेशांसमोर काय तो आला आणि लढविला गेला. अगदी हमरी-तुमरीचे, कटोकटीचे वाद झाले तरी तेही मुख्यतः ब्राह्मण पांढरपेशांमध्येच; एका परीने हे ब्राह्मण-पांढरपेशामधीलच आपापसातले भांडण ठरले ! सर्वसामान्य जनता–बहुजनसमाज यापर्यंत ते गेलेच नाही. आणि या वादात सुधारकांचा संपूर्ण पराभव झाला;–(रानडे-भांडारकरांपासून आगरकरांपर्यंत सर्वांचाच.) हा वाद इतक्या अटीतटीने लढविण्यात टिळकांचाच पुढाकार होता; वा त्यांनीच सनातनी पक्षाची शास्त्रीय वकिली केली :– (टिळकांची मूळ मते, धारणा आणि प्रायः आचारसुद्धा आगरकरांपेक्षा फारसे वेगळे नसतांना.)

जहाल सनातनी विरुद्ध सुधारक राजनिष्ठ !

टिळक विरुद्ध रानडे–आगरकर किंवा सनातनी विरुद्ध सुधारक या वादाला आणखी एक अस्तर होते; ते म्हणजे राजकीय जहाल आणि मवाळपणाचे. कर्तबगार कृतीवंत विरुद्ध बोलके नाकर्ते यामधील अंतराचे. टिळकांनी सनातनी पक्षाचे पुढारीपण केले; पण ते लोकसंग्रहाच्या नावाने, भारतीय परंपरेच्या अभिमानाने, परकीय राज्यकर्त्यांच्या द्वेषाच्या आधाराने. शिवाय टिळक स्वतः त्यागी, झुंझार, कृतीशील, चारित्र्यसंपन्न नेते होते. उलट, सुधारक पक्षातील नेते मवाळ, राजनिष्ठ, केवळ बोलके आणि कृतीच्या वेळी प्रायः कच खाणारे ठरले ! (टिळकांनी आगरकरांच्या प्रामाणिकपणाबद्दल व निर्भयतेबद्दल त्यांचा मुक्तकंठाने गौरव केला आहे; त्याचप्रमाणे महर्षि धोंडो केशव कर्व्यांसारख्या स्वतः विधवा-विवाह करणाऱ्या कृतीशूर सुधारकाचे व त्याच्या कृतीचे त्यांनी स्वागतच केले आहे. पण अशी उदाहरणे एकूण विरळा !) त्यामुळे टिळकांना तत्कालीन पुढारीवर्गाचे आणि जागृत

शहरी जनेतेचे नेतृत्व लाभले; ब्रिटिशविरोधी जहाल राजकारणाचा पाया घालण्याला अनुकूल भूमी प्राप्त झाली. उलट नाकर्ते सुधारक आणि मवाळ राजनिष्ठ हे लोकांच्या मनांतून साफ उतरले; लोकांपासून साफअलग पडले एवढेच नव्हे तर, ते जनतेच्या तिरस्काराचा व उपहासाचा विषय बनले !

आगरकरांचा उज्ज्वल अपवाद

तेव्हापासून भारतीय सार्वजनिक जीवनात एक दुष्ट, घातक समीकरण जन्माला आले. आणि त्यामुळे राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्याची, त्याचप्रमाणे नंतर स्वतंत्र भारताचीही कल्पनातीत हानी झालेली आहे. ते समीकरण म्हणजे राजकीय जहाल तो सामाजिक सनातनी आणि सामाजिक सुधारक तो राजकीय मवाळ–राजनिष्ठ इंग्रजधार्जिणा ! या दुष्ट द्वंद्वाला एकच दैदीप्यमान अपवाद होता आणि तो म्हणजे टिळकांचे पहिले व कदाचित अखेरचे मित्र आगरकर यांचा ! आगरकर मात्र मताने जसे असावयाला पाहिजे तसे होते; ज्या प्रकारच्या नेत्यांची व नेतृत्वाची भारताला तेव्हा (आणि नंतरही) गरज होती तसे ते होते. आगरकर जितके जहाल सुधारक होते तितकेच राजकारणातही जहाल होते. त्यांची भावना जितकी करुणेने भिजलेली होती तेवढीच ती जाज्ज्वल्य स्वातंत्र्यप्रेमाने धगधगलेली होती. त्यांच्या वाणीत आणि लेखणीत जिवंत रसरसता अंगार होता. ज्योतीने ज्योती पेटविण्याची–जनतेला–कार्यकर्त्यांना प्रेरणा देण्याची अमोघ शक्ती त्यांच्यात होती. पण दुर्दैवाने ते अगदी अकाली–वयाच्या अवघ्या ३९ व्या वर्षीच–कर्तृत्वाच्या ऐन भरात मृत्युमुखी पडले. त्यांच्या निधनाने झालेली हानी खऱ्या अर्थाने राष्ट्रीय हानी ठरली, ही पुढील इतिहासाची साक्ष आहे. खुद्द टिळकांना आगरकरांच्या या दुहेरी थोरवीची अत्यंत तीव्र जाणीव होती. म्हणूनच आगरकरांच्या तथाकथित सुधारकी अनुयायांना उद्देशून टिळक म्हणत की, संपूर्ण आगरकर तुम्हाला समजलाच नाही; आणि तो तुम्हाला पचलाही नसता !

पण आगरकरांच्या निधनानंतर टिळक एकमेव पुढारी ठरले; आणि वेगळा इतिहास घडला; तो सर्वश्रुतच आहे.

महात्मा फुले–सर्व समकालीनांपेक्षा वेगळे !

म. फुल्यांबद्दल विचार करताना आज तरी मुख्य दृष्टि त्यांना समजून घेण्याची मुख्यतः असायला हवी. त्यांची मूळ प्रेरणा, (इतर कोणापासूनही ते वेगळे का झाले, त्यामागील मुख्य प्रेरणा–) ही समजून घेतली पाहिजे. त्यांचे इतर समकालीन किंवा नंतरचे नेते त्या त्या काळी प्रसंगवशात किंवा नैमित्तिक कारणांनी अल्पकाळ कितीही यशस्वी झाल्यासारखे वाटले आणि त्यांच्या मानाने फुले कितीही मागे

पडलेले, उपेक्षित झालेले किंबहुना पराभूत झाल्यासारखे वाटले तरी अखेर इतर एकूण इतिहासाच्या दृष्टीने पाहिले तर काय दिसते ?

श्रेष्ठ भारतीय संस्कृतीचा प्रखर आग्रह धरून ज्यांनी फुल्यांना राजनिष्ठ आणि ख्रिस्ती हस्तक ठरविले आणि त्यांना कायमचे संपविल्याचा आभास उत्पन्न केला ते विष्णु शास्त्र्यांसारखे 'विजयी' उर्मट उच्चवर्णीय पुढारी व त्यांची परंपरा आज कुठे आहे ? तिचे साधे समर्थन करण्याला तरी आज कुणाला तोंड राहिले आहे काय ? उलट फुल्यांवरील राजनिष्ठेच्या आणि छुप्या ख्रिस्तीपणाच्या आरोपामागील खरी वस्तुस्थिती काय होती, याचे अधिक वास्तविक आणि यथायोग्य आकलन आज झालेले दिसते.

बरे, ज्यांनी फुल्यांसारखीच अनेक कटु मते तितक्याच हिरिरीने आणि कित्येकदा जवळ जवळ त्याच पद्धतीने मांडली ते लोकहितवादीसारखे त्यांचे समकालिन–त्यांचे तरी काय झाले ? तत्कालीन ब्राह्मण समाजाने फुल्यांप्रमाणेच लोकहितवादींचीही अवहेलना, विपर्यास आणि उपेक्षा करून त्यांनाही संपविल्याचा आभास उत्पन्न केला होता. आणि त्यांच्या हयातीतच लोकहितवादी संपूर्णपणे निष्प्रभ झाले होते हीहि गोष्ट खरीच आहे. या पुढील निदान ५० वर्षे तरी लोकहितवादी संपूर्ण विस्मृतीच्या गर्तेत खोल गाडले गेले. त्यांचे काही प्रमाणांत पुनरुत्थान झाले; ७५–१०० वर्षापूर्वी त्यांनी इतक्या विविध विषयांवर इतके पुढारलेले विचार मांडले याबद्दल त्यांचे कौतुकही होऊ लागले. पण तेही अगदी लहानशा सुशिक्षित वर्तुळांतच. लोकहितवादी त्यांच्या आयुष्यात, त्यांच्या मृत्यूनंतर किंवा त्यांच्या पुनरुत्थानानंतरही कोणती परंपरा निर्माण करू शकले नाहीत. कोणा कार्यकर्त्यांना कार्याची स्फूर्ती देऊ शकले नाहीत. त्यांच्या स्वतःच्या हयातीत किंवा नंतरही ते केवळ एक विचारक-चिंतक म्हणूनच फक्त राहिले. नव विचार आणि त्यांचे लेखी प्रकटण एवढीच त्यांची कृती ठरली ! किंबहुना, त्यांनी हिरिरीने प्रतिपादिलेल्या कोणत्याही विचाराला अनुसरून लहानशीसुद्धा कृती करण्याची जेव्हा पाळी, किंवा संधी आली तेव्हा त्यांनी टाळाटाळ केली, कच खाल्ली किंबहुना उलटीच कृती केल्याचे दिसते !

लोकहितवादीनंतर फुल्यांचे दुसरे एक नामवंत समकालीन विचारक आणि लोकमान्य-राजमान्य नेते न्या. रानडे यांची आठवण होते. रानड्यांची काही मते फुल्यांना अनुकूल होती; फुल्यांना सर्वस्वी प्रतिकूल अशी मते त्यांची नव्हती. लौकिकार्थाने पाहिले, तर अनेक दशके (एक कालखंड) त्यांनी सर्वमान्य पुढारीपण केले; परंपरासुद्धा निर्माण केली. पण त्यांचा एकूण आवाका केवढा—किती मर्यादित होता; त्यांचे यशस्वी पुढारीपण किंवा परंपरा यांचे एकूण आवाहन–एकूण प्रभावच अत्यंत मर्यादित वर्तुळांमध्येच का घुटमळत राहिला ? असे प्रश्न विचारले की त्यांच्या मर्यादा आपोआपच स्पष्ट होतात.

फुल्यांचे वेगळेपण कशामध्ये ?

फुले आणि त्यांचे इतर समकालीन विचारक आणि नेते, (त्यांचे विरोधक किंवा समर्थक;–यशस्वी झालेले किंवा अपेशी ठरलेले)–यापैकी कोणीही घेतले तरी ते आणि फुले यामधील फरक सहज ध्यानात येण्याएवढा ठळक आणि घसघशीत आहे; तो फरक कालदृष्ट्यासुद्धा इतक्या महत्त्वाचा आहे की, त्याला ऐतिहासिक म्हणणेच योग्य ठरेल. त्याचप्रमाणे तो फरक इतक्या वेगळ्या प्रकारचा आहे की तो गुणात्मकच म्हटला पाहिजे.

तात्पर्य, महात्मा फुले हे त्यांच्या समकालीन विचारक नेत्यांपेक्षा ऐतिहासिकदृष्ट्या, गुणात्मकदृष्ट्या आणि प्रत्यक्ष टिकाऊ प्रभावाच्या दृष्टीनेसुद्धा अगदी वेगळे वाटतात, असे म्हणण्यात आज शंभर वर्षांनी मागे वळून पाहता, यत्किंचितही अतिशयोक्ती नाही. फुल्यांनी दिलेल्या प्रेरणा अजूनही स्फूर्तिदायक ठरतील; त्यांनी पेटविलेल्या ज्योती अजूनही प्रभावी मार्गदर्शन करू शकतील. हे महद्भाग्य, ही महत्ता महाराष्ट्रातील दुसऱ्या कोणत्या चिंतकाला–नेत्याला लाभली असेल, असे म्हणता येणार नाही.

फुल्यांचा विपर्यास : विरोधकांकडून–अनुयायांकडून !

फुल्यांच्या विचाराला–शिकवणीला आणि कार्याला गेल्या १०० वर्षांत अनेक चढ-उतार पहावे लागले. आणि त्याला कारण केवळ त्यांचे विरोधकच नाहीत. त्याबाबत त्यांच्या अनुयायांची जबाबदारीही जवळजवळ तितकीच आहे. खरोखर १०० वर्षांचा इतिहास पूर्वग्रहरहित साफ दृष्टीने आणि एकसमयावच्छेदेकरून डोळ्यासमोर आणला तर एक विलक्षण गोष्ट नजरेस येते. फुल्यांच्या विरोधकांनी त्यांचा जेवढा विपर्यास केला, तेवढाच त्यांच्या अनुयायांनीही केलेला आहे ! फुल्यांच्या शिकवणीला आणि कार्याला मधून मधून जो पायबंद बसला त्याला त्यांच्या विरोधकांइतकेच त्यांचे अनुयायीही जबाबदार आहेत !

यशस्वी विपर्यासाचा धोका !

आणि आजच्या आणि उद्याच्या दृष्टीने पाहिले तर फुल्यांच्या शिकवणीला व त्यांना अभिप्रेत असलेल्या प्रेरणांना आणि कार्याला अधिक धोका त्यांच्या नावाने बोलणाऱ्या, त्यांचे पुतळे उभारणाऱ्या, अधिकृतरीत्या शताब्दी साजरी करणाऱ्या तथाकथित अनुयायांकडूनच जास्त आहे ! फुल्यांच्या उघड विरोधकांचा पराभव झाला आहे; इतिहासानेच आता तो पराभव कायमचा ठरविलेला आहे; पण त्याच्या मूळप्रेरणांचा व शिकवणीचा अखेरचा विजय झाला आहे, हे म्हणणे आजतरी धाष्टर्याचे ठरेल ! फुल्यांच्या विरोधकांचा पराभव आणि मूळ प्रेरणांचा अखेरचा विजय यांच्यामधोमध एक अत्यंत धोकादायक असा भयानक विपर्यास–एक भ्रामक

आभास निर्माण होण्याचा संभव दिसत आहे आणि तोही मुख्यतः फुल्यांचे अनुयायी म्हणून मिरवणाऱ्यांकडूनच !

दुर्दैवाची गोष्ट अशी की, चिपळूणकरांनी फुल्यांचा जो व जसा विपर्यास केला तो व तसाच फुल्यांचे अनुयायी म्हणविणारांनी पुढे स्वीकारला. विशेषतः ब्राम्हणेतर चळवळीच्या ऐन रणधुमाळीत तर तो विपर्यास हीच जणु काही फुल्यांची मुख्य शिकवण आहे असे मानले गेले ! आणि त्याच विपर्यस्त भूमिकेवरून फुल्यांचे अनुयायी व विरोधक दोघेही अनेक दशके लढत राहिले ! एकमेकांवर आघात–प्रत्याघात सतत करीत राहिले !

महात्मा फुल्यांच्या मूळ प्रेरणा कोणत्या ? त्यांच्या शिकवणीचा मूळ गाभा कोणता ? आणि त्यांचा, विरोधकांनी व अनुयायी म्हणविणारांनी–दोघांनीही केलेला विपर्यास कोणता ? या तिन्ही गोष्टी तत्कालीन संदर्भाच्या प्रकाशात नीट समजून घेतल्या तरच फुल्यांच्या नावाशी निगडित असलेल्या अनेक मूलभूत पण तितक्याच वादग्रस्त व विपर्यास्त विषयांबद्दल योग्य विचार करता येईल.

प्रकरण २ रे

महात्मा फुल्यांचा सार्वजनिक सत्यधर्म
आणि
ब्राम्हणांच्या वर्णवर्चस्वाविरुद्ध लढा

महात्मा फुले यांनी ब्राह्मणांच्या वर्णवर्चस्वाविरुद्ध जो ऐतिहासिक संघर्ष केला, त्याचा आता थोडासा तपशीलवार आढावा घ्यावयाचा आहे. फुल्यांनी ब्राह्मण-वर्चस्वाला प्रथमपासूनच आव्हान दिले. किंबहुना त्यांच्या सार्वजनिक जीवनाचा प्रारंभ त्या संघर्षापासूनच झाला आणि तो संघर्ष त्यांनी जन्मभर सतत चिकाटीने-हिरीरीने चालू ठेवला. ऐन पंचविशींतल्या पहिल्या उत्साहापासून तो साठींतल्या परिणतप्रज्ञेपर्यंत सर्वत्र त्यांच्या लिखाणांत, भाषणांत, कार्यामध्ये या संघर्षाचे सूत्र सतत आढळते.

महात्मा फुले व विष्णुशास्त्री

ब्राह्मणांमध्येही त्यांचा मुख्य रोख मुख्यतः ते ज्यांना परकीय इराणी आर्य भट म्हणत त्याविरुद्ध दिसतो. या इराणी आर्यभटांचे आक्रमण, वामनाने केलेली दगाबाजी, परशुरामाने केलेल्या क्रूर कत्तली अशा इतिहास-पुराण कालापासून—मनुस्मृतिपासून–आद्य शंकराचार्यापासून–शिवकालिन गागाभट्टांपासून–तो पेशवाई–उत्तर पेशवाई ते अव्वल इंग्रजीपर्यंत–खुद्द फुल्यांच्या काळापर्यंत त्यांनी सतत ब्राह्मणा-बद्दल लिहिले आहे.–त्यांच्या विशिष्ट सडेतोड, प्रखर, ग्रामीण शैलीमध्ये. फुले विद्वान नव्हते; संशोधक नव्हते; पण ते बहुश्रुत होते. नुकत्याच उपलब्ध झालेल्या इंग्रजी विद्येचे 'वाघिणीचे दूध' फुल्यांनी विष्णु शास्त्र्यांप्रमाणेच यथेच्छ प्राशन केले होते. फरक होता दृष्टीचा; तो फरक मात्र मूलभूत होता. फुले भारतामधील-महाराष्ट्रातील

सामान्य श्रमिक, शोषित जनतेच्या ...स्त्री-शूद्र-अतिशूद्रांच्या दृष्टीने बघत होते; समजून घेत होते. उलट, विष्णुशास्त्री हे मूठभर उच्चवर्णीय उच्चवर्गीय शोषक, परंपरागत शासकवर्गाच्या दृष्टीने बघत होते. विष्णुशास्त्री जसे इतिहास-पुराणोक्त परंपरेचे नाव घेत होते, तसेच फुलेसुद्धा दुसऱ्या एका पराभूत उपेक्षित भारतीय परंपरेच्या नावानेच बोलत होते. विष्णुशास्त्र्यांची परंपरा फक्त मूठभर उर्मट, उच्चवर्णीय, शासक-शोषकांची होती, तर फुल्यांची परंपरा शोषित, श्रमिक, दलीत अशा ९५ टक्के भारतीयांची होती. आतापर्यंत उपेक्षित, सुप्त, लुप्त असलेली दलितांची परंपरा फुल्यांची होती.

फुले विद्वत्सभेत बोलत नव्हते किंवा मूठभर उच्चवर्णीय वाचकांसाठी लिहीत नव्हते. आतापर्यंत कुणीही ज्या विषयांबद्दल व ज्यांच्याशी बोलले नव्हते ते प्रथमच बोलण्याचा फुल्यांचा निर्धार होता. हजारो वर्षांच्या दलित, शोषित, तिरस्कृत जनतेचा त्वेष, आवेश त्यांतून व्यक्त होत होता. अर्थात त्यांची भाषाही त्या काळाला—त्यांच्या श्रोतृवर्गाला परिचित अशीच होती; आणि ती तशी असावी असाच त्यांचा प्रयत्न होता—आग्रह होता. एकप्रकारे ती बहुजनसमाजाची परिभाषाच होती, जशी विष्णुशास्त्र्यांची भाषा त्यांच्या वाचकवर्गासाठी वेगळी परिभाषा होती. विष्णुशास्त्र्यांची भाषा संस्कृतप्रचुर, डौलदार, अहंकारी, उपहासयुक्त होती. तीत स्वपक्षाचे आवेशपूर्ण वकिली समर्थन आणि प्रतिपक्षाचा विपर्यास व उपहास होता. त्यांच्या मनात कसलाही किंतु, संशय नव्हता; कमालीचा निर्भयपणा आणि दुःसह दुर्दम्य आत्मविश्वास ही विष्णुशास्त्र्यांची वैशिष्ट्ये होती. त्यांनी स्वतःच स्वतःला मराठी भाषेचे शिवाजी म्हणवून घेतले आणि त्यांच्या मूठभर उत्साही अनुयायांनीही उत्साहाने ती पदवी मान्य केली. आधुनिक मराठीचे श्रेष्ठ शैलीकार म्हणून त्यांची कीर्ति ५०-७५ वर्षे तरी अखंड दुमदुमली! ज्यांनी विष्णुशास्त्र्यांना शैलीकार म्हणून गौरविले, त्यांनीच फुल्यांना अशिक्षित, गांवढळ, ठरविले; आणि राजनिष्ठ व छुपे खिस्ती म्हणून, त्याचप्रमाणे ब्राह्मणद्वेष्टे जातीयवादी म्हणून फुल्यांचा त्यांनी सतत विपर्यास केला.

जनतेचा पहिला मराठी शैलीकार जोतिराव फुले

मराठी भाषेच्या दृष्टीने विष्णुशास्त्री हे जसे एक प्रभावी शैलीकार होते, तसेच एकप्रकारे फुलेसुद्धा एक शैलीकार होते. सामान्य जनतेसाठी, त्यांच्या दृष्टीतून, त्यांच्या भाषेतून बोलणारा, त्यांची सुखदुःखे सोप्या पण प्रभावी लोकभाषेत व्यक्त करणारा मराठीचा पहिलाच आणि इतर सर्वांहून सर्वस्वी वेगळाच असा हा शैलीकार होता. चिपळूणकरी शैलीचा प्रभाव, आदर्श ५०–७५ वर्षे सतत गाजत राहिला; पण तो कोठपर्यंत? मूठभर ब्राम्हणापर्यंतच शिक्षणाचे वर्तुळ घुटमळत होते तोपर्यंत; मूठभर ब्राह्मण एवढाच वाचकवर्ग होता तेथपर्यंत! पण शिक्षणाच्या, जागृतीच्या कक्षा

जसजशा रुंदावत गेल्या, जनतेचे नवेनवे विभाग, त्यांची दृष्टि, त्याचे हितसंबंध, त्यांची सुखदुःखे जेव्हा शब्दरूप शोधू लागली, तेव्हा नव्या शैलीचा शोध सुरू झाला आणि हरवलेले, उपेक्षिलेले, उपहासिलेले महात्मा फुले आणि त्यांची ती तथाकथित रांगडी, ग्रामीण शैली आणि तिचे सामर्थ्य, तिची पोटतिडीक, तिचा तिखटपणा, परखडपणा, यांचा मराठी मनाला नव्याने प्रत्यय येऊ लागला !

विष्णुशास्त्र्यांनी स्वतःला मराठी भाषेचे शिवाजी म्हणून स्वतःच म्हणवून घेतले; आणि त्यांच्या भक्तांनीही या शब्द (शिव) छत्रपतींचा अखंड जयजयकार केला ! पण खरे बोलायचे, तर विष्णुशास्त्री नव्हेत, तर महात्मा फुले शिवाजीला प्रिय असलेल्या रांगड्या-लंगोट्या मावळ लोकांशी त्यांच्या भाषेत त्यांचेच मनोगत बोलत होते; त्यांच्या अंतःकरणाशी भिडत होते.

मराठी भाषेचे शिवाजी ही उपमा, त्यातील उन्मत्त अहंकार वगळला तरी अलंकारदृष्ट्याही कितपण योग्य व समर्पक आहे हा प्रश्नच आहे. पण असल्या अप्रयोजक उपमाच द्यावयाच्या तर शास्त्रीबोबांना शिवाजीपेक्षा गागाभट्टाची उपमा अधिक योग्य ठरेल आणि शिवाजीशी नातं सांगण्याचा अधिकार फुल्यांकडेच अधिक जाईल ! हा शब्दशैलीसंबंधीचा नसता वाद बाजूला ठेवला आणि नवे विचार लोकांपुढे प्रभावीपणे मांडण्याच्या दृष्टीने पाहिले, तर विष्णुशास्त्री जसे एक प्रकारचे-एका वाचकवर्गाचे शैलीकार म्हणून गौरविले जातात, तसेच शूद्र-अतिशूद्रांशी, त्यांच्या सुख-दुखांविषयी, त्यांच्याच भाषेत प्रत्यक्षपणे आणि प्रभावीपणे बोलणारा नव्या मराठीचा शैलीकार म्हणून फुल्यांचाही गौरव व्हावयाला पाहिजे. शैलीकार विष्णुशास्त्री कालचे होते, त्यांचा काळ केव्हाच संपुष्टात आला आहे; जोतिराव हे आजचे व उद्याचे शैलीकार आहेत; त्यांचा काळ आता बहराला येत आहे.

हे झाले शैलीसंबंधी. आता काही वादग्रस्त आणि विपर्यस्त विषयासंबंधी.

फुल्यांच्या ब्राम्हणविरोधाचा खरा अर्थ

फुले हे ब्राह्मणांच्या विरुद्ध होते याचा खरा अर्थ तत्कालीन संदर्भातच समजला पाहिजे. त्याचा खरा अर्थ असा की, फुले हे चातुर्वर्ण्याविरुद्ध होते; जन्मजात उच्चनीचतेच्या विरुद्ध होते. पूर्वकर्मानुसार जन्मजात उच्चवर्ण आणि नीचवर्ण निर्माण होतात; ते सर्वस्वी अपरिवर्तनीय आहेत; जन्मजात अपरिवर्तनीय विषमता हा निसर्गाचा, समाजाचा, धर्माचा पाया आहे-या चातुर्वर्ण्याच्या सिद्धांताचे फुले हे कट्टर विरोधक व वैरी होते. या अन्याय्य, विषम, समाजपद्धतीचे निर्माते व नेते ब्राह्मण म्हणून फुल्यांचा त्यांच्या विरुद्ध विशेष रोख होता. या विषम वर्णव्यवस्थेने अवघा समाज, त्याचे सर्वांगीण जीवन, त्याचे भूत, भविष्य सर्व सर्व व्यापून टाकले आहे; ब्राह्मणाकडे ज्ञानाची, शिक्षणाची, नेतृत्वाची संपूर्ण मक्तेदारी चातुर्वर्ण्याधिष्ठीत हिंदू धर्माने कायमची दिलेली आहे; आणि इतरेजनांच्या, विशेषतः स्त्री-शूद्र,

अतिशूद्रांच्या माथी कायमची गुलामगिरी, हीन, लाचार अवस्था लादलेली आहे. तोच त्यांचा धर्म आहे, त्यांतच त्यांनी आपले भाग्य समजले पाहिजे, या भयानक धारणेविरुद्ध फुल्यांचे सर्वंकष बंड होते, सर्वंकष युद्ध होते.

साधुसंतांची करुणा चातुर्वर्ण्याच्या चौकटीतच !

फुल्यांची ही सर्वंकष बंडखोरी ही सर्वार्थाने एतिहासिक ठरावी एवढी तिची झेप होती, आवाका होता, आदेश-आवेग होता. हिंदु धर्मातील अन्यायाविरुद्ध, विषमतेविरुद्ध पूर्वीही अनेक थोर साधुसंतांनी निषेधाचे आवाज उठविले होते. पण ते केवळ करुणेच्या, भूतदयेच्या भावनेने; त्या सर्व साधुसंतांच्या मते ही समाजरचना मूळांत योग्यच होती; कर्मसिद्धांत हा शास्त्रशुद्धच होता. दलितांबद्दल दया दाखवावी, त्यांचे दुःखदैन्य सौम्य करावे, हलके करावे; पण त्यात विषमतेपासून सुटका नव्हती. कारण निसर्गाने, परमेश्वराने ती योजलेली होती. यामुळे फुल्यांच्या पूर्वीचे सर्व साधुसंत, सर्व विचारक, महात्मे चातुर्वर्ण्याच्या चौकटीतच घुटमळत होते. ही विषमता किंचित सौम्य करून ते तिला दलित बहुजनसमाजाची मान्यताच एकप्रकारे मिळवीत होते. विषम चातुर्वर्ण्यप्रथेला मूळापासून या साधुसंतांचा विरोध तर नव्हताच; पण उलट ती ईश्वरनिर्मित आहे, समाजधारणेला आवश्यक आहे, अशीच त्यांची मनोमन धारणा होती !

ऐहिक गुलामगिरी आणि पारमार्थिक लोकशाही !

आणि अशा या विषम, अन्याय्य समाज-पद्धतीचे निर्माते, नेते व शास्ते हे जन्मजात ब्राह्मणच आहेत, दुसरे कोणीहि असूच शकत नाहीत, अशीच साधुसंतांची श्रद्धा होती. नामदेवापासून तुकोबा-चोखोबापर्यंत जे वेगवेगळ्या हीन, दीन जातींमधील संत निर्माण झाले त्यांनी करुणेने, वेदनेने मधून मधून कितीहि आर्त उद्‌गार काढले, तरी त्यांना चातुर्वर्ण्य मूळात मान्यच होते. ब्राह्मणांचे जन्मजात गुरुपदही मान्यच होते. ब्राह्मण कितीहि भ्रष्ट झाला तरी तो श्रेष्ठच आहे, अशीच त्यांची श्रद्धा होती. दलित, शोषित, हीन, दीन समाजाला जास्तीत जास्त दिलासा त्यांनी दिला तो भक्तीचा-भागवत धर्माचा. पण त्याचा महिमा फक्त वारकरी दिंडीपुरता आणि चंद्रभागेच्या वाळवंटापुरताच मर्यादित होता. विठ्ठलाच्या मंदिराची पायरी तो कधीही चढू शकला नाही ! किंवा गावच्या वेशीच्या आत; ग्रामसंस्थेमध्ये किंवा रस्त्यात, दारात, घरात तो शिरू शकला नाही ! त्यांची सारी करुणा, भावना इहलोकासाठी मुळी नव्हतीच;ती केवळ परलोकांसाठीच होती ! ती ऐहिक मानवी समता नव्हती; ती तथाकथित ' आध्यात्मिक लोकशाही ' होती !

तेव्हा श्रुति-स्मृति-पुराणोक्त कठोर चातुर्वर्ण्य काय किंवा भागवत धर्मातील दयार्द्र भक्तिमार्ग काय स्त्रीशूद्र-अतिशूद्रांना कसलाच सुटकेचा मार्ग नव्हता ! आणि तसा असणेही हिंदू धर्माने सर्वथा आणि सतत अशक्यच करून सोडले होते.

ब्राह्म-आर्य प्रार्थनासमाज आणि त्यांच्या मर्यादा

अशा या सर्वंकष अन्यायाविरुद्ध, विषमतेविरुद्ध फुल्यांचे सर्वंकष बंड होते. फुल्यांच्या इतर थोर थोर समकालिनांनीही न्यायाच्या, करुणेच्या भूमिकेने चळवळी केल्या. बंगालयातील ब्राह्म समाज, पंजाबातील व उत्तरेतील आर्यसमाज, महाराष्ट्रातील प्रार्थना समाज या त्यातील प्रमुख होत. पण यापैकी कुणीही चातुर्वर्ण्य पद्धतीला मूलभूत आव्हान दिले नव्हते. ब्राह्म समाज किंवा प्रार्थना-समाज हे जुन्या भागवत धर्माचे ख्रिस्ती व इंग्रजी संस्कारांनी आधुनिक झालेले अवतार होते ! आर्य-समाज कितीही प्रखर तर्कवादी असला तरी त्याची मूळ प्रेरणा वेदप्रामाण्याचीच होती; प्राचीन-इतिहास गौरवाचीच होती. शिवाय, या तिन्ही समाजांचे नेते प्रायः उच्चवर्णीय, वर्गीय ब्राह्मणच किंवा कायस्थच होते; त्यांचे आवाहन आणि अनुयायीवर्ग अत्यंत मर्यादित सुशिक्षित, उच्चभ्रू वर्तुळापुरताच होता. आणि त्यांच्या प्रयत्नाने मध्ययुगीन संत-कार्याप्रमाणेच एकप्रकारे ब्राह्मण श्रेष्ठत्व व नेतृत्व हलवून बळकट करण्याचेच काम नव्या संदर्भात होत होते !

फुल्यांचे बंड या सर्वांहून मुळातच वेगळे होते; गुणात्मकदृष्ट्या वेगळ्या दर्जाचे –वेगळ्या पातळीवरील होते. त्यांचे आवाहन मूठभर सुशिक्षितांना नव्हते, तर ते स्त्री–शूद्र–अतिशूद्रांना होते; एकूण बहुजन समाजाला होते. त्यात सौम्यता नव्हती; प्रखरताच होती. ते सुधारणावादी नव्हते, सर्वंकष क्रांतिवादी होते. त्यांची चातुर्वर्ण्य-विरुद्ध–ब्राह्मणने तृत्वाविरुद्ध असलेली टीका केवळ तात्त्विक–आध्यात्मिक नव्हती; तर ऐहिक–व्यावहारिक आणि म्हणून तपशीलवारसुद्धा होती.

ब्राह्मणांच्या व उच्चवर्णीयांच्या नेतृत्वाखालील हिंदू धर्म सुधारेल अशी त्यांची यत्किंचितही आशा अपेक्षा नव्हती. हा धर्म–त्यातील ईश्वरप्रणित चातुर्वर्ण्य, जन्मजात जातिप्रथा, विषमता ही संपूर्ण, समूळ नष्टच झाली पाहिजे, अशी फुल्यांची धारणा होती.

फुल्यांच्या या व्यापक, मूलगामी, सर्वंकष मानवतावादी भूमिकेकरूनच त्यांचा ब्राह्मणविषयक दृष्टिकोन समजून घेतला पाहिजे. म्हणूनच त्यांमध्ये जातीयतेचा-जातिद्वेषाचा अंशही आढळत नाही. पण हजारो वर्षे चालत आलेली आणि पुढेही सतत अखंड चालत राहणारी आपली वर्णश्रेष्ठत्वाची, समाज नेतृत्वाची संपूर्ण मक्तेदारी ज्यांना सोडावयाची नव्हती, त्यांच्या या मक्तेदारीला मात्र फुल्यांचा प्रखर, जळजळीत विरोध होता. तेव्हा जातियता, वर्णाभिमान हा ब्राह्मणादी मक्तेदार समाजनेत्यांमध्ये होता. हा पराकोटीचा, उन्मत्त अपरिवर्तनीय अभिमान आणि इतर कनिष्ट वर्णाबद्दल आणि जातींबद्दलचा तिरस्कार हाच जातीयतेचा, जात्यभिमानाचा व जातिद्वेषाचा मूळ आधार होता. उलट फुल्यांच्या मूळ प्रेरणेत–शिकवणीत त्याला यत्किंचितही अवसर नव्हता, असणे शक्यही नव्हते.

फुल्यांची श्रेष्ठ प्रेरणा–संपूर्ण समता–मानवता

म्हणून महात्मा फुले हे केवळ चातुर्वर्ण्यावर–ब्राह्मण श्रेष्ठत्वावर–एकूण विषमताधिष्ठित हिंदू धर्मावर आघात करून थांबले नाहीत. तो त्यांच्या बंडखोरीचा केवळ आवश्यक आणि प्राथमिक असा विध्वंसक आविष्कार होता. पण त्याहूनही श्रेष्ठ अशी फुल्यांची प्रेरणा होती, शिकवण होती. ती म्हणजे संपूर्ण समतेची, बंधुभावाची, मानवतेची, विश्वकुटुंबाची. त्यांमध्ये वर्ण-जात तर सोडाच, पण देश, धर्म, वंश यांमधील भेदांना–त्यांच्या वृथा अभिमानाला यत्किंचितही वाव नव्हता. वंश, धर्म, देश हे कृत्रिम, मनुष्यनिर्मित भेदभाव आहेत; त्यामुळे मूठभर स्वार्थी लोकांचाच स्वार्थ साधतो; त्यासाठी ते सामान्य जनतेमध्ये नसते भेदभाव, विषमता, राग-द्वेष निर्माण करतात;–यापासून कोणताही वंश, धर्म, देश मुक्त नाही;–म्हणून या सर्वांचा विलय करून त्याहून श्रेष्ठ अशा मानवतेची, मानवी समानतेची, स्वातंत्र्याची, विश्वकुटुंबाची प्राणप्रतिष्ठा केली पाहिजे;–ही खरी फुल्यांची श्रेष्ठ प्रेरणा होती–शिकवण होती.



सार्वजनिक सत्यधर्म

या आपल्या श्रद्धेला त्यांनी 'सार्वजनिक सत्यधर्म' असे नाव दिले; आणि त्याचा शोध करणाऱ्या सत्यशोधकांचा सत्यशोधक समाज स्थापन केला; [१८७३] महात्मा फुल्यांची संपूर्ण प्रेरणा आणि शिकवण या सार्वजनिक सत्यधर्मात आणि त्यासाठी त्यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजात शोधली पाहिजे.

जग सत्य, सुंदर, प्रेममय आहे

मानवता, मानवांची संपूर्ण समता ही फुल्यांची निष्ठा होती. त्यामध्ये स्त्री–पुरुष, काळे-गोरे, हिंदू–अहिंदू, देशी–परदेशी, मराठी–अमराठी असल्यांपैकी एकही भेद नव्हता; त्यांच्या मनात याबद्दल यत्किंचितही किंतू किंवा किल्मिष नव्हते.

फुल्यांचे जग खरे होते, सत्य होते; मायामय नव्हते. ते दगडा-मातीचे, नद्या-पर्वतांचे, भौतिक जग होते. त्या जगात दुःख, दैन्य जरूर होते; पण तो त्याचा अपरिवर्तनीय स्वभावधर्म नव्हता. ते अरिहार्य नव्हते; बदलू शकत होते. म्हणूनच त्यांनी एकूण जगाला कधीच दुःखमय मानले नाही. दुःख ही जगाची स्थिती–स्थायी-भाव त्यांनी मानला नाही. तर सुख-आनंद आणि त्याची निर्मिती हा मानला. जगात द्वेष, घृणा, त्यांना जरूर दिसली. पण तीही त्यांनी जगाची स्थिती मानली नाही; तो स्थायीभाव समजले नाहीत. त्यांचे जग प्रेममय-करुणामय होते.

फुल्यांचे जग सत्य, सुंदर, आनंदमय, प्रेममय होते; असत्य-मायामय, दुःखमय किंवा द्वेषमय किंवा ओंगळ नव्हते.

म्हणूनच फुले संन्याशी नव्हते, निवृत्तीमार्गी नव्हते; पंचमहाभूतांना-निसर्गाला शत्रू समजणारे नव्हते. मनुष्याच्या इंद्रियांना-वासनांना-भावनांना विषमय, पापमय मानणारे नव्हते.

फुले हे संसारी, प्रवृत्तीमार्गी, निसर्गाला मित्र मानणारे, सुखाला पवित्र मानणारे होते. त्याचे हे निकोप प्रसन्न दर्शन, ही आशावादी प्रवृत्ती, ही भौतिक दृष्टि हिंदू परंपरेपासून–त्याचप्रमाणे इतरांपासून अगदी वेगळी होती.

सर्वंकर्ष परिवर्तनाचे आव्हान !

फुल्यांना दुःख-दैन्य, द्वेष-घृणा, भेद-विषमता याची जरूर जाणीव होती; तीव्र-तिखट जाणीव होती. पण हे सर्व बदलू शकते ही त्यांची नितांत श्रद्धा होती. अपौरुषेय, अपरिवर्तनीय, अपरिहार्य असे काही नाही; हे परिवर्तन, बदल होऊ शकतात, झाले पाहिंजेत अशी त्यांची धारणा होती.

आणि हे परिवर्तन करणारी कोठली दैवी शक्ती नाही, त्यासाठी अवताराची आवश्यकता नाही; नवससायासाची गरज नाही. जे काय परिवर्तन घडवून आणावयाचे ते आपले आपणच, हवे तसे, हवे त्या पद्धतीने घडवून आणू शकतो, ही फुल्यांची नितांत श्रद्धा होती. ज्यांचे दैन्य-दुःख दूर करावयाचे ते त्यांना स्वतःच स्वप्रयत्नांनी, करावे लागणार आहे; उच्चवर्णीयांच्या कृपेने, दयेने ते केव्हाही होणारे नाही, याबद्दल त्यांच्या मनात शंका नव्हती. म्हणून त्यांचे आवाहन उच्चवर्णीयाकडे त्यांच्या दयेसाठी नव्हते; तर स्त्री-शूद्र-अतिशूद्राकडे उठाव करण्यासाठी–बंड करण्यासाठी त्यांचे आवाहन होते. हे बंड केवळ धार्मिक नव्हते; तर सामाजिक-आर्थिक-राजकीय सर्व काही होते. थोडक्यात म्हणजे फुल्यांची प्रेरणा-शिकवण-आवाहन सर्वंकष होते. सर्वंकष सामाजिक परिवर्तन–सर्वंकष क्रांति ही त्यांची घोषणा होती.

फुल्यांचा अनोखा धर्म

फुल्यांच्या सत्यधर्मात ईश्वर आहे पण तो केवळ निर्माता म्हणून. निर्माता, म्हणजे 'पुरुषरुपी' ईश्वर नव्हे, निर्माता म्हणण्याऐवजी फुले 'निर्मिक' म्हणत; त्याचे पुरुषरुप नाही, हे स्पष्ट करण्यासाठी ते ईश्वराला 'मा-बाप' असे स्त्री-पुरुष संयुक्त रुपी नाव देत! यातही त्यांच्या सत्यधर्मातील स्त्री-पुरुष समानतेचा आग्रह व्यक्त होतो! ते ईश्वर मानीत असले तरी तो केवळ निर्माता-निर्मितीला निमित्तमात्र एवढाच आहे; जवळजवळ निसर्गरूप आहे, तत्त्वरूप आहे. फुल्यांचा ईश्वर व्यक्तिरूप नाही; त्यामुळे फुल्यांना मूर्तिपूजा सर्वस्वी वर्ज्य आहे. त्याचप्रमाणे पूजा, पूजेसाठी उपाध्याय, पूजासाहित्य, मंत्र, आरत्या इत्यादी सर्व फुल्यांच्या दृष्टीने बाद आहेत. अर्थातच उपासना, ध्यान-धारणा, उपास-तापास, व्रत-वैकल्ये त्यांना सर्वथैव त्याज्य आहेत. त्याचप्रमाणे फुल्यांच्या ईश्वराचा कोणी प्रेषित नाही; त्याचा संदेश नाही, अर्थात परमेश्वरप्रणित कोणताही ग्रंथ किंवा उपदेश किंवा आदेशरूप वचने नाहीत.

त्यांनी स्वतः जरी या धर्माची स्थापना केली असली तरी ते स्वतःकडे निर्मिक ईश्वरातर्फे कोणतेही खास स्थान किंवा भूमिका घेत नाहीत. ते स्वतः असलेच तर इतरांप्रमाणे केवळ सत्यशोधक आहेत. त्यांचा धर्म सत्यधर्म आहे आणि त्या सत्याचा शोध घेणारे ते सर्वच सत्यशोधक आहेत.

सार्वजनिक सत्यधर्म

फुल्यांचा सत्यधर्म हा वैयक्तिक नाही; कारण वैयक्तिक मोक्ष-मुक्ति किंवा आत्मिक शांतीसमाधान यावरही त्यांचा भर नाही. त्यासाठी तंत्र-मंत्र नाहीत; संत-महंत नाहीत; मध्यस्थ-उपाध्याय नाहीत. त्यांची दक्षिणा नाही–काही एक नाही. ईश्वराकडे मध्यस्थी करायला कोणाची गरज नाही, गुरु नाही, आत्मानुभव नाही, काही एक नाही. ईश्वराला आमिष नाही, लाच नाही, यज्ञ नाही, बळी नाही. नवस नाही, नवस फेडण्यासाठी बकरे कोंबडे नाही. प्रसाद नाही, कौल नाही, अंगारा-धुपारा नाही; काही एक नाही !

त्यांच्या धर्मातर्फे म्हणून सत्याशिवाय दुसऱ्या कशाचाही आग्रह नाही आणि हे सत्यसुद्धा शास्त्र, ज्ञान, विज्ञान, चिंतन यांच्या सहाय्याने शोधून काढावयाचे आहे. ते अचिंत्य, अज्ञेय, अपौरुषेय, अपरिवर्तनीय नाही.

फुल्यांच्या सत्यधर्माचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तो सार्वजनिक आहे, वैयक्तिक नाही. त्यांत समाजाचा विचार प्राधान्येकरून आहे. आणि त्यांच्या समाजाच्या कल्पनाही अगदी स्पष्ट आहेत. समाज म्हणजे सर्व मानव-वंश. देश-भाषा-संस्कृतिनिरपेक्ष असा अखिल मानव समाज. अर्थात् ते मानवाचा किंवा समाजाचा उल्लेख करताना स्त्री-पुरुष असा संयुक्त उल्लेख आवर्जून करतात. पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांच्या संपूर्ण समानतेवर मुद्दाम आणि सतत भर देत असलेले दिसतात. शिवाय समाज समाज म्हणताना मुद्दाम वंश, धर्म, देश यांमधील भेदांचा निषेध ते पुनःपुन्हा कटाक्षाने करतात. मानवांमध्ये ते कसलाही भेदभाव, उच्चनीचभाव मानायला तयार नाहीत. त्यामुळे धर्म म्हणजे उच्चवर्णीयांचा धर्म, वंश म्हणजे ईश्वराचे लाडके असलेल्या कोणाचा वंश, देश म्हणणे इतर जगाला तुच्छ मानून स्वतःला इतरांपेक्षा सुंदर, पवित्र, श्रेष्ठ मानणारा देश–अशा कळत-नकळत रूढ असलेल्या सर्व कल्पनांचा फुल्यांनी पुनः पुन्हा त्वेषाने धिक्कार केलेला आहे.

फुल्यांचे ब्राम्हण सहकारी !

फुल्यांनी ब्राह्मण वर्चस्वाला–त्यांच्या सर्वंकष मक्तेदारीला कडाडून विरोध केला; पण याच मक्तेदारीविरुद्ध लढण्यास तयार असणाऱ्या ब्राह्मणांचे त्यांनी सतत स्वागतच केले. प्रारंभापासून तर अगदी अखेरपर्यंत फुल्यांच्या प्रदीर्घ सार्वजनिक जीवनात त्यांना अनेक विश्वासू, जिव्हाळ्याचे, ब्राह्मण मित्र व सहकारी सतत लाभले; त्यांचे सहकार्य त्यांनी आनंदाने घेतले; कृतज्ञतेने त्याचे त्यांनी वेळोवेळी नावनिशीवार

उल्लेखही केले. त्यांच्या अगदी अंतरंगातील मित्रांमध्येही अनेक ब्राह्मण होते, त्यांचे उल्लेख फुल्यांनी स्वतः किंवा त्यांच्या चरित्रकारांनी आवर्जुन केले आहेत.

या ब्राह्मण मित्रांचे व सहकाऱ्यांचे सहकार्य घेत असताना, त्यांच्याशी महत्त्वाचे मतभेद होताच त्याबद्दल आपल्या सडेतोड, तिखट शैलीमध्ये त्यांच्यावर टीका करण्यासही फुले अर्थात्‌च कधी कचरले नाहीत. (मग ते न्या. रानड्यांसारखे सर्वमान्य थोर नेते का असेनात!) त्याचप्रमाणे चिपळूणकरांसारख्या आपल्या कट्टर व निष्ठुर विरोधकांचे तरणेबांड शिष्य जे टिळक-आगरकर यांच्यावर सरकारी रोष होऊन, त्यांना कारावासाची शिक्षा झाली तेव्हा या उदयोन्मुख होतकरू तरुणांचे जाहीर स्वागत आणि कौतुक करायला फुलेच स्वतः पुढे आले! (त्या आड टिळक-आगरकरांचे ब्राह्मण्य आले नाही की फुल्यांची तथाकथित 'राजनिष्ठ' मतेही आली नाहीत!)

तेव्हा महात्मा फुले आणि ब्राह्मण या विषयाबद्दल कोणी सहज काही बोलू नये किंवा सांगोवांगीवर भलभलते समजू नये. त्यांचे तथाकथित अनुयायी जे बोलले किंवा वागले त्यावर तर मुळीच जाऊ नये! म. फुल्यांची मूळ प्रेरणा, शिकवण आणि त्यांची प्रत्यक्ष कृती यांचा प्रत्यक्ष परिचय करून घेऊनच या विषयाबद्दल बोलायचे तर बोलावे, हे बरे!

कोणताही जातीयवाद ही फुल्यांची प्रतारणा

फुले चातुर्वर्ण्याचे, जन्मजात जातीयभेदाचे, विषमतेचे वैरी होते. या विषम समाजव्यवस्थेचे निर्माते व नेते म्हणूनच त्यांचा ब्राह्मणांना निःसंशय विरोध होता. या अन्याय्य, विषम पद्धतीचा अभिमान जे आजही बाळगत होते, ती विषमता कायम टिकावी म्हणून जे अजूनही प्रयत्न करीत होते; या विषम व्यवस्थेमध्ये ज्यांचे हितसंबंध गुंतले होते; ज्ञानाची व सत्तेची आपली मक्तेदारी जे आजही टिकविण्यासाठी धडपडत होते, त्यांना–त्यांच्या ब्राह्मण पुढारीपणाला मात्र फुल्यांचा जळजळीत विरोध होता.

पण याचा अर्थ असा नव्हे की, ते ब्राह्मणद्वेष्टे होते; आणि असा तर नव्हेच नव्हे की, दुसऱ्या कोणत्यातरी जातीचा अभिमान बाळगून ते ब्राह्मणांचा द्वेष करीत होते! त्यांनी स्त्री शूद्र-अतिशूद्र यांच्या दृष्टीने, त्यांच्या हितसंबंधांच्या दृष्टीने जरूर ब्राह्मणावर व त्यांच्या नेतृत्वाच्या मक्तेदारीवर त्वेषाने हल्ले केले. पण एकूण श्रमिक-दलित-शोषित समाजाच्या हिताच्या दृष्टीने ते हे सर्व करीत होते. दुसरा कोणताही संकुचित हेतू त्यांचा नव्हता. ब्राह्मणाऐवजी दुसऱ्या कोणत्या तरी जाती-जमातीच्या हिताच्या दृष्टीने विचार करणे किंवा रागद्वेष करणे हे फुल्यांच्या प्रेरणेच्या सर्वस्वी विरुद्धच होते. तेव्हा ज्यांनी फुल्यांच्या नावाने ब्राम्हणद्वेष केला, किंवा ब्राम्हणाऐवजी दुसऱ्या कोणत्या एखाद्या उच्च जातीचे हित साधण्याचा प्रयत्न केला, त्यांनी फुल्यांच्या

मूळ महान् प्रेरणांशी प्रतारणा केली, असेच म्हटले पाहिजे. फुल्यांनी ब्राम्हणाच्या व त्यांच्या ज्ञान आणि सत्तेच्या मक्तेदारीविरुद्ध झुंज देताना इतर सर्वांना शूद्र-अतिशूद्रांना लढ्याचे, एकजुटीचे आवाहन जरूर केले. पण त्याचा अर्थ असा नव्हे की, त्या इतरांमध्ये–शूद्र-अतिशूद्रामध्ये जणू काही समानताच होती! ब्राम्हणांनी स्वतःखेरीज इतरांना शूद्र ठरविले; क्षत्रियांवरही शूद्रत्व संस्कारांनी लादण्याचा प्रयत्न केला. पण म्हणून क्षत्रीय काही शूद्र ठरले नाहीत; क्षत्रियांनी ते मानलेही नाही. समाजाच्या नेतृत्वासाठी व सत्तेसाठी हा झगडा ब्राम्हण-क्षत्रियांमध्ये शतकानुशतके चालला. त्याचा निर्णायक कायमचा असा निकाल क्वचितच लागला. ब्राम्हणांच्या मनात क्षत्रियांसह सर्व वर्णाबद्दल कनिष्ठतेची, तुच्छतेची भावना नक्कीच होती. त्यांचा ऐहिक स्वार्थही त्यात गुंतलेला होता. पण हिंदू चातुर्वर्ण्याच्या चौकटीत आणि जन्मजात जातिभेदांमध्ये उच्च-नीच भेदांची उतरंड इतर जातीजातींमध्ये–आपसांमध्येही होतीच. विशेषतः क्षत्रिय हे ब्राह्मणांशी झगडत असताही इतरांना कनिष्ठ मानीत, यात शंकाच नाही.

तेव्हा वर्णांचे गुरु म्हणून ब्राह्मण नेतृत्वाच्या मक्तेदारीविरुद्ध इतरांनी लढणे ही एक गोष्ट झाली; आणि झाली ती चांगलीच झाली. पण त्या इतरांच्या पोटातही तीव्र श्रेष्ठ-कनिष्ठ भाव होतेच. ब्राह्मणाविरुद्ध लढ्यात क्षत्रियांनी पुढाकार घेणे स्वाभाविक होते व योग्यही होते; पण त्या पुढाकाराचा उपयोग ब्राह्मणाऐवजी क्षत्रियांची-त्यांच्या वरिष्ठतेची नवी मक्तेदारी निर्माण करण्यासाठी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे करणे, याचा फुल्यांच्या प्रेरणेशी-शिकवणीशी काहीही संबंध नव्हता! किंबहुना फुल्यांच्या श्रेष्ठ पवित्र प्रेरणेशी ती प्रतारणाच ठरणार होती.

चित्तपावन ब्राम्हणांचे वर्चस्व

ब्राह्मणा-ब्राह्मणातही फरक आहेत, तरतम भाव आहे; फुल्यांनीही त्या वस्तुस्थितीची दखल घेतली आहे.

इराणी आर्यभट असा जेव्हा फुल्यांनी सतत उल्लेख केला तेव्हा तो चित्पावन कोकणस्थ ब्राह्मणांना लागला, लागू पडला किंवा त्यांनीच लावून घेतला! [विशेषतः परशुरामाच्या वारंवार झालेल्या उल्लेखामुळे].

आणखी एका ऐतिहासिक कारणांमुळे चित्पावनाच्या प्रश्नाला विशेष महत्त्व–तीव्रपणा आला. इंग्रजपूर्व भारतामधील शेवटची प्रभावी (अखिल भारतीय राजकारणाच्या दृष्टीने प्रभावी) भारतीय सत्ता ही पेशवाईतील ब्राह्मणसत्ता होती; इंग्रजानी भारताचे राज्य अखेर मुख्यतः ब्राह्मण्यांकडून—म्हणजे तेही चित्पावनांकडून घेतले, या ऐतिहासिक घटनेचे महाराष्ट्रावर विपरीत परिणाम झाले. भारताचे राज्य पेशव्यांनी घालविले हा ठपका दूषणरूप ठरला. पण पेशवाईच्या समर्थकांची चलाखी अशी की, त्यांनी ते दूषणही भूषणरूप ठरविले. भारतातले बाकी संगळे केव्हाच हरले—शरण

गेले ; आम्ही मात्र शेवटपर्यंत लढलो ! (तसे पाहिले तर पेशवाईच्या अस्तानंतरही शिखांचा उदय झाला. आणि त्यांनी काही काळ तरी—स्थानिक प्रमाणावर का होईना—पण इंग्रजांशी निकराने झुंज दिली. त्यानंतर अफगाण, गुरखे, ब्रम्ही हे वेगवेगळ्या सरहद्दीवरील लोकही लढले. या सर्वांच्या पाडावानंतरच खऱ्या अर्थाने इंग्रजांचे एकछत्री राज्य कायम झाले.) याची आणखीही एक बाजू होती; आणि ती १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धात अधिक ठळकपणे पुढे आली. बंडात प्रारंभी इंग्रजांचा पराभव झाला. दिल्ली, लखनौ, कानपूर, झाशी, ग्वाल्हेर अशा महत्त्वाच्या-मोक्याच्या ठिकाणी इंग्रजी सत्तेऐवजी जेव्हा देशी सत्ता आली तेव्हा दिल्लीच्या बादशहाप्रमाणेच नानासाहेब पेशव्यानेही आपल्या नावाने द्वाही फिरविली ! तेव्हा इंग्रज गेले तर पुन्हा कोण येणार ? या प्रश्नाचे तत्कालीत उत्तर क्षणार्धच का होईना पण विजेसारखे चमकून गेले ! पेशवाईच्या अभिमान्यांना त्यात इंग्रजांच्या पराभवाबरोबरच पुन्हा आपले राज्य–स्वराज्य दिसले ते पेशवाईच्या स्वरूपात ! एकूण ब्राह्मणी वर्चस्वाबद्दलच ज्यांना तिटकारा होता; आणि उत्तर पेशवाईबद्दल तर ज्यांना अपार घृणा होती, त्यांना यदाकदाचित् इंग्रज गेलाच तर त्यानंतर येणाऱ्या या स्वराज्याचे पेशवाईरूपदर्शन सुखावह वाटणे शक्यच नव्हते !

(उत्तर प्रदेशातील बंडवाले, बहादूर शहा, झीनत महाल, त्याचप्रमाणे नानासाहेब पेशवे, राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे या सर्व बंडवाल्यांचा पराभव करण्याच्या कामी प्रथमपासून शेवटपर्यंत इंग्रजांना निष्ठेने आणि शौर्याने मदत करणारांमध्ये शिख आणि गुरखा फलटणी प्रमुख होत्या, ही गोष्टही ध्यानात ठेवली पाहिजे.)

पेशवाई गेली, इंग्रज आले; तरी ब्राह्मणांचेच वर्चस्व !

पेशवाई गेली, इंग्रज आले; तरी गावा-गावांत, तालुक्यात, जिल्ह्यात—मुख्यतः ग्रामीण विभागांत सामान्य लोकांसमोर जे राज्य आले ते इंग्रजांचे आले; पण प्रत्यक्षात ते राज्य चालविणारे अधिकारी, कारभारी-कारकून आले ते जुनेच–एकजात ब्राह्मणच; त्यातही मुख्यतः चित्पावनच. अन् हे ब्राह्मण कारभारीही आले. तितक्याच जुन्या रुबाबात ! तितकेच उर्मट, भ्रष्ट, आपल्या बापाचेच राज्य समजून तोऱ्यात मिरविणारे ! म्हणजे केवळ धार्मिक-सांस्कृतिक-शैक्षणिक मक्तेदारीच त्यांच्याकडे नव्हती; तर राजकीय, कारभारविषयक मक्तेदारीही होती. दुसरी गोष्ट म्हणजे, इंग्रजी शिक्षणाने जे नवे वारे संचारले-नव्या चळवळी, संस्था, संघटना निघाल्या त्यांचेही नेते ब्राह्मणच ! —त्यातही मुख्यतः चित्पावन ब्राह्मणांचेच वर्चस्व !

नवी इंग्रजी राजवट आणि ब्राम्हण

इंग्रजी राज्याचा आणि त्यांच्या नव्या कायद्याच्या राजवटीचा एक परिणाम ताबडतोब झाला; आणि तो ग्रामिण जीवनात जास्तीच जाणवला. तो असा की गेली

शेकडो वर्षे सतत चालत आलेली, जणु काय ईश्वरप्रणीत–अनादी–अपरिवर्तनीय समजली गेलेली सरंजामदारी ग्रामीण रचना एकाएकी कोलमडू लागली. सरंजामी शोषणावर, जातीप्रथेवर, बाऱ्या बलुत्यांवर, ग्रामीण स्वायत्ततेवर आधारलेली सामाजिक–आर्थिक–राजकीय व्यवस्था एकदम मुळापासून हादरली–कोसळू लागली. पूर्वापार चालत आलेली ग्रामीण व्यवस्था जरी विषमतेवर, शोषणावर, अन्यायावर–जुलमावर आधारलेली असली, तरी ती सर्वांना संपूर्णपणे परिचित होती. तिचे बरेवाईट गुणधर्म शेकडो वर्षांच्या संवयीने सर्वांच्या अंगवळणी पडलेले होते. शिवाय. तिच्यात एकप्रकारची स्थिरता होती; सातत्याचे आश्वासन होते आणि वर दिल्लीला किंवा महाराष्ट्रात वरिष्ठ सत्तेमध्ये कितीही बदल झाले–एकामागून एक राजघराणी कितीही बदलली, त्यांचा धर्म बदलला, कारभारी बदलले तरी ग्रामीण पद्धती होती तशीच कायम राही; तिचे स्वायत्त स्वरूपही अखंडपणे कायम टिकून राही. ही स्थगित झालेली–तुंबलेली–कोंडलेली कशी का असेना पण अंगवळणी पडलेली परिचित, स्वायत्त स्थिर रचना आता इंग्रजी राज्य आल्यानंतर मुळापासून हादरत होती; कोसळत होती.

इंग्रजांच्या नव्या राजवटीमुळे शांतता आली, बजबजपुरी संपली; कायद्याचे राज्य आले हे खरेच होते. पण त्याचबरोबर या नव्या राजवटीमुळे जुनी स्वायत्तता संपली; स्थिरता संपली; तिने मिळणारे एकप्रकारचे आश्वासनही संपुष्टात आले.

या नव्या राजवटीमुळे काही अनपेक्षित बदलही एकदम झाले. नव्या राजवटीशी–कायद्याच्या राज्याशी जमवून घेणे सगळ्यांनाच सारखेच जमले नाही;– काहींना फारसे जमण्यासारखे नव्हतेही !

ब्राह्मणांना नवी संधी !

जुन्या सत्ताधारीवर्गाची उर्मट शान इंग्रज अधिकाऱ्यांपुढे एकदम ओसरली. जहागीरदार–इनामदार–मिरासदार वगैरे मानकरी संपले. देशमुख–देशपांडे नाममात्र उरले; ग्राम-पातळीवर पाटील-कुळकर्ण्यांवर नव्या कायद्याप्रमाणे चालण्याची पाळी आली. त्यामुळे या सगळ्यांचीच एकूण रया गेली !

पण इंग्रजाचे कायद्याचे राज्य चालवावयाला त्यांना नवे कायदा–कारभाराचे नियम जाणणारा विविध स्तरांवरील, विविध कामांसाठी अधिकारी व नोकरवर्ग हवा होता;– प्रचंड प्रमाणावर हवा होता. नोकरवर्ग अर्थात्‌च इंग्रजी शिक्षित आणि प्रशिक्षित हवा होता. अत्यावश्यक शिक्षण असलेला अधिकारी आणि नोकरवर्ग कोठून येणार ?–कोण पुरवणार ? या प्रश्नाचे उत्तर एकच होते आणि तेव्हा एकच असू शकत होते. तो नोकरवर्ग फक्त परंपरागत विद्येचा–शिक्षणाचा मक्तेदार ब्राह्मण आणि तत्सम वर्गच पुरवू शकत होता.–आणि हा पुरवठा तो नव्या ब्राह्मणी मक्तेदारीनेच करणार होता !

राज्य इंग्रजाचे; कारभार ब्राह्मणांचाच !

पेशवाई गेली–ब्राह्मणी राज्य गेले. त्याचे दुःख ज्यांना व्हावयाचे त्यांना झाले. (सगळ्यांनाच झाले असेही नाही. काहींना ते दुःख झालेच नाही; काहींना तर आनंदच वाटला–लाभच वाटला !) तरी लवकरच इंग्रजी अंमलाखाली अधिकारी–आणि नोकरवर्ग मक्तेदारीने पुरविण्याची संधी मिळतांच, पराभूत ब्राह्मणवर्ग पुन्हा एकदा नव्या इंग्रजी राजवटीत नव्याने अधिकारारूढ झाला.–राज्याचा मालक–राज्यकर्ता म्हणून नसला, तरी स्थानिक अधिकारी-कारभारी म्हणून ! गेली असेल तर मालकीची शान; पण ती इंग्रजापुढे गेली. तरी सामान्य जनतेपुढे नव्या कारभारी-पणाची शान कायमच राहिली; किंबहुना अधिकच वाढली ! पूर्वी राज्यकारभारांत परंपरागत मराठा मानकऱ्यांची बरोबरीने भागीदारी होती. पण आता मराठा मानकरी निस्तेज झाले;प्रत्यक्ष कारभारात नगण्य ठरू लागले. थोड्याच अवधीत प्रत्यक्ष व्यवहारांत राज्य इंग्रजाचे; पण [स्थानिक] कारभार ब्राह्मणांचा अशी नवी परिस्थिती उत्पन्न झाली ! आणि एकदा पराभूत पेशवाईचा अभिमान गिळण्याचे ठरल्यानंतर, नवा कारभारीपणाचा तोरा आणि अधिकार गाजविणे कठीण नव्हते; स्वाभाविकच होते; लाभदायकही होते !

म. फुले जेव्हा सभोवार बघू लागले–विशेषतः ग्रामीण विभागातील वस्तुस्थिती न्याहाळू लागले, तेव्हा त्यांना वरवर हे दृश्य दिसत होते.

शिवाय, इंग्रजांच्या कायद्याच्या नव्या राज्यामुळे ग्रामीण भागांत आणखीही एक अभूतपूर्व परिवर्तन होताना दिसत होते. ते म्हणजे शेतकऱ्यांच्या जमिनी त्यांच्या हातून जाऊ लागल्या. पूर्वीही शेतकऱ्यांचे शोषण होतेच; खंड–सारा–वेठ यांची जबरदस्ती होतीच. मधूनमधून जाळपोळ-लुटालूटही चाले. पण जमीन राही; कसण्याचा अधिकार राही; झोपडी–गाडगी–मडकी रहात. ग्रामव्यवस्थेत त्याबाबतचे आश्वासन असे; बारा बलुतदारांचे शोषण होई; पण ते एकदा मान्य केल्यावर एक प्रकारची ग्रामीण रोजगाराची, स्थिरतेची हमी होती.

रयतेची दुहेरी लूट; सावकारी–व्यापारी !

पण आता इंग्रजी कायद्याच्या राजवटीत याच हमीला हादरा बसला. कायद्या-प्रमाणे कोणीही हव्या त्या किंमतींत माल विकत घेऊ किंवा विकू लागला. बाजार आणि बाजारभाव यांची नवी अनाकलनीय राजवट सुरू झाली. त्यामुळे उत्पादकांची–श्रमिकांची उत्पादक आणि ग्राहक म्हणून दुतर्फी-दुहेरी लूट होऊ लागली. पण ती कशी–कोण करतो याचे गूढ उलगडणे मात्र कठीण होऊ लागले. यातूनच शेतकरी कंगाल झाला, कर्जबाजारी झाला; आणि त्याला कर्ज पुरविणारा जुना–नवा सावकारवर्ग मुजोर झाला.

खेड्यात जुना–नवा ब्राह्मणवर्ग होता. वर्णांचा गुरू म्हणून सामाजिकदृष्ट्या सर्वोच्चपदी तो होताच; पेशवाई राजवटीत राजकीय सत्ताही उच्च-कुलीन मराठ्यांच्या बरोबरीने–(क्वचित् अधिकच) तो भोगीत होता. शिवाय, सरकारी कारभारी म्हणून सर्व ग्रामीण आर्थिक-सामाजिक-सांस्कृतिक कारभाराचे सूत्र-संचालनही त्याच्याकडेच होते. पण हे सगळे परंपरागत गावगाड्याशी-त्याच्या स्वायत्त रचनेशी निगडित होते. आता नव्या इंग्रजी राजवटीत ब्राह्मणाला सावकारी करण्याची अधिक संधी मिळू लागली. कर्जबाजारी शेतकऱ्यांकडून मुद्दल आणि भरमसाट व्याज वसूल करण्या-पलिकडे जाऊन, त्यांची जमीनच छिनावून घेण्याची नवी कायदेशीर संधी सावकारांना मिळू लागली. तीच संधी नव्या ग्रामीण बाजार-पेठेवर कब्जा करणाऱ्या व्यापारी-अडत्यांना–दलालांनाही मिळू लागली. हे अडत्ये-दलाल बाहेरचेच होते. (मुख्यतः मारवाडी किंवा गुजर.) तेव्हा एका बाजूने परंपरागत ब्राह्मण कारभारी आणि सावकार; त्याचप्रमाणे मारवाडी गुजर व्यापारी-दलाल या दोघा वर्गांनी ग्रामीण जनतेची चौफेर लूट चालविली. आणि राबणाऱ्या रयतेला या चौफेर लुटीपासून वाचवायला इंग्रजांचा कायदा, त्यांची कोर्टे, त्यांचे गोरे वरिष्ठ अधिकारी उपयोगी पडत नव्हते. म. फुल्यांच्या डोळ्याला वरवर जे ग्रामीण जीवनाचे चित्र दिसत होते, ते असे होते.

म. फुल्यांच्या विचारांची जी मूळ जडण-घडण झाली ती मुख्यतः या ग्रामीण पार्श्वभूमीच्या संदर्भात. त्यांनी पुढे सतत तीस-चाळीस वर्षे अहोरात्र चिंतन-मनन केले; अभ्यास केला. सामान्य श्रमिक-दलित जनतेशी तर त्यांचा अत्यंत निकटचा संपर्क होता; आणि तो त्यांनी जन्मभर कायम टिकविला.

फुल्यांच्या उत्तरकालीन लिखाणामध्ये अधिक सूक्ष्म तपशीलांची भर पडत गेली. ग्रामीण जीवनाचे वेगवेगळे बारकावे अधिक बारकाईने ते टिपत गेले. गरीबांच्या–शूद्र–अतिशूद्रांच्या संबंधी जी अथांग सहानुभूती त्यांच्या अंतःकरणात काठोकाठ भरली होती, तिचे उमाळे त्यांच्या लेखनांत पुन्हा पुन्हा उचंबळून येत राहिले. गरीबांच्या दूरवस्थेला–दैन्याला कारणीभूत होणाऱ्या ब्राह्मण–मारवाडी सावकारी-व्यापारी वर्गाबद्दलची त्यांची चीड आणि घृणा वाढतच गेली.

देशातील ग्रामीण जनतेची लूट ब्राह्मण सावकार आणि मारवाडी–गुजर व्यापारी–दलाल हे चौफेर करीत होते, यात शंकाच नाही. पण ते हे जे करीत होते, ते इंग्रजी कायद्याखालीच होत होते; इंग्रजी राजवटीमध्येच घडत होते आणि सर्व वरिष्ठ अधिकारी तर प्रत्यक्ष इंग्रजच होते, या गोष्टीकडे फुल्यांचे जावे तेवढे लक्ष गेलेले दिसत नाही. म्हणजे इतिहासात-पुराणात असो की अगदी अलिकडे पेशवाईत असो; किंवा नंतर इंग्रजांचे राज्य आल्यावर ते चालविण्यात असो, इंग्रजांविरुद्ध बंड करण्यात असो किंवा नंतर पुन्हा इंग्रजी राज्य चालविण्यात आणि त्याविरुद्ध चळवळही चालविण्यात असो–ब्राह्मणांचे पुढारीपण-वर्चस्व होते ते होतेच! स्वराज्यात-पारतंत्र्यात, इहलोकात-

परलोकात ब्राह्मणापासून आणि त्यांच्या वर्चस्वापासून मुक्ती नाही–पुटका नाही, अशीच जणु नैसर्गिक अवस्था होती ! चित्पावनांच्या या वर्चस्वाविरुद्ध इतर ब्राम्हण, सारस्वत, कायस्थ वगरे पुढारलेल्या पांढरपेशा जातींचासुद्धा काहीसा रास्त राग होता !

मराठी राज्यातील नवी ब्राह्मणी मक्तेदारी

फुल्यांनी जेव्हा आपल्या सर्वस्वी वेगळ्या सार्वजनिक सत्यधर्माच्या, मानवतेच्या, समतेच्या जातिनिरपेक्ष भूमिकेवरून ब्राह्मणवर्चस्वावर चौफेर हल्ला सुरू केला आणि त्याला जनमानसात प्रतिसाद मिळू लागला, तेव्हा चित्पावनांविरुद्ध असंतुष्ट असलेल्या पण पुढारलेल्या पांढरपेशा जातींमध्येसुद्धा त्या हल्ल्याबद्दल प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष सहानुभूती निर्माण होणे स्वाभाविक होते. पण त्याचा असा मात्र अर्थ नक्की नव्हे की, फुल्यांनी या पुढारलेल्या नोकरपेशा–पांढरपेशा लोकांच्या चित्पावनविरोधाला जातीय दृष्टीने उत्तेजन दिले ! जी गोष्ट ब्राह्मणसदृश्य पांढरपेशांची तीच ब्राह्मणेतरांतील उच्च क्षत्रीय कुळी सांगणाऱ्या पुढारलेल्या वरिष्ठ जातींची. फुल्यांच्या ब्राह्मण–वर्चस्व विरोधी चळवळींचा फायदा जर या जातीमधील महत्त्वाकांक्षी संधिसाधू लोकांनी घेण्याचा प्रयत्न केला असेल, तर त्याचा अर्थ फुल्यांच्या शिकवणीचा तो भाग होता किंवा फुल्यांनी त्यांना उत्तेजन दिले असे म्हणणे साफ चुकीचे ठरेल. उलट, फुल्यांच्या मूलभूत प्रेरणांविरुद्धच त्यांनी वर्तन केले. फुल्यांच्या शिकवणीचा या मंडळींनी विपर्यास केला. ब्राह्मणांच्या जातीयवादाविरुद्ध झगडताना त्यांनी आपला दुसरा प्रतिस्पर्धी–पुढारलेला जातीयवाद पुढे दामटण्याचा प्रयत्न केला असाच त्याचा अर्थ होईल. प्रत्यक्षात असे प्रयत्न पुढे पुढे झाले, त्यामुळे फुल्यांचा विपर्यास झाला, त्यांच्या चळवळीची उघड विरोधकसुद्धा करू शकले नसते एवढी घोर बदनामी त्यामुळे झाली. फुल्यांच्या खऱ्याखुऱ्या आंदोलनात त्यामुळे अनेक अडथळे–अडचणी आल्या यात शंका नाही.

या पुढारलेल्या इतर जातींच्या काही पुढाऱ्यांच्या संधिसाधुपणाचा आणखीही एक दुष्परिणाम पुढे अधिकच झाला. स्वातंत्र्यसंग्राम यशस्वी होण्याची वेळ येऊन स्वराज्याची सत्ता जेव्हा समोर दिसू लागली, तेव्हा तर ब्राह्मणवर्चस्वाविरुद्ध लढलेल्या या इतर पुढारलेल्या जातींच्या पुढाऱ्यांमध्ये राजकीय–सामाजिक–आर्थिक सत्ता बळकावण्याची नवी महत्त्वाकांक्षा निर्माण झाली. स्वराज्य आल्यानंतर आणि त्यातही संयुक्त महाराष्ट्राचे मराठी राज्य स्थापन झाल्यानंतर, तर विशेषच प्रकर्षाने ही प्रवृत्ति बळावली. उच्च क्षत्रियकुली सांगणाऱ्या काही प्रमुख पुढाऱ्यांमध्ये एक-प्रकारे ब्राह्मणांनी पूर्वी गाजविलेल्या प्रवृत्तींची–सर्वंकष सत्ता बळकावण्याची, राज-कीय–सामाजिक–आर्थिक सत्तेची मक्तेदारी गाजविण्याची ईर्षा उत्पन्न झाली ! एव्हाना या वर्गामध्ये–जातींमध्ये शिक्षणाचा फैलाव इतरांच्या मानाने पुष्कळच झाला होता. शहरातच नव्हे तर तालुक्यात–गावातही शिक्षण घेतलेले, वेगवेगळ्या

चळवळीचे पुढारीपण करणारे, शिक्षण, सहकारी इत्यादी संस्था चालविणारे असे लहान-मोठे कर्तबगार, महत्त्वाकांक्षी पुढारी शेकड्यांनी तयार झाले होते, त्यांच्यामध्ये एक प्रकारे पराभूत ब्राह्मणांमधील अत्यंत अनिष्ट, विकृत, उर्मट अशा प्रवृत्ती निर्माण झाल्या. फुल्यांनी ज्यांच्याविरुद्ध शंभर वर्षे निकराचा लढा दिला व ज्यांचा अखेर पराभव झाला—त्याच धार्मिक-सामाजिक-राजकीय-आर्थिक सत्तेची मक्तेदारी गाजविण्याच्या नव-ब्राह्मणी भ्रष्ट पण उन्मत्त प्रवृत्ती पुन्हा एकदा झपाट्याने बळावू लागल्या ! आणि नव्या शूद्र-अतिशूद्रावर म्हणजेच श्रमिक—दलित-शोषित बहुजन-समाजावर नव्या प्रकारची विषमता, अन्याय, जुलूम, भ्रष्टाचार जबरदस्तीने लादू लागल्या ! खेडेगावातील गोरगरीब, हरीजन गिरीजन-स्त्रिया यांनाच या नव्या सर्वंकष सत्ताबाजांच्या उन्मत्त वर्चस्वाचे चटके जास्त जास्त बसू लागले ! आणि हीच नवी शासक-शोषक—मक्तेदार—सत्ताबाज मंडळी फुल्यांचे नाव सतत आणि सर्वांपेक्षा मोठ्या आवाजात घेऊ लागली !

सुशिक्षित ब्राह्मणेतरांत नव्या ब्राह्मण्याची लागण !

ब्राह्मणेतरांमध्ये शिक्षणाचा प्रसार जसजसा वाढत गेला; वकील, डॉक्टर, शिक्षक, सामाजिक नेते, कार्यकर्ते, सरकारी अधिकारी यांची संख्या जसजशी वाढू लागली, सरकारी व इतर नौकऱ्यांत त्याची भरती जसजशी अधिकाधिक प्रमाणात होऊ लागली, तसतसे या नवसुशिक्षित विभागात एक प्रकारचे दुहेरी परिवर्तन सुरू झाले. एक तर त्यांचा स्वाभिमान, आत्मविश्वास वाढीला लागला; किंबहुना एक प्रकारचा नवा अहंगंड त्यांच्यात निर्माण होऊ लागला. त्यांच्यातील उच्चकुळींच्या विभागांमध्ये तर उच्च जातीचा अभिमानही उफाळू लागला. ब्राह्मणांकडून त्यांचे पुढारीपण आपण हिसकावून घेऊ शकतो असा रास्त आत्मविश्वास आणि महत्त्वाकांक्षाही त्यांच्यात निर्माण झाली.

पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे याचबरोबर त्यांच्यामध्ये ब्राह्मणांच्या सर्व. दुर्गुणांचाही प्रादुर्भाव कळत-नकळत होऊ लागला ! ब्राम्हणांवर टीका करता करताच त्यांचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष अनुकरण सुरू झाले, ब्राम्हणांचे दुर्गुण आत्मसात होऊ लागले आणि त्या प्रमाणात हे पुढारलेले विभाग सामान्य जनतेपासून फुल्यांना प्रिय असलेल्या शूद्र-अतिशूद्रांपासून नकळत वेगळे पडायला लागले, दूर जाऊ लागले !

म्हणजे ब्राम्हणांनी आपल्या परंपरागत दुर्गुणांत इंग्रजांच्या अनुकरणाने भरपूर भर घातली आणि नंतर ५० वर्षांनी उच्च कुलीन ब्राम्हणेतरांनीही त्यांचेच अनुकरण केले ! याहूनही आश्चर्याची व उद्वेगाची गोष्ट म्हणजे आणखी ३०-४० वर्षांनी अस्पृश्यांमध्ये (म्हणजे मुख्यतः महार जमातींमध्ये) शिक्षणाची व त्यामुळे मिळणाऱ्या सवलतींची वाढ होत गेली तसतशी त्यांच्यामध्येही हीच प्रवृत्ती वाढीस लागली !

आधीची परंपरागत विषमता, त्या जोडीला वेगवेगळ्या जाती-जमातींच्या

विकासाच्या विषम क्रमामुळे निर्माण होणारी नवी विषमता, यामुळे समाजामध्ये नव्याच गाठी, नवेच गंड, नव्याच आढ्या ठिकठिकाणी निर्माण झाल्याचे दिसते. बरे या गोष्टींचा वेळीच योग्य विचार, आत्मपरिक्षणपूर्वक विचार व उपाययोजनाही होऊ शकली नाही. या गोष्टी आत्म-टीकापूर्वक समजून घेणे तर दूरच राहिले, पण त्याची साधी जाणीवसुद्धा असणे मुष्कील झाले !

ब्राह्मणश्रेष्ठत्वाविरुद्ध आणि जन्मजात जातीभेदाविरुद्ध लढा करीत असता त्याच जातीवादाची उलटी लागण होण्यासारखाच हा प्रकार होता ! अर्थात् फुल्यांच्या मूळ प्रेरणा-शिकवणीविरुद्ध हे सर्व घडत होते ! फुल्यांनी याची कधी गय केली असती असे वाटत नाही; किंवहुना याबाबत त्यांची किती तीव्र प्रतिक्रिया होऊ शकली असती याची चुणूक त्यांच्या १०० वर्षापूर्वीच्या लिखाणात आजही सापडण्यासारखी आहे !

नवे क्षात्रधर्मपीठ व त्यांची नवी पुरोहितशाही

याच्या जोडीला आणखी एक नवा ब्राह्मण्याचा आविष्कार एका नव्याच संदर्भात काही काळ झाला. ईश्वर आणि माणूस यांमधील सर्व मध्यस्थ-दलाल सत्यशोधक समाज स्थापल्यानंतर फुल्यांनी रद्द केले. त्याचप्रमाणे जन्म, विवाह, मृत्यू, इत्यादि सर्व संस्कारामधील भटांची मक्तेदार भाडोत्री मालिकाही त्यांनी निष्ठुरपणे नाहीशी केली. हे सर्व संस्कार कोणाही नव्या-जुन्या उपाध्यायाच्या किंवा मंत्रतंत्राशिवाय व्हावेत यासाठी त्यांनी शंभर वर्षापूर्वी जिवापाड प्रयत्न केले. त्यासाठी अतिशय प्रतिकूल परिस्थितीत आणि बहुजनसमाजातीलच सनातनीपणाविरुद्ध त्यांना अत्यंत विकट आणि खडतर संघर्ष करावा लागला; व तो त्यांनी नितांत निष्ठेने आणि चिकाटीने सतत केला. पण फुल्यांच्या मृत्यूनंतर आणि विशेषतः इतिहासप्रसिद्ध वेदोक्त प्रकरणानंतर ब्राह्मण भटा भिक्षुकांऐवजी क्षत्रिय उपाध्याय-पुरोहितामार्फत सर्व वेदोक्त संस्कार करविण्याची चळवळ राजर्षी शाहू छत्रपतींच्या प्रेरणेने सुरू झाली. परंपरागत जगद्गुरु श्री. शंकराचार्याऐवजी नव्या क्षात्रजगद्-गुरूंचे नवे धर्मपीठ निर्माण करण्यात आले; नवे ब्राह्मणेतर उपाध्याय-पुरोहित शिकवून तयार करण्यासाठी पुरोहित-पाठशाळा स्थापन करण्यात आल्या. थोडक्यात म्हणजे नवी वेदोक्त पुराणोक्त धर्मसत्ता, एक प्रकारची नवी प्रतिस्पर्धी ब्राह्मणशाही भटभिक्षुकशाही निर्माण करण्याचा प्रचंड प्रयत्न करण्यात आला ! आणि काही सत्यशोधकांच्या तुरळक सौम्य विरोधास न जुमानता तो पुढे रेटण्यात आला. अनेक वर्षे ही चळवळ चालली आणि त्यामुळे फुल्यांच्या मूळ सत्यशोधक प्रेरणेला व चळवळीला धक्का बसला. जततेमध्ये, कार्यकर्त्यांमध्ये, अनुयायीवर्गामध्ये गोंधळ माजला, किंबहुना तिचा विपर्यास झाला. खरे म्हणजे फुल्यांच्या नावाने चाललेल्या चळवळीत निर्माण झालेला गोंधळ संपूर्णपणे कधीच निवळला नाही; तिचे फुलेप्रणित

मूळ स्वरूपच गढूळ झाले, आणि पुढेपुढे तर ब्राह्मणेतर पक्षाच्या पक्षीय राजकारणामुळे आणि राजकीय गरजांमुळे ती चळवळ फुल्यांना अभिप्रेत असलेल्या प्रेरणांपासून, मार्गापासून उत्तरोत्तर, अधिकाधिक दूरदूरच गेली ! या काळात जवळकरांचे प्रयत्न, आंबेडकरांची चळवळ, श्रमिक जनतेच्या वर्गीय चळवळी, समाजवादाचा नवा ध्येयवाद, यामुळेच खरोखर फुल्यांच्या मूळ प्रेरणांचे काहीतरी जतन झाले.

आंबेडकर चळवळीलाही ब्राह्मण्याची बाधा !

आणि जे ब्राह्मणेतर चळवळीत झाले तेच आणखी काही दशकानंतर आंबेडकरांच्या आणि दलितांच्याही चळवळीत नंतर घडले. नवा सुशिक्षित वर्ग, नवे पांढरपेशे—व्यावसायिक, त्यांची संस्कृती, त्यांनी केलेले वरिष्ठ वर्गाचे (विशेषतः त्यांच्या दुर्गुणांचे) दुर्दैवी अनुकरण, त्यांना समाजात मिळालेली प्रतिष्ठा, त्यातून निर्माण झालेले वेगळेपण, अशिक्षित, मागास समाजापासून त्याचे होत गेलेले दूरीकरण ही सर्व नवब्राह्मण्यांचीच लक्षणे होती, असे म्हटले तर त्यात केवळ वस्तुस्थितीचेच वर्णन आहे. बौद्ध धर्म स्वीकारला; धर्म-संघ या नव्या संस्था, नवे संस्कार घेऊन आल्या. धम्म आला पण त्याच्या मूळ प्रेरणा आणि त्याची बाह्य आचार-संस्कार-संहिता यामधील तारतम्य सांगणारा अधिकारी पुरुष आंबेडकरांनंतर कोणी उरला नाही ! त्यातच राजकारणातील चढउतार, रिपब्लिकन पक्षातील फाटाफूट, विघटन आणि अराजक यामुळे गोंधळात अधिकच भर पडली. थोडक्यात म्हणजे ब्राह्मणेतर चळवळीप्रमाणेच आंबेडकरांच्या मागे त्यांच्या नावाने चालणाऱ्या चळवळीलाही इतर अपप्रवृत्तीप्रमाणेच नव-ब्राह्मण्याचीही बाधा झाली ! अशा परिस्थितीत आंबेडकरांच्या मूळ प्रेरणांशी कसोशीने इमान राखून नव्या संदर्भात पुन्हा एकदा एका नव्या क्रांतिकारक परिवर्तनाची नितांत गरज निर्माण झाली आहे.

प्रकरण ३ रे

महात्मा फुले आणि राजकारण

म. फुल्यांच्या राजकीय भूमिकेसंबंधीही बरेच खरेखोटे समज आणि गैरसमज गेली शंभर वर्षे सतत माजून राहिले आहेत. त्यांतही तीन प्रकार आहेत. (१) खुद्द फुल्यांनीच काय काय म्हटलं किंवा प्रत्यक्ष केलं हे तत्कालीन संदर्भात समजून घेण्याचा प्रश्न. (२) फुल्यांच्या विरोधकांनी केलेला अपप्रचार किंवा विपर्यास. (३) फुल्यांच्या तथाकथित अनुयायांनीच केलेला विपर्यास आणि विपरीत कृती.

म. फुले आणि त्यांनी स्थापिलेला सार्वजनिक सत्यधर्म व सत्यशोधक समाज यांची मूळ प्रेरणा-धारणा यांच्या एकूण संदर्भातच त्यांच्या राजकीय भूमिकेचाही विचार केला पाहिजे. ही भूमिका वंश-धर्म-देश-निरपेक्ष शुद्ध मानवतेची व समानतेची होती; विशाल-विश्व कुटुंबाची-विश्वमानवाची होती.

या त्यांच्या मूलभूत भूमिकेच्या आड जे कोणी आणि जे जेथे येतील त्यांना फुल्यांनी विरोधक मानले आणि जे कोणी आणि जे जेथे मदत करतील त्यांना त्यांनी मित्र मानले. त्याचप्रमाणे विरोधकांचेसुद्धा विशिष्ट प्रसंगी सहकार्य घेण्यात आणि मित्रांवरसुद्धा विशिष्ट बाबतींत तिखट टीका करण्यासही फुले कधी कचरले नाहीत. त्यांचे मन नेहमी निर्मळ होते; दृष्टी साफ होती; हेतु स्पष्ट होते.

चातुर्वर्ण्याधिष्ठित जन्मजात जातीभेदावर आधारलेल्या, अन्याय्य आणि विषम हिंदुसमाजव्यवस्थेला त्यांचा भारतीय बहुजनसमाजाच्या दृष्टीकोनातून मूलभूत आणि सर्वंकष विरोध होता. ब्राह्मणांच्या धर्मप्रणीत, अपरिहार्य, अपरिवर्तनीय पुढारीपणा-मुळे, या समाजाची स्वतःला सुधारण्याची अंगभूत शक्ती नष्ट झालेली आहे, अशी

फुल्यांची दृढ धारणा होती. चातुर्वर्ण्याच्या चौकटीत राहून सुधारणा करण्याचे प्रयत्न फोल आहेत; एवढेच नव्हे तर भ्रामक आणि फसवे आहेत; त्या चौकटीत सुधारणा करणारांना साफ पचवून–रिचवून टाकण्याची हिंदु धर्माची शक्ती, युक्ती केवळ अद्‌भूत आहे, याची त्यांना संपूर्ण जाणीव होती. बुद्ध धर्माचा संपूर्ण पराभव आणि चातुर्वर्ण्याला आणि ब्राम्हण श्रेष्ठत्वाला संपूर्ण शरण जाण्याची–आणि ती चौकट अखेर अधिकच बळकट करण्याची वेगवेगळ्या पंथातील साधुसंताची शेकडो वर्षांची अखंड परंपरा, यांचीही अत्यंत तीव्र जाणीव फुल्यांना होती.

ग्रीकापासून तो शक-हूणांपर्यंत जे आक्रमक आले त्यांनाही अखेर चातुर्वर्ण्याने व जातीसंस्थेने कसे पचवून-रिचवून, सामावून टाकले, हेही फुल्यांना उत्तम प्रकारे अवगत होते !

कडव्या इस्लामने आशिया-आफ्रिका जिंकून, व्यापून इस्लाममय केला; पण हिंदुस्थानात मात्र त्याची गती अडखळली; चातुर्वर्ण्याची व जातिभेदाची बाधा त्यालासुद्धा झाली ! बहुसंख्य हिंदु समाज प्रायः जसाच्या तसाच राहिला; त्यात फारशी सुधारणा होऊ शकली नाही. इस्लामी राज्य आणि हिंदू समाज दोन्ही एकाच वेळी चालविण्याला ब्राम्हणी नेतृत्वाला कसलीच अडचण कधीही पडली नाही !



इंग्रजी वसाहती शोषणाचे गूढ

हजारो वर्षे चालत आलेल्या या इतिहासात प्रथमच खंड पडला तो इंग्रजांच्या विजयानंतर. इंग्रजी राजवट आल्यानंतर प्रथमच एक नवी परिस्थिती निर्माण झाली; प्रथमच एकप्रकारे मूलभूत परिवर्तन घडून आले. या परिवर्तनाचे स्वरूप दुहेरी होते. ते विध्वंसकही होते आणि ऐतिहासिक अर्थाने एकप्रकारे क्रांतिकारकही होते.

इंग्रजी राजवटीमुळे झालेल्या मूलभूत परिवर्तनाचे एकूण समग्र स्वरूप त्यावेळी खरोखरच कोणाही भारतीय विचारवंताला किंवा नेत्याला संपूर्णपणे समजले नव्हते. ब्रिटीश राजवटीत घडून आलेल्या परिवर्तनाच्या वेगवेगळ्या अंगांचे दर्शन वेगवेगळ्या नेत्यांना, विचारवंतांना वेगवेगळे आणि फुटकळ स्वरूपातच झाले. फुलेही याला अपवाद नव्हते. परंपरागत गावगाड्यावर आधारलेली स्वायत्त–(काही प्रमाणात स्वावलंबी) ग्रामीण व्यवस्था इंग्रजांच्या राजवटीत हादरली–कोसळली आणि परिणामी ब्राह्मण कारभारी, सावकार आणि मारवाडी-गुजर, व्यापारी–दलाल यांची चलती झाली, ही वरवर दिसणारी वस्तुस्थिती होती. पण तिच्यामागे त्याहूनही भीषण आणि व्यापक अशा शोषणाची, चौफेर लुटीची, जुलमी राजवटीची अशी सर्वंकष वस्तुस्थितीही प्रामुख्याने होती; ती म्हणजे ब्रिटिश साम्राज्यशाहीची, तिच्या वसाहती शोषणाची, विषमव्यापाराची, बाजारपेठेमार्फत चालणाऱ्या दुतर्फी-दुहेरी लुटीची आणि

हे सर्व शोषण अनिर्बंध, बिनतक्रार, बिनबोभाट चालावे म्हणून लादलेल्या जुलमी-गुलामी राजवटीची! फुले लिहायला लागले त्याच्या अगोदर शंभर वर्षे हे भयानक शोषण बंगाल-बिहार-मद्रास वगैरे प्रांतांत सुरू झाले होते आणि पुढील पन्नास वर्षांत ते देशभर क्रमाक्रमाने पसरले होते. फुल्यांच्या आयुष्यांत त्या शोषणाचे एका विशाल-जगड्व्याळ, विक्राळ, सर्वंकष अशा 'कायदेशीर' राणीच्या राजवटींत रुपांतर झाले होते! ब्राह्मणी-मारवाडी वर्गांनी चालविलेल्या सावकारी-व्यापारी लुटीच्या मागे, त्याहूनही व्यापक आणि भीषण अशा ब्रिटिश वसाहती शोषणाची आणि क्रूर जुलमी राजवटीची वस्तुस्थिती होती. फुल्यांना ब्राह्मणी-मारवाडी (सावकारी-व्यापारी) शोषण व जुलूम-जबरदस्ती तीव्रतेने जाणवली आणि त्याविरुद्ध त्यांनी सतत जिद्दीने संघर्ष केला; पण त्याहूनही भीषण आणि सर्वंकष अशा इंग्रजी वसाहती शोषणाचे आणि जुलमी राजवटीकडे फुल्यांचे पुरेसे लक्ष गेले नाही, ही गोष्ट खरी आहे.

इंग्रज राजवटीखाली शेतकरी नागवला गेला, सतत वाढणारा सारा, लोकल फंड, वेगवेगळ्या जकाती, मीठ, पाण्याचा दर, ब्राह्मणी आणि व्यापारी कसाबी कसब मुळे होणारी लूट या सर्वांची नोंद फुल्यांनी सतत घेतली आहे. पण त्यांची या सर्व शोषणाची व जुलूमजबरदस्तीची जबाबदारी त्यांनी प्रथमतः आणि मुख्यतः ब्राह्मणांवर आणि काही प्रमाणात मारवाडी-गुजर व्यापारी-दलालांवर टाकलेली दिसते. ब्राह्मणांवर त्यांनी आणखीही जबाबदारी टाकलेली आहे; ती स्थानिक सरकारी, अधिकारी व नोकर म्हणून, त्याचप्रमाणे धार्मिक गुरु म्हणून भटशाही ही केवळ धार्मिक-सामाजिक वर्चस्वाची मक्तेदारी नव्हती; ती आर्थिक शोषणाचीही युक्ती होती; भटा-भिक्षुकांच्या ऐतखाऊपणाचा तो पाया होता हे सर्व फुल्यांनी जे काही म्हटलेले आहे ते अक्षरशः खरेच होते. पण फुल्यांच्या निरीक्षणातील आणि विचारांतील अपुरेपणा जाणवतो तो त्यांचा इंग्रजांसंबंधीच्या उल्लेखात सारा, लोकलफंड, वेगवेगळे कर, जकाती यामध्ये सतत होत जाणारी वाढ ही सरकारी धोरणानुसारच होत होती आणि ते धोरण ठरविणारे खुद्द इंग्रजच होते. त्याचप्रमाणे सावकारी चालू देणारे, कर्जबाजारीपणापायी शेतकऱ्यांच्या जमिनीचे सावकारांकडे हस्तांतर होऊ देणारे कायदे स्वतः इंग्रजांनीच केलेले होते. शेतीमालाचे बाजवी भाव शेतकऱ्यांच्या पदरात न पडता, त्याची व्यापारी लूट दलालांमार्फत होऊ देण्याचे मूळ धोरण खुद्द इंग्रजाचेच होते; तो तर त्यांच्या वसाहती शोषणाचा, विषम बाजार-पेठेमार्फत करण्यात येणाऱ्या लूटीचा मुख्य पायाच होता. खेड्यांतील व्यापारी-दलाल हे त्या जगड्व्याळ वसाहती बाजारपेठेतील शेवटचे दुवे होते. थोडक्यात म्हणजे जगड्व्याळ वसाहती शोषणपद्धतीचा आणि ती जबरदस्तीने लादणाऱ्या इंग्रजी राजवटीचा भारत देशाचे सर्वंकष शोषण हा अंगभूत गुणधर्मच होता. वसाहती शोषणाचे हे गूढ शंभर सव्वासे वर्षांपूर्वी फुल्यांना उलगडले नव्हते, ही गोष्ट स्पष्टच समजून घेणे जरूर आहे.

दादाभाई वगैरे राष्ट्रीय नेत्यांनी आणि अर्थशास्त्रज्ञांनी भारतीय दारिद्र्याच्या ज्या विविध मीमांसा पुढे केल्या, त्यांमध्येसुद्धा ब्रि. वसाहती शोषणाचे—(त्यामागील भांडवलशाहीला अंगभूत असणाऱ्या नफेखोरीचे) पुरेसे आकलन व्यक्त झालेले दिसत नाही. कारण, हे सर्व अर्थशास्त्रज्ञसुद्धा अखेर तथाकथित उदार भांडवलशाहीचे मूळ सिद्धांत मानणारेच होते. मुळात भांडवलशाहीला, तिच्या तथाकथित खुल्या अर्थव्यवस्थेला (म्हणजेच भांडवलशाहीने तदनुसार मागास जगाच्या चालविलेल्या शोषणाला) त्यांचा मूलभूत विरोध नव्हता.

भारतामध्ये ब्रिटिश राजवटीने चालविलेल्या क्रूर वसाहती शोषणाचे गूढ यावेळी फक्त एकाच आणि एकाच विचारवंताला आणि अर्थशास्त्रज्ञाला इतर कोणापेक्षाही अधिक स्पष्टपणे आणि तपशीलवारपणे समजले होते, उमगलेले होते. तो क्रांतिकारक अर्थशास्त्रज्ञ म्हणजे कार्ल मार्क्स हाच होय.

वसाहती शोषणाची मार्क्सकृत मीमांसा

मार्क्सलाही हे सर्व उमगण्याचे कारण म्हणजे त्याने भांडवली अर्थशास्त्राचे मूळापासून परीक्षण केले होते; भांडवलशाहीच्या तथाकथित नैसर्गिक नफ्यामागे दडलेल्या मानवी शोषणाचा दंभस्फोट त्यानेच प्रथम केला होता; आणि हे करिताना जणु काय, वस्तुपाठ म्हणून ब्रिटिश भांडवलशाही—तिचा उगम आणि विकास यांचा कार्ल मार्क्सने सखोल आणि सांगोपांग अभ्यास केला होता. हा अभ्यास करताना त्याने वरकड मूल्याचा सिद्धांत प्रस्थापित करून भांडवलदारी शोषणाचे गूढ उलगडले आणि भांडवलशाही म्हणजेच मानवी शोषण, भांडवलशाहीचा अंगभूत गुणधर्म–तिची एकमेव प्रेरणा–म्हणजेच नफेबाजी व शोषण आणि अधिकाधिक नफेबाजी व अधिकाधिक शोषण; भांडवलशाहीचा तथाकथित उदारमतवादाशी, सामाजिक विकासाशी, कल्याणाशी काहीएक संबंध नाही, ही गोष्ट मार्क्सने स्पष्ट केली. भांडवलशाही शोषणाचे हे सत्यस्वरूप अगदी नागडे–उघडे करून जगापुढे मांडतांना मार्क्सने ब्रिटिशांनी भारत देश कसा जिंकला, प्लासीच्या दगलबाजीनंतर बंगाल प्रांताची चौफेर सर्रास लूट करून अमाप भांडवल कसे गोळा केले; आणि त्यामुळे समृद्ध बंगालची संपूर्ण अर्थव्यवस्था कशी उध्वस्त झाली; तेव्हा सर्व जगात पुढारलेला व नावाजलेला भारतीय कापडाचा धंदा कसा रसातळाला नेला, हजारो विणकर अक्षरशः देशोधडीला कसे लागले, लक्षावधि शेतकरी अगदी भुकेकंगाल होऊन बंगाल-बिहारमध्ये वर्षानुवर्षे भीषण दुष्काळाच नंगा नाच कसा चालला, याचे भयानक सत्यचित्र मार्क्सने रेखाटले आहे. बंगालनंतर बिहार, उत्तर प्रदेश, ओरिसा, मद्रास या प्रांताचीही अशीच बारेमाप लूट इंग्रजांनी केली. या अमानुष लुटीतूनच इंग्रजांनी आपल्या होऊ घातलेल्या प्रचंड औद्योगिक विकासासाठी, आधुनिक यंत्रसज्ज उद्योगधंद्याच्या उभारणीसाठी अत्यावश्यक असे कोट्यवधी पौंडांचे प्राथमिक भांडवल जमा केले. याच क्रमात

इंग्रजांनी जगभर गाजलेल्या प्रगत भारतीय उद्योगधंद्यांचा नाश केला; पक्का माल जगभर पाठविणाऱ्या भारतीय निर्यात व्यापाराचा विध्वंस केला; कच्च्या माल निर्यात करणाऱ्या मागास देशाचे स्वरूप भारताला लवकरच प्राप्त करून दिले. पक्क्या मालाची प्रचंड प्रमाणावर निर्यात करणाऱ्या तत्कालीन भारत देशाला कच्चा मालाचा पुरवठा करणाऱ्या मागास देशाचे स्वरूप इंग्रजांनी ५०–७५ वर्षांतच दिले. आणि हे सर्व त्यांनी केले ते जुल्म-जबरदस्ती, फसवणूक, भ्रष्टाचार याच मार्गांनी ! या सर्व गोष्टींचा तथाकथित उदारमतवादाशी, स्वातंत्र्य-समता बंधुता या क्रांतिकारक घोषणाशी काहीही संबंध नव्हता !

इंग्रजपूर्व भारत

सतराव्या-अठराव्या शतकांत भारत एका दृष्टीने पुढारलेला आणि संपन्न देश होता; पण हे त्याचे पुढारलेपण केवळ सापेक्ष होते. म्हणजे असे की, अगदी मागासलेल्या अर्ध-गुलामी अर्ध-सरंजामी अशा काही आफ्रिकी-आशियन देशांच्या मानाने भारत देश पुढारलेला आणि संपन्न होता. अकबराने भारतामध्ये मोगल मध्यवर्ती सत्ता स्थिर केल्यानंतर या संपन्नतेला काही प्रमाणात स्थिरताही लाभली होती. पण ही प्रगती आणि संपन्नता सरंजामी पद्धतीची होती–आणि त्या अन्यायी, विषम शोषण-पद्धतीच्या मर्यादेतच ही संपन्नता होती. अर्थातच ही संपन्नता मूठभर सरंजामदार आणि त्यांच्या छत्राखाली वावरणाऱ्या मूठभर व्यापारी-सावकारी वर्गांचीच मुख्यतः होती.–त्यांच्यापुरतीच ती मर्यादित होती. बाकी सारा प्रचंड श्रमिक समाज शोषित–दलित होता. सरंजामी शोषणाच्या जोडी ला जन्मजात जातीभेदामुळे–भीषण सामाजिक विषमतेमुळे या समाजाची हलाखी, हीन-दीन अवस्था अधिक कष्टमय झाली होती. याहूनही घातक गोष्ट म्हणजे हा सरंजामी विषमताधिष्ठित समाज हजारो वर्षे एक प्रकारच्या स्थगित, तुंबलेल्या–गोठलेल्या–आखडलेल्या अवस्थेत जखडला गेला होता. त्याच्या प्रगतीच्या वाटा चारी बाजूंनी बंद झालेल्या होत्या !

या स्थगितीचे एक मुख्य कारण म्हणजे हा समाज शेकडो वर्षे हिंदु चातुर्वर्ण्याच्या चिरेबंदीत बंदिस्त झालेला होता. या व्यवस्थेमुळे बहुजन समाज जन्मजात जाती आणि व्यवसाय यांच्या उतरंडीमध्ये पुरता जखडलेला होता. त्यात नवा विचार, नवी पद्धत, नवे तंत्र, नवे शोध या कोणत्याही प्रगतीला आवश्यक अशा गोष्टींना यत्किंचितही वाव उरलेला नव्हता. समाजाचे राजकीय नेतृत्व जुनाट विचारांच्या भ्रष्ट सत्तालोलुप मूठभर क्षत्रिय घराण्यांकडे होते; आणि त्यांचा कारभार ब्राम्हणी शास्त्र आणि रूढीप्रमाणे चालत होता. समाजाचे धार्मिक–सांस्कृतिक–वैचारिक नेतृत्व तर अगदी काटेकोर मक्तेदारीने मूठभर ब्राम्हण वर्गाकडेच होते. या ब्राम्हणी नेतृत्वाच्या जीर्ण-शीर्ण सनातनीपणाला सीमा नव्हती; पण त्याचबरोबर त्यांच्या नेतृत्वाच्या अहंकाराला आणि उर्मटपणालाही सीमा नव्हती ! कोणत्याही नव्या विचाराचे वारे

त्यांना कधीही सहन होत नव्हते; कोणत्याही मानवी समानतेच्या भावनेचे त्यांना वावडे होते. विद्येची आणि शिक्षणाची मक्तेदारी त्यांच्याकडे शंभर टक्के होती; आणि तिच्या जोरावर बाकी सर्व समाजाला त्यांनी सर्व ज्ञानापासून आणि म्हणूनच अधिकाराच्या–कारभाराच्या जागांपासून संपूर्णपणे वंचित करून ठेवलेले होते. ब्राह्मणी नेतृत्वाच्या या मक्तेदारीचा आणखी एक परिणाम असा झाला की, हे, त्यांनी समाजाला ज्ञानापासून वंचित ठेवले; पण कळत-नकळत ते स्वतःही खऱ्याखुऱ्या ज्ञानापासून, जिज्ञासेपासून, संशोधनापासून, नव्या विचारांपासून संपूर्णपणे वंचितच राहिले होते.

युरोपमधील प्रबोधन आणि औद्योगिक क्रांती

याच काळात युरोपमध्ये एक प्रचंड प्रबोधन झाले, वैचारिक क्रांती झाली. त्या क्रांतीच्या पोटी आधुनिक ज्ञान–विज्ञान जन्माला आले. युरोपीय सरंजामी स्थगितीचे बांध फोडून औद्योगिक क्रांतीच्या सहस्रधारा युरोपमध्ये उचंबळू लागल्या. सामंती–सरंजामी विषमतेऐवजी स्वातंत्र्य–समता–बंधुता या नव्या घोषणांनी जनमानसाची पक्की पकड घेतली. औद्योगिक क्रांतीबरोबरच सामाजिक क्रांतीचे दरवाजे मोकळे झाले. जुल्मी राजेशाहीऐवजी लोकशाहीचा जमाना सुरू झाला. या महान परिवर्तनाच्या प्रक्रियेत, सतत आपापसात लढणाऱ्या स्थानिक सरंजामी गटांमध्ये विभागलेल्या समाजाऐवजी आधुनिक राष्ट्रांची उभारणी होऊ लागली.

—आणि भारताची स्थगितता !

आणि हे सगळे तथाकथित मागासलेल्या, पश्चिम युरोपात घडत असताना भारतीय समाज व त्याचे उच्चवर्णीय नेते मात्र खुशाल आत्मसंतुष्टतेत मग्न होते ! याबाबतीत हिंदु-मुसलमानांत फारसा फरक नव्हता. भारत हा देश नव्हता; आपापसांत सतत लढणाऱ्या शेकडो लहानमोठ्या सरंजामी सत्ताधाऱ्यांचा-सरदारांचा–वतनदारांचा तो एक खंडप्राय प्रदेश होता; शेकडो उचनीच जातींमध्ये विभागलेला तो एक विस्कळित समूह होता. शास्त्रीय ज्ञान–विज्ञान, उत्पादनतंत्र, उत्पादनाची औजारे आणि लष्करी हत्यारे या सर्व बाबतींत अत्यंत मागासलेली अशी त्यांची समाजरचना होती. आणि या समाजरचनेत काही न्यूनता आहे, अन्याय आहे, तिला प्रतिस्पर्धी असे काही नवे ज्ञान-विज्ञान, नवीन विचारधारा, नवी औद्योगिक उत्पादन पद्धती, नवी अवजारे-हत्यारे, नवीन अधिक न्यायी, समतायुक्त समाजपद्धती युरोपात अस्तित्वात येत आहे, याचे साधे ज्ञान आणि भानही या देशाच्या हिंदु-मुसलमान राज्यकर्त्यांना आणि समाजनेत्यांना यत्किंचितही नव्हते !

आणि या देशाचा सामना सतराव्या–अठराव्या शतकांत इंग्रज–फ्रेंच–पोर्तुगीज–डच यांच्याशी झाला. परिणाम व्हावयाचा तोच झाला: आधुनिक ज्ञान-विज्ञान, त्याच्या आधारावर उभारलेले नवे उत्पादन तंत्र, नवी औजारे–हत्यारे, स्वातंत्र्य-समतेवर

तसे पाहिले तर हे गूढ तेव्हा कोणालाच पुरेसे उलगडले नव्हते,—अगदी मोठमोठ्या समकालीन विद्वानांना आणि अर्थ-पंडितांनासुद्धा ! फार काय न्या. रानडे, उभारलेला नवा समाज, एकसंध राष्ट्रकल्पना यांनी हां हां म्हणता भारताचा–एक एक करून भारतांतील प्रत्येक लहान मोठ्या राज्याचा अगदी सहज पराभव केला. आणि ५०–७५ वर्षांतच बलाढ्य, समृद्ध, समजला गेलेला हा तथाकथित पुरातन सनातन-सुसंस्कृत भारतदेश आणि त्याच्या विस्तीर्ण खंडप्राय प्रदेशातील कोट्यवधि लोक सहजपणे-विनासायास अक्षरशः मूठभर अशा इंग्रजांच्या गुलामगिरीत गिळले गेले !

इंग्रजी विद्येचा परिणाम

इंग्रजांच्या विजयाचा आणि भारताच्या पराभवाचा भारतीय मनावर खोल ठसा उमटणे अपरिहार्य होते. पण हा ठसा एक प्रकारचा नव्हता; त्याचे वेगवेगळ्या विभागांवर वेगवेगळे परिणाम झालेले दिसतात. आता ज्याचे राज्य प्रत्यक्षच गेले त्यांना वाईट वाटणे स्वाभाविक होते. पेशवे, वेगवेगळे संस्थानिक, त्यांच्या हातातील जहागीरदार–इनामदार, कारभारी–अधिकारी, त्याशिवाय त्यांचे आश्रित यांना वाईट वाटणे स्वाभाविकच होते. त्याचप्रमाणे मुलुखगिरीची, म्हणजे लष्करी आक्रमणाची, लुटीची चटक लागलेल्या शेकडो सरदारांना, हजारो शिलेदारांना–बारगीरांना, आणि त्यांच्याबरोबर दंगल–जाळपोळ–लुटालूट करीत हिंडणाऱ्या पेढाऱ्यांना–बाजार –बुजगावांनाही, त्याचा 'रोजगार' बुडाला, त्यांचा दरारा नाहीसा झाला म्हणून वाईट वाटणे स्वाभाविक होते ! पण उत्तर पेशवाईत तर खुद्द पेशव्यांसकट हे सर्व सरदार दूर मुलूखात मुलखगिरी करण्यापेक्षा, आपापसांतच लढत होते, आपल्याच मुलखात जाळपोळ–लुटालूट करीत होते; आणि लोकही त्यामुळे निर्माण होणाऱ्या बजबजपुरीला आणि अराजकाला अगदी कंटाळले होते. शिवाय, इंग्रजाविरुद्ध कुणीच फारसे लढत नव्हते; आणि कोणी लढलेच तरी कोणाचाच फारसा टिकाव लागत नव्हता. पेशवाईच्या अखेरच्या दोन दशकांत तर पेशवाई आता चाललीच; इंग्रज आता येणारच; आला तरी फारसे बिघडत नाही; आणि येणारच तर त्याच्याशी जमवून घ्या, अशीही प्रवृत्ती निर्माण होत होती ! बळावत होती. मुख्यतः लोकांना बजबजपुरी जाऊन शांतता, स्थिरता—हवी होती.

इंग्रजांनी ती शांतता, स्थिरता प्रस्थापित केली, यांत शंका नाही. प्रारंभी तर त्यांनी गव्हर्नर एलिफन्स्टनच्या नेतृत्वाखाली समाजाच्या वेगवेगळ्या थरांचा आणि त्यांतील विशेष संवेदनाशील विभागांचा सूक्ष्मतेने अभ्यास करून त्यांना आपल्या कच्छपी लावून घेण्याचे योजनाबद्ध प्रयत्न केले. या सर्वांच्या परिणामी प्रारंभी अनेक दशके तरी इंग्रजांचे राज्य अनेक विभागांना स्वागतार्ह वाटले होते, यात शंका नाही. त्यांतच आपल्या राज्याच्या गरजेपोटी इंग्रजांनी हिंदी जनतेला इंग्रजी शिक्षण देण्याला प्रारंभ केला. स्वाभाविकपणेच आधुनिक पाश्चात्य विद्या–ज्ञान–विज्ञान, नवे विचार,

स्वातंत्र्य–समता बंधुता, लोकशाही, मानवी हक्क इत्यादि नव्या कल्पना हे सर्व शिकण्याची संधी प्रथमच हिंदी लोकांना म्हणजेच त्यांतील मूठभर पांढरपेशांना उपलब्ध झाली. आणि जे शिकले ते चकित झाले; त्यांच्या डोळ्यांना प्रथमच प्रकाश दिसला; नव्या दृष्टीने, नव्या प्रकाशात नवेच जग दिसायला लागले; त्याचा नवा अर्थ, कार्यकारण संबंध समजू लागले.

इंग्रजी राज्याचे स्वागत अगोदरच झाले होते; पण इंग्रजी विद्येने भारावून गेलेल्या पहिल्या एकदोन सुशिक्षित पिढ्यांत तर या नव्या शिक्षणामुळे इंग्रजाबद्दल एक नवी आत्मियता, कृतज्ञतासुद्धा निर्माण झाल्यावाचून राहिली नाही.

इंग्रजी राजवटीचे दुहेरी स्वरूप

इंग्रजांनी आपले राज्य आणले; नवी कायद्याची राजवट सुरू केली; आपल्या साम्राज्यवादी–वसाहतवादी राजकीय–आर्थिक व्यवस्थेमध्ये भारताला समाविष्ट केले आणि त्याचे अत्यंत मूलगामी, दूरगामी असे परिणाम घडले. एक प्रकारे भारताच्या प्रदीर्घ इतिहासात हजारो वर्षांनंतर प्रथमच एक आमूलाग्र परिवर्तन घडविले. दोन हजार वर्षांत भारतावर अनेक परकीय आक्रमकांनी आक्रमणे केली; अनेकदा देश जिंकला; पण आक्रमकांच्या या लाटा भारतावर आल्या व त्या येथेच जिरल्या. सर्व आक्रमकांना भारताने पचवून-रिचवून टाकले. या पुन्हा पुन्हा होणाऱ्या आक्रमणांनी कधीमधी राज्यकर्ते बदलले, तरी एकूण आर्थिक–सामाजिक व्यवस्थेमध्ये फारसे बदल झाले नाहीत. भारतीय समाजाचा मूळ आर्थिक–सामाजिक–सांस्कृतिक पाया कायमच राहात गेला; समाजरचनेची मूळ चौकट प्रायः कायमच राहात गेली. फरक पडले तर त्यामानाने गौण, वरवरचे; फारतर आविष्कार थोडेफार बदलले असतील; पण आर्थिक-सामाजिक आशय जुनाच कायम राहिला.

युगांतर–खरे आणि खोटे

आपण युगांतर हा शब्द अगदी सहज वापरतो; त्याहूनही सवंग असलेला शब्द म्हणजे क्रांती; तिला जोडून नवी संस्कृती वगैरे. पण या संज्ञा वापरताना एका खऱ्याखुऱ्या मूलभूत गोष्टीकडे दुर्लक्ष होते. ती म्हणजे उत्पादन साधने आणि उत्पादन संबंध ही;—त्यांच्याशी निगडित असलेले वर्ग;–शोषक आणि शोषितवर्ग आणि त्याचे सत्तेशी असलेले संबंध. युगांतर किंवा क्रांती यांचा संबंध जर या मूलभूत गोष्टींशी नसेल तर या शब्दांचा वापर अर्थहीन–आशयहीन ठरेल; पोकळ–भ्रामक ठरेल.

खऱ्या क्रांतीचा संबंध उत्पादक शक्ती–उत्पादकवर्ग आणि त्याचे सत्तेशी राजकीय-आर्थिक-सामाजिक सत्तेशी असलेले नाते यांच्याशी असतो. सर्व सत्ता ही प्रथम आणि अखेर वर्गसत्ताच असते; खरे सत्तांतर हे वर्गसत्तांतरच असते. म्हणून खरेखुरे युगांतर म्हणावयाचे तर ते उत्पादक शक्ती, वर्गसंबंध आणि वर्गसत्तेशीच

संबंधित असले पाहिजे. वर्गसत्तांतर नसेल तर युगांतराला काही एक अर्थ राहाणार नाही.

या दृष्टीने पाहिले तर इंग्रजपूर्व दोन हजार वर्षांच्या भारतीय इतिहासात खऱ्या अर्थाने कधी फारसे युगांतर झालेच नाही; उत्पादन शक्ती आणि उत्पादन संबंध यामध्ये मूलभूत बदल झालेच नाही. वर्गसत्तांतर झालेच नाही; कारण खऱ्या अर्थाने नवे वर्ग उदयास आलेच नाहीत; किंवा जुने विलयाला गेलेच नाहीत. आदीम साम्यवादी गणराज्यांच्या विध्वंसानंतर जी अर्धगुलामी–अर्धसरंजामी व्यवस्था सुरू झाली तीच थोड्या फार फरकाने दोन हजार वर्षे कायम टिकली. सामान्यतः सरंजामी पद्धतीचीच वेगवेगळी स्वरूपे आणि आविष्कार वेगवेगळ्या प्रदेशांत कायम राहिले. आर्यानंतर ग्रीक-शक-हूण यांच्या आक्रमणांमुळे किंवा पश्चिम आणि मध्य आशियामधील वेगवेगळ्या 'नाम'धारी संस्कृतीच्या प्रभावामुळे या मूळ परिस्थितीत (उत्पादक शक्ती–उत्पादन संबंध–वर्गसत्ता याबाबत) फारसा फरक पडला नाही. त्याचप्रमाणे खुद्द भारतामध्ये वेगवेगळ्या राजघराण्यांच्या–साम्राज्यांच्या नावाने किंवा वेगवेगळ्या धर्मांच्या–पक्षांच्या–मत–मतांतरांच्या नावाने कितीही घालमेली–उलाढाली–उलथापालथी झाल्या, तरी त्यामुळेही या मूलभूत–पायाभूत भौतिक परिस्थितीत खराखुरा बदल झाला नाही,

अशा परिस्थितीत....या सर्व दोन हजार वर्षांच्या इतिहासात मूलभूत आर्थिक-सामाजिक आशयाच्या दृष्टीने भारतीय समाजरचनेत फारसा फरक पडलेला नाही. इंग्रज आले; त्यांनी आक्रमण केले–देश जिंकला, आणि भारताचा आर्थिक-सामाजिक पायाच त्यांनी उचकटून टाकला; समाजरचनेची चौकट मोडून टाकली. इंग्रजी राज्य आल्यानंतरच दोन हजार वर्षांनी भारतामध्ये प्रथम खऱ्या अर्थाने मूलभूत आर्थिक-सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेला प्रारंभ झाला.

विध्वंसक आणि विधायक परिणाम

या मूलभूत परिवर्तनाचे स्वरूप आणि परिणाम दुहेरी होते. ते विध्वंसकही होते आणि विधायकही होते. त्यामुळे भारतात हजारो वर्षे तुंबलेला प्रवाह वाहू लागला; कोंडलेल्या आर्थिक-सामाजिक शक्ती मुक्त झाल्या. नव्या आधुनिक जगाशी औद्योगिक (भांडवलदारी) क्रांतीच्या नव्या क्रांतिकारक प्रक्रियेशी भारत जोडला गेला; आधुनिक समाजरचनेच्या नव्या मूल्यांशी (स्वातंत्र्य-समता-बंधुता, लोकशाही प्रथा) प्रथमच परिचय होऊन त्यांच्या प्रभावाच्या कक्षेत भारतीय समाज ओढला गेला; ही झाली इंग्रजी राजवटीने घडविलेल्या परिवर्तनांतील जमेची बाजू; पण तिलाच अपरिहार्यपणे चिकटलेली दुसरी विध्वंसक बाजू होती. ती म्हणजे भारताच्या भयानक वसाहती शोषणाची. परंपरागत भारतीय उद्योगधंद्यांचा विध्वंस, वसाहती बाजारपेठे मार्फत शेतकऱ्यांची दुहेरी लूट (कच्च्या मालाचे विक्रेते आणिप पक्क्या मालाचे ग्राहक या

दोन्ही दृष्टीने), प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्या श्रमिक शेतकऱ्यांचा वाढता कर्जबाजारीपणा आणि त्याच्या जमिनींचे प्रचंड प्रमाणावर होणारे हस्तांतर; त्या प्रमाणांत वाढत गेलेले ग्रामीण भागावर सावकारी–व्यापारीवर्गाचे वर्चस्व; निकृष्ट शेतीवर पडणारा ग्रामीण बेकारांचा वाढता भार; पाटबंधारे, कालवे, तळी इत्यादि परंपरागत ग्रामीण पाणी-पुरवठ्याच्या पद्धतीची इंग्रज अमलांत झालेली हेळसांड आणि त्यामुळे शेतीची वाढती हलाखी;–या सर्व कारणांमुळे वारंवार पडणारे दुष्काळ, प्राण-हानी, हजारो लाखो ग्रामीण गरीबांची होणारी प्रचंड सामुदायिक स्थलांतरे, ही सर्व भीषण दुरवस्था हीही ब्रिटिश राजवटीची आणि तिच्या वसाहती शोषण पद्धतीचीच एक अपरिहार्य आणि अंगभूत बाजू होती.

इंग्रजांना 'संशयाचा फायदा'!

ब्रिटिश राजवटीच्या या दुहेरी परिणामांचे यथार्थ संतुलित आकलन त्यावेळी भारतामध्ये कोणालाच झाले नव्हते. काहींना इंग्रजी राज्याची जमेची बाजू जास्त जाणवली व ती त्यांनी व्यक्त केली; या सगळ्यांवर राजनिष्ठेचा शिक्का मारून त्यांना इंग्रजांचे हस्तक ठरविणे आज सोपे असले, तरी त्यामुळे तत्कालीन वस्तुस्थितीचा पुरेसा खुलासा होण्याजोगा नाही. त्याचप्रमाणे ज्यांना इंग्रज राजवटीचे अनिष्ट परिणाम जास्त जाणवले त्यांनाही त्याचे यथार्थ आकलन झालेले नव्हते; कारण वसाहती शोषणाचे मूळरहस्य त्यांपैकी कोणालाच समजले नव्हते.

म. फुले ज्यावेळी लिहायला लागले त्यावेळी इंग्रज राजवटीची इष्ट-विधायक बाजू त्यांच्यापुढे प्रकर्षाने आली होती आणि ती त्यांनी मोकळ्या मनाने सांगितली. विशेषतः इंग्रजी राज्यात बहुजनसमाजाला शिक्षणाची संधी प्रथमच उपलब्ध होण्याची शक्यता फुल्यांना दिसत असल्यामुळे, त्यांनी त्यावरच भर दिला असल्यास नवल नाही. फुल्यांना इंग्रजी राज्याची विध्वंसक बाजूही दिसू लागली होती. विशेषतः त्यांच्या उत्तर आयुष्यात त्यांची ही जाणीव अतिशय तीव्र होत गेली. म्हणूनच त्यांच्या उत्तरकालीन लिखाणात–विशेषतः 'शेतकऱ्याचा आसूड' (१८८३) या पुस्तकात शेतकऱ्यांच्या सर्वांगीण दुरवस्थेचे अत्यंत तपशीलवार आणि विदारक चित्र फुल्यांनी काढलेले आहे. अर्थात्‌च शेतकऱ्यांच्या या भीषण दुर्दशेची प्राथमिक जबाबदारी त्यांनी ग्रामीण भागातील ब्राह्मण अधिकारी व नोकरवर्ग–सावकार–त्याचप्रमाणे मारवाडी-गुजर व्यापारी आणि दलाल यांच्यावर टाकली आहे. पण याच वेळी वरिष्ठ इंग्रज अधिकारी आपल्या कर्तव्याकडे संपूर्ण दुर्लक्ष करीत आहेत; स्वतः ऐषआरामात मश्गूल राहून ते ब्राह्मणी–व्यापारी कारवायांना सर्रास संधी देत आहेत; इंग्रजी अधिकारी जर वेळेवर जागे झाले नाहीत; आणि त्यांनी आपले ईश्वरदत्त कर्तव्य पार पाडले नाही, तर त्यामुळे खुद्द इंग्रजी राज्यालाच धोका निर्माण होईल, असेही इषारे फुल्यांनी पुन्हा पुन्हा दिलेले आहेत. फुल्यांचा मुख्य भर ब्राह्मण, सरकारी

अधिकारी–कारभारी सरकारी नोकर आणि व्यापारी दलाल यांच्यावरच होता. ते वरिष्ठ इंग्रज अधिकाऱ्यांना ऐषआरामी, कर्तव्यच्युत समजत होते. ब्राह्मणी–व्यापारी सल्लागारांचा बदसल्ला हलक्या कानाने ऐकून तदनुसार कारभार चालू देणारे वरिष्ठ इंग्रज अधिकारी हे शेतकऱ्यांची दुरवस्था चालू ठेवीत आहेत, त्यामुळे इंग्रजी राजवटीबद्दल असंतोष वाढत जाणे अपरिहार्य आहे, ही गोष्टही फुल्यांनी वारंवार सांगितलेली आहे.

पण एक गोष्ट मात्र खरीच होती; ती ही की, फुले ब्राह्मणांना, सावकारांना मारवाडी–गुजर व्यापारांना, दलालांना शेतकऱ्यांचे–शूद्र–अतिशूद्रांचे शत्रूच मानीत होते; उलट वरिष्ठ इंग्रज अधिकाऱ्यांना आणि इंग्रजी राजवटीला संशयाचा फायदा देण्यास ते तयार होते !

ब्राम्हणांचे शेकडो वर्षांचे परंपरागत मक्तेदारीने चालणारे वर्णवर्चस्व आणि त्याच्या आधाराने त्यांनी चालविलेले समाजाचे शोषण, याबद्दल फुल्यांचा संताप समजण्यासारखा आहे. हे ब्राम्हण कधीकाळी सुधारतील आणि आपण होऊन आपली वर्चस्वाची मक्तेदारी सोडतील, अशी यत्किंचितही आशा फुल्यांना वाटत नव्हती, आणि ते योग्यच होते. त्यामुळे ब्राम्हणांना ' संशयाचा फायदा, देण्याचा प्रश्नच फुल्यांपुढे नव्हता ! उलट नवीनच आलेले इंग्रज, त्यांनी घडवून आणलेल्या परिवर्तनातील काही इष्ट गोष्टी याबद्दल फुल्यांच्या मनात (तत्कालीन इतर सर्वच पुढाऱ्यांप्रमाणे) आदर होता, कृतज्ञता होती. उलट वरिष्ठ इंग्रज अधिकारी ब्राम्हणी-व्यापारी सल्लागारांच्या बदसल्ल्यांमुळे चुकीची-घातक धोरणे आखतात–इंग्रजांचे हेतू चांगलेच आहेत, परमेश्वरी सूत्रानुसार ते भारत देशाचे भलेच करण्यासाठी येथे आले आहेत, त्यांच्या हेतुबद्दल संशय घेण्याचे कारण नाही, असा संशयाचा फायदा इंग्रजांना द्यावयाला तेव्हा फुले तयार होते.

इंग्रजांचे आगमन !

हजारो वर्षे चालत आलेल्या या इतिहासात प्रथमच खंड पडला; प्रथमच एक सर्वस्वी नवी परिस्थिती निर्माण झाली, प्रथमच एक प्रकारे मूलभूत आणि क्रांतिकारक परिवर्तन घडून आले ते इंग्रजांच्या विजयानंतरच ही गोष्ट मान्य करण्यात, तिचे मनमोकळे स्वागत करण्यात फुल्यांना कसलाही मानसिक संकोच वाटत नव्हता, त्याबाबतीत कोणताही पूर्वग्रह आड येत नव्हता.

हजारो वर्षांत कधीही होऊ न शकलेले मूलभूत सामाजिक परिवर्तन घडून येण्याची ऐतिहासिक संधी इंग्रज राज्यात प्रथमच निर्माण होत आहे, याबद्दल फुल्यांची मनोमन खात्री पटली होती; ही संधी हातची दवडू नये, असे त्यांना मनापासून वाटत होते.

इंग्रजांचे, त्यांच्या आधुनिक विद्येचे, ज्ञान विज्ञानाचे, स्वातंत्र्य–समता–बंधुता यावर आधारलेल्या लोकशाही पद्धतीचे, कायद्याच्या राज्याचे फुल्यांनी सर्वतोपरी व उत्साहाने स्वागत केले. ज्या स्त्री–शूद्र–अतिशूद्र बहुजनसमाजाच्या सर्वांगीण प्रगतीची, सामाजिक न्यायाची तळमळ फुल्यांना लागून राहिली होती, तिची द्वारेच इंग्रज राज्यात प्रथमच मोकळी होत आहेत, याबद्दल फुल्यांना आनंद वाटत होता. म्हणून फुल्यांनी इंग्रजांचे स्वागत केले. त्याबद्दल त्यांना राजनिष्ठ म्हणावयाचे तर त्यांच्या अगोदरच्या बंगाली विचारकांना-देशभक्तांना किंवा लोकहितवादींसारख्या समकालीनांना आणि न्या. रानड्यांसारख्या सर्वांगीण विचारवंताला, देशभक्तालाही राजनिष्ठच म्हणावे लागेल! खरी गोष्ट अशी आहे की, फुल्यांच्या जन्मापासून तो फुल्यांच्या मृत्यूपर्यंत–म्हणजेच लो. टिळकांच्या स्वतंत्र नेतृत्वाच्या उदयापर्यंत महाराष्ट्रातील आणि परप्रांतातील सारेच विचारवंत सामन्यतः एकाच राजकीय मताचे होते. प्रत्येकाची बोलण्याची व लिहिण्याची पद्धत वेगवेगळी होती एवढेच. राजा राममोहन रॉयपासून रानड्यांपर्यंत अनेकांना इंग्रजी राज्यात ईश्वरी योजनेचे सूत्र दिसले. (फार काय, आज गेली शंभर वर्षे गाजत असलेल्या आणि स्फूर्तिप्रद ठरलेल्या 'वंदे मातरम्' हे राष्ट्रगीत ज्या कादंबरीत आले आहे, त्या 'आनंदमठ' कादंबरीतील सशस्त्र बंडखोर नायकालासुद्धा अखेर प्रत्यक्ष ईश्वरी साक्षात्कार होतो तो इंग्रजी राज्याच्या स्वागताचाच; आणि म्हणून त्याला ईश्वरी आदेश मिळतो तो शस्त्रत्यागाचा! फुल्यांच्या आयुष्यात जी तथाकथित राष्ट्रीय चळवळ झाली तिचा (जाहीर आणि सशस्त्र क्रांतिकारकांची परंपरा सोडल्यास) प्रायः सर्वसामान्य असा आधार राजनिष्ठा हाच होता! तेव्हा केवळ फुल्यांना अलग करून, त्यांचे शब्द पकडून, त्यांच्यावर राजनिष्ठेचा छाप मारणे हे संपूर्णपणे चुकीचे आणि दुष्टपणाचे ठरेल.

सशस्त्र उठावाचा मार्ग

१८५७ मध्ये किंवा त्याच्या आगेमागे इंग्रजांविरुद्ध वेळोवेळी जे तुरळक उठाव झाले त्यांना फुल्यांनी पाठिंबा दिला नाही. त्याबाबत त्यांनी टीकात्मक भूमिका घेतली यावरूनही त्यांना राजनिष्ठ ठरविण्यात येते. फुल्यांच्या मूलभूत भूमिकेच्या आणि तत्कालीन परिस्थितीच्या संदर्भातच या उठावांचा विचार केला पाहिजे. पहिली गोष्ट म्हणजे राममोहन रॉयपासून रानड्यांपर्यंत सर्वांची याबाबतची भूमिका फारशी वेगळी नव्हती. इंग्रजांचे राज्य जाऊन मोगल बादशाही किंवा पेशवाई येणे म्हणजे आपल्याला अभिप्रेत असलेले बहुजनसमाजाजे स्वराज्य असे फुल्यांनी मानले नाही, हे तर उघडच आहे.

शिवाय, अगदी रोकड्या व्यवहाराच्या दृष्टीने पाहिले तरी अशा फुटकळ, तुरळक उठावांनी इंग्रजांचे राज्य खरोखरच जाईल, अशी अपेक्षा करणे तेव्हा सर्वथैव अवास्तव व अव्यवहार्यच आहे, याबद्दल लो. टिळकांसकट सर्वांचेच त्यावेळी

एकमत होते. सशस्त्र उठाव किंवा वैयक्तिक दहशतवाद याबद्दल कोणाला कितीही आकर्षण किंवा कौतूक वाटले, तरी तो व्यवहार्य मार्ग नाही याबद्दल लो. टिळकांची सुद्धा संपूर्ण खात्री पटलेली होती आणि म्हणूनच सशस्त्र चळवळीबद्दल सदैव सहानुभूती बाळगूनही, त्यांनी तिचा त्याग केला, आणि लोकजागृती, संघटना, सामुदायिक आंदोलन, प्रतिकार हा आपला मार्ग त्यांनी संपूर्ण विचारांती निश्चित केला;—आणि दोन पिढ्या राष्ट्रीय लढा मुख्यतः त्याच मार्गाने पुढे गेला.

राष्ट्रीय काँग्रेसबाबत भूमिका

फुल्यांनी सार्वजनिक सभेला किंवा राष्ट्रीय काँग्रेसला पाठिंबा दिला नाही, म्हणून त्यांच्यावर राजनिष्ठेचा आरोप करण्यात येतो. फुल्यांच्या उत्तर आयुष्यात स्थापन झालेली सार्वजनिक सभा (१८७०) किंवा अगदी अखेरी-अखेरीला अस्तित्वात आलेली राष्ट्रीय काँग्रेस (१८८५) या संस्थाही राजनिष्ठच होत्या. त्यांचे नेतृत्वही उच्चवर्णीय-उच्चवर्गीय आणि राजनिष्ठच होते. प्रत्यक्ष इंग्रज उदारमत वाद्यांचीही काँग्रेसवर, तिच्या स्थापनेवर, कार्यावर, पुढारीपणावर घनिष्ट छाप होती ही गोष्ट अगदी स्वतंत्र बुद्धीने लक्षात ठेवली पाहिजे.

फुल्यांनी या तत्कालीन राजकीय संस्थांवर उच्चवर्णीय-उच्चवर्गीय असा जो छाप मारला तो त्यावेळी यथायोग्यच होता. त्यांचा कार्यक्रम वर्षाकाठी एकदा नाताळच्या सुट्टीत वेगवेगळे ऐसपैस ठराव (तेही राजनिष्ठेच्या चौकटीतले आणि अर्जविनंत्यांच्या स्वरूपांतलेच) पसार करण्यापलीकडे नव्हता! ही रोकडी वस्तुस्थिती होती. फुल्यांच्या मृत्युनंतर अनेक वर्षांनी लो. टिळकांनी काँग्रेसचे हे राजनिष्ठ व मवाळ स्वरूप बदलून तिला-जहाल जनतानिष्ठ स्वरूप देण्याचा प्रयत्न सुरू केला आणि तो त्यांना पुरी हयातभर पुरला.

फुल्यांच्या राजकारणाचा पायाच वेगळा!

पण टिळकांच्याही आधी फुल्यांनी तत्कालीन राजकारणावर व राष्ट्रीय सभेवरसुद्धा जनतेची छाप पाडण्याचा प्रयत्न आपल्या परीने सतत केला होता, हिही गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे.

आणि फुल्यांचा हा प्रयत्न खरोखर अधिक 'जहाल' होता; काँग्रेसला जनतेजवळ नेणारा होता; जनतेला राष्ट्रीय चळवळीत सहभागी करून घेणारा होता, राष्ट्रीय चळवळीला दैनंदिन कार्यक्रमाची रुपरेषा देणारा होता. फुल्यांची भूमिका आधी की राजकीय लढा की आधी सामाजिक अशा खोट्या वादात राष्ट्रीय चळवळीच्या पिढ्या खर्ची घालून देशात एक नसती खोटी दुफळी पाडण्याऐवजी चळवळीच्या सर्वंकष सर्वांगीण विकासाचा मार्ग दाखविणारी होता. हे राजकीय—म्हणून हे पहिले; हे सामाजिक—म्हणून हे नंतरचे, म्हणजे (कदाचित खरोखर स्वराज्यानंतरचे)

असले खोटे वाद माजविण्याऐवजी फुल्यांनी प्रत्यक्ष जनतेला–बहुजन समाजाला–भिडण्याचा मार्ग दिग्दर्शित केला होता.

त्यासाठी त्यांनी काही मूलभूत प्रश्नच उपस्थित केले–असे प्रश्न की जे तेव्हा सबंध भारतात दुसऱ्या कोणालाही सुचले नाहीत ! किंवा निदान कोणी ते उपस्थित तरी नक्कीच केले नव्हते. पहिला प्रश्न म्हणजे देश म्हणजे काय ? देश म्हणजे कोण ? हाच तो मूलभूत प्रश्न होता. पुन्हा हाच प्रश्न इतर तथाकथित सामाजिक प्रश्नाशीही संबंधित होता.

देश कोणता ? कोणाचा ?

धर्म म्हणजे कोणाचा ? मूठभर ब्राह्मणांचा––उच्चवर्णीयांचा की ९५ टक्के स्त्री-शूद्र-अतिशूद्रांचा ? हा जसा मूलभूत प्रश्न होता व फक्त फुल्यांनीच तो जसा एकाकीपणे उपस्थित केला व जन्मभर चिकाटीने हिरीरीने लढविला; तसाच, पण त्याच्याशीच घट्टपणे चिकटलेला त्यांचा दुसरा प्रश्नही तितकाच मूलभूत होता व तोच शूद्र-अतिशूद्र म्हणजेच खऱ्याखुऱ्या जनतेशी निगडित होता. देश म्हणजे काय–देश म्हणजे कोण–कोणाचा ? वर्षासाठी नातालच्या सुटीमध्ये जमणाऱ्या राजनिष्ठ–उच्चवर्णीय त्याचप्रमाणे उच्चवर्गीय शेठ-सावकारांचा, जमीनदार-सरंजामदारांचा, बॅरिस्टर-डॉक्टरांचा, विद्वानांचा, सर-सरदारांचा-वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांचा आणि काही गोऱ्या प्रतिष्ठांचा ? की शूद्र-अतिशूद्रांचा, गोर-गरीब शेतकऱ्यांचा, शेतमजूरांचा, उघड्या-नागड्या लंगोटीवाल्यांचा, असंस्कृत अक्षरशत्रूंचा, मागास जातीजमातींचा, अस्पृश्यांचा, अर्धपोटी दुष्काळग्रस्तांचा ? शहरांत राहून बग्गीतून फिरणाऱ्या श्रीमंताचा की खेडोपाडी थंडीवाऱ्यात, अनवाणी, अर्धपोटी राबणाऱ्या नागड्याउघड्या जनतेचा ? हा सवाल फुल्यांनी प्रथम उठविला आणि नंतर जन्मभर मिळेल तेव्हा, जमेल तेथे ते उठवीत राहिले. आपल्या लिखाणात-भाषणांत सर्व चळवळींत हाच प्रश्न त्यांनी सतत विचारला. महात्मा गांधींचा राजकीय जन्म होण्यापूर्वी निदान पाऊणशे वर्षांपूर्वी महात्मा फुल्यांनी हा प्रश्न उठविला–फरक एवढाच की फुले त्या जनतेला दरिद्री नारायण म्हणाले नाहीत, तर शूद्र अतिशूद्र म्हणाले ! आणि गांधीजी धोतर-पँट सोडून गुडघ्याइतका पंचा नेसले आणि अर्धनंगे फकीर म्हणून जगभर कीर्ती पावले, त्यापूर्वीही निदान पन्नास वर्षे तरी फुल्यांनी तेच भारताचे सत्यरूपदर्शन स्वतः त्याच वेषाने महाराणीच्या राजपुत्रासमोर उपस्थित राहून सादर केले. काही वर्षांनंतर खुद्द काँग्रेसच्या मंडपासमोर फुल्यांनी हेच खऱ्याखुऱ्या भारताचे, शूद्र-अतिशूद्र भारताचे दरिद्रीविरूप-विराट दर्शन घडविले ! काँग्रेसच्या मंडपाच्या आत कोण होते ? आणि बाहेर देशात खरोखर कोण आहे ? मग देश कोणाचा ? काँग्रेस मंडपातला की बाहेरचा ? हे प्रश्न फुल्यांनी मांडले ते कित्येकांना विक्षिप्तपणाचे वाटले, वेडेपणाचे वाटले ! कित्येकांना ते आततायी

पणाचे वाटले, कित्येकांना अप्रयोजक, असंस्कृत, अडाणीपणाचे, गावढळ वाटले ! पण कोणीही फुल्यांना समजून घेण्याचा प्रयत्न केला नाही. फुल्यांनी उपस्थित केलेले हे प्रश्न अर्धनागड्या, अर्धपोटी शेतकऱ्यांचे होते; त्यांनी घडविलेले जाहीर दर्शन हे खरे भारतीय दलित-श्रमिक जनतेचे पहिले राष्ट्रीय निदर्शन होते ! वर्गीय चळवळ सुरू होण्यापूर्वी, किसान सभा, शेतमजूर संघ, भूमिहीन आदिवाशी आंदोलन सुरू होण्यापूर्वी ५०–७५ वर्षे फुल्यांनी हे केले ! हे राजकारण नसले, जहाल राजकारण नसले तर दुसरे कोणते राजकारण व जहालपण असू शकते–तेव्हाच नव्हे तर आतासुद्धा !

पण फुल्यांच्या अंतरंगातील खरीखुरी वेदना, प्रेरणा, पोटतिडीक त्यांत व्यक्त होते. इतरांपासून, इतर सगळ्या भावी मवाळ–जहालांपासून राजकीय–सामाजिक-वाल्यांपासून फुल्यांचे जे वेगळेपण होते–एक प्रकारचे जे द्रष्टेपण होते, ते यात व्यक्त होते. सामाजिक–राजकीय–आर्थिक या तेव्हा माजविलेल्या कृत्रिम भेदाला व वादाला फुल्यांजवळ जागा नव्हती. कारण श्रमिक-दलित जनतेची मूळ वेदना–प्रेरणा फुल्यांच्या दृष्टीने एकच होती !

फुल्यांनी शोषित–श्रमिक–दलित जनतेला त्यांच्या परिभाषेत स्त्री-शुद्र–अतिशूद्र म्हटले म्हणून त्यांच्या प्रश्नाला राजकीय–आर्थिक–वर्गीय समजावयाचे नाही की काय ?

शेतकऱ्यांची दूरवस्था–दुष्काळ !

आणि या दरिद्री समाजाचे मूलभूत प्रश्न पोटतिडिकेने परखडपणाने उपस्थित करणारा एकमेव नेता राजनिष्ठ म्हणून बदनाम करावयाचा काय ? गेल्या तीन वर्षांत भारतामधील शेतकऱ्यांची स्थिती सुधारली आहे, असे विधान तेव्हाचे सर्वमान्य सर्वज्ञानी नेते न्या. रानडे यांनी १८८० च्या सुमारास केले; इंग्रजांनी केलेल्या वेगवेगळ्या शेतकी सुधारणांचे रानड्यांनी तरी गोडवे गायिले, पण सर्वज्ञ, अर्थशास्त्रज्ञ न्या. रानड्यांच्या या विधानाला जाहीरपणे हरकत घेणारा, त्यांना कडवट शब्दात हटकणारा व शेतकऱ्यांच्या–म्हणजेच भारताच्या सर्वांगीण दारिद्र्याचे तळमळीने तिरीमीरीने वर्णन करणारा तेव्हा फुल्यांवाचून दुसरा कोणी निघाला नाही ! या फुल्यांची राजनिष्ठ म्हणून आणि अडाणी म्हणून बदनामी करणार काय ? आणि फुल्यांना राजकारण–अर्थकारण काही एक नव्हते–ब्राह्मण–द्वेषाखेरीज त्यांना काही सुचत नव्हते, असे आजही हिणवत रहाणार काय ? फुल्यांनी मांडलेली ही भूमिका म्हणजेच पहिल्या दर्जाचे आणि मूलभूत राजकारण नव्हते काय ?

देशांतील आणि महाराष्ट्रातील दुष्काळासंबंधी गेली शंभर वर्षे सतत लिहिले–बोलले जात आहे. फुल्यांच्या समकालीन विद्वानांनीही तेव्हा पुष्कळच लिहिले होते. फुल्यांनीही लिहिले होते. त्यांत कदाचित अगडबंब आकडेवारी नसेल; आर्थिक

महात्मा फुले । एकावन्न

सिद्धांताची चर्चा नसेल; पण मूलभूत दृष्टी, दारिद्री जनतेची दृष्टी होती, श्रमिक–दलित–शोषित–सर्वहारावर्गाची भावना, त्वेष, संताप व्यक्त करण्याची, त्या जनतेला स्फुर्ती देण्याची जेवढी शक्ती फुल्यांच्या ह्या लिखाणांत दिसते, तेवढी त्याच्यानंतर ५० वर्षे तरी दुसऱ्या कोणी दाखविली नाही, हे निर्विवाद ऐतिहासिक सत्य आहे! मग ते मान्य करायला आजही कोणीही, कितीही आढेओढे घेवो!

आणि दुष्काळावरील उपाययोजना? फुल्यांनी सुचविलेले उपाय शंभर वर्षांनंतर आजही अंमलात आलेले नाहीत; अजूनही त्यांचा विचार करण्याची गरज आहे, हे मान्य करावे लागेल.

शिक्षण कोणाचे–कोणासाठी?

तीच गोष्ट शिक्षणाची. जनतेला त्यातही पुन्हा स्त्री–शूद्र–अतिशूद्रांना शिक्षणाचे दरवाजे प्रत्यक्ष खुले झाले पाहिजेत, हा फुल्यांचा आग्रह होता. वरिष्ठांना शिक्षण दिले म्हणजे ते 'झिरपून' खाली येईल, या सिद्धांताचा फुल्यांनी सतत धिक्कार केला आहे. शिक्षणावरील तोकडी रक्कम वरिष्ठ वर्गीयांवरच खर्च होऊन जाते; कनिष्ठांपर्यंत ती पोचतच नाही, पोचणे कधी शक्य नाही. त्याचप्रमाणे मूठभर वरिष्ठांनाच उच्च शिक्षण मिळते; बाकी सारे कोरडेच राहतात. उच्च शिक्षण की शिक्षणविस्तार हे द्वंद्व तेव्हाही होतेच! इथेही फुल्यांचा प्रश्न मूलभूत होता. कोणाचे शिक्षण, कोणासाठी, कोणाकडून? पुन्हा त्याचे उत्तरही मूलभूत प्रश्न उपस्थित करणारेच होते.

तात्पर्य, धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक प्रश्नांप्रमाणेच राजकीय–आर्थिक बाबतीत इतर कोणालाही तेव्हा आणि त्यानंतर निदान ५० वर्षे तरी न सुचलेले प्रश्न तेव्हा फक्त फुल्यांनीच उपस्थित केले. त्यांच्या मनात याबाबत द्वंद्व नव्हते; शंका नव्हती. हा का तो, हे पहिले की ते पहिले असा प्रश्न त्यांच्यापुढे नव्हता. कारण त्यांच्या मनाचा, बुद्धीचा, भावनेचा निश्चय पक्का झालेला होता. त्यांनी स्त्री-शूद्र-अतिशूद्रांना आपले इमान अखेरचे व कायमचे दिलेले होते, निष्ठा दिली होती. त्यांच्यासाठीच त्यांची बुद्धी, शक्ती खर्ची पडणार होती. यातून धर्म-अर्थ-राजकारण सर्वच एकदमच आकार घेणार होते!

फुले आणि मार्क्स–प्रेरणा एकच!

फुल्यांना खरोखर अजूनही नीट समजून घ्यावयाचे असेल तर याच मूळपदावर पुन्हा पुन्हा यावे लागते! कारण याच स्त्री-शूद्र-अतिशूद्रांसाठी त्यांना नवा धर्म हवा होता, नवा देश हवा होता, नवे शिक्षण हवे होते, नवी संस्कृती हवी होती. नवी स्वातंत्र्य-समता-बंधुता हवी होती! थोडक्यात म्हणजे फुल्यांचे संपूर्ण सर्वंकष नवे समाजदर्शन होते.

आणि हे केवळ महाराष्ट्रातील-भारतातील स्त्री-शूद्र-अतिशूद्रांसाठी त्यांना नको

होते; तर अमेरिकेतील आफ्रिकन निग्रोंसाठीही हवे होते. म्हणूनच त्या निग्रोंचा लढा फुल्यांना स्फूर्तिप्रद वाटला–आपला वाटला. त्या लढ्यात जे लढले (गोरे व काळे दोघेही !) तेही फुल्यांना आपलेच वाटले ! कारण फुले खरेखुरे विश्वमानव होते. शंभर-सव्वाशे वर्षांपूर्वी भारतातील गुलामगिरीबद्दल त्वेषाने लिहिताना, ज्यांना अमेरिकेतील नीग्रो गुलामगिरीविरुद्ध चाललेल्या लढ्याची कृतज्ञतेने आठवण होते; ते दोन्ही लढे एकच असल्याचा प्रत्यय येतो, त्या फुल्यांना 'जगातील कामगारांनो एक व्हा !' ही घोषणा खचित दूर नव्हती ! तत्कालीन इंग्रज सेन्सॉरमुळे मार्क्स व कम्युनिस्ट मॅनिफेस्टो फुल्यांना वाचावयाला मिळाला नसेल ! पण कम्युनिस्ट मॅनिफेस्टोचीश्रमिक-दलित जनतेसंबंधीची मूळ प्रेरणा आणि फुल्यांच्या स्त्री-शूद्र-अतिशूद्रांची प्रेरणा ही एकमेकांपासून फारशी भिन्न नाहीत. वेगळ्या परिस्थितीत, वेगळ्या परिभाषेत फुले बोलत होते एवढेच म्हणता येईल. उच्चवर्णीय-उच्चवर्गीय मूठभर शोषक-शासक यांच्याविरुद्ध, त्यांच्या सर्वंकष सत्तेच्या मक्तेदारीविरुद्ध दलित-शोषित-श्रमिक यांचे आव्हान, त्यांचा उठाव हाच फुल्यांना अंतिमतः अभिप्रेत होता; हीच त्यांची प्रेरणा होती. फुल्यांनी मार्क्स वाचला नव्हता; फुल्यांच्या प्रारंभ काळी भारतामध्ये कामगारवर्गही निर्माण झाला नव्हता; म्हणून फुल्यांना वर्ग, वर्गलढा, वर्गीय तत्त्वज्ञान या परिभाषेत बोलता आले नाही. इंग्रजी राज्याचा, साम्राज्यवादी वसाहती शोषणाचा गूढार्थही त्याना उमगला नाही. पण तो त्यांच्या वेळी दुसऱ्या कोणालाही उमगला नव्हता,–ना वर्गलढा; ना साम्राज्यवादी-वसाहती शोषण; हीही गोष्ट इथे आवर्जून सांगितली पाहिजे. पण फुल्यांना जी एक गोष्ट उमगली होती, मनोमन पटली होती; त्यांच्या अंतःकरणाचा जिने ठाव घेतला होता; ती म्हणजे स्त्री-शूद्र-अतिशूद्रांचे दुःख, दैन्य, वेदना ! आणि ही वेदना ईश्वरकृत नव्हती, निसर्गकृत नव्हती; मानवकृत होती. जन्मजात विषमतेवर आधारलेल्या सर्वंकष शोषण-शासन पद्धतीवर आधारलेली होती. आणि हेच महान् सत्य होते; जे फुल्यांना उमगले; आणि जे इतर कोणाही थोरा-मोठ्यांना तेव्हा उमगले नव्हते किंवा फारतर अंशतः फुटकळ उमगले होते.

फुल्यांच्या धर्म-समाज-अर्थ-राजकारणाच्या मुळाशी हे सर्वंकष मूलभूत महान् सत्य होते; ते त्यांना १०० वर्षांपूर्वी उमगले ही त्यांची थोरवी; त्यांची महात्मता; त्यांची मौलिकता ! म्हणून फुल्यांची ही मूलभूत प्रेरणा–तिच्याशी इमान ही फुल्यां-बद्दल आजही समजून घेण्याची खरीखुरी लाखाची गोष्ट आहे. बाकी गौण गोष्टीबद्दल उलटसुलट, खरेखोटे वाद-विवाद विपर्यास करून काही एक उपयोग नाही ! पण ही मूळ प्रेरणा ज्यांना समजली त्यांचेच फुले आहेत; त्यांना ते आजही नित्य नवी प्रेरणा देतील !

♠

फुल्यांच्या आंदोलनांचा आधार : शूद्र-अतिशूद्र

म. फुले केवळ परखड मत-प्रदर्शन करूनच थांबले नाहीत, ते त्यांच्या स्वभावातच नव्हते ! जी गोष्ट मनोमन पटली ती तावडतोब अंमलात आणणे आणि अंमलांत आणीत राहाणे, या दोहोंतही त्यांचे इमान होते. म्हणून त्यांची उक्ती म्हटली की कृती ही आपोआपच अपरिहार्यपणे येणारच ! आणि तीही त्यांच्या सर्व सामर्थ्यानिशी ! स्त्रीशिक्षण, स्त्री-मुक्ती, अस्पृश्यता-निवारण, शूद्र-अतिशूद्रांच्या चळवळी, दुष्काळ-ग्रस्तांचे प्रश्न, सारावाढीचे–सक्तीच्या वसुलीचे प्रश्न, सावकारी कर्ज, फसवणूक, जमिनीवरून हकालपट्टी, सरकारी अधिकाऱ्यांचा उन्मत्तपणा व जाच-जुलूम या सर्व प्रश्नांबाबत फुल्यांनी ग्रामीण भागात सतत चळवळी केल्या. नव्या नव्या विषयांबाबत नव्या नव्या चळवळींचे प्रवर्तन, हे तर फुल्यांच्या कार्याचे सतत सूत्रच होते !

या सर्व चळवळीचे एक वैशिष्ट्य असे होते की, त्या सर्व चळवळी स्त्री-शूद्र अतिशूद्र यांच्याशी संबधित होत्या; त्यांच्या दैनंदिन जीवनातून त्या निर्माण झालेल्या; आणि त्यामुळे विशिष्ट उच्चवर्णीय-उच्चवर्गीय हितसंबंधांशी आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांशी आणि धोरणांशी त्यांचा संघर्ष होणे केवळ अपरिहार्य होते. फुल्यांना राजकारण नव्हते, ते 'राजनिष्ठ' होते; 'राष्ट्रीय' चळवळीच्या ते विरुद्ध होते, इत्यादी अपसमज पिढ्यान् पिढ्या पसरविणाऱ्यांना फुल्यांच्या चळवळीचे खरे रहस्यच समजले नाही, किंवा त्यांनी त्याबद्दल जाणूनबुजून विपर्यास केला, असेच म्हणणे भाग आहे !

सामाजिक-आर्थिक-तितकेच राजकीय सुद्धा !

वर उल्लेखिलेले सर्व प्रश्न-त्यातील प्रत्येक प्रश्न शूद्र-अतिशूद्रांशी जाऊन भिडणारे असल्यामुळे त्या त्या प्रश्नाबाबत त्या त्या दलित-श्रमिक जनविभागांत जागृती, संघटना, आंदोलन सुरू होण्याचा मार्ग खुला होतो; त्यातून उच्च–वर्णीय उच्चवर्गीय प्रस्थापित गट आणि त्यांना पाठीशी घालणारे सरकारी धोरण व अधिकारी यांच्याशी अपरिहार्यपणे संघर्ष होतो आणि त्यातून तथाकथित तत्कालीन राष्ट्रीय चळवळीला कधीही न सुचलेले-तिने कधीही न संकल्पिलेले, तिला तेव्हा न पेलवणारे असे ताण-तणाव निर्माण होतात; त्यांतून नवी जनशक्ती निर्माण होते–ही खरी फुल्यांच्या ग्रामीण विविध चळवळींची अपेक्षित फलश्रुती होती आणि ती जितकी सामाजिक, आर्थिक तितकीच व्यापक अर्थाने राजकीयही होती.

फुलेप्रणित आंदोलनांचे तिहेरी स्वरूप !

या अर्थाने फुल्यांच्या चळवळीत राजकीय विरुद्ध सामाजिक, राजकीय की आर्थिक असे द्वैत-द्वंद्व नव्हते; एकीमुळे दुसऱ्या चळवळीत फूट पडेल, तिला कमजोरी येईल म्हणून ती नको; किंवा आता तरी नको, असा कोता संकुचित

व्यवहार फुल्यांजवळ नव्हता ! त्यांनी ज्या स्त्री-शूद्र-अतिशूद्रांना आपले म्हटले होते; त्यांच्याशी सर्वार्थांनी एकत्व मानले होते; त्यांना संपूर्णपणे आपले इमान वाहिले होते; त्यांच्यामध्ये सामाजिक-आर्थिक-राजकीय अशा वेगवेगळ्या दृष्टींनी विरोध उत्पन्न होण्याची–फूट पडण्याची फारशी भीती नव्हती. कारण ते दलित–श्रमिक म्हणजेच खरा देश–(खरा धर्मसुद्धा) अशी फुल्यांची मनोमन श्रद्धा होती ! त्यांच्या सामाजिक-आर्थिक प्रश्नांना धरूनच आपोआप राजकारण येणार होते. आणि या तिहेरी आंदोलनांत उच्चवर्णीय-उच्चवर्गीय आणि (त्यांना जर आणि जसे सरकार पाठीशी घालीत असेल तर सरकार) या सर्वांशी संघर्ष त्यांत अभिप्रेत होता. फुल्यांच्या या एकूण सर्वंकष भूमिकेचे दर्शन त्यांच्या सर्व लेखनांत दिसते, राजपुत्राच्या सभेत त्यांनी स्वतः दरिद्री शेतकऱ्यांच्या वेशांत येऊन आणि रोखठोक भाषण करून त्याचे प्रात्यक्षिक आणि प्रभावी अनोखे निदर्शनही केले ! कॉंग्रेसच्या मंडपासमोर–त्या तत्कालीन श्रेष्ठ राष्ट्रीय राजकीय व्यासपीठासमोरही त्यांनी तेच निदर्शन पुन्हा केले. या निदर्शनांमागील खरे रहस्य तत्कालिन उच्चवर्णीय–वर्गीय पुढाऱ्यांना समजले नसेल, ते त्यांना वेडेपणाचे– विक्षिप्तपणाचे, अडाणीपणाचे–आंडदांडपणाचे वाटले असेल ! पण शूद्र-अतिशूद्रांना अर्धपोटी-अर्धनागड्या लंगोटी-वाल्यांना त्या निर्शनांचा अर्थ नक्कीच समजला असेल ! त्या शोषित दलित-श्रमिक जनतेला त्यामुळे नवा प्रकाश, नवी प्रेरणा, नवा दिलासा, नवा आत्मविश्वास लाभला असेल यात शंका नाही. महात्मा फुल्यांचा निदान तसा प्रयत्न होता. हे सर्व सुचणारे, संकल्पिणारे तेव्हा आणि त्यानंतर अनेकानेक दशके म. फुले हे एकटेच एक होते ! ही फुल्यांची खरी थोरवी आहे आणि तिचा सामाजिक-आर्थिक तसाच आणि तितकाच राजकीय अर्थही आहे !

टिळकांना फुले-प्रेरणेचा स्पर्श ?

फुल्यांना हा जो झगझगीत प्रकाश दिसला त्यातील चार-दोन किरण दहा-वीस वर्षांनी टिळकांनाही दिसले. व्यवहारात (त्यांना पहिल्या वाटणाऱ्या राजकारणातून) राजकीय गरजेतून टिळकांनी कदाचित् ते किरण पाहिले असतील ! म्हणूनच १८९५–९६ नंतर सारावाढ, लोकल फंड, दुष्काळ, याबद्दल टिळक बोलू लागले, जमेल तेवढा 'शूद्र-संपर्क' साधण्याचा त्यांनीही प्रयत्न केला; सारावंदी, घेराव वगैरे मार्गांनी काही जिल्ह्यांत तरी या आंदोलनाने दलित-जनमानसाची पकड घेतली. त्यातूनच नवे ताण-तणाव निर्माण झाले. त्यातच प्लेगच्या कहरातील जुलमी वरिष्ठ अधिकारी रँडचा खून झाला;— टिळकांवर राजद्रोहाचा खटला झाला; आणि टिळक पुन्हा तुरुंगात गेले. सामाजिक सुधारणांना विरोध करणारे सनातनी नेते याऐवजी, आता सामान्य जनतेच्या वतीने सरकारला उघड आव्हान देणारे झुंजार निर्भय नेते, अशी टिळकांची नवी उज्ज्वल प्रतिमा महाराष्ट्रापुढे आणि देशापुढे प्रथमच आली !

पण दुर्दैवाने हे सर्व घडायला म. फुल्यांच्या मृत्युनंतर काही वर्षे उलटून जावी लागली ! हे बघायला म. फुले जगले असते तर ?—तर त्यांची प्रतिक्रिया काय झाली असती ? मला वाटते आपल्या क्षुद्र कोत्या दृष्टीने या प्रश्नाकडे आता तरी आपण बघू नये. पंधरा-सोळा वर्षांपूर्वी या मानाने कमी महत्त्वाच्या व सर्वसामान्य जनतेशी कमी संबंध असणाऱ्या प्रश्नावरून टिळक-आगरकर तुरुंगात गेले, तेव्हा या तरुण्याबांड होतकरू कार्यकर्त्यांचे कौतुक करावयाला तेव्हाचे वृद्ध व वडिलधारे नेते म. फुले हे उत्साहाने पुढे आले होते. टिळक-आगरकरांची जात किंवा विष्णुशास्त्र्यांची निरर्गल टीका तेव्हा फुल्यांच्या आड आली नव्हती ! आता १५ वर्षांनी फुल्यांना प्रिय असणाऱ्या गरीब दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या सामुदायिक आंदोलनाच्या नव्या पार्श्वभूमीवर, टिळक राजद्रोहाच्या आरोपावरून तुरुंगात गेले होते, त्यांचे काय फुल्यांनी स्वागत केले नसते ? आणि संभवतः फुले आणि टिळक काय एकमेकांच्या थोडे तरी जवळ आले नसते ? हे प्रश्न 'जरतारी' जरी वाटले आणि त्यात संभाव्यतेचा जरी प्रश्न असला तरी हा विचार करणे आज अत्यावश्यक आहे. शक्यता अशी आहे की, फुले आणि टिळक एकमेकांच्या अधिक जवळ आले असते; कारण फुल्यांच्याच प्रेरणेचा किंचित स्पर्श टिळकांच्या वाढत्या जन-आंदोलनाला प्रथमच होत होता ! फुल्यांना आनंद वाटावा अशीच ही घटना होती.

आणि आपल्याला प्रिय आणि मान्य असलेल्या चळवळीच्या कामी मिळेल त्याचे सहकार्य घेण्याचीच फुल्यांची पद्धती व परंपरा होती. अशा सहकार्यामध्ये न्या. रानड्यांपासून अनेक लहानमोठे ब्राह्मण नेतेही ओढले गेले होते.

काही कोत्या विपर्यस्त बुद्धीच्या फुले-विरोधकांना आणि अनुयायांनाही कदाचित् प्रश्न पडेल की, मग फुल्यांच्या तथाकथित राजनिष्ठेचे काय ? त्यालाही उत्तर काही अगदी ठळक प्रसंगीच्या खुद्द फुल्यांच्या धैर्यशाली वर्तणुकीवरूनच मिळते. इंग्लंडच्या राजपुत्राच्या पुण्यातील सभेत शेतकरी वेशातील फुल्यांनी केलेल्या परखड व प्रखर भाषणाचा उल्लेख वर आलाच आहे. त्याचप्रमाणे मुंबईच्या गव्हर्नरांना पुणे नगरपालिकेने मानपत्र देण्याला विरोध करणारे महात्मा फुले हे एकमेव नेते होते, या गोष्टीचीही आठवण ठेवणे जरूर आहे. दोन्ही प्रसंगी तथाकथित राष्ट्रीय-राजकीय म्हणविणारे पुढारी गप्प बसले; पण 'राजनिष्ठ' फुल्यांनी मात्र आपला जळजळीत निषेध आपल्या अनोख्या पद्धतीने व्यक्त केला ! तेव्हा विशिष्ट प्रसंगी फुले कसे वागले किंवा वागले असते यांचा अंदाज, त्यांच्या मूळ प्रेरणेवरून, त्यांच्या कमालीच्या निर्भय, निस्पृह, सडेतोड स्वभावावरूनच सांगता येईल. (टिळकांच्या आयुष्यातही काहीना अनपेक्षित वाटणारे असेच प्रसंग अनेकदा घडलेले आहेत, हे प्रसिद्धच आहे.)

अर्थातच टिळकांनी सामाजिक किंवा अन्य कोणत्याही बाबतीत काही गैर व अन्याय्य भूमिका घेतली असती तर फुल्यांनी तत्काळ त्यांना परखडपणे हटकले

असते, यांत शंकाच नाही. असेही अनेक प्रसंग आले असते. (उदाहरणार्थ, आणखीही काही वर्षांनी गाजलेले वेदोक्त प्रकरण वगैरे.)

पण शक्यता अशी आहे की, फुल्यांना अभिप्रेत असणाऱ्या सामान्य जनहिताच्या कार्यक्रमावर सहकार्याचे प्रसंग कदाचित अधिकाधिक आले असते; त्यामानाने सामाजिक प्रश्न थोडेफार तरी मागे पडले असते. शक्यता अशी आहे की, टिळकांवरही फुलेप्रणीत आंदोलनाचा (उत्तरकाळातील त्यातील विपर्यासाचा नव्हे) अधिकाधिक प्रभाव पडत गेला असता; आणि महाराष्ट्रात पुढे जी दरी दुर्दैवाने रुंदावत गेली ती कदाचित् भरून निघायला थोडीफार मदत झाली असती!

१८९७ नंतरच्या टिळकांच्या राजकारणाचा व आंदोलनांचा विकासक्रम पाहिला, तर त्याही दृष्टीने ही शक्यता वाटते. वेदोक्तासारख्या काही दुर्दैवी प्रसंगी टिळकांचे वर्तन अर्थातच अत्यंत अयोग्य, प्रतिगामी आणि उदयोन्मुख राष्ट्रनेत्याला सर्वस्वी न शोभणारे असे होते. त्यामुळे सामाजिक आंदोलनापेक्षाही राजकीय आंदोलनांचीच अधिक आणि कायमची हानी झाली. टिळकांच्या अहंकारी उच्चवर्णीय मर्यादा आणि त्यांच्या सनातनी ब्राह्मणी कार्यकर्त्यांचे व अनुयायाचे दडपण यांमध्ये या विपरीत वर्तनाचा उलगडा होऊ शकेल. पण हीही गोष्ट खरी आहे की, शेवटच्या वर्षात कालप्रवाह अधिक समंजसपणे समजून घेण्याचा टिळकांनी कसोशीने प्रयत्न केला. आपल्या उच्चवर्णीय व कोत्या दृष्टीच्या अनुयायांच्या परिसरातून बाहेर पडण्यात त्यांनी थोडेफार यश मिळविले. ज्या प्रमाणात या कामी त्यांना यश आले त्या प्रमाणातच त्यांचे पुढारीपण खरेखुरे 'लोक' मान्य होऊ शकले! तेल्यातांबोळ्यांचे पुढारी टिळक खरोखर केव्हा आणि कितपत तसे झाले या प्रश्नाबद्दल वाद होऊ शकेल! पण आपल्या जुन्या परिसराच्या बाहेर पडून शहरी विभागात तरी काही प्रमाणात सामान्य जनमानसाला स्पर्श करण्याची मर्यादित शक्ती टिळकांमध्ये तरी नंतर कोठून आली? केवळ व्यक्तिमत्व, चारित्र्य, निर्भयपणा किंवा साम्राज्यसत्तेशी झुंज घेतांना त्यांनी सोसलेल्या हालअपेष्टा एवढेच टिळकांचे आकर्षण किंवा आवाहन होते काय?

कामगारवर्गावरील टिळकांच्या प्रभावाचे रहस्य!

मुंबईच्या नवोदित लढाऊ कामगारवर्गावर–७५ वर्षांपूर्वीच्या आशिया खंडातील सर्वांत बलिष्ठ आणि पुढारलेल्या झुंजार कामगार वर्गावर इतर कोणत्याही पुढाऱ्यांचा कधीही नव्हता एवढा प्रभाव टिळकांचाच कसा पडू शकला? त्यांना सहा वर्षे काळ्यापाण्याची सजा होताच, पाच हजार मैलावर कॉ. लेनिनलासुद्धा ज्याची सहर्ष दखल घ्यावीशी वाटली असा ऐतिहासिक उठाव या कामगारांनी टिळकांसाठी १९०८ साली का केला? पाशवी सरकारी दडपशाही, मालकांचे दडपण, कचखाऊ पुढाऱ्यांनी केलेला बुद्धिभेद, यांना न जुमानता, हा उठाव अनेक दिवस टिकाव कसा धरू शकला?

याचे साधे उत्तर असे की, टिळक आणि नवोदित लढाऊ कामगारवर्ग यांमध्ये काही एक सामंजस्य, काही नवे लागेबांधे, काही परस्पर-विश्वास उत्पन्न झाला होता. थोडक्यात म्हणजे नवोदित कामगारवर्गाचे नवे प्रश्न, त्यांचा मालकाविरुद्धचा वर्गलढा, राष्ट्रीय आंदोलनाशी त्याचा संबंध या सर्वस्वी नव्या प्रश्नांबाबत कामगारांचे मानस टिळकांना निश्चितपणे समजू लागले होते; आणि कामगारांकडूनही त्यांना प्रतिसाद मिळू लागला होता. आणि इतर कोणत्याही बहुजन समाजाच्या पुढाऱ्याला किंवा मवाळ सुधारकांना जे जमले नव्हते ते टिळकांना साधले होते! याचा अर्थच असा की, फुल्यांनी त्यांच्या लोखंडे प्रभृती पहिल्या अनुयायांमार्फत जी प्रेरणा नव्याने जन्माला आलेल्या कामगारवर्गात उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला होता, तीच प्रेरणा टिळक अधिक पुढे घेऊन जात होते. कामगारांच्या मागण्यांना-संपांना पाठिंबा देत होते; वर्गलढ्याची महती गात होते; कलियुगात संघ हीच शक्ती आहे म्हणून ट्रेड युनियन संघटित करायला उत्तेजन देत होते!

रशियन क्रांती व नवे जग

कामगार हा फुल्यांच्या परिभाषेतील शूद्र-अतिशुद्रातलाच एक अग्रेसर विभाग होता; त्यात हजारो कामगार स्त्रियाही भारतात प्रथमच भरती झाल्या होत्या. जुन्या उच्चवर्णीयांच्या जोडीला नव्याने निर्माण झालेला उच्चवर्गीय भांडवलदार हा त्या कामगारवर्गाचे नव्या तंत्राने शोषण करीत होता, जुलूम-जबरदस्ती करीत होता. इंग्रजांशी लढा चालू असतानाच कामगारवर्गाने भांडवलदारवर्गाविरुद्ध चालविलेल्या लढ्यालाही टिळकांनी स्पष्ट पाठिंबा दिला होता. फुल्यांच्या मूळ प्रेरणेला हे सर्व धरूनच होते; किंबहुना ती प्रेरणा नव्या परिस्थितीत–नव्या प्रश्नाबाबत अधिक पुढे नेण्याचे, भरीव करण्याचे प्रत्यक्ष कार्यच टिळक करीत होते. यामुळे टिळक आणि फुल्यांची अस्सल प्रेरणा अधिकच जवळजवळ आली असे म्हटले तर फुल्यांचा व टिळकांचा विपर्यास करणारांना (विरोधकांना त्याचप्रमाणे अनुयायांनासुद्धा!) कदाचित ते चमत्कारिक वाटेल! पण वस्तुस्थिती तशीच आहे.

सहा वर्षांची शिक्षा भोगून टिळक तुरुंगातून परत आले आणि अधिकच जनताभिमुख झाले; जुन्या गोतवळ्यापासून व कोंडावळ्यापासून ते अधिकच दूर गेले!

हिंदू-मुस्लीम ऐक्यासाठी १९१६ साली टिळकांनी बॅ. जिन्हांबरोबर केलेला 'लखनौ करार' हे या परिणतप्रज्ञ नेत्याचे आणखी एक नवे दर्शन होते. (त्यांच्या जुन्या अनुयायांनी डॉ. मुंजांपासून सावरकरांपर्यंत सगळ्यांनी अजूनही या पापाबद्दल टिळकांना क्षमा केलेली नाही! त्याहूनही महत्त्वाची गोष्ट म्हणजे टिळकांनी १९१७ च्या रशियन क्रांतीचे मनमोकळे हार्दिक स्वागत; कामगार राज्याचे केलेले कौतुक! रशियाप्रमाणेच पुढेमागे सर्वत्र होणार व झाले पाहिजे ही उच्चारलेली भविष्यवाणी आणि कामगारवर्गाला त्या दृष्टीने त्यांनी केलेले आवाहन—फुल्यांच्याच

मूळ प्रेरणांची ही आणखीन पुढली परिणती होती ! नंतर टिळक इंग्लंडला गेले— युद्धोत्तर नवे जग, रशियन क्रांतीच्या प्रभावाने बदललेले नवे जग टिळकांनी स्वतः डोळ्यांनी पाहिले आणि त्या नव्या जगात भारताचे व आपले स्थान कोणते याबद्दल त्यांची खात्री पटली. म्हणूनच टिळकांनी इंग्लंडमधील व युरोपातील बलिष्ठ कामगार-वर्गाबरोबर दोस्तीचे संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला; रशियन क्रांती करणाऱ्या बोल्शेव्हिकांशीसुद्धा संबंध ठेवले—इतके की इंग्रज सरकारच्या पोटात भीतीचा गोळा उठवा !

पन्नास वर्षांपूर्वी फुल्यांनी अमेरिकेतील गुलामगिरी नष्ट करणाऱ्या जनतेबरोबर आणि नीग्रो गुलामांबद्दल आपली गाढ सहानुभूती व बंधुभाव प्रगट केला होता; आता टिळकांनी तीच फुल्यांची मूळ प्रेरणा आणखी पुढे नेऊन जगातील क्रांतिकारक कामगारवर्गाशी, महान् रशियन क्रांतीशी आपले नाते जोडले ! फुल्यांच्याच मूळ प्रेरणेची ही केवढी विस्मयकारक परिणती होती !

भारतामध्येही कामगारवर्गाची शक्ती व त्यांचे वर्गसंघटनेचे हत्यार पाजळून तयार व्हावे म्हणून भारतीय कामगारवर्गाची मध्यवर्ती ट्रेड युनियन संघटना (ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस) स्थापन करण्यात पुढाकार घेणे हे टिळकांच्या राजकीय जीवनातील एक शेवटचे महान् कार्य ठरले; ही गोष्टही या संदर्भात ध्यानात ठेवली पाहिजे.

फुल्यांच्या मूळ प्रेरणा आणि १८९६–९७ नंतर टिळकांच्या जीवनाला लागलेले नवीन वळण पुढील २० वर्षांत (आणि अगदी मृत्युपर्यंत) यांचा होत गेलेला विकास यांची एकत्र मांडणी करण्याचा एक स्थूल प्रयत्न येथे केला आहे.

पण टिळकांचे अनुयायी असे करंटे निघाले की, त्यांनी टिळकांचा हा सारा महान् वारसा वर्षा–दोन वर्षांतच धुळीस मिळविला. टिळकांनंतर ज्यांच्या हाती राष्ट्राचे पुढारीपण गेले ते म. गांधी अनेक बाबतींत टिळकांपेक्षा किती तरी अधिक जनतेजवळ गेले; अनेक महान् आंदोलने त्यांनी केली. पण वर्गलढ्याला, कामगार-वर्गाच्या क्रांतिकारक भूमिकेला त्यांनी प्रथमपासून आणि कसून विरोध केला; शोषक मालकांना कामगारांचे पालक ठरविले ! आणि दुर्दैवाची गोष्ट अशी की फुल्यांचे अनुयायी म्हणविणारांनी, तथाकथित बहुजन समाजाच्या ना. जाधव प्रभृती पुढाऱ्यांनी तर भांडवलदारांची हस्तकगिरी सरकारच्या मदतीने खुशाल केली ! फुल्यांच्या महान् प्रेरणेचा हा विपर्यास बंद पाडण्यासाठी आणि त्या प्रेरणेचे पुन्हा पुनरुज्जीवन करण्यासाठी जेधे-जवळकरांना बंड करावे लागले; जवळकरांना तर नंतर मार्क्सवादांचा व वर्गलढ्याचा स्वीकार करावा लागला आणि पुढे १९४८ मध्ये फुल्यांच्या चळवळीतील ज्येष्ठ व श्रेष्ठ अनुयायांना दाभाडी प्रबंधाच्या अन्वये मार्क्सवादाची आणि आंतरराष्ट्रीयवादाची दीक्षा घ्यावी लागली !

लढाऊ राष्ट्रीय चळवळीच्या कुशीत जन्म पावलेल्या कॉ. डांगे प्रभृती तरुणांनी अगोदरच (१९२० पासूनच) मार्क्सवादाचा स्वीकार आणि कामगार-लढ्यांचे झुंझार नेतृत्व करून टिळकांची-फुल्यांची प्रेरणा अधिक पुढे नेली; संपूर्ण स्वातंत्र्याचा, समाजवादाचा, फुल्यांना प्रिय असणाऱ्या कामगार-शेतकऱ्यांच्या कार्यक्रमाच्या घोषणा राष्ट्रीय चळवळीत आणि वर्गीय चळवळीत प्रभावीपणे उठविल्या होत्या. फुल्यांच्याच मूळ प्रेरणेचा हा आणखी एक प्रभावी आविष्कार होता. आंबेडकरांनीही आणखी एका वेगळ्या दिशेने आणि पद्धतीने फुल्यांच्या प्रेरणेचा विस्तार केला. (या महत्त्वाच्या घटनांचा सविस्तर परामर्श पुढे स्वतंत्रपणे घेतला आहे.)

प्रकरण ४ थे

'आधी'चा एक भ्रामक वाद : सामाजिक की-आणि-विरुद्ध राजकीय ?

या ठिकाणी आणखी एका गाजलेल्या वादाबद्दल किंवा खरे म्हणजे वितंड-वादाबद्दल थोडा विचार करणे आवश्यक आहे. तो वाद म्हणजे पुढे फुल्यांच्या उत्तर आयुष्यात (आणि टिळक-आगरकरांच्या पूर्वायुष्यात) खेळला गेलेला इतिहासप्रसिद्ध वाद-वितंडवाद ! —आधी सामाजिक की आधी राजकीय हा होय.

'आधी सामाजिक की राजकीय' अशी त्याची मांडणी करणे तेव्हाही वस्तुतः चुकीचे होते आणि आजही त्याचा तसा उल्लेख करणे तर केवळ चुकीचेच नव्हे, तर अनैतिहासिकच म्हटले पाहिजे.

हा वाद तेव्हाही खरे म्हणजे केवळ 'आधी सामाजिक की राजकीय' अशा साध्या-सरळ-सोप्या स्वरूपात मांडलाच गेला नव्हता आणि पुढे तो जेव्हा खेळविला गेला-लढविला गेला तेव्हा तर त्याला तसे स्वरूप कधीच उरले नव्हते !

'आधी सामाजिक की राजकीय' या ऐवजी प्रत्यक्षात त्याची मांडणी आणि भांडणी 'सामाजिक विरुद्ध राजकीय' अशीच व्यवहारात आणि प्रत्यक्षात तरी झाली, ही खरी इतिहासात घडलेली वस्तुस्थिती आहे.

सामाजिक आणि राजकीय-

खरे म्हणजे प्रथम 'सामाजिक आणि राजकीय' दोन्ही, एकाच वेळी समांतर चालले पाहिजे; म्हणजेच हा सर्वांगीण प्रगतीचा प्रश्न आहे, अशीच धारणा अव्वल इंग्रजीतल्या नव-विचारकांची व नेत्यांची होती. राममोहन रॉयपासून ते न्या. रानड्यापर्यंत सतत या विचारांचा धागा अनुस्यूत असलेला दाखवून देता येण्यासारखा आहे.

फार काय १८८०–८५ च्या काळातील तरण्याबांड टिळक-आगरकरांची (दोघांचीही) वैचारिक बैठक सामान्यतः अशाच आशयाची होती, ही गोष्टही इतिहासगत वस्तुस्थिती म्हणून ध्यानात ठेवावयास हवी. पण त्यानंतर मात्र 'सामाजिक आणि राजकीय' ही भूमिका बदलून 'आधी सामाजिक की राजकीय' असा संदेह निर्माण करण्यात आला. प्रथम नेत्यांमध्ये, नंतर कार्यकर्त्यांमध्ये. नंतर या संदेहाचे रुपांतर लवकरच वादात—वितंडवादात होऊ लागले आणि मग या वादामध्ये जनतेचा पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न सुरू झाला. (अर्थात त्यावेळची 'जनता' म्हणजे मुख्यतः शहरी मध्यमवर्ग–म्हणजेच मुख्यतः ब्राह्मण किंवा पांढरपेशा वर्ग हाच होता.) या जनतेला सामील करून घेण्याचा–तिला या वादात वादीप्रतिवादी करून घेण्याचा जेव्हा प्रयत्न सुरू झाला, तेव्हा तो मुख्यतः आधी राजकीय म्हणणाऱ्यांकडूनच विशेषेकरून झाला. कारण स्थितिप्रिय जनतेच्या पातळीला ती भूमिका सहजगत्या मानवण्यासारखी होती. उलट 'सामाजिक आधी' ही भूमिका स्थितिप्रिय–सनातनी जनतेला आपोआप एकदम मान्य होण्याचा संभवच नव्हता.

आधी सामाजिक की राजकीय?

तेव्हा हा वाद—आधी सामाजिक की राजकीय या स्वरूपात जेव्हा जनतेपर्यंत गेला–नेण्यात आला तेव्हा स्थितिप्रिय जनतेचा स्वाभाविक सनातनीपणा हा एक नवा वस्तुनिष्ठ घटक सहजच अधिक प्रभावी ठरू लागला. थोडक्यात म्हणजे केवळ विचाराच्या किंवा वादाच्या पातळीवरून हा प्रश्न आता जनभावनेच्या पातळीवर आला आणि तेथे तो सोडविण्याचा प्रयत्न होताच, त्याचा प्रत्यक्षात परिणाम काय होणार, हे एकप्रकारे ठरूनच गेले. म्हणजेच झाले असे की शहरी मध्यमवर्गाच्या म्हणजेच—ब्राह्मण पांढरपेशा वर्गाच्या सनातनी भावना या प्रभावी ठरल्या; आणि सामाजिक हा पक्ष आपोआपच गौण–कमजोर ठरला; त्याच्या पुढील पराभवाची पायाभरणी झाली.

सामाजिक विरुद्ध राजकीय!

पण जनता-जनभावना जेव्हा या वादात वादी ठरली तेव्हाच आणखी एक नवा घटक त्यामध्ये प्रभावी ठरण्याची वेळ आली. वादविचाराच्या पातळीवरून भावनेच्या–जनभावनेच्या–पातळीवर सोडविला जाण्याची शक्यता निर्माण झाल्यावर मग स्वाभाविकपणेच त्या तत्कालिन जनभावनेला–म्हणजेच स्थितिप्रिय ब्राह्मण पांढरपेशांच्या स्वाभाविक सनातनीपणाला आवाहन करण्याचा मोह वादांतील एका पक्षाला पडण्याचा क्षण आला.

सामाजिक आणि राजकीय याऐवजी आधी सामाजिक की राजकीय असे करता करता, सामाजिक विरुद्ध राजकीय असे स्वरूप या वादाला येऊ लागले आणि वाद जिंकण्यासाठी सनातनी जनभावनेला आवाहन हेच प्रभावी ठरले!

टिळक-आगरकर या नव-नेतृत्वाच्या जोडीऐवजी टिळक विरुद्ध आगरकर हे प्रतिद्वंद्व जनतेपुढे आले आणि पुढील अनेक दशके ते तसेच टिकले; दोघांच्याही मृत्युपर्यंतच नव्हे तर मृत्यूनंतरही ! (आजही त्यांचे पडसाद उठतच आहेत !)

नवे-समीकरणः सुधारक मवाळ विरुद्ध सनातनी जहाल !

थोड्याच वर्षांत या मूळ वादाला आणखी एक विशेषण चिकटले. सामाजिक (आणि–की–विरुद्ध) राजकीय या वादाचे स्वरूप, काही वर्षांनी सामाजिक सुधारणा म्हणजेच राजकीय मवाळ आणि राजकीय जहाल म्हणजेच सामाजिक सुधारणेचे कट्टर विरोधक सनातनी असे नवे समीकरण रूढ झाले; आणि रूढीच्याच चिवट आणि जिवटपणाने ते दशकानुदशके टिकूनही राहिले !

आणि मग या समीकरणाभोवतीच राजकीय डावपेच खेळले जाऊ लागले. राजकीय जहाल-मवाळांकडून, त्याचप्रमाणे सुधारक–सनातन्यांकडून आणि त्याच बरोबर इंग्रज राज्यकर्त्यांकडूनसुद्धा. अर्थातच एव्हाना सामाजिक आणि राजकीय म्हणजेच सर्वांगीण-सर्वंकष परिवर्तनाची खरीखुरी उपयुक्त अत्यावश्यक भूमिका केव्हाच मागे पडली. त्याऐवजी सामाजिक विरुद्ध राजकीय अशी खोटी, भ्रामक, घातक, विभाजक भूमिका दृढमूल झाली. आणि त्या भूमिकेभोवती सारे राजकारणच नव्हे तर समाजकारण-अर्थकारण-संस्कृतिकारणही फिरू लागले–फिरत राहिले.

या वादाचा निष्कर्ष–

- सामाजिक न्यायाचा लढा (सामाजिक सुधारणेचा समतेचा लढा) राजकारणापासून सत्तांतराच्या लढ्यापासून वेगळा काढता येत नाही.
- राजकीय लढा सामाजिक न्यायाच्या लढ्यापासून अलग करता येत नाही.
- हे दोन्हीही लढे आर्थिक-औद्योगिक क्रांतीच्या प्रक्रियांपासून वेगळे काढता येणार नाहीत.
- या सर्वांचा मिळून एकच कालप्रवाह होतो–होत आहे–होत राहणार आहे. त्याची प्रेरणा-धारणा वर्गीय आहे.
- राजकीय-सामाजिक-आर्थिक या तिन्ही लढ्यांना व्यापून वर्गीयता उरली आहे.
- ही वर्गीयताही स्थळ-काळ-परिस्थितीने बांधलेली-सांधलेली आहे. तिचे विशिष्ट भारतीय स्वरूप आहे; इतर सर्व गोष्टींप्रमाणे तेही परिवर्तनशील आहे.

एकूण वस्तुस्थितीला कोणत्यातरी पोथिबद्ध साच्यांत किंवा ढाच्यांत कोंबण्याचा प्रयत्न कोणीही करू नये. ते अशास्त्रीय–अनैतिहासिक ठरेल. तसे केल्यास इतिहास, आजची वस्तुस्थिती आणि उद्याचे भविष्यचित्र यासंबंधीचे निष्कर्ष चुकीचे ठरतील.

- म्हणून राजकीय–सामाजिक–आर्थिक या सर्व लढ्यांचा विचार एकत्रित, समग्र, संतुलित असाच केला पाहिजे. हे आधी की ते नंतर; हे मुख्य की ते गौण;

हे नित्य की ते नैमित्तिक अशा प्रकारचे प्रश्न खोटे, दिशाभूल करणारे ठरतात; त्यामुळे मूलभूत प्रश्नांना तुटक, फुटकळ, प्रासंगिक उत्तरे मिळण्याचाच संभव असतो.

आणखी एक बलवत्तर भ्रम–

जे राजकीय जहाल ते सामाजिक दृष्ट्या सनातनी आणि जे सामाजिक सुधारक ते राजकीय मवाळ हे समीकरण आता सर्वांना परिचितच आहे. पण याही बाबतीत एक भ्रम अजूनही बलवत्तर आहे. तो भ्रम विशेषतः सामाजिक सुधारकांच्या सर्वसामान्य मवाळपणामुळे अधिकच दृढमूल झालेला आहे. इंग्रज सरकार हे राजकीय मवाळांचे सतत पाठिराखे असल्यामुळे ते जणूकाय सामाजिक सुधारणेचेही पाठीराखे होते, हा तो भ्रामक समज होय. इंग्रज सरकारचा राजकीय मवाळांना सतत पाठिंबा होता. हे अर्थात खरेच आहे; पण त्याचा अर्थ असा नव्हे की, राजकीय मवाळांना अभिप्रेत असलेल्या सामाजिक सुधारणांनाही इंग्रज सरकारचा सतत पाठिंबा होता. इतिहासगत वस्तुस्थितीच्या दृष्टीने पाहिले तर ही गोष्ट सत्य नाही; फार तर क्वचित् प्रसंगी ती अर्धसत्य ठरू शकेल आणि प्रायः ती असत्यच असल्याचे प्रत्ययाला येईल. पण इतिहासगत वस्तुस्थिती म्हणून या गोष्टीची येथे नोंद करीत आहे.

इंग्रज आणि सामाजिक सुधारणा–

इंग्रज सरकार जणु काय भारतामध्ये सामाजिक सुधारणा करण्याला अतिशय उत्सुक होते; सरकारने जसे काय ते व्रतच घेतले होते; आणि आधुनिक विद्येची प्रतिष्ठा आणि इंग्रजी राज्यसत्तेचा अधिकार गाजवून या विविध सामाजिक सुधारणा नेटाने अमलांत आणण्याचा त्यांनी प्रयत्न चालविला होता, असा एक समज पसरलेला आहे. इंग्रजी राज्यकर्त्यांना, खिस्ती धर्मगुरुंना, त्याचप्रमाणे आधुनिक शिक्षणाचे वाघिणीचे दूध पाजणाऱ्या इंग्रज शिक्षक मार्गदर्शकांना भारतीय समाजात सामाजिक सुधारणा व्हाव्यात असे वाटणे स्वाभाविक होते.

पण हे वाटणे आणि त्यासाठी प्रत्यक्ष प्रयत्न करणे—त्या प्रयत्नांपायी राजकीय प्रतिष्ठेचा व सत्तेचा उपयोग करणे या गोष्टी अगदी वेगळ्या हो या, हे आपण आज तरी समजून घेतले पाहिजे. शिवाय, सामाजिक सुधारणेच्या प्रश्नाकडे बघताना वर उल्लेखिलेल्या तिन्ही घटकांचा वेगवेगळा दृष्टिकोण होता आणि त्याच्या वेगवेगळ्या हितसंबंधांनुसार त्यांचे धोरण आणि प्रत्यक्ष वर्तन होत असे, हीही गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे.

उदारमतवादी इंग्रज विचारवंत !

आधुनिक विद्या-विभूषित अशा इंग्रज उदारमतवादी विचारवंतांना अर्थातच त्यांच्या भूमिकेतून भारतीय जनतेमध्ये सर्वांगीण सुधारणा व्हाव्यात, सनातन

भारतीय समाजाचे आधुनिकीकरण व्हावे, असे वाटणे स्वाभाविक होते, आणि त्यांचे मुख्य साधन आधुनिक शिक्षण हे होते. या आधुनिक इंग्रजी शिक्षणाद्वारे हिंदी जनतेला शहाणे करून सोडावे, जीर्ण-शीर्ण कालबाह्य रूढींच्या जोखडातून तिला मुक्त करावे आणि आधुनिक शास्त्रीय विचार-आचाराच्या प्रवाहात तिला आणून सोडावे, असे त्याचे प्रयत्न होते. अर्थात् हे त्यांचे प्रयत्न अत्यंत मर्यादित होते आणि त्यांचा सुवर्ण-स्पर्श भारतातील फक्त मूठभर शहरी ब्राह्मण-पांढरपेशा वर्गापुरताच मर्यादित होता.

ख्रिस्ती धर्मप्रसारक आणि सामाजिक सुधारणा–

ख्रिस्ती धर्मगुरूंचीही दृष्टी सामान्यतः उदारमतवादी मानवतावादी होती; पण ती ख्रिस्ती धर्माच्या प्रेमाने आणि ख्रिस्ती धर्मप्रसाराच्या अभिनिवेशाने प्रभावित झालेली होती–क्वचित् विकृतही झालेली होती. म्हणजे असे की, त्यांच्या मते ज्या सामाजिक सुधारणा होणे आवश्यक होत्या, त्यांचा संबंध सनातन हिंदू समाजाच्या विषम, अन्याय्य, जन्मजातिबद्ध समाजरचनेशी निगडीत होता. हिंदू समाजातील हे दोष अपरिहार्य आणि अपरिवर्तनीय होते. शिवाय हिंदू समाजाला सुधारणे सोपे नव्हते; त्यापेक्षा हिंदू धर्मातील व जातिबद्ध विषम समाजातील वर्मावर प्रखर हल्ले करून, त्या वर्माचा फायदा घेऊन ख्रिस्ती धर्माचा प्रसार करणे, हे त्यांचे धोरण होते. हिंदूंच्या अन्यायाला बळी पडलेल्या स्त्री-शूद्र-अतिशूद्रांना ख्रिस्ती कळपात ओढण्याचा प्रयत्न करणे, हिंदू बुद्धिमंतांना उदारमतवादी–मानवतावादी–भावनांचे आवाहन करून त्यांनाही दयाघन येशू ख्रिस्ताची करुणा शिकविणे-अशी ख्रिस्ती धर्मगुरुंची दृष्टी होती;– त्यांचा तो हेतु होता. अर्थातच हे सर्व धर्मगुरू धर्मप्रसाराच्या अभिनिवेशाने भारलेले होते. यामुळे ख्रिस्ती धर्मगुरूंनी आणि प्रचारकांनी भारतामध्ये सामाजिक सुधारणेचे जे कार्य सुरू केले होते, त्याला ख्रिस्ती धर्मप्रसाराचा हेतू चिकटलेला होता; त्यांच्या सुधारणेच्या आणि सेवेच्या विविध कार्यांना आणि उपक्रमांना त्यामुळे धर्मप्रसाराचा रंग चढलेला होता. अर्थात् शेकडो वर्षे मुसलमानांनी (किंवा नंतर गोव्यात पोर्तुगीज धर्मप्रसारकांनी) राज्यसत्तेचा आणि जबरदस्तीचा उपयोग जसा आणि ज्या प्रमाणावर केला, तसा इंग्रजी अंमलाखालील ख्रिस्त्यांनी केला नाही, हे खरेच आहे. पण इंग्रजी अंमलाच्या प्रारंभी काही काळ तरी सरकारी सत्तेचे पाठबळ त्यांना काही प्रमाणात तरी लाभले होते. हिही गोष्ट दृष्टिआड करता येणार नाही. या सर्व कारणांमुळे ख्रिस्ती धर्मगुरूंनी केलेले सामाजिक आणि सेवाकार्य हे निर्भेळ सामाजिक सुधारणेच्या दृष्टीने पाहिले तर एक प्रकारे दूषित आणि विकृत झालेले दिसते. त्यांच्या धर्मप्रसाराच्या हेतुमुळे एकूण हिंदू समाजामध्ये त्यांच्याबद्दल संशयाचे आणि विरोधाचे वातावरण निर्माण झाले होते. या सर्व गोष्टी निर्भेळ सामाजिक सुधारणेच्या दृष्टीने इष्ट आणि पोषक नव्हत्या, हे उघड आहे.

१८५७ चा एक अभावित परिणाम !

खुद्द इंग्रज सरकारचे सामाजिक सुधारणांबाबत धोरण काय होते? इंग्रज राज्यकर्ते सामान्यतः आधुनिक विचारांचे होते. त्यांना राज्यकर्ते म्हणूनही हिंदू समाजातील काही अन्याय्य, क्रूर, अमानुष अशा रूढी बंद करणे आणि इंग्रजी न्याय आणि कायद्याचे राज्य सुरू करणे आवश्यक वाटतच होते. या दृष्टीने लॉर्ड बेंटिकसारख्या श्रेष्ठ शासकांनी इंग्रजी कायदा लागू केला; सतीसारख्या काही अमानुष खुनी चाली बंद पाडल्या. पण बेंटिकने केलेल्या महत्त्वाच्या सुधारणांचा पहिला हप्ता हा इंग्रज राज्यकर्त्यांनी केलेल्या सुधारणांचा शेवटचाच हप्ता ठरावा, अशी परिस्थिती लवकरच निर्माण झाली. या घटनेचा संबंध सन १८५७–५८ च्या सुप्रसिद्ध सैनिकी उठावाशी निगडीत झालेला असल्यामुळे, तिचा विचार त्याच संदर्भात केला पाहिजे.

या ठिकाणी १८५७ च्या उठावामागील एकूण प्रेरणा आणि कारणमीमांसा यांमध्ये जाण्याला अवकाश नाही. पण त्या घटनांमागे धार्मिक स्वरूपांशी निगडित अशी काही महत्त्वाची, व्यापक त्याचप्रमाणे प्रासंगिक कारणे होती, याबद्दल मात्र शंका नाही. त्या उठावाची ठिणगी ज्यामुळे पडली किंवा उठावापूर्वीच्या काही घटना, पूर्वतयारी, यंत्रणा या सर्वांमागे धार्मिक स्वरूपाचा काही अंश तरी नक्कीच होता. त्या उठावाचा संपूर्ण पराभव झाल्यानंतर–बंडाळीचा उपशम झाल्यानंतर कंपनीचे राज्य संपुष्टात आले आणि प्रत्यक्ष इंग्रजांचे म्हणजे राणीचे राज्य सुरू झाले. या नव्या अस्सल इंग्रजी राजवटीचा प्रारंभ इतिहासप्रसिद्ध राणीच्या जाहीरनाम्याने झाला. इंग्रजी राजवट म्हणजे न्याय आणि दया यावर आधारलेल्या कायद्याची राजवट असा दावा नेहमीच करण्यात येत असे. या राजवटीचा प्रारंभ ज्याच्या आधारावर झाला, त्या राणीच्या जाहीरनाम्यात एका अत्यंत महत्त्वाच्या बाबतीत इंग्रजी न्यायाला आणि कायद्याला अजिबात मुरड घालण्यात आली होती. ती म्हणजे भारतामधील हिंदू–मुसलमान–शिख वगैरे प्रजाजनांना त्यांच्या धार्मिक निष्ठा, समजुती, रूढी, रीति-रिवाज यांच्या काटेकोर पालनाची संपूर्ण आणि निस्संदिग्ध हमी देण्यात आली होती. या हमीमुळे इंग्रजी कायद्याला–त्याच्या काटेकोर अंमलबजावणीला इतक्या आणि इतक्या महत्त्वाच्या बाबतीत मर्यादा पडल्या की त्याचे आजही आश्चर्य वाटावे. भारतामधील अत्यावश्यक सामाजिक सुधारणांच्या लढ्यावर तर त्यामुळे वज्राघातच झाला, असे म्हणणे यत्किंचितही अतिशयोक्तीचे ठरणार नाही. म्हणूनच लॉर्ड बेंटिकचा सामाजिक सुधारणेचा पहिला हप्ता शेवटचा ठरला. आणि नंतर मूलभूत सरकारी धोरण म्हणून–शासनाचे मार्गदर्शक तत्त्व म्हणून सामाजिक सुधारणा या व्यवहारतः बाद ठरल्या.

राणीचा जाहीरनामा—सामाजिक सुधारणेवर आघात !

हिंदू–मुसलमानांच्या धार्मिक बाबतीत कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप न करण्याचे व्यापक आश्वासन म्हणजे त्या धर्मातील सर्वव्यापी-सामाजिक रूढी, रीतिरिवाज,

चाली, प्रथा, समजुती या साऱ्यांनी व्यापलेल्या सर्वस्पर्शी विषमतेला, अन्यायांना, अनाचारांना, मिथ्याचारांना, अत्याचारांना मिळालेले इंग्रज राजवटीचे सर्वंकष संरक्षणच होते, अभयदानच होते, जीवदानच होते. राणीचा जाहीरनामा म्हणजे सर्व सनातनी हिंदू-मुस्लीम धर्म-मार्तंडाना आपले विविध मिथ्याचार चातुर्वर्ण्यादी विषमता, स्त्री-शूद्र-अतिशूद्रावरील विविध अन्याय, अखंड चालू ठेवण्याची वंश-परंपरेने मिळालेली सनदच होती ! त्याचप्रमाणे जन्मसिद्ध जातिभेदांवर उभारलेल्या विषम समाजरचनेला, तिच्याखाली हजारो वर्षे पिचणाऱ्या स्त्री-शूद्र-अतिशूद्रांना मिळालेली ती गुलामगिरीची काळी सनदच होती ! राणीचा जाहीरनामा म्हणजे धर्मस्वातंत्र्याचे वरदान नसून ती स्त्री-शूद्र-अतिशूद्रांची सामाजिक गुलामगिरी पक्की करणारी राणीची शापवाणीच होती !

१८५७ च्या अपेशी उठावावरील राजकीय भाष्य आणि कारणमीमांसा अनेकांनी केलेली आहे; पण त्याच अपेशी उठावाचे एक अप्रत्यक्ष फलित म्हणजे ही गुलामगिरीची सनद होती, या तिच्या स्वरुपाकडे आवश्यक तेवढे ध्यान दिले गेले नव्हते; जात नाही असे म्हणणे भाग आहे. किंबहुना काही सनातनी विचाराकडे झुकणारी आधुनिक मंडळी तर राणीच्या जाहीरनाम्यातील धर्मासंबंधीचे आश्वासन म्हणजे उठावाचे एक अप्रत्यक्ष विजयी फलित असेच खुशाल मानताना आढळत.

१८५७ नंतर आणि राणीच्या जाहीरनाम्यानंतर इंग्रजी राज्यकर्त्यांच्या एकूण धोरणात आणि दैनंदिन शासनाच्या मार्गदर्शक सूत्रांमध्ये महत्त्वाचे बदल झाले. ब्रिटिश उदारमतवादी-मानवतावादी विचारवंत आपले विचार मांडत राहिले आणि त्यांचे भारतीय शिष्यही त्यांचा अनुवाद करीत राहिले. पण सामाजिक सुधारणांबाबत या इंग्रजी विचारवंतांचे मार्गदर्शन घेणे इंग्रज शासनकर्त्यांनी नक्की बंद केले. त्याचप्रमाणे ख्रिस्ती चर्चला आणि धर्मगुरुंना, त्यांच्या धर्मप्रसाराच्या कार्यात शासना-कडून प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे मिळणारे पाठबळ (आदीवासी आणि मागास विभाग वगळता,) बऱ्याच प्रमाणात कमी झाले. त्याचप्रमाणे दैनंदिन शासनाच्या कारभारातही या धोरणाचे परिणाम विविध स्वरूपांत दिसू लागले.

इंग्रजांना राज्य करावयाचे होते !

याबाबत मुख्य गोष्ट ध्यानात ठेवावयास हवी ती ही की, इंग्रजांची सामाजिक सुधारणेबाबतची मते काहीही असली आणि लेखणीने आणि वाणीने ते कितीही उदारपणाने बोलत असले तरी ते प्रथमतः आणि प्रमुखतः राज्यकर्ते होते; त्यांना या देशात राज्य करावयाचे होते–– ते टिकवावयाचे होते, वाढवावयाचे होते. त्या दृष्टीने–आणि मुख्यतः त्याच दृष्टीने त्यांची मूलभूत धोरणे आणि दैनंदिन शासनाची मार्गदर्शक सूत्रे ठरत होती. ऐसपैस उदारमतवादी–मानवतावाद जर त्याच्या आड येत असतील तर त्यांना बाजूला सारण्यात इंग्रज सरकारला यत्किंचितही दिक्कत

वाटत नसे ! राज्यकर्ते म्हणून–शासक म्हणून इंग्रज सुधारक नव्हते आणि सनातनीही नव्हते. इंग्रजांमधले विशिष्ट लहानमोठे अधिकारी व्यक्तिशः कदाचित् सुधारक असतीलही; (सर्वच होते असेही नाही.) पण शासक म्हणून त्यांच्या वैयक्तिक मतांना किंवा आवडी-निवडीला फारसा वाव नव्हता.

म्हणूनच १८५७ च्या अनुभवानंतर बरीच वर्षे इंग्रजांनी कायद्याच्या साहाय्याने सामाजिक सुधारणा करण्याच्या दृष्टीने आखडता हात घेतला. फार काय, अस्पृश्य आणि मागास जाती-जमातींमधून होणारी सैन्यभरतीसुद्धा त्यांनी बंद केली ! कारण पुढारलेल्या वजनदार जमातींना ते पसंत नव्हते; आणि त्यांचीच पसंती अखेर राज्यकर्ते म्हणून इंग्रजांना महत्त्वाची किंबहुना निर्णायक वाटत होती. तीच गोष्ट मागास जाती–जमातींच्या शिक्षणाबाबत–अधिकाऱ्याच्या नेमणुकांबाबत–नोकर–भरतीबाबत. वरिष्ठ वर्गीय–म्हणजेच उच्चवर्णीय जातींना ही गोष्ट नापसंत असेल तर त्यांचेच मत इंग्रज राज्यकर्त्यांच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचे–निर्णायक ठरे ! कारण, दैनंदिन कारभार करणारी राज्ययंत्रणा अखेर मुख्यतः याच उच्चवर्णीयांच्या सहकार्याने चालणार होती. तीच गोष्ट विवाह, धर्मसंस्कार, दत्तक वगैरे प्रश्नांबाबत; तीच गोष्ट स्त्रियासंबंधीच्या हरएक प्रश्नाबाबत. या सुधारणांना जर उच्चवर्णीयांचा विरोध असेल (आणि तो तसा होताच) तर मग त्यासंबंधीच्या सर्व सुधारणा मागे राहिल्या पाहिजेत, असेच इंग्रजांचेही सर्वसामान्य धोरण होते.

इंग्रज राज्यकर्ते असल्यामुळे त्यांना आणखी एका गोष्टीचा नेहमी विचार करावा लागे. ती गोष्ट म्हणजे भारतीय जनतेमध्ये बेकी-फूट कायम कशी राहील, तिची इंग्रजांविरुद्ध एकजूट कशी टाळता येईल, ही गोष्ट धर्म, जात, जमात, इत्यादींमुळे हिंदी जनतेमध्ये भेदभाव, वैरभाव, फूट, असेल तर ती गोष्ट इंग्रजी राज्याच्या दृष्टीने इंग्रजांना राज्यकर्ते म्हणून अनिष्ट वाटण्याचे काहीच कारण नव्हते. (मग उदारमतवादी-मानवतावादी विचारवंतांनी आपल्या ग्रंथांत आणि प्रवचनांत त्याबाबत कितीही अश्रू ढाळलेले असोत किंवा वाक्पाटव केलेले असो !) तेव्हा सामाजिक सुधारणा हा विषय इंग्रजी राज्यकर्त्यांना राज्यकर्ते म्हणून जिव्हाळ्याचा वाटण्याचा संभव नव्हता; उलट परंपरागत अन्याय, विषमता या ना त्या स्वरूपात टिकून राहून त्यामुळे हिंदी जनतेमध्ये भेदभाव-फाटाफूट कायम राहणे यातच इंग्रज राज्यकर्त्यांचे हितसंबंध गुंतलेले होते, आणि ती गोष्ट त्यांना पुरती ठाऊक होती. तेव्हा राजकीय मवाळांच्या सामाजिक सुधारणांच्या कार्यक्रमाला इंग्रजांचा सतत पाठिंबा होता आणि ते दोघे मिळून जणू काही सामाजिक सुधारणेचा लढा लढवू पाहात होते, ही समजूत सर्वस्वी भ्रामक आहे; वस्तुस्थिती बरीचशी याच्या उलटच होती.

इंग्रजांनी दोघांनाही खेळविले !

अर्थातच जनतेमध्ये–पुढाऱ्यांमध्ये भांडणे–कलागती सतत लावून देणे–ती सतत कायम ठेवणे, जरुर तेव्हा त्यांना उकळी आणणे, ही इंग्रजांची राज्यकर्ते

म्हणून गरज होती; त्यांची तशी राजनीतीच होती; आणि तिचाच एक भाग म्हणून ते सामाजिक सुधारणेच्या नाजुक आणि ज्वलंत प्रश्नाचाही उपयोग आपल्या गरजेप्रमाणे आणि सोयीप्रमाणे वेळोवेळी करीत असत. मधूनच सामाजिक सुधारणेच्या कायद्याची घोषणा होणे; मसुदे तयार होणे; त्यावर घनघोर चर्चा छेडून देणे; त्यावरून पुढाऱ्यांत-जनतेमध्ये फाटाफूट पडणे; मग हा कार्यभाग पुरेसा साधल्यानंतर पुन्हा ते कायद्याचे मसुदे मागे घेऊन सनातन्यांना आणि जनतेलाही दिलासा मिळणे—असे प्रकार पुन्हा पुन्हा घडलेले दिसतात! यांमध्ये इंग्रजांनी दोन्ही पक्षांना–सुधारकांना आणि सनातन्यांना; मवाळांना आणि जहालांना खेळविलेले, चेतविलेले, समाविलेले दिसते. वेळोवेळी दोन्ही पक्षांनी इंग्रजांचा आधार शोधलेला आहे, आणि त्यांना तो इंग्रजाच्या सोयीप्रमाणे मिळालेलाही आहे! सुधारकांना वाटावे इंग्रज उदारमतवादी आहेत; आपले पाठिराखे आहेत! उलट सनातन्यांनी राणीच्या जाहीरनाम्यातील वचनांची साक्ष काढावी, त्याआधारे जनमत जागृत करावे, अखेर त्यांनाही इंग्रजांकडून दिलासा मिळावा, असा हा एकूण प्रकार चालू होता! फार काय, खुद्द लो. टिळकांचीच गोष्ट घ्या. टिळक एवढे जहाल, इंग्रजांचे मनोमन शत्रू व द्वेष्टे; त्यांनी सनातनी पक्षाचे वकीलपत्र घेतले, जनमत संघटित केले; पण अखेर त्यांचाही भर सनातनी शास्त्र वचनाइतकाच राणीच्या जाहीरनाम्यातील वचनावर–आश्वासनांवरही होताच. फार काय, इतिहासप्रसिद्ध वेदोक्त प्रकरणांच्या वेळी प्रथम सयाजी महाराज आणि नंतर शाहूछत्रपती या दोन मातब्बर राजघराण्यांचा संबंध आला तेव्हा हे छत्रपती आणि महाराजे धर्माविरुद्ध आचरण करून जनमत प्रक्षुब्ध करीत आहेत म्हणून सार्वभौम सत्तेने (म्हणजे इंग्रजांनी) राणीच्या जाहीरनाम्यातील वचनांचे कणखरपणे पालन करण्यासाठी, आपली सार्वभौम सत्ता वापरावी, असे सूचित करण्यापर्यंत खुद्द टिळकांनीसुद्धा मजल गाठली होती! (आणि टिळक म्हणजे राजद्रोही आणि छत्रपती म्हणे इंग्रजांचे हस्तक!) तात्पर्य, सामाजिक सुधारक आणि राजनिष्ठ मवाळ यांची इतिहासात जोड पडली असल्यास त्याचे कारण इंग्रजांचा सामाजिक सुधारणेस सतत पाठिंबा होता हे नव्हे; आणि इंग्रजांच्या चिथावणीने व साहाय्याने ही मवाळ मंडळी सुधारणेचा लढा लढवीत होती, ही रूढ समजूत इतिहासगत वस्तुस्थितीच्या दृष्टीने टिकण्यासारखी नाही. त्याचप्रमाणे राजकीय जहाल इंग्रजांविरुद्ध होते आणि म्हणून इंग्रज-पुरस्कृत सामाजिक सुधारणांना त्यांचा विरोध होता, हेही म्हणणे भ्रममूलकच आहे. तेव्हा सुधारक तो मवाळ; सनातनी तो जहाल अशी विभागणी होणे अपरिहार्य नव्हते; त्या विभागणीचे निर्णायक कारण आणि कर्तृत्व इंग्रजांकडे नव्हते. त्याबाबतचा जो काही दोष असेल, गुन्हा असेल तो आपलाच होता आणि तो आज तरी आपण बिनतक्रार स्वीकारला पाहिजे; त्याचे खापर परस्पर इंग्रजांच्या माथी मारून आपण निसटून जाण्याचा प्रयत्न निदान आज तरी कोणी करू नये!

सारांश, या वादात सामाजिक आणि राजकीय (आणि आर्थिक आणि सांस्कृतिक) ही खरी योग्य भूमिका होती व असावयास हवी होती. याऐवजी जेव्हा आधी आले (म्हणजेच आधी राजकीय की सामाजिक असा नसता खोटा पेच उत्पन्न करण्यात आला) तेव्हाच पहिला तडा गेला. त्यानंतर आधीच्या ऐवजी विरुद्ध अशी भूमिका आणि सामाजिक विरुद्ध राजकीय असाच पर्याय जनमानसात रूढ झाला—प्रयत्नपूर्वक रूढ करण्यात आला! आणि या पापात राजकीय मवाळ व जहाल, सुधारक व सनातनी या दोघांचीही भागीदारी होती, हीच खरी इतिहासगत वस्तुस्थिती आहे. जुने, खोटे वाद आजही जुन्याच अभिमानाने आणि आवेशाने लादवीत बसण्यापेक्षा उपरोक्त ऐतिहासिक वस्तुस्थिती बिनबोभाट मान्य करणे, हेच अधिक हितकारक आणि प्रामाणिकपणाचे ठरणार आहे.

प्रकरण ५ वे

भारतीय-राष्ट्रीय पुनरुत्थान : स्वप्न की दुःस्वप्न ?

भारतीय पुनरुत्थान किंवा राष्ट्रीय पुनरुज्जीवन असे शब्दप्रयोग नेहमी करण्यात येतात. विशेषतः भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामाच्या अनुषंगाने हे शब्दप्रयोग अगदी सहजपणे केले जात असल्यामुळे, त्याबद्दल एक प्रकारचे आकर्षणही असते. हे राष्ट्रीय पुनरुत्थान किंवा पुनरुज्जीवन म्हणजे आपाततः काहीतरी उदात्त, मंगल किंवा पुरोगामी असलेच पाहिजे, अशी अगदी अभावित समजूत असते; किंबहुना आपल्या विचाराचे किंवा धारणेचे ते एक गृहीत-कृत्यच असते.

खरे म्हणजे हे भारतीय किंवा राष्ट्रीय पुनरुत्थान म्हणजे नेमके कोणाला-काय अभिप्रेत असते, हे जरा अधिक खोलवर जाऊन तपशीलवार तपासण्याची आता आवश्यकता निर्माण झाली आहे.

राष्ट्रीयत्व !

पहिली गोष्ट म्हणजे 'भारतीय' आणि 'राष्ट्रीय' या संज्ञांचा नेमका अर्थ आपल्या इतिहासाच्या संदर्भात काय आहे ? आधुनिक शास्त्रीय अर्थाने पाहिले तर 'राष्ट्रीय' या संज्ञेला भारताच्या इंग्रजपूर्व इतिहासात खरोखरच स्थान नाही, असेच म्हटले पाहिजे. कारण राष्ट्र आणि राष्ट्रीयत्व या कल्पनेने जे काही आज आपल्याला अभिप्रेत आहे, तसे राष्ट्र किंवा राष्ट्रीयत्व आपल्या इंग्रजपूर्व इतिहासात कधी नव्हतेच; किंवा तसे असण्याची ऐतिहासिक शक्यताही नव्हती. कारण राष्ट्र आणि राष्ट्रीयत्व ही कल्पनाच मुळी इतिहासात प्रथम आधुनिक औद्योगिक भांडवलशाही युगात जन्माला आलेली आहे आणि भारतामध्ये भांडवलशाहीचा उदयच मुळी इंग्रज अमदानीनंतरच झालेला आहे. तेव्हा राष्ट्रीय पुनरुत्थान किंवा पुनरुज्जीवन याचा

संबंध प्राचीन किंवा मध्ययुगीन भारतीय इतिहासाशी जोडणे अशास्त्रीय आणि अनैतिहासिक ठरेल.

—आणि भारतीयत्व !

राष्ट्रीयत्वाशी जवळजवळ समानार्थी असा भारतीयत्व हा शब्दप्रयोगही केला जातो; आणि तसा तो व्हावयाला अधिक आधार आहे, यांत शंका नाही. पंण त्या भारतीयत्वाच्या संकल्पनेला आणि आशयाला इतिहासाच्या आणि भूगोलाच्याही अनेक मर्यादा आहेत, हेही ध्यानात ठेवावयास हवे. भारतीय उपखंड ही भौगोलिक-प्रादेशिक संकल्पना अधिक स्पष्ट आहे; पण त्यात, आजचा संपूर्ण पाकिस्तानचाच नव्हे तर अफगाणिस्तान (गांधार) पासून पूर्वेला ब्रह्मदेश आणि दक्षिणेला श्रीलंका इथपर्यंत त्याची व्याप्ती जाते. उत्तरेस सामान्यतः हिंदुकूश–काराकोरम–हिमालया-पासून तो सिंधु–ब्रह्मपुत्रेने वेढलेला आणि दक्षिणेस सागराने मर्यादित केलेला भूप्रदेश किंवा भूखंड म्हणजे भारत ही भौगोलिक वस्तुस्थिती असली, तरी तिला राजकीय–आर्थिक–सामाजिक–सांस्कृतिक एकसंधतेचा पक्का पाया सतत लाभलेलाच आहे, अशी इतिहासाची साक्ष नाही. भौगोलिक भारतीयतेच्या पोटात एकतेच्या बरोबरच विविधता, केवळ, विविधताच नव्हे तर विषमता, विरोध, संघर्ष, यांनीही हजारो वर्षांचा इतिहास काठोकाठ भरलेला आहे.

वंश, जाती–उपजाती, धर्म–पंथ, प्रदेश, भाषा, संस्कृती या विभाजक शक्तींशी निगडीत अशा घडामोडींचा अखंड इतिहास हा मनीव भारतीय एकात्मतेच्या इतिहासाइतकाच तरी निदान प्रभावी आणि वास्तव आहे.

इंग्रजांविरुद्ध आम्ही एक ?

ब्रिटिशांचे एकछत्री राज्य आल्यानंतर त्यांनी सुरू केलेल्या आधुनिक शिक्षणा-मुळे अनेक कल्पनांचा उदय झाला, त्यामध्ये स्वातंत्र्य, समता, लोकशाही यावरोबरच राष्ट्रीयत्व ही एक नवी कल्पना होती. आणि परकीय इंग्रजांनी लादलेल्या गुलामगिरीविरूद्ध झगडताना 'राष्ट्रीय स्वातंत्र्य' या नव्या ध्येयाचा साक्षात्कार होऊ लागला. परकीय इंग्रजांची गुलामी राजवट सर्व भरतखंडावर एकछत्री असल्यामुळे त्याविरुद्ध आमची अशी राजकीय स्वातंत्र्याकाक्षा व्यक्त करण्याच्या शोधात भारतीय अस्मिता साकार होऊ लागली. आणि त्यातूनच भारतीयत्व–भारतीय राष्ट्रीयत्व अशा स्थूल संकल्पना जनमानसात रुजू लागल्या. आता भारताचा भूगोल आणि इतिहास यांचा मेळ बसू लागला; किंवा तसा मेळ घालण्याचा प्राथमिक प्रयत्न हाच राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या संग्रामाचा एक वैचारिक भाग ठरला. याच प्रक्रियेत भारतीय पुनरुत्थान किंवा राष्ट्रीय पुनरुज्जीवन अशा स्थूल कल्पना आकार घेऊ लागल्या.

पण ही प्रक्रिया प्रत्यक्षात जेव्हा जिवंत रंग-रूप घेऊ लागली,–तिचे तपशील जेव्हा भरले जाऊ लागले, तेव्हा त्या त्या विचारवंतांच्या, नेत्यांच्या, किंवा त्यांच्या

अनुयायांच्या धारणेप्रमाणे या राष्ट्रीयत्वाला किंवा भारतीयत्वाला वेगवेगळे रंगरूपही येऊ लागले. आणि ते तसे येणे अगदी सहज आणि स्वाभाविक होते, हेही आपण आज समजून घेतले पाहिजे. हे समजून घेणे सोपे नाही; पण तसा प्रयत्न करणे मात्र अत्यावश्यक आहे.

पण एक म्हणजे कोण?—कसे?

भारत हा आपला–देश राष्ट्र; इंग्रजांच्या एकछत्री गुलामी राजवटीविरुद्ध आपण सारे एक आहोत–असलो पाहिजे; आपला भूगोल तसा इतिहासही एक–एकात्म असला पाहिजे, अशी एक उर्मी स्वातंत्र्य-संग्रामाच्या प्रक्रियेत उसळू लागली. थोडक्यात परकीय इंग्रजी राजवटीविरुद्ध 'आम्ही एक' अशी एक अस्पष्ट अमूर्त उर्मी,–प्रत्यक्षात ती एक राजकीय गरज;–तिला भूगोलाचा प्रत्यक्ष आधार; इतिहाचा आधार शोधण्याचा प्रयत्न–असे या प्रक्रियेचे स्थूल स्वरुप दिसते. शिवाय ही प्रक्रियाही स्थळ आणि काळ या दोन्ही दृष्टींनी अत्यंत विस्कळीत किंबहुना कधी तर असंबद्ध आणि नेहमीच विषम राहिलेली आहे. काही भूप्रदेशात–त्यांतील काही सामाजिक वर्गीय–वर्णीय विभागात ही क्रिया प्रथम सुरू झाली; तेथून ती पसरत गेली; तीही अत्यंत विषम आणि विस्कळीत गतीने;–अत्यंत विविध किंबहुना विरोधी स्वरुपांत. इंग्रजांच्या प्लासी विजयानंतर ती प्रक्रिया बंगालमध्ये (त्याला जोडलेल्या बिहार–ओरिसाच्या काही विभागात); नंतर मद्रासमध्ये ती सुरू झाली. पेशवाई–मराठेशाहीच्या पराभवानंतर इंग्रजी राज्य ज्या गतीने भारतभर पसरले त्याबरोबरच, ही प्रक्रियाही, विषम गतीने का होईना, पण पसरत गेली. पंजाब–वायव्य प्रांत, नेपाळमध्ये ती सर्वांत उशीरा पोचली. ही प्रक्रिया खरोखर कशी, कुठे आणि किती पोचली होती–रुजली होती याचे एक प्रत्यंतर १९ व्या शतकातील पूर्वार्धात सुरू झालेल्या वैचारिक प्रबोधनात मिळते. पण त्याचे दुसरे एक स्वरूप आणि मर्यादा, १८५७ चा लष्करी–राजकीय उठाव आणि त्याला अनुकूल–प्रतिकूल शक्ती यांमध्ये दिसून येते. १८५७–५८ च्या रोकड्या अनुभवानंतरच्या ५०–६० वर्षांत तिचे आणखी वेगळेच दर्शन घडते आणि राष्ट्रीय स्वातंत्र्याचा लढा त्याचबरोबर भारतीय राष्ट्रीयत्वाची जडण–घडण या क्रिया कधी एकत्र; कधी समांतर; कधी गुंतागुंतीने चाललेल्या दिसतात. स्वातंत्र्यसंग्रामाच्या शेवटच्या म्हणजे टिळकोत्तर पर्वांत–गांधी काळखंडात याच प्रक्रियेची गती एकदम झपाट्याने वाढलेली दिसते; पण तिच्यातील अंतर्विरोधही तितकेच झपाट्याने आणि तीव्रतेने वाढलेले दिसतात. धर्म, जाती, उपजाती, प्रदेश–भाषा, वंश–वर्ण–वर्ग या वेगवेगळ्या परस्परांना छेदणाऱ्या संकल्पनांचा अत्यंत तीव्र संघर्ष या प्रक्रियेमध्ये दिसतो आणि यातूनच भारतीय राष्ट्रीयत्व साकार होते. (ब्रह्मदेश, लंका अगोदरच दूर झाले, फाळणी होऊन पाकिस्तान आझाद झाले, नेपाळ–भूतान–सिक्कीमचे संबंध संदिग्धच राहिले. ह्या प्रक्रियेतील अगदी ढोबळ अशा या घटना होत.) ही प्रक्रिया इंग्रज-

विरोधी स्वातंत्र्य-लढ्यात सुरू झाली असली तरी स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ती संपली, हा एक भयानक भ्रम आहे; ती एक भयंकर भूल आहे. भारत स्वतंत्र झाला म्हणजे औपचारिक राजकीय घटनार्थाने स्वतंत्र राष्ट्र ही ती वस्तुस्थिती ठरली एवढेच. पण इंग्रज जाणे म्हणजे खऱ्याखुऱ्या एकात्म भारतीय राष्ट्राची उभारणी पुरी होणे असे नव्हे.; फार तर एवढेच म्हणता येईल की स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय राष्ट्रीयत्वाच्या उभारणीचा एक नवा टप्पा सुरू झाला. तो २५ वर्षांनंतर अजूनही संपलेला नाही आणि पुढील काही वर्षे तरी तो संपेल आणि ही भारतीय राष्ट्रीयत्वाची जडण-घडण परिपूर्ण होईल असे आजही दिसत नाही.

भारतीय एकात्मता-एक भ्रामक गृहीत-कृत्य !

पण स्वातंत्र्यप्राप्तीनंतर एक भ्रम मात्र अवश्य निर्माण झाला. भारतीय राष्ट्रीयत्व हे एकात्म,-एकसंघ-एकसंध आहे-आहेच, हा तो भ्रम. आणि तसे गृहीत धरूनच स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास वाचण्याचा प्रयत्न करणे, एवढेच नव्हे तर भारताचा प्राचीन आणि मध्ययुगीन इतिहासही त्याच दृष्टीने समजणे हा त्याच भ्रमाचा एक परिणाम आहे. त्या भ्रामक समजुतीमुळे इतिहासही कळत नाही-प्राचीन नाही, मध्ययुगीन नाही, आधुनिक नाही, आजचा नाही आणि उद्या घडणाराही नाही ! एक सर्वस्वी भ्रामक, अनैतिहासिक, अवास्तव असा कल्पना-तरंगांत; स्वप्नरंजनात रमून जाण्याचा धोका मात्र त्यामुळे निर्माण होतो. ज्याला जे असावे असे वाटते-आदर्श वाटते, ते आहेच-होतेच आणि पुढेही राहाणारच आहे, असे हे स्वप्न-रंजन आहे; असा हा हट्टाग्रह आहे; किंवा खोटे भ्रामक इतिहासदर्शन आहे.

आणि हा मूळातच आणि सगळाच भ्रम असल्यामुळे हे स्वप्नरंजनसुद्धा एक प्रकारचे-एक स्वरूपाचे रहात नाही. मूळातले भ्रमही वेगवेगळे आणि त्यातून निर्माण होणारी स्वप्नरंजनेही वेगवेगळी; असा हा एकूण अजब प्रकार आहे !

भारतीयत्व म्हणजे काय काय ?

भारतीय एकात्मता गृहीत धरावयाची; पण त्या एकात्मतेचा पाया, तिचे स्वरुप, यांच्या प्रत्यक्ष आविष्काराबद्दलच्या कल्पना मात्र प्रत्येकाच्या भिन्न भिन्न असावयाच्या, यामुळे एक अनवस्थाच निर्माण होते. मी भारतीय-मी राष्ट्रीय; पण मी हिंदू ! म्हणजेच प्रत्येक भारतीय-राष्ट्रीय हा हिंदू आहे-नव्हे असला पाहिजे; नसला तर त्याला हिंदु केला पाहिजे; त्याचे हिंदुकरण केले पाहिजे; तरच तो भारतीय-राष्ट्रीय होऊ शकेल, असा हा आग्रह आहे ! त्यातूनच मग आणखी पुढचा टप्पा म्हणजे भारतीयत्व-राष्ट्रीयत्व म्हणजेच हिंदुत्व; किंवा हिंदुत्व हेच आणि हेच एकमेव भारतीयत्व-राष्ट्रीयत्व.—भारत हे हिंदू राष्ट्र-भारतीय राष्ट्रवाद म्हणजे हिंदू राष्ट्रवाद-**वगैरे वगैरे !**

हिंदू राष्ट्रवाद ही संज्ञा गृहीत धरून सावरकरांनी जरी त्याची रीतसर मांडणी केली असली तरी ती पुढे; पण त्या भूमिकेशी नाते सांगणाऱ्या कल्पना–भावना प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे गेल्या दीडशे वर्षांत बहुतेक सर्व जन्माने हिंदू असलेल्या लहानमोठ्या नेत्यांनी–विचारवंतांनी आणि त्यांच्या अनुयायांनी मांडलेल्या आहेत. (यापेक्षा वेगळी भूमिका ही अपवादभूत ठरावी इतके तिचे प्रवक्ते थोडे–अक्षरशः हाताच्या बोटावर मोजण्याइतपतच असले तर असतील!) या हिंदू भावनेशी नाते सांगणारे नेते सर्व कालखंडांत सर्व प्रांतांत, सर्व विचारांत असलेले आढळतात. त्यांत टिळकांसारखे तथाकथित सनातनीच आहेत असे नव्हे; तर रानड्यांसारखे तथाकथित सुधारकही आढळतात! एवढेच नव्हे तर गांधींसारख्या राष्ट्रपित्यांपासून तो सुभाषचंद्रासारख्या क्रांतिकारकांचाही या यादीत समावेश होऊ शकेल! उजव्यांप्रमाणेच अनेक डावेसुद्धा या यादीत सापडण्याचा संभव आहे!

आणि हा प्रश्न केवळ हिंदूंपुरताच मर्यादित नाही? जी गोष्ट हिंदूंची; तीच मुसलमानांची. भारतीय म्हणजे हिंदी म्हणजेच मुस्लीम–म्हणजेच शिया–सुन्नी; हिंदुस्तानचा इतिहास सुरू होतो तो महंमद कासीमपासून–त्याच्या सिंधवरील स्वारीपासून; (जसा काही तथाकथित राष्ट्रवाद्यांच्या मते भारताचा इतिहास सुरू होतो आर्यांच्या आक्रमणापासून!) पण इतिहास उलटा वाचायला लागले तर मग मात्र मोहेन-जो-दाडोची सिंधसंस्कृती ही पाकिस्तानी ठरते! वैयाकरणीपाणिनी हाही पाकिस्तानी; (आणि शकुनीमामा हा पाकिस्तानी याबद्दल कदाचित् हिंदू–मुसलमान दोघांचेही एकमत होण्याचा संभव!)

तेव्हा हिंदू राष्ट्रवाद म्हटला की मुस्लीम राष्ट्रवाद आलाच!–मग हिंदुस्तान नाही तर निदान पाकिस्तान आलेच!

पण हे एवढ्यावरच थांबते असे नव्हे! तर मग चातुर्वर्ण्य हिंदूंच्या पोटातल्या जाती–उपजाती वळवळायला लागतात! आणि मग ब्राह्मण राष्ट्रवाद, वर्णाश्रम स्वराज्य,–त्याही पुढे जाऊन चित्पावन राष्ट्रवाद म्हणजे पेशवाई स्वराज्य! हेही राष्ट्रवादाचे अस्सल नमुने काही फारसे दूर नाहीत! (मग चित्पावनच का?–सारस्वत, आणि काश्मिरी आणि नंबुद्री तरी मग मागे का?) आणि ब्राम्हणी राष्ट्रवाद म्हटला की क्षत्रीय,–मग क्षत्रीय कुलावंतस शिवछत्रपती म्हणून मराठा राष्ट्रवाद; मग वैश्य राष्ट्रवाद!–का कुणास ठाऊक वैश्यांना जवळ वाटणाऱ्या जैनापासून तो गांधीपर्यंत–या राष्ट्रवादाला कुणी अजून नाव दिलेले नाही; कारण त्यांना तशी गरज वाटत नसावी! नाव न देताही भारतीय राष्ट्रवादाचे सर्व फायदे–नफे 'राष्ट्रीय' भांडवलदारांना बिनबोभाट–बिनतक्रार मिळतातच आहेत! म्हणून केवळ मारवाडी राष्ट्रवाद सांगण्याची गरज कोणा बिर्ला घराण्याला (किंवा त्यांच्या उदार आश्रयाखालील ज्ञानपीठांतील विचारवंतांना–संपादकांना–प्राध्यापकांना). भासत नाही इतकेच!

शूद्र-अतिशूद्रांसाठी कोणते भारतीय पुनरुत्थान ?

या राष्ट्रीय पुनरुत्थानाच्या प्रक्रियेपासून दूर कोरडे राहिले ते फक्त शूद्र-अतिशूद्र ! कारण पुनरुत्थानाचे स्वप्न बघण्यासाठी ते 'पूर्व दिव्य' त्यांच्याजवळ असल्याचा इतिहास निदान अजूनपर्यंत तरी लिहिलेला नाही ! कारण इतिहास, महाकाव्ये, पुराणे लिहिण्याचा किंवा त्यात वीरपुरुष म्हणून उदार, धीरोदात्त नायक म्हणून मिरविण्याचा मक्ता त्या बिचाऱ्यांना कधी मिळालेलाच नव्हता ! या पुनरुत्थानाच्या घोषणेमागील भावना-' पूर्व दिव्य ज्यांचे त्यांना रम्य भावी काळ ' या काव्यपंक्तीत व्यक्त होते. ती काव्यपंक्ती वाचल्यानंतर किंवा ऐकल्यानंतर प्रत्येक भारतीय राष्ट्रवाद्याच्या अंतःकरणाला गुदगुल्या होत; अंगावर रोमांच उभे राहात ! पण ज्यांचे पूर्व 'दिव्य' असल्याचा इतिहास उपलब्ध नाही. किंवा ज्यांचे पूर्व काळयाकुट्ट अंधःकारातच बुडालेले आहे-त्यांच्यासाठी कोणत्या भारतीयत्वाचे आणि कोणत्या राष्ट्रीयत्वाचे पुनरुत्थान राखून ठेवलेले आहे ? आणि हे शूद्र-अतिशूद्र असतील तर त्यांना हा प्रश्न सुचण्याची आणि सुचला तर विचारण्याची संधी तरी भारतीय समाजाने ठेवली होती काय ? हजारो वर्षांच्या भारताच्या इतिहासामध्ये किंवा खरे तर इंग्रजविरोधी स्वतंत्र्य-संग्रामाच्या दीडशे वर्षांमध्ये, भारतीय पुनरुत्थान, राष्ट्रीय पुनरुज्जीवन हा शब्दप्रयोग सतत होत राहिला; त्यांनी राष्ट्रीय भावनांचे पोषण झाले; कर्तृत्वाला प्रेरणा मिळाली; बलिदानाला आवाहन मिळाले,-पण कोणाला ? कुणाला हिंदु म्हणून-मुसलमान-शिख म्हणून; कुणाला ब्राह्मण म्हणून-क्षत्रिय म्हणून, आर्य म्हणून-उच्चवर्णीय म्हणून-फार काय, कुणाला अंग-वंग-कलिंग किंवा महाराष्ट्र, गुर्जर, पंजाब-म्हणून; किंवा आंध्र, तामीळ, केरळ, कर्नाटक म्हणून. पण मग ते भारतीयत्व-राष्ट्रीयत्व म्हणजे केवळ धर्मवाचक, जातिवाचक, प्रदेशवाचकच ठरत नाही काय ? आणि त्यामध्ये हिंदू राष्ट्र-मुस्लीम राष्ट्र; त्यातील ब्राह्मणी, क्षत्रीय, वैश्य नेतृत्व-वर्चस्व; किंवा त्यांचे भाषिक-प्रादेशिक अभिमान हेच प्रभावी ठरले नाहीत काय ? आणि त्या त्या विभागांना किंवा गटांना राष्ट्रीयत्वाचा साक्षात्कार त्या स्वरूपात झाला नसेल काय ? अजूनही होत नाही काय ? तरीही भारतीय-राष्ट्रीय एकात्मता आपण गृहीत धरतोच !

पुनरुत्थानाचे स्वप्न आणि दुःस्वप्न !

पण याही पलीकडे जाऊन ज्या शूद्र-अतिशूद्रांना पुनरुत्थान करण्याजोगे भारतीय इतिहासाने काही शिल्लक ठेवलेलेच नव्हते--त्यांना पुनरुत्थान म्हणजे हिंदु-मुस्लिम किंवा उच्चवर्णीय ब्राह्मण-क्षत्रीय यांचेच पुनरुत्थान वाटले; स्वराज्य म्हणजे 'वर्णाश्रम' स्वराज्य वाटले, म्हणजेच शूद्र-अतिशूद्रांच्या गुलामगिरीचे, सामाजिक-सांस्कृतिक हीनावस्थेचे पुनरुत्थान वाटले असल्यास त्यात काय नवल ? भारतीय-राष्ट्रीय पुनरुत्थानाच्या स्वप्नरंजनांत शंभर वर्षे मग्न असणाऱ्या देशभक्तांमध्ये जोतीराव

फुल्यांसारखा एखादाच असा क्वचितच निघाला की, ज्याने भारतीय–पुनरुत्थानाच्या (राष्ट्रीय स्वप्नरंजनाच्या) या आविष्काराचा अर्थ ९५ टक्के शूद्र-अतिशूद्रांच्या दृष्टीने समजून घेतला–आणि इतरांना समजावून सांगण्याचा रांगडा प्रयत्न त्यांनी केला! भारतीय राष्ट्रीय पुनरुत्थानासंबंधी पर्वतप्राय वाङ्मय शंभर वर्षांत तयार झाले; पण 'गुलामगिरी' या ग्रंथांत या भारतीय पुनरुत्थानाचे जे–एक आगळे दर्शन जोतिराव फुल्यांनी घडविले ते खरोखरच तोपर्यंत कोणालाही न सुचणारे,–न मानवणारे,–न पेलणारे होते. कोट्यवधी शूद्र–अतिशूद्रांच्या गुलामगिरीचा–आरसा फुल्यांनी आपल्या 'गुलामगिरी' या ग्रंथाच्या रुपाने भारतीय पुनरुत्थानवाल्यांच्या चेहऱ्या-समोर धरला! त्या आरशात जे भयानक–विकट दर्शन विष्णुशास्त्र्यांना झाले ते त्यांना पाहवले नाही–सहन झाले नाही, हे स्वाभाविकच आहे! भारतीय–राष्ट्रीय पुनरुत्थानाचे स्वप्न सर्वच उच्चवर्णीय विचारवंतांना–नेत्यांना पडत होते; पण त्या स्वप्नाचे दुसरे हिडिस दुःस्वप्नदर्शन फक्त जोतिराव फुल्यांनाच झाले! हेच त्यांचे वेगळेपण; हीच त्यांची थोरवी!

भाग दुसरा : महात्मा फुल्यांचा वारसा

प्रकरण १ ले

फुल्यांच्या मृत्युनंतरची स्थगितता आणि पुनरुज्जीवन !

ग्रामीण विभागांतील नवा उदयोन्मुख वर्ग—

म. फुल्याच्या जीवनाच्या अखेरच्या काळात आणि त्यांच्या मृत्युनंतरच्या काळात म्हणजे सामान्यतः १८८० ते १९१० या कालखंडात महाराष्ट्रातील बहुजन-समाजामध्ये जे परिवर्तन होत गेले त्याची आर्थिक-राजकीय पार्श्वभूमी बघितली तर काही गोष्टी अगदी ढोबळपणाने नजरेसमोर येतात. एकामागाहून एक पडणारे दुष्काळ, परिणामी ग्रामीण गोरगरीबांची [शूद्र–अतिशूद्रांची] सतत वाढत गेलेली हलाखी, उपासमार, कर्जबाजारीपणा, जमिनींचे हस्तांतर,–यामधून निर्माण होणारा असंतोष, गरीबांचे उठाव, दंगली, मामलेदार कचेऱ्यांवरील–सावकारांवरील हल्ले, कागदपत्रे–कर्जरोख्यांची जाळपोळ हे प्रकार १८८० च्या पूर्वीच्या दशकांत दिसतात. त्यानंतर दंगलींची सरकारी कमिशनने चौकशी केली; कमिशनच्या शिफारसीनुसार काही वरवरची मलमपट्टीवजा उपाययोजनाही सुरू केली. याच काळात फुल्यांच्या आंदोलनांतून वाढत गेलेली जागृती, ब्राम्हण–मारवाडी–भटजी–शेटजी यांच्या वर्चस्वाविरुद्ध ग्रामीण जनतेचे बंड, मराठा प्रभृती पुढारलेल्या ब्राह्मणेतर समाजांत शिक्षणाचा वाढता प्रसार, याही गोष्टींचा प्रभाव पडलेला दिसतो. सरकारने ज्या उपाययोजना केल्या होत्या, त्याचा फायदा गोरगरीबांमधील अगदी खालच्या थरांना–म्हणजे आदिवासी आणि अस्पृश्यादि अगदी मागास गटांना मिळणे शक्यच नव्हते; त्यामुळे या अतीशूद्रांची आर्थिक, सामाजिक दुःस्थिती अगदी जशीच्या तशीच राहिली. पण मराठा जमातीसारख्या काही पुढारलेल्या विभागांना मात्र या उपाययोजनांचा थोडाफार फायदा मिळू शकला;–तो पदरी पाडून घेण्याइतकी

त्यांच्यात जागृती, हिंमत आणि हिकमतही येत होती. प्रथम हळूहळू–नंतर क्रमाक्रमाने वाढत्या वेगाने त्यांच्यात शिक्षणप्रसार होत गेला. त्यातून नवा आत्मविश्वास येत गेला; नौकऱ्यांमध्ये वाढत्या प्रमाणात प्रवेश मिळू लागला. अधिकाराच्या जागाही तुरळक हाती येऊ लागल्या. मुख्य म्हणजे जमिनी व जमिनीसंबंधीचे व्यवहार याबाबत भटजी–शेटजीकडून होणाऱ्या गैरव्यवहारांना थोडा फार आळा बसू लागला आणि याचा फायदा मुख्यतः पुढारलेल्या मराठा समाजाला मिळू लागला. फार काय, काही वर्षांनी तर असले गैर–व्यवहार स्वतःच सफाईने करण्याइतपत त्यांना मिळणारी संधी वाढत गेली ! बांधकाम, सरकारी कंत्राटे, थोडीफार दलाली, व्यापार इत्यादींचा फायदाही काही लोक घेऊं लागले. सहकारी चळवळीची सुरवात होताच त्याचे फायदेही सामान्यतः याच मंडळींना मुख्यतः मिळू लागले. पतपेढ्यांची कर्जे, शेतीची नवी औजारे–खते–बी–बियाणे, शेतीसुधारणांची मलई वगैरे मुख्यतः त्यांच्याच वाट्याला येऊ लागली. थोडक्यात म्हणजे केवळ सामाजिक दृष्ट्याच नव्हे तर आर्थिक दृष्ट्याही हा एक वर्ग ग्रामीण भागात हळूहळू पण निश्चित आणि वाढत्या प्रमाणात सुस्थिर होऊ लागला. ब्राह्मणांच्या वर्चस्वाला तडा जाऊ लागलाच होता; आता ग्रामीण भागात तरी पुन्हा एकदा पुढारीपण घेऊ शकणारा हा नवा वर्ग तयार होऊ लागला होता. सामाजिकदृष्ट्या तो वरिष्ठ होताच; पण जोडीला त्यातील लहानसा पुढारलेला विभाग तरी आता आर्थिकदृष्ट्याही सुस्थिर होऊ लागला होता. शिक्षण–नोकऱ्या–अधिकाराच्या जागा यामुळे तो ताठपणे मान वर काढू लागला होता. फुल्यांच्या हयातीमध्येच ही प्रक्रिया चालू झाली होती; त्यांच्या मृत्यूनंतर दोन-तीन दशकांत तीच प्रक्रिया अधिक झपाट्याने फोफावत गेली.

नव्या वर्गाची नवी विकृती—

पण फुल्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या सर्वस्पर्शी–सर्वसाक्षी करड्या नेतृत्वाची प्रत्यक्ष जरब मात्र नाहीशी झाली आणि ग्रामीण बहुजनसमाजातील परिवर्तनाच्या प्रक्रियेमध्ये एक एक नवी विकृतीही निर्माण होऊ लागलेली दिसते !

नव्याने शिकलेले, ब्राह्मणाविरुद्ध पेटलेले, महत्त्वाकांक्षा जागृत झालेले, नित्य नवी संधी डोळ्यासमोर दिसणारे असे हे पुढारलेले विभाग आपल्या म्हणजे आपल्यासारख्याच मूठभर पुढारलेल्या गटांच्या हिताला च प्राधान्य देऊ लागले. फुल्यांना प्रिय असलेल्या स्त्री-शूद्र-अतिशूद्रांचा या मंडळींना हळूहळू सोयीस्करपणे विसर पडू लागला ! फुल्यांच्या एकूण कार्यात ज्यांना सतत प्राधान्य आणि अग्रक्रम होता ते स्त्री आणि अस्पृश्य प्रथम हळूहळू पण नंतर कायमचेच वगळले जाऊ लागले ! त्यांचे समानतेचे हक्क–त्यांचे शिक्षण, त्यांच्यासंबंधीच्या वेगवेगळ्या उपाययोजना, चळवळी सर्व बासनात गुंडाळल्या जाऊ लागल्या. अस्पृश्य आणि त्यांच्याबरोबरच आदिवासी आणि

त्याचप्रमाणे सर्व मागास जाती-जमाती या सर्व पुन्हा एकदा उपेक्षेच्या अंधारात फेकल्या गेल्या. शिक्षण, समान हक्क वगैरे सर्व पाहिजे; पण ते ब्राह्मणाविरुद्ध आणि या नव्या पुढारलेल्या गटांनाच मुख्यतः—असा फुल्यांच्या शिकवणीचा नवा अर्थ, प्रत्यक्ष व्यवहारात तरी लावला जाऊ लागला! फुल्यांच्या मृत्यूनंतरच्या दोन-तीन दशकांत ही विकृती वाढतच गेली! याहूनही काही वाईट वेळोवेळी घडत गेले. हे नवे पुढारलेले गट ब्राह्मण वर्चस्वाविरुद्ध नक्कीच होते; पण तेसुद्धा सर्वार्थाने नव्हते! बालविवाह, संमतिवय, वगैरे सुधारणाबाबतचे वाद पुण्यामध्ये ब्राह्मणांचे दोन गट (बहुसंख्य सनातनी आणि मूठभर सुधारक) हिरीरीने लढवीत होते. पण या वादांत सुधारकांची बाजू घेऊन त्या पक्षाचे पुढारीपण करण्यास कोणीही प्रभावी ब्राह्मणेतर पुढारी पुढे आलेले दिसत नाहीत! जणु काय बालविवाह, संमतिवय हे प्रश्न फक्त ब्राह्मण स्त्रियांचेपुरतेच मर्यादित होते! बहुजन समाजातील स्त्रिया जणु या दुष्ट रूढींच्या गुलामी जाचांतून मुक्तच होत्या! पण खरी गोष्ट अशी की, स्त्रिया व स्त्रियांसंबंधीचे सर्व प्रश्न एव्हाना फुल्यांच्या अनुयायांनी आपल्या चळवळीच्या कक्षेतून केव्हाच आणि कायमचे काढून टाकले होते! म्हणजे खरोखर असेच म्हटले पाहिजे की, फुल्यांच्या तथाकथित अनुयायांनी; (फुल्यांनी सतत अग्रक्रम दिलेल्या एका महत्त्वाच्या प्रश्नाबाबत) स्त्रियांच्या प्रश्नाबाबत तरी सनातनी ब्राह्मणांचेच पुढारीपण प्रत्यक्ष व्यवहारात तरी मान्य केले होते! आणि जी गोष्ट स्त्रियांची तीच अस्पृश्यांची!—चाळीस वर्षांनी आंबेडकरांचा उदय होईपर्यंत तरी–किंबहुना आंबेडकरांच्या उदयानंतरसुद्धा! अशा रीतीने स्त्रिया आणि अस्पृश्य यासंबंधीच्या प्रश्नांबाबत सनातनी ब्राह्मणांचे पुढारीपण या बहुजन समाजाच्या पुढारीपणाने प्रत्यक्षतः व्यवहारतः मान्य केले. त्याचप्रमाणे 'राजनिष्ठ' ब्राह्मण गटाचे–मवाळ राजकीय पुढारीपणही या बहुजनसमाजाच्या पुढारीपणाने व्यवहारतः आणि प्रत्यक्षतः त्याच न्यायाने मान्य केल्याचे दिसते! प्रथम राजकारणाबाबत उदासीनता दाखवून; नंतर राजनिष्ठ पुढारीपणाखाली चाललेल्या मवाळ राजकारणात त्यांनी प्रत्यक्षच भाग घेऊन! त्यातही धडाडीने पुढाकार घेऊन नव्हे, तर सर नारायण चंदावरकर, रँग्लर परांजपे वगैरे मवाळ ब्राह्मण पुढाऱ्यांच्या पुढारीपणाखाली बहुजन समाजाची खोगीर-भरती करून!

ब्राह्मणेतर पक्षः जुना आणि नवा!

बहुजन समाजाच्या या सधन, महत्त्वाकांक्षी, प्रतिष्ठित उच्चवर्णीय पुढाऱ्यांना हव्या होत्या फक्त अधिकाराच्या, मानाच्या जागा, दिवाणगिऱ्या, रावबहादुऱ्या, लोकलबोर्डाची व स्कूलबोर्डाची अध्यक्षपदे, बांधकामाची कंत्राटे; काहींना हव्या होत्या दलालऱ्या, अडत-दुकानांतल्या भागीदाऱ्या, सर्वांनाच हव्या होत्या नातेबाईकांसाठी नोकऱ्या वगैरे. आणि यासाठी हवा होता पक्ष! म. फुल्यांच्या सत्यशोधक समाजाचे फक्त नाव त्यांना हवे होते; पण व्यवहारासाठी हवा होता पक्ष—त्याला त्यांनी

सोयिस्कर नाव दिले—'ब्राह्मणेतर' पक्ष. त्यातही त्यांनी आभास असा उत्पन्न केला की, हे सर्व फुल्यांच्याच प्रेरणेनुसार चालू आहे! जणू काय ब्राह्मणेतर पक्ष, त्याचे जातिवाचक नाव, त्याचा जातिनिष्ठ कारभार, त्याचे सरकारजमा लाचार राजकारण, त्याचा संधिसाधू–स्वार्थसाधू व्यवहार—या सर्वांना जणू महात्मा फुल्यांच्या प्रेरणेचा–शिकवणीचा आधार होता! सत्यशोधक समाजाच्या नावाचा, संघटनेचा आणि कार्यकर्त्यांचा उपयोगही त्यांनी जमेल तेव्हा, जमेल तेथे, जमेल तेवढा सतत करून घेतला. म. फुल्यांच्या प्रेरणेचा, शिकवणीचा आणि सत्यशोधक चळवळीचा असा विपर्यास आणि असा दुरुपयोग हे उच्चवर्णीय–उच्चवर्गीय पुढारीगट दीर्घकाळ खुशाल करू शकले, ही खरी चिंतनीय गोष्ट आहे. त्यांना खरोखर प्रभावीपणांने प्रथम हटकणारे निघाले ते जेधे-जवळकरच! पण त्यांनाही त्यासाठी दहा वर्षे सतत झगडा करावा लागला. आणि जेधे-जवळकरांना अखेर यश आले ते १९३० च्या कायदेभंगाच्या चळवळीच्या उधाणाच्या वेळीच; आणि ते यशही अगदी मर्यादित–म्हणजे राजकीय चळवळीपुरतेच मर्यादित होते. फुल्यांना प्रिय असलेले स्त्री-शूद्र–अतिशूद्रांचे प्रश्न जेधे-जवळकरांच्या बंडानंतरही बऱ्याच प्रमाणात उपेक्षितच राहिले. आणि काही वर्षांनंतर काँग्रेसच्या हाती सत्ता येण्याची वेळ येताच, जेध्यांनाही निष्प्रभ करण्यात आले. पुन्हा एकदा संधिसाधु-स्वार्थसाधु-जातिनिष्ठ सत्तालोलूप गट काँग्रेसच्या नावाने–गांधी-नेहरूंच्या छत्राखाली पण फुल्यांची पुण्याई मात्र सांगून सत्तारूढ झाले! बहुजनसमाजाच्या नावाने काँग्रेसने सत्तारूढ होणे हे एकप्रकारे जुन्या ब्राह्मणेतर पक्षाचे पुनर्जीवन होण्यासारखेच होते. बहुजनसमाजाच्या नावाने सत्तारूढ होणारे काँग्रेस राज्यकर्ते हे जुन्या स्वार्थसाधू, जातिनिष्ठ, राजनिष्ठ, सत्तालोलूप ब्राह्मणेतर पक्षाचेच शुद्धिकृत, शुचिभूत अवतारस्वरूप होते, असे म्हणण्यात फारशी अतिशयोक्ती होणार नाही!

महात्मा फुले यांच्या मृत्युनंतर एकप्रकारे एक नवा कालखंड सुरू झाला. या नव्या कालखंडातील म्हणजे १८९० साली नव्या परिस्थितीत त्यांच्या मूळ प्रेरणांचा विकासशील आविष्कार करू शकणारा प्रतिभाशाली नेता किंवा प्रभावी नेतृमंडळ सत्यशोधक चळवळीत निर्माण होऊ शकले नाही. परिणामी काही काळ त्या चळवळीत एक प्रकारची स्थगितता आली; तिचा विकास खुंटला आणि पुढे काही काळानंतर तिचे पुनरुज्जीवन जरी झाले तरी ते एकांगी होते. आणि कालांतराने तर त्यात फुल्यांच्या मूळ प्रेरणांचा विपर्यास होऊ लागला; फुल्यांच्या विरोधकांनी आणि त्याचप्रमाणे इंग्रज राज्यकर्त्यांनी अर्थातच त्याचा फायदा घेतला.

पहिले निष्ठावंत सत्यशोधक!

सत्यशोधक समाजाला कित्येक निष्ठावंत प्रचारक लाभले; कित्येकांनी आपले जीवन त्या कार्यासाठी वाहून घेतले; खेडोपाडी फुल्यांचा संदेश व कार्य पसरविण्या-

साठी त्यांनी जीवाचे रान केले. परंपरागत ब्राह्मणी वर्चस्वाचे ग्रामीण विभागातून उच्चाटन करण्याचे ऐतिहासिक कार्य पुढील दहा-वीस वर्षांत त्यांनी अत्यंत प्रभावी रीतीने पार पाडले. आणि अशा रीतीने बहुजनसमाजाच्या प्रगतीच्या आड येणारे अडथळे दूर केले. बहुजनसमाजाच्या स्वाभिमानी, स्वावलंबी, स्वयंप्रेरित विकासाच्या वाटा मोकळ्या करून दिल्या.

हे करताना अशिक्षित, निरक्षर लोकांच्या मनाला जाऊन भिडण्यासाठी या प्रचारकांनी प्रचाराचे, लोकशिक्षणाचे नवे तंत्र शोधून काढले; नवी माध्यमे उपयोगात आणली. परंपरागत लोकमाध्यमाला नवे स्वरूप देण्याचे अनेक यशस्वी प्रयोग केले. तमाशे, लावण्या, सवाल-जबाब, कीर्तने, गोंधळ वगैरे प्रकार किंवा त्यांचे कल्पकतेने केलेले अनेकविध मिश्रण, यातून हा प्रचार यशस्वी झाला. सत्यशोधकी जलसे म्हणून हा प्रचार पुढे सुप्रसिद्ध झाला असला, तरी त्याचे मूळ उद्दिष्ट व प्रयत्न जनमानसाला प्रत्यक्ष भिडण्याचा होता;–जुन्या लोकप्रिय माध्यमातून नवा आशय ओतण्याचा–नवा संदेश पोचविण्याचा होता. पुढे ४०–५० वर्षांनी कम्युनिस्टांनी हाच प्रयोग पुन्हा एकदा अत्यंत यशस्वीपणाने हाताळून आजचे पुरोगामी, क्रांति-प्रवण लोकनाट्य रूढ केले. पण त्यांच्या पूर्वीच्या पहिल्या प्रयत्नांचे, प्रयोगांचे श्रेय सत्यशोधक चळवळीलाच निःसंशय आहे.

नव्या ग्रामीण नेतृत्वाची पायाभरणी !

निष्ठावंत सत्यशोधक प्रचारकांनी ब्राह्मण वर्चस्वाचे उच्चाटन करण्याचे जे कार्य केले, त्यांचे काही परिणाम तरी चिरस्थायी स्वरुपाचे झाले आहेत. या निष्ठावंत सत्यशोधक प्रचारकांनी, कार्यकर्त्यांनी अंधश्रद्धेवर आघात केला, काही दुष्ट रुढींचे उच्चाटन केले. अनेक संस्कार, व्रतवैकल्ये, भाकड आचार यांनाही त्यांनी चाट दिली. परंपरागत इतिहास-पुराणावर, कथा-आख्यानांवर नवा प्रकाश पाडण्याचा, त्यातून नवा अर्थ दाखविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यामुळे ब्राह्मणी परंपरेपेक्षा वेगळी अशी बहुजनसमाजाची स्वतंत्र परंपरा असल्याची जाणीव पोसण्यास मदत झाली. निवृत्तिपर उदासीन दैववादाऐवजी, प्रवृत्तिपर प्रयत्नवाद, ग्यानबा–तुकोबांनी भारलेल्या भोळ्या बहुजनसमाजाच्या मनात बाणविण्याच्या कामी त्यामुळे निःसंशय मदत झाली.

सत्यशोधक समाजाच्या प्रचाराचे व प्रयत्नाचे मुख्य यश अर्थात बहुजन-समाजामधील शिक्षणप्रसारात दिसून येते. मर्यादित आणि एका अर्थाने विपर्यस्त स्वरूपात का होईना, पण ग्रामीण भागातील खरे व स्थायी प्रबोधन या प्रयत्नांमधून झाले; आणि सतत वाढत्या गतीने चौफेर फोफावले. बहुजनसमाजातील नवे नेतृत्व, नवे बुद्धिवंत, नवे कार्यकर्ते, भावी राज्यकर्ते–शासनकर्ते निर्माण करण्याच्या प्रयत्नांचा हा मजबूत व व्यापक पाया ठरला आणि तो जिल्हा-तालुका-ग्रामपातळी-पर्यंत क्रमाक्रमाने विस्तार पावत गेला. बहुजनसमाजाच्या ज्या प्रचंड शिक्षणसंस्था

कालांतराने निर्माण झाल्या, सहकारी चळवळ जी पुढे चौफेर फोफावली, ग्रामीण स्थानिक-स्वराज्य-संस्थांमध्ये पुढे जे पूर्वी कधीही न दिसलेले चैतन्य खेळू लागले– या सर्वांगीण महान् परिवर्तनाची पायाभरणी करण्याचे श्रेय मात्र, प्रारंभीच ज्यांनी सत्यशोधक चळवळीसाठी आपले जीवन समर्पित केले अशा निष्ठावंत प्रचारकांच्या व कार्यकर्त्यांच्या प्रयत्नांनाच कृतज्ञतेने दिले पाहिजे.

सत्यशोधक चळवळीमध्ये कालांतराने–(विशेषतः त्याला ब्राह्मणेतर चळवळीचे व पक्षाचे स्वरूप येऊ लागल्यानंतर) ज्या अपप्रवृत्ती निर्माण झाल्या, फुल्यांच्या मूळ प्रेरणांचा व शिकवणीचा जो भयानक विपर्यास पुढे झाला, त्याचा दोष निष्ठावंत सत्यशोधक कार्यकर्त्यांच्या अंगी चिकटविणे खचित अन्यायाचे ठरेल. किंबहुना या अस्सल सत्यशोधकी बाण्याच्या कार्यकर्त्यांनी या अपप्रवृत्तींना व विपर्यासाला वेळोवेळी शक्य तेवढा विरोध करण्याचाच प्रयत्न केला, या गोष्टीची नोंद घेतली पाहिजे. काही काळ ब्राह्मणेतर चळवळीत, जातिवादी, स्वार्थसाधू, संधिसाधू, इंग्रजधार्जिण्या पुढाऱ्यांचे प्राबल्य माजले होते, हे खरे आहे; पण तरीसुद्धा निष्ठावंत सत्यशोधकांच्या चिकाटीच्या प्रयत्नांमुळे, फुल्यांची मूळ प्रेरणा, शिकवण सतत जिवंत राहिली. आणि पुढे जेधे-जवळकरांची बंडखोरी आणि त्यानंतर काही वर्षांनी शेतकरी-कामकरी पक्षाची स्थापना शक्य झाली. ग्रामीण भागात कम्युनिस्ट आणि समाजवादी चळवळीला अनुकूल भूमी कुठे कुठे लाभली, त्यालाही निष्ठावंत सत्यशोधकांचे हे प्रारंभीचे कार्य निःसंशय साहाय्यभूत झाले, याची कृतज्ञतापूर्वक नोंद घेतलीच पाहिजे.



बहुजनसमाजातील शिक्षणकार्य

फुल्यांपासून स्फूर्ती घेऊन बहुजनसमाजामध्ये शिक्षणाचा प्रसार करण्याचे व्रत बहुजनसमाजातील अनेक कार्यकर्त्यांनी घेतले होते. विशेषतः ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न झाले. कर्मवीर भाऊराव पाटील किंवा डॉ. पंजाबराव देशमुख यांसारख्यांनी तर शिक्षण-संस्थांचे प्रचंड जाळे जिल्ह्याजिल्ह्यांत तयार केले. या शिक्षण-संस्थांमध्ये अस्पृश्य आणि मागास समाजांतील विद्यार्थ्यांना सामावून घेण्याचे प्रयत्नही अनेकांनी केले. शाळांप्रमाणेच जिल्हा किंवा तालुक्यांच्या ठिकाणी वसतीगृहे काढण्याचे विकट कार्यही अनेकांनी चिकाटीने केले. शाळांमध्ये आणि विशेषतः वसतीगृहांमध्ये अस्पृश्य व मागासवर्गातील विद्यार्थ्यांना इतरांच्या बरोबरीने प्रवेश देणे; एवढेच नव्हे तर विद्यार्थ्यांमध्ये सहजीवनाचा एक आगळा आदर्श निर्माण करण्याचा प्रयत्न करणे, हेही या कार्याचे आणखी एक महनीय वैशिष्ट्य होते. या संस्था स्थापन करणे, त्यासाठी आवश्यक तो निधी व इतर साधनसामुग्री गोळा करणे, या महान कार्याला

आपले जीवन समर्पित करणारे निष्ठावंत शिक्षक व कार्यकर्त्यांची जुळणी करणे, ही कार्ये तेव्हा पन्नास-पाऊणशे वर्षांपूर्वी सोपी नव्हती. विशेषतः स्पृश्य-अस्पृश्यांची संयुक्त वसतिगृहे काढणे व चालविणे, ही तर फारच जिकिरीची गोष्ट होती. श्रेष्ठ दर्जाची निष्ठा आणि हिंमत असल्याखेरीज या कार्याचे मूळ धरणे केवळ अशक्य होते. पण हे अवघड, विकट कार्यही या कर्मवीरांनी करून दाखविले.

स्वावलंबी स्वायत शिक्षण !

कर्मवीर भाऊराव पाटलांसारख्यांनी तर या संस्था सर्वस्वी स्वावलंबी आणि स्वायत्त करून दाखविल्या. श्रम आणि शिक्षण यांची सांगड घालणे, राष्ट्रभक्तीच्या बरोबरीनेच सामाजिक समतेचे संस्कारही विद्यार्थ्यांवर लहानपणापासून घडविणे, विद्यार्थ्यांनीच आपल्या संस्था सहकार्याने व स्वायत्ततेने चालविणे, असे अनेक बहुमोल प्रयोग कर्मवीरांनी यशस्वी करून दाखविले. कर्मवीर श्री. भाऊराव पाटलांचे यश इतके उज्ज्वल होते की खुद्द म. गांधींनीसुद्धा त्याबद्दल मोकळ्या मनाने धन्योद्‌गार काढले. सामान्य जनतेचे सहकार्य, सामान्य जनतेने जमवलेली साधन-सामुग्री (पैसे, धान्य, कपडे, इमारतीचे सामान आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे जनतेची श्रम-सेवा) हाच कर्मवीरांच्या कार्याचा मुख्य आधार होता. त्यांच्या अगोदरच्या कालखंडातही काही प्रमाणात शिक्षणकार्य झाले होते; नाही असे नाही; पण ते मुख्यतः शाहू छत्रपति किंवा अन्य संस्थानिकांच्या, श्रीमंताच्या आणि काही प्रमाणात सरकारी आश्रयाच्या जोरावर झाले. शाहुमहाराजांचा प्रयत्न सोडल्यास इतरत्र अस्पृश्य व मागास विभागाच्या शिक्षणाला पुरेसे प्राधान्य मिळाले नाही; आणि सामान्य जनतेचे सहकार्य, हा भाग तर नंतरच आला. म्हणून कर्मवीर भाऊराव पाटील, पंजाबराव देशमुख व इतरांच्या शिक्षण-प्रसाराच्या कामाचे जेवढे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे.

अर्थात, फुल्यांच्या प्रयत्नानंतरच्या ४०-५०-६० वर्षांनंतरचा हा काळ होता. फुल्यांची चळवळ अगदी खेडोपाडी पोचली होती, तिने ग्रामीण जनतेमध्ये नवी जागृती, जाणीव, चैतन्य निर्माण केले होते. या भक्कम आधारावरच हे पुढील शिक्षणकार्य शक्य झाले यात शंका नाही. पण ही दोन्ही कार्ये एकमेकांपासून वेगळी काढता येणार नाही; परस्परपोषक अशीच ती कार्ये होती. दोन्ही कार्यांतील बरेच कार्यकर्तेही समान किंवा संबंधित होते.

या शिक्षणसंस्थांनी बहुजनसमाजात जागृती केली, राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्याला, त्याचप्रमाणे सामाजिक समतेच्या लढ्याला पोषक अशी मनोभूमि तयार केली. अर्थातच वेगवेगळ्या विभागांत किंवा संस्थांमध्ये अगदी एकाच धोरणाने काम चालत होते असे नाही. याही क्षेत्राचा उपयोग, रावसाहेब-बहाद्दुरांनी राजनिष्ठ राजकारणासाठी, कौन्सिल-लोकल बोर्ड राजकारणासाठी करण्याचा प्रयत्न केलाच !

पण तरीसुद्धा एकूण हे कार्य बरेच ध्येयनिष्ठ, निकोप, संस्कारसंपन्न होऊ शकले. फुल्यांच्या प्रेरणा आणि शिकवण यास अनुसरून ग्रामीण मराठी मनाची मशागत आणि जोपासना करण्याचे महान कार्य या शिक्षण-संस्थांनी केले, अशी नोंद इतिहासात होईल यात शंका नाही.

शाहुमहाराजांचे ऐतिहासिक कार्य

आंबेडकरांच्या स्वाभिमानी, स्वावलंबी आंदोलनाने मूळ धरण्यापूर्वी अस्पृश्य व इतर मागास समाजांत शिक्षणाचा प्रसार फारच मर्यादित प्रमाणात होता. तोही मुख्यतः मिशनऱ्यांनी केला होता; आणि काही प्रमाणात तरी ख्रिस्ती धर्मप्रसाराचा हेतू त्यांच्या प्रयत्नांना चिकटलेला होता. त्यामुळे शिक्षणाच्या ठेकेदारांचा, ब्राम्हण धर्ममार्तंडांचा राग तर या कामावर होताच; पण एकूण धर्मप्रवण समाजाच्या मनातही त्याबद्दल स्वाभाविक संशय आणि दुरावा होता.

शाहुमहाराजांच्या वैयक्तिक प्रयत्नांमुळे व कोल्हापूर राजवटीच्या पाठिंब्यामुळे अस्पृश्य व इतर मागाससमाजांत शिक्षणाचा प्रसार होण्याला चालना मिळाली. शाहुछत्रपतींच्या नेहमीच्या धडाडीने आणि जरबेने हेही कार्य त्यांनी पुढे रेटले! पण त्यांच्या उच्चपदस्थ सहकाऱ्यांमध्ये, कारभाऱ्यांमध्ये, जातिबंधुंमध्ये या कार्याबद्दल निष्ठा किंवा तळमळ खरोखर किती होती, हा प्रश्नच आहे! पण तरीसुद्धा फुल्यांच्या बहुजनसमाजातील शिक्षणकार्याला–त्यांतही अस्पृश्य आणि मागाससमाजांतील शिक्षणप्रसाराला सर्वतोपरी साहाय्य करून मोठ्या प्रमाणावर चालना देण्याचे महान क्रांतिकारक कार्य शाहुछत्रपतींनीच केले, याबद्दल महाराष्ट्राने सतत कृतज्ञ राहिले पाहिजे.

अस्पृश्यांमधील महार किंवा काही प्रमाणात चर्मकार किंवा इतर काही जातींनाच या शिक्षणप्रसाराचा फायदा मिळाला, ही वस्तुस्थिती आहे. पण तत्कालीन परिस्थितीने आणि विषम जागृतीने घातलेल्या त्या मर्यादा होत्या. शाहू छत्रपतींनी आपली संपूर्ण प्रतिष्ठा, सत्ता आणि साधनसामुग्री पणाला लावून हे कार्य हाती घेतले यात मात्र शंका नाही.

त्याचप्रमाणे थोडाफार शिक्षण-प्रसार झाला तरी त्यामुळे नोकरीधंदा मिळणे किंवा समाजात प्रतिष्ठा प्राप्त होणे हा पुढील आवश्यक टप्पा त्यांनाही फारसा गाठता आला नाही, हीही परिस्थितीचीच मर्यादा होती; छत्रपतींच्या प्रयत्नांमध्ये ढिलाई नव्हती. या शिक्षणप्रसारामुळे उच्चवर्णीय मक्तेदारांच्या हितसंबंधांवर गदा आली आणि त्यांनी सामाजिक ताण-तेढ वाढविण्याचा प्रयत्न केला, हेही खरेच आहे. आंबेडकरांनी पुढे जे कार्य केलं त्याचा आणि त्यामुळे जे प्रश्न नंतर निर्माण झाले त्यांचाही पाया येथेच घातला गेला!

बहुजनसमाजातील शिक्षण आणि ब्राम्हण

बहुजनसमाजातील आणि अस्पृश्य आणि मागाससमाजांतील शिक्षणप्रसाराच्या कार्याचा विचार करताना आणखीही एका गोष्टीचा उल्लेख करणे योग्य होईल.

या महान कार्याचे खरेखुरे आणि चिरस्थायी महत्त्व इतिहासानेच आता मान्य केले आहे. पण हे प्रयत्न प्रत्यक्ष होत असताना–(विशेषतः त्याच्या प्रारंभीच्या काळात) त्याबद्दल तत्कालिन समाजनेत्यांची–आणि शिक्षणक्षेत्रांतील ब्राम्हण मक्तेदारांची त्याकडे बघण्याची दृष्टी कशी होती ?

तर ब्राह्मण मक्तेदारांची ही दृष्टी अत्यंत स्वार्थी, कोती आणि विकृत होती; असेच म्हटले पाहिचे. आपण स्वतः तर करावयाचे नाही, इतर जे कोणी करतील त्यांच्या मार्गात शक्य तेवढे अडथळे आणावयाचे; एवढेही करून ते शिक्षण-कार्य सुरू झालेच; मार्गी लागलेच तर त्याचा उपहास करावयाचा; त्याचा तेजोभंग-मनोभंग करण्याचा प्रयत्न करावयाचा अशी ही एकूण वृत्ती होती ! याहीपेक्षा वाईट म्हणजे या शिक्षणप्रसारावर गलिच्छ हेत्वारोप करण्याचेही पाप तत्कालिन ब्राह्मण नेत्यांनी केले ! हा शिक्षणप्रसार नसून हा ब्राह्मणद्वेष माजविण्याचा, जातिवाद फैलावण्याचा प्रयत्न आहे; राष्ट्रीय चळवळीला विरोध करून इंग्रजांना राजनिष्ठ असे प्रजाजन निर्माण करण्याचा हा बनाव आहे; हिंदू धर्म बुडवून सब–गोलंकार माजविण्याचा हा प्रकार आहे, असे एक नाही, दोन नाही, हजार आक्षेप घेऊन नसता बोभाटा माजविण्याचे प्रयत्न या ज्ञानाच्या ठेकेदारांनी सतत केले !

या प्रचारामुळे बहुजनसमाजातील शिक्षणप्रसार थांबणारा नव्हता व थांबणे शक्यही नव्हते. पण यामुळे समाजांतील भेदभाव व तेढ वाढण्याला मात्र मदत झाली. शहरी विरुद्ध ग्रामीण, ब्राह्मण-पांढरपेशे विरुद्ध बहुजनसमाज, पुढारलेले विरुद्ध मागासलेले, 'राष्ट्रीय'वाले विरुद्ध 'सामाजिक'वाले असले खरे-खोटे वाद आणि त्यातून निर्माण होणाऱ्या तेढी वाढावयाला त्यामुळे चालना मिळाली. आणि वर्णाचं गुरु, समाजाचे धुरीण, स्वातंत्र्यआंदोलनांचे नेते म्हणविणाऱ्या काही कार्यकर्त्यांकडूनच या प्रकाराला चालना मिळाली !

कोती-विकृत दृष्टी

खरे म्हणजे शिक्षणाचे व शिक्षण-प्रसाराचे महत्त्व ब्राम्हणांना तरी सांगावयाला नको. अव्वल इंग्रजीमधील मर्यादित, राजनिष्ठ शिक्षणाची कोंडी फोडून शिक्षणाचा सार्वजनिक प्रचार व्हावा, त्याला राष्ट्रीय वळण मिळावे, त्यांचे संचालन सरकारी मक्तेदारीकडून काढून सार्वजनिक कार्यकर्त्यांकडे यावे, यासाठी याच नेत्यांनी किंवा त्यांच्या गुरुंनी ४०-५० वर्षांपूर्वी म्हणजे १८८० ते १९१० पर्यंत प्रयत्न केले होते; आणि अनेक अडचणींवर, राजकीय-सामाजिक अडथळ्यांवर मात करून त्यांनी या महान कार्याची मुहूर्तमेढ रोवली होती. त्यातूनच पहिल्या सार्वजनिक कार्यकर्त्यांच्या-

नेत्यांच्या स्वार्थत्यागी, ध्येयवादी परंपरा निर्माण झाल्या होत्या. पण त्याहीवेळी त्यांनी खुद्द फुल्यांच्या प्रयत्नांचा उपहासच केला होता.—कारण फुल्यांचे शिक्षणाचे क्षितीज अधिक विशाल होते, त्यांच्या शिक्षणाची व्याप्ती ब्राह्मण-पांढरपेशांपलीकडे शूद्र-अतिशूद्र आणि स्त्रियांपर्यंत विस्तारली होती. त्यावेळी 'सामाजिक'वाल्या फुल्यांचे प्रयत्न मर्यादित राहिले, पण 'राष्ट्रीय'वाल्याचे प्रयत्न मात्र फोफावले होते; अर्थात् ब्राह्मणवर्गात—फार तर इतर पांढरपेशांमध्ये. पण आता ३०-४० वर्षांनी म्हणजे १९१० ते १९४० या काळात फुल्यांना अभिप्रेत असलेल्या व्यापक बहुजनसमाजापर्यंत शिक्षण जाऊ लागताच आणि त्याचा आशयही अधिक जनतासन्मुख होताच ब्राह्मणांना त्याचे वैषम्य वाटावयाला लागले!

शहरी विभागांत आणि पांढरपेशांच्या शिक्षणकार्यांत अर्थात पुढाकार ब्राह्मणांचाच होता. पण ग्रामीण भागांत आणि बहुजनसमाजांत जो शिक्षण प्रसार होत होता, त्यात ब्राह्मणांचा सहकार अपेक्षेच्या आणि शक्यतेच्या मानाने फारच कमी होता! सुधारकी किंवा राजनिष्ठ मताचे पांढरपेशेसुद्धा या प्रयत्नांमध्ये फारसे नव्हते, ही गोष्ट लक्षणीय आहे! फुल्यांच्या पहिल्या कठीण प्रयत्नांतसुद्धा ब्राह्मणांचे जेवढे सहकार्य त्यांनी घेतले आणि त्यांना ते मिळाले. त्या प्रमाणातसुद्धा ४०-५० वर्षांनंतर मिळू शकले नाही, ही वस्तुस्थिती जितकी बोलकी तितकीच अर्थपूर्ण आहे.

काही उणिवा!

सत्यशोधक चळवळीतील आद्य प्रचारकांच्या आणि कार्यकर्त्यांच्या बहुमोल कार्याबद्दल इतके लिहिल्यानंतरही काही गोष्टींचा उल्लेख अपरिहार्यच आहे.

फुल्यांनी आपल्या मूळ प्रेरणांनुसार आपल्या कार्यक्रमातील सर्वच गोष्टींवर सतत समप्रमाण भर दिला आणि प्रत्यक्ष व्यवहारातही त्या आणण्याचा आटोकाट प्रयत्न केला. फुल्यांच्या मृत्युनंतर काही वर्षांनी त्यांच्या कार्याचे जरी पुनरुज्जीवन झाले तरी त्यात त्यांना अभिप्रेत असलेल्या सर्वच गोष्टींना यथायोग्य स्थान मिळाले नाही हे उघड आहे. त्यात ब्राह्मणी वर्चस्वाविरुद्ध मोहिमेला प्राधान्य जास्त मिळाले; पण एकूण विषमतेविरुद्ध व एकूण सर्वच जन्मजात जातवारीविरुद्ध असा लढा होऊ शकला नाही. त्याचप्रमाणे फुल्यांनी अस्पृश्यताविरोधी कार्याला प्रारंभापासून तो अखेरपर्यंत जे सतत प्राधान्य दिले ते पुढे टिकले नाही;—थेट डॉ. आंबेडकरांनी तो प्रयत्न हिरीरीने घसाला लावीपर्यंत ही उपेक्षा चालू राहिली. फुल्यांनी स्त्री-मुक्तीच्या, स्त्री-पुरुष-समानतेच्या प्रश्नालाही असेच सतत कटाक्षाने प्राधान्य दिले होते. बाल-विवाह, स्त्री-शिक्षण, विवाहसंस्कार, विधवा विवाह, पतिता-परित्यक्तांचे प्रश्न, अनाथ अर्भकांचे प्रश्न हे सर्व प्रश्न फुल्यांच्या विचारात व कार्यात सतत असत. पण या प्रश्नांची त्यांच्या मृत्युनंतर जी उपेक्षा झाली ती सत्यशोधकांनीच केवळ नव्हे तर इतर कोणीही नंतर फारशी भरून काढली नाही. हे एक कटु ऐतिहासिक सत्य आहे.

अस्पृश्यांना आंबेडकर मिळाले, कामगारांना कम्युनिस्ट मिळाले; आणि त्यांनी त्या त्या विभागांचे प्रश्न हिरीरीने पुढे आणले, प्रचंड लढाऊ चळवळी केल्या; त्यासाठी कायम संघटना स्थापन केल्या, आणि जिद्दीने ते प्रश्न घसाला लावले; राष्ट्रीय सामाजिक जीवनात त्या प्रश्नांना आणि संबंधित वर्गांना, समाजविभागांना महत्त्वाचे आणि कायमचे स्थान मिळवून घेतले. आदिवासी आणि मागास जमातींमध्येही तीच क्रिया थोड्याफार प्रमाणात तरी, कम्युनिस्ट व इतर डाव्या चळवळींच्या पुढाकाराने गेली काही वर्षे चालू आहे. स्त्रियांच्या बाबतीतही अगदी अलीकडे आशादायक अशी चिन्हे दिसू लागली आहेत. पण फुल्यांच्या मृत्यूनंतर उपरोक्त प्रश्न, संबंधित जन-विभाग काही वर्षे तरी उपेक्षित राहिले यात शंका नाही.

प्रकरण २ रे

शाहु छत्रपतींचे कार्य-मर्यादा

महात्मा फुल्यांच्या प्रेरणांचा आणि परंपरेचा विचार करताना राजर्षी शाहु छत्रपतींच्या कार्याचा उल्लेख केवळ अपरिहार्य आहे; पण त्यांच्या कार्याबद्दल लिहिणे तितकेसे सोपे नाही. त्यात गुंतागूंत फार आहे आणि अजूनही ऐतिहासिक वास्तवतेच्या दृष्टिकोनातून त्यांच्या कार्याकडे बघणे सर्वांनाच सारखेच मानवण्यासारखे नाही !

छत्रपतिपद : प्रतिष्ठा-मर्यादा !

मुख्य गुंतागूंत सुरू होते ती अशी की, शाहु छत्रपती होते. म्हणजेच शिव-छत्रपतींचे नाव, कुळी, प्रतिष्ठा, सिंहासन, परंपरा, यांचे ते अधिकृत वारसदार होते. त्यामुळे त्यांच्या सामाजिक व सुधारणेच्या कार्याला जसा थोडाफार उठाव आला, त्यांच्या प्रतिष्ठेचा व राजाधिकाराचा जसा उपयोग झाला, त्याप्रमाणेच त्याला काही अपरिहार्य अशा मर्यादाही निर्माण झाल्या. उच्च क्षात्र कुल (आणि त्याबद्दल भटा-भिक्षुकांनी वेळोवेळी माजविलेला वाद) या दोहोंचाही परिणाम शाहु-महाराजांच्या सामाजिक कार्यावर अवास्तव प्रमाणात झाला. लो. टिळक हे स्वतः उच्च-वर्णीय व त्या उच्चवर्णीयत्वाचा दुरभिमान बाळगणारे त्यांचे बहुतेक सर्व प्रमुख सहकारी, कार्यकर्ते, अनुयायी. यामुळे टिळकांच्या एकूण कार्याला जसा विशिष्ट रंग लागला, मर्यादा पडल्या, अनुकूल-प्रतिकूल परिस्थिती उत्पन्न झाली, तसाच काहीसा प्रकार शाहु छत्रपतींच्या बाबतीतही घडला !

राजकीय रंग !

दुसरी गुंतागुंतीची गोष्ट म्हणजे शाहु छत्रपती होते. (शिवरायांच्या गादीचे अधिकृत वारसदार होते.) हा केवळ विशेष प्रतिष्ठेचा व अनुकूलतेचा भाग

झाला; पण अखेर ते इंग्रजी अंमलाखालील एक संस्थानिक होते; इंग्रज रेसिडेंट आणि पोलिटिकल डिपार्टमेंटच्या करड्या नजरेखालीच त्यांना कारभार करणे भाग होते, हीही तितकीच प्रतिकूल बाजू होती! आपल्या सामाजिक सुधारणेच्या किंवा राजकीय आकांक्षांच्या पूर्तीसाठी सिंहासनांचा त्याग करण्याची तेव्हा एकूण परिस्थिती नव्हती, हे उघडच आहे. स्वातंत्र्यलढ्याची तीव्रता व व्याप्तीही त्यांच्या कालखंडात तेवढ्या निर्णायक अवस्थेला पोचलेली नव्हती. (तसे असते तर खरोखरच शाहु छत्रपती हे अगदी खऱ्याखुऱ्या अर्थाने आधुनिक काळाचे नवे लोक-छत्रपतीच ठरले असते!) त्यासाठी आवश्यक असलेले काही आवश्यक गुण तरी अत्यंत प्रकर्षाने शाहु महाराजांच्या अंगी होते, यात शंका नाही. प्रत्यक्षात त्यांना विशिष्ट मर्यादेत व रेसिडेंटच्या तीक्ष्ण नजरेखालीच वागणे भाग होते, ही दुर्दैवी पण कठोर आणि अपरिहार्य वस्तुस्थिती सदैव ध्यानात ठेवावयाला हवी.

वेदोक्त प्रकरणाचा कायम परिणाम!

त्यातच वेदोक्त प्रकरणावरून त्यांचे ब्राह्मणी वर्चस्वाविरुद्ध भांडण झाले. शाहु महाराजांनी मांडलेले हे भांडण योग्यच होते. न्याय निःसंशय त्यांच्याच बाजूचा होता. हे भांडण मिटविण्यासाठी प्रारंभी तरी बराच वेळ छत्रपतींनी अत्यंत संयमाने आणि शांततेने प्रयत्न केले. वर्णश्रेष्ठत्वाच्या अधिकाराचा माज चढलेल्या उपाध्यायवर्गाने व त्यांना पाठिंबा देणाऱ्या ब्रह्मवृंदाने व धर्मपीठाने छत्रपतींचे हे प्रयत्न निष्फळ ठरविले आणि वाद अधिकच चिघळत ठेवला. छत्रपतींसारख्या मानी व मनस्वी पुरुषसिंहाच्या संयमाचा आणि सहनशीलतेचा या ब्राह्मणांनी अगदी अंत पाहिला! ब्राह्मण राजकीय कार्यकर्त्यांनी व नेत्यांनी या मूळ वादाला राजकारणाचे रंग फासण्याचा हेतुपूर्वक प्रयत्न केला; आणि अखेर टिळकांना त्यांत ओढून एका स्थानिक वादाला महाराष्ट्रव्यापी व राजकीय स्वरूप दिले!

त्याहूनही दुर्दैवाची गोष्ट अशी की, टिळकांनी आपली राजकीय नेत्याची-देशनेत्याची भूमिका सोडून, त्यावेळी ब्राह्मण नेत्यासारखे वर्तन केले आणि सर्व वाद आपल्याच अंगावर विनाकारण ओढवून घेतला! आणि जे मग उभयपक्षी घडले आणि पुढे टिळकांच्या मृत्युपर्यंत व नंतरही पुढे घडत राहिले, त्याने महाराष्ट्राच्या राजकारणाचा व समाजकारणाचा पुरता विचका विचका होऊन गेला! त्या सर्व वादात जाण्याचे हे स्थळ नव्हे आणि इथे त्याला तितका अवकाशही नाही. पण शाहुछत्रपती आणि त्यांचे छत्रपतिपद आणि टिळक व त्यांच्या नेतृत्वातील ब्राह्मणी मर्यादा, यामुळे एकूण गुंतागूंत वाढण्याला मदत झाली, याबद्दल तरी शंका नको.

लोकमान्य टिळक हे उघड उघड राजद्रोही राष्ट्रनेते आणि शाहुछत्रपती हे रेसिडेंटच्या नजरेखाली राज्य करणारे राज्यकर्ते; या दोन परस्परविरोधी राजकीय भूमिकांमुळेही या एकूण प्रकरणातील गुंतागूंत निर्माण व्हायला आणि त्यामुळे वर्षानुवर्षे परिस्थिती अधिकाधिक चिघळत जायला मदतच झाली.

वेदोक्त प्रकरणी म. फुल्यांचाही पराभव !

या वेदोक्त प्रकरणाची एकूण फलश्रुती शोधताना, (प्रासंगिक आणि स्थानिक अभिनिवेशाच्या गदारोळात) एका महत्त्वाच्या गोष्टीकडे नेहमीच दुर्लक्ष होत आलेले आहे, तिची स्पष्ट नोंद या ठिकाणी करणे योग्य ठरेल.

वेदोक्त प्रकरणात एकूण न्याय शाहुराजांच्या बाजूचा होता; त्यांनी हा न्यायाचा लढा मोठ्या जिद्दीने लढविला आणि अखेर न्याय आणि आपला वेदोक्ताचा अधिकार प्रस्थापित करून घेतला, यात शंका नाही.

त्या दृष्टीने वेदोक्त प्रकरणात शाहुमहाराजांचा संपूर्ण विजय झाला; आणि ब्राह्मण वर्चस्वाचा (अगदी लो. टिळकांसकट ब्राह्मण वर्चस्वाचा) संपूर्ण पराभव झाला हेही खरेच आहे. पण त्याचबरोबर या वेदोक्त प्रकरणांत महात्मा फुल्यांचा त्यांच्या महान प्रेरणेचा–शिकवणीचाही पराभव अभावितपणे झाला, हीही गोष्ट आज खऱ्या फुलेभक्तांनी तरी ध्यानांत घ्यावी. कारण शाहुराजांनी या प्रकरणात वेदोक्त संस्कारांचा अधिकार प्रस्थापित करून घेतला, म्हणजे खरोखर काय झाले ? म्हणजे खरोखर असे झाले की, वर्ण-वर्चस्वाच्या असमान, विषम उतरंडीमध्ये क्षत्रीय वर्ण हा ब्राह्मणांच्या बरोबरीला जाऊन बसला एवढेच फार तर झाले ! पण इतर शूद्र-अति-शूद्रांच्या दृष्टीने ती उतरंड,-ती विषमता एकूण कायमच राहिली,–किंबहुना अधिकच घट्ट होऊन बसली ! कारण, फुल्यांचे नाव सांगणाऱ्या काही ब्राम्हणेतर सुधारकांनी, वेदोक्त संस्कारांचा हट्ट धरून एक प्रकारे त्या विषम वर्णव्यवस्थेचाच हट्ट धरला व तो पुरा करून दाखविला ! म्हणजेच म. फुल्यांनी ज्या वर्णव्यवस्थेविरुद्ध (आणि त्या विषम व्यवस्थेचे नेते ब्राह्मण–म्हणून त्यांच्याविरुद्ध) जन्मभर निकराने लढा दिला,– त्या विषम अन्याय्य व्यवस्थेलाच एक प्रकारे या सुधारकांनी मान्यता दिली ! शाहुराजांनी निर्माण केलेले ब्राम्हणेतर पुरोहित जे संस्कार शिकले होते आणि नवे उपाध्याय म्हणून व्यवहारात आणीत होते, ते वेदोक्त संस्कार खरोखर विषमता घट्ट करणारेच संस्कार होते !

खरं म्हणजे या प्रकरणापासूनच शाहु छत्रपतींच्या महान सामाजिक कार्यात इतर अडचणी व अडथळे यावयास प्रारंभ झाला. निखळ समाजकारणावर विशिष्ट राजकीय रंगाची पुटे चढायला अनुकूल परिस्थिती उत्पन्न झाली.

यातूनच शुद्ध सत्यशोधक चळवळीवर, सामाजिक समतेच्या उज्ज्वल चळवळीवर जातीय चळवळीची छाया पडू लागली; पुढे मॉंटेग्यू चेम्सफर्ड सुधारणांचा हप्ता दृष्टिपथात दिसू लागताच, त्या चळवळीला ज्या प्रमाणात उघड राजकारणाचे स्वरूप येऊ लागले त्या प्रमाणात मूळ सत्यशोधक प्रेरणांची आणि शिकवणीची पिच्छेहाटही अपरिहार्यपणे होऊ लागली !

स्वराज्याला-जनतेच्या मताधिकाराला विरोध !

भारतमंत्री मि. मॉंटेग्यू यांच्याकडे ब्राह्मणेतर पुढाऱ्यांचे जे शिष्टमंडळ गेले त्याने तर स्वराज्याच्या मागणीला स्पष्ट विरोधच केला ! पण एवीतेवी स्वराज्याचा हक्क देण्याचे इंग्रजांनी ठरविलेच असले तर ती आपत्तीच आहे; त्या परिस्थितीत ब्राह्मणेतरासाठी 'खास संरक्षण' मागणे एवढेच आता या पुढाऱ्यांच्या हाती होते, असे त्यांनी भारतमंत्री मि. मॉंटेग्यू यांना खुशाल सांगितले ! त्याचप्रमाणे पुढे ब्राह्मणेतरांना जातवार प्रतिनिधीत्वाचाही त्यांनी हट्ट धरला ! याहूनही आश्चर्याची गोष्ट म्हणजे बहुजनसमाजाचे खरेखुरे प्रतिनिधी म्हणविणारे हे नेते सामान्य जनतेच्या मताधिकाराला अनुकूल नव्हते ! प्रातीकर किंवा भारी सारा भरणाऱ्या श्रीमंतांपुरताच मताधिकार करावा, असा त्यांचा आग्रह होता ! म्हणजेच फुल्यांना प्रिय असलेल्या शूद्र-अतिशूद्रांना मताधिकारापासून वगळण्याचीच त्यांची भूमिका होती ! नव्या निवडणुका झाल्या तर राष्ट्रीय चळवळीतील पुढाऱ्यांपुढे आपला टिकाव लागेल असा आत्मविश्वासही त्यांना फारसा वाटत नसावा ! महात्मा फुल्यांच्या निधनानंतरच्या २५-३० वर्षांतच त्यांचे नाव सांगणारे मोठमोठे पुढारी कोणत्या थरापर्यंत जाऊन पोचले होते, याची कल्पना या विपरीत प्रकारावरून येऊ शकेल !

शाहु छत्रपती जाणि सत्यशोधक-ब्राम्हणेतर चळवळ !

शाहु छत्रपती सत्यशोधक चळवळीचे आधारस्तंभ समजले जात; पण स्वतः ते समर्पित सत्यशोधक असे कधीच नव्हते. ब्राम्हणेतर चळवळ तर बरीच त्यांच्या नावावर व आधारावर चालत होती; पण तिचीही सर्व सूत्रे किंवा मुख्य पुढारीपण प्रत्यक्षपणे त्यांच्याकडे नव्हते आणि पुढे पुढे तर त्यांनी ब्राम्हणेतर चळवळीशी जाहीरपणे फारकतच घेतली; तिच्यावर जाहीरपणे टीकाही केली.

पण तरीही या दोन्ही चळवळींपासून त्यांना अलग काढता येत नाही; किंवा त्या चळवळींच्या यशापयशाची जबाबदारी त्यांच्यावर काही प्रमाणात तरी पडल्या वाचून राहात नाही.

खरी गोष्ट अशी आहे की, या दोन्ही चळवळींत ते होते; म्हणून त्या वादल्या-फोफावल्या. पण दोन्ही चळवळींशी ते संपूर्णपणे समरस कधीच झाले नाहीत; किंवा त्यांच्या नेतृत्वाची संपूर्ण जबाबदारी त्यांनी कधीच स्वीकारली नाही. पण या गोंधळाचा एकूण परिणाम मात्र फारसा इष्ट झाला नाही.

शाहु छत्रपतींनी जर संपूर्णपणे सत्यशोधक निष्ठा प्रारंभापासून स्वीकारली असती आणि अखेरपर्यंत सत्यशोधक चळवळीचेच नेतृत्व केले असते, तर सत्यशोधक चळवळीच्या मूळ प्रेरणांना आणि शिकवणीला अभूतपूर्व बळ प्राप्त झाले असते; उठाव मिळाला असता. तिच्यामधील काही महत्त्वाच्या बाबींबाबत जी उपेक्षा पुढे झाली ती कदाचित् टळली असती. त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे ब्राह्मणे-

तर चळवळीवरही सत्यशोधक प्रेरणेचा व शिकवणीचा अधिक प्रभाव पडला असता; ब्राह्मणेतर चळवळीतील काही प्रमुख संधिसाधु, जातीयवादी, इंग्रजधार्जिण्या पुढाऱ्यांच्या सत्ताबाज, जातीयवादी राजकारणाला थोडाफार तरी आळा बसला असता; आणि त्यामुळे महाराष्ट्राची झालेली अपार हानी काही प्रमाणात तरी टळली असती. पण हा झाला जरतारी–संभाव्यतेचा प्रश्न !

पण हे होणार नव्हते; आणि झालेही नाही. यालाही मुख्य कारण खुद्द छत्रपतींचे छत्रपतिपद; सत्ताधिष्ठित वरिष्ठ वर्णाचा वारसा हेच दिसते. शिवाय रेसिडेंडच्या व ब्रिटिश शिक्षकांच्या देखरेखीखाली झालेले राजकुमाराचे शिक्षण हीही गोष्ट सत्यशोधक व्रताला फारशी अनुकूल नव्हती. परिणामी, तरण्याबांड शाहुमहाराजांनी छत्रपतीचा अधिकार ग्रहण केला तेव्हा ते जुन्या परंपरेचे व त्याबरोबर येणाऱ्या बऱ्यावाईट गोष्टींचे अभिमानी होते. हिंदु धर्म, उच्चकुल, परंपरेने चालत आलेले कुळाचार, रूढी वगैरेंवर त्यांची श्रद्धा होती. शिवाय राज्यकर्ते म्हणून काही परंपरा, रीतीरिवाज चालू ठेवण्याचीही त्यांच्यावर जबाबदारी होती.

तरुण शाहुमहाराजांची कारकीर्द सुरू झाली ती सर्वांच्या शुभेच्छा घेऊन. (आज कदाचित् वाचून आश्चर्य वाटेल पण खुद्द टिळकांनी तेव्हा स्वतः लेख लिहून या तरुण राज्यकर्त्याबद्दल शुभेच्छा आणि उच्च अपेक्षा व्यक्त केल्या होत्या.)

बहुजनसमाजाच्या शिक्षणाची पायाभरणी !

अशा परिस्थितीत शाहुमहाराजांच्या अंतःकरणात खोल कुठेतरी फुल्यांच्या प्रेरणेचा स्पर्श झाला, ते काही काळ अगदी झपाटले गेले आणि अनेक अभूतपूर्व सुधारणा त्यांनी धडाक्याने सुरू केल्या ! त्यांत बहुजनसमाजाचे शिक्षण, त्यांना शाळांत बिनबोभाट प्रवेश, शिष्यवृत्त्या, वसतिगृहे, इत्यादींसाठी आपली राज्यकर्त्याची सर्व शक्ती, अधिकार, साधनसामुग्री त्यांनी सर्वतोपरी उपयोगात आणली. उच्चवर्णीय अधिकाऱ्यांचा, कारभाऱ्यांचा, शिक्षकांचा, छुपा विरोध-असहकार त्यांनी हाणून पाडला आणि एक प्रकारे बहुजनसमाजाच्या सामुदायिक प्रमाणावरील शिक्षणाचा पाया घातला. कोल्हापुराबाहेरही इतरत्र अशाच प्रयत्नांना त्यांनी चालना दिली, शक्य तेवढे साहाय्य केले.

स्त्री-विषयक सुधारणा !

शाहुमहाराजांनी बहुजनसमाजाचे शिक्षण आणि अस्पृश्य याबाबत जितक्या धडाडीने आणि चिकाटीने कार्य केले तेवढे स्त्री-विषयक सुधारणांच्या बाबतीत केले नाही, ही वस्तुस्थिती आहे. यावरून इतर कोणत्याही बाबतींतील सुधारणांपेक्षा सर्वांत बिकट अशी (प्रथम पटण्यासच कठीण) आणि पटली तरी प्रत्यक्षात व्यवहारात आणण्यास त्याहूनही अधिक कठीण अशी ती सुधारणा आहे, एवढेच पुन्हा एकदा सिद्ध होते.

स्त्री-विषयक काही सुधारणांच्या बाबीकडे मात्र महाराजांनी सतत आणि कसोशीने लक्ष दिले आणि त्याचा पाठपुरावा केला; त्या सुधारणा म्हणजे स्त्री-विषयक कायदे, बाल-विवाह, विधवा-विवाह, आंतरजातीय विवाह, हिंदु-जैन मिश्रविवाह, नागरी विवाह (रजिस्टर विवाह), इत्यादी विषयांसंबंधी एका मागाहून एक कायदे मंजूर करून महाराजांनी त्यांची संस्थानात अंमलबजावणी करण्याचे कसोशीने प्रयत्न केले.

एका बाबतीत मात्र महाराजांनी फुल्यांच्या शिकवणीशी विसंगत असे वर्तन केले; आणि तेही कदाचित अभावितपणाने ! फुल्यांनी विवाह-संस्कारांतून दलाल उपाध्यांची संपूर्ण हकालपट्टी केली आणि वधु-वरांनी स्वतःच, इष्टमित्रांच्या सान्निध्यात मराठीमधून विवाह लावण्याचे नवे क्रांतिकारक संस्कार निर्माण केले. या जनता-विवाहांच्या प्रसारासाठी फुल्यांनी वैयक्तिक पुढाकार घेऊन खेडोपाडीसुद्धा सतत प्रचार केला; प्रत्यक्षात शेकडो लग्ने लावली; त्याबद्दल कायदेशीर आक्षेप सनातन्यांनी निर्माण केल्यानंतर त्यांचेही चिकाटीने निराकरण केले. पण आपले वेदोक्त हक्क प्रस्थापित करण्याच्या अभिनिवेशात फुल्यांना प्रिय असणाऱ्या या विवाह-संस्कारविषयक सुधारणांकडे शाहुराजांचे दुर्लक्ष झाले ! याहीपुढे जाऊन त्यांनी अगदी सनातनी विवाहसंस्कार अगदी सर्व वेदोक्त शास्त्रोक्त तपशीलांसह अंमलात आणण्याची मोहीम खेडोपाडी केली ! फरक एवढाच की, ब्राह्मण भटाऐवजी ब्राह्मणेतर उपाध्याय म्हणजे नवा ब्राह्मणेतर भटजी त्यांनी आणला ! म्हणजे सगळे जुनेपुराणे सनातनी (ब्राह्मणप्रणित) संस्कारच; फक्त ते ब्राह्मणेतर भटांच्या पौरोहित्याखाली झाले म्हणजे भागले, असा हा विपरीत प्रकार एकूण घडला ! अर्थात् त्या काळच्या विशिष्ट संदर्भात कदाचित मर्यादित अर्थाने ही सुधारणा असली तरी फुल्यांच्या शिकवणीशी ती विसंगत होती, याबद्दल मात्र शंका नाही.

अस्पृशांचे शिक्षण–नोकऱ्या !

छत्रपतींनी आणखीही एक अवघड कार्य अंगावर घेतले. (जे फुल्यांना प्रिय होते व त्यांनी ज्यासाठी जन्मभर जीव टाकला आणि त्यांच्या मृत्यूनंतर जे जवळजवळ स्थगित झाले.) ते अस्पृश्यता निवारणाचे कार्य छत्रपतींनी धडाक्याने सुरू केले. या कामी तर जवळजवळ सगळ्यांचाच (केवळ ब्राह्मणांचा व पांढरपेशांचाच नव्हे, तर इतर उच्च कुलोत्पन्नांचाही) विरोध व असहकार त्यांना सहन करावा लागला. पण त्यांनी तोही बराचसा मोडून काढला. अस्पृश्यांना शिक्षणाचे दरवाजे मोकळे केले, एवढेच नव्हे तर त्यांना ठिकठिकाणांहून एकत्र आणले; सर्व सोयी-सवलती उपलब्ध करून दिल्या. आणि त्यांना शाळांत-वसतिगृहांत आणून बसविले. एवढेच करून शाहुमहाराज थांबले नाहीत, तर त्यांनी आणखी एक पाऊल पुढे टाकून अस्पृश्यांना नोकऱ्यांमध्ये प्रवेश देण्यासाठी जीवाचे रान केले.

सरकारी-निमसरकारी नोकऱ्यांमध्ये अस्पृश्यांना स्थान मिळावे म्हणून व्यक्तिशः लक्ष घालून, विरोध मोडून काढून त्यांनी प्रयत्न केले. स्वतःच्या अगदी खाजगी नोकऱ्यांत अस्पृश्यांना स्थान दिले ! अस्पृश्याला हॉटेल काढून देऊन तेथे स्वतः चहा पिण्याचा अड्डा बनविण्यापर्यंत आणि तेथे उच्च कुलोत्पन्नांना आग्रहपूर्वक बरोबर नेण्यापर्यंत त्यांनी प्रयत्नांची परिसीमा केली. याही पलीकडे जाऊन त्यांनी संस्थानी मिरवणुकीत अस्पृश्यांना, तलवारी–पट्टे हाती घेऊन मिरविण्याचा महत्त्वाचा हक्क दिला. त्याचप्रमाणे पोलिसांत दररोज हजेरी देण्याचा अपमानास्पद हुकूमही रद्द केला. दरबारी हत्तीचा माहूत, स्वतःच्या गाडीचा कोचमन, हुजऱ्या वगैरे वैयक्तिक चाकर अस्पृश्यांतून निवडले. खरोखर छत्रपतींनी स्वतः जिद्दीने आणि जन्मभर केलेल्या या अस्पृश्यविषयक कार्याला भारतात तोड नाही. या बाबतीत तरी छत्रपतींचे ऋण साऱ्या देशाने मानले पाहिजे. खुद्द आंबेडकरांना सुद्धा प्रारंभापासून जेवढी मदत करता येणे शक्य होते तेवढी शाहुराजांनी मदत केली. आंबेडकरांना सार्वजनिक कार्यात मानाने पदार्पण करण्यासाठीही छत्रपतींनी प्रयत्न केले.

पण छत्रपतींच्या नेमक्या याच महान कार्याला महाराष्ट्रात इतरत्र पाठिंबा मिळू शकला नाही ! कोल्हापुरात महाराजांची सतत वैयक्तिक जरब होती म्हणून हे काम थोडेफार तरी पुढे रेटले गेले; पण इतरत्र महाराजांच्या नावाने व मदतीने जगणारे पुढारी व त्यांच्या संस्था यांनी अस्पृश्यविषयक कार्याची उपेक्षाच केली !

दुर्दैवाने छत्रपतींच्या अकाली निधनामुळे या कार्याची फार हानी झाली. छत्रपती अधिक जगले असते तर आंबेडकर आणि छत्रपती यांच्या कार्याची अत्यंत प्रभावी युती होऊ शकली असती; त्याचप्रमाणे जेधे-जवळकर यांच्यासारख्या ध्येयवादी धडाडीच्या तरुण बंडखोरांनाही त्यांचा आधार मिळू शकला असता.

टिळकांच्या निधनानंतर त्यांच्या नावावर जगणाऱ्या पुढारीपणाची झपाट्याने होत गेलेल्या पिछेहाटीच्या काळात, एका बाजूने जेधे-जवळकर आणि दुसऱ्या बाजूने आंबेडकर यांच्या नव्या नेतृत्वाचा उदय झाला. या दोन्ही शक्तींना छत्रपतींच्या साहाय्याची जर जबरदस्त जोड मिळाली असती, तर महाराष्ट्रातील सर्वांगीण सामाजिक परिवर्तनाच्या कार्याला तेव्हाच अधिक गती मिळाली असती–व्यापक पाया लाभला असता. सत्यशोधक चळवळ आणि आंबेडकर यांची फारकत टाळणे तेव्हा शक्य होते, एवढे तरी निखालस म्हणता येईल ! पण हाही पुन्हा संभाव्यतेचाच अंदाजपंचे विचार ! पण अजूनही हळहळ वाटावी अशी ही गोष्ट आहे, यात शंका नाही.

शाहुराजे आणि कामगार !

शाहुराजांच्या अकाली निधनाबद्दल हळहळ वाटावी, अशी आणखीही एक गोष्ट त्यांच्या आयुष्याच्या अखेरच्या काही वर्षांमध्ये घडली; ती म्हणजे मुंबईच्या

कामगारवर्गाशी त्यांचे जडलेले संबंध, कामगारवर्गापुढे त्यांनी मांडलेले विचार ही होय.

अखेरच्या दिवसांत टिळकांप्रमाणेच शाहुमहाराज हेही उदयोन्मुख कामगार-वर्गाकडे आकृष्ट झाले होते. मुंबईत मजुरांच्या सभेत भाषण करताना त्यांनी कामगारांच्या वर्गीय शक्तीचे स्वागत केले; ट्रेड युनियन संघटना बांधण्याचा हक्काचा निःसंदिग्ध पुरस्कार केला. पण एवढ्यावरच न थांबता, त्यांनी भांडवलदारांविरुद्ध कामगारांच्या वर्गलढ्याचीही महती वर्णन केली.

अर्थातच भांडवलदारांत मुख्यतः भटजी आणि शेटजी आहेत, हे महाराजांनी सांगितले असले तर ते आपण तत्कालिन संदर्भात आणि परिभाषेत समजून घेण्याचा प्रयत्न करावा. पण भटजीबरोबरच शेटजी बहुजनसमाजाचा शत्रू म्हणून उघड नाव घेणे आणि तो शेटजी म्हणजे भांडवलदारवर्ग असा त्याचा वर्गीय अर्थ कामगारांसमोर स्पष्ट करणे, ही गोष्ट तेव्हा तरी अपूर्व होती, यात शंका नाही.

याही पलिकडे जाऊन महाराजांनी रशिया आणि जर्मनीचा उल्लेख करणे आणि तेथील कामगारांनी झार आणि कैसरची जुलमी राजसत्ता उलथून पाडली आहे, याचा स्वागतपर उल्लेख करणे ही गोष्ट अधिकच महत्त्वाची आहे. तसा उल्लेख एका सिंहासनाधिष्ठित संस्थानिकाने करावा याचे तर आज अधिकच कौतुक वाटते. शाहुमहाराजांनी कामगारांपुढे केलेली सर्व भाषणे वाचली म्हणजे एक गंमतीची गोष्ट नजरेस येते; ती म्हणजे टिळकांच्या कामगारांपुढील भाषणांशी त्यांचे असलेले तंतोतंत साम्य ! (–अर्थात भटजी हा शब्द वगळून !)

आर्य समाजाचा पुरस्कार !

शाहु छत्रपतींनी आर्य समाजाचाही पुरस्कार केला. त्याच्यामागे आपली प्रतिष्ठा व सरकारी साधनसामुग्री उभी केली. आर्य समाज काही बाबतीत कितीही सुधारक असला तरी त्याची मूळ श्रद्धा वेदांवरच होती. वैदिक धर्माचे पुनरुत्थान हीच त्यांची निष्ठा व घोषणा होती; आणि ती फुल्यांच्या व सत्यशोधकांच्या मूळ भूमिकेशी विसंगत–काही प्रमाणात विरोधीसुद्धा होती. पुढील काही वर्षात हे सुधारक आर्य समाजी मुस्लीम द्वेषावर आधारलेल्या हिंदु राष्ट्रवादाचे कट्टर पुरस्कर्ते बनले; उत्तर भारतामध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघ-जनसंघाचे मुख्य आधारस्तंभ ठरले; फाळणीनंतरच्या कत्तलीत त्यांनी हिरीरीने भाग घेतला.

शाहुमहाराजांची ऐतिहासिक कामगिरी !

शाहुमहाराजांच्या निधनाला आता ५० वर्षे होऊन गेली. आता तरी वेदोक्त प्रकरण, ब्राह्मणेतर चळवळ किंवा आर्य समाजाचा त्यांनी केलेला पाठपुरावा यांमध्ये बुडून जाण्याची आज गरज नाही.

त्यांच्या एकूण कार्याची ऐतिहासिक महती शोधण्याचा प्रयत्न केला तर आज ५०–७५ वर्षांनंतर कोणती गोष्ट ठळकपणे दिसते ?

ब्राह्मणांच्या वर्णवर्चस्वाविरुद्ध शाहुराजांनी केलेला यशस्वी संघर्ष ही त्यांची ऐतिहासिक कामगिरी मानली पाहिजे; पण या कामगिरीचा फायदा दुसऱ्या एका उच्चवर्णीय जातीयतेने काही काळ घेतला असेल तर ती शाहुराजांच्या कार्याची मर्यादा समजली पाहिजे.

शाहुराजांनी फुल्यांना जन्मभर प्रिय असलेल्या अस्पृश्यताविषयक कार्याचा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत सतत पाठपुरावा केला आणि आंबेडकरांच्या कार्याची पायाभरणी केली, हेही त्यांचे एक ऐतिहासात कायम नोंद करण्याजोगे कार्य झाले. शाहुराजांच्या या कार्याला कोल्हापूरबाहेर फारसा प्रतिसाद मिळू शकला नाही, याचा दोष इतरांनी स्वीकारला पाहिजे; शाहुराजांना जेवढे प्रयत्न करणे शक्य होते तेवढे केले यात शंका नाही.

शाहुराजांच्या या द्विविध कार्यामुळेच पुढे जेधे–जवळकर आणि आंबेडकर यांच्या कार्याची पूर्वतयारी आणि पायाभरणी झाली, ही गोष्ट आज मोकळ्या मनाने मान्य केली पाहिजे.

शाहुमहाराजांचा वारसा म्हणून जर काही सांगावयाचा असेल तर तो हा सांगावा. हा वारसा पुढे नेण्याची दिशा कोणती असा प्रश्न विचारला, तर त्याचे उत्तर शाहुराजांनी मुंबईच्या कामगारांपुढे केलेल्या भाषणांतून मिळू शकेल. झारशाहीचा व कैसरशाहीचा अंत, शेटजी म्हणजे भांडवलदार ही गोष्ट स्पष्ट करून वर्गसंघर्षाचा पुरस्कार–हीच ती दिशा होय.



दोन श्रीमान योगी : शाहु छत्रपती आणि सयाजीरावमहाराज

छत्रपती शाहुमहाराजांबद्दल लिहिल्यानंतर दुसऱ्या एका महाराजाबद्दलही लिहिणे योग्य ठरेल. ते म्हणजे बडोद्याचे महाराज श्री. सयाजीराव गायकवाड यांचेसंबंधी.

अनेकदा या दोन महाराजांचे नाव एकत्र घेतले जाते; आणि प्रसंगी त्यांची तुलनाही केली जाते. दोघांचेही अभिमानी आणि आश्रित पुष्कळच होते; आणि त्यामुळे त्यांच्या तुलनेमध्ये अपरिहार्यपणे थोडा अभिमानाचा, थोडा तर-तम भाव दाखविण्याचा प्रकारही घडलेला आहे. कित्येकदा काही विद्वानांनी आणि राजकीय–सामाजिक कार्यकर्त्यांनी आपली अनेकविध वैरे उगवून घेण्यासाठी या दोन महाराजांच्या नावांचा व कार्याचा उपयोग केलेलाही आढळून येतो ! या प्रकारामुळे खरे म्हणजे शाहु आणि सयाजीमहाराज या दोघांनाही आणि त्यांच्या कार्यकर्तृत्वालाही

प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे अन्यायच झालेला आहे. या दोघांच्या कार्यामध्ये जो फरक दिसून येतो, त्याचे मुख्य कारण त्यांच्या वैयक्तिक स्वभाव-वैशिष्ट्यांमध्ये व कार्यकौशल्यांमध्ये शोधण्यापेक्षा त्यांच्या वेगवेगळ्या संस्थानांतील परंपरा, परिस्थिती, त्यामुळे झालेली अनुकूल-प्रतिकूल परिणाम, यांच्यामध्ये खरे म्हणजे शोधले पाहिजे.

सयाजीमहाराज-तुटेपर्यंत न ताणणारा सुधारक राजा !

सामाजिक कार्याच्या दृष्टीने पाहिले तर दोघेही सुधारक होते आणि दोघांनीही आपल्या राजसत्तेचा आणि संस्थानी इभ्रतीचा आणि साधन-संपत्तीचा उपयोग सुधारणांना चालना देण्याच्या कामी सतत आणि कसोशीने केलेला दिसतो.

शाहुमहाराजांनी सुधारणाविषयक जेवढे कायदे केले (म्हणजे बालविवाह, विधवा विवाह, आंतरजातीय विवाह, नागरी रजिस्टर विवाह, वगैरे) ते सर्व आणि त्याहूनही काही अधिकच घटस्फोटाच्या हक्कासारखे कायदे सयाजीरावांनीही केले. त्याचप्रमाणे बहुजनसमाजाच्या शिक्षणाला उत्तेजन देण्यासाठी त्यांनी सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरू केले. त्यांच्या माध्यमिक आणि उच्च शिक्षणालाही त्यांना सतत सक्रीय मदत केली. शिक्षणाला स्वावलंबन व श्रमाची जोड देण्याचे प्रयोगही त्यांनी केले. अस्पृश्य व मागास जमातीचे शिक्षण व इतर सवलती याबाबतही सयाजीरावांचे कार्य अत्यंत भरीव आणि विविध स्वरुपांचे आहे. स्त्रीशिक्षण आणि स्त्रियांना विविध सार्वजनिक आणि सामाजिक-सांस्कृतिक कार्यात सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीनेही सयाजीरावमहाराजांनी केलेले कार्य तर विशेषच उल्लेखनीय समजले पाहिजे.

शाहुराजांप्रमाणेच सयाजीमहाराज स्वतः विद्येचे आणि संस्कृतीचे बहुश्रुत भोक्ते आणि वृत्तीचे रसिक होते. त्यामुळे विविध क्षेत्रांतील विद्वान आणि कलावंत यांना आणि त्यांच्या अनेक उपक्रमांना आणि संस्थांना त्यांचा सदैव उदार आश्रय असे.

याशिवाय एक पुरोगामी आणि प्रजाहितदक्ष राज्यकर्ता म्हणून त्यांनी अनेक उपक्रम सुरू करून बडोदे संस्थानाला आधुनिक युगात आणण्याच्या दृष्टीनेही त्यांनी सतत प्रयत्न केले. याही बाबतीत त्यांचे शाहुराजांच्या कार्याशी साम्य दाखविता येईल.

—आणि इतके सर्व करीत असता त्यांनी सहसा तुटेपर्यंत ताणण्याइतपत पाळी कधी येऊ दिली नाही. शाहुमहाराजांच्या कारकीर्दीत सतत व पदोपदी जो संघर्ष आणि जे वादळ दिसते तसे सयाजीराजांच्या बाबतीत जवळजवळ अजिबात दिसतच नाही. त्यांनी केले ते विचारपूर्वक आणि धोरण म्हणून ठरवूनच केले आणि ते सतत चिकाटीने, निर्धाराने पण तितक्याच संयमाने आणि जरूर तेवढ्या सौजन्याने, सौम्यतेने, आर्जवाने केले.

अर्थात् याही दृष्टीने त्यांना काही गोष्टी विशेष अनुकूल होत्या यांत शंका नाही. पहिली गोष्ट म्हणजे ते महाराष्ट्रात नव्हते; पण महाराष्ट्राच्या जवळ होते. खुद्द महाराष्ट्रात नसल्यामुळे ते महाराष्ट्रातील प्रत्यक्ष राजकीय–सामाजिक संघर्षापासून अलिप्त राहू शकले; पण महाराष्ट्राच्या जवळ असल्यामुळे, त्यांना मान्य असलेल्या चळवळींना, उपक्रमांना आणि नेत्यांना-कार्यकर्त्यांना ते विविध प्रकारे भरीव साहाय्यही करू शकले. शिवाय बडोदे संस्थान हे नसर्गिक अनुकूलता आणि साधन-सामुग्रीच्या दृष्टीने अधिक समृद्ध होते. त्यामुळे विविध उपक्रमांना आणि सुधारणांना मिळणारा त्यांचा पाठिंबाही अधिक समृद्ध आणि भरीव होऊ शकला. शिवाय त्यांचा वैयक्तिक स्वभाव हा अधिक सौम्य, मनमिळाऊ, आणि माणसे जोडणारा होता. समृद्ध संस्थानिकांच्या विधायक कार्य-कर्तृत्वाला येण्याच्या दृष्टीने ही गोष्ट काही प्रमाणात तरी महत्त्वाची ठरली. सुदैवाने सयाजीमहाराज दीर्घायुषी ठरले आणि त्यांना प्रिय असलेल्या सर्वांगीण सुधारणेचे कार्य दीर्घ काळपर्यंत सुसूत्र योजकतेने पार पाडू शकले.

या दृष्टीने कोल्हापूरकडे पाहिले तर शाहुमहाराजांना प्रतिकूल अशा काही गोष्टी नजरेस येतात. कोल्हापूर संस्थान मागासलेले, नैसर्गिक साधनसंपत्ती तुटपुंजी, महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक जीवनातील त्यांचे स्थान सदैव एका प्रतिस्पर्धी केंद्राचे–अगदी पेशवाईच्या प्रारंभापासून तो आजतागायत—शिवाय खुद्द शिव-छत्रपतींचा वारसा, तोही पेशवाईच्या काळापासून दोनशे वर्षे टिकलेला–टिकविलेला. त्यामुळे कोल्हापूर हे सतत संघर्षाचा एक केंद्रबिंदू ठरणे परंपराप्राप्त आणि अपरिहार्य होते आणि त्यातही महाराजांनी स्वीकारलेल्या सुधारकी भूमिका आणि त्याही आपल्या जन्मजात जिद्दीने पुढे रेटलेल्या. शिवाय शाहुमहाराजांचा संघर्ष आला तो त्यांच्याच इतक्या जिद्दी आणि उग्रप्रकृती टिळकांबरोबर ! या सर्व कारणांमुळे शाहुमहाराजांचे सर्व सुधारकी उपक्रम वादळी आणि वादग्रस्त ठरले; उलट तेच उपक्रम (दूर गुजराथमध्ये बडोदे संस्थानधिपति) श्री. सयाजीमहाराजांनी पुढे रेटले, तेव्हा ते दुरून तरी स्वागतार्ह ठरले ! त्यांचे महाराष्ट्रात खुद्द पुण्यामध्ये–फार काय केसरीकडूनसुद्धा वेळोवेळी कौतुकच झाले ! म्हणजे सुधारणा तीच; पण ती शाहुमहाराजांनी कोल्हापुरात केली, तर ती वादग्रस्त ठरते; पण सयाजीरावांनी तीच सुधारणा बडोद्यात केली तर ती पुण्यामध्येसुद्धा कौतुकास्पद ठरते, अशी चमत्कारिक गंमत कधी कधी दिसून येई !

दोन वेदोक्त प्रकरणे : बडोदा आणि कोल्हापूर !

ज्या वेदोक्त प्रकरणामुळे शाहुमहाराज आणि टिळक यांमधील वाद एवढा माजला व जन्मभर चिघळत राहिला, अगदी तेच वेदोक्त अधिकाराचे प्रकरण कोल्हापूरपूर्वी काही वर्षे खुद्द सयाजीमहाराजासंबंधीच बडोद्यात उपस्थित झाले होते,


त्यावेळीही 'केसरी'ने वेदोक्त संस्काराच्या सयाजीकृत आग्रहाबाबत तीव्र आक्षेप घेतला होता, टीका केली होती. सयाजीमहाराजांनीही ठाम भूमिका घेतली होती आणि वेदोक्त संस्कारांबद्दलचा आपला आग्रह अखेर खरा करून दाखविला होता, आणि 'केसरी'ला नंतर गप्प बसावे लागले होते ! एकच वेदोक्त संस्काराचे प्रकरण–पण त्याची सयाजीकृत बडोदा आवृत्ती आणि शाहुकृत कोल्हापूर आवृत्ती–यांमध्ये किती फरक पडला ! सयाजीरावांची संयमशील, सौजन्यशील सौम्य प्रकृती आणि शाहुराजांची आक्रमक उग्रप्रकृती यामुळेच हा फरक पडला असे म्हणणारे खरोखर शाहुमहाराजांवर अन्याय करीत आहेत, असेच म्हटले पाहिजे. बडोदे हे महाराष्ट्राबाहेर होते. तेथील संबंधित प्रजा मुख्यतः गुजराथी होती. तेथे महाराष्ट्रातील राजकीय किंवा जाति-विषयक वाद नव्हते. उलट कोल्हापूर हे महाराष्ट्रात होते; दोनशे वर्षांपासूनचे पुण्याला–(व तेथील ब्राह्मणी वर्चस्वाला) प्रतिस्पर्धी असे एक सत्तेचे आणि सामाजिक-सांस्कृतिक चळवळीचे केंद्र होते, या मुख्य कारणामुळे हा फरक खरोखर पडलेला दिसतो. या मूळ फरकाच्या जोडीला इतर काही राजकीय कारणेही होती; आणि त्यामुळेही हा फरक अधिकच उठून दिसण्यास मदत झाली, हेही खरेच आहे. उदा. शाहुमहाराज हे वेदोक्त प्रकरणानंतर तरी पुढे अखेरपर्यंत टिळकांच्या राजकारणाचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष विरोधक म्हणूनच निदान लोकांसमोर आले. यामध्ये वास्तव परिस्थिती काय होती, यापेक्षाही दोघांचे अभिमानी व अनुयायी एकमेकांना काय समजत होते, हेच अधिक निर्णायक ठरले ! उलट सयाजीराजांची राष्ट्रीय चळवळीला सहानुभूती आहे, असाच समज होत गेला व तो अखेरपर्यंत पक्का होत राहिला. अगदी थेट टिळक–अरविंद यांच्या युतीच्या काळापासून (१९०५-८) तो तहत अखेरपर्यंत हा समज लोकमानसांत दृढमूल झाला होता. सयाजीराजांनी राष्ट्रीय चळवळीलाच नव्हे तर दहशतवादी क्रांतिकारकांनासुद्धा आश्रय दिला होता; दिल्ली दरबारप्रसंगी त्यांनी जाणूनबुजूनच बादशहांचा अपमान केला आणि आपला स्वाभिमान दाखविला इत्यादी कथांनी जनमानसाची पक्की पकड घेतली होती. शिवाय सयाजीराजांचा उदार आश्रय लाभलेले अनेक विद्वान, कलावंत आणि समाजसेवकही महाराजांचे गुणगान करण्यात सदैव तत्पर होतेच. बडोदे येथे साहित्य संमेलनाच्या निमित्ताने केसरीकार श्री. तात्यासाहेब केळकर यांचा जाहीर गुणगौरव करण्यात स्वतः सयाजीमहाराजांनी पुढाकार घेतला, या गोष्टीलाही तत्कालीन संदर्भात अवास्तव महत्त्व आले. उलट, केसरीकार म्हणूनच नव्हे तर 'साहित्य सम्राट' म्हणूनही केळकरांना कोल्हापूर कायम बंदच होते ! (जन्मात एकदाच राजाराम कॉलेजचे माजी विद्यार्थी आणि साहित्यिक म्हणून शाहुराजांच्या निधनानंतर अनेक वर्षांनी केळकरांनी कोल्हापुरात पाऊल टाकले, तरी त्यांचे स्वागत अंडी-टोमॅटोंनीच होऊ शकले !)

या सर्व इतिहासाची आज ५०-७५ वर्षांनंतर आठवण झाली की गंमत

वाटते–चमत्कारही वाटतो. सुधारणेच्या आणि सुधारकांच्या वाटचालीत वेगवेगळ्या परिस्थितीत वेगवेगळ्या राजकीय–सामाजिक संदर्भात किती वेगवेगळे अनुभव येऊ शकतात, याची दोन नमुनेदार प्रात्यक्षिके सयाजीमहाराज आणि शाहुमहाराज यांच्या निमित्ताने इतिहासात नमूद झाली आहेत.

× × ×

राष्ट्रीय चळवळीतील ब्राह्मणी वर्चस्वाच्या काळात सयाजीमहाराज आणि शाहु-छत्रपती यांच्या दोन वेगवेगळ्या प्रतिमा जरी महाराष्ट्रापुढे आल्या, तरी स्वातंत्र्य-लढ्याच्या उत्तरार्धात, राजकारणावर भांडवलदारी वर्चस्व प्रत्यक्षपणे आणि पक्के प्रस्थापित झाल्यावर आणि वल्लभभाईंचा सत्तागट अधिकारारूढ झाल्यानंतर सयाजीराजांचे बडोदे आणि शाहु-छत्रपतींचे कोल्हापूर या दोहोंवरही वल्लभभाईंची वक्रदृष्टी एकाच वेळी आणि सारख्याच क्रोधाने वळली आणि बघता बघता दोन्ही संस्थानांची त्यात आहुतीही पडली ! उदयोन्मुख-सत्तासन्मुख भांडवलदारी राजवटीने दोघांचाही ग्रास एकच वेळी घेतला ! तरी सयाजीराजे आणि शाहु-महाराज यांचे काही अभिमानी अजूनही ५०-७५ वर्षांपूर्वीचे वाद जुन्याच हिरीरीने व अभिनिवेशाने लढताना पाहिले म्हणजे गंमत तर वाटतेच; पण त्याहीपेक्षा विषाद अधिक !



प्रकरण ३ रे

जेधे-जवळकरांची ऐतिहासिक बंडखोरी !

फुले यांच्या विचारधनांपासून स्फुर्ती घेऊन आणि त्यांच्या नावाने चाललेल्या सत्यशोधक आणि ब्राह्मणेतर आंदोलनांत अनेक वर्षे भाग घेतल्यानंतर अनेक प्रामाणिक तरुण कार्यकर्त्यांपुढे वैचारिक आणि प्रत्यक्ष व्यवहारातील यक्षप्रश्न वेळोवेळी उभे राहिले व ते त्यांची उत्तरे शोधीत राहिले.

फुल्यांच्या शिकवणीचा मूळ गाभा ज्यांनी आत्मसात केला होता, तिचे ऐन मर्म ज्यांच्या अंतःकरणाला जाऊन भिडले होते, आणि त्यांच्याशी इमान राखण्याची इमानदारी व जिद्द ज्यांच्यामध्ये होती, अशा काहींनी त्यावेळी तयार झालेल्या चाकोरीच्या बाहेर जाण्याचाही प्रयत्न वेळोवेळी केला. खऱ्या सत्यशोधकांच्या सत्यशोधनाच्या मार्गावरील ही नवी वाटचाल होती. अशी वाटचाल करताना त्यांना प्रस्थापित पुढारीपणाविरुद्ध–त्यांच्या प्रस्थापित हितसंबंधांविरुद्धही भूमिका घेणे भाग पडले आणि अशा प्रयत्नांमधूनच फुल्यांच्या शिकवणीचा अंगार जिवंत राहिला !

जेधे-जवळकर या दोन तरुणांनी हे कार्य शाहु-छत्रपतीनंतरच्या दशकांमध्ये केले आणि काही मर्यादित प्रमाणात तडीसही नेले.

सत्यशोधक आंदोलनांतील इष्ट आणि अनिष्ट

शाहुछत्रपतींच्या काळात आणि नंतरही सत्यशोधक आणि विशेषतः ब्राह्मणेतर या नावाने चाललेल्या चळवळींत, इष्ट आणि अनिष्ट अशा गोष्टींची विलक्षण सरमिसळ झालेली होती. भिक्षुकशाहीविरुद्ध–ब्राह्मणांच्या वर्णवर्चस्ववादी पुढारीपणाविरुद्ध–त्यांच्या शिक्षण आणि शासन क्षेत्रांतील मक्तेदारीविरुद्ध लढा उभारून तो

खेडोपाडी बहुजनसमाजापर्यंत प्रभावीपणे पोचविणे, ही या लढ्यामधील जमेची बाजू होती. जेधे–जवळकरांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी या कार्यात अर्थातच धडाडीने पुढाकार घेतला. पण या कार्याला जोडूनच काही अनिष्ट गोष्टीही या विशाल जन-आंदोलनांत शिरल्या होत्या; आणि त्यांचा फुल्यांच्या शिकवणीशी व सत्यशोधक समाजाशी, मूळ प्रेरणांशी काडीमात्र संबंध नव्हता. किंबहुना फुल्यांच्या शिकवणीच्या व मूळ प्रेरणेच्या त्या सर्वस्वी विरुद्धच होत्या.

या आंदोलनाला केवळ ब्राह्मणद्वेषाचे स्वरूप देण्याचा काही पुढारीगटांचा प्रयत्न फुल्यांच्या शिकवणीशी आणि त्यांनी घालून दिलेल्या वागणुकीच्या आदर्शांशी विसंगत होते. त्याहूनही वाईट गोष्ट म्हणजे या आंदोलनामध्ये नवे उच्चवर्णीय–उच्च जातीय पुढारीपण व त्यांचा हितसंबंध प्रस्थापित करण्याचे प्रयत्न काही वरिष्ठ आणि प्रतिष्ठित उच्चवर्णीय पुढारीगटांकडून पद्धतशीरपणे झाले. उच्चवर्णीय क्षात्रकुलोत्पन्नतेची प्रौढी, जमीनदारी–सावकारी–व्यापारी हितसंबंधांची तरफदारी, दिवाण-बहादूर, रावबहादूर, रावसाहेब अशा पदव्यांना बहुजनसमाजात प्रतिष्ठा मिळवून देण्याचे प्रयत्न, बहुजनसमाजाचे आंदोलन सरकारमान्य किंवा सरकारजमा राजकारणासाठी वापरण्याचे राजकीय डावपेच, मुंबई–महाराष्ट्रातील मवाळ सरकारजमा राजकारणाशी संबंध जोडून गांधी–नेहरूंच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय जनता आंदोलनाला विरोध, इत्यादी अनिष्ट गोष्टींना पायबंद घालण्याची गरज उत्पन्न झाली होती. शिवाय, याच्याही खाली जाऊन मूठभर पुढाऱ्यांच्या दिवाणगिऱ्या, कौन्सिलांतील जागा, लोकल बोर्डांतील मिरासदाऱ्यांसाठी सत्यशोधक आंदोलनाचा उपयोग करण्यात येत होता.

जेधे-जवळकरांची कामगिरी

या सर्व प्रकारांविरुद्ध आवाज उठविणे, कार्यकर्त्यांना जागृत करणे ही तेव्हा सोपी गोष्ट नव्हती. जेधे–जवळकर व त्यांच्या निकटवर्ती सहकाऱ्यांनी ते काम अत्यंत हिंमतीने आणि चिकाटीने केले. आणि ते किती प्रभावी ठरले, यांची प्रचिती १९३०–३२ च्या आंदोलनामध्ये प्रकर्षाने आली. महाराष्ट्रात आणि बऱ्याच प्रमाणात विदर्भामध्येही बहुजनसमाज ३०-३२ च्या राष्ट्रीय उठावात सामील झाला, याचे महत्त्वाचे श्रेय जेधे–जवळकर यांच्या तडफदार तरुण पुढारीपणापणाला आहे, यात शंका नाही. अर्थातच खुद्द गांधी–नेहरूंच्या पुढारीपणाने देशातील एकूण जन-मानसाची पकड घेतलेली होती; महाराष्ट्रातील कोत्या दृष्टीच्या ब्राह्मण पुढारीपणाची दिवाळखोरी १९२० ते ३० च्या दशकात अगोदर साफ उघड झालेली होती. शिवाय युद्धोत्तर काळातील जनतेची आर्थिक हालाखी, आणि त्याच्या जोडीने झालेली अपूर्व राजकीय जागृती या सर्व गोष्टींमुळे जेधे-जवळकर यांच्या कार्याला अनुकूल पार्श्वभूमी उत्पन्न झालेली होती. पण तरीसुद्धा सत्यशोधक-ब्राह्मणेतर चळवळींच्या लब्ध-प्रतिष्ठित

जड बुडाच्या पुढाऱ्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना आणि बहुजनसमाजाला जनता-आंदोलनापासून दूर ठेवण्याचे पद्धतशीर प्रयत्न केले–त्या कामी सरकारी यंत्रणेचा आणि मवाळ राजकीय गटांचा उपयोग केला, हीही गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे. या प्रयत्नांवर मात करून जनतेला व्यापक राष्ट्रीय आंदोलनात सामील करून घेण्याची कामगिरी जेधे–जवळकरांनी केली, ही इतिहासातील एका महत्त्वाच्या घटनेची वस्तुनिष्ठ नोंद आहे.

राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या आंदोलनाशी महाराष्ट्रातील बहुजनसमाज आतापर्यंत पुरेसा समरस झाला नव्हता, तो आता प्रथमच झाला; त्यामुळे त्या आंदोलनावर आतून छाप पाडण्याची संधी प्रथमच निर्माण झाली. राष्ट्रीय चळवळीचे १९२० पर्यंतचे ब्राह्मणवर्चस्वाखालील पुढारीपण, त्याचप्रमाणे ग्रामीण बहुजनसमाजावरील उपरोक्त उच्चवर्गीय संधिसाधू ब्राह्मणेतर पुढारीपणाची पकड या दोन्ही गोष्टींमुळे महाराष्ट्रातील एकूण वातावरणच कोंदलेले होते; त्यांत एक विकृती, एक सामाजिक–राजकीय कोंडी उत्पन्न झाली होती. ही कोंडी फोडण्याची ऐतिहासिक संधी १९३०–३२ नंतर प्रथमच उपलब्ध होत होती.

जेधे-गाडगीळ : नवे समीकरण––

जेधे-जवळकरांच्या या ऐतिहासिक बंडखोरीलाही काही मर्यादा पडल्या होत्या; तीमध्येही काही इष्ट आणि काही अनिष्टही होतेच. १९३०-३४ च्या स्वातंत्र्य-संग्रामात बहुजनसमाजाला सामावून घेण्याच्या प्रयत्नांत महाराष्ट्र काँग्रेसमधील एका पुढारी गटाने काही प्रमाणात साथ दिली. त्यातूनच जेधे-गाडगीळ हे एक नवीन समीकरण-संयुक्त पुढारीपणाचा एक नवा नमुना निर्माण झाला. काका गाडगीळ हे मूळचे केसरी-गटांतले; पण त्यांच्या चौकटीत फार काळ न टिकू शकलेले; गांधी–नेहरू युगाची चाहूल लागलेले; युवकवर्गाशी इतरांच्या मानाने त्यांची जवळिक होती. तेव्हा समाजवादाचे ऐसपैस नाव घेणारे, जहाल म्हणून ओळखले जाणारे एक उदयोन्मुख काँग्रेस-पुढारी म्हणून ते प्रथम पुढे आले. सत्यशोधक चळवळीच्या प्रेरणांशी आणि बहुजनसमाजाच्या आकांक्षांशी संबंध जोडण्याची इष्टता त्यांना जाणवली आणि त्यांनी जेधे यांच्या पुढारी गटांशी काही प्रमाणात तरी सामंजस्य साधण्याचे हेतुपूर्वक प्रयत्न केले. गाडगीळांच्या प्रयत्नांबद्दल देव–देवगिरीकर वगैरे गांधीवादी पुढारी सदैव साशंक असत. त्याचप्रमाणे अगदी ३०–३२ च्या आंदोलनात सामील झालेल्या कित्येक ब्राह्मण पुढाऱ्यांच्या मनातही सत्यशोधकी आंदोलनाबद्दल एक प्रकारचा धसकाच होता–आकससुद्धा होता. तरी सुद्धा जेधे-गाडगीळ पुढारीपणाने एक तत्कालिन ऐतिहासिक गरज भागविली यात शंका नाही. ते संयुक्त पुढारीपण गाजले खरे; पण त्याचा वैचारिक पाया शास्त्रशुद्ध नव्हता; त्याचप्रमाणे त्याच्या प्रचारात व आचारातही अंगभूत दोष राहिलेच होते. शिवाय,

बदलत्या परिस्थितीचे आव्हान स्वीकारण्यास हे पुढारीपण सर्वथैव उणे-अपुरेच होते. पुढील काही वर्षांतच या गोष्टीचा स्पष्ट अंदाज आला. विशेषतः १९३७ मध्ये काँग्रेसने ब्रिटिश राजवटीच्या चौकटीमध्येच मर्यादित सत्ता-स्वीकार केल्यानंतर जे नवे प्रश्न पुढारीपणापुढे, त्याचप्रमाणे जनतेपुढे उभे राहिले, त्यांची उत्तरे देण्यास हे पुढारीपण सर्वथैव तोकडे ठरले! फुल्यांच्या प्रेरणांची फारशी आठवण किंवा टोचणी नव्या सत्तारूढ काँग्रेस पक्षाला जाणवल्याचा पुरावा नाही. जेधे-जवळकर पुढारीपणापासून जेधे-गाडगीळ पुढारीपणापर्यंतच्या वाटाचालीची शोकांत फलश्रुती ही अशी आहे.

नव्या परिस्थितीचे आव्हान !

खरे म्हणजे हा एक अत्यंत महत्त्वाचा व निर्णायक भूमिका घेण्याचा कालखंड होता.

फुल्यांच्या मूलभूत प्रेरणांच्या दृष्टीने विचार करण्याची कुवत आणि आचार करण्याची हिंमत असणारे नवे बहुजनसमाजाचे पुढारीपण निर्माण करणे, ही त्या काळाची ऐतिहासिक गरज होती. त्याला अनुकूल अशी भौतिक परिस्थिती तेव्हा होती; ग्रामीण (व शहरी) बहुजनसमाज एका नव्या जागृतीने, आकांक्षेने, अपेक्षेने भारला गेला होता. अर्थातच सत्ताकांक्षी वरिष्ठवर्गीय पुढारीपणाशी प्रखर मुकाबला करूनच फुल्यांच्या प्रेरणांशी आणि शूद्र-अतिशुद्रांच्या आकांक्षांशी इमानदारी राखणे तेव्हा शक्य होते. काँग्रेसमध्ये गांधींच्या पवित्र छत्राखाली, नेहरूंच्या पुरोगामी नावाने पण, प्रत्यक्षात वल्लभभाईंच्या भांडवलदारी जनताविरोधी हुकमतीखाली नवीनच सत्तावादी पुढारीपण काँग्रेसचा अलगद कबजा घेत होते!

गांधी-नेहरूंना असलेला जनतेचा पाठिंबा आणि नुकतीच आवाक्यात आलेली सत्ता, यामुळे या पुढारीपणाला सत्तेचा कैफ चढायला वेळ लागला नाही! राष्ट्रीय चळवळीचा वापर मूठभर उच्चवर्णीय आणि उच्चवर्गीय जमीनदार, सावकार, भांडवली-व्यापारी गटांच्या हितासाठी करण्याचे सर्वंकष धोरण वल्लभभाईंच्या नेतृत्वाखालील राजवटीत झपाट्याने आकार घेऊ लागले होते. या धोरणामुळे सर्वसामान्य जनतेविरुद्ध काँग्रेस सरकार अशी परिस्थिती, ग्रामीण त्याचप्रमाणे शहरी जीवनात हळूहळू पण निश्चितपणे उत्पन्न होऊ लागली होती. शहरी कामगारवर्ग त्याचप्रमाणे ग्रामीण जनतेचा मध्यम आणि कनिष्ठ विभाग—थोडक्यात म्हणजे शूद्र-अतिशूद्र विभाग त्यात गोवले जाऊ लागले. हा लढा केवळ राजकीय नव्हता; तर आर्थिक-सामाजिकही होता. किंबहुना, सोज्ज्वळ राष्ट्रीय स्वातंत्र्यलढ्याला एक अपरिहार्य आर्थिक-सामाजिक बाजू आहे, आणि तीच अधिकाधिक प्रमाणात निर्णायक ठरत आहे, या पुढेही जास्तच ठरणार आहे, याची पहिली स्पष्ट चिन्हे याच काळात दिसू लागली होती. स्वातंत्र्यलढा तर आहेच; पण त्याच्या पोटात आर्थिक-सामाजिक

लढ्याची–वर्गीय लढ्याची प्रचंड खळबळ माजली आहे, ती वाढतच जाणार आहे. या नव्या वस्तुस्थितीचे आव्हान कसे स्वीकारावयाचे हा रोकडा सवाल इतिहासाने आताच स्पष्टपणे उभा केला होता.

फुल्यांच्या प्रेरणा–नव्या परिस्थितीच्या गरजा !

खरे म्हणजे या वेळी फुल्यांच्या प्रेरणांच्या आणि शुद्रातिशुद्रांच्या सामाजिक–आर्थिक–राजकीय आकांक्षांच्या प्रकाशात या प्रश्नांची उत्तरे शोधणारे नवे सत्य-शोधक तेव्हा निर्माण व्हायला हवे होते. फुल्यांच्या मूळ प्रेरणांशी आणि शिकवणीशी सुसंगत पण ५०-७५ वर्षांनंतरच्या काळाचे आव्हान स्वीकारू शकणाऱ्या नव्या सर्वंकष फुलेवादाची जुळणी व उभारणी करण्याची कुवत व हिंमत बाळगणारे पुढारीपण निर्माण होण्याची नितांत गरज उत्पन्न झाली होती.

वल्लभभाईंचा भांडवलदारी–जमीनदारी–सावकारी सत्तारूढ गट आणि त्यांच्या हुकमतीखाली चालणारे सरकार यांना जेथे–पुढारीपण फक्त एकाच कामासाठी हवे होते; ते म्हणजे महाराष्ट्रातील बहुजनसमाजाला अंकित ठेवण्यासाठी ! उलट, बहुजनसमाजाचे–शुद्रातिशुद्रांचे हितसंबंध राखावयाचे तर त्यासाठी काँग्रेसच्या उच्चवर्गीय पुढारीपणाविरुद्ध कणखर संघर्ष उभारण्यावाचून इलाज नव्हता. १९३४–४० या महत्त्वाच्या कालखंडात राजकीय क्षेत्रात त्याचप्रमाणे फुल्यांचे नाव सांगणाऱ्या बहुजनसमाजात–त्यांतून आलेल्या पुढारीगटात–कार्यकर्त्यांत हे प्रश्न निर्माण झाले.

हेच प्रश्न फुल्यांच्या अनुयायांव्यतिरिक्त इतर गटांपुढेही अपरिहार्यपणे उत्पन्न झाले होते. त्यापैकी काही समाजवाद्यांसारखे काँग्रेसमध्येच होते; काही कम्युनिस्टांप्रमाणे काँग्रेसच्या आत आणि बाहेरही होते. तर आंबेडकरांसारखे काही काँग्रेसच्या बाहेरच नव्हे तर प्रखर विरोधातही होते. प्रचंड मुस्लिम समाज तर गांधींच्या अहंकारी आणि वल्लभभाईंच्या पुढारीपणाच्या मक्तेदारीच्या धुंदीमुळे सर्वच राष्ट्रीय पुरोगामी पक्षांच्या बाहेर फेकला गेला. केसरी गटातील जुन्या ब्राह्मण पुढारी गटांनी, कात टाकून सावरकरांच्या नेतृत्वाखाली हिंदु महासभा आणि डॉ. हेडगेवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची उभारणी चालविली होती ! महाराष्ट्राचे चित्र हे असे होते.

७ नोव्हेंबर १९३८–मुंबईचा निषेध-संप

सत्तारूढ वरीष्ठवर्गीय काँग्रेस पुढारीपणाविरुद्ध श्रमिकवर्गाच्या लढ्याला तोंड लागल्याचे व त्याकामी आवश्यक ती एकजूट होऊ शकण्याचे एक स्फूर्तिदायक दृश्य ७ नोव्हेंबर १९३८ रोजी मुंबईच्या विराट सार्वत्रिक संपाने (आणि त्यात कामी आलेल्या दोन कामगार हुतात्म्यांच्या रक्ताने) दाखविले होते !

७ नोव्हेंबर १९३८ चा संपबंदीच्या काळया कायद्याविरुद्ध सार्वत्रिक निषेध संप म्हणजे सत्तारूढ भांडवलदारी पुढारीपणाविरुद्ध प्रतिस्पर्धी कामगारवर्गीय लढाऊ पुढारीपण यांच्या आगामी अपरिहार्य संघर्षातील एक आघाडीवरील चकमक होती. गांधीजींच्या भांडवलधार्जिण्या 'विश्वस्त'वादी कल्पना. संपबंदीच्या रूपाने वर्गलढावादी कामगारवर्गावर कायद्याच्या जबरदस्तीने लादण्याचा हा पहिला प्रयत्न होता. वर्गविग्रहाचे राजकारण आणि अर्थकारण ग्रामीण भागात पसरण्यापूर्वीच आणि वर्गलढ्याच्या झंझावातामध्ये ग्रामीण बहुजनसमाज झपाटला जाण्यापूर्वीच कामगार-वर्गीय पुढारीपण, वर्गसंघटना आणि त्यांचे संपाचे प्रभावी हत्यार नष्ट करण्याचा हा प्रयत्न होता. म्हणूनच कम्युनिस्ट नेतृत्वाखालील कामगारवर्गाने हे आव्हान स्वीकारले; आंबेडकरांनीही इतर मतभेद बाजूस ठेवून, कम्युनिस्टांना साथ दिली आणि त्यांतून ७ नोव्हेंबरचा ऐतिहासिक निषेध-संप यशस्वी झाला. त्या संपात झालेल्या दोन हुतात्म्यांपैकी एक भागोजी वाघमारे–अस्पृश्य कामगार होता, हीही गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे.

या संपाबद्दल जेधे–गाडगीळ पुढारीपणाने काय भूमिका घेतली ? फार काय, काँग्रेसच्या एकूण भांडवलदारी-जमीनदारी धोरणाविरुद्ध त्यांची काय भूमिका होती ? अंतर्गत का होईना, त्यांनी झगडा केला ? हे प्रश्न वर्गलढ्याच्याच नव्हे तर फुले परंपरेच्या दृष्टीने–फुले प्रेरणांना अद्ययावत् स्वरूप देण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे होते. गाडगीळांबद्दल फारसे बोलण्याची गरज नाही व त्यांच्याकडून फारशी अपेक्षाही बाळगण्याचे बहुजनसमाजाला कारण नव्हते. (काकांनी तेव्हाच म्हणजे १९३४ मध्ये जे वल्लभभाईंचे पुढारीपण बिनशर्त स्वीकारले ते इमानदारीने मरेपर्यंत पाळले ! म्हणजे वल्लभभाई मरेपर्यंतच नव्हे तर नंतरही ! वल्लभभाईंच्या भांडवलदारी जनताविरोधी हुकूमशाही धोरणाचीच काका गाडगीळांनी जन्मभर साथ केली; एवढेच नव्हे तर फाळणीच्या अगोदर व नंतर वल्लभभाईंनी जी मुस्लीमविरोधी हिंदुत्ववादी–एक प्रकारे गोळवलकरी–सावरकरी भूमिका घेतली होती, तिचेही हिरीरीने समर्थन करून काकांनी गांधी-नेहरूंना सुद्धा विरोध केला होता. म. गांधींचा खून व नंतरच्या घटना, जनसंघाचा उदय वगैरेंमुळे सुद्धा काकांची भूमिका बदलली नाही ! खरे म्हणजे वल्लभभाई भावी सिंडिकेट काँग्रेसचे खरे संस्थापक होते–स्वतंत्र पक्षाचे स्फूर्तिदाते आणि संघ-जनसंघाचे आश्रयदाते होते ! आणि काका गाडगीळ त्यांचे इमानी हस्तक होते ! पण हा सारा पुढील इतिहास.)

जेध्यांनी हुकविलेली ऐतिहासिक संधी !

पण जेध्यांजे काय ! जो लढा पुढे दहा-बारा वर्षांनी (म्हणजे १९४८ मध्ये) करणे जेधे-मोऱ्यांना भागच पडले, तो लढा खरोखर १९३६–४० मध्येच करणे अत्यावश्यक होते. तो लढा करावयाला जेधे तेव्हा पुढे येऊ शकले नाहीत, हीही इतिहासातील आणखी एक शोकांत नोंद आहे !

जे ४८ साली घडले ते अगदी १९३८ साली घडले असते तर महाराष्ट्राचा इतिहास अगदी वेगळाच झाला असता ! केवळ राजकीय दृष्ट्याच नव्हे तर फुले संप्रदायाच्या दृष्टीने, वर्गलढ्याच्या दृष्टीने, सामाजिक-आर्थिक समतेच्या लढ्याच्या दृष्टीने १९३४–४० सालात जी संधी हुकली तीमध्येच खरोखर स्वातंत्र्योत्तर काळात आणि नंतर संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतरच्या काळात बहुजनसमाजाच्या नावाने जी धनिक-धार्जिणी भ्रष्ट जनताद्रोही राजवट आली तिचे मूळ शोधल्यास खचित सापडेल !

१९२० ते ३० या दशकात, मूठभर रावसाहेब-रावबहादुरांनी, दिवाणगिरी-साठी-कायदेकौन्सिलातील जागांसाठी व जिल्हा बोर्डातील क्षुद्र सत्तेसाठी जेव्हा फुल्यांच्या नावाचा व सत्यशोधक चळवळीचा दुरुपयोग करण्याचा निंद्य प्रयत्न केला तेव्हा जेधे जवळकरांनी त्यांना यशस्वीपणे हटकले.

पण १९३७ मध्ये प्रांतिक सरकारची सत्ता जेव्हा काँग्रेसच्या हाती आली; आणि सरदार वल्लभभाईमार्फत भांडवलदारी-जमीनदारी पुढारीपणाने ती सत्ता जेव्हा बळकावली, तेव्हाच जेधे-जवळकरांचे दुसरे बंड होण्याची नितांत गरज होती. ते झाले नाही. उलट, काँग्रेसचे व फुल्यांचे नाव व प्रतिष्ठा वरिष्ठवर्गीय सत्ताधाऱ्यांना वापरण्याची संधी मिळाली ! १९४६ नंतर तेच वर्ग त्याच वल्लभभाईंच्याच नेतृत्वाखाली स्वतंत्र भारताची सत्ता बळकावण्यासाठी अधिक निर्धाराने पुढे आले आणि बहुजनसमाजाचा शूद्रातिशूद्रांचा विरोध मोडून काढण्यासाठी निर्घृण दडपशाही करण्याला तयार झाले !

––अर्थात गांधी-नेहरूंच्या नावाने ! पण महाराष्ट्रात अजूनही त्यांना फुल्यांच्या नावाची गरज होती. फार काय, १९६० नंतर संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यानंतरही, पुन्हा एकवार मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचे राज्य भांडवलीवर्गाकडे गहाण टाकणाऱ्या चव्हाण पुढारीपणालाही फुल्यांच्या नावाची गरज होती आणि आजही आहे ! फुल्यांचे नाव, प्रतिष्ठा, परंपरा यांचा उपयोग भांडवली–श्रीमंत शेतकरीवर्गाच्या हितासाठी सर्रास करण्याची संधी या बहुजनसमाजाच्या नावाने सत्तेवर येणाऱ्या संधिसाधु सत्तावाजांना पुन्हा पुन्हा देणार काय, हाच रोकडा प्रश्न प्रत्येक दशकात पुन्हा पुन्हा निर्माण झालेला आहे. प्रथम १९२०–२२, नंतर १९३७, नंतर १९४६ आणि अखेर १९६० मध्ये आणि आता अगदी आजसुद्धा तोच प्रश्न पुन्हा उभा आहे !

नव्या संदर्भात फुले परंपरा जागविण्याचा प्रश्न

खरी गोष्ट अशी आहे की, फुल्यांची मूळ प्रेरणा, शूद्र–अतिशूद्रांशी त्यांचे असलेले धगधगते इमान, सामाजिक त्याचप्रमाणे आर्थिक समता व न्याय यासाठी

त्यांना सतत असलेली तळमळ; या सर्वांचा वारसा घेऊन प्रत्येक कालखंडात, बदलत्या परिस्थितीच्या प्रत्येक संदर्भात, फुल्यांच्या शिकवणीची नवी विधायक जुळणी व मांडणी करणे आवश्यक होते. ते कार्य करण्याची जाणीव ज्यांना झाली, तदनुसार प्रयत्न करण्याची कुवत व हिंमत ज्यांनी ज्या प्रमाणात दाखविली, त्यांनी त्या प्रमाणातच फुल्यांची प्रेरणा-परंपरा खरोखर जागविली, पुढे नेली असे म्हणता येईल.

जेधे–जवळकरांचे कार्य या दृष्टीने महत्त्वाचे आहे. ज्या प्रमाणात त्यांनी ते केले त्याबद्दल त्यांचे ऋण मनमोकळेपणाने मान्य केले पाहिजे. त्याचप्रमाणे ज्या प्रमाणात ते कार्य होऊ शकले नाही, त्या प्रमाणातील त्याच्या मर्यादाही समजून घेतल्या पाहिजेत. हे प्रश्न आजही संपलेले नाहीत; नव्या संदर्भात ते पुन्हा पुन्हा निर्माण होत आहेत.

प्रकरण ४ थे

जवळकर : फुले प्रेरणांचा विकासशील आविष्कार !

आपण आतापर्यंत जेधे–जवळकर असा संयुक्त उल्लेख केला. पण त्यापेक्षा वेगळा उल्लेख करणेही आवश्यक आहे. जेधे–जवळकर असे मिळून दोघेही फुले संप्रदायाचे धडाडीचे तरुण कार्यकर्ते म्हणून १९२०–३० या दशकात बहुजन-समाजापुढे आले आणि झळकले, १९३२ मध्ये जवळकर, तारुण्याच्या व कर्तृत्वाच्या अगदी ऐन उमेदीत मृत्युमुखी पडले ! म्हणून त्यांचे नाव मागेच राहिले आणि पुढे जेधे यांच्यावरच पुढारीपणाची सर्व जबाबदारी पडली. पण जवळकरांच्या कर्तृत्वाच्या लहानशा कालखंडात जेधे–जवळकर या दोघांनी मिळून केलेल्या संयुक्त पुढारीपणाचे व कार्याचे महत्त्व तर आहेच; पण त्याहूनही महत्त्वाचा व प्रायः अज्ञात असा, केवळ जवळकरांच्याच कर्तृत्वाचा एक दैदिप्यमान पैलू आहे. आणि त्यामध्ये जवळकरांचे केवळ कार्यकर्तृत्व व्यक्त झाले एवढेच नव्हे; तर फुल्यांच्या बहुविध प्रेरणांचा व शिकवणीचा, प्राप्त काल-परिस्थितीस अनुरूप असा विकास करण्याची सर्जनशील प्रतिभा त्याकाळी जवळकरांनीच फक्त दाखविली ! जवळकरांनी जेध्यांच्या सहकार्याने केलेल्या प्रत्यक्ष कार्यापेक्षाही, त्यांनी फुलेवादाच्या विकासाची दिशा दाखविण्याचे जे मौलिक–वैचारिक कार्य केले, त्याचे महत्त्व एका दृष्टीने अधिकच आहे. जवळकरांनी जे कार्य प्रत्यक्ष केले त्याचे जेवढे कौतुक वाटते, त्याहीपेक्षा ते जे कार्य करू शकले असते, पण अकाली मृत्यूमुळे जे होऊच शकले नाही–त्याची हळहळ अधिकच वाटते !

एका अर्थाने आगरकरांच्या अकाली मृत्यूची हळहळ जशी साऱ्या सर्वांगीण सुधारकांना सतत वाटत राहील, तशीच ती जवळकरांच्या बाबतीतही बहुजन-

समाजाला सतत वाटली पाहिजे, खरोखर एवढ्या महान दर्जाचे कार्यकर्तृत्व आणि फुले परंपरेच्या ऐतिहासिक विकासाची दिशा सुचविण्याचे प्रतिभाशाली सर्जनकार्य जवळकरांनी केलेले आहे, अशीच इतिहासाची नोंद होईल.

जवळकरांचे अल्पायुषी जीवन म्हणजे एका सदा कर्तव्यसंपन्न, त्याचप्रमाणे सदा विकसनशील-सर्जनशील असे सार्वजनिक जीवन होते. जेध्यांच्या बरोबरीने त्यांनी तरुण सत्यशोधक म्हणून कार्याला प्रारंभ केला. वाणी आणि लेखणी दोघीही त्यांच्यावर सदा प्रसन्न होत्या. फर्डे लेखक आणि पट्टीचे वक्ते म्हणून त्यांना अमाप प्रसिद्धी व लोकप्रियता बहुजनसमाजात अगदी तरुण वयातच लाभली होती. पुण्यात आणि ग्रामीण भागांत झंझावाती प्रचारकार्य केल्यानंतर जवळकरांना मुंबईमध्ये कामगारवर्गात कार्य करण्यासाठी पाठविण्यात आले.

जातवार फूट पाडण्याचा खटाटोप !

मुंबईत कामगारवर्गात काम करण्यासाठी जवळकरांची नियुक्ती करताना तत्कालीन ब्राह्मणेतर पुढारीपणाचा हेतू मुळीच शुद्ध नव्हता ! किंबहुना भांडवलदारी गटांचे अर्क पुढारी, गिरणी मालक आणि ना. जाधवांसारखे उच्च वर्णीय-वर्गीय संधिसाधु ब्राह्मणेतर पुढारी यांमध्ये गुफ्तगू होऊनच ही नियुक्ती झाली होती ! मुंबई सरकारचा आणि मुंबईच्या भांडवलधार्जिण्या मवाळ पुढाऱ्यांचाही या नियुक्तीला संपूर्ण आश्रय लाभला होता. स्पष्टच बोलायचे म्हणजे मुंबईमधील उदयोन्मुख कम्युनिस्ट नेतृत्वाखालील झपाट्याने फोफावणाऱ्या लढाऊ वर्गवादी आंदोलनाला शह देण्यासाठी–कामगारांत जातीय मुद्यावर फूट पाडण्यासाठीच हा सारा बनाव होता ! कॉ. डांगे–निमकर–जोगळेकर प्रभृति कम्युनिस्ट पुढारी 'ब्राह्मण' आहेत; म्हणून या भट पुढाऱ्यांची हाकालपट्टी करा, अशी जातवार कलाटणी कामगार चळवळीला देऊन, तिच्यात फूट पाडण्याचा हा उघड उपद्व्याप होता ! ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनी काही पुढाऱ्यांचा व कार्यकर्त्यांचा ताफा गिरणी मालकांच्या साह्याने जवळकरांच्या मदतीला दिला होता. पैसा, प्रसिद्धी, प्रचार वाङ्मय, गिरण्यांत प्रवेश वगैरे सर्व मार्गांनी कामगारवर्गात फूट पाडून, कम्युनिस्टाचे 'ब्राह्मण' पुढारीपण हुसकावून लावणे आणि त्याच्या जागी बहुजनसमाजाच्या ब्राह्मणेतर पुढारीपणाची प्रस्थापना करणे असा हा एकूण डाव होता.

जवळकरच वर्गलढ्याने झपाटले !

पण या सर्व बनावाचा व खटाटोपांचा एकूण परिणाम काय झाला ? तर कम्युनिस्टांचा लढाऊ वर्गवाद निपटून काढून, त्याऐवजी जातवाद प्रस्थापित करण्याचा प्रयत्न सपशेल फसला; एवढेच नव्हे तर खुद्द जवळकरच लढाऊ वर्गवादाने भारले गेले ! –अर्थात हे परिवर्तन एकदम झाले नाही; पण क्रमाक्रमाने पण निश्चित

असे ते परिवर्तन होत गेले. आणि त्याला कारणेही तशीच होती. जवळकरांचा प्रामाणिकपणा आणि शुद्रातिशुद्रांशी इमान ही मूळात बावनकशी असल्यामुळे त्यांना भांडवली शोषण आणि त्याविरुद्ध कामगारांचा वर्गलढा पटवून घ्यावयाला वेळ लागला नाही. किंबहुना फुल्यांच्या मूळ प्रेरणेची परिणती खरोखरच प्रखर वर्ग-लढ्यातच व्हायला पाहिजे, ही जाणीव जवळकरांना तीव्रपणाने होऊ लागली.

आणि त्यातून भांडवलशाहीविरोधी घोषणा, वर्गलढ्याची-संपलढ्याची ललकारी या पुढील गोष्टी सरळ आणि सोप्या होत्या.

याशिवाय मुंबईच्या गिरणी कामगारांतील वातावरण त्यावेळी (१९२७-३०) विजयी वर्गलढ्याने झपाटले होते. साडेसहा महिने चाललेला प्रचंड सार्वत्रिक संप, त्यासाठी प्राणपणाने लढण्याची जिद्द, मालकांच्या व इतरांच्या संपफोड्या गुंडगिरीच्या कारवाया व सरकारी दडपशाही यावर मात करण्याची किमया तेव्हा कामगारांनी भारतामध्ये प्रथमच प्रचंड प्रमाणावर यशस्वी करून दाखविली होती. याशिवाय कामगारवर्गाला मालकांशी लढण्याचाच केवळ नव्हे तर राजकीय लढ्यात, स्वातंत्र्य लढ्यात पुढाकार घेण्याचा नवा ध्येयवाद डांगेप्रभृति कम्युनिस्ट पुढाऱ्यांनी कामगारांना दिला होता. त्याहूनही महत्त्वाची गोष्ट म्हणजे केवळ राजकीय स्वातंत्र्यच नव्हे, तर कामगारांचे-श्रमिकांचे क्रांतिकारक राज्य झाले पाहिजे–रशियन राज्यक्रांतीने त्याचे एक उज्ज्वल प्रात्यक्षिक दाखविले आहे; जगातील धनिकविरोधी लढ्याचा हा एक भाग आहे, अशी विशाल दृष्टी आणि एक उज्ज्वल स्वप्न कम्युनिस्टांनी कामगारांना दिले होते. त्याहूनही महत्त्वाची गोष्ट म्हणजे मुंबईचा कामगारवर्ग हा या नव्या व्यापक ध्येयवादाने तेव्हा अक्षरशः झपाटून गेला होता.

फुल्यांच्या प्रेरणांशी प्रामाणिकपणा राखणाऱ्या जवळकरांनाही या नव्या ध्येयवादाने लवकरच झपाटले असल्यास त्याबद्दल नवल वाटण्याचे कारण नाही !

तेव्हा कम्युनिस्टांना व त्यांच्या प्रखर वर्गलढ्यांना, प्रचंड लढाऊ वर्गसंघटनेला विरोध करण्यासाठी मुंबईत आलेल्या जवळकरांनाच त्या वर्गलढ्याची बाधा नकळत झाली !

मग प्रश्न राहिला डांगे-निमकरांच्या 'ब्राह्मण'पणाचा ! तो प्रश्न तसा सोपा नव्हता; कारण डांगे-निमकरांची जन्मजात-ब्राह्मण जात बदलणे कोणाच्याच हातात नव्हते ? पण काही वर्षांतच याही मुद्याचा निकाल लागला आणि त्याला कारणेही तशीच होती.

म्हणे कम्युनिस्ट 'ब्राह्मण' पुढारी !

खरी गोष्ट अशी होती की, डांगे-निमकर जन्माने ब्राह्मण होते म्हणून ते कामगारांचे शत्रू असलेच पाहिजेत, ही घोषणा कामगारांना पटण्याजोगी परिस्थितीच

मुळात नाही. पहिली गोष्ट म्हणजे डांगे-निमकर हे तरुण ब्राह्मण म्हणून कामगारांना कधी दिसलेच नाहीत ! तसे त्यांना ते कधी जाणवलेच नाही ! उलट, कामगारांशी समरस होणारे, त्यांच्यात दिवसरात्र राहणारे, मालकांच्या-पोलिसांच्या-गुंडांच्या हल्ल्यांना कणखरपणाने-जीव धोक्यात घालून सतत तोंड देणारे झुंजार नेते, असाच परिचय या तरुण कम्युनिस्टांचा कामगारांना झाला ! शिवाय, त्यांनी वर्गलढ्याचे नवे तत्त्वज्ञान, तंत्र, कामगार राज्याचे नवे ध्येय कामगारांना शिकविले. यामध्ये 'ब्राह्मण' पणाचा प्रश्नच येतो कुठे ? उलट, कामगारांना सतत २४ तास विश्वासात घेणारे, कामगारांतून नवे नवे लढाऊ, वर्गवादी कार्यकर्ते शोधून त्यांच्यावर नव्या नव्या जबाबदाऱ्या टाकण्यासाठी धडपडणारे असे हे तथाकथित 'ब्राह्मण' पुढारी होते ! ज्ञानाची मक्तेदारी टिकविण्याऐवजी कामगार तत्त्वज्ञानाचे नवे ज्ञानभांडार गिरणीच्या दरवाज्यावर व चाळीचाळींत दिवसरात्र अक्षरशः उधळणारे असे हे पुढारी होते !

तरुण कामगारवर्गातून नवे नवे कार्यकर्ते निवडून त्यांना तरूण कम्युनिस्ट म्हणून पक्षांमध्ये व चळवळींमध्ये सामील करून घेण्यासाठी धडपडणारे हे कम्युनिस्ट पुढारी होते. राष्ट्रीय लढ्यातही तेव्हा त्यांचे महत्त्वाचे स्थान होते, तेव्हाच्या मुंबई काँग्रेसवरही त्यांचा प्रभाव होता. गिरण्यांच्या दरवाज्यावर जो ध्येयवाद कम्युनिस्ट शिकवीत, त्यांचाच प्रभावी प्रचार ते काँग्रेसच्या अत्युच्च व्यासपीठावरून–काँग्रेसच्या अधिवेशनातही करीत होते !

तात्पर्य, 'भटजी' या कल्पनेशी सर्वस्वी विसंगत असेच व्यक्तिचित्र या तरुण पुढाऱ्यांचे होते–आणि त्यांची शिकवण तर ब्राह्मण्याच्या ऐन मूळावरच घाव घालणारी होती ! उच्चवर्णीय-उच्चवर्गीय वर्चस्वाला आव्हान देणारी होती.

त्याहूनही महत्त्वाची गोष्ट म्हणजे, कामगारांचीही याबाबतीत संपूर्ण खात्री पटलेली होती. कम्युनिस्टांवर तेव्हा व नंतर अनेक खरेखोटे आरोप आले; पण वंश, धर्म, जात यांच्या आहारी गेल्याचा आरोप त्यांच्यावर त्यांचे कट्टर शत्रुसुद्धा केव्हाही करू शकले नाहीत. किंबहुना वंश, जात, धर्म आणि त्यावर आधारलेली विषमता यापासून सर्वस्वी अलिप्त राहण्याची किमया इतर कोणापेक्षाही कम्युनिस्टांनीच अधिक प्रभावीपणाने प्रत्यक्षात करून दाखवली आहे. आणि अनेक संकटे, अनेक चुका, अनेक फुटपाडे प्रयत्न यांवर मात करण्याची जिद्द कम्युनिस्टांत आली, तिचा नैतिक पाया या मूलभूत धारणेमध्येच–विशाल व्यापक ध्येयवादातच होता यात शंका नाही.

जवळकरांना हाच अनुभव आला. एव्हांना जवळकरांना कामगारांनी अंगीकारिलेल्या कम्युनिस्ट वर्गलढ्याची बाधा झालेली असली तरी अजूनही ते ब्राह्मणेतर पुढारीपणाच्या जाळ्यातून सुटले नव्हते. त्यांची पुढे लवकरच त्यातूनही

सुटका झाली ! तोही एका चमत्कारिक योगायोगाचा परिणाम होता. अर्थातच जवळकरांच्या मूळ प्रेरणा प्रामाणिक होत्या म्हणूनच हे शक्य झाले.

जवळकरांचे परिवर्तन–'क्रांतीचे रणशिंग' !

ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनी आपल्या एका कामासाठी जवळकरांना इंग्लंडमध्ये पाठविले—दोनदा पाठविले. इंग्लंडमध्ये जवळकरांचे वास्तव्य बरेच महिने होते. पण त्या काळात जवळकरांनी काय करावे ? ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनी योजले काय आणि प्रत्यक्षात घडले काय ? तर जवळकरांना ब्रिटीश कामगारवर्गाचे दर्शन घडले; १९३०-३२ च्या जागतिक आर्थिक मंदीच्या तडाख्यात सापडलेल्या–त्यातून निर्माण होणाऱ्या तीव्र राजकीय–आर्थिक संघर्षाच्या कक्षेत झपाट्याने ओढल्या जाणाऱ्या ब्रिटिश कामगारवर्गाशी जवळकरांचा जवळून परिचय घडण्याची संधी प्राप्त झाली. जवळकरांच्या ब्रिटनमधील वास्तव्यातच आणखीही एक गोष्ट घडली. ती म्हणजे जवळकरांचा ब्रिटिश कम्युनिस्ट पक्षाशी जवळून संबंध आला आणि कम्युनिस्ट दृष्टीतून एका नव्या जगाचे दर्शन जवळकरांना घडले. जागतिक मंदी, तज्जन्य राजकीय-आर्थिक अरिष्ट, त्यातून अपरिहार्यपणे उद्भवणारा प्रचंड क्रांतिकारक जागतिक लढा, त्या लढ्याशी असलेला भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा साक्षात संबंध–आणि जवळकरांना नंतर भारतीय परिस्थितीचे चित्रही वेगळ्याच संदर्भात दिसू लागले. मुंबईतील कामगारांचे वर्गलढे, महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील बहुजनसमाजाची आंदोलने, फुल्यांच्या प्रेरणा आत्मसात केलेल्या जवळकरांना यामध्ये नवाच संदर्भ–नवाच अर्थ दिसायला लागला ! जवळकर इंग्लंडमधून परत आले ते महर्षी कार्ल मार्क्सची शिकवण घेऊन आणि तिच्या प्रकाशात भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा आणि फुल्यांच्या प्रेरणांचा मूलभूत विकसनशील विचार करण्याच्या निश्चयाने !

जवळकरांनी आपले हे नवे विचार आपले जुने सहकारी जेधे यांना कळविले; त्यांच्यात विचारविनिमय झाला. दुर्दैवाने हे विचारमंथन तेव्हा अपुरेच राहिले. पण जवळकरांनी मात्र आपले विचार त्यांच्या नेहमीच्या तडफेने, तळमळीने व तातडीने शब्दबद्ध केले, त्यांना ग्रंथरूप दिले. त्या ग्रंथाला त्यांनी नाव दिले 'क्रांतीचे रणशिंग' !

जवळकरांनी फुले प्रेरणांशी आणि शूद्र-अतिशूद्रांच्या जीवनाशी सुसंगत अशी विचारांची नवी वाटचाल डोळसपणाने केली होती. ती त्यावेळी अपुरी असेल; अपरिपक्व असेल; स्थूल, ढोबळ, क्वचित उथळही असेल. पण तिच्यातील जवळकरी ओज, तेज, ताजेपणा, आवेश, जोष आजही स्फूर्तिप्रद वाटण्यासारखा आहे ! पण तिची दिशा अगदी निश्चित होती. सामाजिक समतेच्या लढ्याला सर्वंकष वर्गवादी सिद्धांताचा आधार देण्याचा तो एक प्राथमिक पण प्रामाणिक प्रयत्न होता. फुल्यांच्या प्रेरणा मानणाऱ्या बहुजनसमाजाला जवळकरांनी दिलेली ही एक अमोल ऐतिहासिक

देणगी होती. आगामी कालखंडातील बदलत्या परिस्थितीच्या संदर्भात आपल्या विचारांची, धोरणाची, डावपेचाची नव्याने आखणी करण्याची स्पष्ट दिशा त्यामध्ये सूचित होत होती. जवळकरांनी हे कार्य १९३२ मध्ये केले होते, ही गोष्ट ध्यानात घेतली म्हणजे तिची महती आजही पटण्यासारखी आहे.

(पुढे १९४८ मध्ये काँग्रेसच्या धनिकधार्जिण्या जनताद्रोही धोरणाविरुद्ध बंड करून जेधे-मोऱ्यांनी भारतीय शेतकरी-कामकरी पक्ष स्थापन केला. या नव्या पक्षाचा सैद्धांतिक पाया म्हणून तयार केलेला प्रबंध 'दाभाडी प्रबंध' म्हणून सुप्रसिद्ध आहे. मार्क्सवाद ही जीवननिष्ठा आणि आंतरराष्ट्रीयवाद हे धोरणाचे मुख्य सूत्र अशी दाभाडी प्रबंधाची मूलभूत बैठक आहे. जवळकरांनी १९३२ मध्ये लिहिलेल्या ग्रंथांत याच ध्येय-धोरणाची निश्चित पूर्वसूचना मिळते. त्या अर्थाने दाभाडी प्रबंधांनी पूर्व-परंपरा जवळकरापर्यंत जाऊन निश्चितपणे भिडते. दाभाडी प्रबंधातील एकूण मूळ भूमिकेचे पहिले द्रष्टे-उद्‌गाते म्हणून जवळकरांचे ऋण मान्य करणे आज योग्य होईल. पण ते असो.)

जेधे-जवळकरां'पासून-'जेधे-गाडगीळां'पर्यंत

—पण हे सर्व प्रत्यक्षात उतरविण्याला स्वतः जवळकरच जगले नाहीत ! ज्या नव्या विचाराचे-धोरणाचे दिग्दर्शन त्यांनी केले होते ते प्रत्यक्षात उतरविण्याची संधी जवळकरांना लाभली नाही, हा एक अत्यंत दुर्दैवी अपघात समजला पाहिजे ! भाई दिनकरराव जवळकर हे तारुण्याच्या आणि वैचारिक व प्रत्यक्ष कार्यकर्तृत्वाच्या ऐन भरामध्येच असताना सन १९३२ मध्ये एकाएकी मृत्यू पावले !

१९२०-३० च्या दशकात जेधे-जवळकरांनी ब्राह्मणेतर पुढाऱ्यांच्या भ्रष्ट, संधिसाधू कचाट्यातून सत्यशोधक-आंदोलनाला आणि बहुजनसमाजाला सोडविण्याचा एक महान प्रयत्न केला होता आणि काही प्रमाणात तरी तो यशस्वीही होत होता. त्याच प्रयत्नांची पुढील विकसनशील वाटचाल करण्याची दिशा जवळकरांनी निश्चित केली होती. पण दुर्दैवाने हे कार्य अपुरेच राहिले. किंबहुना त्याचा प्रारंभसुद्धा रीतसर, नीटस होऊ शकला नाही ! जेधे यांनी केलेले प्रयत्न अपुरे ठरले, काही प्रमाणात चुकीचेही ठरले. त्यांतून जेधे गाडगीळ पुढारीपणाचा नवा नमुना निर्माण झाला !

जेधे-जवळकर पुढारीपणाऐवजी आता जेधे-गाडगीळ पुढारीपण महाराष्ट्राच्या नशिबी आले !

१९२०-३० या कालखंडात जेधे-जवळकर पुढारीपण हे धनिकधार्जिण्या, संधिसाधू, वरिष्ठवर्गीय ब्राह्मणेतर पक्षाच्या पुढाऱ्यांच्या सत्ताबाज राजकारणाला प्रभावी आव्हान होते; तर जेधे-गाडगीळ पुढारीपण हे गांधी-नेहरूंच्या पुण्याईने आणि त्याबरोबरच फुल्यांच्या नावाचाही वापर करून मुंबई-महाराष्ट्राच्या सत्तासन्मुख राजकारणावर भांडवलदारी-जमीनदारी पुढारीपण लादण्याला साहाय्यभूत ठरणारे

होते ! जेधे-जवळकर पुढारीपणापासून जेधे-गाडगीळ पुढारीपणापर्यंतची वाटचाल ही महाराष्ट्रातील राजकारणातील फुल्यांच्या सर्वंकष समता-कारणातील एक दारुण शोकांतिका ठरली !

राहून राहून हळहळ हीच वाटते की, प्रत्यक्षात जे घडले, ते टाळता येण्यासारखे होते ! ते कसे टाळायचे त्याचे स्थूल दिग्दर्शन खुद्द जेध्यांचेच निकटवर्ती सहकारी जवळकर यांनी अगदी योग्य वेळीच केलेले होते. त्याच सुमारास कम्युनिस्टांच्या प्रयत्नांमुळे वर्गलढ्याचा क्रांतिकारक झेंडा मुंबईत फडकला होता. तेथे प्रचंड वर्गलढे आणि वर्गसंघटना यांचा खंबीर पाया घातला गेला होता. सोलापूर, नागपूर, खानदेश वगैरे अन्य कामगार-केंद्रांतही वर्गलढा आणि वर्गसंघटना यांचा लाल झेंडा फडकू लागला होता. या नव्या शक्तीचा प्रभाव ग्रामीण महाराष्ट्रावरही पडण्यासाठी अनुकूल अशी परिस्थिती उत्पन्न होत होती. अशा वेळी शहरी कामगारवर्ग आणि ग्रामीण गोरगरीब या दोन क्रांतिकारक शक्तींचा प्रभावी संगम होणे आवश्यक होते आणि शक्यही होते. पण ते प्रत्यक्षात घडवून आणण्यासाठी धडपडणारे जवळकर मात्र उरले नव्हते !

आणि नंतर अनेक कटू अनुभव घेतल्यानंतर–टक्केटोणपे खाल्ल्यानंतर, जेधे–मोऱ्यांना १९४८ मध्ये अखेर तेच करावे लागले;––जे जवळकरांनी १९३२ सालीच निश्चितपणे सूचित केले होते !

पण १९३२ ते १९४८ या १६ वर्षांत काळ थांबला नव्हता. वेळ निघून गेली होती ! काँग्रेसमधील सत्तारूढ भांडवलदारी–जमीनदारी पुढारीपणाने मुंबई–महाराष्ट्राच्या राजकारणावर–अर्थकारणावर आपली पकड पक्की बसविली होती; त्या कामी गांधी–नेहरूंच्या नावाप्रमाणेच महात्मा फुल्यांच्या पुण्याईचाही उपयोग पद्धतशीरपणे करून घेण्याची संधी त्यांनी साधली होती !

प्रकरण ५ वे

डॉ. आंबेडकर : ज्योतीवर पटलेली ज्योती !

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी फक्त तीनच गुरुऋण मान्य केले आहे. त्यांच्या वैचारिक आणि भावमय जीवनात ते तिघे म्हणजे महात्मा फुले, महात्मा कबीर आणि महात्मा बुद्ध याच अनुक्रमाने आले आणि त्यांनी नंतर अढळस्थान मिळविले.

आधुनिक भारतामध्ये फुल्यांखेरीज आंबेडकरांना दुसरा कोणताही स्फूर्तिदाता, द्रष्टा किंवा नेता आढळला नाही, ही एक अत्यंत लक्षणीय आणि मननीय गोष्ट आहे. पण या गोष्टीकडे कोणी फारसे लक्ष दिलेले आढळत नाही. ऐतिहासिक काळातही. फार काय, मराठी संतकवींच्या दैदीप्यमान् मालिकेमध्येही कोणीही आंबेडकरांना स्फुर्ती देऊ शकला नाही. त्यांना एकच संत आढळला; तो उत्तरेमधला; न हिंदु–न मुसलमान–असा संत कबीर ! आणि अखेर बाबासाहेबांनी सर्वार्थाने आपला मानला तो गौतम बुद्ध–अवैदिक, निरीश्वरवादी, अनात्मवादी, भौतिकवादी, तत्त्वज्ञ,–आदिम साम्यवादी गणसंस्थेशी जिवंत नाते सांगणारा शाक्य गौतम; करुणाघन, मध्यममार्गी, समतावादी धर्मसंस्थापक महात्मा बुद्ध ! आंबेडकरांना आधुनिक भारतामध्ये फुल्यांखेरीज दुसरे कोणतेही स्फूर्तिस्थान आढळू नये, ही गोष्ट फुल्यांच्या अपूर्व महात्मतेचा जसा गौरव करणारी आहे, त्याचप्रमाणे ती आंबेडकरांच्या एकूण वैचारिक-भावनिक जीवनाचे वैशिष्ट्यही व्यक्त करणारी आहे.

फुले–आंबेडकर : समसमां संयोग !

अस्पृश्यांसाठी पहिली शाळा काढण्याची कल्पना-प्रेरणा भारतामध्ये फक्त फुल्यांच्याच ठायी संभवली; भारतामध्ये जन्मजात चातुर्वर्ण्याविरुद्ध आणि वर्णजाति-

श्रेष्ठत्वाविरुद्ध सर्वंकष युद्ध पुकारणारे फक्त म. फुलेच निघाले. शूद्र आणि अतिशुद्रांची आणि स्त्रियांची बाजू घेऊन ब्राह्मणी संस्कृतीविरुद्ध–तिच्या वर्चस्वाच्या सर्व आणि प्रत्येक आविष्काराविरुद्ध प्राणपणाने लढण्याची हाक दिली फक्त फुल्यांनीच ! या आपल्या सर्वंकष बंडखोरीच्या आयुष्यात कधीही–एकदासुद्धा ज्यांनी समेट केला नाही,–समन्वय साधला नाही, ज्यांना कधीही व्यवहार आठवला नाही, असा कर्तृत्वशाली विचारवंत-कृतिवंत एकच होऊन गेला ! आणि तो म्हणजे महात्मा फुले ! अशा फुल्यांनी आंबेडकरांना स्फुर्ती दिली आणि आंबेडकरांनी त्यांचे ऋण अगदी मोकळया मनाने-कृतज्ञतेने मान्य केले, तर त्यात ' समसमां संयोग की जाहला ' असेच म्हटले पाहिजे.

फुले आणि आंबेडकरांचे हे अतूट नाते ध्यानात घेतले की, दोघांच्याही वैचारिक त्याचप्रमाणे व्यावहारिक जीवनावरही नवाच प्रकाश पडतो. दोघांचेही चरित्र आणि कर्तृत्व शेजारी शेजारी ठेवले तर दोन्ही समजायला निःसंशय मदत होते.

ज्योती फुल्यांची; मार्ग आंबेडकरांचाच !

खरी गोष्ट अशी आहे की, फुल्यांच्या प्रेरणांचा मूळ अगदी अस्सल गाभा आंबेडकरांच्याच हाती लागला; त्यांच्या तळमळीची आच आंबेडकरांच्याच धगधगत्या जीवनकुंडात सतत प्रज्वलित राहिली. फुल्यांच्या ज्योतीवर खरीखुरी सर्वार्थाने एकच ज्योति पेटली आणि म्हणूनच लाखो-कोट्यवधी अंतःकरणातील ज्योती पेटविण्याचे सामर्थ्य तिला लाभले ! साऱ्या जगाशी-समाजाशी, प्रस्थापित शक्तींशी झुंज घेण्याचे–लौकिक व्यवहारातील भीड किंवा भीती यांची तमा न बाळगण्याचे धैर्य दोघांमध्येही एकाच कसाचे आढळते.

म्हणूनच फुल्यांचे नाते आंबेडकरांनी अभिमानाने सांगितले; पण फुल्यांचे नाव सांगणाऱ्या इतर समकालीन पुढाऱ्यांमध्ये आंबेडकरांना एकही स्फूर्तिदाता किंवा खराखुरा सहकारी भेटू शकला नाही, हीही गोष्ट तितकीच खरी आहे.

आंबेडकरांनी आपल्या विविधांगी जीवनात मिळाले त्यांचे–मिळेल तेवढे, मिळेल तेव्हा–सहकार्य सगळ्यांचे घेतले. पण त्यांच्या आणि त्यांपैकी प्रत्येकाच्या मर्यादांची तीव्र जाणीव त्यांना सतत होती–बोचत होती. आणि म्हणूनच आंबेडकर कोणाचे झाले नाहीत; ते आपण....आपलेच-एकटेच....म्हणजे शूद्र-अतिशुद्रांचेच राहिले; आणि त्याबद्दलचा कडवा अभिमान त्यांनी दिमाखाने सतत जन्मभर मिरविला ! फुल्यांकडून त्यांनी स्फुर्ती घेतली, आच घेतली; पण परिस्थितीनुसार मार्ग मात्र त्यांचा त्यांनाच शोधून काढावा लागला ! अक्षरशः काट्याकुट्यांतून, खाच-खळग्यांतून, चढ-उतारातून, डोंगर-दऱ्यातून, नदी-नाल्यांतून, वाऱ्या-वादळांतून पाण्या-पावसातून, रखरखत्या भयाण एकाकी वाळवंटातून ही वाट त्यांनी खोदून-खणून काढली; आणि कोट्यवधी अनुयायांनाही त्यांनी त्या वाटेने अक्षरशः बांधून,

धरून-ओढून–कधी कधी अक्षरशः फरफटतसुद्धा नेले! आंबेडकरांना सतत चटके बसत राहिले आणि त्यांनीही सतत सगळ्यांना चटके दिले!

वेदना हीच प्रेरणा!

ज्या शूद्र आणि अतिशुद्रांशी फुले मनाने, विचाराने अगदी एकरूप झाले होते–त्याच अतिशुद्रांमधून आंबेडकर उदयाला आले. जी व्यथा-वेदना चिंतनाने, सहानुभूतीने, माणुसकीच्या खऱ्याखुऱ्या कळवळ्याने फुल्यांना तीव्रपणे जाणवली होती; ती व्यथा-वेदना प्रत्यक्ष उरीपोटी घेऊनच आंबेडकर जन्माला आले; आणि ती जन्मजात व्यथाच त्यांच्या जीवनाची सर्वंकष प्रेरणा ठरली! त्या व्यथेची जीववेणी टोचणी जशी त्यांना प्रत्येक क्षणी भोगावी लागली, तशीच ती त्यांना त्यांच्या खडतर जीवनमार्गावर सदा प्रेरक, मार्गदर्शक शक्तीही ठरली! त्यांचा जसा सतत छळ झाला; तसाच आंबेडकरांना मधून मधून सहकार्याचा, स्नेहाचा ओलावाही जरुर लाभला. पण आंबेडकरांमध्ये एक जाणीव मात्र रोकड्या खडतर अनुभवामुळे सतत सलत राहिली;–ती म्हणजे शूद्र-अतिशुद्राची–(जी सर्वार्थाने फक्त त्याची त्यालाच जाणवते; इतरांची जाणीव-सहानुभूती कदाचित खरी असली तरी तिच्या मर्यादाच जास्त खऱ्या असतात! अगदी हार्दिक म्हटली तरी ती सहानुभूती खरोखर बरीचशी काल्पनिक किंवा उसनीच असते!) हा अनुभव फार कडवट आहे, ही जाणीव फार भयंकर आहे; पण सत्यच तसे आहे; वस्तुस्थितीच तशी आहे! म्हणूनच आंबेडकरांनी शूद्र–अतिशुद्रामध्ये धगधगता स्वाभिमान जागविला, त्यांना स्वावलंबनाची कठोर दीक्षा दिली. इतरांची खरीखुरी सहानुभूती असली तर तिचा त्यांनी मनोमन आदर केला; पण उपकाराच्या, उद्धाराच्या भाषेचा त्यांनी त्वेषाने सतत धिक्कारच केला! पापाचे प्रायश्चित घेण्याच्या भाषेचाही त्यांनी तिरस्कार केला. 'हरिजन' म्हणून वृथा गौरव करण्यामध्ये त्यांना साधाभोळा सात्विकभाव आढळला नाही; त्यांना दांभिकतेचा, स्वसंतुष्टतेचा, वृथा सात्विकतेचा दर्प आढळला! फुल्यांच्या एकूण जाणीवेशी–मनोवृत्तीशी–जीवनदृष्टीशी नाते जुळवणारी–जोडणारी अशीच आंबेडकरांची ही प्रवृत्ती होती.

शिवाय आंबेडकरांना वैयक्तिक कटु अनुभवाचे जहर क्षणोक्षणी कंठी धारण करावे लागले होते! आणि ते जहर केवळ वैयक्तिक नव्हते; तर हजारो वर्षे कोटी कोटी स्त्री-पुरुषांनी कंठी बाळगलेल्या–पचविलेल्या विषाचा तो अर्कातला, कटुतम अर्क होता. आंबेडकरांची व्यथा केवळ एका व्यक्तीची नव्हती; कोटी कोटी दलित मानवतेची होती. म्हणूनच त्यांचा त्वेष-द्वेष वैयक्तिक नव्हता; तर जन्मजात विषमतेविरुद्ध होता;–पदोपदी आणि क्षणोक्षणी होणाऱ्या विषमतेच्या विविध विषारी आविष्कारांविरुद्ध होता!

इतर उच्च-वर्णियांचे काय ?

हजारो वर्षे कंठी बाळगलेला आपला त्वेष फुल्यांनी चातुर्वर्ण्यव्यवस्थेचे निर्माते-अधिष्ठाते जे ब्राह्मण त्यांच्याविरुद्ध जळजळीत निखाऱ्यांच्या शब्दांमध्ये व्यक्त केला. आणि ते त्यांच्या काळी अगदी योग्यच होते आणि अत्यावश्यकही होते.

पण आंबेडकरांची व्यथा त्याहूनही वेगळी-व्यापक होती. 'वर्णानाम् गुरु' म्हणून ब्राह्मणांबद्दल त्वेष तर अर्थातच होता; पण ब्राह्मणी शिकवणीचे विष पिढ्यान् पिढ्या अंगात भिनलेल्या इतर उच्चवर्णीयांचे काय ? फुल्यांपुढे नसलेला हा नवा सवाल व्यवहारातून-अनुभवांतून आंबेडकरांपुढे विक्राळ, हिडिस, क्रूर स्वरूपात उभा राहिला !

एवढे मोठे पुरोगामी, उदारमनस्क सयाजी महाराज गायकवाड–त्यांनी आंबेडकरांना शिक्षणासाठी मदत केली; मोठी मानाची नोकरीही देऊ केली. पण राहण्याला घर-जागा मात्र ते देऊ शकले नाहीत ! किंवा ऑफिसातील साध्या पट्टेवाल्याचा उच्चवर्णीय उर्मटपणाही ते सर्वसत्ताधीश सुसंस्कृत, उदारमनस्क सयाजी-महाराज मोडून काढू शकले नाहीत ! सर चिमणलाल-सेटलवाडांसारखा उच्चवर्णीय तथाकथित उदारमतवादी, उच्चभ्रू नेता, आंबेडकरांच्या सत्काराचे जाहीर झालेले अध्यक्षस्थान ऐनवेळी सभेच्या क्षणी स्वीकारण्याचे टाळतो, कच खातो, ही गोष्ट आंबेडकरांनी कशी काय विसरावी ? सभा-परिषदांत सात्विक संतापाने ओसंडणारी किंवा अथांग करुणेने ओथंबणारी ऐसपैस भाषणे करणाऱ्या काही ब्राह्मणी सुधारकांना (किंवा काही ब्राह्मणेतर नेत्यांनासुद्धा) प्रत्यक्ष कृतीची वेळ येते, तेव्हाच नेमका व्यवहार कसा आठवतो, याचा अनुभव आल्यानंतर आंबेडकरांनी कोणता निष्कर्ष काढावा ? ब्राह्मणी विषमतेविरुद्ध-चातुर्वर्ण्याविरुद्ध बंडखोरीची भाषा बोलणाऱ्यांना, (आंबेडकरांनी मनुस्मृती जाळताच) तिच्यातील महान् सांस्कृतिक परंपरेचा, विद्वत्तेचा, समाजधारणेचा साक्षात्कार एकाएकी होऊ लागला (आणि आजही होत आहे !) तर त्याचा आंबेडकरांनी काय अर्थ लावावा ? हे तथाकथित सुधारक, सत्यशोधक किंवा पुरोगामी आणि खरेखुरे चटके खाऊन पोळणारे शूद्र-अतिशूद्र यामध्ये आंबेडकरांनी फरक केला, तर त्यात त्यांचे कुठे चुकले ?

नव्या ब्राह्मण्यांचे नवे ठेकेदार !

आंबेडकरांना अनुभवाने आणखीही एक धक्का बसला. स्वतंत्र, स्वाभिमानी, स्वावलंबी दलित आंदोलनाच्या विकासक्रमात चवदार तळ्यावरील पाण्याचा किंवा काळाराम-पर्वती मंदिरप्रवेश सत्याग्रहाचा प्रश्न आला. आंबेडकरांनी प्रथमच जागृत केलेल्या शूद्र-अतिशूद्र जनसमुदायांच्या या नव्या आंदोलनामुळे, वास्तविक फुल्यांच्या सत्यशोधक चळवळीलाच एक नवी उच्च पातळी गाठण्याची ऐतिहासिक संधी लाभत होती. पण नेमक्या याच सुवर्णक्षणी, फुल्यांच्या पुण्याईवर मक्तेदारीने हक्क

सांगणाऱ्या व तिचा सतत फायदा उठविणाऱ्या बहुतेक उच्चवर्णीय ब्राह्मणेतर पुढाऱ्यांना ही सुवर्णसंधी न वाटता हे धर्मसंकट-प्राणसंकटच वाटले! काही उच्च कुलोत्पन्न लब्धप्रतिष्ठित पुढाऱ्यांनी तर चळवळीविरुद्धच भूमिका घेतल्या! सत्यशोधक-ब्राह्मणेतर चळवळीच्या परिणामी खेड्यापाड्यांतून ब्राह्मणांचे व ब्राह्मणवर्चस्वाचे बऱ्याच प्रमाणात उच्चाटन झाले होते. तेव्हा फुल्यांचे नाव सांगणाऱ्यांना खरे म्हणजे अस्पृश्यतेचा कलंक पुसून काढण्याची ही सुवर्णसंधी होती. पण प्रत्यक्षात काय घडले? तर फुल्यांना प्रिय असलेल्या शुद्र-अतिशूद्रांतील या ऐतिहासिक जागृतीचा व स्वाभिमानी आंदोलनाचा अनेक ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनीच धसका घेतला होता! अस्पृश्यांच्या आंदोलनाला विरोध करण्यासाठी आता पराभूत ब्राम्हणांऐवजी, फुल्यांचे नाव सांगणारे काही प्रतिष्ठित ब्राम्हणेतर पुढारीच हिरीरीने पुढे येऊ लागले! या क्षात्रकुलोत्पन्न ब्राम्हणेतर पुढाऱ्यांनी आणि मारवाडी व्यापाऱ्यांनीच आता ब्राम्हणांची जागा घेतली; आणि एकप्रकारे नव्या ब्राम्हण्यांचे संरक्षण करण्यास हे नव्या चातुर्वर्ण्याचे नवे ठेकेदार पुढे सरसावले!

तेव्हापासून ग्रामीण विभागात सुरू झालेली ही तेढ, या-नाही-त्या कारणास्तव; या-नाही-त्या निमित्ताने पुढे चालूच राहिली—मधून मधून वाढतच गेली—तिचे उद्रेक होतच राहिले! या मूळ जातीय तेढीला सोयीस्कर राजकीय रंग फासण्यात येऊ लागला! निमित्त काय-तर म्हणे, आंबेडकर ब्रिटिशांचे हस्तक; म्हणे आंबेडकर ख्रिस्ती होणार....मुसलमान होणार ...इत्यादी इत्यादी. गंमतीची गोष्ट म्हणजे नेमके हेच आरोप-हेच आक्षेप फुल्यांविरुद्ध त्यांच्या तत्कालीन ब्राह्मण विरोधकांनी....विष्णु-शास्त्र्यांपासून सर्वांनी घेतले होते!

तात्पर्य, आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली शूद्र-अतिशुद्रांमध्ये नवी जागृती, नवा स्वाभिमान, नवी जिद्द, नवी लढाऊ संघटना निर्माण झाली. आणि फुल्यांना अभिप्रेत असलेले सामाजिक समतेचे आंदोलन एकदम एका झडपेसरशी पुढे गेले; त्याने उच्चतर पातळी गाठली! आणि नवलाची व खेदाची गोष्ट म्हणजे फुल्यांच्याच नावाने जगणाऱ्या ब्राह्मणेतर चळवळीने फुल्यांच्या शिकवणीशी सरळ प्रतारणा केली. पण त्याहूनही आश्चर्याची गोष्ट म्हणजे ते पुढारी तरीही फुल्यांच्या नावाने मिरवू शकले; बहुजनसमाजाच्या नावाने बोलूही शकले!

जेधे-जवळकरांनी ग्रामीण बहुजनसमाजाला स्वातंत्र्यलढ्यात सामील करून घेण्याच्या कार्यात बऱ्याच प्रमाणात यश मिळविले; पण अपृश्यांच्या स्वाभिमानी आंदोलनाला आपल्यात-सत्यशोधक चळवळींत सामावून घेण्याच्या कार्यात मात्र ते संपूर्णपणे अयशस्वी ठरले! शूद्र-अतिशुद्रांच्या (फुल्यांना प्रिय असलेल्या) आंदोलनासंबंधी एकाच वेळी घडलेल्या या क्रिया व प्रतिक्रिया; यश व अपयश; चढ आणि उतार ही दोन्ही जमेस धरूनच फुल्यांच्या एकूण आंदोलनाच्या प्रगतीचा-विकासाचा आलेख काढावयाला हवा. असा आलेख तेव्हा तर फारसा कुणी काढला

नाही; फुलेभक्तांनीही काढला नाही. तसा आलेख काढण्याचा प्रयत्न केला तर त्याबद्दलही वाद माजण्याचा प्रसंग आज तरी येऊ नये, अशी निदान आशा करू या! खरी गोष्ट अशी आहे की, आंबेडकरांनी फुल्यांना प्रिय असलेल्या शुद्र-अतिशुद्रांच्या आंदोलनाचे प्रस्थान उभारून फुल्यांना अभिप्रेत असणाऱ्या कार्याची व्याप्ती वाढवली; गुणात्मक विकास केला; पण त्याच क्रमात फुल्यांचे नाव घेणाऱ्या काही पुढारी गटांनी या आंदोलनाला विरोध केला, बहुजनसमाजातील विषमतेचे विष (म्हणजेच एक प्रकारचे नवे ब्राम्हण्य) पोसण्याचे पाप मात्र केले!

आंबेडकर आणि ब्राह्मणेतर चळवळ

शिक्षणक्षेत्रातील ब्राह्मणांची मक्तेदारी मोडून शिक्षण बहुजनसमाजात नेणे, हा फुल्यांच्या कार्यक्रमातील एक अत्यंत महत्त्वाचा भाग होता. ब्राह्मणांच्या विरोधास, उपहासास, न जुमानता त्या कार्यक्रमात बऱ्याच प्रमाणात प्रगती झाली. पण त्या प्रगतीमध्ये अस्पृश्य आणि मागासवर्गाला अधिक हिस्सा मिळावा, अशी ऊर्मी जेव्हा अस्पृश्य आणि मागासवर्गात उफाळू लागली, तेव्हा परत एकदा जुनाच अंतर्विरोध नव्या स्वरूपात (काही प्रमाणात तरी) प्रगट होऊ लागला. आंबेडकरांच्या उदयामुळे अस्पृश्यवर्गात जी जागृती झाली, स्वाभिमानी-स्वावलंबी आंदोलनाची जी लाट उसळली, त्यामध्ये विशेषतः महारसमाज आघाडीला होता. महारसमाज अगोदरच इतर अस्पृश्यांच्या मानाने अधिक जागृत, पुढारलेला, लढाऊ, संघटित, त्यातच त्यांच्यातून आंबेडकरांसारखा लोकोत्तर नेता निर्माण झालेला! त्यामुळे स्वाभाविकपणेच त्या समाजात एक प्रकारचे परिवर्तनच घडून आले. ती केवळ जागृती नव्हती; ते एक उधाण होते; तुफान होते! एकूण समाजाचा कायापालट घडवून आणणारे ते एक क्रांतिकारक परिवर्तनच होते. त्याची व्याप्ती, वेग, तेज यांचा खरे म्हणजे, कोणालाच यथायोग्य अंदाज आला नाही; कोणालाच ते पेलले नाही!– तेव्हाच नव्हे, तर आज–आतासुद्धा!)

सहकार्य तर नव्हेच; फारकत!

वस्तुस्थिती अशी आहे की, उघड उघड फुल्यांचे नाव घेऊन, फुल्यांची परंपरा सांगून, फुल्यांचा वारसा घेऊनच आंबेडकर पुढे आले. सयाजी महाराजांनी त्यांना प्रारंभी मदत केली; शाहू छत्रपतींनी तर त्यांच्या भावी आंदोलनाचेही मुक्त मनाने स्वागतच केले. पण आंबेडकरांची चळवळ, केवळ जागृतीच्या–प्रचाराच्या कक्षा ओलांडून हक्क बजावण्याच्या–प्रत्यक्ष प्रतिकाराच्या–लढाऊ जन-आंदोलनाच्या पातळीला जेव्हा पोचू लागली, तेव्हा फुल्यांची परंपरा सांगणाऱ्या काही उच्च-वर्णीय उच्च-वर्गीय प्रतिष्ठितांकडून त्यांना सहकार्य मिळनासे झाले! एवढेच नव्हे तर काही पुढाऱ्यांकडून तरी प्रत्यक्ष विरोधही सुरू झाला. तुमची दया नको; आम्हाला न्याय पाहिजे; हक्क पाहिजे; हक्क नाकारण्याचा प्रयत्न केला तर तो आम्ही प्रत्यक्ष

बजावू, अशा आंदोलनाचा पवित्रा जेव्हा आंबेडकरांनी घेतला, तेव्हा अनेक ब्राह्मणेतर पुढारी गडबडून गेले! आंबेडकरांनी राजकारणात प्रवेश करून विशिष्ट भूमिका घ्यावयास प्रारंभ करताच, हे विरोध अधिकच स्पष्ट होऊ लागले. ब्राह्मणांची जोशीवतने नष्ट करण्याचा आग्रह धरणारे ब्राह्मणेतर पुढारी, आंबेडकरांनी पाटील व इतर वतने नष्ट करतो म्हणताच, त्या मागणीला विरोध करावयाला पुढे सरसावले! जमिनीसंबंधी कोणतेही हक्क अस्पृश्यांनी मागणे म्हणजे तर त्यांच्या दृष्टीने अनर्थच झाला! अशा रीतीने आंबेडकर आणि ब्राह्मणेतर पुढारी यामधील दरी अधिकाधिक रुंदावत चालली. खरे म्हणजे या वेळी सत्यशोधक चळवळीने तरी आंबेडकरांचा भरभक्कम पाठपुरावा करणे आवश्यक होते. फुले यांच्या मूळ प्रेरणांच्या, आणि शूद्र-अतिशुद्रांशी इमानदारी राखण्याच्या भूमिकेच्या दृष्टीने तर तो मूलभूत निष्ठेचाच प्रश्न होता. पण दुर्दैवाने ब्राह्मणेतर पुढारी अशी भूमिका घेऊ शकले नाहीत. परिणामी, आंबेडकर आणि ब्राह्मणेतर चळवळ (आणि त्याबरोबरच सत्यशोधक चळवळ) यांच्यांत फारकत होण्याचा दुर्दैवी क्षण जवळ आला!

आंबेडकरांची ब्राह्मणेतर पुढारीपणावरील टीका

अशा परिस्थितीत आंबेडकरांनी ब्राह्मणेतर चळवळीवर आणि तिच्या काही पुढाऱ्यांवर वेळोवेळी–अत्यंत सडेतोड आणि तिखट–कडवट टीका केलेली असल्यास, ती टीका तत्कालीन संदर्भात समजून घेतली पाहिजे.

वास्तविक आंबेडकर हे महात्मा फुल्यांना मनोमन गुरू मानणारे होते. छत्रपती शाहुमहाराजांबद्दलही त्यांच्या मनात आदरभाव आणि कृतज्ञता होती. आंबेडकरांच्या चळवळीच्या प्रारंभीच्या काळात त्यांचे कौतुक करणारे–त्यांना सर्वतोपरी उत्तेजन देणारे शाहुराजेच होते.

ब्राह्मणेतर आणि सत्यशोधक चळवळीने चालविलेल्या काही उपक्रमांकडे प्रारंभी तरी आंबेडकर काही आशेने–अपेक्षेने बघत होते. दिनकरराव जवळकर यांच्या गाजलेल्या 'देशाचे दुष्मन' या पुस्तकावर जेव्हा खटला झाला, तेव्हा जवळकरांच्या बाजूने वकीलपत्र घेऊन त्यांची निर्दोष सुटका करविणारे कायदेपंडित बॅ. आंबेडकरच होते.

पण आंबेडकरांच्या तेजस्वी स्वतंत्र विचारांची आणि त्यांच्या स्वतंत्र चळवळीची झेप जशी उंचावू लागली तसतसा ब्राह्मणेतर पुढाऱ्यांचा त्यांना वेगळा अनुभव येऊ लागला! आंबेडकरांनी जन्मजात विषमतेच्या हिंदू आचारधर्माचे प्रतीक म्हणून ज्यावेळी जाहीरपणे मनुस्मृती जाळली तेव्हा ब्राह्मणेतर चळवळीचे एक अग्रगण्य नेते ना. भास्करराव जाधव यांनी त्याबद्दल जाहीर नापसंती व्यक्त केली; कारण म्हणे मनुस्मृतीमध्ये वाईटापेक्षा चांगलेच जास्त असल्याचा हिशेबी जमाखर्च जाधवरावांना एकाएकी नव्यानेच आठवू लागला! महाडला चवदार तळ्यावर

सत्याग्रह करण्याची घोषणा आंबेडकरांनी केली; आणि त्या चळवळीसाठी ब्राह्मणेतर पुढाऱ्यांचे सहकार्य मागितले. काही ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनी सहकार्य देऊ केले; पण एक अट घातली;–ब्राह्मणांना या चळवळीतून वगळावे, ही ती अट! आणि आंबेडकरांनी ही अट अर्थातच तडकाफडकी साफ फेटाळून लावली! त्यांना ब्राह्मणेतर पुढाऱ्यांचे सहकार्य जरूर हवे होते; पण प्रामाणिक ब्राह्मण कार्यकर्त्यांचेही सहकार्य त्यांना त्यासाठी वगळावयाचे नव्हते. एकाचे सहकार्य मिळविण्यासाठी दुसऱ्याचे सहकार्य नाकारण्याचा हा सौदा आंबेडकरांना मंजूर नव्हता. आंबेडकर तत्कालीन कायदे कौन्सिलांत सरकारनियुक्त आमदार झाल्यानंतर त्यांना ब्राह्मणेतर पुढाऱ्यांचा आणखी काही कटु अनुभव आला. ग्रामीण विभागांतील उच्चवर्णीय ब्राह्मणेतरांची मक्तेदारी व वतनदारी नष्ट करण्याला काही प्रमुख ब्राह्मणेतर पुढाऱ्यांचा विरोध होता. पुढे मंदिर प्रवेश सत्याग्रहासारख्या प्रत्यक्ष कृतीच्या आंदोलनाच्या वेळीही अनेक ब्राह्मणेतर पुढारी व कार्यकर्ते सनातनी ब्राह्मणांच्याच जोडीने विरोधात उभे राहिलेले आंबेडकरांनी पाहिले!

याशिवाय ब्राह्मणेतर चळवळीचा, सत्यशोधक आंदोलनाचा, म. फुल्यांच्या नावाचा उपयोग केवळ मूठभर उच्चवर्णीय ब्राह्मणेतरांच्या हितासाठी सर्रास केला जात असल्याचे आंबेडकरांच्या ध्यानात आले. आणि त्यामुळे त्यांचे मन अगदी विटले. म्हणून तत्कालीन वरिष्ठ ब्राह्मणेतर पुढाऱ्यांना त्यांनी स्वार्थी, अदूरदर्शी, उद्धट, मगरूर, ब्राह्मणांचे अनुकरण करणारे, दुय्यम दर्जाचे ब्राह्मण होण्यासाठी धडपडणारे इत्यादि शेलकी विशेषणे लावलेली आढळतात! फुल्यांचे आणि सत्यशोधक चळवळीचे नाव घेऊन उच्चवर्णीय ब्राह्मणेतर पुढारीपणाची नवी मिरासदारी निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे, याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला. या स्वार्थी पुढाऱ्यांनी (महात्मा फुल्यांचा विश्वासघात) केला आहे, असे जाहीरपणे म्हणण्यासही आंबेडकरांनी कमी केलेले नाही!

आंबेडकरांनी राजकारणात नंतर अधिकाधिक काँग्रेसविरोधी भूमिका घेतली; खुद्द महात्मा गांधींना आव्हान देण्याचे अपूर्व धाडस त्यांनी दाखविले! १९३० च्या चळवळीलाही त्यांनी विरोध केला आणि अखेर १९३२ मध्ये जातीय निवाड्यांतील जातवार प्रतिनिधित्व आणि राखीव जागांच्या प्रश्नावर तर गांधी विरुद्ध आंबेडकर असा सरळ रोखठोक सामना भारतीय राजकारणांत उभा राहिला. त्यांतच गांधींनी प्राणांतिक उपवास करून आपले प्राण पणाला लावले; आणि लोकमताचे प्रचंड भयानक भावनिक दडपण निर्माण होऊन आंबेडकर-गांधी यांच्यामध्ये इतिहासप्रसिद्ध येरवडाकरार झाला. पण येरवडाकरार म्हणजे दिलजमाई नव्हती; ते खरेखुरे मनोमीलन नव्हते. उलट विशिष्ट भावनिक-राजकीय दडपणाखाली झालेली ती एक नाखुषीची तडजोड होती. अर्थात त्यामुळे तत्कालिन प्रश्न मिटला–ताण सुटला; तरी स्पृश्य आणि अस्पृश्य; काँग्रेस आणि आंबेडकर, राष्ट्रीय चळवळ आणि सामाजिक समतेची

चळवळ यामधील दरी अधिकच रुंदावली; त्यांमधील परस्पर संबंध अधिकच कटू झाले !

गांधीजींनी नंतर 'हरिजन सेवक संघ' काढला; आपल्या मुखपत्राला 'हरिजन' असे नाव दिले; हरिजन कार्याला आपल्या एकूण कार्यक्रमात महत्त्वाचे स्थान दिले. तरीसुद्धा संबंध सुधारले नाहीत; उलट अधिकाधिक बिघडतच गेले ! " उच्चवर्णीयांची दया, त्यांनी करावयाचा उद्धार " विरुद्ध स्वाभिमानी, स्वावलंबी, स्वतंत्र आंदोलन, असाच खरोखर हा रोकडा सवाल होता ! इथे केवळ गांधीजींच्या वैयक्तिक प्रामाणिकपणाचा प्रश्न नव्हता; एकूण तात्विक, सामाजिक, राजकीय भूमिकेचाच प्रश्न होता.

गांधीजी विरुद्ध आंबेडकर

गांधीजी विरुद्ध आंबेडकर हा संघर्ष मूलतः राजकीय नव्हता; केवळ वैयक्तिक तर मुळीच नव्हता. दोघांच्या मूलभूत तात्विक भूमिका सर्वस्वी भिन्नच नव्हे, तर परस्परविरोधी होत्या. गांधीजी मानवतावादी, उदारमतवादी निस्संशय होते. पण ते उद्धारवादीही होते; हिंदुसमाजाला प्रायश्चित-पश्चात्तापद्वारे ते शुद्ध करू पहात होते ! याशिवाय आंबेडकर–गांधीजी वादाच्या मुळाशी त्याहूनही मूलभूत भूमिकेचा फरक होता, हेही ध्यानात ठेवले पाहिजे. आंबेडकर हे फुल्यांप्रमाणेच चातुर्वर्ण्य–जन्मजात विषमता संपूर्णपणे नष्ट करावयाला निघाले होते. उलट गांधीजी हे कितीही मानवतावादी–उदार मनस्क असले तरी ते संस्कारांनी, निष्ठेने, सनातनी हिंदूच होते, ही गोष्ट विसरता कामा नये. गांधी–आंबेडकर वादातील प्रत्येक समर–प्रसंगांत गांधीजींनी सनातन्यांची–फार काय हिंदूमधील जातीसंस्थेची वकिलीच केल्याचे दिसून येते ! जातीभेद स्वाभाविक–नैसर्गिक आहेत; जातीमुळे समाजाला 'स्थैर्य' लाभलेले आहे, असे समर्थन गांधीजींनी वारंवार केल्याचे आढळते. फार काय भंग्याने उदारनिर्वाह भंगी म्हणूनच करावा, ते त्याचे कर्तव्यच आहे, असे गांधीजींनी बिन-दिक्कत म्हटलेले आहे ! फक्त वकील, डॉक्टर यांच्याइतकाच भंगी हा 'व्यवसाय' ही 'सन्मान्य' आहे, अशी ग्वाही गांधीजींनी दिली आहे इतकेच !

आंबेडकरांनी अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदार संघ मागितले, तेव्हा गांधीजींच्या पुढारीपणाच्या अहंकाराला आव्हान मिळाले म्हणूनच केवळ ते अस्वस्थ झाले नाहीत; आंबेडकरांनी इतर सवर्ण हिंदूसमाजापासून फारकत घेतली, त्यांच्यावर अविश्वास दाखविला, ही खरी गांधीजींची व्यथा होती ! आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा केली तेव्हा तर त्यांनी हिंदुधर्मालाच आव्हान दिले असल्याचे दुःख इतर सनातनी हिंदूंइतकेच गांधीजींनाही झाले ! तेव्हा आंबेडकर-गांधीजी यांच्या वादात, केवळ हिंदुधर्माचेच नव्हे तर परंपरागत जातीधर्माचेसुद्धा समर्थक म्हणून गांधीजी पुढे आले, हा आंबेडकरांचा मुख्य राग होता. म्हणूनच गांधीजींची मानवता, उदारता, साधुता, प्रामाणिकपणा यांची जाणीव ठेवूनही आंबेडकरांना केव्हाही त्यांचे आकर्षण

वाटू शकले नाही; उलट त्यामुळे त्यांच्या मनातील गांधीविरोधी आढी अधिकच घट्ट होत गेली !

गांधीजींविरुद्ध उघड झुंज घेऊनही आंबेडकरांनी आपला स्वाभिमानी अनुयायीवर्ग टिकविला. राजकीय दडपण, सामाजिक बहिष्कार, आर्थिक कोंडी, महार विरुद्ध इतर अस्पृश्य अशा फाटाफूट पाडावयाचा प्रयत्न, आणि अखेर निर्भेळ, निर्घृण गावगुंडगिरी या आणि असल्या सर्व प्रकारांना तोंड देऊन आंबेडकर टिकले, पुरून उरले हे खरेच आहे. आंबेडकरांच्या पुढारीपणाचा कस लागला;–अत्यंत खडतर अशा अग्निदीव्यांतून त्यांचे बावन्नकशी सोने सिद्ध झाले होते.

पण तरी एकूण परिणाम काय झाला ? राजकारणात काँग्रेसविरुद्ध आंबेडकर हे समीकरण पक्के आणि अखेरचे ठरले. राजकारणांतील डावपेचांमध्ये आंबेडकरांना इंग्रजांचे हस्तक ठरविण्यात काँग्रेसने यश मिळविले ! हा प्रचार करणारांनी आंबेडकरांचे काय नुकसान केले असेल ते असो; पण खुद्द राष्ट्रीय आंदोलनाचे, स्वातंत्र्यलढ्याचेही त्यामुळे केवढे अपरिमित नुकसान होत आहे, याचा विचारही तेव्हा कोणाला सुचला नाही ! स्वातंत्र्य मिळेपर्यंत नाही; नंतरही नाही, स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास लिहिताना सुद्धा नाही ! राजकारणाची सविस्तर, सोपपत्तिक चर्चा करण्याचे हे स्थळ नव्हे, म्हणून हा विषय एथेच सोडू.

पण समाजकारणाचे काय ? खास महाराष्ट्राच्या दृष्टीने बोलावयाचे तर फुल्यांच्या शुद्रा-अतिशुद्रांच्या आंदोलनाचे काय ? हा प्रश्नही फारसा कुणाला सुचला नाही, कुणी त्यामुळे व्यथित झाला नाही, ही खरी शोकांतिका आहे !

ही फारकत फार महाग पडली आहे !

खरी गोष्ट अशी आहे की, आंबेडकरांची सत्यशोधक चळवळीशी झालेली ही फारकत एकूण महाराष्ट्राला फार महागात पडलेली आहे. सत्यशोधक चळवळीला पुढील कक्षा दाखविणारी, फुल्यांच्या मूळ प्रेरणांची सतत आठवण करून देणारी, एकप्रकारे त्या चळवळीची सदसद्विवेकबुद्धी अशी जरब उत्पन्न करणारी शक्ती व त्यामुळे नाहीशी झाली ! विशेषतः १९३७ मध्ये सत्तेची पहिली चटक लागल्यानंतर खरोखर म. फुल्यांची व त्यांच्या मूलभूत प्रेरणांची–(विशेषतः शूद्र-अतिशूद्र स्त्रिया यांच्याशी इमान राखण्याची) नितांत गरज होती. पण नेमक्या त्याच वेळी ही फारकत अधिकच घट्ट झाली ! परिणामी, सत्यशोधक चळवळ म्हणून असणारा सामाजिक समतेचा दबाव, समाजांतील वेगवेगळ्या थरांपर्यंत पोचून दलितांच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी आवश्यक ते प्रामाणिक प्रयत्न, ती तळमळ दुर्मिळ झाली ! ब्राह्मणेतर आणि सत्यशोधक चळवळीचा उपयोग आपल्या हितासाठी करण्याचा सत्ताधारी गटांचा मार्ग सुकर झाला ! याहूनही वाईट गोष्ट म्हणजे फुल्यांच्या नावाचा, प्रतिष्ठेचा, परंपरेचा उपयोग सर्रास करण्याची संधी उच्चवर्णीय–उच्चवर्गीय

सत्ता-गटांना अनायासे मिळाली ! म्हणजे फुल्यांचे अनुयायी म्हणविणारे सत्तेवर आले आणि त्याचवेळी एक प्रकारे फुल्यांच्या शिकवणीला दुसऱ्यांदा विजनवासांत जाण्याची पाळी आली ! फुल्यांचे पुतळे उभारणे, त्यांचे जन्मदिन साजरे करणे, वगैरे कामी पुढाकार घेणे सत्ताधाऱ्यांना सोपे झाले. द्रष्ट्याला देव्हाऱ्यात बसवून त्याची प्रेरणा, शिकवण मात्र बासणांत गुंडाळून ठेवण्याचे नेहमीचे तंत्र सत्ताधारी गटाने अत्यंत यशस्वीपणे आणि उजळ माथ्याने अंमलात आणले आणि त्यांना हटकणारे फारसे कुणी निघाले नाहीत !

सत्तेच्या उंबरठ्यावर—

१९४० पासून १९४७ पर्यंत स्वातंत्र्यलढ्याचे अखेरचे पर्व सुरू होते; त्यामुळे राजकारण प्रभावी ठरणे, त्या मानाने समाजकारणाला—समतेच्या लढ्याला दुय्यम स्थान प्राप्त होणे स्वाभाविक होते, अपरिहार्य होते; हा युक्तिवाद फसवा किंबहुना ढोंगीपणाचाच समजला पाहिजे. खरे म्हणजे स्वातंत्र्योन्मुख देशालाच सामाजिक समतेच्या-न्यायाच्या लढ्याची जास्तीत जास्त गरज वाटायला हवी. कारण आता स्वातंत्र्यानंतर येणारी सत्ता कोणाच्या हाती जाणार, हा प्रश्न अगदी व्यावहारिक आणि प्रत्यक्ष प्रश्न म्हणून उभा राहिलेला असतो. शोषक, भांडवली, सरंजामी वरीष्ठवर्णीय—वरिष्ठवर्गीयांच्या हाती सत्ता जाणार की, शूद्र-अतिशूद्रांच्या, शोषित, दलित, श्रमिकवर्गाच्या हाती जाणार, हा प्रश्न धसाला लावण्याची वेळ आलेली असते. याच वेळी खरे म्हणजे फुल्यांच्या मूळ प्रेरणा, मूळ दलित-शोषित—श्रमिकवर्गाशी त्यांचे असलेले इमान, याची नितांत गरज होती. आणि नेमक्या याच वेळी बहुजन-समाजाचे त्याच्या हातातील मुख्य वैचारिक शस्त्र म्यान झाले होते ! परिणामी भांडवली-जमीनदारी-शोषकवर्गीय गट (हेच उच्चवर्णीयही होते) सुखेनैव बहुजन-समाजाच्या नावे बोलू शकले; सत्ता हडपू शकले आणि थोड्याच काळात खुद्द बहुजन-समाजाच्या मानगुटीलाही भूतासारखं बसू शकले ! खरे म्हणजे फुल्यांना अभिप्रेत असलेल्या शूद्र-अतिशूद्रांच्या चळवळीला, नव्या संदर्भात श्रमिकांच्या क्रांतिकारक वर्गीय लढ्याचे—वर्गसंघटनेचे लढाऊ रूप द्यावयाला हवे होते. निदान फुल्यांचे नाव सांगणारांनी श्रमिकांच्या वर्गलढ्यासाठी वाहून घेतलेल्या क्रांतिकारक कम्युनिस्ट शक्तींशी आपले नाते जोडायला हवे होते. राष्ट्रीय लढ्याच्या नावाने भांडवली, सरंजामी गटांचे हित साधणाऱ्या पुढारी गटांशी कठोरपणाने फारकत घ्यायला हवी होती. आंबेडकरांना केवळ महारांचे पुढारी म्हणून हिणविणे किंवा महारेतरांना त्यांच्या-विरुद्ध चिथावणे, किंवा आंबेडकरांना आणि कम्युनिस्ट वर्गसंघर्षवाद्यांना ब्रिटिशांचे हस्तक ठरविणे, हा व्यावहारिक डावपेच वेळोवेळी फार गोड वाटला असेल ! पण त्याच्या अंतीम परिणामांचा विचार तेव्हा कोणी फारसा केलेला दिसत नाही ! परिणाम एवढाच झाला की, राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या नावाने उच्चवर्णीय-उच्चवर्गीय

भांडवली, सरंजामी गटांनी सत्ता बिनबोभाट बळकावली ! आता काय फुल्यांच्या बहुजनसमाजाच्याच हाती प्रथमच सत्ता येत आहे, अशीसुद्धा जनतेची समज करून देण्यातही काही काळ तरी सत्ताधारी गटाने यश मिळविले ! फुल्यांच्या प्रेरणांशी खरेखुरे इमान राखणाऱ्या किंवा स्वतःला समाजवादी म्हणविणाऱ्यांना फार नंतर जाग आली. तीही त्यांच्यावरच नवसत्ताधाऱ्यांनी प्रत्यक्ष हल्ला सुरू केला तेव्हाच !



मनुस्मृती जाळणारा आधुनिक भारताचा आद्य स्मृतिकार !

आंबेडकरांना ब्रिटिशांचे हस्तक ठरवून बदनाम करण्यात ज्यांचा जन्म गेला, त्यांनीच सत्तांतरानंतर आंबेडकरांना घटना परिषदेत आणि खुद्द नेहरू-पटेल मंत्रिमंडळात मानाचे स्थान दिले ! आंबेडकरांनीही झाले गेले विसरून, स्वतंत्र भारताचे नवे संविधान घडविण्याची ऐतिहासिक कामगिरी अंगावर घेतली आणि ती तितक्याच असामान्य कुवतीने आणि कार्यक्षमतेने पार पाडली. मनुस्मृती जाळण्याबद्दल आंबेडकरांवर जन्मभर शिव्या-शापांचा वर्षाव करणाऱ्यांवरच आता स्वतंत्र भारताचे आद्य स्मृतिकार म्हणून त्यांचा गौरव करण्याची पाळी आली ! कालबाह्य विषमतेवर–गुलामगिरीवर आधारलेली मनुस्मृती जाळणारा हा क्रांतिकारक स्वतः नवस्मृतिकार होता, याची जाणीव एक संबंध कालखंड उलटून गेल्यानंतरच या मंडळींना एकाएकी साक्षात्कार झाल्यासारखी झाली !

स्वतंत्र भारताच्या संविधानाचे शिल्पकार म्हणून आंबेडकरांचा जो गौरव झाला, तो यथा योग्यच होता. त्यामुळे आंबेडकर हे त्यांच्या इतर थोर थोर समकालीनांमधून उमटून वेगळे पडले, आणि प्रत्येक बदलत्या कालखंडातील मूलभूत कायदा घडविणाऱ्यांच्या (घटनाकारांच्या–स्मृतिकारांच्या) मालिकेत त्यांना ऐतिहासिक स्थान प्राप्त झाले. वर्तमानातील एका नवयुग–प्रवर्तकांचे उच्चस्थान टिकवून, त्याचवेळी इतिहासातील स्थान मिळविण्याची ही अद्भूत घटना होती !

आंबेडकरांना मिळालेल्या या अपूर्व मानामुळे आणि स्थानामुळे, त्यांच्या अनुयायांचे (एकूण अस्पृश्य-मागासवर्गांचेच) समाजातील मान–स्थानही एकदम उंचावले यात शंका नाही; त्यांच्या स्वाभिमानाला एक नवी भक्कम–बैठक–आधारशिला निर्माण झाल्यासारखे त्यांना वाटले असल्यास त्यात नवल नाही.

स्वतंत्र भारताच्या संविधानात अस्पृश्यता नष्ट करण्याची–अस्पृश्यता हा गुन्हा ठरविण्याची तरतूद करण्यात आली. आणि सतत शंभर वर्षे फुल्यांपासून, आंबेडकरांपर्यंत वेगवेगळ्या महान सामाजिक क्रांतिकारकांनी अत्यंत बिकट परिस्थितीमध्ये जो खडतर लढा केला, त्याची यशस्वी सांगता खुद्द आंबेडकरांच्याच हस्ते

घटनेतील या कलमामुळे झाली ! नव्या स्मृतीला मंजुरी देताना, अवघ्या २५ वर्षांपूर्वीच आंबेडकरांनी मनुस्मृती जाळली होती, त्यामागील क्रांतिकारक वृत्तीला व कृतीलाच एकप्रकारे आता मान्यता मिळाली होती. हजारो वर्षे श्रुतिस्मृतींच्या नावावर चाललेला अन्याय आता एका अस्पृश्याने घडविलेल्या नव्या 'स्मृती 'मार्फत नष्ट होणार होता !

भारतीय संविधान आणि सामुदायिक आंदोलनाचा हक्क

स्वतंत्र भारताची नवी घटना घडविल्यानंतर काही एका प्रमाणांत भारताचे राजकीय उद्दिष्ट साकार झाले. तेव्हा आता स्वतंत्र भारतात लढाऊ आंदोलन, प्रत्यक्ष प्रतिकार, सत्याग्रह वगैरे मार्गांना स्थान नाही, असा एक पुकारा आंबेडकरांचे नाव घेऊन कधी कधी केला जातो. मर्यादित अर्थाने आंबेडकरांचे अशा आशयाचे एखादे वक्तव्य काढून दाखविणे शक्यही आहे.

पण मुख्य मुद्दा असा आहे की, घटनेच्या प्रास्ताविकात, किंवा मार्गदर्शक आदेशांत किंवा मूलभूत हक्कांत अनेक गोष्टी नोंदविल्या असल्या, तरी त्या प्रत्यक्ष व्यवहारांत आपोआप उतरणे शक्य नव्हते. त्याचप्रमाणे राजकीय बाबींपेक्षाही नव्या नव्या सामाजिक, आर्थिक, वर्गीय हक्कांना त्यांच्या संरक्षणाला नव्यानेच वाढते महत्त्व येणार होते. भारतीय स्वातंत्र्याच्या आणि सामाजिक समतेच्या लढ्याची परंपरा बघितली तरी तेथेही प्रथम आंदोलन, प्रत्यक्ष कृती, सत्याग्रह, प्रखर सामुदायिक लढे, प्रत्यक्ष प्रतिकार, त्यामार्गे विशिष्ट हक्क अधिकाराचा लढा धसाला लागणे,— आणि मगच त्याला कायद्याच्या रूपाने मान्यता मिळणे; नंतर पुन्हा त्या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी, तो अधिक सुधारण्यासाठी पुन्हा आंदोलन करणे हाच घटनाक्रम, विकासक्रम दिसतो.

आंबेडकरांनाही हा विकासक्रम पूर्णपणे अवगत होता, मान्य होता. त्यांनी जन्मभर त्याच सूत्राचा स्वतः अवलंब केला होता आणि आपल्या लक्षावधी अनुयायांनाही त्यांनी तीच शिकवण दिली होती. तेव्हा स्वातंत्र्यानंतर आंबेडकरांनी प्रत्यक्ष लढाऊ आंदोलन, प्रत्यक्ष प्रतिकाराची चळवळ बाद ठरविली होती, केवळ मतपेटी व सनदशीर चळवळच त्यांना अभिप्रेत होती, असा बोभाटा त्यांच्या मृत्युनंतर करणे म्हणजे आंबेडकरांच्या तेजस्वी प्रेरणेचा, शिकवणीचा, त्यांच्या ज्वलंत जीवनाचा, त्यांनी जन्मभर एकामागून एक केलेल्या विविध आंदोलनांचा घोर विपर्यास करण्यासारखे होईल ! आणि या गोष्टीचा प्रत्यक्ष प्रत्ययही लवकरच आला !

आंबेडकरकृत घटनेला पडलेल्या मर्यादा

—शिवाय आंबेडकरांनी तयार केलेल्या घटनेलाही काही मर्यादा पडल्या होत्या. त्या घटनेची अंगभूत संभाव्य शक्ती अत्यंत मोठी होती, यांत शंकाच नाही.

पण अखेर ती भांडवलदारी—अर्धसरंजामदारी जनतंत्राचीच घटना होती, यातही शंका नाही. खाजगी मालकी हक्काला, मूलभूत हक्काचा घटनासिद्ध स्वयंभू दर्जा त्या घटनेत मिळालेला होता; आणि गेली २५ वर्षे ही गोष्ट श्रमिक जनतेला आणि तिच्या आकांक्षांना, आंदोलनांना सतत मारक ठरत होती. पुढे श्रमिकांचे सतत आंदोलन झाले, त्याची तीव्रता व उग्रता सतत वाढत गेली; त्यांमध्ये सारा समाज ओढला जाऊ लागला, तेव्हाच घटनेमध्ये पुन्हा एकदा ऐतिहासिक दुरुस्ती होऊ शकली! खुद्द आंबेडकरांनाही या गोष्टीची जाणीव होती;—बोचणी-टोचणी होती. म्हणूनच नेहरू सरकारमधून बाहेर पडताच आंबेडकरांनी घटनेतील या उणीवेवर नेमके बोट ठेवले. घटनेतील ती तरतूद काँग्रेसमधील भांडवली-सरंजामी गटांनी—त्यांच्या वल्लभभाई प्रभृती नेत्यांनी केली होती. म्हणूनच त्या कलमांची जबाबदारी आंबेडकरांनी नंतर नाकारली! (त्याबाबत मी केवळ 'लेखकु' होतो, असे आंबेडकर म्हणाल्याचे प्रसिद्धच आहे.)

तीच गोष्ट हिंदू कोड बिलासंबंधी. विवाह, मालमत्तेचा हक्क, वारसाहक्क, दत्तक इत्यादींबाबतींतील अन्याय (विशेषतः स्त्रियांना बोचणारा विषम न्याय) दूर करणाऱ्या विविध सामाजिक सुधारणासंबंधी, आंबेडकरांनी मोठ्या मेहनतीने व कसोशीने नवी स्मृती तयार केली. तिला खुद्द नेहरूंचा पाठिंबा असताही, ती संमत होऊ शकली नाही! आंबेडकरांनी त्याबाबत बरेच प्रयत्न केले. खुद्द नेहरूंनीही त्रागा केला; तरी फारसा उपयोग झाला नाही! अखेर आंबेडकरांच्या हातून हे काम पूर्ण होऊ शकले नाही. पुढे अनेक वर्षांनंतर हिंदू कायद्यांतील या दुरुस्त्या, फुटकळ स्वरूपांत होत राहिल्या; खरे म्हणजे अजूनही त्या पूर्ण झालेल्या नाहीतच! आणि मुसलमानांना त्यांचा फायदा अजूनही मिळू शकत नाही. 'मुस्लीम पर्सनल लॉ'मधील दुरुस्त्या अडविण्याचे महत्कृत्य हिंदू आणि मुसलमान सनातन्यांनी, जनसंघ आणि मुस्लीम लीग यांनी एकत्र येऊन, सध्या कसोशीने चालविले आहे!

'मी चुकीचे मित्र निवडले!'

घटना घडविण्याचे कार्य संपविल्यानंतर १९५२ मध्ये होऊ घातलेल्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या तोंडी, आंबेडकरांनी पुन्हा एकदा परिस्थितीचे नव्याने मूल्यमापन केले आणि मंत्रिमंडळ सोडले. त्यापूर्वीच काँग्रेसमधील डावे गट बाहेर गेलेले होते. कम्युनिस्टांना आधीच काढून टाकले होते; वेगवेगळे सोशालिस्ट गट, फॉर्वर्ड ब्लॉक, महाराष्ट्रातील फुलेनिष्ठ बहुजनसमाजवादी शे. का. पक्ष वगरे गट काँग्रेसमधून बाहेर पडले होते. त्यातून आंबेडकरांनी जयप्रकाश, अशोक मेहतांच्या सोशालिस्ट पक्षाशी युती केली; पण ती केल्यामुळे कम्युनिस्ट, शे. का. पक्ष वगैरे मार्क्सवादी शक्तींशी सामना होण्याचा दुर्दैवी प्रसंग ओढवला! त्यावेळी सोशालिस्टांशी केलेली युती चुकीची ठरली ('मी चुकीचे मित्र निवडले') ही गोष्ट पुढे आंबेडकरांनीच मोकळ्या

मनाने मान्य केली. ही चूक दुरुस्त करण्याची संधी संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाच्या निमित्ताने आली. आणि महाराष्ट्रातील कम्युनिस्ट, शे. का. पक्ष, सोशालिस्ट वगैरे सर्व डाव्या शक्तींबरोबर आंबेडकरांनी आपली भीमशक्ती उभी केली.

संयुक्त महाराष्ट्र लढा

महाराष्ट्राच्या इतिहासातील एक लहानसा पण अत्यंत उज्ज्वल असा संघर्ष त्यामुळे शक्य झाला. गेल्या शंभर वर्षांत महाराष्ट्रात जे काही महान संघर्ष झाले; विचारप्रवाह उत्पन्न झाले, लोकोत्तर नेते होऊन गेले–त्या सर्वांमधील जे उत्कृष्ट होते, इष्ट होते, पुरोगामी होते, बहुजनांच्या हिताचे होते ते सारे संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यामध्ये एकत्र आले. जे हीणकस होते, ते दबले गेले. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या स्वरूपात महाराष्ट्रातील या शिवशक्तीचे-शुभशक्तींचे भीमदर्शन घडले! आधुनिक महाराष्ट्रातील श्रेष्ठ नेत्यांच्या—फुले, टिळक, आंबेडकर, यांच्या परंपरांचे नाव त्यावेळी महाराष्ट्राने शिवछत्रपतींच्या जोडीने एकत्र एकमुखाने घेतले! आणि महाराष्ट्रातील सर्व लोकशाही–पुरोगामी शक्ती डाव्या पक्षांच्या नेतृत्वाखाली प्रथमच एकत्र आल्या. आणि त्यांनी भांडवली, सरंजामी प्रतिस्पर्धी राज्यकर्त्या शक्तीचा (एका विशिष्ट प्रश्नाबाबत का होईना–तात्कालिक का होईना–पण) निश्चितपणे पराभव केला.



रिपब्लिकन पक्षः आंबेडकरांचे नवे राजकीय हत्यार

—पण नवा महाराष्ट्र निर्माण झाल्याचे पाहण्यास डॉ. आंबेडकर जगले नाहीत! नवा महाराष्ट्र त्यांच्या मार्गदर्शनास मुकला, ही एक अत्यंत दुर्दैवी घटना समजली पाहिजे. पण मृत्यूपूर्वी आंबेडकरांनी आपल्या समाजाला, अनुयायांना आणि एकूण देशाला दोन देणग्या दिल्या होत्या. बौद्ध धर्म आणि रिपब्लिकन पक्ष या त्या दोन देणग्या होत.

डॉ. आंबेडकरांनी नवा रिपब्लिकन पक्ष स्थापन करण्याची घोषणा केली; याचाच अर्थ असा की, राजकीय दृष्ट्या त्यांनी एक नवी भूमिका घेतली होती. युद्धकाळापासून असलेली शेडयूल कास्ट्स् फेडरेशन ही आपली जुनी वर्गीकृत जातींवर आधारलेली राजकीय संघटना त्यांनी बरखास्त केली. एक नवा व्यापक डावा राजकीय पक्ष स्थापन करण्याचा त्यांचा मानस होता, हे उघड आहे. आपल्या दलित जाती–जमातींची संघटना आणि व्यापक डावा पक्ष असे दोन पर्याय आंबेडकरांपुढे सतत त्यांच्या संबंध आयुष्यभर होते. अगदी प्रारंभीच्या काळातील मुख्यतः सामाजिक प्रश्नांशी निगडित असलेल्या संघटना सोडल्या, तरी आंबेडकरांनी प्रत्यक्ष

राजकीय क्षेत्रात पदार्पण केल्यानंतरही हे दोन्ही पर्याय त्यांनी आळीपाळीने वापरल्याचे दिसून येते. १९३६ पर्यंत दलित फेडरेशन, नंतर स्वतंत्र मजूर पक्ष (१९३६ ते ४०); त्यानंतर युद्धकाळात व नंतर शे. का. फेडरेशन आणि अखेर मृ यूपूर्वी ही नव्या रिपब्लिकन पक्षाची घोषणा अशा हा आलटून.पालटून केलेल्या प्रयोगांचा क्रम दिसतो.

स्वतंत्र मजूर पक्ष आणि शे. का. फेडरेशन

युद्धपूर्व काळातील स्वतंत्र मजूर पक्ष आणि १९५६ नंतरचा रिपब्लिकन पक्ष यांत फरक होता. लढाईपूर्वी अस्पृश्य-मागास जाती-जमातींच्या अखिल भारतीय आंदोलनाचे जरी आंबेडकर हे प्रणेते होते, तरी स्वतंत्र मजूर पक्ष हा राजकीय पक्ष मुख्यतः पश्चिम महाराष्ट्रातच मर्यादित होता. त्याने दलितांच्या विविध प्रश्नांबरोबरच, डाव्या, लोकशाही चळवळीच्या व्यापक भूमिकाही स्वीकारल्या होत्या; आणि त्यासाठी कम्युनिस्ट व इतर डाव्या लोकशाही शक्तींबरोबर वेळोवेळी सहकार्यही केले होते. कामगार, भूमिहीन, शेतमजूर, आदिवासी, मागास जमातीचे प्रश्न, त्याचप्रमाणे लोकशाही, नागरिक, ट्रेड युनियन हक्क वगैरे प्रश्नांवर या पक्षाच्या प्रचाराचा व आंदोलनाचा भर होता. युद्ध आणि नंतरच्या काळात शे. का. फेडरेशनच्या नावाने जी आंदोलने झाली, त्यांचे स्वरूप मात्र बरेचसे निराळे होते. वर्गीकृत जातीजमाती, त्यांचे हक्क, प्रतिनिधित्व, शिक्षण, नोकऱ्या आणि या प्रश्नांशी संबंधित राजकारण; तेही युद्धाच्या व नंतरच्या अपेक्षित सत्तांतराच्या गुंतागुंतीच्या पार्श्वभूमीवर; असा त्यांचा संदर्भ होता आणि तद्नुसार शे. का. फेडरेशनने मुख्यतः भूमिका घेतल्या; काही प्रमाणात स्वतंत्र चळवळीही केल्या.

रिपब्लिकन पार्टी : व्यापक पुरोगामी पक्ष ?

पण १९५६ मध्ये योजलेला रिपब्लिकन पक्ष हा स्वतंत्र भारतामधील पक्ष होता. सत्तांतर होऊन मूठभर भांडवली, सरंजामी शक्तींनी सर्वसत्ता हडपली होती. डाव्या पुरोगामी चळवळीवर त्यांनी चौफेर हल्ले चढविले होते. त्याचवेळी नव्या घटनेमुळे आणि सार्वत्रिक मताधिकारामुळे निवडणुकींनाही असाधारण महत्त्व प्राप्त झाले होते. अशा परिस्थितीत रिपब्लिकन पक्षाची घोषणा आंबेडकरांनी केली होती. १९५२ च्या निवडणुकीतील अनुभवही त्यांनी जमेस धरलेला होता; वेगवेगळ्या उजव्या, डाव्या शक्तींचे आणि पक्षांचे बलाबलही त्यांच्या नजरेसमोर होते. १९५७ च्या निवडणुकाही त्यांच्या डोळ्यासमोर होत्या. अशा परिस्थितीत रिपब्लिकन पक्षाची घोषणा म्हणजे एका व्यापक पुरोगामी डाव्या अखिल भारतीय पक्षाची घोषणा होती. सर्व मागास जाती-जमातींचा सामाजिक पाया तर त्याला असणारच होता; पण त्याच्या जोडीला अस्पृश्येतर ग्रामीण गोरगरीब, भूमीहीन, आदीवासी, त्याचप्रमाणे शहरी कामगार, मध्यमवर्ग यांच्याशीही समानतेच्या–समान संघर्षातील सहकार्याच्या भूमिकेतून

संबंध जोडण्याची आकांक्षा-आत्मविश्वासही त्यामध्ये होता. थोडक्यात म्हणजे सर्व मागास दलित जाती-जमाती आणि सर्व शोषित-श्रमिक जनता यांच्या व्यापक एकजुटीवर आणि सहकार्यावरच या नव्या पक्षाचा भर असणार होता हे उघड आहे.

खरोखर, आंबेडकरांचा मृत्यू या दृष्टीने अकाली वाटतो. त्यांच्या ऐतहासिक जीवनातील सर्वांत महत्त्वाच्या अशा ज्या दोन घोषणा त्यांनी अखेरीस केल्या, त्या तडीस नेण्यासाठी ते स्वतः जिवंत राहू नयेत, याची अतिशय हळहळ वाटते. आंबेडकरांच्या या अकाली निधनामुळे त्यांच्या अखेरच्या दोन्ही घोषणांची अखेर अगदी परवड निघाली, असे म्हटले तर त्यात मुळीच अतिशयोक्ती होणार नाही.

रिपब्लिकन पक्ष व समिती

रिपब्लिकन पार्टी म्हणजे एक पुरोगामी डावा पक्ष व्हावा; शूद्र-अतिशूद्र दलित, शोषित, श्रमिकांच्या हिताच्या दृष्टीने कणखर, लढाऊ, एकजुटीच्या—आंदोलनाचे एक प्रभावी हत्यार त्याने बनावे, अशी त्यांची अपेक्षा होती. सुदैवाने १९५६ मधील सं. म. समितीच्या आंदोलनात महत्त्वाची भागीदारी करून, या पक्षाच्या कार्याचा शुभारंभ महाराष्ट्रात तरी नक्की झाला. महाराष्ट्रात अभूतपूर्व अशा लढ्यातील, निवडणुकीतील, आंदोलनातील अपूर्व यशांमध्ये सहभागी होण्याची संधी त्याला मिळाली होती. स्पृश्य आणि अस्पृश्य हे समाज प्रथमच इतक्या जवळ आले; प्रथमच खरेखुरे सामाजिक अभिसरण इतक्या मोठ्या व्यापक प्रमाणावर महाराष्ट्रभर होऊ लागले. अस्पृश्यांचे खरेखुरे लढाऊ, विश्वासू प्रतिनिधी प्रथमच मोठ्या प्रमाणावर ग्रामपंचायतीपासून, जिल्हा परिषदा, विधानसभा, लोकसभा, राज्यसभेमध्ये मानाने समानतेच्या भावनेने बसू शकले.

याचबरोबर ट्रेड युनियन्स, किसान सभा, वगैरे जनसंघटनांमध्ये, जनआंदोलनांमध्ये, वर्गलढ्यामध्ये इतरांच्या बरोबरीने अस्पृश्य समाजही भाग घेऊ लागला. मुंबईच्या व्यापक एकजुटीच्या बलाढ्य गिरणी कामगार युनियनमध्ये, कम्युनिस्ट–सोशालिस्टांच्या बरोबरीने रिपब्लिकन पक्षाने भागीदारी केली. सोलापूर, नागपूर, खानदेश, वगैरे गिरणीकेंद्रांतही याच धर्तीवर, एकजुटीच्या बलाढ्य युनियन्स स्थापन झाल्या. गिरणी कामगारांप्रमाणेच विडी कामगारांमध्येही कम्युनिस्ट-रिपब्लिकन यांचे सहकार्य प्रभावी झाले. स्थानिक स्वराज्य-संस्थांमधील मुख्यतः अस्पृश्य कामगारांच्या पायावर बलिष्ट युनियन्स महाराष्ट्रभर स्थापन होऊन, त्यांचे प्रश्न आणि मागण्या प्रथमच धसास लागल्या. कामगारक्षेत्रातील हे लोण लवकरच ग्रामीण क्षेत्रामध्येही पसरले. अस्पृश्य–त्याचप्रमाणे स्पृश्य-भूमिहीन यांना जमीन मिळण्यासाठी कम्युनिस्ट आणि रिपब्लिकन यांच्या एकजुटीने महाराष्ट्रभर प्रचंड आंदोलने झाली आणि त्यांच्या परिणामी हजारो अस्पृश्यांना प्रथमच जमिनी मिळाल्या. खरोखर, महाराष्ट्रामध्ये असे आशादायक, स्फूर्तिदायक वातावरण १९५६ पूर्वी कधीही दिसले नव्हते आणि

१९६० नंतरही दुर्दैवाने पुन्हा कधी दिसू शकले नाही! बाबासाहेबांनी दीक्षा दिलेला नवबौद्ध समाज आणि त्यांच्या आदेशानुसार स्थापन झालेला रिपब्लिकन पक्ष यांचा शुभारंभ इतक्या अनुकूल आणि आशादायक वातावरणात झाला.

पण संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली; ती समितीची फाटाफूट करूनच! स्वातंत्र्य लढ्याप्रमाणेच यावेळीही झाले. मैदानात लढले एक; सत्तेवर चढले दुसरेच– भलतेच! सत्ताबाजांची सत्ता निरंकुश होण्यासाठी समिती फोडणे आवश्यकच होते; त्याकामी समितीमधीलच प्र. स. पक्षानेही ना. चव्हाणांशी मनःपूर्वक सहकार्य केले! आणि महाराष्ट्राच्या इतिहासात पूर्वी कधीही न झालेली दलित-श्रमिक जनतेची एकजूट फोडण्याचे शतकृत्य–पुण्यकृत्य त्यांनी पार पाडले!

—पण समितीची एकजूट टिकविण्याच्या कार्यात रिपब्लिकन पक्षाने— विशेषतः श्री. दादासाहेब गायकवाड यांनी अगदी अखेरपर्यंत कम्युनिस्ट, शे. का. पक्षाशी सहकार्य केले, ही गोष्ट इथे नमूद केली पाहिजे. पण समितीची एकजूट टिकू शकली नाही; आणि जनतेचा तेजोभंगही फार काळ टळू शकला नाही. आणि यानंतर रिपब्लिकन पक्षाची खरी कसोटीची वेळ आली.

रिपब्लिकन पक्षाची चौफेर वाताहत!

समितीची फाटाफूट होताच, आंबेडकरांचा एकसंघ, पोलादी एकजुटीचा रिपब्लिकन पक्ष आणि बौद्ध जनता यांना आपल्या म्हणजे राज्यकर्त्या उच्चवर्णीय-वर्गीय गटांच्या कच्छपी लावण्यासाठी श्री. यशवंतराव चव्हाण टपून बसलेलेच होते! त्यांनी लवकरच सामाजिक अभिसरणाच्या सोज्ज्वळ नावाखाली रिपब्लिकन पक्षाशी तथाकथित 'युती' केली. युती कसली? आंबेडकरांचा रिपब्लिकन पक्ष व त्याबरोबरच त्यांची बौद्ध जनता यांना गिळून टाकण्याचा–आणि नंतर समाधानाने ढेकर देण्याचा तो एक कुटिल प्रयत्न होता! दुर्दैवाने रिपब्लिकन पक्ष या डावाला बळी पडला. आणि तेव्हापासून एकाचे दोन, दोनाचे तीन; तिनांची एकजूट करण्यासाठी आणखी नवा एक असे करता करता रिपब्लिकन पक्षाचे तुकडे तुकडे झाले! पुढाऱ्यांगणिक गट, गटागणिक विशिष्ट हितसंबंध, त्यासाठी सौदेबाजी असे प्रकार सुरू झाले. काँग्रेसच्या उच्चवर्णीय-वर्गीय भ्रष्टाचारी राजवटीशी कसंही करून सोयरिक जमविण्याच्या प्रयत्नात रिपब्लिकन पक्ष, आंबेडकरांची तेजस्वी शिकवण, स्वाभिमानी परंपरा, स्वतंत्र लढाऊ अस्तित्व, उज्ज्वल ध्येयवाद, आणि नव्याने दिलेले रिपब्लिकन पक्षाचे हत्यार सर्वच गमावून बसले! आणि ही परवड वर्षानुवर्षे चालत राहिली! श्री. दादासाहेब गायकवाड यांच्या निधनानंतर तर आपल्या सहकाऱ्यांना—अनुयायांना चार परखड गोष्टी अधिकारवाणीने सांगू शकणारा, आंबेडकरवादी जनतेचा खराखुरा विश्वास असणारा शेवटचा प्रभावी नेताही नाहीसा झाला. आणि नंतर लक्षावधी निष्ठावंत लढावू अनुयायांना वाऱ्यावर सोडून लहान-मोठी सर्वच पुढारी

मंडळी बाजारात बसली! त्याला अपवाद म्हणून जवळजवळ एकही पुढारी मागे राहिला नाही! काँग्रेसपासून जनसंघ-शिवसेनेपर्यंत कोणाशीही, कशासाठीही, केव्हाही सोयरीक जमवावयाला सारेच तयार, असा अनवस्थाप्रसंग निर्माण झाला! वर्षानुवर्षे एकीचे प्रयत्न होत राहिले आणि वर्षानुवर्षे चौफेर शतखंड विघटना वाढतच गेली!

खरोखर, १९५६-६० सालात-दहा वर्षापूर्वीच केवढ्या आशेने, अपेक्षेने, केवढ्या वैभवाने-दिमाखाने रिपब्लिकन पक्ष समितीमध्ये आला, नांदला, वाढला-आणि समिती संपताच काही वर्षांतच त्याची अशी दुरवस्था झाली!

याचा परिणाम खुद्द बौद्ध जनतेवरही झाला. काही वर्षापूर्वीच खुद्द बाबासाहेबांच्या मुखाने ज्यांनी अभूतपूर्व असे धर्मचक्र-प्रवर्तन झालेले पाहिले--अडीच हजार वर्षानंतर पुन्हा जणू भगवान् बुद्धाचाच अवतार होत असल्याचे दिव्य दृश्य ज्यांना दिसले-त्यांना बुद्धजन म्हणजेच रिपब्लिकन असे समिकरण बघण्याची पाळी आली! त्याहूनही वाईट म्हणजे या दोन्हींचाही आधार म्हणजे पूर्वाश्रमीची महार जमातच केवळ, अशी आठवण त्यांना सतत देण्यात येत गेली! सत्ताधाऱ्यांकडून-उच्चवर्णीयांकडून आणि त्याहूनही दुर्दैव म्हणजे संधिसाधू पुढाऱ्यांकडूनही!

समाजिक समतेचे लढे, आर्थिक मागण्यांचे लढे, वर्गलढे, यांचा साधा विचार करायलाही कोणाला फारशी फुरसत मिळेनाशी झाली. या सर्वांची लज्जास्पद परिणती म्हणजे बाबासाहेबांच्या रिपब्लिकन पक्षातील, बौद्धजनांतील कार्यकर्ते चातुर्वर्ण्यवादी जनसंघात किंवा हिंदू फॅसिस्ट शिवसेनेमध्येसुद्धा खुशाल दिसू लागले! आणि त्यांचे मतदार तर कोठेही-कोणाच्याही दारात!



आंबेडकर आणि बौद्धधर्म

आंबेडकरप्रवर्तित धर्मांतर जरी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी प्रत्यक्ष झाले असले तरी त्याची पूर्वतयारी मात्र अनेक वर्षे आणि अनेक परींनी चालली होती.

सांगोपांग विचार-प्रदीर्घ पूर्वतयारी

कटु अनुभव, (वैयक्तिक आणि सामुदायिक), त्याचप्रमाणे गाढ व्यासंग, सभा-परिषदा, कायदेमंडळातील ठराव, सरकारी परिपत्रके इत्यादि प्राथमिक अवस्था ओलांडून आंबेडकरांनी पाणवठा, मंदिरप्रवेश वगैरे प्रश्नांबाबत प्रत्यक्ष सामुदायिक सत्याग्रहाचा प्रयोग करून पाहिला. त्यावेळी त्यांना जे विविध अनुभव आले तेव्हापासून खरे म्हणजे त्यांच्या मनात हिंदुधर्मात राहून मूलभूत सुधारणा करण्याच्या शक्यतेबद्दल शंका निर्माण होऊ लागली होती.

१९२९ (जळगाव), १९३० (नागपूर) या परिषदांपासूनच हिंदुधर्मात न राहण्याचे आवाज उठू लागले होते. स्वतः आंबेडकरांनी मात्र धर्मांतराची घोषणा केली नव्हती. १९३३ साली आंबेडकर मुसलमान धर्म स्वीकारणार असल्याची बातमी जेव्हा काही वृत्तपत्रांनी उठविली, तेव्हा मुसलमान धर्म कधीही न स्वीकारण्याचे आंबेडकरांनी जाहीर केले. यानंतर १९३५ मध्ये येवले येथे भरलेल्या प्रचंड परिषदेत मात्र आंबेडकरांनी धर्मांतराची निश्चित घोषणा प्रथम स्वतः केली. "हिंदु, (अपृश्य) म्हणून जन्मलो त्याला माझा इलाज नव्हता; पण हिंदू म्हणून मी मरणार मात्र नाही.") या घोषणेनंतर हिंदुधर्मांतर्गत सुधारणेचे सर्व आंदोलन त्यांनी कायमचे व अखेरचे बंद करून टाकले.

वेगवेगळे पर्याय

या घोषणेमुळे गांधींपासून सावरकरांपर्यंत वेगवेगळ्या मतांचे सर्व हिंदू पुढारी हादरून गेले. (नाशिकच्या सनातनी हिंदूंना मात्र हर्षाच्या उकळ्या फुटल्या आणि हीच मंडळी पुढे सुधारक सावरकरांची-गोळवलकरांची कट्टर अनुयायी बनली!)

आंबेडकरांना भेटून त्यांना धर्मांतरापासून परावृत्त करण्याचे प्रयत्न अनेक पुढाऱ्यांनी केले. हिंदू समाजात मूलभूत परिवर्तन होत असेल, तर पाच-दहा वर्षे वाट बघायला आपण तयार असल्याचे आंबेडकरांनी पुन्हा एकदा सांगितले. हिंदुधर्म सोडायचाच तर दुसरा धर्म कोणता? मुसलमान, ख्रिस्ती, शिख? लोकांपुढे पर्याय हेच होते. आणि यांपैकी प्रत्येक धर्माशी तत्कालीन प्रचलित राजकारणही गुंतलेले होते! इस्लाम किंवा ख्रिस्ती यांपैकी कोणताही धर्म आपण स्वीकारणार नाही, ही गोष्ट आंबेडकरांनी लवकरच स्पष्ट केली; आणि धर्मांतराचा राजकारणाशी किंवा राजकीय सौदेबाजीशी कसलाही संबंध नसल्याचे निक्षून जाहीर केले. त्यानंतर धर्मांतर करावयाचेच झाले, तर आंबेडकरांनी शीखधर्मात जावे, अशी सूचना डॉ. मुंजे प्रभृतींनी केली आणि तदनुसार परस्पर योजनाही आखण्यात आल्या! सुधारक शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांचीसुद्धा म्हणे या योजनेला संमती होती. अर्थातच मुसलमान विरोधाच्या राजकारणातून या योजनेचा जन्म झाला होता. इस्लाम व ख्रिस्ती धर्म झिडकारून टाकलेल्या आंबेडकरांनी शीख धर्माचा विचार मात्र केला; व तो करताना शीखधर्म हिंदुधर्माबाहेर असला तरी तो भारतीय संस्कृतीच्या कक्षेत आहे, ही गोष्ट त्यांनी कटाक्षाने स्पष्ट केली.

हा सर्व इतिहास पाहिला तर आंबेडकरांनी धर्म आणि धर्मांतराचा विचार किती वर्षे, किती कसोशीने, किती तपशीलवार, किती बाजूंनी केला होता, ही गोष्ट स्पष्ट होते. प्रथम हिंदुधर्मांतर्गत सुधारणा, नंतर नाइलाजाने केलेली धर्मांतराची घोषणा, त्यानंतर इस्लाम व ख्रिस्ती धर्माचा अव्हेर, पुढे शीखधर्माचा विचार—इतक्या अवस्थांमधून आंबेडकरांनी दहा-पंधरा वर्षांत प्रवास केला.

आंबेडकरांची निवड : बुद्ध व त्याचा धर्म

पण या शोधाच्या काळातसुद्धा गौतम बुद्ध व त्याचा धर्म यांचे पक्के ठाणं आंबेडकरांच्या मनात खोल खोल घर करून राहिलेले होते, यात मात्र शंका नाही. आंबेडकरांनी हिंदुधर्म सोडावयाचे ठरविले, तरी त्यांना धर्म हा हवाच होता; त्याशिवाय ते जगू शकत नव्हते, हे उघड आहे. त्यांनी अखेर निवडला तो मात्र सर्वांनाच अनपेक्षित असा धर्म होता !

भारतभूमीत निर्माण झालेला एकमेव धर्म,–भारतामध्ये हजार वर्षे टिकलेला, भारतातून आशियाभर चौफेर पसरलेला; पण भारतातून मात्र संपूर्णपणे हद्दपार झालेला असा भारतनिर्मित बौद्ध धर्म ! आंबेडकरांना त्या धर्माने–त्यांच्या मूळस्वरुपाने आकृष्ट केले आणि त्या पराभूत, परागंदा धर्माचे पुनरुत्थान आंबेडकरांनी केले आणि हेच आपले श्रेष्ठ जीवितकार्य असे त्यांनी मानले !

आंबेडकरांनी अखेर निवडलेला बौद्धधर्म अवैदिक तर होताच; पण तो निरीश्वरवादीही होता. निरीश्वरवादी, अनात्मवादी, भौतिकवादी, व म्हणून परिवर्तनीयही होता. याबाबतीत, हिंदू किंवा यहुदी, ख्रिस्ती किंवा इस्लाम या सर्व विद्यमान धर्मांपेक्षा बौद्धधर्म सर्वस्वी भिन्न होता. खरे म्हणजे रूढ लौकिक अर्थाने तो धर्मच नव्हता !

आंबेडकरांना पटलेला धर्म हा खरा धारणा करणारा धर्म होता. तो संपूर्ण ईहलोकवादी होता; (परलोकवादी नव्हता; स्वर्गवादी किंवा नरकवादीसुद्धा नव्हता !) तो सामाजिक होता; (वैयक्तिक नव्हता). तो मार्गदर्शक होता; (मोक्षदाता नव्हता). तो सामाजिक नीतिमत्ता सांगणारा होता; (वैयक्तिक व्रतवैकल्ये सांगणारा नव्हता). वास्तववादी होता; (कल्पनावादी नव्हता). तो गतिमान, सर्वसमावेशक होता; (अपौरुषेय, अपरिवर्तनीय नव्हता). तो बुद्धिनिष्ठ-तर्कनिष्ठ होता; (बुद्धीपलिकडील साक्षात्कारी नव्हता). तो करुणामय, शांततावादी होता; (आक्रमक, हिंसावादी नव्हता). तो समता, स्वातंत्र्य, बंधुभाव सांगणारा होता; (विषमता, अन्याय यावर आधारलेला नव्हता). आंबेडकरांनी बौद्ध धर्माची ही जी वैशिष्ट्ये पुन्हा पुन्हा परोपरीने प्रतिपादिलेली आहेत, ती ध्यानात ठेवण्यासारखी आहेत.

बुद्ध आणि आंबेडकर–वैचारिक वारसा

बौद्ध धर्माची स्थापना आणि ती करण्यापूर्वी आणि नंतरही गौतम बुद्धापुढे पडलेला पेच, यांचा विचार आंबेडकरांच्या डोळ्यापुढे सतत असावा, असे दिसते. बुद्ध अवैदिक, निरीश्वरवादी, अनात्मवादी तर होताच, वैदिक परंपरेविरुद्ध, यज्ञयाग, त्यातील भयानक हत्याकांड आणि कर्मकांड, ऐतखाऊ ब्राह्मणांचे उन्मत्त वर्चस्व, या सर्वांविरुद्ध तर बुद्धाचे बंड होतेच. ते बंड यशस्वी झाले; जनमानसाची त्याने पकड

घेतली हे तर खरेच आहे. पण वस्तुस्थिती केवळ एवढीच आणि सोपी–सरळ नव्हती. ती संपूर्णपणे समजून घ्यायची असेल तर २५०० वर्षांपूर्वीच्या ईशान्य आणि पूर्व भारतामधील संक्रमण काळातील गुंतागूंत आणि तेव्हा घडत असलेल्या परिवर्तनामधील क्रिया-प्रतिक्रिया समजून घेतल्या पाहिजेत.

बुद्धकालीन गुंतागूंत

स्वतः बुद्ध वैदिक नव्हता आणि त्याचा गणसंघ सभोवतालचा अर्धगुलामी–अर्ध-सामंती आर्थिक–राजकीय समाजरचनेमध्ये अजून पुरता सामावलाही नव्हता. पण बुद्धाला प्रिय असलेली (आदिम साम्यवादी–सदृश) गणराज्ये भोवतालच्या गुलामी–सामंती समुद्राच्या लाटांमध्ये मोठ्या मुष्किलीने कशीबशी तगलेली होती. खरे म्हणजे ही गणराज्यांची बेटे सभोवार उसळणाऱ्या सामंती सागराच्या लाटांमध्ये केव्हा गडप होतील याचा नेम राहिला नव्हता ! कालज्ञानी बुद्धाला या भीषण भवितव्याचे भान होते, गणराज्ये आणि त्यांमधील सर्वंकष समता, जिवंत प्रत्यक्ष लोकशाही ही किती काळ टिकू शकणार, याची बुद्धाला चिंता लागली होती. त्याचप्रमाणे ही गणराज्ये गिळावयास टपलेल्या वैदिक यज्ञप्रधान समाजातील गुण-दोषही बुद्धाला पूर्णपणे अवगत होते. ऐतखाऊ ब्राह्मणांच्या उन्मत्त वर्चस्वाविरुद्ध निर्माण होणाऱ्या सामाजिक आणि वर्गीय शक्तींचाही परिचय बुद्धाला चांगलाच होता. अशा गुंतागुंतीच्या परिवर्तन-काळात बुद्धाने आपली क्रांती केली. त्यामध्ये त्याने आपल्याला प्रिय असणाऱ्या गणराज्यातील समता आणि प्रत्यक्ष लोकशाहीचे, मानवतावादी मूल्यांचे–आदर्शांचे जतन करण्याचा प्रयत्न केला. पण त्याच वेळी ती गणराज्ये आता टिकू शकत नाहीत, याचीही वास्तव जाणीव त्याला होती. त्याचप्रमाणे यज्ञप्रधान वैदिक धर्म आणि त्यामधील ऐतखाऊ ब्राह्मणांचे वर्चस्व याविरुद्ध बंड करण्याची शक्यता बुद्धाला दिसत असली, तरी ते बंड यशस्वी करणाऱ्या शक्ती, अस्तप्राय कालबाह्य गणसंघांत नसून त्या हिंदू समाजातीलच काही उदयोन्मुख वर्ग-विभागांमध्येच आहेत, हेही बुद्धाने जाणले होते.

परिवर्तनाचे स्वरूप आणि मर्यादा

म्हणून बुद्धाने केलेले धर्मचक्र-प्रवर्तन आणि सामाजिक परिवर्तन यांमध्ये या दोन्ही घटकांची छाप पडलेली दिसते. बुद्धाचे धर्मचक्र-प्रवर्तन म्हणजे संपूर्ण सामाजिक क्रांती नव्हती; नवे उत्पादन-तंत्र, त्यांच्याशी निगडीत उत्पादक-शक्ती व संबंध आणि त्यांतून निर्माण होणाऱ्या संघर्षांतून होणारा वर्ग-समांतर असा संपूर्ण क्रांतीचा क्रम बुद्धप्रणित धर्म-चक्र-प्रवर्तनात दिसत नाही. सामाजिक क्रांतीच्या दृष्टीनेही ती एक संमिश्र मध्यममार्गी मर्यादित स्वरूपाची प्रक्रिया दिसते. बुद्धाला प्रिय असणाऱ्या, पण ऐतिहासिक क्रमात अस्ताला चाललेल्या आदीम साम्यवादी

गणराज्यांतील जिवंत समता, प्रत्यक्ष लोकशाही, उदार मानवतावाद इत्यादि मूल्ये आणि आदर्श जतन करण्यासाठी बुद्धाने 'संघ' काढला. पण बुद्धाचा हा संघ सर्व समाजाला–सर्व सामाजिक संबंधांना व्यापणारा नव्हता; तर बंदिस्त–मर्यादित होता. केवळ नेत्यांचा, कार्यकर्त्यांचा, सेवकांचा मिळून हा संघ होता. एकूण समाजापुढे 'आदर्श' म्हणून तो कल्पिलेला होता. उलट सारा समाज अर्धगुलामी–अर्धसामंती स्वरूपाचा शोषणाधिष्ठित समाज होता. ऐतखाऊ ब्राह्मणी वर्चस्वाचा आणि नेतृत्वाचा पाडाव बुद्धाने जरुर केला होता; तळच्या शोषित-दलित विभागांना काही प्रमाणात तरी नक्की अधिक सवलती मिळणाऱ्या होत्या; पण नव्या परिवर्तनांमध्येही नेतृत्व आणि वर्चस्व ऐतखाऊ क्षत्रीय राज्यकर्त्यावर्गाचे आणि शोषक श्रेष्ठींचे–नवोदित व्यापारीवर्गाचेच होते, यात शंका नाही. या सत्ताधारीवर्गांनी बुद्धाचे महात्म्य आणि नेतृत्व सर्वसामान्यपणे मान्य केले; पण त्याच्या आदर्शानुसार काही समाजरचना झाली नाही. आदर्शासाठी बुद्ध संघ आणि त्यांतील नियम, त्यातील निष्ठावंत भिक्षू (नंतर भिक्षुणीसुद्धा), त्यांना समाजामध्ये मानाचे स्थान, त्यांच्या योगक्षेमाची सर्व सोय–हे सारे समाजाने केले. पण धर्म-चक्र-प्रवर्तनानंतरही एकूण समाज शोषणाधिष्ठित, विषमच राहिला. शोषक–शोषित, शासक–शासित, वरिष्ठ–दलित हे मूलभूत भेद कायमच राहिले, हे ध्यानात ठेवले पाहिजे.

'बुद्धं-धर्मं-संघं सरणं गच्छामि' या घोषणा शतकानुशतके पसरत पसरत गेल्या; तरी या मूळ वस्तुस्थितीत फारसा फरक पडला नाही. उलट शोषणाधिष्ठित विषम समाजांमध्ये बुद्ध संघासारखे आदर्शाचे बेट फार काळ आदर्शरूपानेही टिकू शकंत नाही, हेच पुढे सिद्ध झाले! एकूण समाजातील विषमता, शोषण, ऐतखाऊपणा, भ्रष्टाचार, अनाचार यांचा प्रवेश आदर्श संघामध्येही होऊ शकतो; त्याविरुद्ध कितीही लढा केला तरी शेवटी बाहेरील समाजांतील शोषक–शासकवर्गीय शक्ती प्रभावी ठरतात, हा अनुभवही शेवटी आलाच!

बौद्धधर्माचा उत्कर्ष आणि अपकर्ष यासंबंधीचा इतिहास म्हणूनच अभ्यसनीय आहे. आज बौद्ध धर्माचे आंबेडकरप्रणीत पुनरुत्थान होत असता, एक प्रकारचे नवे धर्म-चक्र-प्रवर्तन होत असल्याचा दावा पुढे येत आहे. म्हणून आजच्या संदर्भात हा अभ्यास अधिकच आवश्यक आहे. विशेषतः जेव्हा आंबेडकर नव्या धर्म-चक्र-प्रवर्तनाच्या प्रयत्नात होते, तेव्हाच समांतर असे महात्मा गांधींचे धर्म-चक्र-प्रवर्तन चालूच होते! महात्मा गांधी–त्यांची अहिंसामय क्रांती, त्यांचा आदर्श सर्वोदय समाज, खुद्द गांधींनी भारतामधील उदयोन्मुख शोषक-शासक वर्गाशी जमविलेली सोयरीक, त्याच्या परिणामी स्वातंत्र्योत्तर काळात घडलेले परिवर्तन, गांधीजी आणि सर्वोदय संघाचा उत्कर्ष आणि अपकर्ष, या आपल्या अगदी डोळ्यांसमोर घडलेल्या समांतर घटनांचा विचारही केवळ अपरिहार्य आहे.

एक उपेक्षित बुद्धविचार–दुःख आणि मालमत्ता

या दृष्टीने बुद्धाच्या ज्या एका उपेक्षित विचाराकडे आंबेडकरांनी विशेष ध्यान दिले आणि त्याविषयी नवी उपपत्ती बसवून त्यावर नवा प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला तो उल्लेखनीय आहे. हा बुद्धविचार म्हणजे दुःख आणि मालमत्ता–खाजगी मालमत्ता याविषयी होय.

बुद्धाने मानवी जीवनातील दुःखाचा सतत विचार केला आहे; दुःखाचा परिहार हा त्याच्या सतत चिंतनाचा विषय होता. आंबेडकरांनी बुद्धाच्या या दुःख-मिमांसेकडे बरेच लक्ष दिलेले दिसते. दुःख हा शब्द बुद्धाने मालमत्तेच्या संदर्भात वापरेला आहे,—किंबहुना दुःख आणि मालमत्ता या दोन गोष्टींची सांगड पुन्हा पुन्हा येते, याकडे आंबेडकरांचे विशेष ध्यान गेलेले दिसते. दुःख हा शब्द मालमत्तेच्या केवळ संदर्भातच नव्हे तर त्याच अर्थाने बुद्धाने वापरला आहे, असेही आंबेडकरांनी सूचित केले आहे. मानवी दुःखाच्या मूळ कारणांपैकी मालमत्ता–खाजगी मालमत्ता हे एक महत्त्वाचे कारण आहे, याबद्दल शंकाच नाही. म्हणूनच बुद्धाने आपल्या अनुयायांसमोर खाजगी मालमत्तेचा सतत धिक्कार केलेला आहे, बुद्ध संघांत खाजगी मालमत्तेला तर सर्वथा आणि सदैव बंदीच घातलेली आहे. खाजगी मालमत्तेच्या मोहाने–लोभाने–आधाराने समाजात अनर्थ माजतात, हे बुद्धाने पाहिले होते. समाजातील विषमता, अन्याय, शोषण, गुलामगिरी याचे मूळ खाजगी मालमत्तेमध्ये आहे, हे बुद्धाला दिसतच होते. शिवाय बुद्धाची परंपरा आदीम साम्यवादीसदृश गणराज्याची होती; त्या गणराज्यांचा ऱ्हास आणि निरर्गल स्वार्थावर व सर्वंकष खाजगी मालमत्तेवर आधारलेल्या गुलामी–सामंती शोषणप्रथेचा विजय हे तर बुद्धाच्या डोळ्यासमोरच घडणारे महाभारत होते ! स्वाभाविकपणेच बुद्ध-विचारांत दुःख आणि मालमत्ता यांची सांगड पुन्हा पुन्हा आलेली दिसते. म्हणूनच बुद्धाने त्याच्या व्यवहारी मध्यम मार्गानुसार समाजाला अनेक सवलती दिल्या असल्या, तरी बुद्धसंघामध्ये मात्र खाजगी मालमत्तेला सक्त मनाई केली होती.

बुद्धाचा हा खाजगी मालमत्तेला असलेला विरोध आणि त्याने मालमत्तेची दुःखाशी घातलेली सांगड हा बुद्धविचाराचा एक अत्यंत महत्त्वाचा आधारभूत भाग आहे.

या विचारांकडे शोषणाधिष्ठित समाजातील सत्तारूढ शोषकवर्गाने दुर्लक्ष करावे हे स्वाभाविकच आहे. खुद्द बुद्ध-संघांमध्येही शोषकवर्गाच्या या प्रवृत्तीची लागण होणे आणि त्यामुळे संघाच्या ऱ्हासाची प्रक्रिया सुरू होणे, या गोष्टी आजही लक्षणीय आहेत. आज खाजगी मालमत्ता, शोषणावर आधारलेला समाज, त्यातील सर्वंकष शोषण आणि विषमता या सगळ्या गोष्टींचा शास्त्रीय वर्गविचार सर्वमान्य होत आहे, वर्गविग्रहावर आधारलेला हा विचार जेव्हा शोषित–दलित–

श्रमिक जनतेची मुख्य प्रेरक शक्ती ठरत आहे, अशा वेळी बुद्ध-विचारातील दुःख आणि मालमत्तेसंबंधीचा विचार हा नव्याने अभ्यासण्याची नितांत आवश्यकता आहे. आंबेडकरांनी या उपेक्षित विचारांकडे पुन्हा एकदा लक्ष वेधले, यांमध्ये त्यांच्या जागरूकतेची व कालज्ञतेची साक्ष पटते. पण बुद्ध आणि धर्म-चक्र-प्रवर्तन यांचा सतत नुसता उद्घोष करून बुद्ध-विचाराचा खरा आजचा संदर्भ ध्यानात येणार नाही. आंबेडकर आज असते तर बुद्ध-धर्म दीक्षेनंतरच्या १६–१८ वर्षांत त्यांनी बुद्धाच्या प्रेरणेचा–शिकवणीचा किती किती प्रकारे विचार केला असता आणि आजच्या परिस्थितीच्या संदर्भात त्या विचारांवर किती नवा नवा प्रकाश त्यांनी पाडला असता, याची कल्पनाच केलेली बरी !

असा विचार करू लागले की, पुन्हा मूळ पदावर यावे लागते की, आंबेडकरांचा विचार केव्हाच स्थगित झाला नव्हता–तो सदा गतिशील–विकासशील होता. त्यांचे अनुयायी म्हणविणारांना आंबेडकरांच्या या सदा गतिशील–विकासशील विचारांचे सतत आव्हान आणि आवाहन असले पाहिजे.

धर्मांतराबाबतच्या प्रतिक्रिया

धर्मांतराच्या पहिल्या जाहीर घोषणेपासून ते तहत प्रत्यक्ष धर्मांतर घडेपर्यंतच्या प्रदीर्घ काळात (म्हणजे १९३३ ते १९५६) आंबेडकरांच्या धर्मांतराबाबत नाना प्रकारची चर्चा, चिकित्सा, चेष्टा झाल्या. नाना प्रकारच्या कंड्या पिकविल्या गेल्या; हेत्वारोप केले गेले; गलिच्छ अप्रचार केला गेला. पण कोणत्याही राजकीय, सामाजिक, भौतिक प्रलोभनांचा त्यांच्या धर्मांतराशी सुतराम संबंध नव्हता, ही गोष्ट नीट समजून घेतली पाहिजे. त्याचप्रमाणे त्यांनी अखेर कुणालाही कधीही न सुचलेला, कुणाच्याही कधीही ध्यानीमनी नसलेला जो धर्म अखेर शोधून काढला, व त्याची जी वैशिष्ट्ये पुन्हा पुन्हा आग्रहपूर्वक प्रतिपादिली त्यावरून आंबेडकरांच्या मूळ प्रेरणांची स्पष्ट कल्पना येते. चालू विषयापुरते बोलावयाचे तर म. फुल्यांची मूलभूत प्रेरणा (स्त्रीशूद्र–अतिशूद्र यांच्या मुक्तीच्या व सर्वांगीण विकासाची प्रेरणा) ही सुद्धा त्यातीलच एक प्रकर्षाने प्रकट झालेली प्रेरणा दिसते.

आंबेडकरांनी प्रत्यक्ष धर्म-चक्र-प्रवर्तन केल्यानंतरही त्याची चर्चा बरीच झाली आणि अजूनही चालू आहे. सावरकरांनी सांगून टाकले की, आंबेडकरांचे धर्मांतर झालेच नाही ! मी ते धर्मांतर मानीतच नाही; कारण माझ्या व्याख्येप्रमाणे बुद्ध हिंदूच होता !—आता या हट्टाला काय म्हणावे ? मग दोन हजार वर्षे बुद्धाविरुद्ध आणि त्याच्या बंडखोरीविरुद्ध एवढी कडवी मोहीम कशाला केलीत ? बुद्धाचे नाव-सुद्धा भारतामधून पुसून टाकण्यासाठी शेकडो वर्षे खटाटोप कशाला केलात ? आणि खुद्द सावरकरांनी जन्मभर बुद्धाचा आणि त्याच्या करुणेचा, अहिंसेचा, एकूण शिकवणीचा आणि त्याच्या कार्याचा विपर्यास आणि निंदा कशाला केली ?

सावरकरांचे एक अनुयायी आणि कट्टर हिंदुत्ववादी सुधारक 'महार' माटे मास्तर यांनी आंबेडकरांच्या धर्मांतराबद्दल वेगळीच हळहळ व्यक्त केली आहे. ते म्हणतात, आंबेडकरांनी हवे ते करावयाचे होते; पण थोडे मिळते घेऊन–नावाला का होईना, हिंदुधर्मात राहून ! त्यांनी तसे केले असते तर त्या ते अधिक प्रभावी नेते ठरले असते, त्यांना लक्षावधी अनुयायी मिळाले असते. काळ त्यांच्या बाजूला होता; हिंदुसमाजाला पश्चात्ताप होत होता, प्रायश्चित्ताची त्याची तयारी होती ! माटे म्हणतात–तुम्ही आतापर्यंत शापित होता हे खरेच; पण आता उःशापाची वेळ आली आहे इत्यादी ! आता माटेमास्तरांच्या या हळहळीला काय म्हणावे ? म्हणे उःशापाची वेळ आली आहे ! अरे कोण तुम्ही उःशाप देणार ? तुमचा उःशाप–तुमचे उपकार हवे आहेत कोणाला ? कावळ्याच्या शापाने आता कुणी मरत नाही; आणि उःशापाने कुणी जगणारही नाहीत ! शापाची भाषा जशी सनातनी ब्राह्मणांची; तशीच माटेमास्तरांची उःशापाची भाषाही 'सुधारक' ब्राह्मणांचीच ! या ब्राह्मणांचा वर्णवर्चस्वाचा भ्रम जाणार तरी केव्हा ?



बौद्धधर्माचा उत्कर्ष आणि अपकर्ष

बौद्धधर्माच्या स्वीकाराची घोषणा केल्यानंतरही आंबेडकरांनी बौद्धधर्माच्या उत्कर्षाची त्याचप्रमाणे अपकर्षाची, ऱ्हासाचीही सडेतोड मीमांसा केलेली आढळते. त्यामुळे बौद्धधर्म स्वीकारल्यानंतर कोणते संभवनीय धोके आहेत; आणि त्यापासून बचाव करण्याचे उपाय कोणते असू शकतात, याचाही आंबेडकरांनी खोलवर विचार केलेला दिसतो.

बौद्धधर्माचे सर्वसाधारण स्वरूप आंबेडकरांनी जसे विशद केले आहे, त्याचप्रमाणे त्याची काही खास वैशिष्ट्येही त्यांनी विशेष भर देऊन पुन्हा पुन्हा प्रतिपादन केलेली आहेत. शिवाय, हिंदुधर्माच्या कोणत्या अवस्थेत भारतामध्ये बौद्धधर्म उदयास आला. त्याचप्रमाणे त्याचा उत्कर्ष आणि अपकर्ष का व कसा झाला, याची आंबेडकरांनी केलेली मीमांसासुद्धा चालू संदर्भात लक्षणीय आहे.

आंबेडकरांनी हिंदू म्हणून समजल्या गेलेल्या धर्माचे तीन कालखंड व त्यातील तीन अवस्था स्थूलमानाने कल्पिलेल्या आहेत. (१) वैदिक (२) ब्राह्मणी (३) हिंदू यांपैकी दुसऱ्या म्हणजे ब्राह्मणीधर्माच्या कालखंडात बुद्धाचा उदय आणि उत्कर्ष झाला. ब्राह्मणीधर्मातील विषमतेविरुद्ध बुद्धाची समता, यज्ञयागातील पशुहिंसेविरूद्ध अहिंसा, निष्फळ वावदुकी चर्चा आणि चातुर्वर्ण्याविरूद्ध सामाजिक

नीतिमत्ता आणि व्यावहारिक मध्यमवर्ग, भावनाशून्य कर्मकांडाविरुद्ध करुणा अशी स्थूलमानाने आंबेडकरांची मांडणी आहे. गौतम बुद्धाच्या अलौकिक व्यक्तिमत्वा-इतकाच त्याने लोकभाषेत केलेला प्रभावी प्रचार, त्याच्या समतेच्या घोषणेमुळे झालेला सामान्य दलित जनतेमधील उठाव, सत्प्रवृत्त बुद्धिमंत व विद्वान यांच्यावरही त्याची पडलेली मोहिनी, तत्कालीन सामाजिक-राजकीय उत्थानाचे भान ठेवून त्याने केलेला धर्मप्रसार, त्याचप्रमाणे निष्ठावंत-कृतिवंत कार्यकर्त्यांचा त्याने बांधलेला शिस्त-बद्ध आदर्श, प्रचंड भिक्षुसंघ व त्याच्यामार्फत प्रवर्तिलेले अनेकविध उपक्रम आणि आंदोलने;–बुद्धाच्या, त्याच्या धर्माच्या आणि त्याच्या संघाच्या अपूर्व उत्कर्षाची अशी ही यशोगाथा आहे. बुद्धाने आणि बौद्धधर्माने ब्राह्मणीधर्माचा भारतभर काही शतके तरी पराभव केला होता, यात शंकाच नाही. पण नंतर 'प्रच्छन्न बौद्ध' म्हणून गाजलेल्या शंकराचार्यांसकट सर्व ब्राह्मणधर्म नेत्यांनी हा पराभव व्यवहारतः मान्य करून त्यापासून रोकडे धडे घेतले, हेही तितकेच खरे आहे. त्यांनी बौद्धाला भगवंताचा नववा अवतार-बौद्धावतार बनविले ! त्याच्या शिकवणीतील लोकमान्य भाग ब्राह्मणीधर्मात त्यांनी चपखलपणे सामावून घेतला; आणि बौद्धधर्मातील कमजोर आणि जनतेला मान्य नसलेल्या गोष्टींवर त्याचप्रमाणे बुद्धसंघातील अनाचारांवर हल्ले करून नव्या स्वरूपांत हिंदुधर्म पुनःप्रस्थापित करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. बुद्धधर्मात जनतेला हवा असणारा ईश्वर नाही, आत्मा नाही, चमत्कार नाहीत; त्यात दुःखावर भर आहे, ऐहिकांविषयी अनास्था आहे, ब्राह्मणीधर्मातील विषमतेची आणि अनाचारांची बाधाही त्याला झालेली आहे, शिवाय भारताबाहेर त्याचा बेसुमार जलद गतीने प्रसार झाल्यामुळे भारताबाहेरील अनेक गोष्टी बौद्धधर्म संघटनेत प्रभावी ठरल्या आहेत, इत्यादी अनेक गोष्टींचा फायदा ब्राह्मणीधर्माने पद्धतशीरपणे घेतला. अशा रीतीने एका बाजूने बौद्धाला आत्मसात करणे आणि दुसऱ्या बाजूने त्याचे उच्चाटन करणे, अशा दुहेरी-दुधारी शस्त्रानिशी बौद्धधर्माशी ब्राह्मणी नेत्यांनी सामना केला. तरीही भारतामध्ये हिंदूकडून बौद्धधर्माचा पराभव झाला, बौद्धाचे समूळ उच्चाटन झाले ही प्रचलित इतिहास-मीमांसा आंबेडकरांना साफ मंजूर नाही. अखेर बौद्धांचा पराभव मुसलमानी स्वाऱ्यांच्या, कत्तलीच्या काळात झाला. एका बाजूने हिंदूंचे आतून आक्रमण आणि दुसऱ्या बाजूने मुसलमानांनी केलेल्या क्रूर कत्तली, यामुळे अखेर भारतामधून बौद्धधर्माची पिछेहाट झाली, असा आंबेडकरांच्या इतिहास-मीमांसेचा मुख्य रोख दिसतो.

आंबेडकरांनी बौद्ध धर्म स्वीकारला, धर्म-चक्र-प्रवर्तन केले; पण त्यातून आजच्या संदर्भात निर्माण होणाऱ्या सर्व प्रश्नांचा सांगोपांग विचार पुन्हापुन्हा केला. तो विचार चालू ठेवण्याला, त्यातून आजच्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याला ते स्वतः राहिले नाहीत, ही एक खरोखरच अत्यंत दुर्दैवी घटना समजली पाहिजे.

विचारांना पूर्णविराम केव्हाच नसतो !

आंबेडकरांच्या महानिर्वाणानंतर तर हे सर्व प्रश्न अधिकच जिवंत, ज्वलंत आणि स्फोटक बनले आहेत. त्यामधील गुंतागूंतही वाढली आहे. आंबेडकरांच्या पश्चात् त्यांची जयंती-महानिर्वाण दिन–दीक्षा-दिन वगैरे सर्व समारोह कसोशीने, निष्ठेने, उत्साहाने, नियमितपणे पाळण्यात येतात. पण बुद्धधर्म स्वीकारण्यापूर्वी आणि नंतर ज्या प्रश्नांचा विचार आंबेडकर स्वतः सतत अहोरात्र करीत होते, त्यांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न मात्र नंतर कोणी फारसा केलेला दिसत नाही. गौतम बुद्धाच्या जीवनात, त्याचे विचारमंथन अखेरच्या क्षणापर्यंत चालूच होते; पण त्याच्या महानिर्वाणानंतरही त्याच्या निष्ठावंत शिष्यांनी आणि अनुयायांनी बदललेल्या परिस्थितीच्या आणि प्रश्नांच्या संदर्भात आपले विचारमंथन सतत चालूच ठेवले. बौद्ध-विचार बुद्धाच्या हयातीत कधी कुंठित झाला नव्हता; बुद्धाच्या शेवटच्या क्षणापर्यंत तो सदा विकासी–सदा जिवंतच राहिला. विचाराला पूर्णविराम केव्हाच नसतो, हे बुद्धाला पुरते ठाऊक होते. प्रत्येक खऱ्या बौद्धालाही ते महान सत्य ध्यानात ठेवावेच लागते. आंबेडकरांनीही आपल्या उभ्या आयुष्यात विचारांचा पूर्णविराम कधीच मानला नाही; त्यांचे जीवन आणि विचार सदा जिवंत, ज्वलंत, सदा विकासशील असेच राहिले. नवीन परिस्थिती आणि नवीन प्रश्न यांचे आव्हान सतत स्वीकारूनच आंबेडकर आणि त्यांचे विचार सतत विकास पावले.

आंबेडकरांच्या निधनानंतर त्यांच्या राजकीय वारशाची–रिपब्लिक पक्षाच्या संकल्पनेची परवड त्यांच्या अनुयायांनी केली. तीच गत आंबेडकरांच्या वैचारिक वारशाचीही होऊ घातलेली दिसते ! किंबहुना आंबेडकरांचा काही जिवंत विकासशील वैचारिक वारसा आहे, याची साधी जाणीवसुद्धा त्यांचे अनुयायी म्हणून मिरविणाऱ्या तथाकथित बुद्धिमंतांमध्ये फारशी आढळत नाही. आंबेडकरांनी जन्मभर जे कटाक्षाने टाळले, ते म्हणजे विचारांची स्थगितता–कोंडी; विचारांचा पूर्णविराम. आंबेडकरांचे तथाकथित अनुयायी मात्र आंबेडकरांच्या विचारांना पूर्णविराम देऊ इच्छितातसे दिसते ! सतत विचारांचा संघर्ष, नव्या परिस्थितीच्या–नव्या प्रश्नांच्या आव्हानाचा हिंमतीने स्वीकार करूनच, आंबेडकरांची प्रज्ञा आणि प्रतिभा सतत जिवंत–सतत ज्वलंत–सतत विकासशाली राहिलेली आहे. याच सदा संघर्षशाली–सदा विकासशाली प्रतिभेने आंबेडकरांनी त्यांच्या आयुष्याच्या अखेरीस दोन नवी आव्हाने स्वीकारली होती; एक राजकीय–दुसरे वैचारिक–आदर्शसंबंधी. पण त्यांच्या (दलित पँथरखेरीज) सर्व अनुयायांनी मात्र आंबेडकरांचे शब्द तेवढे स्वीकारले; आणि त्या शब्दांच्या शेवटी पूर्णविराम देऊन टाकला !–आणि जयंती, परिनिर्वाण, दीक्षा इत्यादी दिन पाळण्यामध्येच आंबेडकरभक्तीची परिसीमा मानली ! जुन्या हिंदूंप्रमाणेच आंबेडकरांना बुद्धाचा अवतार ठरवून ते मोकळे झाले !

आंबेडकरांच्या अनुयायांत आज निर्माण झालेले अराजक, केवळ संघटना-विषयक नाही. ते मुख्यतः आणि मूलतः वैचारिक स्थगिततेमधून निर्माण झालेले आहे, ही गोष्ट समजून घेतली पाहिजे. म्हणून जयंती–नुसती जयंती, निर्वाण दीक्षा-दिन पाळून–पण विचारांना पूर्ण विराम देऊन हे अराजक टळणार नाही. आंबेडकरांच्या सदा विकासी विचारांचा वारसा जिवंत–ज्वलंत करूनच पुढचा मार्ग दिसणार आहे. दलित पँथरच्या आंदोलनाचे महत्त्व या दृष्टीनेही तपासून पाहण्यासारखे आहे.

आंबेडकरांनी आपल्या लक्षावधी अनुयायांना स्वतः बौद्धधर्माची दीक्षा दिली; धर्म-चक्र-प्रवर्तन स्वतः केले. पण दुर्दैवाने या आपल्या महान जीवितकार्याची यथायोग्य सांगता झाल्याचे बघायला मात्र ते जगले नाहीत !

आंबेडकरांचे धर्मांतर आणि त्यातही त्यांचा बौद्ध-धर्म-स्वीकार हा भारतामधील विषमताधिष्ठित चातुर्वर्ण्यावर, जन्मजात जातिसंस्थेवर एक जबरदस्त ऐतिहासिक आघात होता. भारतामधील अवैदिक, निरीश्वरवादी, अनात्मवादी, इहवादी, भौतिक वादी बंडखोर परंपरेच्या पुनरुज्जीवनाला त्यामुळे गती मिळणार होती. बौद्धधर्माचा पराजय करून शंकराचार्यांनी जी प्रतिक्रांती केली. त्यांनी उच्चवर्णीयांच्या सत्तेची उन्मत्त मक्तेदारी आणि बहुजनसमाजाची सर्वांगीण गुलामगिरी पुन्हा प्रस्थापित केली, तिला हे एक जबरदस्त आव्हान होते. फुल्यांची समतेची प्रेरणा आणि शूद्र-अति-शुद्रांच्या बंडखोरीची परंपरा पुढे नेण्याच्या दृष्टीने ते एक पुढील पाऊल होते. रिपब्लिकन हा डावा पक्ष, दलित–श्रमिकांचे वर्गीय–सामाजिक आंदोलन, त्यासाठी व्यापक एकजूट याची जोड याला लाभणार होती. संयुक्त महाराष्ट्राचे महान् आंदोलन, बौद्धांची त्यातील भागीदारी यामुळे या एकूण प्रक्रियेला अधिकच सामर्थ्य लाभणार होते. (आंबेडकरांचे अकाली निधन आणि समितीची फाटाफूट यामुळे ही सुवर्णसंधी फुकट गेली आणि तिचा पुरेपूर फायदा ना. चव्हाणांच्या सत्ताबाज गटाने घेतला हा पुढील शोकांतिकेचा एक भाग आहे.)

गेल्या दहा-बारा वर्षांत महाराष्ट्रात–जे काही घडले आहे–आजही घडत आहे, त्याची पार्श्वभूमी अशी आहे. इतिहासाने कधी नव्हे अशी सुवर्णसंधी उपलब्ध करून द्यावी, आणि पुरोगामी डाव्या शक्तींनी तिचा सदुपयोग करण्याऐवजी प्रतिगामी शक्तींनी तिचा दुरुपयोग मात्र करावा असे काहीसे प्रत्यक्षात घडले आहे.

♠

फुले-आंबेडकर आणि बुद्ध

फुले आणि आंबेडकर यांचा एकत्र विचार करताना काही विशिष्ट गोष्टी ध्यानात येतात.

आंबेडकरांनी फुल्यांचे ऋण कृतज्ञतेने मान्य केलेले आहे, याचा उल्लेख वर आलाच आहे.

पण आंबेडकरांनी आणखी दोघांचे ऋण मानलेले आहे. एक महात्मा कबीर आणि दुसरा अर्थात् गौतम बुद्ध.

खुद्द फुल्यांनी मात्र एकाही मराठी किंवा इतर संतांचे ऋण कधीही मानले नाही. बुद्धाला अनुकूल असे काही उल्लेख फुल्यांच्या लिखाणात असले, तरी ते मुख्यतः आद्य शंकराचार्यांच्या संदर्भात आलेले आहेत. बुद्धाची बंडखोरी, त्याची परंपरा यांचा अधिक मागोवा घेण्याचा किंवा त्याच्याशी संबंध जोडण्याचा फुल्यांनी प्रयत्न केल्याचे दिसत नाही. उलट, आंबेडकरांनी सगळे जग पालथे घातले; अखिल ज्ञान, विज्ञान, तत्त्वज्ञानाचा तळ गाठला आणि अखेर बुद्धाचा स्वीकार केला.

फुले आणि आंबेडकर यांमध्ये हा फरक का पडावा ?

पहिली गोष्ट अशी की फुल्यांनी मिळेल ते वाचले; ऐकले; त्यावर आपल्या स्वतंत्र बुद्धीने सतत मनन-चिंतन केले; पण त्यांनी गुरु म्हणून कोणालाच मानले नाही; नाव कोणाचेच सांगितले नाही. त्यांनी नाव सांगितले हे खुद्द आपलेच ! आपल्याला जे पटले, जे रुचले, ते त्यांनी सांगितले.

महाराष्ट्रात एवढी मोठी संतांची महान् परंपरा; जन-मानसावर त्यांची एवढी जबरदस्त पकड; पण फुल्यांनी त्यापैकी एकाचेही नाव कधी सांगितले नाही; त्याच्यापैकी एकाकडेही स्फूर्ती शोधली नाही, ही लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आहे. उलट, संतांबद्दल त्यांच्या मनात एक प्रकारची खोल आढीच दिसते ! त्याची अनेक कारणे दिसतात. पहिले म्हणजे सारे संत अखेर सनातनीच होते; मधून मधून त्यांनी सामान्य जनांवरील अन्यायाला—त्यांच्या वेदनेला वाचा फोडलेली असली; उच्चवर्णीयांच्या उन्मत्तपणावर व दांभिकपणावर त्यांनी मधून मधून आसूड ओढले असले, तरी सर्व आणि त्यातील प्रत्येक संत हे अखेर सनातनीच होते; चातुर्वर्ण्यवादीच होते ! वेद अपौरुषेय आहेत, धर्म अपरिवर्तनीय आहे; भ्रष्ट झाले तरी ब्राह्मण श्रेष्ठच आहेत; आपल्या पूर्वकर्मानुसार जे या जन्मी प्राप्त झाले त्याला अनुसरून शूद्र-अतिशूद्रांनी (आणि स्त्रियांनी) आपले प्रारब्ध आनंदाने भोगलेच पाहिजे, अशीच प्रायः संतांची सर्वसाधारण शिकवण होती. संत कितीही उदार झाले तरी ती त्यांची उदारता फक्त वारकरी दिंडीत किंवा चंद्रभागेच्या वाळवंटातच ! ती विठ्ठलाच्या मंदिरात शिरू शकत नव्हती किंवा गावात, रस्त्यात, घरात तर नव्हतीच नव्हती ! बाकी सगळीकडे जन्मजात उच्चनीचता, स्त्री शूद्र-

अतिशूद्रांची अपरिवर्तनीय गुलामगिरी ! संतांनी आपल्या महात्म्याचा उपयोग उलट ही गुलामगिरी—विषमता दृढ करण्यातच एक प्रकारे खर्ची लावली. फुल्यांना ही गोष्ट कशी पटावी ? म्हणून केवढेही मोठे संत असोत; कवी असोत; मराठी असोत की इतर प्रांतीय असोत फुल्यांना त्यांची क्षिती कधीच वाटली नाही ! त्यांनी एकाही संताचे नाव कधी सांगितले नाही; आधार शोधला नाही.

आंबेडकरांनी एकाही मराठी किंवा हिंदू वा मुसलमान संताचे नाव घेतले नाही. त्यांना एक संत मात्र आढळला व त्याची स्फूर्ती त्यांनी मान्य केली. तो म्हणजे संत कबीर. तो हिंदू नव्हता, तेव्हा चातुर्वर्ण्य, जन्मजात जाती, वगैरेंशी त्याचा काही संबंध नव्हता. तो त्यांचा कट्टा विरोधकच होता. तो मुसलमानही नव्हता. इस्लामचीही परंपरा–त्यातील अन्याय त्याने कधी जुमानले नाहीत. कबीर आणि त्याचा परमेश्वर यांच्यामध्ये कोणताही धर्म, पीठ, मध्यस्थ, दलाल, नव्हता. त्याची स्वतःची श्रद्धा, करुणा, मानवता त्याला पुरेशी होती. आंबेडकरांना म्हणून तेवढाच एक संत पसंत पडला, आणि त्याचे ऋण त्यांनी मान्य केले.

फुले-आंबेडकर आणि बुद्ध

बुद्धाच्या बाबतीत विचार केला तर फुले-आंबेडकरांची दृष्टी वेगवेगळी दिसते.

वर उल्लेखिल्याप्रमाणे फुल्यांना बुद्धाचा परिचय नक्कीच होता. हिंदु धर्मा-विरुद्ध–चातुर्वर्ण्य, विषमता, वगैरेविरुद्ध गौतम बुद्धाने जो महान ऐतिहासिक संघर्ष केला, तोही फुल्यांना नक्कीच अवगत होता, पण फुल्यांनी बुद्धाला मानल्याचे मात्र दिसत नाही. त्याचे कारण बहुधा हे असावे की, बुद्ध हा अवैदिक तर खराच, पण निरीश्वरवादी होता. त्याला ईश्वरच मान्य नव्हता; आत्माही नव्हता ! आणि फुले तर ईश्वरवादी होते : त्यांचा ईश्वर अर्थात परंपरागत नव्हता; किंबहुना कोणत्याही रूढ धर्मात न आढळणारा असा फुल्यांचा ईश्वर होता. तो " निर्मिक-निर्माता होता; पण तो 'तो' नव्हता (पुरुष नव्हता !); स्त्रीही नव्हता. म्हणून त्यांनी निर्मिकाला माबाप म्हटले ! पण फुल्यांना ईश्वराची पूजा, कोणत्याही प्रकारे मान्य नव्हती. प्रतीक, मूर्ती, अवतार, साक्षात्कार, उपासना, दर्शन, नवस, यापैकी काहीही त्यांना मान्य नव्हते. त्याचप्रमाणे अर्थातच गुरू, मध्यस्थ, उपाध्याय यांना अर्थातच फुल्यांच्या धर्मात स्थान नव्हते. तेव्हा फुल्यांना कोणताच विद्यमान धर्म (हिंदू, ख्रिस्ती, इस्लाम, बौद्ध, यहुदी) मान्य नव्हता. म्हणून त्यांनी आपल्या या अनोख्या निष्ठेला नवीनच नाव दिले. ते म्हणाले, माझा सत्यधर्म–सार्वजनिक सत्यधर्म–आणि माझा समाज म्हणजे सत्यशोधक समाज !

आंबेडकरांनी मात्र सर्व धर्मांचा त्याग करून अखेर बौद्ध धर्म स्वीकारला; त्यासंबंधीचे सविस्तर विवेचन वर आलेच आहे.

♠

आंबेडकर-कोंडी फोडण्याचे प्रयत्न

आंबेडकरांना खरोखर पुरतेपणी समजून घेण्याचा प्रयत्न कधी कोणाकडून फारसा झालाच नाही; याबाबतीत त्यांचे विरोधक आणि त्यांचे अनुयायी दोघेही सारखेच! विरोधकांनी आपल्या हितसंबंधांनुसार आंबेडकरांच्या उक्तींचा आणि कृतींचा एक प्रकारे सतत विपर्यास केला. उलट अनुयायी म्हणविणारांनीही अगदी वेगळ्या-विरुद्ध कारणासाठी पण तेच केले!

आंबेडकरांनी एक म्हणून काही बोलावे-काही करावे; आणि त्यांच्या विरोधकांनी त्यांचा विपर्यास करून, त्याचा वेगळाच अर्थ लावावा; त्याला भलताच हेतू चिकटवावा, असे सतत आंबेडकरांच्या आयुष्यभर होत गेले! अनुयायांनी आपल्या उत्साहाच्या भरात आणि कोत्या समजुतीच्या भ्रमात तेच केले; आंबेडकरांच्या उक्तींचा व कृतींचा वेगळाच-भलताच अर्थ लावला; त्यांत हेतु-विपर्यासही खुशाल होऊ दिला!

विरोधक आणि अनुयायी यांनी केलेल्या या अर्थाच्या अनर्थांमध्ये आणि विपर्यासांमध्ये एक फरक जरूर होता. तो म्हणजे विरोधकांना आपल्या उच्चवर्णीय-वर्गीय हितसंबंधांचे रक्षण करावयाचे होते; आणि तरीही काहीजणांना तरी उदारमतवादी, उद्धारवादी, समतावादी म्हणून वर मिरवावयाचेही होते! उलट, अनुयायांना आंबेडकर समजले ते आपले म्हणजे आपल्या मागास-अस्पृश्य जमातीचे-त्यातही महार जमातीचे पुढारी म्हणूनच! त्यापलीकडे आंबेडकरांची जी काय विद्वत्ता असेल, आधुनिक विचारवत्ता असेल, ध्येयवाद असेल, उदारमतवाद असेल, एकूण समाजाच्या आणि राष्ट्राच्या दृष्टीनेही त्यांनी जो काही विचार केला असेल, तो त्यांना प्रथम तरी अगम्य, अज्ञात आणि अनावश्यक वाटला! हे सर्व प्रारंभीच्या काळात समजण्यासारखे होते; आणि आजही समजून घेण्यासारखे आहे.

पण पुढे पुढे आणि अखेर आंबेडकरांच्या निधनानंतर आंबेडकर आणि त्यांची विशिष्ट जमात हाच एक मूठभर, सुशिक्षित, स्वार्थी, संधिसाधू आंबेडकर-भक्तांचा प्रस्थापित हितसंबंध ठरला! तो टिकविणे, कसेही करून त्याचे संरक्षण करणे, इथेच त्यांची आंबेडकर-भक्ती सुरू होऊ लागली आणि तेथेच संपू ती ही लागली! तात्पर्य, उच्चवर्णीय-वर्गीयांचा एक प्रस्थापित हितसंबंध-आणि त्याविरुद्ध आंबेडकरांचे नाव सांगणाऱ्या दुसऱ्या काही मागासवर्गीय गटांचा दुसरा हितसंबंध असा काहीसा आंबेडकरांच्या शब्दांचा-अर्थाचा अनर्थ होऊ लागला! आंबेडकरांच्या निधनानंतर विशेषतः हा प्रकार सतत व सर्रास होऊ लागला!

दोन हितसंबंधांच्या या रस्सीखेचीमध्ये नंतर आंबेडकरांची प्रखर तत्त्वनिष्ठा उरली नाही; प्रयोगशीलता उरली नाही; आणि अखेर त्यांचा जाज्ज्वल्य

स्वाभिमानही उरला नाही. उरला तो फक्त हितसंबंध–जातीच्या, जमातीच्या आधाराने निर्माण होणारा, वाढणारा, टिकणारा हितसंबंध !

जात–जमात : एक हितसंबंध !

म्हणजे जातवाद–जमातवाद नष्ट करावयाला आंबेडकर निघाले; त्यासाठी त्यांनी जन्मभर जिवाचे रान केले; जन-आंदोलन केले; नाना प्रयोग केले, पर्याय शोधले; मित्र जोडले–शत्रू तोडले. पण परिणाम ? तो जातवाद–जमातवादच कायम राहिला; क्वचित् अधिकच घट्ट झाला–खुंटा हलवून बळकट व्हावा तसाच ! आणि उच्च वर्णीय–वर्गीय हितसंबंधियांच्या दृष्टीने यात काहीच नुकसान नव्हते ! नुकसान होते, हानी होती ती अर्थातच एकूण सर्व मागास–अस्पृश्य–दलित जाती-जमातींची;–त्याचप्रमाणे एकूण श्रमिक–शोषित जनतेची; त्यांच्या एकजुटीची–त्यांच्या प्रतिस्पर्धी जनशक्तीची.–आणि त्याबरोबरच एकूण महार जमातीचीसुद्धा–मग तिला बौद्धजन म्हणा की रिपब्लिकन म्हणा; किंवा आणखीन काही म्हणा !

अनेक प्रयोग–अनेक पर्याय

आंबेडकरांनी जन्मभर पुन्हा पुन्हा जमातीबाहेर विचार करण्याचा, मित्र जोडण्याचा, एकजूट बांधण्याचा, आटोकाट प्रयत्न केला. मागास जाती–जमातींचे हितसंबंध एकूण दलित–श्रमिक–शोषित जनतेमध्ये एकरूप करण्याचा त्यांचा हेतू स्पष्ट होता. त्यांच्या या हेतूचा पुन्हा पुन्हा विपर्यास झाला; त्यांना पुरेसा प्रतिसाद मिळाला नाही. त्यांची चारी बाजूंनी कोंडी करण्याचे पद्धतशीर प्रयत्न झाले. पण तरीही आंबेडकर डगमगले नाहीत; त्यांनी जमातीबाहेर विचार करण्याचे सोडले नाही. त्यासाठीच त्यांनी पुन्हा पुन्हा प्रयत्न केले; नवे नवे प्रयोग केले; पर्याय शोधले. अनुभवाने शिकण्याची पराकाष्ठा केली. आपल्या अनुयायांनाही नाना परींनी समजावून सांगण्याचे त्यांनी परमावधीचे प्रयत्न केले. विरोधकांनी उच्चवर्णीय–वर्गीय हितसंबंधांनी केलेल्या कोंडीतून बाहेर पडण्यासाठीच त्यांचे हे सारे प्रयत्न होते.

या सर्वांमधून आंबेडकरांच्या एकूण जीवनात अनेक खडतर द्वंद्वे निर्माण झाली. ती द्वंद्वे त्यांची स्वतःची व्यक्तिगत नव्हती; त्यांचा संबंध केवळ त्यांच्या जाती–जमातीपुरताच मर्यादितही नव्हता. त्यांचा संबंध सर्व दलित जाती-जमातींशी होता; सर्व श्रमिक–शोषित जनतेशी होता; फार काय सवर्णांसह एकूण समग्र समाजाशीही होता.

कारण ती द्वंद्वे आंबेडकरांनी निर्माण केलेली नव्हती; ती केवळ त्यांच्या व्यक्तिगत किंवा सार्वजनिक कार्यकर्तृत्वामधून निर्माण झालेलीही नव्हती. खरे म्हणजे त्या भयानक द्वंद्वांची निर्मिती एकूण समाजाने चातुवर्ण्यग्रस्त–शोषणग्रस्त समाजानेच केलेली होती. म्हणून त्या द्वंद्वाची जबाबदारी मुख्यतः उच्चवर्णीय–वर्गीय ब्राह्मण–क्षत्रीय नेत्यांवरच पडते आणि ती त्यांनी बिनतक्रार-बिनबोभाट स्वीकारली पाहिजे.

आंबेडकर आणि सारा दलितसमाज हे खरोखर या सर्वांचे लक्ष्य होते, भक्ष्य होते, शिकारीचे सावज बनले होते!

ज्या मूळ चातुर्वर्ण्यामुळे व जन्मजात सर्वंकष विषमतेमुळे आंबेडकरांपुढील मुख्य प्रश्न निर्माण झाले होते, त्यांचे स्वरूप कमालीचे संमिश्र होते; धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय असे सर्वव्यापी-सर्वस्पर्शी त्यांचे स्वरूप होते. त्यामुळे आंबेडकरांची कोंडी झाली तीही अशीच सर्व बाजूंनी झाली. ती फोडण्याच्या आंबेडकरांच्या प्रयत्नांना-प्रयोगांना-पर्यायांनाही त्यामुळे वेगवेगळे रंग वेळोवेळी आले. धार्मिक, सामाजिक–सांस्कृतिक–राजकीय–आर्थिक असे एक किंवा अनेक रंग त्यांच्या या प्रयोगांना, पर्यायांना वेळोवेळी मिळाले. या सर्वांच्या मुळाशी असलेल्या वर्गीय स्वरूपाचे भान आंबेडकरांना होते; त्यामुळे वर्णाबरोबरच वर्गाचाही विचार अपरिहार्यपणे त्यांना पुन्हा पुन्हा करावा करावा लागला होता.

म्हणून आंबेडकरांच्या जीवनात निर्माण झालेली भीषण द्वंद्वे जितकी विविध–संमिश्र स्वरूपाची, तितकेच ती कोंडी फोडण्याचे त्यांचे प्रयत्न–प्रयोगही विविध–संमिश्र स्वरूपाचे होते.

जात–(जन्माच्या अपघाताने आलेली जात), जातींची उतरंड–उच्चनीचता, त्यामुळे निर्माण झालेली विविध सर्वंकष विषमता, त्यातून कनिष्ठ विशेषतः अस्पृश्य जातींवर कायमचे आजन्म–आमरण लादले गेलेले अन्याय (सामाजिक-आर्थिक-सांस्कृतिक-राजकीय अन्याय) ही आंबेडकरांच्या परिसराची सर्वांत महत्त्वाची परिस्थिती होती; भयानक वस्तुस्थिती होती. या वस्तुस्थितीमुळे त्यांची आणि त्यांच्या जमातींची सर्व बाजूंनी कोंडी झालेली होती. आणि ती हजारो वर्षे सतत टिकून राहिलेली होती. इतर दलित–शोषित–श्रमिक यांचीही जन्मजात जातिभेदामुळे त्याचप्रमाणे सरंजामी–भांडवली शोषणामुळे जरूर कोंडी झाली होती. पण त्यांची पिळणूक त्यावरील अन्याय–त्यांची कोंडी यामध्ये आणि अस्पृश्य जाती-जमातींच्या वरील अन्यायांचे कोंडीचे (स्वरूप वेगळे होते)! काही बाबतींत आणि प्रमाणात तरी अधिकच वेगवेगळे होते.

या महत्त्वाच्या फरकामुळे इतर दलित–शोषित–श्रमिकांनी आपल्या झालेल्या कोंडीतून बाहेर पडण्याचे जगभर जे मार्ग शोधले, जे प्रयोग केले, क्रांतिकारक प्रयत्न केले, ते जसेच्या तसे उपयोगी पडतील की नाही, याचा आंबेडकरांना पुन्हा पुन्हा आणि सतत विचार करावा लागला.

आंबेडकरांच्या विचारांची जडणघडण

असा विचार करण्याची संधीही, त्यांच्या जाती-जमातींमध्ये आंबेडकरांनाच प्रथम मिळाली; किंवा तशी संधी निर्माण करण्याची आणि तिचा पुरेपूर फायदा घेण्याची जिद्द–बुद्धिमत्ता–क्षमता प्रथम आणि फक्त आंबेडकरांनीच दाखविली.

या संधीचा फायदा घेऊन त्यांनी इथे भारतामध्ये, त्याचप्रमाणे इंग्लंड-अमेरिकेमध्ये सशास्त्र, सविस्तर, सर्वांगीण शिक्षण घेतले; ते पुरते पचविले–रिचविले–अंगी बाणविले.

इंग्लंड-अमेरिकेतील शिक्षणाप्रमाणे त्यांना युरोपमधील नव्या क्रांतिकारक विचारांचे–मार्क्सवादी विचारांचे–शिक्षण परिशीलन करण्याची संधी तेव्हाच मिळाली नाही, ही खरे म्हणजे एक दुर्दैवी घटनाच समजली पाहिजे. अर्थातच हे दुर्दैव सर्वच भारतीय बुद्धिमंतांच्या आणि सामाजिक-राजकीय कार्यकर्त्यांच्या वाट्याला आले होते ! पण इतरांपेक्षा खरोखर आंबेडकरांच्या पुढे जे प्रश्न होते, त्यांची उत्तरे शोधण्याच्या कामी कदाचित् या युरोपियन क्रांतिकारक विचारांचा आणि अनुभवांचा अधिक उपयोग झाला असता. सतराव्या आणि अठराव्या शतकांमधील ब्रिटिश-फ्रेंच-अमेरिकन क्रांत्यांपेक्षा एकोणीस आणि विसाव्या शतकात झालेल्या फ्रेंच-जर्मन आणि अखेर रशियन आणि चिनी क्रांतिकारक उठावांचे महत्त्व आणि साक्षात संबंध फुले–आंबेडकरांना अभिप्रेत असलेल्या दलित-श्रमिक वर्गांच्या आणि जाती-जमातींच्या दृष्टीने अधिक जवळचे होते. आंबेडकरांच्या मूळ विचारांची जडण-घडण जेव्हा झाली, तेव्हा दुर्दैवाने या जर्मन–फ्रेंच–रशियन श्रमिक–दलितांचा अनुभव आणि त्यातून निर्माण झालेले मार्क्सवादी क्रांतिशास्त्र आंबेडकरांना वेळीच उपलब्ध झाले नाही, ही एक मोठीच उणीव राहून गेली यात शंका नाही. अर्थात यात आंबेडकरांचा काहीच दोष नव्हता. दोष आणि गुन्हा होता तो ब्रिटीश साम्राज्यशाहीचा आणि तिने लादलेल्या सर्वंकष कडेकोट बौद्धिक तटबंदीचा होता. ब्रिटिश–अमेरिकन भांडवलशाहीचे आणि तिला मान्य असलेल्या विचारांचेच सशास्त्र शिक्षण तेव्हा वेगवेगळ्या ब्रिटिश किंवा अमेरिकन विद्यापीठांत मिळू शकत होते. इतर युरोपीय क्रांतिकारक विचारांची त्यांनी पक्की चौफेर नाकेबंदी केलेली होती !

भांडवलदारी उदारमतवाद

म्हणून त्यांच्या विचारांच्या जडण–घडणीच्या काळामध्ये आंबेडकरांपुढे जे विचार अभ्यासासाठी आले ते मुख्यतः भांडवलदारी चौकट मानणाऱ्या विचारवंतांचेच होते. त्यांपैकी उदारमतवादी विचारवंतांच्या विचारांचा आंबेडकरांवर खोल परिणाम झाला आणि तो जन्मभर टिकला. विचारवंत 'उदारमतवादी' असले तरी ते भांडवलशाहीच्याच मूळ चौकटीत विचार करीत होते; एकूण भांडवलदारी व्यापक हितसंबंधांच्याच मर्यादांनी त्याचे विचार चोहोबाजूंनी वेढलेले होते, ही गोष्ट सतत ध्यानात ठेवली पाहिजे.

या उदारमतवादी विचारांचे भारतामधील अग्रगण्य आणि आदर्श प्रतीक म्हणजे न्यायमूर्ती रानडे आणि त्यांनी प्रवर्तिलेला (राजकीय–आर्थिक–सामाजिक धार्मिक विचारप्रणालींचा) भारतीय उदारमतवाद. आंबेडकरांना भारतामधील जुन्या-

नव्या विचारवंतांबद्दल आणि समाजनेत्यांबद्दल फारसा आदर कधी नव्हताच; उलट त्यांच्यापैकी बहुतेकांबद्दल त्यांच्या मनात कमालीचा तिरस्कारच भरलेला होता. पण ज्या अगदी थोड्या आधुनिक भारतीय विचारवंतांबद्दल व समाजनेत्यांबद्दल आंबेडकरांना मनापासून आदर वाटत होता, त्यांमध्ये न्या. रानडे यांचे नाव अग्रभागी होते. रानड्यांबद्दलचा हा त्यांचा आदर जन्मभर टिकून राहिला होता, हीही गोष्ट ध्यानात ठेवण्यासारखी आहे. भारतीय राजकारणामधील तथाकथित उदारमतवादी बदनाम लिबरल पार्टीबद्दलही आंबेडकरांना वाटणारी आत्मियता अखेरपर्यंत टिकली होती.

भांडवलदारी उदारमतवादाचा फोलपणा !

हा झाला आंबेडकरांच्या उच्च शिक्षणाचा आणि त्यांचा विचारांच्या जडणीघडणीचा विचार. या उदारमतवादी विचारांचा वारसा घेऊन आंबेडकर हिंदुस्थानात परत आले. पण शिक्षणाने स्वीकारलेल्या विचारांचा कस प्रत्यक्ष अनुभवाच्या रोकड्या कसोटीवर कसा काय लागला ? व्यक्ती म्हणून, जमात म्हणून, भारतीय नागरिक म्हणून, राष्ट्रवादी म्हणून, समाजसुधारक म्हणून आंबेडकरांना हे उदारमतवादी विचार कितपत उपयोगी पडले ? प्रत्यक्षात कितपत मार्गदर्शक ठरले ?

ब्रिटिश विचारवंतांच्या पायाशी बसून आंबेडकर उदारमतवाद शिकले; स्वातंत्र्य-समता-बंधुता शिकले, सनदशीर राजकारण शिकले, अर्थकारण शिकले, मानवतावादी विचार शिकले, माणुसकी आणि मानवाची प्रतिष्ठा शिकले, सहिष्णुता आणि परमताचा आदर शिकले. पण या सर्व विचारांच्या उच्चाराला–आचाराला प्रत्यक्ष भारतीय परिस्थितीमध्ये कितपत स्थान होते ?–वाव होता ? ज्या ब्रिटिश विचारवंतांनी उदारमतवाद शिकविला तेच किंवा त्यांचे शिष्य ब्रिटिशांच्या भारतामधील जुलमी, शोषक, निर्घृण शासनाचे समर्थक होते. आणि या शासनाविरुद्ध केवळ सनदशीरपणाने–कायद्याने लढणे अशक्य होते, हा हिंदी जनतेला पुरता अनुभव येऊन चुकला होता. म्हणूनच राजकारणात इंग्रज विचारवंतांनी शिकविलेला उदारमतवाद आणि सनदशीरवाद रोकड्या अनुभवाने पराभूत झाला होता; बाद ठरला होता. तीच गोष्ट मानवी स्वातंत्र्य–समता–बंधुता यांची. भारतामधील चातुर्वर्ण्याधिष्ठित समाजव्यवस्था, जन्मजात सामाजिक विषमतेची, अस्पृश्यतेची निर्घृण, अपरिवर्तनीय समाजरचना ही भयानक वस्तुस्थिती होती. तिच्यापुढे सारी मानवता, करुणा, समता–बंधुतेच्या भावना संपूर्णपणे बोथटच नव्हे तर अगदी विकृत होऊन गेल्या होत्या ! (याही बाबतीत उदारमतवादी समाजनेते किंवा ब्रिटिश कायद्याचे राज्य संपूर्णपणे निरुपयोगी ठरले होते, किंवा त्या विषम-पद्धतीचे प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष समर्थकच ठरले होते.) आणि हे सर्व धर्माच्या नावाने चालले होते ! ईश्वरी कृपा, धार्मिक

सात्विक धारणा, ईश्वराची सर्व लेकुरे वगैरे सर्व तत्त्वज्ञान निष्फळच नव्हे तर प्रत्यक्षात दांभिक ठरले होते ! तीच गोष्ट भारतीय जनतेच्या भीषण आर्थिक शोषणासंबंधीची. ब्रिटिश साम्राज्यवादी राजवट आणि तिने चालविलेली वसाहती लूट–आणि त्याच्या जोडीला जुन्या भारतीय सरंजामी–सावकारी आणि नवीन व्यापारी–भांडवलदारी शोषकवर्गाकडूनही होणारे शोषण, अशा द्विविध शोषणामुळे भारतीय श्रमिक–दलित –जनतेची झालेली संपूर्ण हलाखी; याबाबतीतही आंबेडकरांनी विद्यापीठात शिकलेली विचारधारा संपूर्णपणे निरुपयोगी ठरत होती; किंवा साम्राज्यवादी–सरंजामी–भांडवलदारी शोषण पद्धतीची समर्थकच ठरली होती !

अनेक प्रयोग–अनेक पर्याय

ब्रिटीश किंवा अमेरिकन विद्यापीठांमध्ये आत्मसात् केलेली उदारमतवादी विचारधारा–अशा रीतीने व्यक्तिगत जीवनात–त्याचप्रमाणे सार्वजनिक कार्यात निरुपयोगी ठरत असल्याचा अनुभव आंबेडकरांना लवकरच आला. आणि मग प्रत्यक्ष अनुभवातून–खडतर संघर्षाच्या अग्निदिव्यातून आंबेडकरांची दुसरीच एक व्यवहार-सन्मुख अशी विचारधारा आकार घेऊ लागली. ही विचारधारा कमालीची लवचिक, बदलत्या परिस्थितीच्या गरजांना प्रतिसाद देणारी, प्रयत्नवादी–प्रयोगशील अशी होती. तिने कोणालाच कायम मित्र मानले नाही; आणि कोणालाच कायम शत्रूही मानले नाही. तिने कोणत्याच विचारांचे किंवा विचारवंताचे, धर्माचे किंवा धर्म संस्थापकाचे स्तोम माजविले नाही; किंवा कायमचा धिक्कारही केला नाही. ग्रंथात शिकलेले विचार आंबेडकर कधी विसरले नाहीत; पण त्यापैकी कोणत्याही विचार-प्रणालीचे गुलामही ते कधी बनले नाहीत. म्हणूनच धर्माच्या दृष्टीने पाहिले तर प्रारंभी हिंदुधर्म सुधारणांपासून तो पुढे क्रमाक्रमाने धर्मांतर,–नंतर ख्रिस्ती, इस्लामी, शिख, आणि अखेर बौद्ध एवढ्या साऱ्या धर्मांचा त्यांनी कसोशीने आणि परोपरीने पर्याय म्हणून विचार केला. सामाजिक सुधारणेच्या दृष्टीने पाहिले तर शक्य तेवढे त्यांनी सर्वांचे सहकार्य घेतले आणि आवश्यक तेव्हा सर्वांनाच विरोधही केला. मार्गाच्या दृष्टीने पाहिले तर अर्जविनंत्या, ठराव, परिषदांपासून तो प्रखर जन-आंदोलन आणि सामुदायिक सत्याग्रह इत्यादी सर्व मार्गांचा त्यांनी वेळोवेळी आणि पुन्हा पुन्हा अवलंब केल्याचे आढळून येते. सनदशीर राजकारणाच्या दृष्टीने पाहिले तर निवडणुका-नेमणुका यांना त्यांनी प्रारंभी महत्त्व दिले; पण त्याचप्रमाणे विभक्त मतदारसंघ, राखीव जागा, राखीव नोकऱ्या, राखीव शिक्षण-सोयी या सर्वांचा सतत पुरस्कार करून, अखेर स्वतंत्र सार्वभौम भारताची घटना लिहिताना मात्र, सार्वत्रिक मताधिकार आणि संयुक्त मतदार संघ–यांचा स्वीकार केला; आणि विभक्त मतदार-संघाची जन्मभर मांडून केलेली मागणी कायमची सोडून दिली. संयुक्त मतदार-संघातील राखीव जागांची व्यावहारिक निष्फळताही दाखवून दिली आणि अखेर तर

राखीव जागा काढून टाकण्यापर्यंत मजल गाठली ! घटनासिद्ध हक्क, अधिकार, तरतुदी, राखीव जागा, राखीव नोकऱ्या, सोयी-सवलती यांचा त्यांनी जन्मभर आग्रह धरला; पण त्याचबरोबरीने स्वतंत्र, स्वाभिमानी, स्वावलंबी बनण्याचा आदेशही त्यांनी मागास जाती–जमातींना सतत दिला आणि त्यासाठी जन्मभर जिवाचे रान केले.

राजकीय दृष्टीने पाहिले तरी केवळ अर्जविनंत्या, निवेदने सादर करणाऱ्या संस्था काढण्यापासून आंबेडकरांनी प्रारंभ केला. कायदेमंडळात किंवा कमिट्या–कमिशनांवर सरकारी नेमणुका स्वीकारल्या; बहिष्कृत हितकारिणीसारख्या सामाजिक संस्थांहून अधिक पण राजकीय पक्षाहून कमी अशा संस्था चालविल्या. नंतर स्वतंत्र–मजूर–पक्षासारखा राज्यपातळीवरील प्रत्यक्ष राजकीय पक्ष काढला; तो केवळ अस्पृश्यांचा न राहता, इतर श्रमिकांचे सहकार्य लाभावे म्हणून त्याला पुरोगामी डाव्या पक्षाची प्रतिमा दिली. नंतर पुन्हा यांनी मागास जाती-जमातींची अखिल भारतीय संस्था–शेड्युल कास्ट फेडरेशन काढली. ती जाती-जमातींची संस्था असली तरी प्रत्यक्षात तो राजकीय पक्षही होता; आणि अखिल भारतीय प्रमाणावरील आंदोलनाचे ते एक बलिष्ठ व्यासपीठही होते. या फेडरेशनमार्फत त्यांनी सरकारात सत्तास्वीकारही केला. निवडणुका लढविल्या, आघाड्या बांधल्या व मोडल्या आणि अखेर हे फेडरेशन बरखास्त करून नवा रिपब्लिकन पक्ष काढण्याची घोषणा आणि प्रत्यक्ष पूर्वतयारीही त्यांनी केली.

सर्व प्रयोगामागील मुख्य सूत्र—

आंबेडकरांनी जन्मभर चालविलेले हे विविध प्रयत्न, केलेले विविध प्रयोग, शोधलेले विविध पर्याय यांमध्ये काही एक सूत्र किंवा दीर्घसूत्र दिसते काय ? नक्कीच दिसते. ते सूत्र म्हणजे चातुर्वर्ण्याधिष्ठित जन्मजात जातवार विषमतेविरुद्ध संघर्ष हे होय. या संघर्षाचा पाया म्हणजे मागास जाती-जमातींचे स्वतंत्र-सार्वभौम-स्वाभिमानी स्वावलंबी लढाऊ आंदोलन आणि संघटन; त्यांच्या भक्कम आधारावरच बाकी सर्व इतर उपक्रम; म्हणून हे आंदोलन व संघटन सतत करीत राहणे यावर आंबेडकरांचा मुख्य भर होता. पण त्याबरोबरच हीही जाणीव होती की हे आंदोलन केवळ वर्ण-वाचक-वर्ण-विशिष्ट असून भागणार नाही, तर त्यापलिकडेही गेले पाहिजे. सामाजिक समतेच्या लढ्याला तर त्यात मुख्य स्थान आहेच; पण त्याचबरोबर राजकीय आर्थिक-वर्गीय लढाही अटळ आहे. अस्पृश्य आणि मागास जाती-जमातींचे हितसंबंध हे प्रथम हे तर खरेच; पण त्याबरोबरच इतर श्रमिक-शोषिक-दलित वर्गाचे सहकार्य, सहभाग हेही असलेच पाहिजे. जन्मजात जात–जमात ही इतिहासाने लादलेली भयानक वस्तुस्थिती आहे, ही गोष्ट तर खरीच; पण ती बदलण्यासाठी इतर श्रमिक समाजाचे सहकार्यही आवश्यक आहे; या सर्वांच्या बरोबरीने वर्गीय लढा हीही एक निर्णायक वस्तुस्थिती आहे, याचीही तीव्र जाणीव आंबेडकरांना सतत होतीच. ही सर्व सूत्रे

सांभाळून व्यापक एकजुटीचे आंदोलन चालविल्यावाचून ते प्रभावी व यशस्वी होण्याची शक्यता नाही, या जाणीवेतून आंबेडकरांनी विविध प्रयत्न–प्रयोग–पर्याय वापरून बघितले. समाजाने जन्माने त्यांना अस्पृश्य–महार ठरविले होते; तेव्हा त्यांच्या सर्व जीवन-संघर्षाचा प्रारंभ तेथूनच होणे केवळ अपरिहार्य होते. आणि ही अस्पृश्यता–जन्मजात असल्याने हिंदुसमाजाच्या दृष्टीने तिचा शेवट केवळ मृत्यूनेच होऊ शकत होता! आंबेडकरांचा सारा जीवन-संघर्ष या भयानक वस्तु-स्थितीविरुद्ध होता; ती परिस्थिती आमूलाग्र बदलण्याचा होता. ही वस्तुस्थिती खरोखरच आमूलाग्र बदलावयाची असेल तर मग धर्म, समाजघटना–कायदा राजकारण–समाजकारण–अर्थकारण हे सर्वच आमूलाग्र बदलले पाहिजे हीही तीव्र जाणीव आंबेडकरांना होती. म्हणूनच त्यांचा संघर्ष सर्वंकष होणे, त्यासाठी मूलभूत समस्यांना हात घालणे, आमूलाग्र सर्वांगीण परिवर्तनाचा सर्वंकष क्रांतीचा प्रश्न त्यामुळे निर्माण होणे, हे केवळ अपरिहार्य होते. आंबेडकरांची व त्याच्या जाती-जमातीची कोंडी खरोखर आणि कायमची फोडावयाची तर हे सर्व अपरिहार्य होते.

आंबेडकरांच्या आयुष्यातील सर्व द्वंद्वे या जन्मजात समाजरचनेने केलेली कोंडी फोडण्याचा विविध प्रयत्नांमधून निर्माण झालेली होती. आणि त्यातून त्यांचे वेगवेगळे प्रयोग आणि पर्याय आकाराला आले होते. आंबेडकरांच्या परिनिर्वाणाच्या वेळी हा संघर्ष संपला होता, असे मानण्याचे कारण नाही. म्हणूनच बुद्धधर्म आणि रिपब्लिकन पक्षाची घोषणा म्हणजे आंबेडकरांच्या जीवन संघर्षातील अखेरचा प्रयत्न, अखेरचा प्रयोग, अखेरचा पर्याय असे ही मानण्याचे कारण नाही. खुद्द आंबेडकरांनी तसे कधीही मानले नसते, हीच त्यांच्या प्रदीर्घ प्रयत्नशील, प्रयोग-शील, जीवन संघर्षाची प्रत्यक्ष साक्ष आहे. इतिहासाने आणि समाजाने केलेली चौफेर कोंडी फोडण्याच्या प्रयत्नांत, जी द्वंद्वे आंबेडकरांच्या जीवनात निर्माण झाली, त्यांचा विचार अधिक खोलात जाऊन, तपशीलात जाऊन करणे आवश्यक आहे. आंबेडकरांना खरोखर समजून घेण्याचा तोच एकमेव मार्ग आहे. तेवढा खोलवर आणि तपशीलवार विचार करायला पुरेसा अवसर येथे नाही; तरीसुद्धा त्या प्रयत्नांची दिशा येथे केवळ सूचित केलेली आहे.

प्रकरण ६ वे

म. फुले आणि पुरोगामी आंदोलन

महात्मा फुले, त्यांची प्रेरणा–शिकवण यांचा विपर्यास सतत आणि पद्धतशीर झाला; त्यांच्या विरोधकांकडून–त्याचप्रमाणे त्यांच्या अनुयायांकडूनसुद्धा. या विरोधाबद्दल–विपर्यासाबद्दल आतापर्यंत बरेच विवेचन केले.

पण ही कथा एवढीच सांगितली आणि येथेच संपविली, तर ती अर्धवटच राहील! फुल्यांबाबत आणखी एक गोष्ट घडली आहे. ती म्हणजे उपेक्षा -अनुल्लेख. उपरोक्त विरोधकांनी विरोध–विपर्यास करण्यासाठी का होईना; पण फुल्यांची दखल तरी घेतली. अनुयायी म्हणविणारांनी तर अर्थातच फुल्यांचा सतत उदो उदो केला आणि तो चालू असतांच त्यांच्या खऱ्या प्रेरणेचा-शिकवणीचा विपर्यासही भरपूर केला!

पण याहून आणखीही एक प्रकार महाराष्ट्रात घडला आहे. तो म्हणजे उपेक्षेचा, अनुल्लेखाचा; आणि तोही काही पुरोगामी चळवळींकडून–त्यांच्या नेत्यांकडून–कार्यकर्त्यांकडून आणि तोही अतिशय दीर्घ काळ! खरे म्हणजे या पुरोगामी चळवळींनी आणि नेत्यांनी फुल्यांची मूळ प्रेरणा आणि शिकवणच खरोखर प्रत्यक्षात पुढे नेलेली आहे. शूद्र–अतिशूद्र–(स्त्रिया) यांच्यासाठीच त्यांनी आपल्या चळवळी केल्या, संघटना बांधल्या, वैचारिक संघर्ष केले. हे करताना त्यांनी महाराष्ट्रात आणि देशांमध्ये नवी शक्ती–नव्या परंपरा निर्माण करण्यासाठी कटोकटीचे प्रयत्न केले. पण तरीही त्यांच्याकडून फुल्यांची उपेक्षा झाली; आणि या उपेक्षेच्या पोटी महाराष्ट्रातील शूद्र–अतिशूद्र, श्रमिक–दलित यांची एकजूट बांधण्याच्या कामात, (त्यांची पुरोगामी

सात्विक धारणा, ईश्वराची सर्व लेकुरे वगैरे सर्व तत्त्वज्ञान निष्फळच नव्हे तर प्रत्यक्षात दांभिक ठरले होते ! तीच गोष्ट भारतीय जनतेच्या भीषण आर्थिक शोषणासंबंधीची. ब्रिटिश साम्राज्यवादी राजवट आणि तिने चालविलेली वसाहती लूट–आणि त्याच्या जोडीला जुन्या भारतीय सरंजामी–सावकारी आणि नवीन व्यापारी–भांडवलदारी शोषकवर्गाकडूनही होणारे शोषण, अशा द्विविध शोषणामुळे भारतीय श्रमिक–दलित –जनतेची झालेली संपूर्ण हलाखी; याबाबतीतही आंबेडकरांनी विद्यापीठात शिकलेली विचारधारा संपूर्णपणे निरुपयोगी ठरत होती; किंवा साम्राज्यवादी–सरंजामी–भांडवलदारी शोषण पद्धतीची समर्थकच ठरली होती !

अनेक प्रयोग–अनेक पर्याय

ब्रिटीश किंवा अमेरिकन विद्यापीठांमध्ये आत्मसात् केलेली उदारमतवादी विचारधारा–अशा रीतीने व्यक्तिगत जीवनात–त्याचप्रमाणे सार्वजनिक कार्यात निरुपयोगी ठरत असल्याचा अनुभव आंबेडकरांना लवकरच आला. आणि मग प्रत्यक्ष अनुभवातून–खडतर संघर्षांच्या अग्निदिव्यातून आंबेडकरांची दुसरीच एक व्यवहार-सन्मुख अशी विचारधारा आकार घेऊ लागली. ही विचारधारा कमालीची लवचिक, बदलत्या परिस्थितीच्या गरजांना प्रतिसाद देणारी, प्रयत्नवादी–प्रयोगशील अशी होती. तिने कोणालाच कायम मित्र मानले नाही; आणि कोणालाच कायम शत्रूही मानले नाही. तिने कोणत्याच विचारांचे किंवा विचारवंताचे, धर्माचे किंवा धर्म संस्थापकाचे स्तोम माजविले नाही; किंवा कायमचा धिक्कारही केला नाही. ग्रंथात शिकलेले विचार आंबेडकर कधी विसरले नाहीत; पण त्यापैकी कोणत्याही विचार-प्रणालीचे गुलामही ते कधी बनले नाहीत. म्हणूनच धर्माच्या दृष्टीने पाहिले तर प्रारंभी हिंदुधर्म सुधारणांपासून तो पुढे क्रमाक्रमाने धर्मांतर,–नंतर ख्रिस्ती, इस्लामी, शिख, आणि अखेर बौद्ध एवढ्या साऱ्या धर्मांचा त्यांनी कसोशीने आणि परोपरीने पर्याय म्हणून विचार केला. सामाजिक सुधारणेच्या दृष्टीने पाहिले तर शक्य तेवढे त्यांनी सर्वांचे सहकार्य घेतले आणि आवश्यक तेव्हा सर्वांनाच विरोधही केला. मार्गांच्या दृष्टीने पाहिले तर अर्जविनंत्या, ठराव, परिषदांपासून तो प्रखर जन-आंदोलन आणि सामुदायिक सत्याग्रह इत्यादी सर्व मार्गांचा त्यांनी वेळोवेळी आणि पुन्हा पुन्हा अवलंब केल्याचे आढळून येते. सनदशीर राजकारणाच्या दृष्टीने पाहिले तर निवडणुका-नेमणुका यांना त्यांनी प्रारंभी महत्त्व दिले; पण त्याचप्रमाणे विभक्त मतदारसंघ, राखीव जागा, राखीव नोकऱ्या, राखीव शिक्षण-सोयी या सर्वांचा सतत पुरस्कार करून, अखेर स्वतंत्र सार्वभौम भारताची घटना लिहिताना मात्र, सार्वत्रिक मताधिकार आणि संयुक्त मतदार संघ–यांचा स्वीकार केला; आणि विभक्त मतदार-संघाची जन्मभर मांडून केलेली मागणी कायमची सोडून दिली. संयुक्त मतदार-संघातील राखीव जागांची व्यावहारिक निष्फळताही दाखवून दिली आणि अखेर तर

राखीव जागा काढून टाकण्यापर्यंत मजल गाठली ! घटनासिद्ध हक्क, अधिकार, तरतुदी, राखीव जागा, राखीव नोकऱ्या, सोयी-सवलती यांचा त्यांनी जन्मभर आग्रह धरला; पण त्याचबरोबरीने स्वतंत्र, स्वाभिमानी, स्वावलंबी बनण्याचा आदेशही त्यांनी मागास जाती–जमातींना सतत दिला आणि त्यासाठी जन्मभर जिवाचे रान केले.

राजकीय दृष्टीने पाहिले तरी केवळ अर्जविनंत्या, निवेदने सादर करणाऱ्या संस्था काढण्यापासून आंबेडकरांनी प्रारंभ केला. कायदेमंडळात किंवा कमिट्या–कमिशनांवर सरकारी नेमणुका स्वीकारल्या; बहिष्कृत हितकारिणीसारख्या सामाजिक संस्थांहून अधिक पण राजकीय पक्षाहून कमी अशा संस्था चालविल्या. नंतर स्वतंत्र–मजूर–पक्षासारखा राज्यपातळीवरील प्रत्यक्ष राजकीय पक्ष काढला; तो केवळ अस्पृश्यांचा न राहता, इतर श्रमिकांचे सहकार्य लाभावे म्हणून त्याला पुरोगामी डाव्या पक्षाची प्रतिमा दिली. नंतर पुन्हा यांनी मागास जाती-जमातींची अखिल भारतीय संस्था–शेडयुल कास्ट फेडरेशन काढली. ती जाती-जमातींची संस्था असली तरी प्रत्यक्षात तो राजकीय पक्षही होता; आणि अखिल भारतीय प्रमाणावरील आंदोलनाचे ते एक बलिष्ठ व्यासपीठही होते. या फेडरेशनमार्फत त्यांनी सरकारात सत्तास्वीकारही केला. निवडणुका लढविल्या, आघाड्या बांधल्या व मोडल्या आणि अखेर हे फेडरेशन बरखास्त करून नवा रिपब्लिकन पक्ष काढण्याची घोषणा आणि प्रत्यक्ष पूर्वतयारीही त्यांनी केली.

सर्व प्रयोगामागील मुख्य सूत्र—

आंबेडकरांनी जन्मभर चालविलेले हे विविध प्रयत्न, केलेले विविध प्रयोग, शोधलेले विविध पर्याय यांमध्ये काही एक सूत्र किंवा दीर्घसूत्र दिसते काय ? नक्कीच दिसते. ते सूत्र म्हणजे चातुर्वर्ण्याधिष्ठित जन्मजात जातवार विषमतेविरुद्ध संघर्ष हे होय. या संघर्षाचा पाया म्हणजे मागास जाती-जमातींचे स्वतंत्र-सार्वभौम-स्वाभिमानी स्वावलंबी लढाऊ आंदोलन आणि संघटन; त्यांच्या भक्कम आधारावरच बाकी सर्व इतर उपक्रम; म्हणून हे आंदोलन व संघटन सतत करीत राहणे यावर आंबेडकरांचा मुख्य भर होता. पण त्याबरोबरच हीही जाणीव होती की हे आंदोलन केवळ वर्ण-वाचक-वर्ण-विशिष्ट असून भागणार नाही, तर त्यापलिकडेही गेले पाहिजे. सामाजिक समतेच्या लढ्याला तर त्यात मुख्य स्थान आहेच; पण त्याचबरोबर राजकीय आर्थिक-वर्गीय लढाही अटळ आहे. अस्पृश्य आणि मागास जाती-जमातींचे हितसंबंध हे प्रथम हे तर खरेच; पण त्याबरोबरच इतर श्रमिक-शोषिक-दलित वर्गाचे सहकार्य, सहभाग हेही असलेच पाहिजे. जन्मजात जात–जमात ही इतिहासाने लादलेली भयानक वस्तुस्थिती आहे, ही गोष्ट तर खरीच; पण ती बदलण्यासाठी इतर श्रमिक समाजाचे सहकार्यही आवश्यक आहे; या सर्वांच्या बरोबरीने वर्गीय लढा हीही एक निर्णायक वस्तुस्थिती आहे, याचीही तीव्र जाणीव आंबेडकरांना सतत होतीच. ही सर्व सूत्रे

सांभाळून व्यापक एकजुटीचे आंदोलन चालविल्यावाचून ते प्रभावी व यशस्वी होण्याची शक्यता नाही, या जाणीवेतून आंबेडकरांनी विविध प्रयत्न–प्रयोग–पर्याय वापरून बघितले. समाजाने जन्माने त्यांना अस्पृश्य–महार ठरविले होते; तेव्हा त्यांच्या सर्व जीवन-संघर्षाचा प्रारंभ तेथूनच होणे केवळ अपरिहार्य होते. आणि ही अस्पृश्यता–जन्मजात असल्याने हिंदुसमाजाच्या दृष्टीने तिचा शेवट केवळ मृत्यूनेच होऊ शकत होता! आंबेडकरांचा सारा जीवन-संघर्ष या भयानक वस्तु-स्थितीविरुद्ध होता; ती परिस्थिती आमूलाग्र बदलण्याचा होता. ही वस्तुस्थिती खरोखरच आमूलाग्र बदलावयाची असेल तर मग धर्म, समाजघटना–कायदा राजकारण–समाजकारण–अर्थकारण हे सर्वच आमूलाग्र बदलले पाहिजे हीही तीव्र जाणीव आंबेडकरांना होती. म्हणूनच त्यांचा संघर्ष सर्वंकष होणे, त्यासाठी मूलभूत समस्यांना हात घालणे, आमूलाग्र सर्वांगीण परिवर्तनाचा सर्वंकष क्रांतीचा प्रश्न त्यामुळे निर्माण होणे, हे केवळ अपरिहार्य होते. आंबेडकरांची व त्याच्या जाती-जमातीची कोंडी खरोखर आणि कायमची फोडावयाची तर हे सर्व अपरिहार्य होते.

आंबेडकरांच्या आयुष्यातील सर्व द्वंद्वे या जन्मजात समाजरचनेने केलेली कोंडी फोडण्याचा विविध प्रयत्नांमधून निर्माण झालेली होती. आणि त्यातून त्यांचे वेगवेगळे प्रयोग आणि पर्याय आकाराला आले होते. आंबेडकरांच्या परिनिर्वाणाच्या वेळी हा संघर्ष संपला होता, असे मानण्याचे कारण नाही. म्हणूनच बुद्धधर्म आणि रिपब्लिकन पक्षाची घोषणा म्हणजे आंबेडकरांच्या जीवन संघर्षातील अखेरचा प्रयत्न, अखेरचा प्रयोग, अखेरचा पर्याय असे ही मानण्याचे कारण नाही. खुद्द आंबेडकरांनी तसे कधीही मानले नसते, हीच त्यांच्या प्रदीर्घ प्रयत्नशील, प्रयोग-शील, जीवन संघर्षाची प्रत्यक्ष साक्ष आहे. इतिहासाने आणि समाजाने केलेली चौफेर कोंडी फोडण्याच्या प्रयत्नांत, जी द्वंद्वे आंबेडकरांच्या जीवनात निर्माण झाली, त्यांचा विचार अधिक खोलात जाऊन, तपशीलात जाऊन करणे आवश्यक आहे. आंबेडकरांना खरोखर समजून घेण्याचा तोच एकमेव मार्ग आहे. तेवढा खोलवर आणि तपशीलवार विचार करायला पुरेसा अवसर येथे नाही; तरीसुद्धा त्या प्रयत्नांची दिशा येथे केवळ सूचित केलेली आहे.

प्रकरण ६ वे

म. फुले आणि पुरोगामी आंदोलन

महात्मा फुले, त्यांची प्रेरणा–शिकवण यांचा विपर्यास सतत आणि पद्धतशीर झाला; त्यांच्या विरोधकांकडून–त्याचप्रमाणे त्यांच्या अनुयायांकडूनसुद्धा. या विरोधाबद्दल–विपर्यासाबद्दल आतापर्यंत बरेच विवेचन केले.

पण ही कथा एवढीच सांगितली आणि येथेच संपविली, तर ती अर्धवटच राहील! फुल्यांबाबत आणखी एक गोष्ट घडली आहे. ती म्हणजे उपेक्षा-अनुल्लेख. उपरोक्त विरोधकांनी विरोध–विपर्यास करण्यासाठी का होईना; पण फुल्यांची दखल तरी घेतली. अनुयायी म्हणविणारांनी तर अर्थातच फुल्यांचा सतत उदो उदो केला आणि तो चालू असतांच त्यांच्या खऱ्या प्रेरणेचा-शिकवणीचा विपर्यासही भरपूर केला!

पण याहून आणखीही एक प्रकार महाराष्ट्रात घडला आहे. तो म्हणजे उपेक्षेचा, अनुल्लेखाचा; आणि तोही काही पुरोगामी चळवळींकडून–त्यांच्या नेत्यांकडून–कार्यकर्त्यांकडून आणि तोही अतिशय दीर्घ काळ! खरे म्हणजे या पुरोगामी चळवळींनी आणि नेत्यांनी फुल्यांची मूळ प्रेरणा आणि शिकवणच खरोखर प्रत्यक्षात पुढे नेलेली आहे. शूद्र–अतिशूद्र–(स्त्रिया) यांच्यासाठीच त्यांनी आपल्या चळवळी केल्या, संघटना बांधल्या, वैचारिक संघर्ष केले. हे करताना त्यांनी महाराष्ट्रात आणि देशांमध्ये नवी शक्ती–नव्या परंपरा निर्माण करण्यासाठी कटोकटीचे प्रयत्न केले. पण तरीही त्यांच्याकडून फुल्यांची उपेक्षा झाली; आणि या उपेक्षेच्या पोटी महाराष्ट्रातील शूद्र–अतिशूद्र, श्रमिक–दलित यांची एकजूट बांधण्याच्या कामात, (त्यांची पुरोगामी

आंदोलने–व्यापक व भरीव होण्याच्या कामात) कमजोरी आलेली आहे. परिणामी–महाराष्ट्रातील गांधीवादी, किंवा पुरोगामी–सोशालिस्ट–कम्युनिस्ट चळवळींचीही अपरिमित हानी झालेली आहे.

फुल्यांची उपेक्षा–एक एक नमुना !

ही उपेक्षा इतकी सतत होत राहिली किंवा त्या उपेक्षेनेसुद्धा इतकी विविध रूपे धारण केली की त्याचे आज आश्चर्य वाटावे ! काहींच्या लेखी फुले अजिबात जणू होऊन गेलेच नाहीत की काय अशी शंका येते ! या संपूर्ण उपेक्षेचा एक अर्थ असा होऊ शकतो की, चिपळूणकरांनी फुल्यांवर केलेली टीका या सर्वांनी जणू गृहितच धरलेली असावी, निदान त्या टीकेत त्यांना फारसे आक्षेपार्ह असे तरी वाटलेले नसावे.

१९२० पर्यंत म्हणजे सामान्यतः टिळकांच्या जमान्यात हा प्रश्न फारसा उपस्थित होण्याचा संभवच नव्हता. कारण, टिळकांच्या स्वातंत्र्य-लढ्याचा नगारा महाराष्ट्रात एवढ्या जोरात वाजत होता की, त्याच्या कडकडाटात बाकी सर्व आवाज अक्षरशः बुडून गेले होते. शिवाय, टिळकांच्या उत्तर आयुष्यात राजकारणालाच संपूर्णपणे प्राधान्य मिळाले; त्यांतही कामगार चळवळ, वर्गलढे, रशियन राज्यक्रांती, हिंदु-मुसलमान एकजूट, (फार काय काही प्रमाणात तरी अस्पृश्यतेसारखे सामाजिक प्रश्न) यांबाबत टिळकांनी बऱ्याच पुरोगामी भूमिका पुढे पुढे घेतल्यामुळे तत्कालीन पांढरपेशा तरुणांची पुरोगामीपणाची व जहाल लढाऊपणाची भूक काही प्रमाणात भागत गेली असावी. आणखी एक उल्लेखनीय गोष्ट म्हणजे केवळ सामाजिक सुधारणेच्या आणि बहुजनसमाजाच्या नावाने बोलणारे लोक तेव्हा राजकीय दृष्ट्या पूर्णपणे सरकारजमा झालेले होते; फुल्यांच्या मूळ प्रेरणांचा, शिकवणीचा प्रभाव त्यांच्या उच्चार-आचारांतून फारसा जाणवण्याजोगा नव्हता. त्यामुळे खऱ्या अर्थाने फुल्यांची सर्वांगीण प्रेरणा-शिकवण यांचा विजनवास तेव्हा प्रत्यक्षात संपलेला नव्हता.

गांधी-युगातील उपेक्षेचा नवा नमुना !

टिळकांच्या निधनानंतर महात्मा गांधींकडे देशाचे आणि त्याबरोबर (मूठभर मक्तेदार ब्राह्मण पुढाऱ्यांना आवडो अगर न आवडो !) महाराष्ट्राचेही पुढारीपण गेले. पण गांधीजींच्या नव्या पुढारीपणालाही बरीच वर्षे फुल्यांची दखल काही ध्यावीशी वाटली नाही ! जेधे-जवळकरांनी प्रस्थापित ब्राह्मणेतर पुढाऱ्यांचा पराभव करून बहुजनसमाजाला स्वातंत्र्यलढ्यात आणि काँग्रेसमध्ये खेचून आणीपर्यंत जवळपास हीच परिस्थिती कायम राहिली. १९३०-३४ नंतर केशवराव जेध्यांच्या प्रभावामुळे फुल्यांची उपेक्षा महाराष्ट्र काँग्रेसमध्ये होत राहणे, पुढे शक्य राहिले नाही. तेव्हा फुल्यांना एकदाची मान्यता मिळालीः पण ती मान्यता मिळाली ती इतकी की, फुल्यांची

प्राण-प्रतिष्ठा एकदम देव्हाऱ्यातच झाली! महात्मा फुले देव्हाऱ्यात बसले; पण त्यांची प्रेरणा-शिकवण मात्र प्रत्यक्षात पूर्वीप्रमाणेच उपेक्षितच राहिली! फुल्यांची आठवण फक्त त्यांच्या पुण्यतिथीच्या दिवशी-किंवा त्यांच्या पुतळ्यांचे किंवा प्रतिमांचे गावोगाव अनावरण करण्याच्या निमित्ताने यथासांग केली की संपले, देव पावला, असा नवा जमाना सुरू झाला! त्यांमध्ये कर्मवीर भाऊराव पाटलांसारखे जे प्रत्यक्ष कार्यकर्ते होते, त्यांचाच तेवढा उज्ज्वल अपवाद म्हणून काय तो, सांगता येण्यासारखा आहे.)



जावडेकरकृत अपुरे मूल्यमापन

याबाबतीत आणखीही एक गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे. गांधी युगात जे विचारवंत झाले त्यांनी फुल्यांचे कधी उत्साहाने स्वागत केलेले दिसत नाही; किंवा फुल्यांच्या ऐतिहासिक कार्याचे त्यांनी कसोशीने मूल्यमापन केल्याचेही आढळत नाही. उलट, त्यांच्या मनात कुठेतरी फुल्यांबद्दल आणि त्यांच्या कार्याबद्दल एक प्रकारची आढी–किंबहुना आकसच वसत असल्यासारखे दिसते! जी स्थिती महाराष्ट्रातील गांधीवादी नेत्यांची–विचारवंतांची; तीच काही अंशी–काही प्रमाणात तरी समाजवाद्यांबाबतही असावीसे दिसते. कारण, बहुतेक समाजवादी निदान १९४०–४२ पर्यंत तरी प्रायः आणि अंतिमतः खरोखर गांधीवादीच होते; निदान जास्त गांधीवादी–कमी समाजवादी होते! आणि त्यांचा समाजवादही अगदी सोयीप्रमाणे कमीजास्त पातळ झालेला–किंवा केलेला! गांधीयुगातील या सर्व गांधीवादी–समाजवादी विचारवंतांचे अग्रगण्य प्रवक्ते आणि विचारवंत तत्त्ववेत्ते म्हणजे आधुनिक भारतकार प्रा. जावडेकर हे होत. गाढ विद्वत्ता, व्यापक व्यासंग, अभ्यासकाची सचोटी, वैचारिक सर्जनशीलता याबाबतींत जावडेकरांइतकी उंची टिळकोत्तर महाराष्ट्रात क्वचित्‌च कोणी गाठली असेल! राष्ट्रवाद, गांधीवाद, समाजवाद यांचा साक्षेपी व समतोल अभ्यास करून त्यांनी सत्याग्रही समाजवादाचा अभिनव सिद्धांत मांडला. भारतीय प्रबोधनाचे एक महान् भाष्यकार असा त्यांचा सार्थ लौकिक आहे. त्यांचा 'आधुनिक भारत' हा ग्रंथ दोन पिढ्यांनी तरी प्रमाण-ग्रंथ म्हणून मानला होता. लो. टिळकांच्या 'गीता रहस्या' नंतरचा सर्वश्रेष्ठ ग्रंथ म्हणून वा. म. जोशींसारख्या साक्षेपी विचारवंतांनी त्यांचा गौरव केलेला आहे. अशा या प्रमाण-ग्रंथात, जावडेकरांनी फुल्यांचे केलेले मूल्यमापन पुन्हा वाचले म्हणजे आज आश्चर्याचा धक्काच बसतो! जावडेकरांच्या प्रचंड ग्रंथांमध्ये फुले आणि त्यांच्या कार्याला इतके कमी व गौण स्थान मिळालेले आहे की, जणू काय,

टाळता येत नाही म्हणून टाळले नाही, नाइलाज म्हणून कमीत कमी लिहावयाचे तेवढे लिहिले, असाच हा एकूण प्रकार वाटतो! फुल्यांचा मनमोकळा गौरव करण्याइतपत उत्साह नाही; आणि त्यांच्यावर टीका करण्याइतपत सध्या परिस्थिती आणि शक्यता राहिलेली नाही, अशा काहीशा विचित्र पद्धतीचे हे लिखाण वाटते! बरे जे लिहिले आहे त्यावरील चिपळूणकरी छाप पुसतां पुसत नसल्यासारखे वाटते! जावडेकरांसारख्या श्रेष्ठ विचारवंतांची ही गोष्ट! मग विद्वान इतरेजनांबद्दल अधिक काय लिहावे?

पुनर्मूल्यमापनः लोकहितवादींचे आणि फुल्यांचे

याबाबतीत आणखीही एक मजेदार गोष्ट दिसते. वास्तविक, ब्राम्हणांवरील टीकेच्या बाबतीत लोकहितवादी हे फुल्यांइतकेच कडवे होते. आणि चिपळूणकरांनी फुल्यांप्रमाणेच लोकहितवादींवरही आपल्या विशिष्ट शैलीमध्ये झोड उठविली होती. आणि शास्त्रीबुवानी दोघांनाही त्यांच्या समजुतीप्रमाणे केव्हाच कायमचे जमिनदोस्त करून टाकले होते! चिपळूणकरी विचारांची विषारी झापड टिळक-युगाच्या अस्तानंतर काही काळाने उतरू लागली; आणि शास्त्रीबोवांनी जमीनदोस्त केलेल्या काही विचारांबाबत आणि विचारवंतांबाबत फेरविचार थोडाफार सुरू झाला. स्वाभाविकपणे लोकहितवादी आणि फुल्यांबद्दल (ब्राह्मण) विचारवंतही नव्याने फेरविचार–पुनर्मूल्यमापन करू लागले. पण त्यातही एक फरक दिसतो. लोकहितवादींचे नव्याने मूल्यमापन चटकन आणि बिनबोभाट होऊ शकले; पण फुल्यांबाबतचा फेरविचार बराच अडखळत, रडत-खडत, आढेवेढे घेत, कित्येकदा नाइलाज म्हणूनच जणू काय होत गेल्यासारखे दिसते! हा प्रकार जावडेकरांप्रमाणेच अगदी पाध्ये–टिकेकरांसारख्या एकेकाळी पुरोगामी म्हणून गाजलेल्या विचारवंतांच्या लेखनातही आढळतो! नव्या पुरोगामी-समाजवादी दृष्टीने 'आजकालच्या महाराष्ट्रा'चे अवलोकन करणाऱ्या या तरूण विचारवंतांनी लोकहितवादींचे पुनर्मूल्यमापन करून अगदी मोकळ्या मनाने त्यांना न्याय दिलेला दिसतो; पण फुल्यांबाबत मात्र तसे होऊ शकले नाही, हीही गोष्ट तितकीच खटकते! पाध्ये–टिकेकर विष्णुशास्त्र्यांवर परखड टीका करू शकतात, पण अगोदर भरपूर क्वचित भरमसाट स्तुती केल्यानंतरच! शिवाय चिपळूणकरांच्या काही विचारांचा धिक्कार केल्यानंतरही त्यांची छाप शिल्लक राहिलेलीच दिसते! ती पुसता पुसवत नाही, हेच खरे! उदाहरणार्थ— "फुल्यांना राजकारणात गम्य नव्हते; आंग्लहितैषी मिशनऱ्याने सत्यशोधक समाजाच्या उद्देशांचा खर्डा जोतिबांसाठी तयार केला असावा" इत्यादी मुक्ताफळे प्रभाकर पाध्यांनी उधळलेली आढळतात! म्हणजे फुले केवळ अशिक्षित अज्ञान होते, एवढेच नव्हे तर त्यांचे 'अज्ञान पालक' कोणी तरी आंग्लहितैषी खिस्ती मिशनरी होते आणि सत्यशोधक समाजाच्या उद्दिष्टांचा खर्डासुद्धा त्यांनीच लिहून दिला असावा,

असा शोध लावण्यापर्यंत या पुरोगामी संशोधकांची मजल १९३५ साली गेली! 'फुल्यांच्या अंगी ब्रह्मद्वेष' भरलेला होता; त्यांनी जातिद्वेषाला वर्णद्वेषाची जोड दिली इत्यादी विधानेही पाध्यांनी अगदी सहजतेने केलेली आढळतात! तात्पर्य, १९३५ साली आजकालच्या महाराष्ट्राचा-त्यातील प्रबोधनाचा इतिहास नव्या पुरोगामी दृष्टीने लिहिण्याची प्रतिज्ञा करणाऱ्या या तरूण पुरोगामी भाष्यकाराने, अखेर ६० वर्षांपूर्वी विष्णुशास्त्र्यांनी केलेल्या विपर्यस्त व अनुदार टीकेचाच अनुवाद पुन्हा एकदा केलेला दिसतो.

नाही म्हणावयाला फुल्यांचे मूल्यमापन करावयास पुढे आले ते काही बहुजनसमाजातील तरुण विचारवंत; पण त्यांच्या विचारात क्वचित् दुसऱ्या टोकाचा विपर्यास दिसतो; तो म्हणजे दुसऱ्या प्रकारच्या एका जातिवादी दृष्टीने केलेला. जवळकर–जेध्यांनी ब्राह्मणेतर पुढाऱ्यांच्या राजनिष्ठ–राजकीय कचाट्यातून बहुजनसमाजाला सोडविण्याचे ऐतिहासिक कार्य बऱ्याच प्रमाणात यशस्वी रीतीने केले. पण त्यात ब्राह्मणेतर पुढारीपणाच्या वरिष्ठवर्गीय-वरिष्ठवर्णीय वैचारिक जातीयवादी पिंडातून ते बहुजनसमाजाची सुटका करू शकले नाहीत. जवळकरांनी मात्र ते काम धडाडीने सुरू केले होते; फुलेवादाला त्यांनी शास्त्रीय मार्क्सवादी वर्गीय दृष्टीची जोड देण्याचा पहिला ऐतिहासिक प्रयत्न केला होता. पण त्यांच्या अकाली निधनानंतर तो प्रयत्न तेथेच खुंटला! त्यानंतर शेतकरी कामकरी पक्षाचा दाभाडी प्रबंध येईपर्यंत हे पुनर्मूल्यमापन प्रायः बंदच पडले!

दाभाडी प्रबंधानंतरची सुवर्णसंधी

दाभाडी प्रबंधानंतर मार्क्सवाद आला, आंतरराष्ट्रीयवाद आला, पण त्याबरोबरच सामाजिक समतेचा लढा काही प्रमाणात तरी मागे पडला, ही गोष्ट खरीच आहे! त्याचप्रमाणे सामाजिक समतेचा लढा आणि वर्गलढा यांची सांगड घालण्याचा विचारही त्या नेत्यांनी फारसा केलेला दिसत नाही; निदान प्रत्यक्षात तरी तो उतरल्याचे फारसे जाणवले नाही. खरे म्हणजे अशा प्रकारचा खराखुरा वास्तव विचार मार्क्सवादी शास्त्रीय दृष्टीतून करण्याला विशेष अनुकूल अशी संधी जेधे-मोऱ्यांना उपलब्ध होती. फुल्यांच्या, शाहुराजांच्या, जेधे–जवळकरांच्या, कर्मवीर पाटलांच्या कार्याचा श्रेष्ठ वारसा त्यांच्याकडे अगदी स्वाभाविकपणाने आणि हक्काने आलेला होता; आणि मार्क्सवाद आणि शास्त्रीय समाजवाद स्वीकारण्याची वैचारिक झेप त्यांनी जवळकरानंतर दीड तपाने प्रथमच घेतली होती. पण दाभाडी प्रबंधानंतरही 'बहुजनसमाज' सामान्यतः जेथल्या तेथेच राहिला-आणि म्हणूनच पुढे यशवंतराव चव्हाणांच्या पुढारीपणाखाली पुन्हा एकदा नव्या ब्राह्मणेतरवादाचे (म्हणजेच उलट्या ब्राह्मणवादाचे!) पुनरुज्जीवन होऊ शकले! म्हणूनच तसे पुनरुज्जीवन करून महाराष्ट्रातील तथाकथित हरितक्रांतीचे नेतृत्व यशवंतराव–वसंतराव यशस्वीपणे करू

शकले ! १९२०–३० या दशकाच्या उत्तरार्धात सत्तावादी--जातिवादी वरिष्ठवर्णीय–वर्गीय ब्राह्मणेतर पुढारीपणाविरुद्ध जेधे-जवळकरांनी बंड केले; ते राजकारणात यशस्वी झाले; पण सामाजिक समतेच्या, त्याचप्रमाणे श्रमिक जनतेच्या वर्गीय लढ्याच्या दृष्टीने अपुरेच राहिले; किंबहुना फारसे सुरूच झाले नाही. १९५०–६० च्या कालखंडात दाभाडी प्रबंधाच्या रूपाने तेच बंड जेधे-जवळकरांच्या पुढे नेण्याचा प्रयत्न झाला. पण पुन्हा चालू राजकारण प्रभावी ठरले; संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याच्या मर्यादित संदर्भात ते यशस्वीही झाले.

खरे पुनर्मूल्यमापन झालेच नाही

पण सामाजिक समतेचा लढा आणि श्रमिकांचा वर्गीय लढा यांचा भरभक्कम पाया पुरोगामी राजकारणाला उपलब्ध करून देण्याचे कार्य अपुरेच राहिले; खरे म्हणजे व्यापक आणि कायम स्वरूपात ते कार्य सुरूच झालेले नाही, ही खेदकारक वस्तुस्थिती आहे. म्हणूनच महात्मा फुल्यांना अभिप्रेत असलेल्या शूद्र-अतिशूद्र श्रमिकांच्या सर्वंकष (राजकीय–सामाजिक–आर्थिक–वर्गीय) क्रांतीऐवजी, बहुजनसमाजाच्या नावाने श्रीमंत शेतकऱ्यांची-बागाईतदारांची तथाकथित 'हरित क्रांती' महाराष्ट्रात होऊ शकते आणि बहुजनसमाजाला मुंबईच्या मूठभर मक्तेदार भांडवलदारांच्या आणि काळ्याबाजारवाल्यांच्या दावणीला बांधण्याचे महत्कार्य यशवंतराव-वसंतराव यशस्वी प्रकारे करू शकतात ! आणि या प्रकाराची मीमांसा करण्यासाठी सुद्धा बहुजनसमाजाच्या पुरोगामी नेत्यांना अजूनही आत्मसंशोधन करण्याची जरूरी सुद्धा फारशी भासत नाही !



कम्युनिस्ट चळवळ आणि फुले

महात्मा फुले, त्यांची प्रेरणा–शिकवण–आणि परंपरेच्या संदर्भात, खरे म्हणजे कम्युनिस्ट चळवळीनेही कठोर आत्मटीका करून घेण्याची तयारी ठेवली पाहिजे. ही आत्मटीका ज्यांची त्यांनी वेळीच केली नाही तर इतरेजन ती टीका करतील, हे उघडच आहे. टिळकयुगाच्या अखेरच्या वर्षात ज्यांच्या विचारांची जडण–घडण झाली, त्या पहिल्या पिढीच्या पोरसवदा भावी कम्युनिस्ट नेत्यांच्या लेखी खुद्द फुले आणि त्यांची मूळ प्रेरणा आणि शिकवण फारशी नव्हतीच ! त्यांच्यासमोर फुले आले ते सरकारजमा ब्राह्मणेतर पुढारी फुल्यांचे नाव सांगत होते म्हणून ! या स्वार्थी, संधिसाधू, जातीयवादी पुढाऱ्यांमुळे, स्वतः महात्मा फुले नव्हेत तर, त्यांचा भीषण विपर्यास या पहिल्या तरुण कम्युनिस्ट नेत्यांच्या डोळ्यासमोर यावा हे दुर्दैवच मानले पाहिजे. बरे आपण फुल्यांचा स्वतःच मागोवा

घ्यावा, अशी गरजही त्यांना कधी वाटल्याचे दिसत नाही ! येथे पुन्हा टिळक–युगाचा वारसा आड आलेला दिसतो. त्यामुळे विष्णुशास्त्र्यांनी आणि राजवाड्यांनी फुल्ल्यांबद्दल जे काय बरेवाईट म्हटले असेल ते तपासून बघण्याची गरजही या तरुण नेत्यांना वाटली नसावी. याचे अतिशय विपरीत परिणाम पुढे होऊ शकतील, याचे भानही त्यांना तेव्हा नसावे. याचा एक परिणाम मात्र असा झाला की, या पहिल्या पिढीच्या तरुण कम्युनिस्ट नेत्यांच्या लेखी फुले अजिबात अस्तित्वातच नव्हते; किंवा असलेच तर, विष्णुशास्त्र्यांसारख्या विरोधकांनी किंवा ब्राह्मणेतर पुढाऱ्यांसारख्या अनुयायांनी उभी केलेली फुल्ल्यांची विपर्यस्त प्रतिमा त्यांच्यापुढे होती. याचाच अर्थ असा की, फुल्यांची खरीखुरी प्रेरणा, शिकवण पहिल्या कम्युनिस्टांपुढे आलीच नाही आणि त्यांनीही तिचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला नाही. आणि त्यामुळे त्यांचे फुल्यांसंबंधीचे दूषितग्रह, काही काळ तरी कायम राहिले असावेत.

टिळकांनी रशियन राज्यक्रांतीचे मनमोकळे स्वागत केले होते; कामगारवर्गाची आणि त्याच्या ऐतिहासिक भवितव्याची महती गायिली होती; त्यांची मध्यवर्ती वर्गीय संघटना स्थापन करण्यात टिळकांनी पुढाकार घेतला होता. राष्ट्रीय चळवळी-प्रमाणेच, कामगारांच्या वर्गीय चळवळीला टिळकांनी दिलेल्या पाठिंब्याचा वारसाही या भावी कम्युनिस्ट पुढाऱ्यांकडे आला होता. टिळकानंतर देशाचे–राष्ट्रीय चळवळीचे पुढारीपण गांधीजींकडे अगदी सहजतेने गेले. गांधीजींच्या असहकार, कायदेभंग, सामुदायिक प्रतिकार वगैरे लढाऊ कार्यक्रमाला या भावी कम्युनिस्टांनी उत्साहाने पाठिंबा दिला. पण एका लहानशा 'हिंसक' प्रसंगाचे निमित्त करून गांधीजींनी एवढे प्रचंड राष्ट्रव्यापी आंदोलन मागे घेतले; आणि देशाचा विशेषतः लढाऊ तरुण देशभक्तांचा दारुण मानभंग–मनोभंग–तेजोभंग केला ! याचा एक परिणाम असा झाला की, तरुणांचा गांधीजींबद्दल भ्रमनिरास झाला आणि त्यांनी नव्या पर्यायी मार्गाचा शोध सुरू केला. 'गांधी विरुद्ध लेनिन' या श्रीपाद अमृत डांगे नामक एक चळवळ्या तरतरीत तरुणाने विचारलेल्या सवालात हा शोध भारतामध्ये अगदी प्रथमच व्यक्त झालेला दिसतो.

गांधी विरुद्ध लेनिन

गांधी विरुद्ध लेनिन हा कॉ. डांगे यांचा, तेव्हा काहीसा उर्मट वाटणारा सवाल ऐतिहासिक महत्त्वाचा ठरला आहे. लेनिनच्या नावाने या पुस्तिकेत कॉ. डांगे यांनी भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यामध्ये एक नव्या मार्गाचे दिग्दर्शन केले आहे; त्याचप्रमाणे कामगारवर्गाच्या रुपाने भारतामध्ये (विशेषतः मुंबईमध्ये) निर्माण झालेल्या एका महान् क्रांतिकारक शक्तीचे आणि त्याच्या क्रांतिकारक तत्त्वज्ञानाचे-मार्क्सवादाचे तेव्हा त्यांना समजले तेवढे दिग्दर्शन केले आहे. भारतीय स्वातंत्र्य-लढ्याच्या कुशीमध्ये कम्युनिस्ट आंदोलनाचा जन्म झाल्याची ही जन्म-खूण समजली

पाहिजे. भारतीय स्वातंत्र्यलढ्याशी आपले अतूट नाते कम्युनिस्ट चळवळीने जन्मापासून मानले; त्याचप्रमाणे भारताचे भवितव्य समाजवादामध्येच आहे, अशी गंभीर भविष्यवाणीही त्याने उच्चारली, हेही खरे आहे. मार्क्सवादाचा सर्वंकष क्रांतिकारक सिद्धांत, वर्गीय दृष्टीने केलेली समाज-परिवर्तनाची शास्त्रीय मीमांसा, श्रमिकांचा वर्गसंघर्ष ही इतिहासाची-प्रगतीची प्रेरकशक्ती इत्यादी प्रश्नांची प्रथम सूचना कॉ. डांगे यांच्या सवालात मिळते. गांधीजी नकोत; लेनिन हवा, अशी स्पष्ट प्रतिज्ञाही प्रथमच उच्चारली जाते; आणि हे सर्व टिळकांच्या परंपरेशी जुळते आहे, अशीही समजूत या पुस्तिकेमध्ये दिसते. क्रांती आणि हिंसा–अहिंसेच्या संदर्भात गांधीजींच्या विरुद्ध डांगे यांनी टिळकांची साक्ष काढलेली आढळते. ब्रिटिश साम्राज्यशाहीने चालविलेल्या आर्थिक शोषणाच्या संदर्भात, बनिया गांधीजींच्या महात्म्याच्या आड दडू पाहणाऱ्या भारतीय भांडवलदारांवरही हल्ल्याचा प्रथमच रोख आहे. भारतामधील कम्युनिझमचा पहिला उद्घोष म्हणून कॉ. डांगे यांची ही पुस्तिका ऐतिहासिक महत्त्वाची ठरावी, हे योग्यच आहे. राष्ट्रीय स्वातंत्र्यसंग्राम आणि वर्गसंघर्ष या दोन महान् क्रांतिकारक शक्तींचे व त्यांच्या परस्पर संबंधांचे भान या पुस्तिकेत डांगे यांनी त्यावेळी आणि त्या पोरसवदा वयात दाखविले, हे खचित कौतुकास्पद आहे.

सामाजिक समतेच्या लढ्याचे भान

—पण या पुस्तिकेमध्ये भारतीय परिस्थितीच्या वास्तव दर्शनाच्या दृष्टीने आवश्यक अशा सामाजिक समतेच्या लढ्याचे भान फारसे दिसत नाही. विशेषतः श्रमिक जनतेची लढाऊ एकजूट हीच राष्ट्रीय क्रांतीची–त्याचप्रमाणे वर्गसंघर्षाची मुख्य प्रेरणा–प्रमुख शक्ती मानणाऱ्या कम्युनिस्टांच्या दृष्टीने तर या गोष्टीला विशेषच महत्त्व असावयाला हवे होते. चातुर्वर्ण्य, जन्मजात जातवारी, सामाजिक विषमता ही, भारतीय शोषणपद्धतीमध्ये; समाजरजनेमध्ये, राज्ययंत्रणेमध्ये जर एवढी महत्त्वाची गोष्ट असेल तर कम्युनिस्टांच्या विचारमंथनात तिला यथायोग्य स्थान मिळणे आवश्यक होते. पण तशी जाणीव प्रथमपासूनच दिसत नाही आणि पुढेही फारशी कधी दिसलेली नाही.

आधुनिक ज्ञान-विज्ञानासाठी आवश्यक ती शास्त्रीय दृष्टी, स्वातंत्र्य–समता–बंधुता–लोकशाही–वैयक्तिक स्वातंत्र्य इत्यादी नवी मूल्ये स्वीकारण्याचा लढा अव्वल इंग्रजीत आणि नंतरच्या पन्नास वर्षांत भारतामध्ये आणि महाराष्ट्रामध्ये लढला गेला. भारताच्या स्वातंत्र्यलढ्याची पायाभरणी या वैचारिक संघर्षामध्ये झाली. त्याचवेळी चातुर्वर्ण्य, जन्मजात जातवारी, स्त्रियांची गुलामगिरी इत्यादी नष्ट करून खरीखुरी सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या लढ्याचे महत्त्व काही विचारवंतांनी आणि नेत्यांनी प्रतिपादन केले. महात्मा फुल्यांसारख्यांनी तर या लढ्याला निर्णायक महत्त्व

देऊन त्यासाठी स्वतः निर्वाणीचे प्रयत्न केले. दुर्दैवाने या प्रयत्नांचे महत्त्व तत्कालीन राष्ट्रीय नेत्यांनी पुरेसे समजून घेतले नाही; किंवा ज्यांना ते समजले त्यांच्याकडे राष्ट्रीय चळवळीचे नेतृत्व जाऊ शकले नाही. परिणामी सामाजिक समतेचा लढा उपेक्षित राहिला. समाजाचे शूद्र-अतिशूद्र बहुसंख्य विभाग राष्ट्रीय लढ्याच्या कक्षे-बाहेरच राहिले; आणि त्यामुळे राष्ट्रीय लढा, त्याचप्रमाणे सामाजिक समतेचा लढा हे दोन्हीही काही प्रमाणात तरी कमजोर राहिले; त्यांच्यामध्ये काही प्रमाणात तरी फारकत झाली. ही हानी भरून निघण्यासाठी अनेक दशके जावी लागली; तरीही ही फारकत अजून सुद्धा पुरेशी भरून निघालेली नाहीच !

सामाजिक समतेच्या लढ्याची नवी मांडणी

४०–५० वर्षांनंतर राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या जोडीला समाजवादाचे नवे ध्येय आले. स्वातंत्र्य-संग्रामाच्या जोडीला वर्गीय संघर्षाची नवी घोषणा आली आणि जुन्या अनुभवावरून धडे घेण्याची, जुन्या चुका दुरुस्त करण्याची संधी पुन्हा एकदा आली. नवे राष्ट्रीय नेते म. गांधी यांनी स्वातंत्र्यलढ्याच्या दृष्टीने अंशतः या चुका दुरुस्त करण्याचा प्रयत्न केला. पण खरे म्हणजे तोही प्रयत्न वरवरचाच होता. –मनाने सनातनी, चातुर्वर्ण्यवादी, जन्मजात जाती-व्यवसायाचे समर्थक असे गांधीजी, फार तर उच्चवर्णीयांना पश्चात्ताप करावयाला–प्रायश्चित्त घ्यावयाला सांगू शकत होते ! कनिष्ट जातींना–शूद्र-अतिशुद्रांना अधिक मानवतेची, भूतदयेची वागणूक देऊन त्यांचा 'उद्धार' करण्याचा कार्यक्रम गांधीजी आखीत होते ! अर्थात् हे सर्व अपुरे तर होतेच; पण निष्फळही ठरणार होते.

आणि समाजवादाच्या नव्या ध्येयाबद्दल आणि वर्गसंघर्षाबद्दल तर गांधीजींची कट्टर विरोधाचीच भूमिका, प्रारंभापासून अखेरपर्यंत कायम होती. वर्गसंघर्ष हे पाप आहे, तो द्वेषमूलक व म्हणून स्वभावतः हिंसामय आहे; भांडवलदारवर्ग हा मालक-शोषक नसून पालक–विश्वस्त आहे, ही गांधीजींची गाढ श्रद्धा होती. त्यांच्या स्वराज्याची व्याख्या रामराज्यापलीकडे जाऊ शकत नव्हती ! आणि वर्गसंघर्ष आणि समाजवाद हे तर त्यांना भयावह वाटत होते; किंबहुना त्या लाल संकटापासून देशाला आणि जगाला वाचविणे हे त्यांच्या (हृदय-परिवर्तनावर आधारलेल्या) शांति-संग्रामाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट होते. आणि अशा आग्रही, प्रभावी, नेत्याकडे राष्ट्राचे नेतृत्व गेले होते; आणि मीच राष्ट्राचा एकमेव नेता आहे, असा त्या नेत्याचा विनयशील पण सर्वंकष अहंकार होता !

अशा परिस्थितीत सामाजिक समतेचा लढा, चातुर्वर्ण्य-जन्मजात जातवारी, विषमता नष्ट करण्याचा लढा, स्त्रियांच्या समान हक्काचा लढा, यांना एक नवीनच संदर्भ, नवीनच महत्त्व प्राप्त होणे अपरिहार्य होते. म्हणूनच फुल्यांच्या प्रेरणेचे–शिकवणीचे महत्त्व समजून घेऊन, (त्यांनी प्रतिपादिलेल्या–प्रवर्तिलेल्या आंदोलना-

तील विपर्यास टाळून; पण त्यांची मूळ प्रेरणा ध्यानात घेऊन) सामाजिक समतेच्या लढ्याची मांडणी नव्याने करणे आवश्यक होते आणि हे कार्य नव्या परिभाषेत, नव्या घोषणांच्या साहाय्याने करणे आवश्यक होते.

भारतीय राष्ट्रीयत्वाची केवळ घोषणा करून ते भारतीयत्व आणि राष्ट्रीयत्व सिद्ध होत नाही;. प्रत्यक्षात अस्तित्वात येत नाही, उलट, वंश, धर्म, जात, कुल, प्रदेश, आणि भावकी–गावकी यांच्या नावाने आधीच विभागलेल्या समाजात विभाजक–विघातक शक्ती प्रभावी होऊ शकतात; कित्येकदा भारतीय राष्ट्रीय आंदोलनात फूट पाडू शकतात, त्याला विषारी–विघातक वळण लावू शकतात, हा कटु अनुभव होता. उच्चवर्णीय–उच्चवर्गीय पुढारीपण हेच करणार, हा त्यांचा स्वभावधर्मच आहे—त्यामध्येच त्यांच्या विशिष्ट प्रस्थापित हितसंबंधांच्या संरक्षणाची हमी त्यांना मिळते, हा रोकडा अनुभव होता.

आता तर स्वातंत्र्य-संग्रामाच्या कुर्शीमध्ये वर्गसंघर्षाचा–समाजवादाचा उद्घोष होत होता. तेव्हा भारतीयत्व आणि राष्ट्रीयत्व यांच्या जोडीला आता श्रमिकांच्या एकजुटीचे वर्गीयत्व सिद्ध–सज्ज करण्याचा, मजबूत पायावर श्रमिकांची एकजूट बांधण्याचा प्रश्न इतिहासाने उभा केला होता. जसे राष्ट्रीयत्वाची, भारतीयत्वाची घोषणा केली म्हणजे राष्ट्रीयत्व किंवा भारतीयत्व आपोआप सिद्ध होत नाही किंवा झाले नाही; त्याचप्रमाणे वर्गीयत्वाची–वर्गीय एकजुटीची केवळ घोषणा केली म्हणजे ती वर्गीय एकजूटही आपोआप प्रत्यक्षात सिद्ध होण्याजोगी नाही, याचा विचार तेव्हा कोणीच केलेला दिसत नाही; तसा करण्याची गरजही तेव्हा–केव्हा कोणाला फारशी वाटल्याचेही आढळत नाही !

१९२० ते ३०–अनुकूल संधीचे दशक

१९२० ते १९३० या दशकात खरे म्हणजे मार्क्सवाद, वर्गवाद, कम्युनिस्ट चळवळ त्यांच्या वाढीला एक प्रकारची अनुकूल संधी होती. वैचारिक दृष्ट्या जनमानसाची पकड घेणे–त्याचप्रमाणे श्रमिक जनतेमध्ये त्या आधारावर प्रचंड जन-आंदोलन, जन-संघटना उभारणे हे कार्य समोर होते. मुंबई शहरात–भारताच्या प्रथम औद्योगिक केंद्रांत–नवोदित कामगारवर्गाच्या या राजधानीत, या दृष्टीने अनुकूल परिस्थिती होती आणि डांगेप्रभृती तरुण कम्युनिस्ट पुढाऱ्यांनी या दशकात मुंबईमध्ये या कार्यात अभूतपूर्व यश मिळविले. मार्क्सवादाचा, वर्गवादाचा–समाजवादाचा पद्धतशीर प्रसार, गिरणी कामगारांच्या प्रचंड वर्गलढ्यात निर्णायक पुढाकार, गिरणी कामगार युनियनची बलशाली लढाऊ संघटना, तरुण कामगारांवरील जबरदस्त प्रभाव, मुंबई काँग्रेसवरील स्पष्ट छाप इत्यादी गोष्टींमध्ये तरुण कम्युनिस्टांच्या तत्कालीन यशाची प्रात्यक्षिके दिसतात. याच काळात कामगारवर्गाच्या वर्गीय एकजुटीला तडे देऊ शकणाऱ्या शक्तींचा–आणि त्यांचा वापर करण्याच्या भांडवलदारवर्गाच्या–

सरकारच्या कुवतीचा, कसबाचा रोकडा अनुभवही नवोदित कम्युनिस्ट नेत्यांना आला होता. हिंदु–मुसलमान दंगे माजवून राष्ट्रीय लढ्याप्रमाणेच कामगारांच्या वर्गलढ्यातही फूट पाडण्याचे प्रयत्न मालकांनी आणि सरकारने कसोशीने केले होते आणि कम्युनिस्टांनी ते तितक्याच निकराने आणि हिंमतीने हाणून पाडले होते. बहुजन-समाज आणि अस्पृश्यसमाज तेव्हा गांधीप्रणित राष्ट्रीय चळवळीपासून सामान्यतः अलिप्त–असंतुष्ट राहिलेला असला, तरी मुंबईच्या कम्युनिस्ट नेतृत्वाखालील वर्ग-लढ्यात तो उत्साहाने सामील झालेला होता. अस्पृश्यांचे उदयोन्मुख पुढारी डॉ. आंबेडकर यांनी गिरणी कामगारांच्या सार्वत्रिक संपाला पाठिंबा दिला होता; फुल्यांचे नाव सांगणाऱ्या ब्राम्हणेतर चळवळीने वर्गलढ्याला विरोध करण्याचे प्रयत्न प्रथम कसोशीने केले; पण काही काळानंतर जवळकरांसारख्या तरुण प्रामाणिक कार्यकर्त्याला तरी ही चूक सुधारून घेणे आवश्यक वाटले. वर्गलढ्याला—संपाला पाठिंबा; पण (ब्राह्मण) कम्युनिस्ट पुढाऱ्यांना विरोध असा पवित्रा काही काळ घेता घेता, स्वतः जवळकरच अखेर प्रामाणिकपणाने वर्गलढावादी–मार्क्सवादी बनले; आणि त्यांनी 'क्रांतीचे रणशिंग' फुंकले!

कामगारवर्गाची घडण

१९२० ते ३० च्या दरम्यान घडलेल्या या सर्व घटनांकडे आज ४०–४५ वर्षांनंतर सिंहावलोन करून पाहिले, तर एका गोष्टीचे आश्चर्य वाटते. राष्ट्रीय–त्याच-प्रमाणे वर्गीय एकजुटीला तडा देऊ शकणाऱ्या, तिच्यात फाटाफूट करू पाहणाऱ्या धार्मिक–जातीय शक्तींचा अनुभव तरुण कम्युनिस्टांना तेव्हा जरूर आला होता, पण १९२८ च्या संपलढ्याची तीव्रता–उग्रता, लढाऊ एकजूट एवढी जबरदस्त होती आणि त्या लढ्याचे यश एवढे दैदिप्यमान होते की, त्याच्या प्रभावामुळे सर्व फूटपाड्या शक्ती काही काळ तरी पार दबून गेल्या होत्या. आणि त्या यशाच्या उत्साहात–उन्मादात या धार्मिक, जातीय, जातवारी विभाजक शक्तीचे पुरेसे भान कम्युनिस्ट पुढाऱ्यांना राहिले नसावे! वर्गीय भावना हीच पहिली, तीच प्रभावी–तीच निर्णायक ठरते, अशी या उत्साही तरूण कम्युनिस्ट क्रांतिकारकांची खात्री पटली होती. वर्ग, वर्गवाद, वर्गलढा ही जणू एक गुरूकिल्ली आहे; ती एक अद्भूत किमया करणारी शक्ती आहे, ही त्यांची श्रद्धा अधिकच दृढ झाली असावी. कामगारवर्ग म्हणजे वर्ग; वर्गलढा म्हणजे वर्गलढा; वर्गीयता म्हणजे वर्गीयता;– त्यापुढे आणि त्याशिवाय दुसरे काहीएक नाही, अशीच त्यांची ठाम निष्ठा असावी. कारखान्यात कामाला लागला म्हणजे कोणीही माणूस एकदम शंभर टक्के कामगार बनावा; धर्म, संस्कृती, जात, भावकी-गावकी इत्यादी हजारो वर्षांचे संस्कार त्याने एका क्षणात जणू विसरून जावे, अशीच त्यांची काहीशी सरधोपट समजूत झालीशी वाटते! कामगारवर्ग हा घडावा–घडवावा लागतो; वर्गलढ्यांतून तो घडतो; या

वर्गलढ्याचीही अनेकविध स्वरुपे असू शकतात; म्हणूनच स्वातंत्र्य, समता, बंधुता यांचे लढे आणि सर्वंकष वर्गलढा यांचाही काही संबंध आहे. त्यासंबंधी काही तात्त्विक आणि व्यावहारिक प्रश्न आहेत, ते प्रश्न समाधानकारकपणे सोडविल्यावाचून वर्गलढा–वर्गीय एकजूट हीही संपूर्णपणे आपोआप सिद्ध होणार नाही, असा विचार फारसा कोणी तेव्हा केलेला दिसत नाही.

वर्गीय आणि राष्ट्रीय

राष्ट्रीय स्वातंत्र्यलढ्याची परंपरा ज्यांना लाभलेली होती, त्या पहिल्या नेत्यांना राष्ट्रीय लढ्याचे भान तरी होते; पण अर्धवट मार्क्सवादाच्या हळकुंडाने लाल झालेल्या काही कोऱ्या करकरीत पुस्तकी कम्युनिस्टांना तेही भान राहिले नव्हते ! आणि १९३०–३२ च्या अभूतपूर्व कायदेभंगाच्या देशव्यापी लढ्याविरुद्ध कम्युनिस्ट चळवळ व वर्गलढा यांना उभे करण्याचा आततायी प्रयत्न त्यांच्यापैकी काही जणांनी तरी खुशाल केला ! १९३४ नंतर ही चूक त्यांना व एकूण कम्युनिस्ट चळवळीला सुधारावी लागली; त्यासाठी कठोर आत्मपरीक्षण–आत्मटीका करावी लागली आणि तीही त्यांनी कठोरपणे आणि जाहीरपणे केली ! राष्ट्रीय लढा आणि एकूण राष्ट्रीय प्रश्नांसंबंधी कम्युनिस्ट पक्षाने पुन्हा पुन्हा आणि सतत विचार केला आहे; विचार–संघर्ष केलेला आहे. जाहीरपणे टीका आणि आत्मटीकाही केलेली आहे. त्यामुळे कम्युनिस्ट चळवळीत निर्माण होणाऱ्या मतभेदांना वेळोवेळी तोंडही दिलेले आहे. राष्ट्रीय प्रश्नांमध्ये राष्ट्रीय एकजुटीचा प्रश्न राष्ट्रीय भांडवलदारांसकट वेगवेगळ्या वर्गांशी येणाऱ्या संबंधांविषयीचे प्रश्न यांचाही वर्गसंघर्षवादी कम्युनिस्ट चळवळीला सतत विचार करावा लागलेला आहे आणि तो तिने केलेला आहे. कारण सर्वंकष वर्गीयत्व मान्य करूनही राष्ट्रीयत्व या संकल्पनेचा विचार टाळता येत नव्हता. तो प्रश्नच अस्तित्वात नाही; तेव्हा त्याचा विचार करण्याचे कारणच नाही, अशी शुद्ध वर्गवादी भूमिका काही शुचिर्भूत पोथीनिष्ठ, नव-ब्राह्मणांनी पुन्हा पुन्हा घेऊन पाहिली ! नाही असे नाही. पण ती रोकड्या व्यवहारात टिकण्याजोगी नव्हती; आणि ती तशी टिकलीही नाही.

वर्गीय एकजुटीला छेदणारे प्रश्न

मग हाच न्याय सामाजिक समतेच्या लढ्याला का लागू शकला नाही ? वर्ग आणि वर्गीयत्व एकदा मान्य केले की, विषमतेचे, सामाजिक अन्यायाचे, त्यामुळे वर्गीय एकजुटीला निर्माण होणाऱ्या धोक्याचे प्रश्न आपोआप सुटलेच पाहिजेत, हा पोथीवद्ध आग्रह कोठून आला ? द्वंद्वात्मक भौतिकतावादाचे आणि वर्गलढ्याचे मूलभूत सिद्धांत मार्क्सने तर सांगितलेच; पण नंतर प्रत्येक कालखंडाच्या आणि प्रत्येक देशाच्या स्थल–काल–परिस्थितीचा सांगोपांग विचार करून, त्यांची वैशिष्ट्ये शोधण्याचा प्रयत्न करणे, त्या वैशिष्ट्यामुळे विशिष्ट देशांत, विशिष्ट

परिस्थितीत त्याच्या विकासाच्या विशिष्ट अवस्थेत, वर्गलढ्यालासुद्धा विशिष्ट आणि विविध रूपे येऊ शकतात, ती शोधून काढणे, हीच विकासशील मार्क्सवादाची खरी कसोटी आहे, अशी मार्क्सवादाची स्पष्ट धारणा आहे. एकदाच अखेरचे परमेश्वरप्राप्त सत्य सांगून टाकून पूर्णविराम पावलेली पोथी म्हणजे मार्क्सवाद नव्हे; किंवा त्या पोथीतील मंत्रांची घनपाठाने पोपटपंची करणे म्हणजे खरे मार्क्सवादी पांडित्यही नव्हे ! मार्क्सवाद हा मृत सिद्धांत नाही; ते एक सदा गतिशील, सदा विकासशील, मार्गदर्शक तत्त्वज्ञान आहे. स्वतः मार्क्सने आणि त्याच्यानंतर त्याच्या सर्व सच्च्या अनुयायांनी याच दृष्टीने आपले तत्त्वचिंतन सतत चालू ठेवले. खुद्द मार्क्सने तर मिळेल त्या साधनसामुग्रीच्या आधारे भारताच्या इतिहासाचे आलोडन करून त्यांतून भारतीय परिस्थितीची–वर्गलढ्याची खास वैशिष्ट्ये शोधून काढण्याचा प्रयत्न सतत केला. लेनिननेही तो प्रयत्न यथावकाश यथाशक्ती चालू ठेवला. भारताची हजारो वर्षे टिकलेली स्थगितता, भारतीय समाजाला आधारभूत ठरलेली ग्रामसंस्था, केवळ भारतामध्येच आढळणारी जन्मजात व्यवसायबद्ध जातिसंस्था, या सर्वांवर ब्रिटिश राजवटीचे व आधुनिक साम्राज्यशाहीचे होणारे अनेकविध परिणाम या सर्व प्रश्नांचा विचार त्याला तेव्हा उपलब्ध असलेल्या तुटपुंज्या साधनसामुग्रीच्या सहाय्याने मार्क्सने सुरू करून दिला होता.

पण भारतामध्ये कम्युनिस्ट चळवळ प्रत्यक्ष सुरू होऊन अनेक वर्षे लोटली तरी या इतिहासदत्त प्रश्नांचा विचार पुरेसा होऊ शकला नाही; वेळीच होऊ शकला नाही, हे मान्य केले पाहिजे. राजकीय गरज म्हणून राष्ट्रीय स्वातंत्र्याचा लढा, राष्ट्रीय भांडवलदारवर्गाचे दुहेरी–दुटप्पी स्वरूप, अशा काही प्रश्नांची तात्विक व व्यावहारिक; सैद्धांतिक आणि धोरण–डावपेचविषयक चर्चा कम्युनिस्ट चळवळीने वेळोवेळी केलेली आहे. त्यासंबंधी भूमिकाही घेतलेल्या आहेत. हिंदु-मुसलमानांचा प्रश्न सतत डोक्यावर लटकत होता; पाकिस्तानच्या घोषणेच्या रूपाने तो प्रश्न राष्ट्रीय एकजुटीवर कड्यासारख्या कोसळला, तेव्हा त्या प्रश्नाचा बरावाईट विचार कम्युनिस्ट चळवळीने चुकत-माकत का होईना, पण केला. भारतीय राष्ट्रीयत्वाच्या पोटात विकास पावणाऱ्या भाषिक, प्रादेशिक गटांच्या प्रश्नाबाबत तर कम्युनिस्ट चळवळीने सर्वांआधी योग्य शास्त्रीय भूमिका घेतली, त्याबाबतची यथायोग्य मांडणी केली; त्या भूमिकेनुसार भाषावार राज्य-रचनेच्या लढ्यांमध्ये पुढाकार घेतला आणि त्या आधारे भारतीय संघराज्य आणि राष्ट्रीय एकात्मता दृढ करण्याचा प्रयत्न केला.

वर्गलढा आणि सामाजिक समतेचा लढा

सामाजिक समतेच्या लढ्याबाबत मात्र जो शास्त्रीय विचार सखोलपणे आणि गंभीरपणे करावयाला हवा होता तो कम्युनिस्ट चळवळीने पुरेसा केला नाही, निदान वेळेवर तरी केलेला नाही, ही गोष्ट मोकळेपणाने मान्य केली पाहिजे. सामाजिक

समतेचा लढा हा मूलतः आणि अंतिमतः वर्गलढ्याशीच निगडित आहे; तथाकथित शूद्र-अतिशुद्रांचा उच्चवर्णीयांविरुद्ध असलेला समतेचा–मानवी हक्कांचा लढा हा श्रमिक जनतेच्या वर्गीय लढ्याशीच निगडित आहे—किंबहुना तो वर्गलढ्याचाच एक अंगभूत भाग आहे, असा विचार कोणी फारसा केला नाही. अस्पृश्य समाज हा तर संपूर्णपणे श्रमिक-शोषित समाजाचा सर्वांत जास्त दलित असा विभाग आहे—तो खऱ्याखुऱ्या अर्थाने 'सर्वहास' आहे, गुलामीच्या बेड्यांवाचून हरण्यासारखे–गमावण्यासारखे ज्याच्याजवळ दुसरे काहीही नाही आणि अक्षरशः सर्व जगच जिंकण्यासारखे ज्याला मोकळे आहे, असा हा वर्ग आहे, ही वस्तुस्थिती आहे. अस्पृश्यांचा संपूर्ण प्रश्न (त्याच्या सामाजिक अंगासह) वर्गीय लढ्याचाच एक विशिष्ट प्रश्न आहे, अशा प्रकारचा विचार झाला नाही. उलट वर्गीय-वर्गीय करता करता, वर्गीय लढा म्हणजे केवळ आर्थिक लढा; आणि आर्थिक लढा म्हणजे केवळ ट्रेड युनियन स्वरूपाचा लढा असा अर्थ निदान व्यवहारात तरी (न कळत) सतत साकार होत गेल्याचे पुन्हा पुन्हा दिसते.

५०–६० वर्षांपूर्वी राष्ट्रीय चळवळीत आधी राजकीय की, आधी सामाजिक असा भ्रामक वाद महाराष्ट्रात माजला आणि आधी राजकीय हा पक्ष विजयी झाला आणि सर्व सामाजिक प्रश्न कायमचे उपेक्षित ठरले. त्यामुळे राष्ट्रीय लढ्याची त्याचप्रमाणे समाजिक सुधारणेची दोघांचीही अपार हानी झाली. ५० वर्षांनंतर समाजवादाच्या चळवळीत वर्गीय आणि दुसरे काही असा प्रश्नसुद्धा उपस्थित होऊ शकला नाही! आधी वर्गीय, नंतरही वर्गीय आणि निरंतर वर्गीयच–त्याखेरीज दुसरे काही नाही, असा मंत्रच जणू नव्या पोथीनिष्ठांकडून घोकला गेला! आणि वर्गीय म्हणजे आर्थिक म्हणजे ट्रेड युनियन असा अर्थ व्यवहारात तरी उतरू लागला! परिणामी, एका बाजूने व्यापक राजकारणाला आणि दुसऱ्या बाजूने सामाजिक समतेसारख्या लढ्यांना दुय्यम–गौण स्थान व्यवहारात मिळू लागले. यांमध्ये राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या प्रश्नासंबंधीची एकांगी भूमिका सुधारण्याचे वेळोवेळी प्रयत्न झाले; पण सामाजिक समतेच्या लढ्यासंबंधीचे जिवंत प्रश्न मात्र सतत उपेक्षितच राहिले. परिणामी, ट्रेड युनियन लढ्यासाठी लाल बावटा; पण राष्ट्रीय लढ्यासाठी गांधी-नेहरू आणि अस्पृश्यतेविरुद्ध लढ्यासाठी आंबेडकर अशी विभागणी-वाटणी कामगारांच्या मनांतसुद्धा काहीकाळ काही प्रमाणात तरी होत गेली!

फुल्यांच्या दिक्कवणीच्या संपूर्ण उपेक्षेच्या परिणामी ग्रामीण विभागांतील जनतेशी मनोमन संबंध जोडण्यात अधिकच अडचणी उत्पन्न झाल्या. ग्रामीण विभागांतील श्रमिकांचा वर्गलढा अधिकच संमिश्र, गुंतागुंतीचा, अनाकलनीय वाटतो असा अनुभव कम्युनिस्टांना येत गेला. ग्रामीण विभागांतील श्रमिकांशी बोलण्याची भाषासुद्धा सापडणे सोपे नसल्याचा अनुभव येऊ लागला. ग्रामीण श्रमिकांच्या

मानसविश्वात प्रवेश करून त्याच्याशी अंतरीच्या गुजगोष्टी करण्यासाठी आवश्यक ती 'वेव्हलेंग्थ' सापडणे, हाच प्रश्न सोपा राहिला नाही !

पण हे सर्व प्रश्न विचाराहे आहेत; व्यावहारिक आहेत; वर्गलढा,–वर्गीय एकजूट–श्रमिकांची एकजूट साधावयाची असेल तर त्यासाठी तो विचार अत्यावश्यकच नव्हे तर अपरिहार्य आहे, अशी निकड कोणाला फारशी भासली नाही.

कम्युनिस्ट चळवळ : जमाखर्च

१९२७-२८ च्या मुंबईतील प्रचंड उधाणानंतर महाराष्ट्रात कम्युनिस्ट चळवळीची प्रगती एकदम का खुंटली; काही चुका दुरुस्त झाल्यानंतरही ग्रामीण भागात तिचा विकास मंदगतीनेच का होत राहिला; ग्रामीण श्रमिकांच्या मानसाला स्पर्श करण्याच्या आड काय काय आले, असा विचार कोणाला फारसा सुचला नाही. जो काय विचार वर्गीय म्हणून वेळोवेळी होत गेला त्यात खरोखरच निर्जीव आर्थिक आकडेमोडच जास्त होती; श्रमिक जनमानसाला स्पर्श करण्याची शक्ती त्यांमध्ये पुरेशी तरी नव्हती. शहरी कामगारांच्या प्रारंभीच्या वर्गलढ्यांच्या तेजाने जसे क्षणभर सर्वजण दिपून गेले, तसे ग्रामीण भागात फारसे घडले नाही. नाही म्हणायला काही आदिवासी विभागातील शौर्यशाली लढे किंवा सोलापूरसारखे तथाकथित 'गुन्हेगार' जमातींचे लढे, असे काही उज्ज्वल अपवाद आढळतील. बाकी सारी जी कमाई जमेच्या खाती आहे ती शहरी-वर्गीय-आर्थिक लढ्याच्या पोटी असेल किंवा स्वातंत्र्यलढ्यांतील त्यागाच्या किंवा शौर्यकथांच्या पोटी जमलेली असेल ! ती काही कमी नाही, किंवा तिचे महत्त्व कमी लेखण्याचाही प्रश्न नाही. प्रत्यक्ष कम्युनिस्ट चळवळ मर्यादित प्रमाणातच वाढलेली असली; तरी एकूण श्रमिकांच्या लढ्यांवर तिची प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष छाप त्याहूनही बऱ्याच व्यापक प्रमाणावर दिसते, यात शंकाच नाही. राष्ट्रीय लढ्यात जे स्थान गांधी-नेहरूंच्या प्रेरणेला तेच स्थान वर्गीय समाजवादी लढ्यांत कम्युनिस्ट चळवळीच्या प्रेरणेला देशभर मिळालेले आहे, ही वस्तुस्थितीची केवळ मर्यादित नोंद आहे. त्याचप्रमाणे जे प्रश्न कम्युनिस्ट चळवळीने यथायोग्य हाताळले नाहीत–सोडवले नाहीत, त्याही चळवळीतील शेकडो श्रेष्ठ, सर्वोत्कृष्ट, त्यागी, प्रभावी, हिंदु-मुस्लीम कार्यकर्ते कम्युनिस्ट चळवळीकडेच अखेर आकर्षित झाले, हीही खरीच वस्तुस्थिती आहे.

राष्ट्रीय चळवळीबाबत वेळोवेळी चुकीच्या भूमिका घेऊनही त्या चळवळीच्या वेगवेगळ्या उठावांतील श्रेष्ठ नेते व कार्यकर्ते अखेर कम्युनिस्ट चळवळीकडेच ओढले गेले, हीही वस्तुस्थितीची आणखी एक नोंद होईल. १९२०–२२ नंतर १९३०–३२ नंतर १९४०–४२ नंतर ४८–५० या प्रत्येक कालखंडात हे पुन्हा पुन्हा घडलेले आहे. त्याचप्रमाणे वेगवेगळ्या ग्रामीण उठावांतील आघाडीवरील लढाऊ कार्यकर्तेही कम्युनिस्ट चळवळीमध्येच सामील झाले आहेत. फार काय डॉ. आंबेडकरांसारखा

जबरदस्त प्रभावी नेता प्रत्यक्ष जिवंत असताही आणि त्याची जबरदस्त पकड त्या समाजावर सतत कायम टिकली असताही, त्या समाजातील शेकडो निष्ठावंत कार्यकर्त्यांनी कम्युनिस्ट चळवळीलाच आपले जीवनसर्वस्व अर्पण केले होते, हीही एक वस्तुस्थितीचीच नोंद आहे ! जी गोष्ट अस्पृश्यवर्गातील कार्यकर्त्यांची तीच इतर मागास जमातींमधील–त्याचप्रमाणे आदीवासी विभागातील शेकडो निष्ठावंत तरुण कार्यकर्त्यांबाबतही खरी आहे. विविध सामाजिक-शैक्षणिक चळवळींतील कार्यकर्त्यांबद्दलही असेच काही प्रमाणात तरी म्हणता येण्यासारखे आहे.

वेळीच झाले असते तर —

अशा रीतीने राष्ट्रीय चळवळ, वर्गीय लढे, मागास जमातींचे लढे, अनेकविध सामाजिक–सांस्कृतिक–शैक्षणिक चळवळी यांमधील हिंदु–मुसलमान, मागास–अस्पृश्य अशा विविध थरांतील कार्यकर्ते कम्युनिस्ट चळवळीकडे आकर्षित झाले ही वस्तुस्थिती आहे. पण त्यामुळे त्या चळवळीकडे, तिच्यातील मूलभूत प्रश्नांकडे कम्युनिस्ट चळवळीने दुर्लक्ष केले–निदान पुरेसे लक्ष दिले नाही, वेळेवर तर नाहीच नाही, या गोष्टीचे समर्थन होऊ शकत नाही. उलट, या प्रश्नांची यथायोग्य जाणीव वेळीच ठेवली असती, त्या प्रश्नांचा सांगोपांग शास्त्रीय विचार वेळीच केला असता, सामाजिक समतेच्या लढ्यांना–त्याच्या वेगवेगळ्या आविष्कारांना आपल्या एकूण चळवळीत योग्यप्रकारे सामावून घेतले असते; व्यापक वर्गलढ्याचेच ते एक विशिष्ट स्वरूप असले तरी त्या लढ्याचाच तो अंगभूत भाग आहे अशी कम्युनिस्ट चळवळींची धारणा असती, तर कम्युनिस्ट चळवळीला, तिला अभिप्रेत असलेल्या खऱ्याखुऱ्या व्यापक सर्वंकष वर्गलढ्याला आणि सामाजिक समतेच्या लढ्यालाही वेगळेच बळ प्राप्त झाले असते, यात शंका नाही. त्याचप्रमाणे उच्चवर्णीय–उच्चवर्गीय शोषकवर्गांना–कम्युनिस्ट चळवळीच्या कट्टर शत्रूंना त्यामुळे वर्गीय चळवळींत धर्म, जात, भावकी, गावकी या नावाने फूट पाडण्याची संधीही मिळाली नसती; श्रमिक जनतेची एकजूट अधिक मजबूत झाली असती, तिची वर्गीय दृष्टी अधिक स्पष्ट, तेजस्वी झाली असती, वर्गशत्रूंच्या फूटपाड्या कारवायांवर मात करण्याची श्रमिक जनतेची शक्ती आणि क्षमता, हिंमत आणि कुवत अधिक वाढली असती याबद्दल शंका नको. ही जरतरची भाषा आहे; इतिहासामध्ये दवडलेली संधी पुन्हा पुन्हा येत नाही, हेही खरेच आहे. पण तरीही कटू अनुभवांवरून शिकणे ही कायमचीच गरज असते. जुन्या अनुभवांतून धडे घेण्यात प्रामाणिकपणा असेल तर उशीर होण्याचा प्रश्न कधीच उपस्थित होत नाही ! या दृष्टीने हे थोडेसे कठोर आत्म-परीक्षण येथे केले आहे; अर्थातच मला दिसले त्याप्रमाणे; माझ्या विचारांना चालना ज्या रीतीने मिळाली त्या रीतीने; यासंबंधी आणखीही सविस्तर चर्चा व्हावी–या अपेक्षेने.

प्रकरण ७ वे

महात्मा फुले आणि स्त्री-मुक्ति-आंदोलन : . . . एका शतकातील वाटचाल

स्त्री-मुक्तीचा लढा : ऐतिहासिक पार्श्वभूमी

सामाजिक समतेच्या सर्व सुधारणांमध्ये स्त्री-पुरुष समता, फार काय स्त्रियांचे किमान सामाजिक हक्क प्रस्थापित करणे ही सर्वांत कठीण गोष्ट आहे. अगदी मानवी समाजाच्या प्राथमिक अवस्थेमधील–आदिम साम्यवादी समाजातील स्त्री-पुरुष समानता सोडल्यास; पुढे खाजगी मालमत्तेच्या उदयाबरोबरच पुरुषप्रधान कुटुंबव्यवस्था अंमलात आली. आणि प्रथम पिता, नंतर पती, अखेर पुत्र यांचे संरक्षण स्वीकारणे हे स्त्रीच्या नशिबी आले. पुरुषाचे संरक्षण स्वीकारणे हे स्त्रीच्या गुलामगिरीचेच दुसरे नाव होते! चातुर्वर्ण्य आणि जन्मजात जातिभेद यांच्या उदयानंतर तर स्त्रीची गुलामगिरी अधिकच पक्की आणि कायमची झाली.

सर्व धर्मांमध्ये–नारी नरकद्वार!

भारताच्या प्रदीर्घ इतिहासात स्त्रीच्या समानतेचा लढा खऱ्या अर्थाने कधी झालाच नाही; कधी सुरूसुद्धा होऊ शकला नाही! किंबहुना त्याची संकल्पना किंवा मांडणीसुद्धा होऊ शकली नाही! भारतामध्ये इतके धर्म, पंथ, स्थापन झाले; इतकी विविध मत-मतांतरे अस्तित्वात आली, पण त्यांमध्ये खऱ्या अर्थाने स्त्रीच्या समानतेची मांडणी केव्हाही, कुणीही कधी केल्याचे आढळत नाही. सनातनी हिंदु-धर्माचे सोडा पण बौद्ध–जैनआदी बंडखोर संप्रदाय स्थापन झाले, वाढले; पण

त्यांमध्ये सुद्धा स्त्रीच्या समाननेला कुठे स्थान मिळाले नाही. यहुदी, खिस्ती, इस्लामी इत्यादी परकीय धर्मांतही स्त्रीच्या समानतेचा प्रश्नसुद्धा कधी उपस्थित झाला नाही. बौद्ध–जैन–खिस्ती या करुणेवर–मानवतेवर आधारलेल्या धर्मांमध्येसुद्धा स्त्रीला समानतेचे स्थान मिळण्याचा प्रश्नसुद्धा उपस्थित होऊ शकला नाही ! फार तर त्या त्या धर्म संघांत स्त्रियांना प्रवेश मिळाला; पण तो तत्त्व म्हणून नव्हे. खुषीने नव्हे तर जवळजवळ नाईलाज म्हणून–आपद्धर्म म्हणून ! खिस्ती धर्मसंघात जोगिणी म्हणून स्त्रिया असल्या तरी त्यांना धर्मगुरुचे फार काय उपदेशकाचे, धर्मसंस्कार करण्याचे सुद्धा अधिकार नव्हते ! धर्मसंस्थेतील कनिष्ठ अधिकारपदाशीसुद्धा स्त्रियांचा दुरूनसुद्धा संबंध येऊ दिला नव्हता ! तीच गोष्ट बौद्ध–जैन संघांमधली. यहुदी–इस्लामी धर्मांत तर स्त्रियांचे याहूनही कनिष्ठ–निकृष्ट स्थान होते.

या सर्व धर्मांत स्त्रियांचा संबंध पापाशी सतत जोडलेला आढळतो ! स्त्री ही पापाचे मूळ, मोहाचे मूलस्थान अशीच स्त्रियांकडे बघण्याची विकृत दृष्टी सर्वच धर्मांत आढळते ! फार काय प्रस्थापित धर्माविरुद्ध जे बंडखोर किंवा सुधारकी पंथ किंवा परंपरा निर्माण झाल्या, त्यांमध्येही स्त्रियांच्या समानतेच्या विचाराला कधीही फारसे महत्त्वाचे स्थान मिळालेले आढळत नाही !

एवढी महान् संत–परंपरा या देशात निर्माण झाली–प्रसार पावली. वैष्णव, भागवत, चैतन्य, त्याचप्रमाणे नानक, कबीर इत्यादी अनेक संप्रदाय देशभर पसरले. इतर अनेक सामाजिक अन्याय थोडेफार सौम्य होण्याला–निदान सहन करावयाला या संप्रदायांची थोडीफार मदतही झाली असेल. पण स्त्रियांचा विचार केला तर 'नारी–नरकद्वार' मानणाऱ्या संतांकडून स्त्रीला समानताच काय, पण साधे किमान हक्क मिळण्याची अपेक्षा कशी करिता येईल ?

भागवत धर्मांत काही संतिणींची–कवयित्रींची नावे जरूर तळपताना आढळतात. पण त्या संतिणींची भूमिका सेविकांची–किंबहुना दासीभावाचीच दिसते ! अगदी मीरेपासून जनी–मुक्ताईपर्यंत–कोणीही बघा. जनीसारखीचा तर दुहेरी दासीभाव ! जनी विठ्ठलाची दासी तर होतीच; पण शिवाय, शूद्र जातीतली म्हणून आणखी एक वेगळा कनिष्ठ दासीभाव तिच्या निमित्ताने प्रकट झालेला दिसतोच ! पुरुष संतांबद्दल तर विचारावयालाच नको ! नारी नरकद्वार काय, रांडा पोरे काय, मुक्तिमार्गावरील धोंड काय; संतांचे शब्द वेगळे वेगळे–भाव मात्र एकच ! स्त्रीची समानता तर सोडाच; पण स्त्री-जन्म हेच जणू मूळपाप ! हीच सारी भूमिका ! मुक्ति-मार्गाचा प्रारंभच मुळी स्त्री-निंदेपासून–स्त्री–द्वेषापासून ! बोहोल्यावरून सावधान ऐकून पलायन करणारा रामदास काय किंवा लहानग्या राहुलबाळाला कुशीत घेऊन झोपलेल्या निद्रिस्त यशोधरेला एकटी सोडून पळणारा सिद्धार्थ काय किंवा दुष्काळात बायका–पोरे मरू देणारा तरीही मरेपर्यंत संसार करिता करिता रांडा–पोरांना सतत

शिव्या-शाप घालणारा तुकाराम काय, स्त्रियांकडे बघण्याची मूळ दृष्टी एकच–नारी नरकद्वार ! आदीम साम्यवादी कालखंड किंवा पुराणकथा सोडल्या तर भारताच्या एकूण प्रदीर्घ इतिहासात देशाच्या नेतृत्वाच्या किंवा शासन-कर्तृत्वाच्या अत्युच्च स्थानी स्त्री बसल्याचे सहसा आढळत नाही. जो एक अपवाद दिसतो तो एका मुस्लीम स्त्रीचाच असावा, हीही एक नवलाचीच गोष्ट आहे ! तो अपवाद म्हणजे सुलताना रेझियाचा. तिची कारकीर्दही जेमतेम तीनच वर्षे टिकू शकली; त्या अत्यल्प काळातही तिला पदच्युत करण्याचे प्रयत्न सतत चालूच होते; आणि अखेर तिच्या खुनात त्याचे पर्यवसान झाले !

विद्युल्लतेच्या विलक्षण तेजाने क्षणमात्र तळपून अंतर्धान पावणाऱ्या तेजस्विनी भारतीय इतिहासात अनेक दिसतात. राणी लक्ष्मीबाई, चांदबिबी–किती तरी नावे आढळतील. खरीखुरी राज्यकर्ती म्हणून नाव घेण्यासारख्या एखाद्या असामान्य स्त्रीचे नावही डोळ्यासमोर येते; ते म्हणजे कोल्हापूरच्या महाराणी ताराबाईचे; किंवा इंदूरच्या राणी अहिल्याबाईचे.

ऐने अकबरी–स्त्रियांच्या हक्कांची पहिली सनद

ज्या स्त्री-विषयक सुधारणांना एकोणिसाव्या शतकात प्राधान्य मिळाले त्यांपैकी निदान काहीतरी घडवून आणण्याचा प्रयत्न भारताच्या इतिहासात जर प्रथम कोणी केला असेल तर तो महंमद तुघलकाने आणि नंतर अकबराने !

वेड्या महंमद तुघलकाचे आणखी एक वेड !

सतीच्या कायद्याला प्रथम बंदी घातली म्हणून लॉर्ड बेंटिंकचे नाव कृतज्ञतेने घेतले जाते; पण बेंटिकपूर्वी ५०० वर्षे वेड्या महंमद तुघलकाने ज्या अनेक वेड्या गोष्टी करण्याचा प्रयत्न केला त्यात हिंदू स्त्रियांच्या सक्तीच्या सतीला बंदी घालण्याचा प्रयत्न ही एक होती ! त्याने सती जाण्यापूर्वी सरकारी परवाना काढण्याची अट घातली. अर्थातच वेड्या महंमदाच्या अनेक इतर वेडांप्रमाणेच हेही वेड मुल्ला-मौलवी, शास्त्री-पंडितांनी आणि भ्रष्ट सरकारी अधिकाऱ्यांनी व्यवहारात फोल ठरविले !

बदनाम व कर्दनकाळ अल्लाउद्दिन खिलजीच्या नावे निदान एक तरी सुधारणा नमूद करण्यासारखी आहे; ती म्हणजे वेश्यांना बंदी–वेश्यांनी विवाह करावा यासाठी त्याने हुकूमही काढले.

—पण अकबराने योजलेल्या आणि प्रयत्न केलेल्या सुधारणा तर फारच व्यापक व मूलगामी होत्या. त्याच्या कायद्यांची संहिता म्हणजे ऐने अकबरी. भारतीय स्त्रियांच्या हक्कांची पहिली सनद असे ऐने अकबरीचे वर्णन केले तर त्यात मुळीच अतिशयोक्ती होणार नाही. अकबरप्रणित स्त्री-विषयक सुधारणांमध्ये पुढील कलमे आहेत. (१) हिंदु स्त्रीने सती जाण्यास प्रतिबंध. (२) हिंदू स्त्रीच्या पुनर्विवाहास

मान्यता. (३) बालविवाहास बंदी–विवाहापूर्वी मुलीचं वय किमान चौदा आणि मुलाचे किमान सोळा असावे. या वयासंबंधी कोतवालाचा शिफारसवजा दाखला मिळविला पाहिजे. (४) विषम विवाहास बंदी–वर आणि वधू यांच्या वयात बारा वर्षांपेक्षा अधिक अंतर असू नये. (५) वेश्याव्यवसायावर प्रतिबंध–त्यासंबंधी खास नियम; परवानापद्धती; वेगळी वस्ती वगैरे. अकबराच्या या स्त्री-विषयक सुधारणांमुळे हिंदू व मुसलमान स्त्रियांना पूर्वी कधीही नव्हते एवढे हक्क प्रथमच मिळणार होते. अर्थातच हिंदू व मुस्लीम दोन्ही सनातन्यांनी–हिंदू शास्त्र-पंडितांनी आणि मुस्लीम मुल्ला-मौलवींनी अकबराविरुद्ध एकच गहजब केला. अकबराच्या नवा धर्म (दीन-ई-ईलाही) काढण्याच्या प्रयत्नांमुळे मुल्ला-मौलवी अगोदरच बिथरले होते. त्यांनी अकबराविरुद्ध हिंदु-मुस्लीम दोन्ही समाजांना चिथावण्याचा प्रयत्न केला; स्थानिक अधिकाऱ्यांकरवी त्या सुधारणा अमलात आणण्याच्या कामी पदोपदी अडथळे आणले आणि अकबराच्या मृत्यूनंतर तर प्रतिक्रियाच सुरू झाली. अकबराच्या पुरोगामी धोरणाचा संपूर्ण पराभव होऊन पुढील तीन बादशहांच्या कारकीर्दीत हिंदू-मुस्लीम दोन्ही धर्मांतील सनातन्यांचाच जोर सतत वाढत गेला ! खरोखर भारताचा दोन हजार वर्षांचा इतिहास पाहिला तर स्त्री-विषयक सुधारणेच्या दृष्टीने अकबराएवढा प्रयत्न कोणीही केलेला दिसत नाही. भारताच्या इतिहासातील सुवर्णयुग म्हणून समजला गेलेला गुप्तकाळ हा स्त्रियांच्या (आणि अस्पृश्यांच्या) दृष्टीने काळाकुट्ट गुलामगिरीचा काळच समजला पाहिजे ! तेव्हापासून तो-तहत इंग्रजी राज्यापर्यंत ही गुलामगिरीची सनद स्त्री-शूद्र-अतिशुद्रांच्या माथी कायम बसली होती ! अशा कृष्णयुगात अकबराने केलेले प्रयत्न म्हणजे काळ्याकुट्ट अंधारात क्षणमात्र चमकलेल्या विद्युल्लेखेप्रमाणेच भासतात. अकबराच्या ऐने अकबरीत भारतीय स्त्रीच्या हक्कांची पहिली सनद लिहिलेली आहे, असाच इतिहासाचा निर्वाळा आहे.

अकबरानंतर स्त्रीविषयक सुधारणांचा प्रश्न अधिकाधिकच बिकट होत गेला; आणि तो पुन्हा उपस्थित होण्यासाठी आणि त्या दृष्टीने वाटचाल सुरू होण्यापूर्वी भारतामधील हिंदू आणि मुसलमान दोघांही शासनकर्त्यांचा संपूर्ण पराभव होऊन इंग्रजांचे राज्य यावे लागले !



फुल्यांच्या कार्यात स्त्री-मुक्तीला प्राधान्य

खुद्द महात्मा फुल्यांनी आपल्या एकूण आंदोलनांत स्त्रियांच्या समानतेच्या लढ्याला शूद्र–अतिशुद्रांच्या बरोबरीने स्थान दिले होते. फुल्यांनी स्वतः वैयक्तिकरीत्या केलेल्या प्रयत्नांतही स्त्री-मुक्ती कार्याला अग्रक्रम होता. प्राधान्य होते, आणि ते त्यांच्या आयुष्यभर कायम राहिले.

शिवाय केवळ स्त्री-शिक्षणापुरतेच त्यांचे प्रत्यक्ष कार्य थांबले नाही; तर प्रौढविवाह, विधवाविवाह, पतिता–परित्यक्ता यांचे विकट व नाजूक प्रश्न, अनाथालये या सर्व क्षेत्रांत त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन प्रत्यक्ष कार्य केले किंवा त्या कार्याला चालना दिली. त्यासाठी संस्था काढल्या, कार्यकर्ते तयार केले, प्रचार केला. फार काय, हिंदू जीवनातील सर्वांत महत्त्वाचा संस्कार जो विवाह, त्यामध्ये सुद्धा फुल्यांनी क्रांतिकारक बदल सुचविले आणि तो अंमलात आणण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली.

स्त्रियांच्या समानतेची ग्वाही देणारे विवाह-संस्कार

बालविवाहाविरुद्ध तर त्यांनी सतत प्रचार केलाच; पण समज आलेल्या मुलीच्या संमतीने विवाह ठरावा; विवाह संस्कारांमधून भाडोत्री भिक्षुकांची संपूर्ण हकालपट्टी करावी, पुरातन काळापासून चालत आलेले पुरुषप्रधान संस्कृतीचे–स्त्रीच्या गुलामगिरीचे संस्कृत मंत्र रद्द करावेत; त्याऐवजी वधु-वरांना समजणारी–त्यांची समानता प्रस्थापित करणारी–वधु-वरांमधील प्रेम-सहकार्य-पावित्र्य यांची महती गाणारी मराठी मंगलगीते त्यांनी तयार केली आणि प्रचारात आणली. असे आधुनिक, स्त्रीच्या समानतेची ग्वाही देणारे विवाह मोठ्या प्रमाणावर व्हावेत, यासाठी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत फुल्यांनी केलेल्या अचाट प्रयत्नांना खरोखर तोड नाही ! फुल्यांचे हे सर्व कार्य केवळ शहरांपुरते मर्यादित नव्हते; उलट त्यांच्या प्रयत्नांचा मुख्य रोख, मुख्य भर ग्रामीण विभागांत होता; आणि त्यांनी सुचविलेले विविध कार्यक्रम सर्वत्र अंमलात यावेत म्हणून त्यांनी संकलितपणे प्रयत्न केले. कुटुंबप्रमुखाची हुकूमशाही आणि स्त्रियांची गुलामगिरी, हा खरोखर सामाजिक–विषमतेचा गुलामगिरीचा मूळ आधार आहे. तो तोडल्याखेरीज कुटुंबात, स्त्री-पुरुषांत समानता येणे केवळ अशक्य आहे. आणि ही समानता आल्याखेरीज बाहेर समाजांत स्त्री-पुरुषांमधील समानतेच्या आणि सामाजिक समतेच्या गोष्टी बोलण्यात काही एक अर्थ नाही, अशी अत्यंत शास्त्रशुद्ध आशयाची भूमिका फुल्यांनी स्वीकारली आणि त्यासाठी त्यांनी जन्मभर चिकाटीने प्रयत्न केले, ही खरोखरच आश्चर्यकारक अशी गोष्ट आहे. याबाबत फुले यांची निष्ठा इतकी पक्की व आग्रही होती की आपल्या काही प्रमुख सहकाऱ्यांशीही, याबाबत अत्यंत कटू शब्दांत वाद करावयाला, फुल्यांनी वेळप्रसंगी मागेपुढे पाहिले नाही.

फुल्यांच्या मृत्यूनंतरची स्थगितता

या शास्त्रशुद्ध भूमिकेवरून सुरू केलेले कार्य फुल्यांनी जन्मभर चालू ठेवले. पण दुर्दैवाची गोष्ट अशी की, फुल्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या एकूण शिकवणीची जशी आबाळ झाली; तशीच त्यांनी प्रवर्तिलेल्या प्रत्यक्ष कार्यामध्ये तर एक प्रकारे स्थगितता आली. आणि या स्थगिततेची सर्वांत जास्त बाधा–झळ फुल्यांच्या स्त्रीविषयक शिकवणीला आणि प्रत्यक्ष कार्याला भोवली !

फुल्यांना प्रिय असलेल्या शिकवणीतील निदान काही बाबी, त्याचप्रमाणे त्यांनी पुरस्कारिलेल्या काही चळवळी पुढे कालांतराने इतर सुधारकांनी उचलून धरल्या. उदा. बहुजनसमाजाचे शिक्षण, अस्पृश्यतानिवारण वगैरे राजर्षी शाहू छत्रपती, विठ्ठल रामजी शिंदे, यांनी त्याचप्रमाणे पुढे फुल्यांच्या नावाने फोफावलेल्या सत्यशोधकी आणि ब्राह्मणेतर चळवळींनी फुल्यांच्या शिकवणीचे व प्रत्यक्ष कार्यक्रमाचे काही भाग तरी निःसंशय पुढे नेले. अस्पृश्याबाबतचे कार्य जरी शाहू छत्रपतींनी आणि कर्मवीर शिंद्यांनी सतत पुरस्कारिले असले, तरी एकूण सत्यशोधक, किंवा ब्राह्मणेतर चळवळीने त्याची पुढे उपेक्षाच केली. अस्पृश्यता आंदोलनाला मात्र स्वतः फुल्यांना साजेसा प्रवक्ता व प्रणेता डॉ. आंबेडकरांच्या रुपाने अखेर लाभला.

फुल्यांनंतर स्त्री-मुक्तीबद्दल संपूर्ण उपेक्षा

पण स्त्री-स्वातंत्र्याच्या आणि समानतेच्या फुल्यांना प्रिय असलेल्या आणि त्यांनी प्राधान्य दिलेल्या आंदोलनाला मात्र कुणीही प्रभावी प्रवक्ता किंवा प्रणेता नंतर लाभला नाही, ही एक अत्यंत लज्जास्पद अशी वस्तुस्थिती आहे. महर्षी कर्व्यांचे स्त्रीशिक्षण आणि महिलाश्रमासारखे मुख्यतः मध्यमवर्गीय महिलांपुरते मर्यादित प्रयत्न सोडले, तर स्त्री-शिक्षणाची व इतर स्त्रीविषयक कार्यक्रमाची सतत संपूर्ण उपेक्षा आणि आबाळ झालेली दिसते. बहुजनसमाजाच्या शूद्र, अतिशूद्र स्त्रियांच्या दृष्टीने पाहिले तर पंडिता रमाबाई आणि काही ख्रिस्ती संस्था सोडल्या, तर कुणीच या कार्याकडे फारसे लक्ष दिलेले दिसत नाही. (अर्थातच केवळ कालांतराने किंवा कालमहात्म्याने किंवा औद्योगिक क्रांतीच्या अपरिहार्य परिणामांमुळे जे काय घडले असेल त्यांची दखल वेगळ्या रीतीने घेतली पाहिजे.)

आणखी एक उल्लेखनीय पण तितकीच लज्जास्पद गोष्ट म्हणजे फुल्यांच्या नावाने चालणाऱ्या चळवळींमध्ये स्त्रियांच्या समानतेच्या प्रश्नांकडे अग्रक्रमाने तर पाहिले गेले नाहीच; उलट त्यांमधील उच्चवर्गीय पुढारीपणाने त्याबाबत उपेक्षा-बुद्धीच दाखविली. किंबहुना त्या चळवळीचा त्यांनी दुस्वासच केला, असे म्हटले तरी चालेल !

फुल्यांच्या शिकवणीशी विसंगत वर्तन !

खरे म्हणजे फुल्यांची स्त्रियांच्या समानतेसंबंधीची मूलभूत भूमिका व शिकवण, ही त्यांच्या नावाने चळवळी करणारे अगदी निष्ठावंत नेते व कार्यकर्ते यांच्यासुद्धा फारशी पचनी कधी पडलीच नाही ! त्याबाबतची फुल्यांची पोटतिडीक त्यांच्या अनुयायांत निर्माण होऊच शकली नाही ! परिणामी, फुल्यांच्या शिकवणीचा व कार्यक्रमाचा हा भाग केवळ कागदोपत्री किंवा फुल्यांच्या लिखाणातच राहिला ! अनुयायांनी त्याची संपूर्ण उपेक्षा तरी केली किंवा अनेकांनी व्यवहारात तरी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष दुरावा किंवा विरोधच केला, हे एक अत्यंत कटू सत्य आहे. बहुजन-

समाजात शिक्षणप्रसार पुष्कळच झाला; पण स्त्रियांपर्यंत त्याचा दहावा हिस्साही आजसुद्धा झिरपला नाही ! सत्यशोधक-ब्राह्मणेतर चळवळीचे रान महाराष्ट्रभर उठले खरे; पण त्याचवेळी बालविवाहही पूर्वीच्याच धडाक्याने सर्रास होतच राहिले !— आणि त्याबद्दल कुणाला कधी खंत वाटली नाही; खेद वाटला नाही की त्याची जाणीवसुद्धा कुणी कधी दाखविली नाही !

शाहुछत्रपतींच्या पुढाकाराने विवाहप्रसंगांत सुधारणा करण्याची आणखी एक चळवळ दक्षिण महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांत तेव्हा पसरली होती. पण त्याचा फुले-प्रणीत स्त्रीपुरुष समताधिष्ठित विवाह-संस्कारांशी दूरान्वयानेही संबंध नव्हता ! नवी सुधारणा होती ब्राह्मण-भिक्षुकांची हकालपट्टी करून त्याऐवजी ब्राह्मणेतर भिक्षुकांची प्रतिष्ठापना करण्याची ! फुल्यांचा विरोध ब्राह्मण भिक्षुकशाहीलाच नव्हे तर सर्वच भिक्षुकशाहीला होता;—परमेश्वर (फुल्यांचा 'माबाप निर्मिक') आणि माणूस यांमध्ये कोणाचीही मध्यस्थी किंवा दलाली असण्यालाच फुल्यांचा सर्वथैव विरोध होता, ही मूलभूत भूमिका हे अनुयायी ब्राह्मणविरोधाच्या उत्साहात विसरले होते ! शिवाय, ब्राह्मणेतर भिक्षुकांच्या पौरोहित्याखाली होणारे हे विवाह इतर दृष्टीने स्त्रियांची गुलामगिरी पक्की करणारे परंपरागत विवाहच होते; त्यांतील मंत्रही जुनेच सनातन संस्कृतच होते ! आणि हे सर्व फुल्यांचे नाव सांगणारांकडूनच बेधडक घडत होते ! अश्राप विधवा, परित्यक्ता, पतिता आणि त्यांची अजाण अनाथ अर्भके यांच्याकडे लक्ष द्यावयाला तर खिस्ती मिशन संस्थांवाचून, कोणालाच फारशी फुरसत नव्हती !

फुल्यांच्या शिकवणीमध्ये पुन्हा पुन्हा आणखी एका गोष्टीवर भर असे. ती ही की, एकूण समाजाची दुरावस्था तर आहेच; पण त्यांतही या सर्व दुरावस्थेचा जास्तीत जास्त जाच आणि आच कनिष्ठांना शूद्र-अतिशुद्रांना आणि त्यांतही त्यातील स्त्रियांना मुख्यत्वे भोगावा लागतो. याशिवाय महागाई, दुष्काळ, रोगराई इत्यादी आपत्ती आल्यास त्यांचाही सारा भार आणि मार याच कनिष्ठतम व हीनतम विभागांनाच सहन करावा लागतो; त्यांतही स्त्रियांना व त्यांच्या लहान मुलांना सर्वांत जास्त ! टंचाई-महागाईची झळ गृहिणींना सर्वांत जास्त भोवते; दुष्काळ-रोगराईचा फटका त्यांनाच प्रथम आणि सर्वांत जास्त बसतो; त्यातून जगल्या तर वैधव्य आणि अनाथपणा पदरी येतो आणि त्यातून नवीनच दुःखमालिका निर्माण होते ! पण या सर्व शिकवणीकडे आणि त्यातून निर्माण होणाऱ्या कार्यक्रमाकडे लक्ष देण्याचे भान कोणाला होते ?

सामान्य सवर्ण बहुजनसमाजापलिकडे जाऊन दलितांची, अतिशुद्रांची महा-प्रचंड चळवळ आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली झाली; आणि निदान महार समाज तरी तिने अगदी शंभर टक्के संपूर्णपणे भारावून टाकला. ही जी चळवळ झाली, तिच्या एकूण जागृतीचा, लढाऊपणाचा, संघटनेचा, स्वाभिमानाचा, आत्मविश्वासाचा फायदा

इतरांबरोबरच स्त्रियांनाही जरूर झाला. पण त्या दलितांच्या चळवळीत, अगदी अस्पृश्यांमध्येसुद्धा स्त्रियांचे म्हणून जे अनेकविध असे खास प्रश्न असतात व होते, त्यासंबंधी कुणी काय केले ? ती फुलेप्रणीत दृष्टी कुणी दाखविली का ? फुल्यांची ती पोटतिडीक कुठे तरी दिसली का ? हे प्रश्न आज तरी विचारण्यासारखे आहेत. आणि त्याचे उत्तर फुल्यांच्या पवित्र स्मृतीला स्मरून आजतरी सर्वांकडून प्रामाणिकपणे आत्मपरीक्षणपूर्वक यावे एवढी तरी अपेक्षा करू या.



फुले आणि वैयक्तिक आचरणाची कसोटी

सार्वजनिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या–विशेषतः नवीन विषयाबाबत नवीन विचार आणि आचार मांडण्याच्या कामी पुढाकार घेणाऱ्या द्रष्ट्यांकडून-प्रणेत्यांकडून समाजाच्या स्वाभाविकपणे विशेषच अपेक्षा असतात.

नवीन क्रांतिकारक विचार किंवा विचारप्रणाली सुचणे, तिची व्यवस्थित जुळणी-मांडणी करणे, ते विचार जाहीरपणे मांडण्याचे धैर्य दाखविणे, त्यासाठी सरकारचा किंवा जनतेचा रोष झाल्यास, होणाऱ्या परिणामांना धैर्याने तोंड देणे, यांमध्येच नवविचार प्रवर्तकाची खरी कसोटी लागते. विशेषतः सर्वांगीण क्रांतीचे–सामाजिक क्रांतीचे कंकण हाती बांधणाऱ्या क्रांतिकारकाची तर विशेषच कसोटी लागते. केवळ क्रांतिकारक विचार सांगून–प्रभावीपणे मांडून भागत नाही. प्रत्यक्ष वैयक्तिक आचरणाच्या कसोटीला उतरावे लागते. क्रांतिकारक विचार मांडले; पण प्रत्यक्ष आचरणाच्या कसोटीची वेळ येताच कच खाल्ली, तर त्या नेत्याची तर बेअब्रू होतेच; पण ज्या क्रांतिकारक विचाराचे कंकण बांधून तो जनतेसमोर आला असतो, त्या विचारांचीही अपरंपार हानी होते. महाराष्ट्रात सामाजिक सुधारणांच्या चळवळीत ही गोष्ट वारंवार घडलेली आहे; आणि त्यामुळे त्या चळवळीची अपरंपार हानी झालेली आहे.

कचखाऊ सुधारक आणि कर्ते सुधारक

अगोदर सामाजिक सुधारणेच्या चळवळीमध्ये विवाह-पुनर्विवाह या विषयाला विद्वान ब्राह्मण समाजसुधारकांनी अवास्तव, प्रमाणाबाहेर महत्त्व दिले. आणि खुद्द त्या सुधारकांवरच जेव्हा कृतीची वेळ आली, तेव्हा त्यांपैकीच काही अगदी अग्रगण्य नेत्यांनीच कच खाल्ली ! (उदा. महाराष्ट्रातील बुद्धिमंतांचे आणि सुधारकांचे मेरूमणी न्या. रानडे आणि त्यांचे पट्टशिष्य ना. गोखले ! न्या. रानड्यांना पुनर्विवाहाची वेळ येताच घरच्या वडिलधाऱ्या मंडळीच्या भावना आठवल्या ! मग निदान त्यांच्यासारख्या धीरोदात्त प्रज्ञावंताने विधुरावस्था स्वीकारावयाची; पण तेही

नाही ! पुन्हा विवाह तर करावयाचा; आणि तोही 'नाईलाज' म्हणून अखेर अगदी विषम विवाह (खरे म्हणजे बालविवाह) ठरावा ! ना. गोखल्यांना पहिली पत्नी जिवंत असता दुसरा विवाह करण्याची तर कोणी सक्ती केली नव्हती ! पण त्यांनी तो केला; आणि पुन्हा तोही परंपरागत पद्धतीनेच; म्हणजेच विधवा विवाह टाळून ! आता अगदी बुद्धिमंतांचे व सुधारकांचे मेरूमणी व त्यांचे पट्टशिष्य यांचेकडूनच असे कचखाऊ वर्तन घडल्यावर त्या सुधारकांच्या अनुयायांचे नैतिक बळ किती खच्ची होणार आणि त्यांच्या प्रतिगामी सनातनी प्रतिस्पर्ध्यांचे बळ निष्कारणच किती वाढणार, याचा अंदाजच केलेला बरा !)

यामुळे केवळ विधवा विवाह या सुधारणेच्या एका कलमाबाबतच हानी झाली नाही तर एकूण समाज-सुधारक चळवळीचीच हानी झाली; ती चळवळ व तिचे नेते जनतेमध्ये तिरस्काराचे व उपहासाचे विषय बनले. एकट्या महर्षी कर्व्यांनी जे कमावले त्याच्याहून अधिक न्या. रानड्यांनी गमावले असे म्हटले, तर त्यात मुळीच अतिशयोक्ती होणार नाही.

महाराष्ट्रातील समाजसुधारणेच्या चळवळींमध्ये ही गोष्ट वारंवार घडली आहे; तिचे अतिशय गंभीर दुष्परिणाम झालेले आहेत; म्हणूनच या कटू व अप्रिय गोष्टींचा उल्लेख करणे भाग पडते !

या दृष्टीने महात्मा ज्योतिबा फुले यांच्या वैयक्तिक वर्तनाला—आणि कठीणतम कसोटीला उतरणाऱ्या त्यांच्या धीरोदात्त व्यक्तिमत्वाला अधिकच महत्त्व येते—उजळा येतो.

फुल्यांचे वैयक्तिक चारित्र्य आणि कृतिशीलता-कृतिशूरता ही या दृष्टीने फार महत्त्वाची आहे; (जितकी टिळकांची राजकीय क्षेत्रात होती तितकीच !)

फुल्यांनी सार्वजनिक जीवनाचा प्रारंभच मुळी अगदी ऐन विशीमध्ये केला; आणि तोही क्रांतिकारक विचार मांडून आणि त्याला तात्काळ क्रांतिकारक वैयक्तिक आचरणाची जोड देऊन !

क्रांतिकारक सुधारणेचा विचार, उच्चार आणि आचार फुल्यांनी एकाच वेळी केला; आणि विसाव्या वर्षी हे जे खडतर त्रिविध व्रत त्यांनी घेतले ते जीवनाच्या अखेरच्या क्षणापर्यंत त्यांनी अत्यंत निष्ठेने व कसोशीने पाळले.

फुल्यांनी अस्पृश्यांसाठी व मुलींसाठी पहिल्या शाळा काढल्या; त्यात त्यांनी स्वतः शिकविले. आपल्या पत्नीला शिकवून त्यांनी तिलाही शिक्षिका बनविले. अस्पृश्यांसाठी स्वतःचे घरच नव्हे, तर स्वतःचा पाण्याचा हौद खुला करून दिला. या अगदी त्यांच्या सार्वजनिक कार्याच्या पहिल्या काही वर्षांतील गोष्टी !—ज्या अनेक नामवंत अग्रगण्य आजन्म सुधारकांना जन्मात कधी करता आल्या नाहीत ! नंतर फुल्यांनी व त्यांच्या पत्नीने आणि त्यांनी जोडलेल्या, पारखून घेतलेल्या निकट

सहकाऱ्यांनी जन्मभर हेच व्रत अखंड चालविले ! पुढे या कार्याचा विस्तार चौफेर झाला ! नव्यानव्या चळवळी त्यांनी सुरू केल्या, संस्था काढल्या; कार्यकर्ते जोडले, पण विचार, उच्चार आणि आचार यांमध्ये फुल्यांनी नेहमीच संपूर्ण सुसंगती राखली; एकदाही यत्किंचितही विसंगती येऊ दिली नाही.

निपुत्रिकतेची कठीण कसोटी !

फुल्यांच्या वैयक्तिक आचरणाच्या दृष्टीने त्यामानाने उपेक्षित अशी पण महत्त्वाची एक गोष्ट आहे. तिचा उल्लेख या ठिकाणी करणे आवश्यक आहे. ती म्हणजे त्यांच्या निपुत्रिकतेची. त्यांची पत्नी निपुत्रिक होती. शंभर-सव्वाशे वर्षांपूर्वीचा काळ ध्यानात घेतला व तत्कालीन सामाजिक-कौटुंबिक मूल्ये, अपेक्षा, जबाबदाऱ्या, यासंबंधीच्या कल्पना विचारात घेतल्या म्हणजे फुल्यांसमोर व त्यांच्या पत्नीसमोर केवढा बिकट वैयक्तिक-कौटुंबिक-सामाजिक प्रश्न उभा राहिला असेल याची आज पुरेशी कल्पनाही करणे कठीण आहे ! स्वतःला अपत्य असणे ही स्त्री-पुरुषांची स्वाभाविक आवड व अपेक्षा तर असतेच. ज्या वडिलधाऱ्या माणसांचा हवाला पुढे न्या. रानड्यांनी दिला तसा फुल्यांनी दिला असता तर ? फुल्यांच्या कुटुंबातील वडिलधाऱ्यांनीही ज्योतिरावांना दुसऱ्या लग्नाचा आग्रह–अत्याग्रह सतत चालविला होता. फुल्यांच्या पत्नीनेही त्याबाबतीत अत्यंत उदार भूमिका घेतली होती. पण या आग्रहाला बळी पडण्याची कल्पना फुल्यांनी एक क्षणभरही मनात आणली नाही ! त्यांनी व त्यांच्या पत्नीने निपुत्रिकता विनतक्रार स्वीकारली–त्यातच समाधान मानले. हा त्यांचा केवळ वैयक्तिक प्रश्न नव्हता; ते ज्या महान आंदोलनाचे प्रणेते होते, त्यालासुद्धा फुल्यांच्या या निर्णयामुळे केवढे बळ प्राप्त झाले असेल !

या निपुत्रिकतेमधून त्यांच्यापुढे दत्तकाचा प्रश्न आला. तोही फुल्यांनी व त्यांच्या पत्नीने अतिशय धैर्याने सोडविला. तो सोडविताना त्यांनी आणखी एका सामाजिक सुधारणेचा व वैयक्तिक आचरणाचा आदर्श घालून दिला.—तो म्हणजे अनाथालयातील एका मुलाला दत्तक घेऊन !



रानडे-टिळक कालखंडातील स्त्री

आधुनिक राजकीय–सामाजिक आंदोलनात स्त्रियांनी सहभागी होण्याच्या दृष्टीने पाहिले तर काय दिसते ?

लो. टिळकांनी एवढी मोठी आंदोलने चढत्या क्रमाने सतत तीस वर्षे तरी केली. आधुनिक भारतातील पहिल्या मोठ्या जनआंदोलनाचे प्रणेते म्हणून टिळकांचा यथार्थ गौरव होतो आणि महाराष्ट्र तर त्यांची प्रमुख कर्मभूमी होती. पण या

टिळकप्रणीत आंदोलनात स्त्रिया कोठे होत्या ? तर जवळ जवळ संपूर्ण अभावानेच त्या झळकत होत्या, हीच वस्तुस्थिती होती ! पुढारीपणात तर एकही स्त्री नव्हतीच; पण मध्यम व कनिष्ठ–जिल्हा किंवा तालुका पातळीवरही जवळ जवळ एकही स्त्री टिळकांच्या आंदोलनात आढळत नाही. आता सर्वच देशभक्तांच्या आणि क्रांतिकारकांच्या घरांतील स्त्रियांना प्रदीर्घ हालअपेष्टा आपल्या पती–बंधूसमवेत भोगाव्या लागल्या, यात शंका नाही. पण ती काही सार्वजनिक आंदोलनातील भागिदारी ठरत नाही. टिळकांच्या काळात अखिल भारताच्या दृष्टीने पाहिले तर काही ठळक नावे झळकताना दिसतात. उदा. डॉ. ॲनी बेझंटबाई; थिओसिफिस्ट म्हणून आणि तितक्याच 'होमरूल' चळवळीच्या नेत्या म्हणून गाजल्या. पण त्यांचा संबंध भारतीय स्त्री-चळवळीशी मुळीच नव्हता. त्यांचा वारसा ब्रिटीश महिला आणि सोशालिस्ट चळवळीचा. त्या भारतात आल्या त्या एकट्याच आणि पुढारी झाल्या तरी एकट्याच राहिल्या. राजकारणात–समाजकारणात भारतीय महिलांना त्याही खेचू शकल्या नाहीत. सरलादेवी चौधुराणी, सरोजिनी नायडू वगैरे नावेही पुढे पुढे ऐकू यायला लागली; पण तीही व्यक्तिगत पुढारणी म्हणून—महिला आंदोलनाच्या प्रणेत्या म्हणून नव्हेत. आणखी एक नाव मॅडम कामा—पण त्या पारशी आणि त्यांचा क्रांतिकारक आणि सोशालिस्ट आंदोलनाशी संबंध आला व टिकला तो इंग्लंडमध्ये आणि युरोपातच. भारतामधील स्त्रियांना त्यांची स्फुर्ती लाभली नाही.

स्त्रियांच्या सहभागाचा अभाव

सगळ्यात नवलाची गोष्ट म्हणजे टिळक कालखंडातील विशाल आंदोलनात स्त्रिया नव्हत्या हे तर खरेच; पण त्यांचा अभाव कोणालाही जाणवला नाही; त्यांची खंत कोणालाही वाटलीसुद्धा नाही ! ही तितकीच खेदाची गोष्ट आहे. स्त्रियांनाही आपल्या हक्काची जाणीव नव्हती, आणि ते हक्क बजावण्यासाठीही कुणी ब्राह्मण–सुधारक स्त्रियाही पुढे आल्या नाहीत. जहाल तर सोडाच; पण मवाळ राजकारणात देखील नाहीच ! याचे एक कारण असे की, खुद्द टिळकांना ती दृष्टीच नव्हती. त्यांच्या सार्वजनिक जीवनाच्या पूर्वार्धात त्यांनी सनातन्यांचीच वकिली हिरीरीने केली होती; आणि तीही मुख्यतः अशा मुद्यांबाबत की ज्यांमध्ये स्त्रियांच्या हक्कांना –स्त्रियांच्या एकूण समानतेच्या भूमिकेला विरोधच होता. टिळक स्वतः व्यक्तिशः सनातनी नसले तरी त्यांचा अनुयायीवर्ग व प्रमुख कार्यकर्तावर्ग प्रारंभीच्या दशकात तरी मुख्यतः कडवा सनातनीच होता. अशा वातावरणात आणि अशा पुढाऱ्यांकडून आणि कार्यकर्त्यांकडून स्त्रियांना सार्वजनिक कार्यात सहभागी होण्याची काय स्फुर्ती मिळणार ? उलट, शक्य तेवढा अडथळाच होणार, हे उघड होते. टिळकांच्या चळवळीच्या उत्तरार्धात चळवळ अधिक व्यापक होत गेली; सुधारक विरुद्ध सनातनी हे वाद मागे पडले; कालप्रवाहामुळे स्त्रियांमध्येही जागृती-शिक्षण अधिक प्रमाणात

झाले. पण तरीही एकूण टिळक चळवळीला प्रथमपासून जे सनातनी वळण लागले ते काही फारसे बदलले नाही; बदलू शकले नाही.

नेमस्त राजकारणातही स्त्रियांचा अभाव !

निदान मवाळ राजकारणी नेते हे तरी समाजसुधारक व स्त्री-स्वातंत्र्याचे–समानतेचे पुरस्कर्ते होते. त्यांनी तरी स्त्रियांना सार्वजनिक कार्यात पडण्याची स्फुर्ती द्यावी ! पण तीही तशी मिळाल्याचे कधी दिसत नाही. याचे एक कारण म्हणजे सुधारणेच्या वादात सुधारकांचा संपूर्ण पराभव झाला होता. लोकमत प्रखरतेने त्यांच्या विरुद्ध गेले होते. शिवाय, बहुतेक सुधारक बोलकेच होते, कर्ते क्वचितच होते ! आणि अग्रगण्य पुढाऱ्यांनी कसोटीच्या क्षणी कच खाल्ल्याची उदाहरणे घडली होती. अशा अर्धवट पुढाऱ्यांकडून, त्यांची वैयक्तिक मते कितीही सुधारक असली तरी सार्वजनिक काम करू इच्छिणाऱ्या स्त्रियांना कसली कपाळाची स्फुर्ती मिळणार ? अन् उत्तेजन मिळणार ? शिवाय, त्यांचे राजकारण असले मिळमिळीत व लांगूलचालक होते की त्यापासूनही स्त्रियांना स्फुर्ती मिळण्याचा सुतराम संभव नव्हता !

महर्षी कर्वे यांचे कार्य–व्याप्ती आणि मर्यादा

अगदी अग्रगण्य आणि नामवंत-प्रतिष्ठावंत सुधारक घेतले तरी त्यांच्या अगदी घरच्या स्त्रियांनासुद्धा (पत्नी-भगिनी-लेकी-सुना) ते कधीही समाजकार्यासाठी 'घराबाहेर' काढू शकले नाहीत. (तसे करण्याचे त्यांनी खरोखर प्रयत्न तरी किती केले असतील हाही एक संशोधनाचा विषय होऊ शकेल !) अगदी न्या. रानडे, गोखले, रँग्लर परांजपे–सगळे याबाबतीत सारखेच ! फार काय, आगरकर एवढे कडवे आणि सतत विस्तवाशी खेळणारे; पण त्यांच्या घरच्या मंडळींनीसुद्धा कधी समाजकारणात प्रत्यक्ष भाग घेतल्याची नोंद नाही. या सर्वांत उज्ज्वल अपवाद फक्त एकच-महर्षी कर्वे यांचा ! महर्षी धोंडो केशव कर्वे या कर्त्या व निष्ठावंत सुधारकाने स्त्री-कार्याला सर्व आयुष्य वाहून घेतले. त्यानंतर कर्व्यांच्या संस्थांचा प्रत्यक्ष लाभ घेतलेल्या कृतज्ञ स्त्रियांची पिढी उत्पन्न झाली. त्यानंतर मात्र अनेक स्त्री-कार्यकर्त्या सार्वजनिक कार्यात पडल्या आणि त्यांनी जन्म जन्म त्या नियोजित कार्यात घालविला.

कर्व्यांच्या एकमार्गी कार्याचे महत्त्व कितीही असले तरी त्याची व्याप्ती मुख्यतः ब्राम्हण व तत्सम उच्चवर्णीय सुशिक्षित स्त्रियांपुरतीच मर्यादित होती, एकमार्गी होती; तिचा परिसर व पसारा अगदी विशिष्ट वर्तुळाच्या अवतीभवतीच घुटमळत राहिला होता, हीही मर्यादा उल्लेखनीय आहे.

आणि समाजस्वास्थ्यकार र. धों. कर्वे

महर्षी अण्णासाहेब कर्वे यांच्या महिलाविषयक कार्याचे स्वरूप पाहिल्यानंतर त्यांचे थोरले चिरंजीव, 'संतती-नियमनवाले म्हणून पन्नास वर्षांपूर्वी गाजलेले समाज-स्वास्थ्य'कार श्री. र. धों. कर्वे, यांच्या कार्याचाही उल्लेख करणे आवश्यक आहे.

त्यांच्या प्रत्यक्ष कार्याचे यथायोग्य मोजमाप अजून फारसे झाले नसल्याने त्यांच्याबद्दल, अनुकूल आणि प्रतिकूल दोन्ही प्रकारचे गैरसमजच जास्त पसरलेले आहेत !

ऋषितुल्य समर्पित जीवन

सर्वसामान्य जनतेत त्यांची प्रसिद्धी (खरे म्हणजे कुप्रसिद्धी) स्त्रियांना अनिर्बंध स्वातंत्र्य देणारे, स्त्रियांना वेश्या बनविणारे, एक भयानक कामनीती शिकविणारे, अशा प्रकारची आहे ! उलट त्यांचे काही चाहते कर्व्यांना स्त्री-मुक्तिदाते, एकमेव क्रांतिकारकही समजणारे आहेत. खरी गोष्ट अशी आहे की, हे दोन्हीही समज खरे नाहीत. र. धों. कर्व्यांनी स्त्रियांच्या समागम-स्वातंत्र्याचा पुरस्कार केला; संतति-नियमनाची साधने, गर्भपात वगैरे व्यावहारिक गोष्टींचा प्रचार केला. लैंगिक प्रश्नांची मनमोकळी शास्त्रीय चर्चा जाहीर रीतीने करण्याची त्यांनीच प्रथम प्रथा पाडली. आणि हा सारा खटाटोप एका अनन्य निष्ठेने त्यांनी जन्मभर केला. एक प्रकारे आपले हेच जीवितकार्य मानून, त्यांनी त्यासाठी आपले जीवनसर्वस्व वाहून घेतले. त्यापायी नोकऱ्या सोडल्या, गरिबी पत्करली, बदनामी-गैरसमज सहन केले, समाजाचा आणि सरकारी कायद्याचा रोष सतत ओढवून घेतला. रघुनाथराव कर्व्यांचे हे कार्य अपूर्व आहे; त्यांच्या ऋषितुल्य पित्याप्रमाणेच र. धों. कर्वे हेही एकप्रकारे ऋषितुल्य जीवन जगले !

स्त्री-विषयक प्रतिगामी मते

पण त्यांच्या कार्याची थोरवी आणि मर्यादाही एवढीच. बाकी यापुढे जाऊन त्यांना क्रांतिकारक, स्त्री-मुक्तिदाते म्हणणे साफ चुकीचे आहे. त्यांनी स्त्रियांच्या काम-स्वातंत्र्याचा पुरस्कार निर्भयपणाने केला हे खरेच आहे; पण त्यांची एकूण स्त्रीविषयक मते–स्त्रीच्या सामाजिक समतेसंबंधीची मते जुनाट, सनातनीच होती. काही मते तर जवळजवळ सरंजामी–काही भांडवलदारी मते होती. निसर्गानेच स्त्रीला उणेपणा दिला आहे, गौणस्थान दिले आहे; तिने समानतेचा हक्क-हट्ट करू नये. शरीर रचना, मासिक पाळी, प्रसूती वगैरेंमुळे स्त्रियांवर बंधने पडतात, त्या लक्षात घेऊन पुरुषांनी पुरुषावर एकपत्नीव्रत लादू नये, अशा आशयाची त्यांची मते होती ! पुरुषांना वाटणारे आपले नैसर्गिक आकर्षण वाढवून स्त्रियांनी पुरुषावर सत्ता गाजवावी; समान हक्काच्या भानगडीत पडू नये; फार काय 'सुधार-लेल्या' फ्रेंच स्त्रियांनासुद्धा राजकीय मतदानाच्या हक्काची गरज वाटत नाही, असे या पुरोगामी कर्व्यांचे मत होते ! आपल्या लैंगिक आकर्षणाचा उपयोग ज्यात होईल असेच व्यवसाय स्त्रियांनी करावेत. (उदा. जाहिरात, मॉडेल, नटी, हवाई सुंदरी, स्वागतिका, खाजगी सेक्रेटरी, विक्रेत्या, परिचारिका इत्यादी. फार काय सामाजिक

दृष्ट्या वेशाव्यवसायही आवश्यक असल्याने, तोही स्त्रियांचा लोकमान्य व्यवसाय समजावा वगैरे !) पुरुषी व्यवसायावर आक्रमण करण्याचा वेडेपणा स्त्रियांनी करू नये; स्त्रिया समाजवादी कधीच होणार नाहीत; त्यांनी चूल-मूल हेच आपले मुख्य कार्यक्षेत्र मानावे, अशी या कर्व्यांची धारणा होती !

र. धों. कर्व्यांची ही एकूण मते पाहता त्यांना स्त्रीमुक्ति-दाते म्हणणे किती चुकीचे आहे, हे सहज ध्यानात येईल. फार काय, ते आगरकरांसारखे बुद्धिवादीसुद्धा नव्हते; सर्वांगीण सुधारणावादी तर नव्हतेच नव्हते, ही वस्तुस्थिती आहे. अत्यंत बिकट परिस्थितीत र. धों. कर्व्यांनी निष्ठेने केलेल्या कार्याचे मोल मोठेच आहे; आणि ते कृतज्ञतापूर्वक मानलेच पाहिजे. पण त्याबरोबरच त्यांच्या तथाकथित बुद्धिवादाबाबत, सर्वांगीण सुधारणावादाबाबत, क्रांतिकारकत्वाबद्दल असणारा दावा टिकण्यासारखा नाही, हीही गोष्ट मुळीसुद्धा विसरता कामा नये.

मिशनऱ्यांच्या कार्याची व्याप्ती–कसोटी

टिळककालीन स्त्रियांच्या चळवळीचा विचार केला तर आणखीही एक विलक्षण गोष्ट नजरेस येते. ती जितकी विलक्षण तितकीच ती उपेक्षितही राहिलेली आहे.

स्त्रियांचे खरेखुरे व सर्व प्रश्न घेऊन आणि केवळ ब्राह्मणवर्गीय स्त्रियांपुरतेच नव्हे तर बहुजनसमाजापर्यंत–अगदी शूद्र-अतिशूद्रांपर्यंत त्यांची व्याप्ती वाढवून प्रत्यक्ष कार्य जे झाले, ते मुख्यतः खिस्ती मिशनऱ्यांनी आणि त्यांच्या पुरस्काराने निघालेल्या संस्थांमार्फतच मुख्यतः झाले, ही ती गोष्ट होय.

स्त्रियांच्या शाळा, त्यांना विविध प्रकारचे शिक्षण, विधवा, अपंग, अनाथ, तथाकथित पतिता, त्यांची मुले यांच्यासाठी शाळा, आश्रम, वसतिगृहे, कार्यशाळा, दवाखाने, सुतिकागृहे इत्यादी ज्या संस्था मोठ्या प्रमाणावर महाराष्ट्रभर आणि उपेक्षित विभागातसुद्धा काढल्या, त्या मुख्यतः खिस्ती मिशनऱ्यांनीच ! त्याही मोठ्या शहरांतच नव्हे तर ग्रामीण विभागातसुद्धा. ग्रामीण विभागाच्याही अगदी पलिकडे जाऊन अगदी दूरवर आदिवासी विभागांत, जंगलांत, दऱ्याखोऱ्यांतही गेले ते फक्त खिस्ती मिशनरीच ! त्यांनी सर्वसामान्य स्त्रियाच नव्हे तर, अस्पृश्य, आदिवासी, मागास स्त्रिया व त्यांची मुले यांची सर्वतोपरी सेवा सतत केली. पूर्वी दरसाल येणारे साथीचे रोग, दुर्धर संसर्गजन्य रोग, दुष्काळ अशा भयंकर आपत्तीमध्येही धावून गेले ते समाजनेते, राजकीय नेते नव्हते; तर मुख्यतः आणि सामान्यतः मिशनरीच होते !

मिशनऱ्यांनी निर्माण केलेली स्त्री-कार्यकर्त्यांची सेना

आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे या मिशनरी कार्यकर्त्यांमध्ये मोठ्या संख्येने स्त्रियाही होत्या. गोऱ्या परकीय मिशनरी स्त्रिया तर नक्कीच होत्या; पण

त्यांनी हिंदी-मराठी स्त्रियांमधून–त्यांच्या सर्व थरांमधून अगदी कनिष्ठ थरांमधूनसुद्धा शेकडो स्त्री-कार्यकर्त्या निर्माण केल्या आणि त्या जन्मभर अत्यंत विकट परिस्थितीत सतत कार्य करीत राहिल्या.

पण आम्ही मात्र या महान कार्याचा, समाजसेवेचा, गौरव तर केला नाहीच; उलट दुरावाच केला. केवळ उपेक्षाच केली असे नव्हे, तर दुष्टावा केला; आणि आमच्या राजकीय-सामाजिक चळवळीचे सोवळेपण मात्र टिकवून आम्ही धन्य धन्य झालो! वरीच वर्षे तर शूद्रसेवा, रुग्णसेवा, ग्रामीण विभागांतील सेवाकार्य, दुष्काळ, रोगराई, महापूर इत्यादी आपत्तींमधील कार्ये म्हणजे जणू आपले कार्यच नाही; हे तर जणूकाय केवळ मिशनऱ्यांचेच नैसर्गिक ईश्वरदत्त कार्य आहे, अशी वाटणीही आम्ही करून टाकली! आणि आमच्या सद्‌सदविवेकाचे समाधान आम्ही केले की, मिशनऱ्यांचे हे कार्य म्हणचे धर्मप्रसाराचे होते–राजनिष्ठा पसरविण्याचे होते! अरे, पण हे कार्य ज्यांमध्ये करावयाचे ते तर आपले–आपल्या हाडामांसाचे–बहुजनसमाजाचे अंगभूत विभाग होते ना? त्यांना वगळून–त्यांची उपेक्षा-उपहास करून का आमची राजकीय-सामाजिक आंदोलने वाढणार होती? पण आमची दृष्टी मूळातच इतकी विकृत, आमची संवेदना इतकी बधीर झालेली होती की, आम्हाला आमच्या या विकृतीची, त्यामुळे होणाऱ्या हानीची जाणीवही उरली नव्हती; मग खंत-शरम वाटणे तर दूरच राहिले!



गांधी-नेहरू युगातील महिला–आंदोलन

महात्मा गांधींच्या हाती देशाच्या पुढारीपणाची आणि जन-आंदोलनांची सूत्रे जाताच टिळक कालखंडापेक्षा ते आंदोलन अनेक परींनी अधिक जागृत, व्यापक, लढाऊ तर झालेच; पण त्याचबरोबर त्यामध्ये प्रथमच आणि जणू सहजपणे–स्वयं-स्फुर्तीने शेकडो–हजारो स्त्रिया सामील झाल्या! लहान–मोठ्या शहरांत तर बघता बघता शेकडो स्त्री-कार्यकर्त्यांची पथके उभी राहिली. केवळ प्रभातफेऱ्यांत, प्रचारातच नव्हे; तर सामुदायिक कार्यक्रमात, सत्याग्रहात–लाठीमारात—गोळ्या झेलण्यात!

म. गांधींनी आणि त्यांच्या सामुदायिक प्रतिकाराच्या अभूतपूर्व आंदोलनाने स्त्रियांची मने जिंकली-भारली गेली आणि त्या प्रथमच घराबाहेर पडून पुरुषांच्या बरोबरीने (कधी कधी दोन पाऊले पुढेसुद्धा!) रस्त्यात आल्या. भारतीय महिलांनी मारलेली ही झेप ऐतिहासिक महत्त्वाची मानावी लागेल. ही एक नवीच पातळी होती––हा एक गुणात्मक बदलच होता ही गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे. स्त्रिया घराबाहेर आल्या, त्यांनी हिरीरीने आंदोलनाच्या सर्व अवस्थांत आणि लढ्यांच्या

सर्व प्रकारांत हिरीरीने भाग घेतला खरा; पण खुद्द गांधीजींनी घालून दिलेली तात्त्विक बैठक काय होती ?

गांधीजींची सनातनी तात्त्विक बैठक

गांधीजींची विचारसरणी काही बाबतीत तरी कमालीची सनातनीच होती. स्त्री ही मोक्षमार्गावरच नव्हे तर संसारातसुद्धा मोहमयीच आहे; मोहाचे, पापाचे आवाहनच आहे. प्रखर आत्मसंयमन, कठोर व्रतपालन, देहदंड, यांचा वापर केला तरच काही तरणोपाय आहे, अशीच त्यांची धारणा होती. किंबहुना ब्रह्मचर्य, कठोर नैष्ठिक ब्रह्मचर्य हाच त्यांचा आदर्श होता, आदेश होता. त्यासाठी हवे ते नैतिक व भौतिक दडपण, आहार-विहारातील कठोर पथ्य-व्रत-पालन, देहदंडसुद्धा गांधी-आश्रमात भरपूर होते ! ज्या केशवपनाचा अनेक उदार मनाच्या पण जुन्या मतांच्या सनातन्यांनीसुद्धा धिक्कार केला होता; त्या स्त्रियांच्या केश-वपनाचासुद्धा, पापाचे प्रायश्चित म्हणून, मोहापासून परावृत्त व्हावे म्हणून, देहदंड म्हणून-साधना म्हणून गांधीजींनी स्वतः पुरस्कार केला; प्रत्यक्ष वापरसुद्धा केला ! गांधीजींच्या या मूलभूत धारणेमुळे त्यांच्या एकूण भूमिकेत आणि त्यामुळे आचार-प्रणालीतही एक प्रकारची विकृतीसुद्धा आली होती, यात शंका नाही. गांधीजींचीच ही धारणा; मग गावोगाव जे गावगांधी तयार झाले व त्यांनी जे गावगन्ना आश्रम काढले, त्यात काय काय प्रकार--काय काय विकृती आली असेल याची कल्पनाच करावी ! हे सर्व प्रकार, मर्यादा ध्यानात घेऊनही, गांधी युगात भारतीय स्त्रीने एक ऐतिहासिक पाऊल पुढे टाकले, याबद्दल मात्र मुळीच शंका नाही.

गांधीप्रणित महिला चळवळीवर भांडवलदारी प्रभाव

गांधीजींच्याच चळवळीचा आणखी एक प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष असा परिणाम झाला. तो म्हणजे उच्चवर्णीयांबरोबर उच्चवर्गीय (म्हणजे प्रत्यक्ष भांडवलदारी--व्यापारी) स्त्रियांचे नवोदित महिला चळवळीत प्राबल्य माजले ! गांधीजींच्या विश्वस्तवृत्तीच्या व वर्गसमन्वयवादी तत्त्वज्ञानामुळे भांडवलदारवर्गाला त्यांचा मोठा व्यावहारिक आधार तर वाटलाच; पण शिवाय त्याच्या जोडीला एक तात्त्विक-नैतिक आधारसुद्धा भांडवलदारी पद्धतीला गांधीजींनी निर्माण करून दिला होता. त्यामुळे गावोगावी स्वाभाविकपणे अनेक भांडवलदार-व्यापारी सहकुटुंब गांधीजींचे अनुयायी म्हणून उजळ माथ्याने मिरवू लागले; गांधीजींच्या चळवळींचे आणि आश्रमांचे आणि विविध संघटनांचे उदार आश्रयदाते आणि विश्वस्त बनले ! परिणामी भांडवलदार-व्यापारी कुटुंबांतील आणि परिसरातील अनेक स्त्रिया गांधीजींच्या बहुविध चळवळीत समाविष्ट झाल्या आणि पुढारीपणाही पावल्या. यामधूनच अखिल भारतीय महिला परिषद व तिच्या शाखा यावर उच्चवर्णीय-वर्गीय स्त्रियांच्या

पुढारीपणाची छाप पडली. पूर्वीच्या मानाने महिला चळवळीचे पाऊल गांधी-जमान्यात पुढे पडले ही गोष्ट तर खरीच; पण त्याबरोबरच त्या चळवळीवर भांडवलदारी निदान वर्ग-समन्वयवादी भूमिकेची छाप पडली, हीही तितकीच वस्तुस्थिती आहे. म्हणजे प्रगतीच्या वाटा खुल्या झाल्या ही जशी वस्तुस्थिती....त्याचप्रमाणे त्या प्रगतीला मर्यादा पडल्या; किंबहुना प्रगतीच्या वाटा काही बाबतीत रोखल्या गेल्या; त्यांना भलत्याच वळणावर नेण्याचे प्रयत्न झाले, हीही गोष्ट तितकीच खरी आहे.

नेहरू-जमान्यातही उच्च-वर्णीयांचीच चलती

गांधीजींच्या चळवळीत काही वर्षांनंतर विशेषतः १९२९–३० नंतर पं. जवाहरलाल नेहरू यांचा प्रभाव दिसू लागला. नेहरूंची आधुनिक दृष्टी, समाजवादी प्रेरणा यांचाही प्रभाव राष्ट्रीय राजकारणावर–विशेषतः तरुणवर्गावर काही प्रमाणात पडू लागला, यात शंकाच नाही. त्याचे पडसाद महिला चळवळीतही उमटू लागले. पण तरीसुद्धा प्रत्येक निर्णायक क्षणी गांधीजींचे मतच प्रभावी ठरत असल्याने, वर वर्णिलेल्या स्थितीत फारसा मोठा गुणात्मक बदल होऊ शकला नाही. विशेषतः १९३४ नंतर सत्तेचे राजकारण वल्लभभाईंच्या नेतृत्वाखाली सुरू झाल्यानंतर, तर राजकारणाप्रमाणेच महिला चळवळीवरही भांडवलदारी-व्यापारीच नव्हे, तर सरंजामी छापही अधिकाधिक पक्की होत गेली. फार काय नेहरू भारताचे पंतप्रधान झाल्यानंतरही त्यांच्या प्रेरणेने डॉ. आंबेडकरांनी तयार केलेले हिंदु कोड विधेयकसुद्धा अनेक वर्षे बासनातच पडून राहिले ! कारण काय तर म्हणे वल्लभभाई–राजेन्द्र प्रसादसारख्या वरिष्ठ पुढाऱ्यांचा विरोध ! वास्तविक या विधेयकात फार मोठे क्रांतिकारक असे काहीच नव्हते. विवाह, पुनर्विवाह, घटस्फोट, स्त्रियांचा मालमत्तेचा व वारसाहक्क, दत्तक वगैरे काही गोष्टी फक्त त्यात होत्या. पण त्याबाबतसुद्धा वर्षानुवर्षे चालढकल चालू राहिली–आणि अखेर अनेक वर्षांनी अनेक आढेवेढे आणि पण-परंतु यांनी आवळून आणि तेही फुटकळ स्वरूपात हे विधेयक कसेबसे अंमलात येऊ शकले !

नेहरूंनी काही गोष्टींचा आग्रह धरून महिलांना प्रतिष्ठा मिळवून देण्याचा प्रयत्न केला. उदा. आपल्या भगिनी विजयालक्ष्मी यांना राष्ट्रसंघात आणि परदेशी वकिलातींच्या प्रांतात नेहरूंनी सतत दिलेले उच्च स्थान ! त्याचप्रमाणे भारतीय संसद आणि कायदेमंडळ यांमध्ये स्त्रियांना अधिक जागा आणि मंत्रिपदे मिळण्यासाठी त्यांनी केलेला प्रयत्न वगैरे. अर्थात्‌च या गोष्टींचाही सर्व फायदा उच्चवर्णीय-वर्गीय महिलांनाच मिळाला; आणि त्यांचे महिला आंदोलनातील पुढारीपण अधिक बळकट करण्यातच त्याचे पर्यवसान झाले.

आणि नंतरचे इंदिरा राज्य

नेहरूंनंतर त्यांच्या सुकन्या वडिलांच्या प्रतिष्ठेच्या मूळ भांडवलावर प्रथम पंतप्रधान झाल्या. पण नंतर मात्र त्यांनी स्वतःच्या कर्तबगारीवर आपले पंतप्रधानपद टिकविले,: एवढेच नव्हे तर देशाच्या एका ऐतिहासिक वळणावर निर्णायक भूमिका घेऊन आपले पुढारीपणही त्यांनी निर्विवाद प्रस्थापित केले. भारतासारख्या महान् देशाचे पंतप्रधानपद आणि पुढारीपण करणारी महिला म्हणून इंदिराबाईंचे देशभर व जगभर कौतुक झाले; प्रत्येक भारतीय महिलेच्या अंतःकरणात त्यामुळे एक अभिमानाची व आत्मविश्वासाची लहर उठली असेल, यात शंका नाही. पण त्यापलिकडे जाऊन एकूण महिलावर्गाची चळवळ, सामान्य श्रमिक महिलांच्या हिताचे-प्रतिष्ठेचे हक्कांचे प्रश्न याबाबतीत इंदिराजींच्या पंतप्रधानकीमुळे किंवा सर्वमान्य पुढारीपणामुळे सुद्धा फारसा फरक पडला असे म्हणता येणार नाही !

इंदिराजीच्या पंतप्रधानकीमुळे व पुढारीपणामुळे एक प्रश्न मात्र कायमचा निकालात निघाला. तो म्हणजे स्त्रीचा पुढारीपण करण्याचा, अत्युच्च पद स्वीकारण्याचा हक्क व अधिकार कायमचा प्रस्थापित झाला.

इंदिराजी प्रथम पंतप्रधान झाल्यानंतर त्या स्त्री म्हणून जसे, काहीजणांकडून त्यांचे कौतुक झाले, तसेच त्या केवळ स्त्री म्हणून त्यांना कमालीची निंदा-नालस्ती, उपहास, बदनामीही सहन करावी लागली ! विशेषता संघ-जनसंघाच्या हिंदू संस्कृतिवाल्यांनी तर इंदिराजींचे स्त्रीत्व–त्यातही विशेषतः त्यांचे दुर्दैवी वैधव्य यावरच टीकेचा-उपहासाचा-बदनामीचा मुख्य रोख प्रथम अनेक वर्षे तरी ठेवला !

आधीच 'स्त्रीराज्य', त्यात विधवा राज्य, त्यात केस कापणारी, पदर टाकणारी विधवा, यापासून प्रारंभ करून, या हिंदुवाल्यांनी कमालीच्या बीभत्स, हलकट, अनुदार, वैयक्तिक टीकेचा उच्चांक गाठला–आणि विशेषतः हिंदी भाषिक मुलखात तो सतत टिकविला ! काँग्रेस वर्किंग कमिटीचे नेते किंवा मंत्री हे, एका बाईचे पुढारीपण मान्य करायला नपूंसक आहेत काय, या दर्जाची निरर्गल टीकासुद्धा या संस्कृतवाल्यांनी सतत केली ! डावे जहाल समाजवादी म्हणविणाऱ्यांनीही 'गुंगी गुडिया' म्हणून इंदिरेच्या स्त्रीत्वाचा एकप्रकारे उपहासच केला ! पण या सर्वांना इंदिराजी पुरून उरल्या आणि त्यांनी अखेर स्त्रीचा सर्वोच्च नेतृत्व करण्याचा हक्क कायमचा प्रस्थापित केला. त्यानंतर प्रांतोप्रांती राजकीय पक्षांत आणि सरकारमध्ये त्याचप्रमाणे सार्वजनिक जीवनातील विविध क्षेत्रांत महत्त्वाचे व पुढारीपणाचे स्थान मिळविणे स्त्रियांना अधिक सोपे झाले, असे म्हटल्यास कोणाच्या पोटात उगाचच दुखू नये !

पण तरीही उत्तर प्रदेशचे एक भूतपूर्व मुख्यमंत्री आणि काही जहाल समाजवाद्यांचे लाडके नेते श्री. चरणसिंग यांनी आमच्या उत्तर प्रदेश राज्यात

स्त्री उच्च अधिकारी (आय. एस. अधिकारी) नकोत, अशी निर्लज्ज मागणी जाहीरपणे व अधिकृतपणे केलीच, हेही ध्यानात ठेवावयास हवेच !



नवी महिला–नवी स्त्री-शक्ती

गांधी–नेहरू जमान्याचा एकूण देशावर जसा आणि ज्या प्रकारचा परिणाम झाला तसाच तो महाराष्ट्रावरही झाला.

टिळक जमान्यात घरी बसलेल्या मध्यमवर्गीय स्त्रिया मोठ्या प्रमाणात राजकारणात व समाजकारणात भाग घेऊ लागल्या. कर्वे यांच्या विविध संस्थांतून त्याचप्रमाणे, मिशनरी संस्थांतून शिक्षण घेतलेल्या स्त्रिया प्रथमच मोकळ्या मनाने सर्व क्षेत्रांत वावरू लागल्या. त्यातही वेगवेगळे नमुने दिसतात. कर्वेप्रणीत विविध संस्थांतील सुसंस्कृत ब्राह्मणी पांढरपेशा स्त्रिया, मिशन संस्थांतील सर्वजातीय शिक्षित त्याचप्रमाणे अर्धशिक्षित स्त्रिया, गांधी आश्रमांशी संबंधित स्त्रिया वगैरे. डाव्या व श्रमिक आंदोलनामधील स्त्रियांचा विचार वेगळाच करावा लागेल.

नवी महिला–मध्यमवर्गीय आणि श्रमिक

स्वातंत्र्योत्तर काळात बघितले तर जवळ जवळ सर्व लहानमोठ्या आंदोलनांत स्त्रियांनी अधिकाधिक प्रमाणात आणि अधिक मोकळेपणाने भाग घेतलेला दिसतो. महागाई–टंचाईविरुद्ध लढ्यांतील आघाडी तर स्त्रियांनी १९५२–५३ पासून तर अगदी आजतागायत १९७३–७४ पर्यंत सतत, चिकाटीने आणि तितक्याच वाढत्या आक्रमक, लढाऊ, हिरीरीने, गाजविलेली आहे. या आंदोलनांत मध्यमवर्गीय महिलांप्रमाणेच श्रमिक महिलांचा, फार मोठा सहभाग आहे. गिरणी, विडी, औषधी–कारखाने, त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील किसानकन्या, भूमीहीन यांचा खास उल्लेख करायला हवा. त्याचप्रमाणे अस्पृश्य आणि आदिवासी महिलांच्या, अधिकाधिक वाढत्या प्रमाणात आणि लढाऊ प्रकारातील सहभागामुळे, एकूण चळवळीच्याच स्वरूपात बदल घडायला मदत झाली आहे. मुंबई-पुणे, सोलापूर-नागपूर-सारख्या महानगरातच नव्हे तर सर्व औद्योगिक केंद्रांत आणि जिल्हा-तालुक्यांत कारखान्यांतील श्रमिक महिला आणि झोपडपट्टीतील व गलिच्छ वस्तीतील स्त्रिया यांची पथके नेहमीच आघाडी लढवीत आहेत.

मध्यमवर्गातील स्त्रियांमध्ये नवीन बदल झाले आहेत. परिचारिका, शिक्षिका, कर्मचारी महिला, ग्रामसेविका इत्यादि महिलांची भागिदारी संख्येच्या दृष्टीने तर प्रचंड आहेच; पण लढाऊ ट्रेड युनियन चळवळीचा एक संघटित विभाग म्हणूनही त्यांचा वाटा महत्त्वाचा आहे. कनिष्ठ मध्यमवर्गातील स्त्रिया कारखान्यांमध्ये

वाढत्या प्रमाणात दिसू लागल्या आहेत. परिणामी मध्यमवर्गीय स्त्रियांचा एकूण दृष्टिकोन अधिक जतताभिमुख होत आहे; श्रमिक वर्गाला अधिक जवळ येत आहे. स्त्रियांमधील या परिवर्तनाचा परिणाम, सनातनी संस्कारांच्या जनसंघी महिलांवरसुद्धा होत असल्याची चिन्हे कुठे कुठे दिसत आहेत !

गोवा-संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत स्त्रियांनी फार मोठ्या प्रमाणावर भाग घेतला, आणि त्या चळवळीवरील डाव्या व जनताभिमुख पुढारीपणाची छाप या हजारो महिलांवरही आपोआपच पडली. नंतर संयुक्त महाराष्ट्र चळवळ ओसरली आणि समितीचे विघटन झाले, तरीही स्त्रियांमधील ही नवी जागृती मात्र बऱ्याच प्रमाणात टिकून राहिली. उपासमार, महागाईविरुद्ध लढा, भूमिमुक्ती आंदोलन, वेगवेगळे स्थानिक आणि महाराष्ट्रव्यापी बंद , बँका-विमा, सरकारी नोकर, शिक्षक वगैरे संघटित विभागांच्या चाललेल्या अखंड चळवळी, या सर्वांमध्ये महिलांनी महत्त्वाची भागिदारी करावी, हे आता एक कायमचेच वैशिष्ट्य बनले आहे.

दुष्काळ आणि स्त्री

विशेषतः गेल्या तीन-चार वर्षांतील महाराष्ट्रातील व्यापक दुष्काळामुळे तर ग्रामीण श्रमिक जनतेचा प्रचंड बहुसंख्य विभाग प्रत्यक्ष उपासमारीच्या तडाख्यात सापडून देशोधडीला लागला आहे. दुष्काळाची सर्वांत मोठी झळ स्त्रीवर्गालाच सहन करावी लागली. या कठीण आपत्तीमध्ये महाराष्ट्रभर ग्रामीण विभागात जे सतत व तीव्र संघर्ष झाले–मोर्चे, घेराव, लाठीमार, गोळीबार वगैरे जे जे प्रसंग आले, त्या प्रत्येकामध्ये स्त्रियांची भागिदारी किमान पुरुषांच्या बरोबरीने किंबहुना जास्तीच होती ! दुष्काळानंतर दुष्काळग्रस्त विभागात तरी एक सर्वांगीण महान् परिवर्तन घडत आहे, ते केवळ संख्यात्मक नाही; तर गुणात्मक आहे. श्रीमंत शेतकऱ्यांच्या भांडवलदारधार्जिण्या, सत्ताबाज, संधिसाधू, जातिवादी, भ्रष्ट सत्तेला आव्हान देणारी, श्रमिक जनतेची एकजुटीची लढाऊ श्रमिक शक्ती ग्रामीण विभागात सर्वत्र निर्माण होत आहे. या उदयोन्मुख विजिगीषु शक्तीमध्ये स्त्री-शक्ति हा एक महत्त्वाचा आणि अंगभूत असा घटक प्रथमच प्रभावी होत आहे ! महाराष्ट्रातील हे एक महान् क्रांतिकारक परिवर्तन ठरणार आहे; आणि त्याचा प्रभाव सर्व क्षेत्रांत अधिकाधिक निर्णायक ठरत जाणार आहे.

स्त्री-मुक्ती आंदोलनातील नवी शक्ती

मध्यमवर्गीय नोकरीपेशा महिला; गिरणी-कारखान्यांतील कामकरी स्त्रिया; चाळी, गलिच्छवस्त्या, झोपडपट्ट्यांमधील श्रमिक स्त्रिया; हरिजन-गिरीजन आणि इतर मागास जाती-जमाती आणि विभागांतील स्त्रिया; दुष्काळग्रस्त विभागांतील स्त्रिया––स्वातंत्र्योत्तर आणि संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतरच्या काळातील

स्त्रियांचे हे विभाग या सर्वांचे मिळून महाराष्ट्रातील महिलांचे आजचे आंदोलन बनले आहे. गृहिणी, माता, शिक्षिका, परिचारिका, कारकून, कामकरी-कष्टकरी, हरिजन–गिरीजन, दलित, दुष्काळग्रस्त या वेगवेगळ्या नात्याने स्त्री ही जागृत, संघटित होत आहे. प्रत्यक्ष लढ्याच्या क्षेत्रात हिरीरीने उतरत आहे. तिने आपले असे वेगवेगळे लढे लढविले आहेत, त्याचप्रमाणे पुरुषांच्या बरोबरीने चालविलेल्या विविध संयुक्त लढ्यांतील आघाडीही सांभाळली आहे. या स्वतंत्र आणि संयुक्त लढ्यात स्त्री-मुक्ती आंदोलनांचे अनेक जुने आणि नवे प्रश्न (सामाजिक, राजकीय, आर्थिक, वर्गीय, शैक्षणिक, सांस्कृतिक) लढविले जात आहेत; काही धसाला लागत आहेत.

महाराष्ट्रातील एकूण पुरोगामी, लोकशाही आणि वर्गीय लढ्याचा एक अंगभूत भाग म्हणून, एकूण महिला चळवळीची ही वाटचाल होत आहे. म. फुल्यांना अभिप्रेत असलेल्या स्त्री-मुक्ती आंदोलनाच्या प्रेरणा यांमध्ये प्रकर्षाने प्रकट होत आहेत; साकार होत आहेत. त्याहूनही महत्त्वाची गोष्ट म्हणजे फुल्यांनाच अभिप्रेत असलेल्या शूद्र-अतिशुद्रांच्या आंदोलनाशी या स्त्री-मुक्ति आंदोलनाची युती होत आहे; व्यवहारात भागिदारी होत आहे.

रानडे-टिळक कालखंड सोडाच; पण गांधी–नेहरू कालखंडापेक्षा ही सर्वस्वी वेगळी––गुणात्मक दृष्ट्या वेगळी––वरची पातळी महिला आंदोलनाने आता निश्चित पणे गाठली आहे, असे म्हणावयास हरकत नाही.

टिळक कालखंडातील महिला चळवळीचा अभाव, गांधी–नेहरू जमान्यातील महिला चळवळीचा उदय; पण त्यावरील उच्चवर्णीय-उच्चवर्गीय पुढारीपणाचा प्रभाव –यापेक्षाही अगदी वेगळी अशी ही वस्तुस्थिती आहे. स्वाभाविकपणेच महिला चळवळीचे जुने सरंजामी, भांडवलदारी, उच्च मध्यमवर्गीय पुढारीपण आता हतप्रभ होत आहे.

याच काळात मुंबई-पुण्यात (आणि इतरत्र तुरळक) भांडवलदारी–कारखानदारी भरमसाट वाढली आहे. व्यापारीवर्गाचे पाशही सर्वत्र आवळले जात आहेत. सहकाराच्या नावाने आणि सरकारी आश्रयाने श्रीमंत शेतकऱ्यांची पक्कडही आपल्या ग्रामीण विभागावर बसली आहे. भांडवलदारी, व्यापारीवर्गाच्या भ्रष्ट बाजारी संस्कृतीची छाप या नव-श्रीमंत शेतकरीवर्गावरही पडत आहे! या नव श्रीमंत वर्गामध्ये भ्रष्टाचार, अरेरावी, सवंग विलासी जीवन हे जसे वाढत आहे; तशीच स्त्रियांकडे बघण्याची त्या वर्गाची वृत्तीही अधिक भ्रष्ट, विकृत, बाजारी होत आहे. संपूर्ण आर्थिक अनुकूलता व स्वास्थ्य असूनही मुलींना उच्च शिक्षण देण्याची, विवाह–स्वातंत्र्य देण्याची, समान दर्जा देण्याची टाळाटाळ हे नवश्रीमंत लोक अगदी पद्धतशीरपणे करीत आहेत! उच्च शिक्षण घेऊ न देता जबरदस्त हुंडे घेऊन मुलींचे सौदे पटविण्याची चढाओढ

लागली आहे ! स्त्रीविषयक भ्रष्ट वागणुकीला ऊत येत आहे. या नव्या जीवनाशी समरस होणाऱ्या श्रीमंतवर्गातील स्त्रियाही सार्वजनिक जीवनात आपल्या सर्व साधनसामुग्रीनिशी उतरत आहेत. महिला संघटना, महिला मंडळे, आर्थिक सहकारी संस्था, इंदिरा बँका, सामाजिक कल्याण खाती, साखळी वृत्तपत्रे व रेडिओ-टेलीव्हिजनसह इतर प्रचारसाधने, भ्रष्ट बाजारी भांडवली आदर्शांची जाहीरातबाजी, इत्यादी अनेक प्रकारांनी महाराष्ट्रातील महिलांवर आपला प्रभाव पाडण्याचे पद्धतशीर प्रयत्न त्यांनी चालविले आहेत. पण आज या उच्चवर्णीय, उच्चवर्गीय महिलांचे पुढारीपण सामान्य जनतेच्या आणि महिलांच्या तिरस्काराला आणि उपहासास पात्र ठरत आहे !

ग्रामीण भागांतील हरिजन-गिरिजनांवरील अत्याचारांचा एक विशेष स्फोटक भाग म्हणजे स्त्रियांवरील अत्याचार हा होय. त्याचप्रमाणे ग्रामसेविका, परिचारिका, शिक्षिका इत्यादींची सुरक्षितता हाही ग्रामीण जीवनातील एक गंभीर प्रश्न बनत आहे. या खास प्रश्नांबाबत, त्याचप्रमाणे श्रमिक म्हणून, महिला म्हणून उत्पन्न होणाऱ्या विविध प्रश्नांबद्दल उच्चवर्णीय-वर्गीय महिला संघटना आणि त्यांचे पुढारी पण कोणतीही भूमिका घेऊ शकत नाहीत. या उच्चवर्णीय-वर्गीय पुढारीपणाची दिवाळखोरी, भूमिमुक्ती आंदोलन, दुष्काळ, महागाई, सामाजिक अन्याय अशा प्रत्येक प्रश्नाबाबत पदोपदी जाहीरपणे उघड होत आहे.

समाजवाद आणि स्त्री-मुक्ती

सार्वत्रिक मताधिकारानंतर लोकसभा व कायदेमंडळातच नव्हे तर जिल्हा परिषदा आणि ग्रामपंचायती या सगळ्या निवडणुकांत स्त्री ही मतदार म्हणून पुढे येत आहे. अर्थात एकूण राजकीय चौकटीबाहेर, स्त्री-मतदारांचा प्रभाव अजून तरी फारसा पडू लागलेला नाही, हे खरे आहे. त्या चौकटीतच पण स्त्री-मतदाराची भूमिका अधिक गंभीरपणे विचारात घेणे राजकीय, सामाजिक पुढारीपणाला भाग पडत आहे. येथेही उच्चवर्णीय-वर्गीय पुढारीपण आणि सर्वसामान्य महिला यांमधील अपरिहार्य विरोध अधिकाधिक स्पष्ट होत आहे.

बाहेर गिरण्या-कारखान्यात, चाळीत, झोपडपट्टीत, ग्रामीण विभागात निर्माण होणाऱ्या सर्व लढ्यांत स्त्रियांनी आघाडी लढवावी; आणि मतदानाचा हक्क बजावताना मात्र पुरुषांनी सांगितल्याप्रमाणे मतदान करावे; त्यासाठी पहाटेपासून मतदानकेंद्रावर निमूटपणे रांगा लावाव्या—ही परिस्थिती आता आणखी फार काळ अशीच टिकून राहू शकेल, असं समजण्याचे कारण नाही ! विविध आपत्तींचा भार सोसायला, त्याविरुद्ध लढायला स्त्रिया हव्यात; त्याबद्दल त्यांचे भारी कौतुक ! पण उमेदवार ठरविताना, पदाधिकारी ठरविताना, पुढारीपण निवडताना मात्र स्त्रियांची संपूर्ण उपेक्षा ही पूर्वापार चालत आलेली परंपरा यापुढे स्त्रिया सहन करणार

नाहीत. तेव्हा स्त्रियांची भागिदारी संसारामध्ये, आपत्तीमध्ये, लढ्यांमध्ये जशी हवी, तशी ती राजकीय, सामाजिक सत्ता चालविण्यामध्येही––राबविण्यामध्येही तितकीच हवी, हा विचार आता फार काळ कोणी टाळू शकणार नाही !

सर्वांनाच आत्मपरीक्षण करावे लागेल

स्त्री-समानतेचा हा नवा लढा प्रत्येक घरात, चाळीत, गावात, ग्रामपंचायतीत, जिल्हा परिषदेत, कायदेमंडळात, मंत्रिमंडळात पुढील काही वर्षांत नक्कीच अन्याग्रहाने लढविला जाईल. आणि त्याबाबत प्रत्येक पक्षामध्ये, संस्थेमध्ये ताण-तणाव नक्कीच निर्माण होतील. डाव्या पुरोगामी समाजवादी म्हणविणाऱ्या पक्षांनाही याबाबत बरेच आत्मपरीक्षण आणि आत्मटीका अगदी कठोरपणाने आणि जाहीरपणेसुद्धा करण्याची नितांत गरज आहे. तशी ती आत्मटीका त्यांनी केली नाही तर घराघरांत, गावागावांत, पक्षापक्षांत ती करायला भाग पाडण्याची परिस्थिती निर्माण होणे केवळ अपरिहार्य आहे ! आणि आवश्यक तर आहेच आहे ! तेव्हा वाढत्या स्त्री-शक्तीचे आव्हान केवळ उच्चवर्णीय–उच्चवर्गीय शोषक शक्तींनाच नव्हे, तर ते एकूण पुरुषप्रधान समाजपद्धतीला आहे. डाव्या आणि पुरोगामी म्हणविणाऱ्या पक्षांनी आणि कार्यकर्त्यांनी देखील हे महान सत्य पुन्हा पुन्हा समजून घेण्याची नितांत आवश्यकता आहे ! ते त्यांनी समजून घेतले तर डाव्या, पुरोगामी, समाजवादी शक्तींचे बळ चौफेर वाढण्याला महत्त्वाची मदतच होणार आहे. समाजवाद हा युगधर्म असेल तर स्त्री-मुक्ती, स्त्री-पुरुषामधील खरीखुरी निकोप समानता, हा त्या युगधर्मातील एक अत्यंत महत्त्वाचा अंगभूत भाग आहे; इतक्या महत्त्वाचा भाग की, खऱ्या स्त्री-मुक्तीवाचून, समानतेवाचून समाजवादसुद्धा अर्थहीन, आशयहीन ठरेल !



पंडिता रमाबाई : शतकात एखाद वेळ जन्माला येणारी लोकोत्तर स्त्री !

राजकारणात टिळकांसारखे असामान्य नेते निर्माण झाले म्हणून गांधीपूर्व कालखंडात महाराष्ट्राने राजकारण गाजविले–राजकीय पुढारीपण केले, असा एक समज आहे. पण याच महाराष्ट्रात रानडे गोखले यांच्यासारखे महान् पुढारी लाभूनही मवाळ राजकारण मूळ धरू शकले नाही; निदान टिळकांपुढे टिकाव धरू शकले नाही, हीही गोष्ट खरीच आहे.

तेव्हा नुसत्या असामान्य नेत्यांच्या व्यक्तिमत्वाचा हा प्रश्न नाही; तर त्यांच्या शिकवणीने जनता भारली गेली की नाही; त्यांच्या कार्याला अनुकूल अशी पार्श्वभूमी व परिसर तयार झाला होता की नाही, हा खरा प्रश्न आहे.

महाराष्ट्रातील स्त्री-आंदोलनाच्या दृष्टीने पाहिले तर असामान्य व्यक्तिमत्त्वाची एक तरी लोकोत्तर स्त्री या कालखंडात निर्माण झाली होती. प्रारंभीच्या काही वर्षांत महाराष्ट्र तिला डोक्यावर घेऊन नाचला होता. नंतरही त्याच स्त्रीने स्त्री-मुक्ति हेच आपले जीवित-कार्य ठरवून त्यासाठी आपले बहुमोल जीवन समर्पित केले होते आणि महाराष्ट्रातील शहरांत आणि नंतर ग्रामीण विभागांत स्वतःला दशकानुदशके गाडून घेतले होते. पण महाराष्ट्रही असा रत्नपारखी की, त्याने या स्त्रीची प्रथम अवहेलना सुरू केली; तिचे नाव व कार्य सार्वजनिक क्षेत्रांत अगदी बदनाम केले आणि नंतर तिला उपेक्षेच्या डोहामध्ये अगदी खोल खोल गाडून–बुडवून टाकले!

शतकातून एखाद वेळेसच निर्माण होणारी अशी ही लोकोत्तर स्त्री म्हणजे पंडिता रमाबाई ही होय.

बंडखोर बापाची बंडखोर कन्या!

तिचे सर्व चरित्र आणि कार्य यांचा यथायोग्य गौरव करायला या ठिकाणी पुरेशी जागा नाही. एका उच्च प्रकांड पंडिताच्या पोटी रमाबाईंचा जन्म झाला; (१८५८) निसर्गाने आपल्या अनेकविध श्रेष्ठ गुणांच्या देणग्या तिच्यावर जन्मक्षणीच उधळल्या होत्या! पित्याच्या सुधारकी बंडखोरीमुळे तिला सर्व पैतृक विद्वत्तेचा वारसा मिळाला व तो तिने अत्यल्प काळात आत्मसात केला-पचनी पाडला. पुढे दुर्दैवाच्या फेऱ्यात सारा देश पायी भटकण्याची–प्रत्यक्ष बघण्याची संधी तिला लाभली. या काळात आई–बाप, भाऊ–बहीण यांचे मृत्यू अगदी उघड्या डोळ्यांनी बघून येणारी स्थितप्रज्ञता व स्थिर बुद्धीही तिला विशीच्या आतच लाभली.

या भारत भ्रमणाच्या फेऱ्यात ती जेव्हा त्यावेळच्या भारताच्या राजधानीत–म्हणजे कलकत्त्यात पोचली तेव्हा ती केवळ विशीत होती! या बालपंडितेच्या प्रकांड पांडित्याने, संस्कृत वक्तृत्वाने आणि तेजस्वी आकर्षक व्यक्तिमत्त्वाने सारे समाजनेते तेव्हा अक्षरशः दिपून गेले! नंतर बापाच्या बंडखोरीच्या पुढे जाऊन, संस्कृतातील सर्वांत श्रेष्ठ असा वेदविद्येचा आणि गुह्यात गुह्य शास्त्रांचा अधिकार (स्त्रियांना आणि शुद्रांना नाकारलेला अधिकार) रमाबाईने केवळ बंडखोरीने कमावला व गाजविला! त्याचबरोबर आधुनिक इंग्रजी विद्येचे 'वाघिणीचे दूध' तिने यथेच्छ प्राशन केले. आणखी एक बंडखोरी करून तिने एका बंगाली अन्य जातियाशी (तत्कालीन कल्पनेप्रमाणे कनिष्ठ जातीयाशी) प्रेमविवाह केला! एव्हाना पंचविशी उलटण्यापूर्वीच या स्त्रीची कीर्ती देशभर आणि देशाबाहेरही पसरली होती. आणि दुर्दैवाने तिला अल्पकाळातच वैधव्य प्राप्त झाले, तेव्हा सारा देश हळहळला होता.

रमाबाई-टिळकांची अगदी समकालीन !

एका महाराष्ट्रकन्येचे हे अद्‌भूत विद्युल्लतेसारखे जीवन महाराष्ट्र दुरून कौतुकाने पहात होता. रानडे-भांडारकरांसारखे ज्येष्ठ व श्रेष्ठ नेतेही ऐन पंचविशीतल्या या पोरसवदा स्त्रीच्या विद्वत्तेकडे-कर्तृत्वाकडे-वक्तृत्वाकडे स्तिमित होऊन पहात होते. पुण्या-मुंबईलाही तिचे अपूर्व सन्मान झाले. या ठिकाणी आणखी एका गोष्टीचा उल्लेख केला पाहिजे. तो हा की हे सर्व टिळकांच्या उदयापूर्वीच घडले होते ! रमाबाई टिळकांची अगदी समकालीनच होती. टिळकानंतर दोन वर्षांनी ती जन्मली आणि टिळकांच्या मृत्यूनंतर बरोबर दोनच वर्षांनी ती निवर्तली. आणि टिळकांची प्रारंभीच्या काळची उमेदवारी चालू असताना रमाबाई कीर्तीच्या, लोकप्रियतेच्या शिखरावर आधीच चढली होती !

रमाबाईला अवदसा आठवली !

अशा कर्तृत्वाच्या आणि कीर्तीच्या ऐन भरात रमाबाईला अवदसा आठवली ! -अवदसा आठवली हेच वर्णन अक्षरशः खरे आहे ! तिने संस्कृत विद्या हस्तगत केली होती; स्त्री-शुद्रांना निषिद्ध अशी वेदविद्यासुद्धा ! त्या वेदविद्येत पारंगत झाल्यावर तिला आढळून आले की, विद्येचे जे श्रेष्ठ फलित म्हणजे मोक्ष-त्यापासून ती कायमची वंचितच राहणार आहे ! कारण, हिंदुधर्माप्रमाणे स्त्रीला ती स्त्री आहे म्हणूनच केवळ तेवढ्याच कारणासाठी मोक्षाचा अधिकारच नाही; आणि तो स्त्री-जन्मात कधीही मिळणेही शक्य नाही. कारण शुद्राप्रमाणेच स्त्री ही अपवित्र, नीच कोटीतील आहे ! हिंदु स्त्रीला जास्तीत जास्त साध्य, अगदी अखेरचे फलित म्हणजे जन्मभर पतिसेवा करून, पतिव्रताधर्माचे कसोशीने जन्मभर पालन करून तिला फार तर स्वर्गप्राप्ती होईल-पण तीही स्वर्गात पतीची सेवा करण्यासाठीच केवळ !

हिंदुधर्माने स्त्रीला देऊ केलेले अंतिम श्रेय हेच ! यापलीकडे तिचा पल्लाच पोचू शकत नाही ! आणि हा 'प्रकाश' पडल्यानंतर, या बंडखोर पंडितेने आपला ईश्वराचा शोध, मोक्षमार्गाची आपली साधना स्वतःच स्वतंत्रपणे-स्वतंत्र बुद्धीने सुरू केली. त्यातून तिचा येशू ख्रिस्ताशी परिचय झाला. प्रथम ख्रिस्ती धर्ममार्तंडांमार्फत; नंतर स्वतःच्या प्रत्यक्ष वाचन-चिंतन-ध्यान-धारणेच्या साहाय्याने. आश्चर्याची गोष्ट म्हणजे ही सर्व वैचारिक अध्यात्मिक क्षेत्रांतील वाटचाल चालू असता, पंडिता रमाबाई समाजापासून क्षणभरही विन्मुख नव्हती. किंबहुना समाजसेवा-त्यांतही दलितांची, पीडितांची, आपद्‌ग्रस्तांची स्त्रियांची-शूद्र-अतिशुद्रांची सर्वविध सेवा हाही रमाबाईंच्या जीवनाचा एक कायमचा अविभाज्य भाग होता, ती तिची जीवननिष्ठाच होती. तिचे तेही कार्य अखंड चालूच होते.

ख्रिस्ती धर्ममार्तंडाविरुद्ध बंडखोरी !

नंतर रमाबाईला इंग्लंड–अमेरिकेत जाण्याची संधी मिळाली. तेथून तिने जग पाहिले. आधुनिक नजरेने,––वैचारिक त्याचप्रमाणे व्यावहारिक दृष्टीने. हिंदुधर्माने मोक्षमार्ग नाकारला म्हणून ती येशूकडे वळली; संतांच्या साक्षात्काराच्या गोष्टी तत्कालीन समाज मानत होता; आणि आजही मानतो. पण साक्षात्कार हिंदुधर्माने स्त्रीला मात्र नाकारला होता; तो येशूच्या रूपाने रमाबाईला झाला !

येथेही रमाबाईची जन्मजात बंडखोरी पुन्हा पुन्हा आड आलीच ! हिंदुधर्माने व धर्ममार्तंडांनी तिची वाट जशी पावलोपावली अडविली होती; तशीच ख्रिस्ती धर्ममार्तंडांनी सुद्धा–अगदी त्याच पद्धतीने–त्याच तंत्राने–त्याच निष्ठुरपणाने रमाबाईची वाट अडविली होती !

अधिकृत धर्ममार्तंडांच्या, मोक्षमार्गावरील मक्तेदार दलालांच्या, भिक्षुक श्रेणीतील उतरंडीच्या मार्फतच येशूचे आणि परमेशाचे दर्शन होऊ शकते, हा त्यांचा दावा–आग्रह–किंवा खरे म्हणजे जबरदस्ती ! हिंदु धर्ममार्तंडाचा दावा जसा बंडखोर रमाबाईने फेटाळला होता, त्याचप्रमाणे नंतर ख्रिस्ती धर्ममार्तंडांचाही दावा तिने फेटाळला !—तितक्याच बंडखोरीने–निर्धाराने–कठोरतेने !

येशूचा प्रत्यक्ष साक्षात्कार आपल्याला होऊ शकतो आणि परमेश्वरी कृपेचे वरदान आपल्याला प्रत्यक्ष मिळू शकते, असा दावा ख्रिस्ती धर्मात (त्यातील वेग-वेगळ्या व पंथ-उपपंथात शिरून) रमाबाईने केला; आणि अखेर खरा करून दाखविला ! हिंदुधर्ममार्तंडांविरुद्ध रमाबाईने केलेली बंडखोरी–(धर्मद्रोह !) जगजाहीर आहे आणि त्याबद्दल भरपूर प्रायश्चितही हिंदुधर्माने तिला दिलेले आहे ! पण ख्रिस्ती धर्ममार्तंडांविरुद्ध ख्रिस्ती धर्मात प्रवेश केल्याच्या प्रथम क्षणापासूनच रमाबाईने पुकारलेली बंडखोरी मात्र अजूनही बरीचशी अज्ञात किंवा उपेक्षित राहिली आहे. हिंदूंनी रमाबाईवरील सूडबुद्धीने तिकडे दुर्लक्ष केले; आणि ख्रिस्ती धर्ममार्तंडांनी ती बंडखोरी प्रथम दडपून टाकण्याचा–आणि नंतर दडवून ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न केला !

रमाबाईनी उपस्थित केलेले मूलभूत प्रश्न

ख्रिस्ती धर्ममार्तंडांविरुद्ध रमाबाईने किती किती प्रकारांनी म्हणून बंडखोरी करावी ? धर्मसंस्थेची व धर्ममार्तंडांची ख्रिस्ताशी व परमेशाशी मध्यस्थी व दलाली करण्याची मक्तेदारी, रमाबाईने साफ नाकारली; माझा येशू माझ्याशी बोलतो–मला मार्गदर्शन करतो, हा भयानक जीवघेणा दावा–(अनेक ख्रिस्ती संतांनी आणि संतिणींनी केलेला प्राणघातक दावा) रमाबाईने केला–आणि अखेर चालवून दाखविला !

(जोन ऑफ आर्कसारख्या शेकडो संतिणींना याच दाव्याबद्दल धर्मद्रोहाच्या आरोपाखाली चेटकिणी म्हणून जिवंत जाळण्यात आले होते.)

बरे ख्रिस्ती धर्म स्वीकारल्यानंतर तरी रमाबाईंनी धर्मसंस्थेची, चर्चची कार्यपद्धती–तंत्र–परिभाषा बिनतक्रार मानली का? तर मुळीच नाही–कधीच नाही. प्रारंभापासून अखेरपर्यंत नाही! भारतामध्ये धर्मप्रसार करावयाचा तर त्यासाठी येशूचा 'क्रूस' कशाला हवा? मोक्षमार्गासंबंधी काही भारतीय धर्मचिन्ह का नको? धार्मिक भाषा म्हणून लॅटिनच कशाला हवी? संस्कृत किंवा मराठी का नको? प्रार्थना व प्रार्थनागीते इंग्रजीतच का? मराठीतील भजने का नकोत? हिंदी ख्रिस्त्यांची नावे परकीय–युरोपीय–यहुदीच का? मराठी–भारतीय का नकोत? धर्मगुरूंचा व उपदेशकांचा गणवेश युरोपीय का? मराठी घोतर किंवा साडीचोळी का नको? भारतीय चर्चला स्वायत्तता का नको? रोम किंवा दुसऱ्या कोणत्या धर्मपीठाची व धर्माध्यक्षाची दूरची हुकूमत काय म्हणून? येशूच्या वेगवेगळ्या पंथात–उप-पंथात वैर का? एकता का नाही? ख्रिस्ती धर्माचे इतर धर्माशी वैर का? असे अनेक मूलभूत भूमिकेचे–त्याचप्रमाणे व्यवहाराचे अनेक 'धर्मद्रोही' प्रश्न रमाबाईंनी तिच्या ख्रिस्ती जीवनातील पहिल्या काही महिन्यांत–वर्षांतच उपस्थित केले–जिद्दीने लढविले! आणि हा लढा साऱ्या जन्मभर–तिने लढविला.

याहूनही महत्त्वाची गोष्ट म्हणजे ख्रिस्ती झाल्यानंतरही रमाबाईंनी राजनिष्ठेचा, ख्रिस्ती चर्चमध्ये चाकरी करण्याचा सुखासीन मार्ग पत्करला नाही. त्याचप्रमाणे आपली धर्मबुद्धी स्थिर झाल्यावर, आध्यात्मिक शांती प्राप्त झाल्यानंतर रमाबाईंनी जगाकडे पाठ फिरवून केवळ प्रार्थना किंवा चिंतन यांमध्ये गढून जाण्याचा संन्यासमार्गही अवलंबिला नाही.

संत आणि समाजसेविका

कारण तिला जशी येशूची ओढ होती; तशीच भारतातील शापित स्त्री-शुद्रांच्या आत्यंतिक वेदनेची, त्यांच्या सेवेचीही तिला आस लागलेली होती. म्हणूनच भारतात परत पाऊल ठेवण्याच्या क्षणापासून, तो या जगातून कायमचा निरोप घेण्याच्या क्षणापर्यंत, रमाबाईंनी आपले अवघे जीवन दलितांच्या सेवेत क्षणाक्षणाने आणि कणाकणाने अक्षरशः झिजविले! तिच्यासारख्या प्रकांड-पंडितेच्या पांडित्याला, विद्वत्तेला, वक्तृत्वाला, कर्तृत्वाला खरे म्हणजे सारे जग मोकळे होते; पण तिच्या मातृभूमीचीच हाक तिला साद घालीत होती. म्हणून महाराष्ट्रातील शापित–दलित स्त्री-शुद्रांच्या सेवेलाच तिने स्वतःला जुंपून घेतले. अनाथ, पतित, परित्यक्त, वंचित, आपदग्रस्त, रुग्ण, दुष्काळपीडित अशा स्त्रिया व बालबालिका यांच्या सेवेला तिने वाहून घेतले! शहरी जीवनाचा त्याग करून तिने ग्रामीण जीवनाचा अंगीकार केला. आणि सतत ३० वर्षे तिने हे कार्य अनन्यसाधारण निष्ठेने आणि कार्यक्षमतेने केले.

हजारो दलित–पीडितांची तिने नाना परीने सेवा केली, शेकडो स्त्री-शुद्रांना सेवेची महान दीक्षा दिली.

पण महाराष्ट्राने या कार्याचे काय चीज केले? अवघ्या दहा वर्षांपूर्वीच म्हणजे १८८५–९० मध्ये देवी सरस्वतीचा अवतार म्हणून रमाबाईंना डोक्यावर घेऊन नाचणाऱ्या हिंदुसमाजाने–रमाबाईंना नंतर सर्वस्वी बहिष्कृत केले; विषारी विकृत प्रचाराने तिचा सतत उपहास केला; आणि पुढील वीस वर्षे उपेक्षेच्या विस्मृतीच्या अंधारमय डोहात खोल खोल बुडवून–गाडून टाकले!

फुल्यांनी उपदेशिलेल्या स्त्री-शूद्रसेवेच्या कार्यक्रमातील प्रत्येक तपशील रमाबाईंनी कसोशीने आणि निष्ठेने अंमलात आणला. आपल्या कार्यामध्ये संपूर्ण भारतीयत्व टिकविण्याचा आटोकाट प्रयत्न तिने जन्मभर केला. राजनिष्ठ राजकारणापासून ती जन्मभर कटाक्षाने अलिप्त राहिली. खिस्ती धर्माला भारतीय—मराठी स्वरूप देण्याचा अत्यंत बिकट व खडतर अंतर्गत लढाही तिने सतत चालू ठेवला. रमाबाईंनी ५०–७५ वर्षांपूर्वी दिलेला कठीण लढा किती दूरदर्शीत्वाचा होता, याची साक्ष गेली काही वर्षे खिस्ती जगात व भारतामध्येही काही प्रमाणात घडून येणाऱ्या परिवर्तनावरून आजही येण्यासारखी आहे.

अध्यात्ममार्गावरील तत्त्वचिंतन आणि मोक्षसाधना या परंपरागत मूल्यांच्या दृष्टीने पाहिले तर रमाबाईंना खरोखर महाराष्ट्राच्या महान् संतमालिकेत मानाचे स्थान द्यावे लागेल. पण संत रमाबाई इतर संतांप्रमाणे केवळ मोक्षसाधनेत गढलेली नव्हती; किंवा गृहस्थधर्मात बुडलेली ती भागवत वारकरीणही नव्हती; किंवा बौद्ध-जैन संप्रदायातील ती संन्यासिनीही नव्हती. संत पदवी यथार्थ करणारी ती संन्यासिनी तर होतीच; पण दलित सेवेला वाहून घेतलेली ती एक निष्ठावंत निष्काम कर्मयोगिनीही होती!

अशा एका श्रेष्ठ संतिणीचा-समाजसेविकेचा लाभ महाराष्ट्राला झाला. भारतातील-महाराष्ट्रातील स्त्री-शुद्रांच्या मुक्ति-संग्रामाचा खराखुरा इतिहास जेव्हा केव्हा लिहिला जाईल, तेव्हा रमाबाईंच्या चरित्राचे आणि कार्यकर्तृत्वाचे स्मरण कृतज्ञतेने करावेच लागेल. त्याचप्रमाणे या लोकोत्तर स्त्री-संतिणीची आणि समाजसेविकेची जी अवहेलना आणि उपेक्षा कृतघ्न हिंदुसमाजाने सतत केली, त्याबद्दलच्या पश्चात्तापाने महाराष्ट्राला मान खाली घालावी लागेल!

रमाबाईंनी आपल्या स्त्री-शूद्रसेवेच्या कार्यासाठी केडगाव या आडमार्गावरील लहानशा गावात स्वतःला गाडून घेतले होते. इथेच तिने नवा आश्रम काढून हजारो अनाथा, पतिता, परित्यक्ता; दुष्काळग्रस्ता, विधवा, रुग्णा इत्यादी स्त्रियांना मुख्यतः शूद्र-अतिशूद्र स्त्रियांना आश्रय दिला, शिक्षण दिले; हिंदुधर्माने नाकारलेली समानतेची, माणुसकीची वागणूक दिली.

—केडगावचा दुसरा संत !

रमाबाईंच्या या महान् कार्याची हिंदुसमाजाने निष्ठुर अवहेलना केली. पण याच गावात दुसरा एक संत दुसऱ्याच प्रकारचा एक आश्रम चालवीत होता ! तो संत 'राजयोगी' म्हणजे विलासी होता ! त्याचे नाव श्री अनंतकोटी ब्रम्हांडनायक योगयोगेश्वर राजाधिराज संत नारायणमहाराज. त्याचे–त्यांच्या विलासी ऐतखाऊ राजयोगाचे मात्र महाराष्ट्राने जन्मभर कौतुक केले ! पण महाराष्ट्राच्या श्रेष्ठ संत-मालिकेत सहज शोभणाऱ्या संत रमाबाईंची–श्रेष्ठ समाजसेविकेची मात्र सतत बदनामी केली ! नारायणमहाराजांचे काही शिल्लक राहिलेले नाही. शिष्य-शिष्यिणी संपल्या; इस्टेटीबद्दल भांडणे-कज्जेदलाली झाली. सुंदर दत्तमंदिरावर अवकळा आली. पण रमाबाईंचा आश्रम अजून टिकून आहे आणि तिने माणुसकीत आणलेल्या हजारो तथाकथित शूद्र-अति शूद्र स्त्रिया आणि त्यांची मुलेबाळे महाराष्ट्रभर पसरली आहेत.

पंडिता रमाबाईंचे मुख्य जीवितकार्य म. फुल्यांच्या मृत्यूनंतरच घडले; पण तरीही या लोकोत्तर स्त्रीचे खरे तेज, मूल्य, तिच्या उदयकाळातही फुल्यांना उत्कटपणे जाणवले होते. म्हणूनच फुल्यांनी वेळप्रसंगी त्या तरुण तेजस्विनीबद्दल आणि तिच्या बंडखोरीबद्दल गौरवोद्गार काढलेले आहेत. रमाबाईंचे संपूर्ण जीवितकार्य फुल्यांनी बघितले असते, तर त्यांनी खचित तिचा सतत पाठपुरावा केला असता. कारण अखेर फुल्यांना प्रिय असलेल्या श्रेष्ठ प्रेरणा घेऊनच, रमाबाईंनी आपले कार्य जन्मभर केले;—स्त्री-शूद्र-अति शुद्रांच्या सर्वांगीण सेवेसाठीच तिने आपले जीवन-सर्वस्व उधळून टाकले !

प्रकरण ८ वे

हिंदू सुधारक-दोन नमुने

(१)

सुधारक सावरकर–त्यांची शोकांतिका !

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या सुधारणावादाबद्दल थोडे वेगळे लिहायला हवे.

खरी गोष्ट अशी आहे की, सावरकर एक नाहीतच ! किमान तीन सावरकर तरी त्यांच्या जीवनाच्या तीन वेगवेगळ्या कालखंडात वावरताना आढळतात ! बालपणापासून १९१० पर्यंत म्हणजे अंदमानच्या कराल काळगृहाने गिळून टाकीपर्यंतचे पहिले सावरकर !–ज्वलज्जहाल, संपूर्ण स्वातंत्र्यवादी, संपूर्ण शस्त्रवादी, प्रखर राष्ट्रवादी स्वातंत्र्यवीर सावरकर होत. स्वातंत्र्यवीर सावरकरांचा राष्ट्रवाद तेव्हा धर्मनिरपेक्ष होता; हिंदु–मुस्लीम ऐक्यावर आधारलेला होता. या काळातील त्यांची प्रमुख दैवते बघावी. शिवाजी, राणी लक्ष्मीबाई (शिवाय श्रीराम–रामदास वगैरे); चालू राजकारणाच्या दृष्टीने मुख्यतः काळकर्ते शि. म. परांजपे (लो. टिळक नव्हेत); वैचारिक दृष्ट्या पाहिले तर 'भगवान् मॅझिनी' (इटालियन राष्ट्रवादाचा व स्वातंत्र्य आंदोलनाचा प्रणेता). आणि आणखी महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांची हिंदु–मुस्लीम एकजुटीबद्दलची त्यावेळची दृष्टी. १८५७ च्या स्वातंत्र्य-समरात सावरकरांना हिंदु–मुस्लीम ऐक्याचे, त्यावर आधारलेल्या धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाचे दर्शन झाले होते. बाहादूरशहा, झीनत महाल हे मुस्लीम नेते, सावरकरांना नानासाहेब, राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपेंइतकेच प्रिय व आदरणीय होते, स्फूर्तीदायक वाटत होते. सावरकरांच्या त्यावेळच्या देशभक्तीमध्ये पुढील काळातील हिंदूत्वाचा–हिंदुराष्ट्रवादाचा लवलेशसुद्धा नव्हता ! प्रखर व्यापक

राष्ट्रप्रेमाने ते संपूर्णपणे भरून–भारावून गेले होते. सामाजिक सुधारणांचा विचार करायला त्यांना तेव्हा फारसा वेळच नव्हता! त्यांचे राजकीय गुरु काळकर्ते परांजपे तर सनातन्यांचे अध्वर्यु आणि सुधारकांचा सतत व निर्दय उपहास करणारेच होते!

असे स्वातंत्र्यवीर सावरकर अंदमानात पुढे १२–१४ वर्षे अडकले; पिचले. तेथे प्रथम त्यांचा जहाल सशस्त्र राष्ट्रवाद हळुहळू निवत गेला आणि त्याऐवजी हिंदुराष्ट्रवादाचा उदय होऊ लागला. (इथूनच दुसरे सावरकर सुरू होतात.)

रत्नागिरी कालखंड : १९२४ ते १९३६

१९२४ मध्ये सुटका झाल्यानंतर त्यांनी राजकीय दृष्ट्या तत्कालिन 'केसरी' गटाशी–म्हणजेच एव्हाना राजकीय दृष्ट्या मवाळ आणि सामाजिक दृष्ट्या प्रतिगामी –सनातनी बनलेल्या संस्थेशीच जवळिक केली! फार काय १९२६ सालच्या प्रांतिक कौन्सिलच्या निवडणूकीत तथाकथित प्रतियोगी सहकारिता पक्षातर्फे उमेदवार म्हणून उभे राहण्यासाठी स्वातंत्र्यवीर सावरकरांनी खटपट केली होती! अर्थातच गांधीजी आणि त्यांच्या पुढारीपणाखालील सामुदायिक लढावादी चळवळी, त्याचप्रमाणे मर्यादित प्रमाणातील फुलेप्रणीत सामाजिक सुधारणेच्या चळवळी, यापासून सावरकर अलिप्तच नव्हे तर विरुद्धच राहिले!

हिंदुत्वनिष्ठ सुधारणावाद!

रत्नागिरी येथील बारा वर्षांच्या प्रदीर्घ स्थानबद्धतेच्या काळात सावरकरांनी शुद्ध बुद्धिवादाच्या भूमिकेवरून हिंदुधर्मातील अनेक दुष्ट रूढींविरुद्ध आणि विषमतेविरुद्ध अत्यंत प्रखर आणि प्रभावी असे लिखाण केले. आगरकरानंतर सुधारकांची भूमिका इतक्या प्रभावीपणाने आणि प्रखरपणाने मांडणारा प्रचारक म्हणजे सावरकरच, असे म्हणण्यात यत्किंचितही अतिशयोक्ती होणार नाही. लेखी प्रचाराच्या जोडीलाच सावरकरांनी रत्नागिरी जिल्ह्याच्या बंदिस्त मर्यादेत शक्य तेवढा अस्पृश्यता–निवारणाचाही प्रभावी प्रचार आणि आचारही केला. सहभोजने, झुणका-भाकर सत्यनारायण, खेडोपाडी प्रचार सभा, संघटना इत्यादी प्रकारांचा त्यांनी प्रभावी अवलंब केला.

सावरकरांनी बुद्धवादी भूमिकेवरून हिंदूंच्या भोळसट, पोथीवादी, कालबाह्य समजुतींवर आणि रुढींवर प्रखर हल्ले चढविले. विषमता, वर्णवर्चस्व, जातीभेद यावरील त्याचे हल्ले निःसंशय प्रभावी होते. 'गोमाता' हा हिंदूचा एक सर्वांत नाजूक मानबिंदू मानणाऱ्या सनातनी विचारधारेवर (की जो पुढे गोळवलकरगुरुजींनी आपल्या अनेक राष्ट्रव्यापी जन-आंदोलनांचा केंद्रबिंदू केला) सावरकरांनी निर्दय हल्ले केले. ही सर्व सावरकरी सुधारकी कार्याची निःसंशय जमेची बाजू म्हणायला हवी.

वैयक्तिक आचरणाच्या दृष्टीने पाहिलें तर सावरकर स्वतः कर्ते सुधारक होते. रोटीबंदी–स्पर्शबंदी विरुद्ध मोहिमांत त्यांनी व्यक्तिशः पुढाकार घेतला; आणि व्रत म्हणूनही त्याचे पालन केले. हिंदुधर्मांतील अनेक मूर्खपणाच्या रूढ संस्कारांविरुद्धही त्यांनी जळजळीत प्रचार केला. (खुद्द आपल्या मृत्यूनंतरही कोणतेही धार्मिक हिंदू संस्कार करू नयेत, असा सक्त इषारा त्यांनी देऊन ठेवला होता आणि या त्यांच्या आदेशाची कसोशीने अंमलबजावणी करण्यात आली, ही गोष्ट प्रसिद्धच आहे.)

सावरकरांनी ज्या सुधारणा प्रतिपादिल्या त्यांचे वर्गीकरण खुद्द त्यांनीच 'सप्तशृंखला' या आकर्षक घोषणेद्वारा केलेले आहे. रोटी, बेटी, स्पर्श, सिंधु, व्यवसाय, वेदोक्त, शुद्धी या त्या सात शृंखला किंवा बंद्या होत्या. यांतील प्रत्येक शृंखला किंवा बंदी–बेडी तोडा, अशी त्यांची घोषणा होती. 'रोटीबंदीची बेडी तोडा' या घोषणेपासून त्यांनी रत्नागिरीला आपले सुधारकी कार्य सुरू केले. रोटीबंदी त्यांनी निश्चित मोडली–आणि त्यांच्यापासून स्फूर्ती घेऊन पुढे झुणका-भाकर सहभोजनाचे आंदोलन महाराष्ट्रात पुष्कळच पसरले. रोटीबंदी–स्पर्शबंदी या दोन बेड्या तोडण्याची पद्धतशीर मोहीम त्यांनी केली व ते मर्यादित अर्थाने का होईना पण एक महत्त्वाचे सुधारकी कार्य अत्यंत धडाडीने त्यांनी केले. याबद्दलचे श्रेय निःसंकोचपणे त्यांना दिले पाहिजे.

सातवी बंदी जी शुद्धी तिच्यासंबंधीचेही कार्य त्यांनीं पुढे बरेच केले: पण त्याला प्रथमपासून अखेरपर्यंत प्रखर मुस्लीमविरोधी–खिस्तीविरोधी स्वरूप होते. आणि तो त्यांच्या हिंदुत्ववादी राजकारणाचाच खरे म्हणजे एक मुख्य भाग होता. या मोहिमेला निर्भेळ सुधारकी मोहीम म्हणणे कठीणच आहे. त्यामागील मुस्लीमद्वेष्टी-खिस्तीद्वेष्टी, जातीय, आक्रमक, प्रक्षोभक भूमिका तर निःसंशय घातकच होती.

बुद्धापासून गांधींपर्यंतच्या सुधारकांची वेगवेगळ्या कारणांसाठी निंदाही करून, सावरकर आपल्यासाठी एक वेगळी भूमिका तेव्हापासूनच निर्माण करीत होते. प्रखर हिंदुत्वनिष्ठ, पण हिंदु राष्ट्राच्या कक्षेत सुधारणावादी; बुद्ध-गांधींच्या 'नपुंसक' अहिंसावादाची अत्यंत निर्दय टवाळी; मुसलमानांचे उघड शत्रुत्व–आणि मुसलमानाशी एकजूट करण्याच्या धोरणाला ऐक्यलंपट–लोटांगणवादी–'राष्ट्रद्रोही' अशा विशेषणांनी प्रखर विरोध, बाटलेल्या हिंदूंचे– त्याचप्रमाणे बाटलेल्या मराठी भाषेचे शुद्धीकरण अशा वेगवेगळ्या प्रकारांनी त्या काळात सावरकर विशिष्ट वैचारिक–राजकीय भूमिका तयार करीत होते. यांपैकी बऱ्याच भूमिका १९१० पर्यंतच्या कालखंडातील भूमिकेशी सर्वस्वी विसंगत–किंबहुना विरुद्ध होत्या, यात शंकाच नाही. नव्या भूमिकेत ब्रिटिश साम्राज्य हे मुख्य शत्रू ही भूमिका व्यवहारतः लोपत चालली होती. उलट, मुसलमान आणि गांधी यांचीच व्यवहारतः मुख्य शत्रुत्वस्थानी स्थापना झाली होती ! नेपाळचे स्वतंत्र हिंदु सम्राट, इतर हिंदु संस्थानिक व सरंजामदार

यांच्याबद्दल एकप्रकारची आत्मीयता, त्यांच्या उदार आश्रयाची अपेक्षा निर्माण करण्यांत येऊ लागली होती! भारताच्या इतिहासाचे अत्यंत विकृत पुनर्लेखन सुरू झाले होते. त्यामध्ये बुद्धाच्या परंपरेची निरर्गल निंदा, हिंदु-मुस्लीम सामंजस्याचे प्रयत्न करणारांचा तीव्र विरोध आणि विपर्यास, मुस्लीम हेच मुख्य शत्रू आणि हिंदु पुनरुत्थान हाच उपाय, अशी शिकवण अत्याग्रहाने येऊ लागली होती.

पुढे हिंदु राष्ट्रवाद्यांनी प्रमाणभूत मानलेला 'हिंदुत्व' हा ग्रंथ याच काळात सावरकरांनी लिहीला, ही गोष्टही सावरकरांच्या सुधारणावादाचा विचार करताना ध्यानात ठेवली पाहिजे. याच ग्रंथातील मूळ भूमिकेच्या आधाराने सावरकर भारतीय इतिहासाकडेही पाहू लागले होते. त्या इतिहासाचे पुनर्लेखनही त्यांनी सुरू केले होते. 'हिंदू-पद पादशाही' या त्यांच्या ग्रंथात नव्या इतिहास लेखनाचा नमूना दिसून येतो. भारताच्या म्हणजेच हिंदूंच्या इतिहासातील 'सोनेरी पाने' शोधून काढण्याचा अनैतिहासिक, विपर्यस्त खटाटोप याच काळात सावरकरांनी सुरू केला होता.

सावरकरी सुधारणावादाची पार्श्वभूमी

१९२४ ते १९३६ या कालखंडाला सावरकरांचे सुधारणायुग असे संबोधून त्याचा अलिकडे सर्वांकडून बराच गाजावाजा पद्धतशीरपणे करण्यात येत आहे. पण त्यावेळी सावरकरांवर राजकीय बंधने असल्याने प्रत्यक्ष राजकारण त्यांना वर्ज्य होते, ही गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे. पण तरीही सावरकरांनी आपली राजकीय भूमिका स्पष्ट करण्याचा प्रयत्न तेव्हाही वैचारिक आणि व्यावहारिक दृष्टीने चालविला होताच. ते राजकारण संपूर्णपणे हिंदुत्ववादी, प्रतिगामी, वरिष्ठवर्गीय आणि मुख्यतः गांधी आणि कम्युनिस्ट-सोशालिस्ट यांनी प्रवर्तिलेल्या प्रचंड जनता आंदोलनाच्या—राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या—त्याचप्रमाणे श्रमिकांच्या समाजवादाच्या विरुद्धच होते.

या मूलभूत भूमिकेच्या पार्श्वभूमीवर सावरकरांच्या मर्यादित सामाजिक सुधारणेचा आणि अस्पृश्यता-निवारण कार्याचा विचार केला पाहिजे.

प्रत्यक्ष सामाजिक सुधारणेचे कार्य म्हणून सावरकरांनी सहभोजने वगैरे प्रकार अत्यंत प्रभावपणाने हाताळले-पतितपावन मंदिराची प्राणप्रतिष्ठा हे अस्पृश्यांच्या मंदिरप्रवेशांच्या चळवळीला सावरकरांचे पर्यायी उत्तर होते. आणि बाटवलेल्या हिंदूंचे शुद्धिकरण आणि मराठी भाषेचे शुद्धिकरण या दोन्ही चळवळीत अभिप्रेत असलेले प्रखर हिंदुत्ववादाचे पुनरुत्थान हे तर निश्चितपणे समता-आंदोलनाला पोषक नव्हते. व्यवहारतः ते परंपरागत हिंदुसंस्कृतीचेच पुनरुत्थान करीत होते, यात शंका नाही.

सावरकरांनी अस्पृश्यता निवारणाची चळवळ रत्नागिरी जिल्ह्यातील स्थानबद्धतेच्या काळात केली. पण त्याचवेळी बाहेर डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली

तेजस्वी–स्वाभिमानी चळवळीचे जे रान पेटत होते, त्याबद्दल सावरकरांना फारशी आत्मीयता वाटत होती, असे म्हणवत नाही. जेधे-जवळकरांच्या नेतृत्वाखाली चालणाऱ्या सत्यशोधक चळवळीबद्दलही सावरकरांना यत्किंचितही आपलेपणा वाटलेला दिसत नाही. श्रमिकांच्या वर्गसंघर्षवादी–समाजवादी चळवळीबद्दल आत्मीयता तर सोडाच पण सावरकरांची वैरबुद्धीच होती. उलट, त्याच काळात जर्मनीत व युरोपात फोफावणाऱ्या हिटलर-मुसोलिनीच्या फॅसिस्ट आंदोलनाबद्दल, त्यातील 'आर्यवाद' हुकूमशाही, जनतेबद्दलचा तिरस्कार इत्यादी गोष्टींचे कौतुक करणाऱ्यांकडेच सावरकरांची सहानुभूती होती !

सावरकर आणि स्त्री-मुक्ती

सावरकरांच्या समाजसुधारक चळवळीमध्ये आणखी एक न्यूनविशेष आढळतो. त्यांच्या समतेच्या आणि सामाजिक न्यायाच्या कल्पनेत स्त्री-मुक्ती आंदोलनाला फारसे स्थान दिसत नाही. फुल्यांपासून आगरकर-कर्व्यांपर्यंत सामजिक समतेच्या लढ्यामध्ये, वैचारिक भूमिकेमध्ये किंवा प्रत्यक्ष चळवळीमध्ये स्त्रिया व त्यांची गुलामगिरी, शिक्षण, समान हक्क, बालविवाह, विधवा, पतिता परित्यक्ता वगैरे प्रश्न, स्त्रियांचे मालमत्तेचे हक्क, वारसा हक्क, वगैरे प्रश्नांना सतत प्राधान्य मिळालेले आहे. आणि सनातन्यांशी सुधारकांचे जे संघर्ष झाले त्यामध्येही स्त्री-विषयक विविध प्रश्न सतत प्रामुख्याने लढविले गेले आहेत. पण सावरकरांनी दहा-बारा वर्षे सतत सामाजिक प्रश्नांबाबत लिखाण, प्रचार व चळवळी केल्या. त्यात स्त्रीविषयक प्रश्नांना फारसे महत्व कधीच मिळाले नाही; त्यांच्या प्रत्यक्ष व्यावहारिक चळवळीत तर स्त्रियांचे प्रश्न जवळजवळ अभावानेच असावेत, ही एक आश्चर्याची गोष्ट आहे ! याबाबतीत फुले-आगरकरांचे लिखाण आणि सावरकरांचे लिखाण यांची तुलना केल्यास हा फरक फारच तीव्रतेने जाणवतो ! सावरकरांवरील हिंदु पुनरुत्थानवादी संस्काराची पुटे किती गाढ आणि गूढ होती, याचाच हा आणखीही एक प्रभाव असावा ! सावरकरांच्या चळवळीच्या परिसरात स्त्रियांना स्थान होते ते केवळ पुरुष पूजना- पुरतेच !

सावरकरांनी आपल्याला अभिप्रेत असणाऱ्या महत्त्वाच्या सात सुधारणांची जी सप्तसूत्री सांगितली आहे, ती सप्तशृंखला या नावाने सावरकरभक्तांमध्ये प्रसिद्ध आहे. रोटी-बेटी-स्पर्श-सिंधु-व्यवसाय-वेदोक्त-शुद्धी याबाबत सप्तशृंखला तोडण्याच्या या सप्तसूत्री सुधारणांमध्ये स्त्री मुक्तीच्या प्रश्नाला; स्त्रियांच्या समान हक्कांच्या प्रश्नाला स्थान मिळू नये, ही गोष्ट जितकी चिंतनीय तितकीय अर्थपूर्ण आहे ! यामधील बेटी बंदीचे जे कलम आहे, ते फक्त विवाहाच्या बाबतींत, हिंदुमधील जातीभेद आड येऊ नयेत, एवढ्या मर्यादित संदर्भापुरतेच आलेले आहे. एकूण स्त्री-मुक्तीच्या व्यापक प्रश्नांचा एक अत्यावश्यक मूलभूत सुधारणा म्हणून सावरकरांनी केव्हाही विचारच केलेला

नाही. तसा व्यापक, मूलभूत, शास्त्रशुद्ध विचार त्यांच्या एकूण धारणेमध्ये बसत नव्हता, हेच खरे आहे. किंबहुना त्यांची विचारांची जी मूलभूत बैठक होती तिच्याशी असे स्त्री-मुक्ति-आंदोलन जुळण्यासारखे नव्हते; किंबहुना ते विसंगत विरोधीच होते. हिंदु पुनरुत्थानवाद आणि त्यांच्या सिद्धीसाठी सावरकरांनी अंगीकारिलेली आक्रमक, शस्त्रपूजक, हिंसाचारी, एकनेतावादी, फॅसिस्ट धर्तीची विचारधारणा, यांचा स्त्रीमुक्ति-आंदोलनाशी मूलभूत विरोधच होता ! परंपरागत पुरुषप्रधान धारणेच्याही पलिकडे जाऊन स्त्रीला 'चूल-मूल'ची हिटलरी सनद देऊन तिला पुरुष-पूजेच्या तत्त्वज्ञानाला बांधण्याच्या मार्गावरीलच ही वाटचाल होती !

तेव्हा सावरकरांचा सुधारक म्हणून विचार करताना सामाजिक समतेच्या लढ्यांतील एका अती महत्त्वाच्या आणि सर्वांत निकट अशा कलमाबाबत त्यांची ही भूमिका ध्यानात घेतली पाहिजे आणि त्यांच्या सुधारणा विचारांतील एक महत्त्वाचा न्यूनविशेष म्हणूनच त्या गोष्टीची नोंद झाली पाहिजे. फुले-आगरकर यांनी स्त्री-मुक्ति-विषयक प्रश्नाला आपल्या एकूण सुधारणा-विचारांत आणि आचारांत किती महत्त्वाचे स्थान दिले होते, हे पाहिले म्हणजे सावरकरांचे हे न्यून अधिकच जाणवते. आणि हे असे का झाले याचा विचार करताना पुन्हा सावरकरांच्या गाढ व गूढ हिंदु-पुनरुत्थानवादी भूमिकेपर्यंत त्यांचे मूळ जाऊन भिडते हेच खरे आहे.

फुले-आगरकर-आंबेडकर वेगळे; सावरकर वेगळे !

आज फुले आणि आंबेडकर यांच्या सामाजिक समतेच्या लढ्याबाबतच्या ऐतिहासिक-क्रांतिकारक कार्याचा उदोउदो करण्याचा जमाना आहे; त्यांमध्ये सुधारक सावरकरांना, फुले-आगरकर-आंबेडकर यांच्या बरोबरीने स्थान देण्याचा काहीसा पद्धतशीर प्रयत्न चालू असलेला सध्या दिसतो ! ऐतिहासिक वास्तव-दर्शनाच्या दृष्टीने पाहिले तर हा प्रयत्न काहीसा कृत्रिम आणि सर्वस्वी अनैतिहासिक वाटतो.

सावरकरांच्या महान् विभूतीमत्त्वाचे गुणगान ज्यांना करावयाचे असेल त्यांनी खुशाल करावे. पण फुले-आगरकर-आंबेडकर यांच्याशी आणि त्यांच्या सर्वांगीण समताआंदोलनाशी सावरकरांचे नाव जोडणे सर्वस्वी अनैतिहासिक, अनुचित ठरेल. फुले-आगरकर-आंबेडकर यांच्या सामाजिक समतेच्या मूळ प्रेरणा, धारणा संपूर्णपणे वेगळ्याच होत्या. हिन्दुराष्ट्रवादी सावरकरांच्या प्रेरणा-धारणांशी त्यांचा सुतराम संबंध नव्हता, ही गोष्ट हडसून-खडसून आज सांगणे आवश्यक झाले आहे.

हिन्दु पुनरुत्थानवादी सुधारक म्हणजे वदतो व्याघात !

फुले-आंबेडकरांच्या प्रेरणा सावरकरांच्या प्रेरणांपेक्षा सर्वस्वी भिन्नच नव्हे, तर विरुद्धच होत्या. फुले-आंबेडकर विषमतावादी हिन्दुपरंपरेचे कट्टर विरोधक होते;

त्या परंपरेला मूळापासून आव्हान देऊनच त्यांचा सुधारणावाद उभा राहिला होता. विषमतावादी हिन्दुपरंपरेचा संपूर्ण पराभव करूनच फुले-आंबेडकरांचा नवा समताधिष्ठित मानवतावाद प्रस्थापित व्हावयाचा होता. उलट, सावरकरांना हिन्दुपरंपरेचे पुनरुत्थान करावयाचे होते. त्यासाठी त्या परंपरेतील जी सोनेरी पाने ते शोधीत होते—त्यांचा सामाजिक समतेशी, दलित-श्रमिकांशी, स्त्री-शूद्र-अति-शूद्रांशी काडीमात्र संबंध नव्हता! बुद्धापासून गांधींपर्यंतच्या मानवतावाद्यांच्या परंपरेशी सावरकरांनी उभे वैरच मांडले होते! सावरकरांनी हिन्दुधर्मातील काही वेडगळ समजुती-रूढी यावर कोरडे ओढले असले, तरी दलित-श्रमिक स्त्री-शूद्र-अति-शूद्र यांची ९५ टक्के असलेली जनता म्हणजेच खरेखुरे राष्ट्र, त्यांना समानतेचे-माणुसकीचे सर्व हक्क देणे आणि उच्चवर्णीय-उच्चवर्गीय शोषकांची मक्तेदारी समूळ नष्ट करणे हाच खरा मार्ग, ही जाणीव सावरकरांना होऊच शकली नाही. या जाणीवेहून वेगळा असा सुधारणावाद खरोखरच असूच शकत नाही. उलट, हिंदु पुनरुत्थानवादी सुधारणावाद म्हणजे अखेर एकप्रकारच्या नव्या उच्चवर्गीय (आणि प्रायः उच्चवर्णीयसुद्धा) विषमताधिष्ठित हिंदुसमाजाचे पुनरुत्थान होणार, ही जाणीव सुधारक सावरकरांना, बुद्धीवादी सावरकरांना मुळातच नव्हती! म्हणूनच सुधारक म्हणवता म्हणवता हिंदुराष्ट्रवादाचे प्रणेते—हिंदुहृदयसम्राट म्हणूनच सावरकर पुढे गाजले!

मदनलाल धिंग्रा ते नथूराम गोडसे!

—रत्नागिरीची १२ वर्षांची स्थानबद्धता संपताच, समाजसुधारक सावरकरांनी रत्नागिरी जिल्ह्याच्या बंदीत १२ वर्षे जे मर्यादित कार्य केले ते खरोखर देशभर पसरविण्याला त्यांना संधी होती.

पण प्रत्यक्षात झाले काय? तर स्थानबद्धतेतून सुटका होताच सावरकर राजकारणात म्हणजे हिंदुकारणात शिरले! ब्रिटिशांच्या ऐवजी मुसलमान आणि गांधी नेहरूंचे शत्रुत्व व्यवहारतः त्यांनी स्वीकारले! स्त्री-शूद्र-अतिशूद्र दलित-शोषित यांची फारशी पर्वा न करता, हिंदु संस्थानिक, जमीनदार-भांडवलदार-व्यापारी यांच्या आश्रयानेच हिंदु सभेच्या आंदोलनाची उभारणी करण्याच्या प्रयत्नाला सावरकर लागले! सामाजिक सुधारणेचे आपले सर्व लिखाण त्यांनी बासणात गुंडाळून ठेवले आपल्या अनुयायांत आणि कार्यकर्त्यांत-पुढाऱ्यांत बेलाशक सनातनी उच्चवर्णीय-उच्चवर्गीय वर्णाश्रमवाद्यांची त्यांनी खोगीर भरती सर्रास केली! परिणामी, २५ वर्षांनी परत प्रत्यक्ष राजकारणात आणि समाजकारणात उतरण्याची संधी जेव्हा सावरकरांना लाभली, तेव्हा 'स्वातंत्र्यवीर' सावरकर त्याचप्रमाणे 'समाजसुधारक' सावरकर हे केव्हाच संपुष्टात आलेले होते! उरले ते प्रतिगामी हिंदुराष्ट्रवादाचे प्रखर प्रणेते—हिंदुहृदयसम्राट सावरकर! म्हणजेच देशातील सर्व शोषित-दलित-श्रमिकांशी आणि

लोकशाहीवादी स्वातंत्र्यचळवळीशी वैर करणारे त्या कामी उच्चवर्णीय-उच्चवर्गीयांचा आश्रय शोधणारे सावरकर उरले! त्यांचा सगळा आवेश, लढाऊपणा–शस्त्रवाद मुसलमानांविरुद्ध–गांधी–नेहरू–समाजवादी शक्तींविरुद्ध आता शिल्लक राहिला! मदनलाल धिंग्रापासून तो नथूराम गोडसेपर्यंतचा हा सावरकरांचा परतीचा प्रतिगामी प्रवास आता चालू झाला होता!

स्वाभाविकपणेच, सावरकरांच्या अनुयायीवर्गाने अखेर कोणते सावरकर स्वीकारले? १८५७ च्या स्वातंत्र्य समराची; हिंदु-मुस्लीम ऐक्याची स्तोत्रे गाणारे १९१० पर्यंतचे सावरकर? की रत्नागिरीच्या स्थानबद्धतेतील समाजसुधारणांचे पुरस्कर्ते सावरकर?–छे छे. त्यांच्या अनुयायांनी या दोन्ही सावरकरांकडे साफ पाठ फिरवून, तिसरे हिंदु राष्ट्रवादी सावरकरच फक्त डोक्यावर घेतले!–आणि त्या प्रतिगामी सावरकरांना मूठभर उच्चवर्णीय-उच्चवर्गीय हिंदूंचे हृदयसम्राट बनविले!

सावरकरांची खरी शोकांतिका!

सावरकरांच्या अद्भुत जीवनाची खरी शोकांतिका ही आहे. १९०६–१० या काळातील सावरकरांच्या अनेक सहकाऱ्यांनी, क्रांतिकारक शस्त्रधारकांनी अनुभवाने व उघड्या डोळ्याने लवकरच सर्वंकष समाजवादी क्रांतीची नवी क्षितिजे पाहिली, स्वीकारली! रशियन राज्यक्रांतीने खुल्या केलेल्या जागतिक इतिहासातील नव्या खऱ्याखुऱ्या समाजवादी क्रांतीची क्षितिजे सावरकरांबरोबरीच्या शेकडो सशस्त्र क्रांतिकारकांनी पाहिली–त्या दिशेने त्यांनी वाटचाल सुरू केली. पण सावरकरांच्या बाबतीत तसे काही होऊ शकले नाही, ही त्यांची खरी शोकांतिका आहे.

सावरकरांनी प्रसंगवशात् रशियन राज्यक्रांतीबद्दल आणि साम्यवादी अर्थरचनेबद्दल क्वचित् काढलेले अनुकूल उद्गार त्यांच्या लिखाणांतून काढून दाखविता येतील. पण त्याचा एकूण भर आणि संदर्भ पाहिला तर तो, आक्रमक हिंदु राष्ट्रवादाचा आहे; समाजवादाचा नव्हे. ऐतिहासिक भौतिकतावाद, वर्गसंघर्ष, सर्वांगीण क्रांती, संपूर्ण सामाजिक परिवर्तन यांचा स्वीकार न करता केवळ समाजवादी अर्थरचना स्वीकारतो, असे विशिष्ट संदर्भात प्रसंगवशात् म्हणणे निरर्थकच ठरते! कम्युनिस्ट क्रांती झाली तर राष्ट्र बलवान होईल म्हणजेच बहुसंख्यांकाना पोषक असा धर्म बलवान होईल, असे काही तरी केव्हा तरी सावरकर म्हणाले होते. त्याचप्रमाणे हिंदु मंदिराबरोबरच मुस्लीम मशिदी आणि ख्रिस्ती चर्चेस यांचाही नाश होईल–आणि त्यामुळे परकीय (म्हणजे मुस्लीम आणि ख्रिस्ती) आक्रमणाच्या अत्याचाराचे डागही पुसले जातील, याचे म्हणे सावरकरांना समाधान वाटणार होते! खरी गोष्ट अशी आहे की कम्युनिस्ट क्रांती झाली तर हिंदु मंदिरेही नष्ट होणार नाहीत; आणि बौद्ध, मुस्लीम, ख्रिस्ती मंदिरेही नष्ट होणार नाहीत. ती ओस पडतील! ऐतिहासिक–सांस्कृतिक कलात्मक स्मारके म्हणून त्यांचे तत्परतेने संरक्षण

आणि जतन करण्यात येईल. अर्थात् धर्म ही वैयक्तिक बाब म्हणून राहील; कायदा, राजकारण, समाजकारण, शिक्षण वगैरे सर्व क्षेत्रांतील (कोणत्याही) धर्माचा सध्या सतत चालणारा हस्तक्षेप मात्र कटाक्षाने बंद करण्यात येईल. हे सर्व भवितव्य सावरकरांना कदापी मान्य होण्याजोगे नव्हते, हे सावरकरांच्या काही उद्‌गारांचा आधार शोधणाऱ्या तथाकथित हिंदु साम्यवाद्यांनी वेळीच ध्यानात घ्यावे हे बरे!

तरुण क्रांतिकारक सावरकरांना जे दिसले नाही ते समाजवादाचे, रशियन राज्यक्रांतीने खुल्या केलेल्या भव्य क्षितीजांचे दर्शन त्यांच्या आधीच्या पिढीतील लोकमान्य टिळकांनासुद्धा झाले होते, हे एक विशेष करून नमूद करण्यासाठी गोष्ट आहे. आगरकर हयात असते तर त्यांनाही ते दर्शन नक्कीच झालेच असते! महात्मा फुल्यांच्या खऱ्या प्रेरणांच्या व शिकवणीच्या वारसदारांची परिणती अखेर शास्त्रीय समाजवादामध्येच होणे स्वाभाविक आणि अपरिहार्य होते. आंबेडकरांनीही समाजवादाचाच उद्‌घोष केला; आणि सामाजिक समतेच्या शोधात अखेर चातुर्वर्ण्यवादी हिंदु परंपरेच्या विरुद्ध यशस्वी बंड करणाऱ्या सावरकर-तिरस्कृत गौतम बुद्धाच्याच परंपरेचा आंबेडकरांनी पुनरुद्धार केला; सावरकरांच्या हिंदु राष्ट्रवादाचा नव्हे! तेव्हा रत्नागिरी कालखंडातील काही लिखाणाचा आधार घेऊन फुले आगरकर-आंबेडकर यांच्या परंपरेत पंक्तीत सावरकरांना बसविण्याचा;—त्या महान् समाजसुधारकांशी, सामाजिक क्रांतिकारकांशी त्याचे नाते जोडण्याचा नसता प्रयत्न आज हिंदु राष्ट्रवाद्यांनी करू नये हेच बरे! आजचे हिंदु पुनरुत्थानवादी केव्हाही खऱ्या अर्थाने समतावादी—सामाजिक न्यायवादी—मानवतावादी होऊच शकणार नाहीत. हा मूलभूत प्रेरणेचा—धारणेचा प्रश्न आहे. या हिंदुत्ववाद्यांच्या मूळ प्रेरणा—धारणा याच मूळात संपूर्णपणे वेगळ्या आहेत!

● 'हिंदुराष्ट्रवादी' फुले,—'हिन्दुराष्ट्रवादी' आगरकर, 'हिंदुराष्ट्रवादी' आंबेडकर? —अशी आपण कल्पना तरी करू शकतो काय? नाही—त्रिवार नाही—कधीही नाही.

● उलट हिंदु-पुनरुत्थानाशिवाय सावरकरांची कल्पना तरी आपण-किंवा सावरकरांचे अनुयायी तरी करू शकतात काय? नाही, तेही मुळीच शक्य नाही, कालत्रयी नाही!

● तेव्हा सावरकरांच्या सुधारणावादाची जात वेगळी, कुळी वेगळी! आणि फुले-आगरकर-आंबेडकर यांची वेगळी! त्यांच्यामध्ये नसते नाते जोडण्याचे प्रयत्न कोणीही करू नयेत! तसा प्रयत्न अनैतिहासिक, अप्रस्तुत, अनुचित ठरेल. सावरकरांचा मर्यादित सुधारणावाद रत्नागिरीच्या स्थानबद्धतेत सुरू झाला आणि तेथेच तो विराम पावला! मदनलाल धिंग्रापासून नथुराम गोडसेपर्यंत सावरकरांच्या शिकवणीचा जो परतीचा प्रतिगामी प्रवास झाला, त्यांमध्ये रत्नागिरीमधील मर्यादित सुधारकी कार्य, हा एक चमकता अपवाद फार तर समजावा! त्यापलिकडे जाऊन

सावरकरांची सोयरिक फुले-आगरकर-आंबेडकर यांच्याची जोडण्याचा प्रयत्न जर कोणी फुले शताब्दीच्या निमित्ताने केला, तर तो फुल्यांच्या स्मृतीचा व प्रेरणेचा आणि औचित्त्याचाही उपमर्द ठरेल !



(२)

गोळवलकरगुरुजींचा चातुर्वर्ण्यवाद !

सावरकरांप्रमाणेच गोळवलकर आणि त्यांचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि जनसंघ हेही सध्याच्या सामाजिक समतेच्या (फुले-आंबेडकरांच्या) जमान्यात स्वतःला सुधारक म्हणवून खपून जाण्याचा-खपविण्याचा प्रयत्न करीत आहेत !

सावरकरांच्या लिखाणात, काही प्रमाणात तरी समाजसुधारणेचा, हिरीरीचा पुरस्कार आढळतो. पण संघ-जनसंघाच्या एकूण विचारांत-उच्चारात-आचारांत तोही सापडणे मुष्कीलच !

राजकीय गरजेपोटी सुधारकाचा आव !

पण संघ-जनसंघ सुधारक म्हणून खपून जाण्याचा जो प्रयत्न करतो त्याचे कारण हेडगेवार-गोळवलकर यांच्या लिखाण-भाषणात व्यक्त होणारी भूमिका हे मुळीच नाही. तर संघ-जनसंघाचा देशभर विशेषतः उत्तरेकडील हिंदी–भाषिक प्रदेशांत असलेला राजकीय दबदबा हे होय. रा. स्व. संघ आणि जनसंघ या भारतव्यापी संघटना आहेत; त्यांचे जाळे जितके व्यापक तितकेच मजबूत आणि लवचिक आहे. त्याहूनही महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांचे आद्य आणि ज्येष्ठ आणि श्रेष्ठ पुढारीपण संपूर्णतः ब्राह्मण– (आणि तेही अभिजात चातुर्वर्ण्य संस्कारित ब्राह्मण) असले, तरी अनुयायीवर्गात उत्तरेकडे तरी बिगर-ब्राह्मण (म्हणजे क्षत्रीय-वैश्य) बरेच आहेत. जिल्हा व तालुका पातळीवरील आश्रयदाते तर बरेच बिगर-ब्राह्मण आहेत. उत्तरेकडील यशाच्या भांडवलावर संघ व जनसंघ महाराष्ट्रातही शहरी, त्याचप्रमाणे ग्रामीण विभागांतही हातपाय पसरण्याचा पद्धतशीर प्रयत्न करीत आहे. पैसे व साधनसामुग्री पुरविणारा धनिक व्यापारीवर्ग पाठीशी आहेच ! जिल्हा, तालुका पातळीपर्यंत निष्ठावंत कार्यकर्तेही भरपूर आहेत. पण अडचण ही की, त्यापैकी बहुतेक विशेषतः पूर्णवेळ देणारे कार्यकर्ते ब्राह्मण पांढरपेशे आहेत ! पण राजकीय-सामाजिक पक्ष व संघटना म्हणून जनतेकडे जाणे, जनतेमधील कार्यकर्त्यांना आकर्षित करणे; ही संघ-जनसंघाची राजकीय आणि व्यावहारिक गरज आहे. शिवाय या जनतेचे आणि

कार्यकर्त्यांचे दडपणही खालून सतत येत राहणे केवळ अपरिहार्य आहे. संघ-जनसंघाचे संस्कारित ब्राह्मण पुढारीपण आणि कनिष्ठ कार्यकर्ती जनता यांमधील अंतर्विरोध ही एक व्यावहारिक वस्तुस्थिती आहे.

जनसंघाला हवी असलेली जनता व जनतेमधील कार्यकर्ते यांच्या अपेक्षा पूर्ण करावयाच्या तर वर्गीय त्याचप्रमाणे सामाजिक बाबतीत काही लढाऊ, पुरोगामी–समतावादी भूमिका घेणे त्याला भागच आहे. आणि जरी आपल्या उच्चवर्णीय–उच्चवर्गीय आश्रयदात्यांच्या आणि ब्राह्मण पुढाऱ्यांच्या धारणेशी आणि हितसंबंधाशी विसंवाद आला तरी ती भूमिका कशीवशी टिकविण्याची संधिसाधू धडपड जनसंघाला करावीच लागते !

गुरुजी, गप्प बसायचे काय घ्याल ?

पण खरी गोष्ट अशी आहे की, श्रमिक जनतेच्या वर्गीय प्रश्नांबाबत ज्याप्रमाणे जनसंघ प्रामाणिकपणे श्रमिक जनतेची बाजू निखालसपणे घेऊच शकत नाही, शकणार नाही; त्याचप्रमाणे सामाजिक समतेची खरी प्रेरणा-धारणाही जनसंघाला मानवणे-पेलवणे केवळ अशक्यच आहे. असे कसेतरी खपून जाण्याचे–खपवून घेण्याचे प्रयत्न संघ-जनसंघवाले सतत करतात; पण मध्येच गोळवलकरगुरुजी अभावितपणे काही तरी असे बोलून जात की, त्यातून संघ-जनसंघाची खरीखुरी आंतरिक प्रेरणा-धारणा-भूमिका आरशासारखी स्पष्ट होऊन जाई !

गोळवलकरांनी मृत्यूपूर्वीच काही महिने ही भूमिका पुन्हा एकदा स्पष्ट केल्यामुळे तीच त्यांची अखेरची–परिणतप्रज्ञेची भूमिका आहे असे समजण्यात प्रत्यवाय नाही.

इतर बारिक-सारीक श्लेष आणि बारकावे सोडले तरी गोळवलकरगुरुजींची भूमिका इतकी स्पष्ट व आखीव-रेखीव आहे की, संशयाचा फायदासुद्धा आरोपीला मिळू नये !

खरी गोष्ट अशी आहे की, खुद्द गोळवलकरगुरुजी हे स्वतः (त्यांचे संस्कार, त्यांचे एकमेव पुढारीपण, त्यांची प्रतिष्ठा यासह) खुद्द श्रीशंकराचार्यांशीच गुंतलेले होते; समरस एकरूप झालेले होते. आणि तेही केवळ या अगर त्या विषयांबाबत किंवा तपशीलाबाबत नव्हे तर मूलभूत प्रेरणा-धारणांबाबतच ! वर्णाश्रमधर्म हीच गुरुजींची आणि शंकराचार्यांची समान भूमिका आहे. ती भूमिका थोडक्यात अशी :–वर्णाश्रमव्यवस्था ही सहकारी पद्धती आहे : जन्माने प्राप्त होणाऱ्या चातुर्वर्ण्यात गैर काही नाही.–समाजाच्या स्थैर्यासाठी आणि उत्कर्षासाठी ही व्यवस्था आहे. कर्मफलाची आशा न करिता कर्म करावे म्हणजे कर्म बदलण्याचे कारणच राहात नाही ! चार वर्ण पशूंमध्ये आणि दगडातसुद्धा आहेत. (निसर्गाचा तो धर्मच आहे.)

गुणकर्म विभागशः चातुर्वर्ण्य मी स्वतः निर्माण केले आहे, हे खुद्द भगवंताचे वचन आहे. श्रुती ईश्वर निर्मित–धर्म ईश्वरनिर्मित आहे. गुण म्हणजे सत्त्वारज-तम आणि कर्म म्हणजे पूर्व जन्मात केलेले कर्म; पूर्वजन्म आणि पूर्वकर्मानुसार पुर्नजन्म हा हिंदुधर्माचा पायाभूत सिद्धांत आहे, इत्यादी, इत्यादी गोळवलकरी वचने पुन्हा एकदा नीट वाचली की, खरे म्हणजे हा सुधारणेचा प्रश्न त्यांच्यापुरता आणि संघ–जनसंघापुरता तरी कायमचा निकालात निघावयाला हवा !

श्रीशंकराचार्य : शास्त्रार्थाचे एकमेव अधिकारी !

या मूलभूत भूमिकेबाबत गुरुजींना केव्हाही खेद खंत नव्हती. अगदी खुलासा करायला गेले तरी ते त्याच भूमिकेचा पुनरुच्चार करीत, क्वचित वेगळ्या शब्दांत; पण बहुधा त्याच त्याच शब्दात ! कारण, हा शास्त्राचा प्रश्न आहे–ईश्वरी व्यवस्थेचा प्रश्न आहे;–तेथे खुलासा कसला करणार अन् कोण करणार ?

आणि खुलासा करणारे–शास्त्रार्थ सांगणारे–धर्मनिर्णय देणारे–आज्ञापत्रे काढणारे–गुरुजींच्या दृष्टीने एकच; ते म्हणजे श्रीशंकराचार्य ! गुरुजींनी तर शंकराचार्यांबद्दलही तितकीच निष्ठा व्यक्त केलेली आहे !! १२०० वर्षे शंकराचार्यांची धर्मपीठे ठीक चालली आहेत; त्यांनी धर्मच नव्हे तर समाजधारणा टिकवून धरली आहे. त्याबद्दल साऱ्या समाजाने कृतज्ञ असले पाहिजे, असाच गुरुजींचा निर्वाळा आहे. काही बारीकसारीक सवलती बघावयाच्या असतील तर ते खुद्द श्रीशंकराचार्यच बघतील; ते अधिकार सर्वस्वी श्रीशंकराचार्यांचेच आहेत; त्यामध्ये दुसऱ्या कोणी अनधिकाराने लुडबूड करू नये, अशी गुरुजींची तंबी आहे !

तेव्हा संघ–जनसंघी कार्यकर्त्यांनी–आणि त्यांच्या अनुयायीवर्गाने एकदाच काय ते नीट समजून घ्यावे. ते हे की, धर्मात–रूढीत–आचारात काही किरकोळ सोय-सवलत हवी असल्यास, त्याबाबत श्रीशंकराचार्यांकडे अर्ज करावा. पण श्रींनी दिलेला निर्णय अखेरचा व बंधनकारक मानला पाहिजे; कारण दुसऱ्या कोणाला तो मुळी अधिकारच नाही !

गुरुजी जे नम्रतेने सांगतात ते समाजाला नव्हे; उच्चवर्णीयांनासुद्धा नव्हे ! त्यांचे सार सांगणे आहे, ते केवळ श्रीशंकराचार्यांच्याच चरणी ! श्रींना श्री. गुरुजी थोडा फार गुरुउपदेश करू इच्छितात ! तोही एवढाच की, श्रींनी आधुनिक काळाकडे बघून, त्या परिभाषेत हिंदुधर्माची सनातन चातुर्वर्ण्याधिष्ठित तत्त्वे मांडावीत; आधुनिक विज्ञानाच्या साहाय्याने सनातन धर्माचे समर्थन करावे; सामान्य जनतेला पटवून द्यावे. जन्मजात चातुर्वर्ण्य, पूर्वजन्मानुसार कर्म, विषमतेची स्वाभाविकता, दलित–पतित आणि–स्त्री–शूद्र अतिशुद्रांनी निष्काम फलाशारहित नियत–कर्म करीत राहण्याची आवश्यकता आणि त्यातच त्यांच्या जन्माची

कृतार्थता इत्यादी गोष्टी म्हणे श्रीशंकराचार्यांनी विज्ञानाच्या साहाय्याने आधुनिक परिभाषेत जनतेला पटवून द्याव्या, एवढीच फक्त गुरुजींची अपेक्षा ! तेव्हा संघ–जनसंघवाल्यांनी फुले–आंबेडकर (फार काय सावरकरांचेही !) नाव घेण्यापूर्वी आणि सत्यशोधक समाजाच्या शताब्दी महोत्सवात भाग घेण्यापूर्वी गुरुजींच्या या धारणेचे नीट स्मरण करावे हेच बरे !

—म्हणे श्रीशंकराचार्यांमार्फतच अस्पृश्यता–निवारण !

—म्हणूनच गुरूजींचा अस्पृश्यता निवारणाचा मार्गही केवळ श्रीशंकराचार्यांमार्फतच काय तो आहे ! म्हणे श्रींनी असा काही तरी एक धार्मिक विधी शोधून काढावा की, जेणे करून अस्पृश्यांचे पातितत्व, हीनत्व, हळुहळू नाहीसे होईल ? आणि असे होऊ शकते हे श्रींनी आपल्या अनुयानांना म्हणजे उच्चवर्णीयांना म्हणे पटवून द्यावे ! फुले–आंबेडकरांनी केलेल्या महान् क्रांतीनंतरही, गुरुजी श्रीशंकराचार्यांच्या चरणी अजून अस्पृश्यांचे गाऱ्हाणे घालीतच आहेत ! आणि काय करावे ? श्रींना योग्य तो शास्त्रार्थ अजूनही सापडतच नाही !

याच न्यायाने गुरुजी 'मुस्लीम पर्सनल लॉ 'चेही खुशाल समर्थन करीत आहेत ! मुसलमानांना सुधारणा हव्या असतील तर म्हणे मुल्ला-मौलवींची खात्री पटवा; म्हणे त्यांना एकादा कुराण प्रणीत शास्त्राधार शोधायला सांगा. म्हणजे इकडे हिन्दुमध्ये श्रीशंकराचार्य आणि तिकडे इस्लाममध्ये मुल्ला–मौलवी यांच्या हाती म्हणे सामाजिक सुधारणेचा, समतेचा–प्रश्न सोपवा ! आणि ते म्हणे न्याय देणार ! आणि या गुरुजींचे अनुयायी संघ–जनसंघवाले फुले-आंबेडकरांची व सत्यशोधकसमाजाची स्मृती साजरी करायला इकडे तयारच !

गोळवलकरगुरुजींनी इतकी स्पष्ट भूमिका पुन्हा पुन्हा घेतली आणि जे जे 'खुलासे' म्हणून केले, त्यामुळे त्यांच्या मूळ चातुर्वर्ण्यवादी धारणेचा आणि धोरणाचा खुंटा हलवून बळकटच झाला !

गुरुजींच्या मृत्यूपर्यंत या धारणेत कोणताही बदल झालेला नाही. त्यांच्या मृत्यूनंतर देवरसगुरुजी सरसंघचालक झाले. आणि त्यांनी आता नव्याने गुरुजीच्या धारणेचा खुलासा करण्याचा प्रयत्न चालविला आहे. म्हणे गुरुजीकृत चातुर्वर्ण्य–प्रशस्ती आणि विषमतेचे व जातीप्रथेचे समर्थन, हे प्राचीन इतिहासावरील त्यांचे भाष्य होते; त्याचा चालू प्रश्नाशी संबंध नव्हता ! ठीक आहे. देवरसगुरुजींना नव्याने काही भूमिका घ्यावयाची असेल, तर त्यांनी जरूर घ्यावी; पण ती प्रामाणिकपणाने घ्यावी. प्रामाणिकपणाने त्यांना नवीन भूमिका खरोखरच घ्यावयाची असेल, तर मात्र त्यांना गुरुजींच्या वारंवार घोषित केलेल्या भूमिकेशी प्रथम संपूर्णपणे फारकत घ्यावी लागेल ! त्याचप्रमाणे धर्मगुरू म्हणजे श्रीशंकराचार्य–त्याचप्रमाणे विश्व हिंदु धर्म-संमेलनाच्या निमित्ताने गोळा केलेले पुरातन संत-महंत यांचा अस्पृश्यता व जातिप्रथा

निर्मूलनाच्या कामी काही उपयोग होऊ शकेल, ही गुरुजींची लाडकी कल्पना देवरसगुरुजींना एकदा कायमचीच सोडून द्यावी लागेल! नाहीतर गोळवलकर-गुरुजींचाही संपूर्ण वारसा सांगावयाचा; श्रीशंकराचार्य आणि इतर सनातनी संत-महंतांचाही आशीर्वाद मागावयाचा; आणि वर अस्पृश्यता निर्मूलनाच्या गोष्टीही करावयाच्या, हा प्रामाणिकपणा नव्हे; किंवा त्यामुळे दलित जनता फसू शकेल, असेही नाही! फार काय, आजच्या तरुण संघवाल्यांनासुद्धा हे सारे पटविणे, देवरस-गुरुजी समजतात तेवढे सोपे नाही, हा अनुभव त्यांना येईलच! चातुर्वर्ण्य, विषम जातिप्रथा आणि तिच्या समर्थकांची गोळवलकरी परंपरा यांच्याशी समूळ आणि संपूर्ण फारकत घेतल्यानंतरच अस्पृश्यता आणि जातिप्रथा निर्मूलनाची भाषा बोलण्याचा प्रश्न उपस्थित होतो!

गुरुजींनी स्वतः वैयक्तिक पुढाकार घेऊन दोन-दोनदा केलेले एकमेव राष्ट्रव्यापी (अभियान) आंदोलन म्हणजे गोरक्षा आंदोलन होय, हीही अत्यंत लक्षणीय गोष्ट आहे. आणि या आंदोलनांत गुरुजींबरोबरच एक श्रीशंकराचार्यही स्वतः सामील होते, हीही तितकीच उल्लेखनीय गोष्ट आहे! गुरुजींच्या कार्यक्रमांत अग्रक्रम कशाला होता, आणि सामान्य जनतेच्या आंदोलनाला त्यांत कितवे किंवा कितपत स्थान होते (की अजिबात नव्हतेच!) हा सत्य संशोधनाचाच विषय होऊ शकेल!

गुरुजींनी गोरक्षा–आंदोलन अखिल भारतीय पातळीवर दोन-दोनदा केले; त्यासाठी संघाची सर्व शक्ती-प्रतिष्ठा पणाला लावली. पण सामान्य श्रमिक जनतेच्या हिताचे दुसरे कोणतेही आंदोलन त्यांना सुचूं शकले नाही, ही वस्तुस्थिती आहे! या ठिकाणी गुरुजी व सावरकर यामधील फरक मात्र ध्यानात येतो. गुरुजींना गोरक्षणाचे महत्त्व पहिल्या क्रमांकाचे वाटते; गाय ही माय म्हणूनच नव्हे तर हिंदु-राष्ट्राचा मानबिंदू म्हणून! उलट, बैल ज्याचा बाप असेल त्याने गाईला माय मानावे, असे फटकन बोलणारे सावरकर! हा फरक जरूर मानला पाहिजे. पण हिंदुत्वनिष्ठ जनतेने सावरकरांच्या सुधारणावादाला दूर सारून त्यांचा हिन्दुत्ववाद मात्र तेवढा उचलला; आणि त्या हिन्दु आंदोलनाचे नेतृत्व मात्र श्री. गोळवलकरगुरुजी आणि त्यांच्या संघ-जनसंघाकडे दिले!

हिंदुधर्म तरी भारतीय कुठे?

चातुर्वर्ण्याधिष्ठित हिंदुधर्म आणि हिंदुराष्ट्रवाद या दोन्हींचे गुरुजी प्रणेते व पुरस्कर्ते आहेत. त्यांच्या निष्ठावंत अनुयायांच्या दृष्टीने तर गुरुजी आधुनिक भारताचे–हिंदु राष्ट्राचे निर्माते व शिल्पकार आहेत.

पण याही बाबतीत जराशी गडबड आहे! हिंदुधर्माला गुरुजी भारताचा राष्ट्रधर्म म्हणतात. म्हणजेच हिंदुधर्म आणि भारतीय हिंदुराष्ट्र यांना ते समानार्थी मानतात. पण हिंदुधर्म हा विश्वधर्मही आहे, असाही त्यांचा दावा आहेच. 'कृण्वंतु

विश्वमार्यम्' ही तर त्यांची विजयी घोषणाच आहे ! त्यांतही आणखी गंमत म्हणजे हिंदुधर्म हा एकटाच भारतीय धर्म आहे आणि बाकी इतर धर्म हे परकीय–भारतबाह्य आहेत. त्यांचे अनुयायी अर्थातच भारतबाह्य निष्ठेचे आहेत. शिवाय ते यहुदी, ख्रिस्ती-महंमदी हे सर्व धर्म सेमेटिक म्हणजे अनार्य वंशाचे आहेत ! म्हणूनही ते केवळ कम-अस्सलच नव्हेत; तर हीन आणि पतित आहेत म्हणजेच अधर्म आहेत ! तात्पर्य, गुरुजी एकट्या हिंदुधर्मामध्ये ईश्वरनिर्मितत्त्व, आर्यवंशीयत्त्व आणि भारतीय राष्ट्रीयत्त्व आणि विजीगीषु एकमेव विश्वधर्मत्त्व एवढ्या गोष्टी एकत्र कोंबीत आहेत ! खरे म्हणजे यापैकी प्रत्येक गोष्ट अनैतिहासिक, असत्य आणि परस्परविरोधी आहे. हिंदुधर्म ईश्वरनिर्मित आणि म्हणूनच अपरिवर्तनीय म्हटल्यावर सुधारणेचा प्रश्नच उत्पन्न होत नाही हे तर झालेच; पण यहुदी, ख्रिस्ती, महंमदी धर्म हेही ईश्वरनिर्मितच. कारण त्यांचीही प्रेरणा व निर्मिती ही ईश्वरी प्रेषितांमार्फतच म्हणजे (अनुक्रमे सोलोमन, येशू आणि महंमद यांच्यामार्फत) झालेली आहे. फरक एवढाच की, ईश्वरी निर्मितीचा असा एकमेव साक्षात्कारी साक्षीदार प्रेषित हिंदुधर्मात नाही !

दुसरी गोष्ट आर्यत्वाची. यहुदी, ख्रिस्ती-इस्लामी धर्मसंस्थापक हे सेमेटिक म्हणजे अनार्य होते हे खरेच आहे. हिंदु म्हणजे वैदिक, हे स्वतःला आर्य म्हणवीत हेही खरेच आहे. पण त्यामुळे त्यांचे श्रेष्ठत्व, त्यांचे अनादित्व कसे काय सिद्ध होणार ? ऐतिहासिक दृष्ट्या पाहिले तर आर्य आणि अनार्य दोन्हीही प्राचीनच. त्यात पहिले, नंतरचे, श्रेष्ठ कनिष्ठ हा क्रम इतिहासाला तरी मंजुर नाही. अर्थात ईश्वराला हे सर्व माहीत असेलच ! पण यहुदी, ख्रिस्ती, महंमदी यांना प्रतीत झालेल्या वेगवेगळ्या ईश्वरांचे याबाबत मतभेद दिसतात !

बौद्धधर्म : एकमेव भारतीय धर्म !

गुरुजींच्या मूलभूत धारणेमधील आणखी एक अंतर्विरोध म्हणजे हिंदुधर्म हाच एकमेव भारतीय धर्म होय. पुन्हा इतिहासाच्या दृष्टीने पाहिले तर खरे म्हणजे आर्य हे भारताबाहेरूनच आलेले; भारतबाह्य–भारतीयेतरच ! त्यांनी आणलेली अपौरुषेय प्रेरणा, स्फूर्ती व स्मृती मूलतः आणि मुख्यतः, अंशतः तरी भारताबाहेरचीच; अगदी उत्तर ध्रुवापासून ते व्होल्गा ते गंगेपर्यंत प्रवास-प्रवाह-पतित अशी ! तेव्हा ऐतिहासिक दृष्टीनेच बोलावयाचे तर, आर्य वैदिक धर्म हा यहुदी–ख्रिस्ती महंमदी धर्माप्रमाणेच अभारतीय आहे; संपूर्ण भारतीय तर नाहीच नाही ! हिंदुधर्म कदाचित् आर्य असलाच तरी भारतीय तर नक्कीच नाही ! विजीगीषु जेत्या आर्यांनी भारतामधील अनार्यांवर लादलेला–शस्त्रबळाने आणि प्रचारबळाने लादलेला हा धर्म आहे !

तो अगदी शंभर टक्के भारतीय बनावटीचा नाही. जन्म-जडण-घडण या दृष्टीने एकमेव व संपूर्ण भारतीय धर्म म्हणजे फक्त बौद्धधर्मच आहे आणि त्या एकमेव

भारतीय धर्माचे उच्चाटन करून परत भारतबाह्य आर्य–वैदिक धर्माची पुनःस्थापना करण्याचे धर्मकार्य करण्याचा दावा सांगूनच श्रीशंकराचार्यांचा आजचा हिंदुधर्म प्रस्थापित झालेला आहे ! आणि त्या शंकराचार्यप्रणीत धर्माचे आजचे प्रचारक व समर्थक श्री. गोळवलकरगुरुजी आहेत.

राष्ट्रीय धर्म-म्हणजे वदतो व्याघात !

हिंदुधर्म हा भारताचा राष्ट्रधर्म आहे हे विधान खरे नाही; कारण तो बाहेरून आला, भारतामध्ये विजयी झाला आणि भारतमार्गे पूर्वेकडे व आग्नेयेकडे भारताबाहेर पसरला ही वस्तुस्थिती आहे. या अर्थाने तो विश्वधर्म असेल, विश्वाला जिंकून आर्य करणारा तो विजिगिषु धर्मही कदाचित असेल; पण तो भारताचा एकमेव राष्ट्रीय धर्म मात्र होऊ शकत नाही. तो मान जन्म-घडण-जडणीच्या दृष्टीने केवळ बौद्धधर्मालाच मिळू शकेल ! पण बौद्धधर्म भारतात निर्माण होऊन अक्षरशः चारी दिशांना झपाट्याने पसरला आणि अवघा आशिया खंड तरी त्याने व्यापून टाकला ! नंतर बौद्धांचा खुद्द भारतामध्येच पराभव झाला, तरी तो इतरत्र मात्र टिकून राहिलाच; अगदी आजतागायत; आणि आंबेडकरांनी आता तर त्याचे या भारतभूमीवरच पुनरुत्थान केले आहे ! आणि इतिहासाच्या दृष्टीने पाहिले तर तो निदान हिंदुधर्माइतका तरी खराच आहे !

तेव्हा गोळवलकरांचा दावा व्यर्थ आहे आणि ज्या न्यायाने वैदिकधर्म हा भारताचा राष्ट्रधर्म होऊ शकतो, अगदी तोच न्याय इस्लामही सांगू पाहात आहे ! ज्या मार्गाने व ज्या पद्धतीने आर्य व त्यांचा धर्म भारतात आला, वाढला, पसरला, त्याच अगदी त्याच मार्गाने–क्रमाने–पद्धतीने इस्लामही पसरला, असाच त्याचा दावा आहे.

प्रत्येक धर्म विश्वधर्मच !

खरी गोष्ट अशी आहे की, प्रत्येक धर्म हा विश्वधर्मच असतो; आणि कोणताही धर्म केवळ राष्ट्रीय धर्म होऊच शकत नाही ! प्रत्येक धर्माला स्थळ–काळ–परिस्थितीला अनुरूप असे देशीय किंवा प्रादेशीय स्वरूप येऊ शकते व येते. आणि जी गोष्ट धर्माची; तीच विचारप्रणालीची सुद्धा. पूर्वी प्रत्येक विचार (अध्यात्मिक, भौतिक, शास्त्रीय, तांत्रिक, व्यावहारिक प्रत्येक विचार) धर्माच्या स्वरूपातच येत होता; बहुधा ईश्वरी निर्मितीचे किंवा प्रेरणेचे नाव सांगूनच येत होता !

आधुनिक काळातील विचार ईश्वराच्या मध्यस्थीने किंवा माध्यमाने येत नाहीत; ते विचार–त्यांतील प्रत्येक विचार मानवी माध्यमाने येतात. पण तेही विश्वविचारच असतात. त्यामध्ये राष्ट्रीय प्रादेशिक काही नसते. त्यांचे सत्यत्त्व (खरेखोटेपणा) हे शेवटी प्रत्यक्ष अनुभवाने, व्यवहाराने-प्रयोगानेच सिद्ध होत असते. पण गुरुजींना हा साधा विवेक मान्य नाही.

राष्ट्र हा अगदी आधुनिक विचार आहे; गेल्या चार-दोन शतकांमध्येच भांडवली अर्थव्यवस्थेच्या उदयाबरोबरच राष्ट्र या कल्पनेचा व राष्ट्रीयत्वाचा उदय झालेला आहे. भारतामध्ये तर भारतीय राष्ट्रीयत्त्वाचा उदय, जडण, घडण आपल्या डोळ्यासमोर गेली शे-दिडशे वर्षे प्रत्यक्ष घडतच आहे. पण हे सर्व बघायला साधी स्वच्छ पूर्वग्रहरहित आधुनिक शास्त्रीय दृष्टी हवी. पण गुरुजींच्या ठिकाणी तीच नव्हती आणि तशी दृष्टी भारतीय जनतेला येऊ नये म्हणून तर गुरुजींच्या संघाला-जनसंघाला जन्माला घातले !

हे निवेदन बरेच लांबले आणि इतिहासात व भूगोलातही बरेच दूरवर फिरले. पण चातुर्वर्ण्याधिष्ठित अपरिवर्तनीय हिंदुधर्म आणि भारतीय राष्ट्र यांची जाणूनबुजून गल्लत करणे, हा गुरुजी व त्यांचा संघ-जनसंघ यांची मूलभूत भूमिका असल्यानेच हा उहापोह येथे केला. त्यातून एक गोष्ट मात्र स्पष्ट होईल; ती ही की, फुले-आंबेडकर यांच्या सामाजिक समतेच्या लढ्यांमधील प्रेरणा-धारणांचा आणि गुरुजींचा व संघ-जनसंघाचा काडीमात्र दूरान्वयानेही संबंध नाही ! किंबहुना फुले-आंबेडकर यांना अभिप्रेत असलेला समताधिष्ठित समाज, गुरुजींच्या व संघ-जनसंघाच्या जन्मजात चातुर्वर्ण्याचा संपूर्ण आणि समूळ पाडाव करूनच निर्माण होऊ शकेल, ही खरी वस्तुस्थिती आहे. तेव्हा पूर्वी गोळवलकरगुरुजींचे–आता त्यांच्यानंतर देवरसगुरुजींचे एकमेव पुढारीपण (एकचालकत्व) जन्मभर मान्य करावयाचे आणि पुन्हा वर फुले-आंबेडकरांचेही नाव वापरण्याचा प्रयत्न करावयाचा, यात राजकीय–डावपेच असेल; पण प्रामाणिकपणा मात्र मुळीच नाही !

● तात्पर्य, सावरकर मर्यादित अर्थाने तरी सुधारक होते; पण गोळवलकर-गुरुजी तेही नव्हते. त्यांची श्रद्धा–प्रेरणा–धारणा, प्रत्यक्ष भगवंताने निर्मिलेल्या जन्म-जात चातुर्वर्ण्याचीच होती !

● जेवढा पचेल तेवढा चातुर्वर्ण्यवाद संघ-जनसंघावर व त्यांच्यामार्फत भारतीय जनतेवर लादण्याचाच गुरुजींनी सतत प्रयत्न केला.

● पीठाधिष्ठित श्रीशंकराचार्यांना जेवढी मान्य होईल तेवढीच आणि त्यांच्या पदस्पर्शाने पुनीत झाली तर आणि तेवढीच सुधारणा गुरुजींना मान्य होती !

● गोळवलकरगुरुजींच्या या चातुर्वर्ण्यवादाचा संपूर्ण आणि समूळ पराभव करूनच, म. फुल्यांचा समतावाद अखेर विजयी होणार आहे, ही गोष्ट सर्वांनीच नीट समजून घेतली पाहिजे.

प्रकरण ९ वे

मुस्लीम सत्यशोधक चळवळ

म. फुल्यांच्या सत्यशोधक समाजाचे नाव आणि परंपरा यांचा आधार घेऊन महाराष्ट्रात एक नवे आंदोलन आणि तिचे नेतृत्व करणारी एक नवी संस्था अलिकडेच स्थापन झाली आहे. कदाचित सत्यशोधक समाजानंतर आणि चळवळीनंतर 'सत्यशोधक' असे उघड नाव घेऊन वावरू लागलेली ही पहिलीच चळवळ असेल! ती म्हणजे मुस्लीम सत्यशोधक चळवळ!

उंचावलेली अपेक्षा

'म. फुल्यांच्या सत्यशोधक समाजाच्या' शताब्दीच्या ऐन मोक्यावरच आणि फुल्यांचे व सत्यशोधकांचे नाव घेऊनच ही चळवळ व संस्था सुरू करण्यात आली. अर्थात यात गैर काहीच नाही; खरे म्हणजे ही एक अत्यंत उपयुक्त आणि स्फूर्तीदायक चळवळ ठरावी, अशी अपेक्षा त्यामुळे उत्पन्न झाली. सनातनी रुढीग्रस्त मुस्लीम समाजामध्ये म्हणजेच (फुल्यांच्या कल्पनेप्रमाणे) स्त्री-पुरुष, शूद्र-अतिशूद्रांमध्ये ही चळवळ फुल्यांची प्रेरणा-धारणा आणि पोटतिडीक घेऊन जात असली, तर ते फुल्यांचे, महाराष्ट्राचे आणि मुस्लीम समाजाचे महद्भाग्यच ठरणार होते.

स्वाभाविकपणेच या चळवळीचे, तिच्या प्रवर्तकांच्या योजकतेचे आणि एक प्रकारच्या धाडसाचे प्रारंभी अमाप कौतुकच झाले आणि त्यामुळे त्यांच्या कार्याबाबतच्या अपेक्षाही सहजच एकदम बऱ्याच उंचावल्या.

हिंदु सनातन्यांविरुद्ध जसा झाला तसा आता मुस्लीम सनातन्यांविरुद्ध मुस्लीम बहुजनसमाजाचा—स्त्रिया आणि श्रमिक दलितांचा उठाव होणार, अशी अपेक्षा

उत्पन्न झाली. अशा प्रारंभीच्या पायाभरणीच्या चळवळीच्या व तिच्या प्रवर्तकांच्या नशिबी जी उपेक्षा येते, तीही सुदैवाने मुस्लीम सत्यशोधकांच्या वाट्याला आली नाही. उलट, साखळी वृत्तपत्रांतील अमाप दैनंदिन प्रसिद्धीच्या झगझगाटात ही चळवळ सुरू झाली; आणि प्रसिद्धीच्या बाबतीत तिला कधीच ओहोटी लागली नाही! (एवढी अमाप, सार्वत्रिक व सतत प्रसिद्धी मिळण्याचे भाग्य कदाचित फक्त शिवसेनेलाच लाभले असेल!)

चळवळीचे मुख्य प्रणेते आणि प्रवर्तक श्री. हमीद दलवाई यांना वक्तृत्वाची आणि उत्साहाची नैसर्गिक देणगी लाभलेली असल्याने, त्यांची झंझावाती प्रचार मोहीमही महाराष्ट्रभर चांगलीच गाजू लागली. जाहीर सभांप्रमाणेच निवडक उच्च-भ्रूंच्या बैठकीचाही भरपूर लाभ दलवाईंना झाला. शुद्ध मराठीत बोलणारा आणि मुस्लीम जातीयवादाचा सडेतोड दंभस्फोट करणारा फर्डा पट्टीदार वक्ता म्हणून लवकरच दलवाईंना अमाप लोकप्रियताही लाभली. विशेषतः तथाकथित राष्ट्रवादी व पुरोगामी मुस्लीम नेत्यांचा जो दंभस्फोट दलवाईंनी धडाक्याने चालविला होता, त्यामुळे काही मंडळी तर प्रारंभी अगदी बेहद्द खूष होऊन गेली होती!

या चळवळीला ज्याप्रमाणे प्रसिद्धीची कधी वाण पडली नाही; त्याचप्रमाणे इतर साधनसामुग्रीचीही! त्याचप्रमाणे चळवळीने प्रथमच जो प्रश्न हाती घेतल तो मुस्लीम स्त्रियांच्या गुलामगिरीचा, त्यांच्या विवाहाचा म्हणजेच मुस्लीम पुरुषांच्या चार बायका करण्याच्या हक्काचा; त्याचप्रमाणे हवा तेव्हा, हवा तसा एकतर्फी 'तलाक' (घटस्फोट) देण्याच्या हक्काचा! थोडक्यात म्हणजे कुराणाच्या नावाने चाललेल्या एका महत्त्वाच्या अन्यायाविरुद्ध–तोही समाजातील अत्यंत दलित अशा स्त्रियांवरील घोर अन्यायाविरुद्ध हा लढा होता. स्वाभाविकपणेच या आंदोलनाबद्दल गाढ सहानुभूती निर्माण होऊ लागली.

थोडक्यात म्हणजे सर्व काही हवे तसे जमून येत आहे, असे वाटू लागले आणि वरवर पाहता असेच दोन वर्षे तरी चालू राहिले. मुस्लीम सत्यशोधकांनी स्थापनेच्या नंतर लवकरच ज्या अपेक्षा उंचावल्या होत्या, त्या पूर्ण व्हावयाला आता अवकाश नाही, असा आभास कदाचित सामान्य मराठी माणसांच्या मनात उत्पन्न व्हावा, इतपत वातावरण तयार होत गेले.

आता या चळवळीला तीन वर्षे होऊन गेली. वर वर पाहता अत्यंत अनुकूल परिस्थितीत आणि सर्वांच्या शुभेच्छा बरोबर घेऊन, प्रसिद्धीच्या सतत झगझगाटात झळकणाऱ्या या चळवळीने खरोखर किती मजल गाठली आहे? तिच्या कार्याचा, कामगिरीचा आता थोडासा आढावा घेण्याची वेळ आली आहे. अर्थातच तो आढावा म. फुल्यांच्या शिकवणीच्या आणि दंडकांच्या प्रकाशातच घेतला पाहिजे, हे उघड आहे. त्या दृष्टीने पाहिले तर आज काय काय दिसते?

चळवळ कोणासाठी ? अन् गर्दी कोणाची ?

ज्यांच्यासाठी ती चळवळ उभारली; त्यांच्यापर्यंत ती कितपत पोचली ? ज्यांना तिचे आव्हान जाणवायला हवे होते, त्यांना ते किती जाणवले ? तिला पाठिंबा कोणाचा मिळाला ? विरोध कोणाचा झाला ? मुस्लीम जनमानसाच्या दृष्टीने–त्याचप्रमाणे एकूण जनतेच्या दृष्टीने–आजतागायत कितपत प्रगती झाली ? एकूण पुरोगामी शक्तींच्या जमेच्या बाजूला काय पडले ? प्रतिगाम्यांच्या हाती काय पडले ? देशातील एकूण पुरोगामी धर्मनिरपेक्ष, सामाजिक क्रांतिकारक चळवळीला तिच्यामुळे कितीसे बळ प्राप्त झाले ?

अगदी पहिली आणि ठळक गोष्ट ध्यानात येते ती म्हणजे या चळवळीचा इतका बोलबाला मुख्यतः जेथे झाला आणि ज्यांच्यात झाला त्यांचा खुद्द संबंधित, मुस्लीम समाजाशी काहीच संबंध नव्हता ! किंबहुना त्यांपैकी बरेच विभाग, खरे म्हणजे, मुस्लीम समाजाशी वैरच बाळगणारे होते ! त्याहूनही विपरीत गोष्ट म्हणजे ज्या (मुस्लीम) स्त्री-मुक्तीच्या प्रश्नासाठी म्हणून या आंदोलनाचे प्रस्थान होते, त्या चळवळीबद्दलही या मंडळींना फारसा जिव्हाळा नव्हता; किंबहुना हिंदु स्त्रीच्या मुक्ती आंदोलनाला–किंवा एकूण सामाजिक समतेच्या आंदोलनालाच या मंडळींचा सतत विरोधच होता !

तात्पर्य, ज्यांच्या मनात सर्वसाधारण मुस्लीम समाजाबद्दलच दुरावा किंबहुना वैरभाव होता असेच हिंदुत्ववादी लोक हमीद दलवाईंच्या सभांना मुख्यतः गर्दी करीत होते ! आणि इस्लाममधील प्रतिगामी गोष्टींबद्दल–त्यांच्याप्रमाणे मुल्ला-मौलवींच्या रुढीग्रस्त सनातनीपणाविरुद्ध दलवाई जेव्हा खरपूस टीका करीत, तेव्हा हे लोक अत्यानंदाने टाळ्या पिटीत होते ! राष्ट्रीय आणि पुरोगामी समजल्या जाणाऱ्या मुस्लीम पुढाऱ्यांविरुद्ध दलवाईंनी केलेल्या टीकेमुळे तर ह्या लोकांना भलताच दिलासा वाटत असे ! कारण, मुसलमानात कुणी राष्ट्रीय, पुरोगामी असूच शकत नाही, या त्यांच्या आवडत्या सिद्धांताला त्यामुळे अनपेक्षित बाजूने पुष्टी मिळत होती !

थोडक्यात म्हणजे दलवाईंच्या श्रोतृवर्गामध्ये मुख्य गर्दी करीत होते ते संघ-जनसंघवाले आणि काँग्रेसमधील छुपे हिंदुवालेच ! त्यांच्या सभा संघटित होण्याबद्दल जास्त उत्साह आणि मदतही याच मंडळींची. इतरही काही थोडीफार जिज्ञासू किंवा भले व्हावे असे इच्छिणारी सज्जन मंडळी होती; अगदीच नाही असे नाही. पण मुख्य उत्साह व जल्लोष उघड किंवा छुप्या हिंदुवाल्यांचाच !

मुख्य प्रवर्तक कोण ?

मुख्य प्रवर्तकांचा, संघटकांचा आणि साहाय्यकांचा विचार केला तर आणखी एक विलक्षण गोष्ट नजरेस येते; ती म्हणजे या चळवळीचे एक मुख्य प्रवर्तक (चीफ प्रमोटर म्हणू या का ?) म्हणून सूत्र-संचालन करीत होते प्रो. ए. बी. शहा–अमेरिकन

कलचरल फ्रीडमचे एक आधारस्तंभ! मुंबईतील आणि पश्चिम भारतामधील अमेरिकन-प्रणीत वेगवेगळ्या चळवळींमधील एक अग्रगण्य संघटक म्हणून ए. बी. शहा महाशयांची ख्याती आहे! देशातील कोणत्याही पुरोगामी चळवळीला विरोध करणारी; कम्युनिस्ट विद्वेष ही जीवननिष्ठा म्हणून–त्याचप्रमाणे व्यवसाय म्हणून स्वीकारणारी, जी काही शिष्टमंडळी आहेत, त्यांतही शहामहाशय हे अग्रगण्य आहेत! अशा शहा-महाशयांचा उदार आश्रय मुस्लीम सत्यशोधक मंडळाने का स्वीकारावा, हे एक अनाकलनीय कोडेच आहे! त्यामुळे मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्याला कोणती विशिष्ट मदत होणार होती; कोणते खास बळ प्राप्त होणार होते, हे समजणे कठीणच आहे!

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या मोहिमेला जी साधनसामुग्री खर्ची पडली-साखळी वृत्तपत्रांचा जो भरघोस पाठिंबा सतत लाभला, संघ-जनसंघवाल्यांची जी जल्लोष गर्दी जमली, या सगळ्या मिळणीजुळणीला कदाचित शहामहाशयांचे वजन, प्रतिष्ठा, योग्य ठिकाणचे योग्य संबंध, उपयोगी पडले असण्याचा बळकट संभव आहे!

मुस्लीम स्त्री-मुक्तीसाठी हिंदु सनातनी?

मुस्लीम सत्यशोधक मंडळाने मुस्लीम स्त्रियांचा प्रश्न हाती घेतला खरा; पण तो गाजला–गाजविला तो संघ-जनसंघवाल्यांनी! म्हणजेच मुस्लीम सनातन्यांविरुद्ध जी चळवळ मुस्लीम सत्यशोधकांनी उठविली, तिला भरघोस अत्युत्साही पाठिंबा मिळाला तो मुख्यतः हिंदु सनातन्यांचा! मुस्लीम स्त्री मुक्तीच्या आंदोलनाला मुख्य पाठिंबा मिळाला तो हिंदु स्त्रीला गुलामगिरीची सनातन सनद देणाऱ्या हिंदु चातुर्वर्ण्यवाल्यांचा! काय करायला गेले आणि प्रत्यक्षात काय घडले? या किमयेचे किमयागार हमीद दलवाई की ए. बी. शहा हा प्रश्न तूर्त बाजूला ठेवू या. तरी एक शल्य मात्र नक्की मनात रूतून राहते–ते हे की, या विपरीत घटनांमध्ये महात्मा फुल्यांचे आणि सत्यशोधकांचे नाव मात्र निष्कारण खर्ची पडले!

मुस्लीम समता आंदोलनाचा मुख्य आधार

आता या चळवळीचे लोण मुस्लीम स्त्रियांपर्यंत आणि मुस्लीम बहुजनसमाजा-पर्यंत कितपत पोचले? काही थोड्या मुख्यतः मध्यमवर्गीय मुस्लीम महिला या चळवळीत धैर्याने पुढे आल्या. ही कदाचित या चळवळीची सर्वांत उज्ज्वल कामगिरी ठरेल! त्यांचा पाठपुरावा करण्यासाठी तुरळक मुस्लीम युवकांचे गटही कुठे कुठे संघटित होत असतील, तर तीही एक जमेची बाजू समजावी.

अर्थात या स्त्रिया आणि युवकांचे गट हेही अगोदर होऊन गेलेल्या वेगवेगळ्या पुरोगामी, राष्ट्रीय, लोकशाही किंवा वर्गीय चळवळीच्या परिसरात अगोदरच ओढले गेलेले असावेत. त्या गटांना सामाजिक समतेच्या लढ्यासाठी म्हणून संघटित करणे,

त्या महान लढ्याची दीक्षा देणे या गोष्टीचेही वेगळे महत्त्व आहे, यात शंकाच नाही. मुस्लीम समाजामध्ये सामाजिक समानतेचा–स्त्री-मुक्तीचा लढा पुढेमागे जर मूळ धरणार असेल सर त्याचा मुख्य आधार हे मुस्लीम युवकांचे गट हाच असेल, आणि तो तसा असलाही पाहिजे.

हे गट मजबूत करणे, त्यांच्यामध्ये सामाजिक समतेच्या बिकट–खडतर लढ्यासाठी आवश्यक असलेली निष्ठा निर्माण करणे,— त्या लढ्यासाठी सारे जीवन समर्पित करण्याची उर्मी उत्पन्न करणे, हे एक महान् कार्य आहे, आणि या कार्याला अनुकूल असे खरेखुरे सहकारी, मित्र जोडणे हेही या चळवळीच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. त्याचप्रमाणे या चळवळीचा दुवा देशातील इतर खऱ्याखुऱ्या पुरोगामी, धर्मनिरपेक्ष, श्रमिक चळवळीशी जोडणे याही गोष्टीला अत्यंत महत्त्व आहे.

प्रामाणिक मित्रांना दूर लोटले !

पण वर सांगितल्याप्रमाणे शहा–दलवाईंनी जे केले ते मात्र नेमके याच्या उलट होते ! म्हणजे ज्यांना जवळ करायचे नेमके त्यांनाच त्यांनी दूर लोटले. त्यांनी या मुस्लीम समाज-सुधारकांचे संबंध इतर पुरोगामी लोकशाही चळवळीशी येऊ नयेत यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. जे काय स्वाभाविक संबंध असतील ते अजिबात तोडून टाकण्याची कोशीस कसोशीने केली. खुद्द मुस्लीम समाजातील पुरोगामी, निधर्मी गट, वर्गीय चळवळीत तयार झालेले श्रमिक कार्यकर्ते यांच्यापासून तर मुस्लीम सत्यशोधकांना तोडण्यात आलेच; पण इतर समाजांतील पुरोगामी गटांपासूनही त्यांना दूर करण्यात आले.

शत्रूंना जवळ करण्याची किमया !

मुस्लीम सत्यशोधकांचे मित्र तोडणे–त्यांना दूर ठेवणे ही एक बाजू झाली; दुसरी बाजू म्हणजे मित्र मिळविण्याची ! त्यातही किमया अशी की, मुस्लिम सत्यशोधकांसाठी मित्र शोधले ते नेमके हिंदू चातुर्वर्ण्यवाद्यांमध्ये ! म्हणजे मुस्लिम सनातन्यांशी लढण्यासाठी मुख्य साहाय्य कोणाचे ? तर हिंदू सनातन्यांचे !

मुस्लीम सत्यशोधकांनी विचार केला तर त्यांच्या लक्षात येईल की, त्यांनी गेली तीन वर्षे कलेल्या चळवळीचा फायदा मुख्यतः कुणी उठविला असेल तर तो फक्त संघ-जनसंघवाल्यांनी !! हिंदुवाल्यांच्या एकूण प्रतिगामी धारणेचे समर्थन करायला त्यांना अनायासे एक मुस्लीम पुरोगामी प्रवक्ता मिळाला ! त्यांच्या मुस्लीमद्वेष्ट्या हिंदू धारणेला-राजकारणाला मुस्लीम पुरोगामी चळवळीला अनपेक्षित पाठिंबा मिळाला !

बरे या चळवळीचा मुस्लीम समाजावर काय परिणाम झाला ? पहिली गोष्ट म्हणजे प्रत्यक्ष मुस्लीम समाजात–त्यातील श्रमिक-दलित विभागात ही चळवळ नेण्याचे प्रयत्न फारसे झाले नाहीत; झालेच असतील तर ते नैमित्तिक––नाममात्र !

मुस्लीम श्रमिक पुरोगामी चळवळीचा एक अंगभूत भाग म्हणून या चळवळीचे संकल्पन-आयोजन झाले असते तरच मुस्लीम सनातन्यांच्या अपेक्षित रोषाला तोंड देण्याचे सामर्थ्य तिला लाभले असते ! पण तसे काही न करता किंबहुना तो रस्ता बंद करूनच मुस्लीम सत्यशोधकांची चळवळ सुरू करण्यात आली ! परिणामी, मुस्लीम मुल्ला-मौलवींचा अपेक्षित रोष त्यांनी अर्थातच ओढवून घेतला; पण मुस्लीम पुरोगामी–श्रमिक शक्तीचा पाठिंबा मात्र ती चळवळ आपल्या पाठीशी फारसा उभा करू शकली नाही.

याचा आणखी एक परिणाम झाला. तो म्हणजे सामाजिक चळवळीविरुद्ध मुस्लीम समाजाला उठविण्याचा.–त्यांच्यातील जातीय-धार्मिक भावना चेतविण्याची संधी मात्र मुल्ला-मौलवींना मिळाली ! इस्लाम धोक्यात आहे, असे वातावरण निर्माण करून पुरोगामी शक्तीवर हल्ला करण्याला त्यांना मोकळे रान मिळाले.

हिंदु–मुस्लीम सनातन्यांचे एकमत

बरे, त्यामुळे मुस्लीम सनातनी मुल्ला-मौलवी आणि संघ-जनसंघाचे सनातनी पुढारी यांच्यात तरी काही जुंपली का ? तर मुळीच नाही !

कुराण प्रणित 'मुस्लीम पर्सनल लॉ'–सनातनी मुस्लीम रुढीला धक्का लावू नका; मुस्लीम धर्ममार्तंडाच्या आणि समाजाच्या संमतीने मुस्लीम कायद्यांत ज्या सुधारणा करायच्या त्या करा, असे 'आज्ञापत्र' काढून खुद्द गोळवलकरगुरुजीच मोकळे झाले ! म्हणजे इकडे हमीद दलवाईंच्या सभांना गर्दी करून टाळ्या पिटणारे संघ-जनसंघवालेच; आणि त्यांचे परमपूज्य गुरुजी आणि शंकराचार्य तिकडे मुस्लीम मुल्ला-मौलवींच्या कुराणप्रणित भूमिकेला पाठिंबा द्यावयाला तयारच ! दोघांच्याही सिद्ध-साधकपणाला साजेसेच हे धोरण; त्याला मर्यादा कसली अन् लाज कसली ? अन् निष्कारण मध्येच खर्ची पडले ते बिचारे मुस्लीम सत्यशोधक आणि त्यांच्याबरोबर फुल्यांचे पवित्र नाव व प्रेरणा ! खरोखर मनाला अगदी उद्वेग वाटावा अशीच ही घटना आहे !

सत्यशोधक नावाचा दुरुपयोग !

पण शहा-महाशय आणि हमीद दलवाई एवढ्यावरच थांबणारे नव्हते, तर मुस्लीम सत्यशोधक चळवळीचे नाव, प्रतिष्ठा यांचा प्रत्यक्ष वापर वेळप्रसंगी प्रत्यक्ष अमेरिकन-धार्जिण्या राजकारणासाठी त्यांच्या अत्यंत दुष्ट प्रतिगामी आविष्कारासाठीही करायला त्यांनी मागेपुढे पाहिलेले नाही !

असा प्रयत्न अरब-इस्त्रईल संघर्षाच्या निमित्ताने झाला, अरबांविरुद्ध आणि त्यांच्या स्वातंत्र्य-लढ्याविरुद्ध प्रचार करण्याच्या कामात मुस्लीम सत्यशोधक

चळवळीच्या नावाचा व प्रतिष्ठेचा उपयोग व्हावा–किंवा केला जाऊ द्यावा, ही अत्यंत उद्वेगजनक घटना आहे. अशा प्रयत्नांमुळे मुस्लीम जनतेवर किती विपरीत परिणाम होतो व त्यामुळे एकूण चळवळीचे किती नुकसान होते, याचीही पर्वा शहा–दलवाईंनी केली नाही.



खऱ्या सत्यशोधकाचे वाण

यापुढे फुल्यांचे आणि सत्यशोधक आंदोलनाचे नाव लावावयाचे असेल तर प्रामाणिक मुस्लीम सत्यशोधकांनी संघी-जनसंघी-हिंदू सनातन्यांची संगत कायमची सोडली पाहिजे. साखळी वृत्तपत्रांतील मतलबी प्रसिद्धीचा मोह टाळला पाहिजे. आपले खरे मित्र मुस्लीम बहुजनसमाजातच, श्रमिक विभागातच शोधले पाहिजेत. देशातील खऱ्याखुऱ्या पुरोगामी, लोकशाहीवादी, समाजवादी शक्तींशी मैत्रीचे संबंध जोडले पाहिजेत; मुस्लीम-मौलवींविरुद्ध लढा आणि हिंदू सनातन्यांविरुद्ध लढा हे दोन्ही एकाच प्रतिगामी विषमतावादी सरंजामी अवशेषांविरुद्ध आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्या भांडवलदारी शक्तींविरुद्ध चाललेल्या व्यापक लढ्याचा केवळ एक भाग आहे, हे महान् सत्य ओळखले पाहिजे. हा लढा सोपा नाही, खडतर आहे. नैमित्तिक नाही; नित्याचा आहे. तो दीर्घकाळपर्यंत चालणारा आहे. मुस्लीम सत्यशोधक चळवळ नसत्या कामासाठी राबविण्याचे किंवा वेगवेगळ्या प्रलोभनांनी तिला आपल्या कच्छपी लावून घेण्याचे प्रयत्न कुणी करतील, तर ते सत्यशोधकांनी निर्धाराने हाणून पाडले पाहिजेत.

पूर्वी सत्यशोधक चळवळीच्या इतिहासातही असेच प्रसंग आले होते, त्यांचीही आठवण मुस्लीम सत्यशोधकांनी जरूर ठेवावी. म. फुल्यांचे व सत्यशोधक चळवळीचे नाव आणि प्रतिष्ठा यांचा वापर, स्वार्थासाठी, संधिसाधू प्रतिगामी राजकारणासाठी, नवोदित उच्चवर्णीय––वर्गीयांच्या नव्या हितसंबंधांसाठी करण्याचे प्रयत्न अनेकदा झाले व पुन्हा पुन्हा होत राहिले. खऱ्या सत्यशोधकांनी असल्या प्रयत्नांविरुद्ध वेळोवेळी झुंज दिली, त्याचप्रमाणे काळाचा ओघ, नवा युगधर्म बघून त्यांनी सत्यशोधक चळवळीला नवी क्षितिजेही मोकळी करून दिली.

मुस्लीम सत्यशोधकांसमोरही तसलेच प्रश्न पुन्हा येत आहेत. ७५–१०० वर्षांपूर्वी उच्चवर्णीय ब्राह्मण सुधारकांनी काही गंभीर चुका केल्या आणि सामाजिक समतेचा लढा मूठभर उच्चवर्णीय-उच्चवर्गीय परिसरात ठाणबंद करून टाकला! त्यापासून योग्य ते धडे घेतले पाहिजेत. फुल्यांची मूलभूत प्रेरणा–धारणा होती समाजातील सर्वांत दलित, शोषित, श्रमिक जनतेशी सदैव समरस झालेली. त्यापासून

क्षणमात्रही विचलित न होता; तिच्याशी सतत इमान राखणे हेच मुस्लीम सत्य-शोधकांचे इमान असले पाहिजे.

तात्पर्य, चातुर्वर्ण्यवादी हिंदू राष्ट्रवाद्यांच्या नुसत्या टाळ्या मिळवून, मुस्लीम जनतेमध्ये केव्हाही सत्यशोधक प्रेरणा मूळ धरणार नाही.

हिंदू राष्ट्रवादी एकीकडे हमीद दलवाईंना टाळ्या पिटतात; आणि त्यांचे गुरुजी (गोळवळकर किंवा आता देवरस) मुस्लीम मुल्ला-मौलवींच्या 'पर्सनल लॉ'संबंधी कुराणप्रणित भूमिकेला खुशाल पाठिंबा देतात!

सनातनी मुसलमानांचे दगड खावे लागले तर ते भूषणासह ठरेल! पण हिंदू राष्ट्रवाद्यांच्या टाळ्या मात्र मुस्लीम सत्यशोधकांना निःसंशय महाग पडतील!

अशा तथाकथित मित्रांपासून मुस्लीम सत्यशोधकांनी ताबडतोब आणि कायमची फारकत घेतली पाहिजे आणि श्रमिक-शोषित-दलित जनशक्तींशी एकजूट केली पाहिजे. हिंदू आणि मुस्लीम दोन्ही समाजांतील सामाजिक सुधारणेचा लढा अखेर एकच आहे आणि तो तसाच लढविला पाहिजे.

परिशिष्टे

परिशिष्ट । १

म. फुले आणि इतिहास

महात्मा फुले विद्वान् नव्हते; इतिहास-संशोधक तर नव्हतेच नव्हते. त्यांनी तसा दावाही कधी केला नव्हता. शिवाय, त्यांचे लिखाण शंभर-सव्वाशे वर्षांपूर्वी झाले होते, ही गोष्टही ध्यानात ठेवली पाहिजे. त्या काळच्या मानाने फुले विलक्षण बहुश्रुत होते; समाजाच्या सर्व थरांशी त्यांचा सतत आणि साक्षात घनिष्ट संबंध होता. शिवाय, ते कमालीचे चौकस आणि चिकित्सक होते. त्यांच्या नजरेतून कोणताही, बारीकसासुद्धा तपशील सुटू शकत नव्हता. याशिवाय सामान्यजनांबद्दल त्यांना उदंड आणि अखंड सहानुभूती होती. ती सहानुभूती विशिष्ट जात, प्रदेश, धर्म यांनी मर्यादित नव्हती. तर ती खऱ्या अर्थाने शुद्ध माणुसकीची होती; कोणत्याही वृथा अभिमानापासून आणि विषमतेच्या विषापासून ती संपूर्णपणे अलिप्त होती.

हे सर्व ध्यानात ठेवूनच त्यांच्या एकूण लिखाणाचा संकलित–संतुलित विचार करावयाला हवा. दुर्दैवाने तसा विचार पूर्वी, फारसा झाला नाही आणि आजही कितपत होतो किंवा होऊ शकतो, याची शंकाच आहे ! आणि या बाबतीत फुल्यांचे विरोधक आणि अनुयायी दोघेही जवळपास एकाच माळेचे मणी आहेत, असेच म्हणावे लागते !

प्रारंभी ५०–७५ वर्षे विद्वानांनी आणि संशोधकांनी फुल्यांना 'खोडून' काढण्याचा प्रयत्न केला; 'अडाणी' म्हणून त्यांची टवाळी केली; किंवा त्यांना खिस्ती-इंग्रजधार्जिणे ठरवून त्यांची निरर्गल निंदाही केली ! उलट, त्यांच्या तथाकथित अनुयायांनी आपल्याला सोयिस्कर वाटतील तेवढीच विधाने फुल्यांच्या लिखाणातून उचलली आणि आपल्या क्षुद्र स्वार्थासाठी आणि जातवार हितसंबंधांसाठी,

त्या विधानांचा त्यांनी सर्रास उपयोग केला. आता तरी फुल्यांना खोडून काढण्याचा खेळ विद्वानांनी बंद करण्याची वेळ आली आहे; त्याचप्रमाणे अनुयायांनीही फुल्यांच्या शब्दांचा दुरुपयोग करण्याचा मोह टाळण्याची आज नितांत आवश्यकता आहे.

कारण, या उभयविध खेळांत फुल्यांच्या शब्दांचा दोन्हींकडून दुरुपयोग होतो; आणि फुल्यांची मूळ प्रेरणा–शिकवण आणि तिचा आजचा जिवंत संदर्भ याकडेच नेमके दुर्लक्ष होऊन जाते !

इतिहास-संशोधन हा हेतू नव्हता

इतिहास, इतिहासाची संगती किंवा उपपत्ती याबद्दलही आज जपूनच विचार करावयाला हवा. फुले विद्वान किंवा संशोधक नसल्यामुळे तसा त्यांचा दावा नव्हता; फार काय त्यांचे लिखाण इतिहास-लेखनासाठी, विशिष्ट घटनांची इतिहासशास्त्रीय उपपत्ती बसवून दाखविण्यासाठीही नव्हते. त्यांच्या लिखाणाचे खरेखुरे आणि मौलिक महत्त्व त्यांच्या दलितांबद्दलच्या–स्त्री-शुद्र-अतिशुद्रांबद्दलच्या समरसतेमध्ये होते. समाजाच्या या दलित विभागांवर हजारो वर्षे सतत होत राहणाऱ्या भयानक अन्यायांबद्दल, ते अन्याय चालू ठेवणाऱ्या जन्मजात विषमतेबद्दल, ती विषमता निर्माण करणाऱ्या आणि टिकविणाऱ्या समाजरचनेबद्दल आणि त्या समाजाच्या वरिष्ठवर्णीय–वर्गीय मक्तेदार नेत्यांबद्दल फुल्यांच्या मनात विलक्षण संताप आणि चीड उत्पन्न झाली होती. स्त्री-शूद्र-अतिशुद्रांबद्दलचा अथांग कळवळा आणि त्यांच्यावरील अन्यायाला जबाबदार असणाऱ्या वरिष्ठ समाजनेत्यांबद्दलची चीड ही फुल्यांची खरी प्रेरणा, प्रेरकशक्ती होती. या अन्यायाविरुद्ध सर्वसामान्य समाजाला जागृत करणे,–उघड बंडाला प्रवृत्त करणे, ही खरी त्यांची प्रेरणा होती. या सर्वांमधून त्यांचा एक विशिष्ट दृष्टिकोन तयार झाला होता. त्या दृष्टीतून ते विद्यमान समाजाकडे आणि त्यातील विशिष्ट वर्णाकडे, विभागाकडे बघत होते; त्याच दृष्टीने इतिहासाकडे बघण्याचा–इतिहासातील घटनांचा वेध घेण्याचा, अर्थ लावण्याचा त्यांचा प्रयत्न होता. अर्थात् शंभर–सव्वाशे वर्षांपूर्वी त्यांना उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारेच फुल्यांनी हे सर्व केले असणार. त्यावेळी उपलब्ध असलेली पुस्तके, विद्वान् मित्रांशी केलेल्या विविध चर्चा आणि त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे समाजातील सर्व थरांचे, विभागांचे त्यांनी सतत केलेले सूक्ष्म निरीक्षण, हीच खरी फुल्यांच्या लेखनाची पूर्वतयारी आणि साधनसामुग्री होती. फुल्यांच्या लिखाणाची मूळ प्रेरणा, हेतू आणि तदनुसार त्यांनी शंभर-सव्वाशे वर्षांपूर्वीच्या विशिष्ट परिस्थितीत केलेले लिखाण यांचा हा एकूण संदर्भ ध्यानात ठेवला नाही तर फसगत होण्याचा संभव आहे! विरोधकांची त्याचप्रमाणे अनुयायांचीसुद्धा ! फुल्यांचे खरे सामर्थ्य त्यांच्या प्रेरणेमध्ये आहे; बाकी सारे अनुषंगिक मानले पाहिजे. म्हणूनच त्यांची सामाजिक दृष्टी–त्यांचा सामाजिक विचार हा प्रथम महत्त्वाचा आहे; त्यांनी तो कशा रीतीने व्यक्त केला ही गोष्ट त्यामानाने दुय्यम आहे. फुल्यांच्या

लिखाणातील काही इतिहासविषयक तपशील आज शंभर वर्षांच्या संशोधनानंतर कदाचित् अपुऱ्या किंवा चुकीच्या माहितीवर आधारलेले वाटतील; पण त्या लिखाणामागील मूळ प्रेरणा, दृष्टी ही आजही मार्गदर्शक आणि स्फुर्तिदायक ठरेल. फुल्यांचे इतिहासविषयक काही तपशील कदाचित खोडून काढता येतील; पण त्यामुळे त्यांचा सामाजिक विचार खोडला जात नाही, हे ध्यानात ठेवले पाहिजे.

जातिसंस्थेचे मूळ

फुल्यांनी चातुर्वर्ण्याबद्दल, जन्मजात जातवारीच्या निर्मितीबद्दल आणि ती निर्माण करणाऱ्या तत्कालीन समाजनेत्यांबद्दल जे लिहिले, त्यांतील काही तपशील आजवर झालेल्या संशोधनानंतर कदाचित चुकीचे किंवा दूरान्वित ठरतील; पण तरीही फुल्यांच्या मूळ धारणेला त्यामुळे बाधा येत नाही.

आर्यपूर्व भारतामध्ये बरीच विकसित संस्कृती निर्माण झाली होती; आणि आजच्या हिंदू धर्मातील अनेक अनिष्ट प्रथा आणि विषमता यांचा उगम आर्यपूर्व संस्कृतीमध्येही सापडतो, असा आजच्या संशोधनाचा निष्कर्ष आहे. फार काय जातिप्रथेचे मूळसुद्धा आर्यपूर्व संस्कृतीमध्ये सापडू शकेल, असाही अनेक संशोधकांचा–विद्वानांचा दावा आहे. आर्यांनी या संस्कृतीचा पराभव केला; तिला मागे मागे रेटत नेले; ही प्रक्रिया शेकडो वर्षे चालली आणि या प्रक्रियेत भिन्न भिन्न संस्कृतींचा संघर्ष झाला, संकर झाला–संगम झाला. जगाच्या पंचखंडांतील इतिहासात पुरोहितवर्ग वेगवेगळ्या स्वरूपांत सर्वत्रच दिसतात; तसे ते आर्यपूर्व भारतामध्येही होते. त्याचप्रमाणे लढाऊ शस्त्रधारी शासकवर्गही होता; आणि बाकी सर्व दलित–शोषिक–श्रमिक होते.

इतिहास-मीमांसा आणि कल्पना-विलास

सामाजिक उत्पादनाच्या विशिष्ट विकासाबरोबर समाजरचनेची उत्पादन-संबंधांची विशिष्ट अवस्था येते; त्या क्रमात खाजगी मालमत्ता निर्माण होते आणि तेथूनच शोषक आणि शोषित; ऐतखाऊ आणि कष्टकरी अशी समाजातील खरीखुरी विषम विभागणी सुरू होते. भारतामध्येही अर्थात स्थूल मानाने तसेच घडले असले पाहिजे. खंडप्राय भारतातील वेगवेगळ्या विभागांतील घटनाक्रमांचे स्वरूप, तपशील यांमध्ये स्थळ काळानुसार फरक पडले असतील; पण उत्पादन-शक्तींची वाढ आणि त्यातून नंतर निर्माण होणाऱ्या उत्पादन-संबंधांत पडणारे फरक, त्या संघर्षांतून निर्माण होणारी वर्ग-विशिष्ट समाजरचना यांमध्ये स्थूलमानाने फारसे फरक पडत नाहीत.

भारतामध्ये जे एक वेगळे घडले आणि निदान दोन हजार वर्षे तरी सतत टिकले ते म्हणजे चातुर्वर्ण्य आणि व्यवसायबद्ध जन्मजात जातिव्यवस्था आणि तिला मिळालेला ग्रामसंस्थांचा भक्कम आर्थिक-सामाजिक-सांस्कृतिक आधार, हे होय. या

वैशिष्ट्याचा उगम, विकास आणि स्थैर्य यांची उपपत्ती आणि मीमांसा इंग्रजी राज्य आल्यापासून गेली दीडशे वर्षे चालूच आहे. प्रामाणिक संशोधनाने इतिहासातील घटनांचे तपशील निश्चित करणे, हा त्या प्रयत्नांतील एक भाग झाला; या तपशीलांच्या आधाराने इतिहासाची संगती लावणे, घटनाक्रमांची सुत्रे शोधून काढणे, उपपत्ती बसविणे, हा इतिहास-मीमांसेतील दुसरा भाग. यांमध्ये अनेकदा मोठमोठ्या संशोधकांनी आणि विद्वानांनी सत्य-संशोधनापेक्षा कल्पना-विलास किंवा स्वप्नरंजनच अधिक केलेले आढळते ! ही गोष्ट फुल्यांना 'खोडून' काढणाऱ्यांनी ध्यानात ठेवावी—अशा कल्पना-विलासात आणि स्वप्नरंजनांमध्ये विष्णुशास्त्र्यांसकट फुल्यांचे बहुतेक सर्व टीकाकारही मशगूल होते. ते इंग्रजांच्या किंवा खिस्ती मिशनऱ्यांच्या विरुद्ध बोलत होते, राष्ट्रीय अभिमान जागृत करीत होते. म्हणून त्यांचा हा इतिहासातील कल्पना-विलास समर्थनीय ठरत नाही; आणि राष्ट्रीय स्वाभिमान जागविण्याच्या नावाखाली चातुर्वर्ण्याचे आणि जन्मजात जातीय विषमतेचे समर्थन करणे हे तर घातक ठरते. म्हणूनच संशोधन-विषय झालेल्या ऐतिहासिक तपशीलांचा भाग सोडला तर चातुर्वर्ण्य आणि जन्मजात विषमता याबाबत फुल्यांची भूमिका मूलतः योग्यच होती. राष्ट्रीय अभिमान जागविण्याच्या नावाखाली, जन्मजात सामाजिक विषमतेचे समर्थन करणारे फुल्यांचे टीकाकार मूलतः चुकीच्या आणि घातक मार्गावर चालले होते, असेच अखेर म्हणणे भाग आहे.

फुल्यांनी केवळ इतिहासातील तपशीलांचे प्रासंगिक उल्लेख केले. पण आंबेडकरांनी तर इतिहास-संशोधन आणि मीमांसाही केली. आंबेडकर गाढे विद्वान होते आणि संशोधकही होते. चातुर्वर्ण्य, जन्मजात जातिव्यवस्था, अस्पृश्यता इत्यादी अनेक वादग्रस्त विषयांवर आंबेडकरांनी अधिकारवाणीने नवीन उपपत्ती सांगितल्या आहेत, इतिहास-मीमांसाही केली आहे. आंबेडकरांनी फुल्यांना गुरू मानले; तरी आंबेडकरांची इतिहास-मीमांसा त्यांची स्वतःची व स्वतंत्र होती, फुल्यांपेक्षा वेगळी होती. फुल्यांनी काही शेवटचा शब्द लिहिला नव्हता किंवा आंबेडकरांनीही नव्हता; फार काय बुद्ध किंवा कार्ल मार्क्स यांनीही शेवटचा शब्द लिहिण्याचा दावा कधी केला नव्हता !

फुले आणि खिस्ती मिशनरी

फुल्यांनी जे लिखाण केले ते खिस्ती मिशनऱ्यांच्या प्रेरणेने केले आणि त्यांचा हेतू हिंदुधर्माची आणि संस्कृतीची केवळ निंदा-नालस्ती करण्याचा होता, असे म्हणत राहण्याचा प्रकार म्हणजे तर फुल्यांची शुद्ध बदनामी आहे. चातुर्वर्ण्य आणि जन्मजात जातवार विषमतेवर आधारलेल्या हिंदुसमाजरचनेपेक्षा खिस्ती समाजात फुल्यांना दलितांबद्दल अधिक सहानुभूती आणि कमी विषमता आढळली, असे फार तर म्हणता येईल. पण फुल्यांचे खिस्ती धर्माशी आणि सर्वच प्रस्थापित-संघटित

धर्मांशी मूलगामी मतभेद होते; आणि ते फुल्यांनी सतत हिरीरीने व्यक्त केले, ही गोष्ट सतत ध्यानात ठेवली पाहिजे. ख्रिस्ती–महंमदी–यहुदी वगैरे सर्वच धर्म ईश्वरप्रणित, प्रेषितप्रेरित असल्याचा दावा करतात; म्हणून फुल्यांचा त्या सर्वांना मुळातच विरोध होता. येशू किंवा महंमद किंवा इतर धर्मसंस्थापक ईश्वराने पाठविलेले प्रेषित आहेत, त्यामुळे त्यांच्या उक्ति-कृतीला ईश्वरी प्रसादाची प्रतिष्ठा लाभते; त्यांचे धर्मग्रंथ ईश्वरप्रणित ठरतात; त्यामुळे त्यांमध्ये अपरिवर्तनीयता येते–अंधश्रद्धा हाच धार्मिकतेचा मुख्य गुण ठरतो; त्यामुळेच असहिष्णुता, धार्मिक दुराभिमान–ईर्षा वाढीला लागते, आणि सर्व ईश्वराची लेकरे ही समानतेची–बंधुतेची भावना नाहीशी होते. उलट धर्म ही विभाजक–विध्वंसक–आक्रमक शक्ती बनते इत्यादी विचार फुल्यांनी सतत जन्मभर आग्रहाने मांडलेले आहेत. ख्रिस्तीधर्माच्या ईश्वरी राज्यापेक्षा फुल्यांना अभिप्रेत असलेले ईश्वरी राज्य फार वेगळे होते. स्वातंत्र्य-समता-बंधुता, सामाजिक न्याय्य, लोकशाही इत्यादी गुणांनी युक्त असे श्रमिकांचे खरेखुरे लोक-राज्य आणि तेही आज, इथेच या पृथ्वीवर प्रस्थापित झाले पाहिजे, ही फुल्यांची ठाम भूमिका होती. धर्माप्रमाणेच विभाजक, अंधाभिमानी, आक्रमक राष्ट्रवादालाही फुल्यांचा स्पष्ट विरोधच होता. संपूर्ण स्वातंत्र्य-बंधुता-न्याय यांवर आधारलेला प्रादेशिक समाज अशीच फुल्यांची राष्ट्रवादाबद्दलची धारणा होती. खरे म्हणजे फुले विश्वमानवच होते. विशुद्ध विश्वकुटुंबाची कल्पना हाच फुल्यांना अभिप्रेत असलेला धर्माचा, समाजाचा आणि राष्ट्राचा मूलाधार होता. सत्यशोधक समाज या महान आदर्शासाठीच त्यांनी स्थापन केला. तेव्हा विरोधकांनी फुल्यांना इंग्रजाचे किंवा ख्रिस्ती मिशनऱ्यांचे हस्तक म्हणणे ही जशी त्यांची बदनामी आहे; त्याचप्रमाणे विशिष्ट धर्म-प्रदेश-जात इत्यादी कोणत्याही संकुचित कल्पनेच्या मर्यादेत त्यांना बंदिस्त करण्याचा फुले-अनुयायांचा प्रयत्नही क्षुद्रतेचाच द्योतक आहे.

परिशीष्ट । २

म. फुले आणि राष्ट्र–लोकशाही–मताधिकार वगैरे

जोतिरावांची दृष्टी सर्वस्पर्शी आणि व्यापक होती; पण सगळ्याच गोष्टीवर त्यांनी सर्वकाळी सारखाच भर दिलेला दिसत नाही. काही गोष्टी तर त्यांना त्या काळी कदाचित अगदीच अव्यवहार्य वाटत असतात.

उदा. राष्ट्रीयता, लोकशाही, पार्लमेंटरी पद्धती, मताधिकार यांबाबत त्यांनी केलेले उल्लेख एकूण कमी, आणि तेही मुख्यतः तत्त्वनिदर्शक आहेत. याचे कारण बहुधा हेच असावे की, त्यांच्या डोळ्यापुढे जी लोकशाही किंवा जे लोकप्रतिनिधी अभिप्रेत होते, ते प्रत्यक्षात अस्तित्वात येण्याची शक्यता त्यांना त्या काळी दिसत नव्हती.

त्यांच्या मते शूद्र–अतिशूद्र (भिल्ल-कोळी वगैरे) सर्व विद्वान होऊन विचार करावयास लागतील–ते सर्वांसारखे एकमय होतील, तेव्हाच खऱ्या अर्थाने 'राष्ट्र' होईल; तसे राष्ट्र न होता, केवळ उपऱ्या आर्यभटांनी नॅशनल काँग्रेस स्थापिली तर तिला विचारतो कोण? असा फुल्यांचा करडा आणि रोकडा सवाल होता. राष्ट्रीय काँग्रेस किंवा तिच्यापूर्वी स्थापन झालेली पुण्याची इतिहासप्रसिद्ध 'सार्वजनिक सभा' या राजकीय संस्थांबद्दल फुल्यांची मूलभूत भूमिका अशी होती. त्यांच्या मते या संस्थांमध्ये खरे राष्ट्र (खरा शूद्र-अतिशूद्र बहुजन समाज) येणे शक्यच नव्हते; आणि काँग्रेसमधले उच्चवर्णीय-उच्चवर्गीय मूठभर पुढारी बाहेरील शूद्र-अतिशुद्रांशी सर्वस्वी एकरूप होणे तेव्हा शक्य दिसत नव्हते.

फुल्यांना तेव्हा बिनतोड वाटणाऱ्या अशा परिस्थितीत, त्यांच्यापुढे शूद्र-अतिशुद्रांमध्ये जागृती करणे, त्यांना शिक्षण देणे, त्यांच्या विविध दुःखांना वाचा फोडणे एवढेच शक्य होते आणि त्याच कार्याला त्यांनी सर्व शक्तीनिशी स्वतःला वाहून

घेतले होते. अशा परिस्थितीत मताचा अधिकार, निवडणुका, लोकप्रतिनिधीत्व इत्यादी कल्पना म्हणजे फुल्यांच्या दृष्टीने तेव्हा तरी केवळ स्वप्नरंजन होते; त्यांचा उपयोग शूद्र-अतिशुद्रांच्या दृष्टीने शून्य होता! उलट, त्या कल्पनांचा दुरुपयोग उच्च-वर्णीयांकडून सर्व जनतेचे प्रतिनिधी म्हणून मिरविण्याच्या कामी होण्याचा फुल्यांना धोका वाटत असलेला दिसतो. लोकांचे 'प्रतिनिधी' म्हणून काळे लोक, शूद्र-अतिशूद्र, शेतकरी हे कधीकाळी येणार असतील, तरच फुल्यांना त्यामध्ये रस होता. लोकप्रतिनिधींच्या निवडणुकीची कल्पना तेव्हा इतर विद्वानांना-सुद्धा नजीकच्या भविष्यकाळात प्रत्यक्ष व्यवहारिकतेच्या कक्षेत येण्याजोगी वाटत नव्हती. मतदार, मतदारसंघ, राजकीय पक्ष, उमेदवार या सर्व गोष्टी फार फार दूरच्या होत्या. सरकारने केलेली नियुक्ती-नेमणूक ही त्यामानाने समोर दिसणारी गोष्ट होती. पण त्यामध्ये शूद्र-अतिशुद्रांना स्थान मिळण्याचा प्रश्नच त्यावेळी अवास्तव होता! अशा परिस्थितीत फुल्यांच्या दृष्टीने लोकशाही, मतदानाचा हक्क, पार्लमेंटरी पद्धती इत्यादी गोष्टींना त्यामानाने गौणस्थान मिळाले असले; त्यांच्या कार्यक्रमात या गोष्टींना पुरेसे प्राधान्य, अग्रमान मिळाले नसले तर ते समजून घेतले पाहिजे.

फुल्यांना राजकारण कळत नव्हते, किंवा त्यांना राजकारणाचे वावडे होते, त्यांना राजकारणात रस नव्हता, असा निष्कर्ष यावरून काढणे नक्कीच चुकीचे ठरेल! आणि ते 'राजनिष्ठ' होते, त्यामुळे 'राष्ट्रीय' राजकारणाबद्दल ते उदासीन होते–इंग्रजांच्या शिकवणीने-चिथावणीने फुले या राष्ट्रीय चळवळीविरुद्ध उभे राहिले, असे म्हणणे तर दुष्ट विपर्यासच समजला पाहिजे. आजही कुणाचा तसाच आग्रह असेल तर त्यांना तत्कालीन राजकारणही समजले नाही; फुले तर मुळीच समजले नाहीत, समजणारही नाहीत, असेच म्हटले पाहिजे.

परिशिष्ट । ३

म. फुले आणि शिवाजी

सध्या शिवछत्रपतींच्या राज्यारोहणाच्या त्रिशताब्दी-महोत्सवाची धामधूम वर्षभर चालू आहे; त्यानिमित्ताने शिवकार्याचे खरे रहस्य समजून घेण्याऐवजी भलत्याच भारुड गोष्टींना आणि नसत्या दंतकथांना महत्त्व दिले जात आहे; आणि नव्या दंतकथाही जन्म घेत आहेत!

एकूण साऱ्याच समाजाने आणि देशाने आता शिवकार्याला मान्यता दिली आहे. खऱ्या फुलेभक्तांना याबद्दल अभिमान आणि आनंद वाटणे योग्यच आहे. पण शिव-चरित्र गाताना काही तारतम्य ठेवणे आवश्यक आहे, याचे भान, इतर सामान्य शिवभक्तांनी सोडले, तरी फुलेभक्तांनी सोडणे युक्त होणार नाही. याही-बाबतीत मूळ प्रश्न पुन्हा तोच येतो. देश कोणाचा—समाज कोणाचा—आणि त्याच-बरोबर शिवाजीही कोणाचा? हाच तो प्रश्न होय. शिवाजी मूठभर वरिष्ठवर्गीय हिंदूंचा—त्यातही ब्राह्मण-क्षत्रियांचा होता, की स्त्री-शूद्र-अतिशूद्रांचा होता? शिवकार्याचे खरे रहस्य शोधण्याच्या कार्यात फुल्यांचा काही आग्रह दिसतो का? म. फुले विद्वान नव्हते, व्यासंगी संशोधक नव्हते; तरी ते त्यांच्या काळाच्या आणि परिस्थितीच्या मानाने बरेच बहुश्रुत होते. आणि त्यांचा स्वतःचा असा एक खास स्वतंत्र दृष्टिकोन होता; त्यांची एक पक्की वैचारिक बैठक तयार झालेली होती. त्यांच्या एकूण लिखाणाचा विचार या दृष्टीने केला पाहिजे.

फुल्यांच्या विस्तृत लिखाणात शिवाजीमहाराजांचा उल्लेख वेगवेगळ्या संदर्भात वारंवार येणे अपरिहार्य होते; आणि त्या उल्लेखांवर फुल्यांच्या विशिष्ट भाषाशैलीची छाप पडणे हेही स्वाभाविकच होते. त्यांच्या लिखाणाचा एकूण संदर्भ ध्यानात न घेता, फुल्यांच्या शिवाजीविषयक उल्लेखांचा उपयोग किंवा दुरुपयोग काही लोक

आपापल्या सोयी-गैरसोयीप्रमाणे करताना आढळतात ! विशेषतः फुल्यांनी वेळोवेळी केलेल्या उल्लेखांतून शिवाजीबद्दल जी काही विशेषणे वापरली आहेत किंवा ज्या काही ऐतिहासिक घटनांचा त्यांनी ज्या रीतीने उल्लेख केलेला आहे, त्यांचा दुरुपयोग होऊ शकतो आणि तसा तो करून काही मंडळी फुले आणि शिवाजी या दोघांबद्दलही गैरसमज निर्माण करण्याचा खटाटोप करीत असतात ! म्हणून शिवाजीकडे बघण्याची म. फुल्यांची एकूण दृष्टी काय होती, हे त्यांच्या तत्कालीन लिखाणाच्या आणि शैलीच्या संदर्भातच समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

'अज्ञानी, अक्षरशत्रू, धर्मभोळा-शूद्र' वगैरे विशेषणे शिवाजीच्या संदर्भात फुल्यांनी वापरलेली आढळतात; त्याचप्रमाणे औरंगजेब, अफजलखान यांना केवळ काळ्याकुट्ट स्वरूपातच फुल्यांनी बघितले नव्हते, हेही खरेच आहे. शिवकार्यासंबंधीच्या काही रूढ कल्पनांबाबत फुल्यांचा आक्षेप असावा असेही दिसते; आणि फुल्यांच्या दृष्टीने आक्षेपार्ह ठरणाऱ्या काही गोष्टींबद्दल रामदास, गागाभट्ट, दादोजी कोंडदेव वगैरे शिवाजीचे तथाकथित गुरु किंवा सल्लागार जबाबदार आहेत, अशी फुल्यांची समजूत दिसते.

फुल्यांनी शिवाजीचा उल्लेख अनेकदा केला असला तरी त्यांनी शिवाजीबद्दल किंवा त्याच्या एकूण कार्याबद्दल समग्र किंवा संतुलित असे स्वतंत्रपणे काहीच लिहिलेले नाही, हीही गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे. त्यामुळे त्यांनी केलेले शिवाजीसंबंधीचे उल्लेख त्या त्या विवेचनाच्या-प्रतिपादनाच्या संदर्भातच समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे, हे उघड आहे.

या दृष्टीने बघितले तर स्थूलमानाने काही गोष्टी तरी स्पष्ट होण्यासारख्या आहेत.

शिवाजी-हिंदुराज्य संस्थापक ?

पहिली गोष्ट अशी की, जनमानसात शिवकार्यासंबंधी जी काही स्थूल कल्पना असते, त्यापेक्षा फुल्यांची कल्पना फार वेगळी होती. अर्थात् एक लोकोत्तर शूर वीरपुरुष; जन्मजात जननेता, स्वराज्य-संस्थापक, लोककल्याणाची सदैव काळजी वाहणारा राज्यकर्ता या विविध नात्यांनी शिवाजीची व शिवकार्याची जी महती आहे, ती फुल्यांना निःसंशय मान्य होती. पण शिवकार्याची आणखी एक आणि सर्वाधिक महत्त्वाची बाजू म्हणून जी काहीजणांकडून सतत आणि पद्धतशीरपणाने मांडण्यात येते ती फुल्यांना बिलकूल मान्य नव्हती. आणि त्यांना त्याबद्दल कौतुकही नव्हते. ती गोष्ट म्हणजे शिवाजी हा हिंदुधर्मरक्षक होता, त्याचे राज्य हे हिंदुधर्मराज्य होते; तो गो-ब्राह्मण प्रतिपालक, क्षत्रीय कुलावतंस छत्रपती होता इत्यादी.

शिवकार्याच्या या स्वरूपासंबंधी किंवा जनमानसात घट्ट रुजविलेल्या या त्याच्या प्रतिमेसंबंधी किंवा त्याच्या छत्रपतीच्या बिरुदावलीसंबंधी फुल्यांची दृष्टी काय होती, हे समजून घेतले पाहिजे. मुळात चातुर्वर्ण्याधिष्ठित हिंदुधर्माबद्दल किंवा त्याच्या

विषम, अन्याय्य, जातिनिष्ठ समाजरचनेबद्दल फुल्यांना यत्किंचितही प्रेम तर अर्थात नव्हतेच. उलट, त्यांचा तिला प्रखर, जळजळीत विरोधच होता. त्यामुळे इतिहासकाळात हिंदुधर्माचा जो ऱ्हास झाला–पराभव झाला, त्याबद्दल फुल्यांना खेद नव्हता; खंतही नव्हती. किंबहुना हिंदुधर्माच्या व समाजाच्या या स्वरूपामुळेच परकीय आक्रमणापुढे तो समाज सतत हतबल ठरला व त्याचा पराभव झाला, याबद्दलही फुल्यांच्या मनात शंका नव्हती. वारंवार झालेल्या पराभवांपासून धडे घेऊन हा चातुर्वर्ण्याधिष्ठित हिंदुधर्म–समाज सुधारेल किंवा त्याचे उच्चवर्णीय नेते त्याला कधीकाळी सुधारू देतील अशी फुल्यांना यत्किंचितही आशा वाटत नव्हती. शेकडो वर्षे सुधारकांना हिंदुसमाजाने कसे पचविले किंवा बंडखोरांचा त्याने कसा समूळ आणि निष्ठुरपणे नायनाट केला, हेही फुल्यांना नीट ठाऊक होते. परिणामी, फुल्यांना या हिंदुधर्माबद्दल–समाजाबद्दल खास प्रेम नव्हते, किंवा इतरांबद्दल, इतर समाजाबद्दल इतर धर्मांबद्दल त्यांना खास द्वेषही वाटत नव्हता. म्हणूनच मुसलमानी आक्रमणाबद्दल किंवा मुसलमान धर्माच्या प्रसाराबद्दल फुल्यांना फारसा विषाद वाटत नसावा किंवा त्या धर्मांबद्दल द्वेष किंवा आकस त्यांच्या मनात नक्कीच नव्हता. किंबहुना मुसलमान हे आक्रमक असले, जुलमी असले, तरी त्यांची विचारधारणा व समाजरचना अधिक न्याय्य, समतेला अधिक जवळची होती, असेच फुल्यांना वाटत असावे. आणि याच दृष्टीने ते मुस्लीम आक्रमणांकडे आणि धर्मप्रसाराकडे बघत होते. शिवाय, मुसलमान व त्यांचा इस्लामी धर्म हे या देशांत शेकडो वर्षांपासून कायम झाले आहेत, येथील समाजाचा तो एक कायम आणि अविभाज्य भाग बनला आहे, अशीच फुल्यांची धारणा होती.

गोब्राह्मण-प्रतिपालक–क्षत्रीय कुलावतंस वगैरे

अशा दृष्टीने पाहिले तर, हिंदुधर्माचे (म्हणजेच चातुर्वर्ण्याचे) आणि हिंदुसमाजरचनेचे (म्हणजेच विषम जातिनिष्ठ व्यवस्थेचे) पुनरुज्जीवन म्हणजे काही महान् कार्य असे फुल्यांना वाटणे शक्यच नव्हते. आणि शिवाजीने जर हेच एकमेव कार्य केले किंवा तेच त्याचे तथाकथित 'अवतार-कार्य' होते, असा जर कोणाचा दावा असेल, तर त्याबद्दल फुल्यांना उत्साह वाटण्याचे कारण नव्हते! त्यांतही 'शूद्र' तुकारामाला बाजूला सारून किंवा त्याच्याकडे दुर्लक्ष करून शिवाजीने रामदासाला गुरु केला, (म्हणजेच त्याच्या ब्राह्मण वर्णश्रेष्ठत्वाला मान्यता दिली.) हीच शिवकार्याची मोठी महती जर कोणाला वाटत असेल, तर फुल्यांना त्याहीबद्दल उत्साह वाटण्याचे कारण नव्हते! त्याचप्रमाणे राज्यारोहणापूर्वी गागाभट्टाला तुलादान देऊन (म्हणजेच भरपूर भारंभार सुवर्ण-दक्षिणा देऊन) शिवाजीने वर्णलोपाबद्दल प्रायश्चित्तपूर्वक विविध संस्कार करून घेतले असतील, तर त्यामुळे फुल्यांच्या धर्मभावना उचंबळून येण्याचे काहीच कारण नव्हते! त्याचप्रमाणे छत्रपती झाल्यानंतर गोब्राह्मण–प्रतिपालक–क्षत्रीयकुलावतंस ही विरुदे लावण्याने, शिवाजीची महती काही वाढते

किंवा त्यामुळे त्याचा काही खास गुणगौरव होतो, असेही वाटण्याचे फुल्यांना कारण नव्हते! किंबहुना, गागाभट्टाने प्रायश्चित्तपूर्वक केलेले वेदोक्त संस्कार आणि वरील दोन विरुदे यामुळे चातुर्वर्ण्याधिष्ठित हिंदुधर्माचा आणि विषम वर्णव्यवस्थेचा पुनरुद्धार होण्याला अनुकूल असेच वातावरण व जनमानस तयार होणे शक्य आहे, अशी फुल्यांना भीती वाटत असल्यास, ते तसेच समजून घेतले पाहिजे.

फुल्यांचा शिवचरित्रावरील पोवाडा

फुल्यांनी शिवाजीवर स्वतंत्रपणे लिहिले आहे ते अगदी वेगळ्याच स्वरूपातले आहे. ते म्हणजे शिवचरित्रावरील पोवाड्याच्या स्वरूपात. या पोवाड्याचा हेतूही फुल्यांच्या इतर लिखाणापेक्षा जरा वेगळ्या स्वरूपाचा आहे. 'माळी कुणब्यास समजणाऱ्या' सोप्या भाषेत शिवचरित्र सांगण्याची प्रतिज्ञा करूनच फुल्यांनी हा पोवाडा लिहिला आहे. त्याकाळी फुल्यांना जी काय माहिती किंवा साधनसामुग्री उपलब्ध होती, त्याचा कसोशीने मागोवा घेऊनच फुल्यांनी या पोवाड्यात शिवचरित्र सांगितले आहे. अर्थात्, त्यातही फुल्यांचा एकूण दृष्टिकोन मधून मधून व्यक्त होतोच.

पोवाड्याचे नाव किंवा शीर्षकांमध्येही फुल्यांचे वैशिष्ट्य दिसते. 'छत्रपती शिवाजीराजे भोसले' असे पोवाड्याचे शीर्षक आहे. त्यात शिवाजीचे 'छत्रपती' हे विरुद अर्थात् आहेच–आणि 'शिवाजीराजे भोसले' हे साधे नाव व कुलनामही पण आहे. याशिवाय 'कुळवाडीभूषण' हे नवे विरुद फुल्यांनी शिवछत्रपतीसाठी खास निर्माण केलेले आहे!

कुळवाडीभूषण—

शिवाजीवरील एकूण पोवाड्यामध्ये 'क्षत्रिय कुलावतंस' किंवा 'गोब्राह्मण प्रतिपालक' ही विरुदे अजिबात गाळली आहेत; आणि 'कुळवाडीभूषण' हेच विरुद दिमाखाने आणि प्रामुख्याने मिरविले आहे! पोवाड्याचा एकूण रागरंग, रचना आणि रोख याच विरुदावर केंद्रित झालेला आहे.

पोवाड्याच्या अखेरीला शिव-निधनानंतर जो शोक व्यक्त केला आहे, तोही कुळवाड्यांनीच; फुल्यांनी तो गायिला आहे कुळवाड्यांच्या मुखानेच! कुळवाड्यांच्या या शोकाच्या निमित्ताने ज्या दहा-वीस ओळी फुल्यांनी लिहिल्या आहेत, त्यात शिवचरित्राचे आणि कार्याचे सार-सर्वस्व आणि खरेखुरे रहस्य साठविले आहे. (आज १०५ वर्षांनंतरही मराठी कुळवाड्यांना आणि शोषित–दलित–श्रमिक जनतेला, फुल्यांचे हे 'शिव-चरित्र-मानस' खचित मार्गदर्शक आणि स्फुर्तिप्रद ठरणारे आहे.–अर्थात त्यांनाच; शिवचरित्राचा बाजार करणाऱ्या वरिष्ठवर्णीय–वर्गीय सत्ताधाऱ्यांना नव्हे किंवा त्यांच्या भाडोत्री भाटांनाही नव्हे!)

पोवाड्याच्या प्रारंभाच्या पहिल्या ओळीचा पहिला शब्दच 'कुळवाडीभूषण' हा आहे. "कुळवाडीभूषण हा पवाडा गातो! भोसल्याचा छत्रपती शिवाजीचा"

ही पालुपदाची ओळ असल्यामुळे तिच्यातील 'कुळवाडीभूषण' या विशेषणात व्यक्त झालेला विशिष्ट आशय फुल्यांना विशेष जोर देऊन व्यक्त करावयाचा होता, हे उघड होते. क्षत्रियकुलावतंस, गोब्राह्मण प्रतिपालक, हिंदुपद-पातशाहीचे संस्थापक इत्यादी शिवाजीच्या तथाकथित बिरुदांकडे दुर्लक्ष करून फुल्यांनी शिवचरित्राचे मुख्य रहस्य 'कुळवाडीभूषण' या संदर्भात आवर्जून व्यक्त केले आहे. प्रत्यक्ष पोवाड्याच्या पहिल्या ओळीतही शिवकार्याचे रहस्य स्पष्ट करणारा आणखी एक उल्लेख आहेः 'लंगोट्यास देई जानवी पोशिंदा कुणब्यांचा.' शिवकार्याच्या तत्कालीन प्रचलित मानीव कल्पनांपेक्षा फुल्यांच्या कल्पना किती वेगळ्या होत्या आणि त्या कष्टकरी जनतेशी–शूद्र-अतिशुद्रांशी किती निकटपणे निगडित होत्या, ही गोष्ट यावरूनही पोवाड्याच्या प्रारंभीच स्पष्ट होते.

आता पोवाड्यातील इतर काही तपशील बघू. दादोजी कोंडदेवाने शिवाजीला मामुली ब्राह्मणी संस्कारांपेक्षा जास्त काही खास शिकविलेले नाही; 'मासा पाणीं खेळे–गुरू कोण त्याचा?' असा साधा सवाल करून फुल्यांनी दादोजी कोंडदेवाला शिवाजीचा आद्यगुरू–स्फुर्तिदाता समजणाऱ्यांचा भ्रमनिरास केला आहे. अफजूलखान प्रकरणी शिवाजीने जो 'दंगा' केल्याचा बोभाटा चालतो, त्याची जबाबदारी फुल्यांनी फितूर वकील गोपीनाथपंतावर टाकली आहे. रामदास, गागाभट यांच्यावर फुल्यांचा विशेष आक्षेप असणे स्वाभाविकच होते, त्यासंबंधीचे उल्लेख वर आलेच आहेत.

जिजाबाई–सईबाई

या पोवाड्यात शिवचरित्र सांगताना केवळ फुल्यांनाच सुचू शकतील असे काही उल्लेख आहेत. जिजाईचा उल्लेख करीत असता, शहाजीराजांनी नवी सवत आणली आणि जिजाईवर जन्माचा अन्याय केला; या गोष्टींचा फुल्यांनी अगदी खोचून उल्लेख केलेला आढळतो! नवी सवत येणे आणि त्यामुळे पराक्रमी नवऱ्याकडून आपली उपेक्षा होणे, या मानी स्त्रीच्या जिव्हारी भिडणाऱ्या शल्याचे वर्णन फुल्यांनी जितक्या सहानुभूतीने तितक्याच पोटतिडकीने केलेले आहे. शिवाजीची प्रथम पत्नी सईबाई हिच्याकडे बहुतेकांचे दुर्लक्ष होते; पण शिवाजी–सईबाई यांच्या दांपत्यप्रेमाचे मनोहर वर्णन फुल्यांनी केले आहे. त्याचप्रमाणे शिवाजी–सईबाईचा सल्ला घेत असे, असेही आवर्जून म्हटले आहे. शिवाजीने आपल्या राज्यात स्त्रीला खरेखुरे अभयदान दिले–– खऱ्या अर्थाने निर्भय केले या गोष्टीची अपूर्वाई अर्थात्च फुल्यांना विशेष वाटावी, हे स्वाभाविकच आहे. शिवाजीच्या कल्याणकारी राज्यांचे अनेक पैलू वर्णन करताना, त्याने सगळ्यांच्या–शत्रूच्यासुद्धा औषधपाण्याची व्यवस्था केली, या गोष्टीचा (इतरांना सहसा न सुचणारा) उल्लेख केला आहे. शिवाजीचा तिसरा भाऊ, 'दासीपुत्र' संताजी याला

शिवाजीने जवळ केला, मोठा राज्याधिकार दिला, या सहसा कोणाला न आठवणाऱ्या उपेक्षित घटनेचा उल्लेख केवळ फुल्यांनाच सुचण्यासारखा आहे !

फुल्यांनी आपल्या पोवाड्यात भाकड दंतकथांना स्थान देण्याचे कटाक्षाने टाळले आहे. भवानीचा साक्षात्कार आणि तिने आशीर्वाद देऊन भवानी तलवार शिवाजीला देण्याची भाडोत्री भाटांची लाडकी भाकडकथा फुल्यांच्या पोवाड्यात अर्थात्‌च आढळत नाही ! किंवा प्रत्येक आपत्तीच्या किंवा प्राणसंकटाच्या प्रसंगी भवानीमाता साहाय्यास धावली आणि तिने साक्षात् दर्शन देऊन शिवाजीला तपशीलवार मार्गदर्शन केले, वगैरे प्रकारही या पोवाड्यात नाहीत. त्याचप्रमाणे शिवाजी गुरु रामदासांकडे वारंवार जातो आणि अध्यात्मिक शांतीबरोबरच राजकीय सल्लामसलतही अगदी तपशीलवार करून येतो इत्यादी बनावट कथाही अर्थात्‌च या पोवाड्यात बाद झाल्या आहेत.

राज्यारोहणाच्या महोत्सवाला आजही आपण इतके महत्त्व देतो; पण फुल्यांनी आपल्या हजार-बाराशे ओळींच्या पोवाड्यात राज्यारोहणाची बोळवण चारसहा ओळींतच केलेली आढळते ! मात्र प्रत्यक्ष राज्यारोहणापूर्वीच कित्येक वर्षे शिवाजीने आपली स्वतंत्र सत्ता प्रस्थापित केली होती; त्या स्वस्थापित राजसत्तेचे प्रतीक म्हणून, शिक्कामोर्तब सुरू केले होते, या गोष्टींची दखलही फुल्यांनी आवर्जून घेतलेली दिसते.

राज्यारोहणासंबंधी आणखी एक गोष्ट मुद्दाम सांगितली पाहिजे. कारण, आज त्या निमित्ताने एक नवी दंतकथा इतिहास म्हणून खपवून नेण्याचा प्रयत्न चाललेला दिसतो. ती म्हणजे गागाभट्टासंबंधी. जणू काय गागाभट्ट जन्मभर स्वराज्य-स्थापनेच्याच चिंतेमध्ये मग्न होता; जणूकाय शिवछत्रपतींच्या प्रयत्नांना समांतर असे त्याचेही प्रयत्न, त्याच्या परीने, जन्मभर चालूच होते ! असा भास काही तथाकथित शिवभक्त निर्माण करीत आहेत ! या मंडळींच्या या नव्या दंत-कथनाच्या उपक्रमास उतारा म्हणून फुल्यांच्या पोवाड्यातील गागाभट्टासंबंधीचा उल्लेख वाचनीय ठरेल !

फुल्यांच्या लिखाणात विविध संदर्भात आलेले शिवाजीसंबंधीचे वेगवेगळे उल्लेख—त्याचप्रमाणे 'छत्रपती शिवाजीराजे भोसले' यांच्या पोवाड्यात त्यांनी गायिलेले शिवचरित्र, या दोन्हींमधून एकत्र होत असलेले शिवदर्शन संकलितपणे ध्यानात घेऊनच, फुल्यांना दिसलेला शिवाजी आज आपण पाहिला पाहिजे. तेव्हा लोकोत्तर वीरपुरुष, स्वराज्यसंस्थापक, कल्याणकारी राज्यकर्ता, इत्यादी नात्यांनी शिवाजीची महत्ता फुल्यांना मान्य होती आणि या शिवाजीचे गुणगान फुल्यांनी शिवाजीवरील पोवाड्यात मुक्तकंठाने केलेले आहे. पण गोब्राम्हण प्रतिपालक, क्षत्रिय कुलावतंस हिंदुराज्यसंस्थापक म्हणूनच जर कोणी शिवाजीला अवतारी पुरुष ठरविणार असेल, तर ते फुल्यांना साफ नामंजूर होते. शिवाजीकडे आणि त्याच्या कार्याकडे बघण्याची फुल्यांची दृष्टी स्थूलमानाने अशी होती.

परिशिष्ट । ४

विष्णुबुवा ब्रह्मचारी आणि त्यांचे आदर्श कल्पनाचित्र– –इतके मौलिक विचार वांझ का ठरले ?

केवळ विचारांच्याच दृष्टीने पाहिले तर फुले आणि लोकहितवादी या दोघांनाही अगदी समकालीन असा आणखी एका विचारकाचा उल्लेख करणे अपरिहार्य आहे. तो विचारक म्हणजे विष्णुबुवा ब्रह्मचारी हा होय.

विष्णुबुवा ब्रह्मचारी हे खऱ्या अर्थाने विचारकही नव्हते; क्रांतिकारक तर नव्हतेच नव्हते. जणू काय आपल्याला कसलातरी साक्षात्कार झाला आहे, अशा झपाटलेल्या अवस्थेत त्यांनी आपले लोकविलक्षण विचार लिहून ठेवलेले आहेत.

त्यांच्या विचारांची झेप आणि झपाटा पाहिला तर आजही खरोखरच विस्मय वाटावा ! त्यांनी जवळजवळ प्रत्येक विषयावर काही ना काही लोकविलक्षण विचार नमूद केलेले आढळतात. त्यांच्याकाळी कोणालाही न सुचलेल्या विषयासंबंधी कोणालाही न सुचू शकणारे विचार, त्यांनी बेधडक मांडलेले आहेत !

आदर्श समाजाचे कल्पनामय चित्र

'सुखदायक राज्यप्रकरणी निबंध' या आपल्या निबंधांत आदर्श वाटणाऱ्या समाजाचे सर्वांगीण चित्रच त्यांनी रेखाटलेले आहे. सर्व देशाचा म्हणून सर्वांगीण विचार करून नियोजन करावे; जमिनीचे गुणविशेष, हवामान, पर्जन्य ध्यानात घेऊन सर्व जमिनीची लागवड करावी; उत्पादन सामुदायिक, उत्पन्नही सर्वांच्या मालकीचे, वितरण प्रत्येकाच्या गरजेप्रमाणे या आशयाचा कम्युनिस्ट मॅनिफेस्टो-मधील विचार विष्णुबुवांनी आपल्या शब्दांत जवळजवळ त्याच सुमारास म्हणजे १८५० मध्ये मांडलेला पाहिला म्हणजे आश्चर्य वाटते ! प्रत्येकाने आपल्या

मगदूराप्रमाणे–कुवतीप्रमाणे काम करून सामाजिक उत्पादनात भर घालावी आणि प्रत्येकाला त्याच्या गरजेप्रमाणे समाजाने द्यावे, हा श्रेष्ठ विचार विष्णुबुवांच्या लिखाणात प्रकर्षाने आलेला आहे. सर्व निसर्गनिर्मित गोष्टी (म्हणजे जमीन, खनिज-संपत्ती, पाणी वगैरे) आपोआपच सर्व समाजाच्या मालकीच्या होतात; त्यावर खाजगी मालकी असू नये, करही असू नयेत, हा विचार त्यांनी निःसंदिग्धपणे मांडलेला आहे. त्याचप्रमाणे राजा हा लोकनियुक्त शासनाधिकारी असावा, लोकांना वाटल्यास तो बदलता यावा, हीही त्यांची घोषणा होती. हजारो वर्षे चालत आलेल्या आणि जवळजवळ निसर्ग-नियमाइतकाच अपरिवर्तनीय म्हणून समाजाने स्वीकारलेल्या खाजगी मालमत्ता, राजसत्ता वगैरे गोष्टींबाबत विष्णुबुवांनी वरील मूलभूत क्रांतिकारक विचार अगदी सहजतेने मांडलेले आढळतात !

पण विष्णुबुवा केवळ असे मूलभूत पण (सर्वसामान्य तत्त्वरूप) दूरचे विचारच सांगून थांबलेले नाहीत; तर तत्कालीन समाजाच्या अगदी हाडीमासी खिळलेल्य काही दृढमूल रूढींना मुळापासून धक्का देणारे काही विचारही विष्णुबुवांनी बिनदिक्कत मांडले आहेत. उदा. ' महार दरवाजाबाहेर आणि ब्राह्मण आतमध्ये, असा पक्षपात करू नये, असे त्यांनी स्पष्टपणे म्हटले आहे ! शिक्षण सर्वांना–अगदी सर्व प्रजेला–जातीभेद किंवा स्त्रीपुरुष भेद न मानता सर्वांना द्यावे, असे त्यांनी पुन्हा पुन्हा सांगितले आहे.

स्त्री-मुक्तीचा उद्‌गाता

स्त्री-पुरुष संबंध–विवाह याबद्दल त्यांनी पुन्हा पुन्हा मांडलेले विचार वाचले म्हणजे तर मन आजही थक्क होते.

सर्व विवाह सरकारी खात्यांमार्फत व्हावेत, ते खऱ्याखुऱ्या ' स्वयंवर ' पद्धतीने–म्हणजे स्त्री-पुरुषांच्या परस्पर संमतीने आणि पसंतीने व्हावेत; कोणत्याही परिस्थितीत विषम-विवाह (जरठ कुमारी विवाह) होऊ नयेत, असा त्यांनी आग्रह धरला. पती-पत्नींना जोपर्यंत मान्य असेल तोपर्यंतच विवाहबंधन असावे; अन्यथा घटस्फोट सुखेनैव करावा, घटस्फोटानंतर पुनर्विवाह करण्यास दोघेही मोकळे असावेत, असे क्रांतिकारक विचार त्यांनी पुनःपुन्हा मांडलेले आढळतात. या दृष्टीने पाहिले तर आधुनिक काळात स्त्री-मुक्तीचा, स्त्रीच्या समान हक्काचा निःसंदिग्ध पुरस्कार करण्याचे श्रेय विष्णुबुवांनाच दिले पाहिजे. विष्णुबुवांच्या आदर्श समाजव्यवस्थेत शिशुसंगोपनापासून तो तहत सर्व शिक्षणाची आणि नंतर तरुणांना व्यवसाय उपलब्ध करून देण्याची संपूर्ण जबाबदारी शासन-संस्थेने (सरकारी खात्याने) घेतली पाहिजे, असा दंडक घातलेला आढळतो.

गेल्या शतकाच्या मध्याच्या सुमारास विष्णुबुवांनी आपली ही सर्वांगीण क्रांतिकारक मते हिरीरीने पुढे मांडली. एका अर्थाने लोकहितवादी आणि फुले यांना समांतर असे हे नवमत-प्रतिपादन होते आणि आपल्या या लोकविलक्षण विचारांच्या

प्रचाराचे कार्य विष्णुबुवांनी जन्मभर म्हणजे १८७१ पर्यंत सतत केले. पण या विचारांचा प्रभाव महाराष्ट्रावर यत्किंचितही पडलेला दिसत नाही! त्यांचे विचार तत्कालीन ब्राह्मण समाजापर्यंत तरी पोचले असले पाहिजेत. पण त्यामुळे कुठे प्रक्षोभही माजलेला दिसत नाही; किंवा त्यांना कुणी अनुयायीही लाभलेले आढळत नाहीत! समकालिनांच्या विचारांवर त्यांचा प्रभाव पडल्याची तर अजिबात कुठे नोंद नाही.

एवढे मौलिक विचार वांझ का ठरले?

एवढे मूलभूत क्रांतिकारक सर्वस्पर्शी विचार धडाक्याने मांडले जातात; पण (जल-ताडन-वत्) त्याचा अजिबात परिणाम दिसत नाही, हा काय चमत्कार आहे? या विलक्षण प्रकाराचे कारण असे दिसते की, विष्णुबुवांची आणि त्यांच्या विचारांची कुणी गंभीरपणे दखलच घेतली नाही! एखाद्या विक्षिप्त फटकळ माणसाने तोंडाला येईल ते बडबडत फिरावे, लोकांनी त्याची बडबड गंमत म्हणून ऐकावी, कंटाळा आला तर ऐकू नये; त्यांच्या एखाद्या विलक्षण विचाराचे वाटल्यास मधून मधून कौतुकही करावे; पण त्यांच्या विचारांपासून कोणालाही (प्रस्थापिताच्या कोणत्याही अंगाला) धोका मात्र वाटू नये, असे काहीतरी झाले असावे! समाजाने विष्णुबुवांबद्दल अशी वृत्ती धारण करावी, याला आणखीही एक अनुकूल कारण असावे. ते हे की, विष्णुबुवा हे ख्रिस्ती मिशनऱ्यांचे पक्के शत्रू होते. मिशनरी आणि त्यांचे प्रचारक हिंदुधर्म आणि त्यातील दोषांबद्दल जो प्रचार करीत, त्यांना उत्तर देण्याचे कार्य विष्णुबुवांनी आपल्या अंगावर आपण होऊन घेतले होते. आणि हे काम तत्कालीन ब्राह्मण समाजाला अगदी पसंत पडण्यासारखेच होते! मिशनऱ्यांना चपखल उत्तरे देताना किंवा उलट ख्रिस्तीधर्मातील धर्मभोळेपणा आणि मूर्ख रुढींचा दंभस्फोट करताना विष्णुबुवांच्या वावदूकपणाला भलतीच धार चढे! यामुळे धर्मनिष्ठ हिंदु-ब्राम्हण अगदी खूष होत.

ख्रिस्ती मिशनरी हिंदुधर्माच्या नाजुक वर्मांवर जे हल्ले करीत त्यापासून हिंदु-धर्माचा बचाव करण्यासाठी विष्णुबुवा आपल्या मताने एका आदर्श, न्यायी, सुखी समाजाचे कल्पनाचित्र काढीत. खरा वेदप्रणित समाज असा आदर्शभूत होता; आजच्या अधःपतित हिंदुसमाजावरून आमची किंमत करू नका; (आणि ख्रिस्ती-धर्मात तरी काय कमी धर्मभोळेपणा, विकृती, भ्रष्टाचार, विषमता आहे!) असा विष्णुबुवांच्या वावदुकी प्रतिपादनाचा रोख असे. तेव्हा ख्रिस्ती टीकाकारांना सडेतोड उत्तर देऊन हिंदुधर्माचा बचाव करणारा प्रभावी प्रचारक म्हणून सनातनी समाजाला विष्णुबुवा प्रिय होते. मग हिंदुधर्माच्या समर्थनार्थ ते प्रत्यक्ष काय काय बोलतात, याबद्दल त्या समाजाला फारशी फिकीर नव्हती! शिवाय, एक आदर्श, न्यायी, सुखी समाजाचे चित्र जर विष्णुबुवा वेदांतून काढून दाखवू लागले, तर त्याबद्दल हिंदु-समाजाला विपरीत वाटण्याचे कारणच नव्हते. किंबहुना वेदांत सर्व काही आहे, आगगाड्या, तारायंत्रे, विमाने, तोफा वगैरे अत्याधुनिक शोध आम्ही वेदकाळी

केव्हाच लावले होते, या कल्पनेमुळे तत्कालीन पराभूत समाजाची अस्मिता आतल्या-आत खुलत असे–सुखावत असे. त्याचप्रमाणे स्वातंत्र्य–समता–न्याय वगैरे काही आधुनिक सुधारणाही वेदकालीन समाजात होत्या, असे कोणी हिंदुधर्माच्या समर्थनार्थ सांगू लागला तर त्यात विशेष आक्षेपार्ह असे वाटण्याचे समाजाला कारण नव्हते! तेव्हा विष्णुबुवांचा मुख्य उपयोग ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या प्रचाराला परखड उत्तर देण्यापुरताच समाजाला मान्य होता; समाजाने तेवढ्यापुरतेच त्याचे कौतुक केले. बाकी आदर्श समाजाचे चित्र रेखाटताना विष्णुबुवांनी काही विक्षिप्त–विलक्षण मते मांडली असतील, तर त्याकडे संपूर्णपणे दुर्लक्ष करावयाला—त्यांची अजिबात उपेक्षा करायला समाज मोकळाच होता! आणि समाजाने नेमके तेच केले! म्हणूनच विष्णुबुवांचे विचार आज पुस्तकात वाचताना कितीही क्रांतिकारक आणि मौलिक वाटले तरी तेव्हा त्यामुळे यत्किंचितही प्रक्षोभ माजला नाही; त्यांना अजिबात विरोध झाला नाही, सामाजिक-राजकीय-आर्थिक प्रस्थापिताला त्यामुळे यत्किंचितही धोका वाटला नाही; आव्हान निर्माण होऊ शकले नाही!

तेव्हा विचार नुसते मूलभूत किंवा क्रांतिकारक असून भागत नाही; त्यामुळे प्रस्थापिताला धोका उत्पन्न व्हावा लागतो; जनमानसाची त्याने पकड ध्यावी लागते; प्रस्थापित शक्तींना जबरदस्त आव्हान उत्पन्न व्हावे लागते! असे झाले किंवा तसे होण्याची चिन्हे दिसू लागली, तरच मग प्रक्षोभ उत्पन्न होतो, क्रांतिकारक विचार मांडणाराचा छळ सुरू होतो, त्याच्याविरुद्ध निंदा-नालस्तीची,–विपर्यासाची, किंवा चारित्र्य-हननाची जबरदस्त मोहीम चौफेर सुरू होते! महात्मा फुल्यांच्या किंवा काही प्रमाणात लोकहितवादी किंवा आगरकरांच्या बाबतीत हे घडले. पण विष्णुबुवा ब्रह्मचाऱ्यांच्या बाबतीत तसे काही एक घडलेले दिसत नाही!

महत्त्व आणि मर्यादा

तेव्हा विष्णुबुवांचे मौलिक विचार केवळ कागदावर राहिले किंवा वाऱ्यावर विरून गेले! त्यांचा प्रत्यक्ष परिणाम यत्किंचितही कुठेही झालेला दिसत नाही! क्रांतिकारक कृतीवाचून नुसते मौलिक विचार केवळ वांझ ठरतात; त्यांना आगा-पिच्छा काही राहात नाही; आपोआप अनुयायी मिळत नाहीत; जनमानसाची पकड आपोआप घेतली जाऊ शकत नाही! ते केवळ कागदी घोडे ठरतात; त्यामुळे फार तर मनोरथ आभाळात धावू शकतात; आणि केवळ तेवढाच दिलासा ज्यांना पुरेसा वाटतो, त्यांना त्यांचे कौतुक वाटते!

विष्णुबुवांच्या विचारांच्या बाबतीत असेच काहीसे घडलेले असावे. शिवाय ते विचार शास्त्रीय नव्हते, पूर्व इतिहासाच्या किंवा तत्कालीन समाजस्थितीच्या खोल अभ्यासातून ते जन्माला आलेले नव्हते; किंवा अंतःकरणाला पीळ पडून उमटणारे ते आर्त उद्‌गार नव्हते किंवा अन्यायाबद्दलच्या आत्यंतिक चिडीने पेटून निघालेले ते

जळते आणि जाळते स्फुर्ति-स्फुल्लिंगही नव्हते. म्हणून एका आदर्श समाजरचनेचे ते केवळ कल्पनाचित्र ठरले; त्याला परंपरा नव्हती; किंवा नवीन परंपरा निर्माण करण्याचे सामर्थ्यही त्यामध्ये नव्हते. असे विचार उचलून धरून त्यांच्या आधारावर प्रचंड जन-आंदोलन उभे करणाऱ्या क्रांतिकारक जन-शक्तींची विष्णुबुवांना कल्पना नव्हती; तसा त्यांनी कधी शोधही केलेला दिसत नाही. म्हणूनच त्यांच्या मौलिक विचारांना समाजशक्तींच्या आधाराची–आचाराची जोड मिळण्याचा प्रश्नच कधी त्यांच्यापुढे उपस्थित झाला नाही !

विष्णुबुवा ब्रह्मचाऱ्यांच्या तेव्हा लोकविलक्षण वाटणाऱ्या विचारांचे आज कौतुक करताना हे भान सतत ठेवले पाहिजे. त्यामुळेच विष्णुबुवाच्या विचाराचे महत्त्व आणि त्याचप्रमाणे त्यांच्या अपरिहार्य मर्यादाही ध्यानात येतील.

परिशिष्ट । ५

'' जोती म्हणे ''—फुल्यांची काव्यरचना !

फुल्यांचे नाव गेली शंभर वर्षे सतत गाजत आहे. त्यांच्या विचारांबद्दल लिखाणाबद्दल सतत बरी-वाईट, उलट-सुलट चर्चाही चालू असते.

पण फुल्यांचे मूळ लिखाण प्रत्यक्ष वाचून किती लोक बोलत असतील, याबद्दल शंकाच आहे ! बहुतेक सारी चर्चा सांगोवांगीवर !—त्यांच्या विचारा-लिखाणाबद्दल विरोधक किंवा अनुयायी यांच्या ज्या काही ऐकीव-मानीव कल्पना असतील, त्यावरूनच ! हा प्रकार अगदी 'जाणकार' म्हणून सभजल्या जाणाऱ्या 'अधिकृत' विद्वानांबद्दलही खुशाल संभवतो !

जोतीबांची उपेक्षित काव्यरचना !

याचे प्रत्यक्ष प्रमाण म्हणजे फुल्यांच्या कवितेची झालेली संपूर्ण शंभर टक्के उपेक्षा, ही होय ! फुल्यांबद्दल आणि त्यांच्या लिखाणाबद्दल इतका अखंड बोलबाला सतत चालू असतो, पण जोतीबा नामक कोणी कवी होते; त्यांनी बऱ्याच मोठ्या प्रमाणावर जन्मभर काव्य-रचना केलेली आहे; आपल्या दृष्टीने जोतीबा त्या रचनेला विशेष महत्त्व देत होते, या गोष्टींकडे त्यांच्या अनुयायांनी किंवा विद्वानांनीसुद्धा 'अगदी' संपूर्ण दुर्लक्ष केलेले आहे. कवी म्हणून फुल्यांचे नाव अनुल्लेखाने पुसून टाकण्याच्या कामी, त्यांचे विरोधक-अनुयायी,-त्याचप्रमाणे विद्वान-संशोधक या सर्वांचेच व्यवहारतः तरी अगदी एकमत असलेले दिसते !

पण खरी गोष्ट अशी आहे की, फुल्यांनी जन्मभर विपुल काव्य-रचना केलेली आहे. काही विशिष्ट लोकप्रिय पद्य-प्रकारांचा त्यांनी अगदी हेतुपूर्वक वापर केलेला आहे. विशेषतः पोवाडा, अभंग (अभंगाला त्यांनी 'अखंड' हे नवीन नाव देण्याचा

यत्न केला) हे पद्य-प्रकार त्यानी विशेषकरून उपयोगात आणलेले आहेत. 'तुका म्हणे' या धर्तीवर 'जोती म्हणे' म्हणून आपली 'अखंड' रचना रूढ करण्याचा पद्धतशीर प्रयत्न त्यांनी केलेला आहे.

फुल्यांनी हा जो पद्य-प्रपंच केला तो त्यांच्या लिखाणाचा आणि त्यांच्या एकूण प्रयत्नांचा एक अंगभूत असा भाग होता, हीही गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे. हा अखंड पद्य-प्रपंच करीता-करीता, अगदी सहजपणे-अभावितपणे काव्यक्षेत्रातही फुल्यांनी काही तरी कामगिरी केली असण्याचा निदान संभव तरी आहे; आधुनिक कवितेशी त्यांचे काही नाते जुळण्याची शक्यता तरी निदान आहे; आधुनिक कवींमध्ये जोतीबांना कदाचित् कोठेतरी स्थान मिळण्याचीही संभावना आहे, या गोष्टींची गंधवार्ताही फुल्यांबद्दल सतत बोलणाऱ्या-लिहिणाऱ्यांना नसावी, ही एक नवलाची गोष्ट आहे !-जितकी नवलाची तितकीच खेदाचीसुद्धा.

जोतीबा फुल्यांच्या पद्य-प्रपंचाचा अगदी ढोबळ परिचय सामान्य वाचकाला करून देण्याची नितांत आवश्यकता आहे. मग त्यांच्या पद्य-प्रपंचाला काव्य म्हणावेच की नाही, काव्य म्हटलेच तर मग त्यामध्ये काव्यगुण कितपत होते; मग त्यांचे कवि-मंडळातील स्थान काय, वगैरे प्रश्नांची चर्चा पुढे होऊ शकते. ही चर्चा जरुर व्हावी; -अगदी मोकळ्या मनाने व्हावी ! कारण फुल्यांनी जी काव्य-रचना केली ती संस्कृत साहित्य-शास्त्रकारांनी वर्णिलेल्या वेगवेगळ्या काव्य हेतूमध्ये बसण्याजोगी नक्की नव्हती ! 'यशसे-अर्थकृते इत्यादी काव्य-शास्त्रकारांच्या वचनांप्रमाणे कीर्ती, द्रव्यलाभ किंवा मुक्तीसाठी जोतिबांनी आपली रचना खचितच केलेली नव्हती ! त्याचप्रमाणे मराठी कवि-मंडळात कवी म्हणून आपले काही स्थान निर्माण व्हावे, अशी आकांक्षा कधी काळी त्यांच्या मनात निर्माण झाली असण्याचीही शक्यता नाही ! फुल्यांनी जी काय काव्य-रचना केली ती आपल्या जीवनकार्याच्या सिद्धीसाठी. ज्या हेतूने त्यांनी वाणी व लेखणी गद्यांमध्ये अखंड झिजविली, त्याच हेतूने त्यांनी पद्य-रचनाही केली. त्यांच्या इतर लिखाणाप्रमाणेच त्याची काव्य-रचनाही त्यांच्या एकूण जीवनाचा अंगभूत असा भागच होता, यात शंका नाही.

जोतीबांच्या काव्यरचनेमागील हेतू

काव्यरचनेमागील हेतुबद्दलच बोलावयाचे तर मात्र ज्ञानोबापासून तुकोबापर्यंत साऱ्या संत-कवींचा जो हेतू होता व त्यामागील जी प्रेरणा होती, तिच्याशी जोतीबांच्या अखंड काव्य-रचनेचे नाते नक्की जुळण्यासारखे आहे. आपल्या अंतर्यामी जी प्रेरणा-धारणा आहे, जिने आपले जीवन-सर्वस्व अंतर्बाह्य व्यापून -भरून-भारून टाकले आहे; जी प्रेरणा इतरेजनांमध्ये-अगदी सामान्यातल्या सामान्य अशा प्रत्येक माणसामध्येही निर्माण करण्यासाठी ज्यांनी जन्मभर अखंड धडपड चालविली आहे, आपल्याला जे कळले (संताच्या भाषेत जो साक्षात्कार

झाला–परमेश्वरी प्रसाद मिळाला!) ते इतरेजनांना कळविल्यावाचून ज्यांना राहावतच नाही; आपल्याला जे ज्ञान झाले ते इतर सर्वांपर्यंत पोचवून 'सकल जनांना शहाणे' करून सोडण्यासाठी ज्यांची जन्मभर खटपट केली–भटकंती केली, –हे सर्व ज्याप्रमाणे संतकवींनी ज्या प्रेरणेने केले, अगदी त्याच प्रेरणेने फुल्यांनीही तेच केले. तसे केल्यावाचून जिवंत राहाणे (किंवा साधे स्वस्थ बसणे) जसे संतकवींना केवळ अशक्यप्राय होते,तसेच ते फुल्यांच्या बाबतीतही तितकेच खरे होते, यात शंका नाही! फरक येवढाच की, फुल्यांचे मुख्य माध्यम तोंडचा शब्द हा होता; लेखणीतून त्यांनी गद्य लिहिले; त्याच्या जोडीला सामान्यजनापर्यंत पोचण्याचे एक लोकप्रिय, प्रस्थापित माध्यम म्हणून–साधन म्हणून त्यांनी काही विशिष्ट पद्य-प्रकारांचाही वापर करून पाहिला. या पद्यप्रकारांमध्ये अभंग, (म्हणजे अभंग सदृश 'अखंड'), पोवाडा, मंगलाष्टके, आरत्या इत्यादी अनेक पद्यप्रकार हाताळण्याचा फुल्यांनी प्रयत्न केला. तो किती यशस्वी किंवा प्रभावी ठरला; ते पद्यप्रकार हाताळतांना फुल्यांनी कितपत 'काव्यगुण' किंवा 'रचना कौशल्य' प्रकट केले, हा अधिक अभ्यासाचा आणि चर्चेचा विषय होऊ शकतो.

फुल्यांची कोणाशी तुलना करून स्थान ठरविण्याचा प्रयत्न न करता, अगदी वरवर पहाताही ज्या एक-दोन गोष्टी सहज ध्यानांत येतात, त्यांचा येथे उल्लेख करतो.

"जोती म्हणे"—फुल्यांची 'अखंड' रचना!

फुल्यांची त्यांच्या 'निर्मिका'वर गाढ श्रद्धा असली तरी, तिचे कोणत्याही प्रचलित धर्मातील ईश्वर-कल्पनेशी काडीइतकेही साधर्म्य नव्हते.

फुले ईश्वराला शरण जात नव्हते, त्यांच्यापुढे आपल्या पापांचा पाढा वाचीत नव्हते, पश्चाताप करीत नव्हते, प्रायश्चित्त मागत नव्हते. त्याचप्रमाणे परमेश्वराला ते आळवीत नव्हते; त्याला प्रसन्न करून घेण्यासाठी आरत्या, भजने, स्तोत्रे, म्हणत नव्हते. खिस्ती संत-संतिणींप्रमाणे कोण्या ईश्वरपुत्रावर सारा भार टाकून मोकळे होत नव्हते! फुले आपल्या 'मा–बाप' निर्मिकाच्या नावाने नवस बोलत नव्हते; त्याला कोंबड्या–बकऱ्याचा किंवा बळी-महाबळीचे नैवेद्य समर्पण करीत नव्हते.

ते परमेश्वराला प्रत्यक्ष रूपात बघू इच्छित नव्हते; कारण तसा दर्शन देणारा साक्षात्कार घडविणारा 'तो' कोणी मुळी नव्हताच! त्यामुळे नामस्मरण, पूजा-अर्चा, आदी नव-विधा भक्तीही फुल्यांना साफ मंजूर नव्हती.

जोतीबा योगी किंवा हटयोगी होण्याचाही सुतराम संभव नव्हता, तेव्हा त्या पंथांतील यम-नियम, ध्यान–धारणा इत्यादी स्तोम त्यांच्याजवळ नव्हते. राज-योगातील 'संभोगातून समाधी' साधण्याचा प्रश्न अर्थातच त्यांच्यापुढे नव्हता! काव्यरचनेत फुल्यांच्या या अनोख्या धोरणामुळे त्यांच्या काव्यरचनेत भाबडी भक्ती नाही, आर्त उमाळे नाहीत; आत्मनिंदा नाही; केल्या–न–केलेल्या पापांचे कबुली-

जबाब पण नाहीत ! अनन्य–शरणतेचे आत्मसमर्पणही नाही. तरीही रूढार्थाप्रमाणे विचार केला तरी जोतीबा संतकवींमध्ये शोभण्यासारखे आहेत. कारण ते खरेखुरे संत होते; आणि कवीही पण होते. त्यांचे संतत्व जसे अनोखे होते, तसेच त्याला साजेसे त्याचे कवित्वही ! पण ज्यांना त्यांच्या संतत्वाच्या व कवित्वाच्या मूळ प्रेरणा मान्य नसतील त्यांनी, जोतीबांना संत म्हणू नये; आणि कवीही मानू नये. त्याबद्दल काहीही तक्रार असण्याचे कारण दिसत नाही.

पण खऱ्याखुऱ्या संतत्वाची अस्सल प्रेरणा मात्र जोतीबांच्या ठायी अत्यंत प्रकर्षाने होती, याबद्दल मात्र यांकिंचितही शंका नाही. वैयक्तिक आणि सामाजिक विचार-आचारामागील सर्वस्पर्शी शुद्ध-श्रेष्ठ नैतिक प्रेरणा त्यांच्यामध्ये ओतप्रोत– अगदी ओसंडण्याइतपत भरलेली होती !

अभंग आणि अखंड

पण इतर संतकवींचे अभंग आणि जोतिबांचे 'अखंड' यामध्ये मात्र मूलभूत फरक आहे. फुल्यांनी आपले विचार प्रदर्शित करण्यासाठी एक लोकप्रिय माध्यम म्हणून, साधन म्हणून एका अभंग-सदृश्य पद्य-प्रकाराचा उपयोग केला. 'अभंग' हा तो पद्य-प्रकार होय. तो लोकप्रिय होता; अगदी सामान्यांतल्या सामान्य निरक्षर माणसाला, समाजातील अगदी शेवटल्या थरातील शेवटल्या माणसालासुद्धा समजेल, त्याच्या अंतःकरणाला थेट जाऊन भिडेल, इतकी त्याची रचना आणि भाषा सोपी होती. म्हणूनच केवळ, फुल्यांना 'अभंग' हा पद्यप्रकार पसंत पडला असावा. आणि म्हणूनच फुल्यांनी तो स्वीकारला आणि वापरला असावा. मग त्यांनी या 'अभंग'–रचनेला 'अखंड' का म्हटले ? 'अखंड' या नव्या नावाने आपली काव्यरचना ओळखली जावी असा आग्रह तरी त्यांनी का धरला ?

फुल्यांनी स्वतःच्या काव्य-रचनेसंबंधी, स्वतः लिहून ठेवलेले असे काहीच दिसत नाही—निदान आज उपलब्ध तरी काहीही नाही. तेव्हा यासंबंधी काही अनुमान बांधण्यापलिकडे तूर्त तरी काही करीता येण्यासारखे नाही.

फुल्यांनी आपल्या 'अभंग' रचनेला 'अखंड'–रचना म्हटले याचे कारण बहुधा असे असावे :– आपल्या विचाराचे माध्यम म्हणून अभंग इत्यादी पद्य–प्रकार जोतिबांना प्रभावी वाटला असावा. अगदी साध्या, सोप्या, घरगुती शब्दांत प्रभावीपणाने हवा तो विषय, आशय, विचार प्रकट करण्याचे आणि अगदी सहजतेने शेवटल्या निरक्षर सामान्यजनापर्यंत पोचविण्याचे अभंगाचे सामर्थ्य स्वतः–सिद्धच होते. आणि फुल्यांना तेवढे पुरेसे होते; त्यांचा हेतू त्यामुळे सिद्धीस जाण्याजोगा होता. पण आपल्या या रचनेला त्यांच्याच्याने 'अभंग' मात्र म्हणवेना ! कारण अभंगाशी निगडित होते तुकोबा आणि इतर भागवत संत आणि त्यांची आर्त भक्ती, त्यांची परमेश्वर प्राप्तीची तळमळ, त्यांची आत्मनिंदा त्यांची पापाचरणाची कबुली

आणि पापमुक्तीसाठी परमेश्वराची विनवणी–आळवणी वगैरे वगैरे. पण फुल्यांना तर हे सारे–प्रकार अजिबात मंजूर नव्हते; त्यांना या सर्वाबद्दल एक प्रकारचा उबगच वाटत होता. कारण, परमेश्वराबद्दलच्या त्यांच्या कल्पनांशी हे सर्वस्वी निसंगत होते, विरोधी होते. शिवाय, सर्व संतांची निवृत्तीची तळमळ, प्रपंच व संसाराबद्दलची त्यांची घृणा सर्वश्रुत होती. सत्य-सुंदर जगाबद्दल व त्यांमध्ये वावरणाऱ्या जिवंत माणसाबद्दल या सर्व संतांना कमालीचा तिरस्कार होता. 'नारी–नरकद्वार' यापेक्षा वेगळ्या शब्दात स्त्री-जातीचा उद्धार, तर ते करूच शकत नव्हते! या आपल्या साऱ्या भावना, कल्पना तुकोबा महाराजांनी अत्यंत प्रभावी शब्दांत आपल्या अभंगातूनच व्यक्त केल्या होत्या; आणि जन-मानसात तुकोबांची ही 'अभंग'–वाणी खोल खोल घट्ट रुतून बसलेली होती!

म्हणूनच अभंगाबद्दल फुल्यांची अशी द्विधा वृत्ती असावी! सोपा-सुलभ लोकप्रिय प्रभावी पद्य–प्रकार म्हणून 'अभंग' मान्य; त्याचा उपयोग अपरिहार्य म्हणून त्याबद्दल आकर्षण. पण अभंगाला चिकटलेले,–साऱ्या संत-कवींनी चिकटविलेले सर्व विषय–आशय, सर्व भाव–भावना मात्र फुल्यांना साफ संपूर्ण नामंजूर! या शृंगापत्तीमधून फुल्यांनी मार्ग काढण्याचा प्रयत्न केला असावा. म्हणूनच बहुधा, 'अभंग' हा प्रभावी पद्य-प्रकार एक साधन म्हणून–माध्यम म्हणून फुल्यांनी स्वीकारला. पण संतांनी अभंगाला चिकटविलेल्या आशयापासून मात्र संपूर्ण फारकत घेऊन, त्यांनी त्या पद्य-प्रकारात नवा आशय-विषय ओतला. या पद्य-प्रकाराला नवे स्वरूप देण्याचा फुल्यांनी प्रयत्न केला. म्हणूनच त्यांनी–आपल्या अभंग-सदृश काव्य-रचनेला म्हटले 'अखंड' रचना! 'तुका म्हणे' म्हणून रूढ झालेल्या लोकप्रिय अभंगाच्या जागी 'जोती म्हणे' म्हणून आपले नवीन 'अखंड'–निरक्षर शूद्र-अति-शुद्रांमध्ये रूढ करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. फुल्यांच्या 'अखंड'-रचनेमागे यापेक्षा अधिक काही गूढार्थ असेल, असे वाटत नाही!

फुल्यांचा हा हेतू—('जोती म्हणे' तो आशय) कितपत सिद्धीस गेला, हा मात्र अगदी वेगळा प्रश्न आहे!

जोतिबा आणि रामदास

फुल्यांच्या पद्य-रचनेचे कोणाशी साम्य शोधावयाचेच म्हटले तर समर्थ रामदासांचेच नाव डोळ्यापुढे येऊ शकते (अर्थात् रामदासांची करुणाष्टके किंवा त्यांच्या अंतरीचे उमाळे वगळून). दासबोधाच्या रचनेमागील हेतू फुल्यांच्या काव्य-रचनेमागील हेतूंशी जुळणारा आहे.

आपल्याला जे जे, ज्या ज्या विषयासंबंधी ज्ञान झाले; जे जे आपल्याला मनापासून प्रामाणिकपणे पटले, ते ते इतरे-जनांना,–सामान्यजनांना केव्हा एकदा कळवून टाकतो, अशी घाई या दोघांनाही झाल्यासारखे सतत वाटते! सामान्यजनांना

'शहाणे' करून सोडण्याच्या या दुर्दमनीय ऊर्मीमधूनच त्या दोघांचीही बहुतेक पद्यरचना झालेली दिसते. म्हणूनच त्या रचनेमध्ये ज्ञान आहे, इतिहास आहे, माहिती आहे, उपदेश आहे. त्यांच्या पद्यरचनेला कोणत्याही विषयाचे वावडे आहे, असे आढळत नाही ! अगदी कशासंबंधीही, अगदी गद्य, काव्यशून्य रूक्ष, व्यावहारिक अशा कोणत्याही विषयासंबंधीसुद्धा दोघेही खुशाल पद्य-रचना करू शकतात आणि करतात ! कारण आपल्या अनुयायांनी, कार्यकर्त्यांनी सामान्य जनतेपर्यंत जो बोध नेऊन पोचवावा, अशी त्यांची इच्छा आहे, त्याला या रचनेमुळे, त्यांच्या दृष्टीने मदत होणारी असते. बहुधा याच हेतूने दोघांनीही बरीचशी पद्यरचना केलेली दिसते.

रामदासांच्या दासबोधाला-त्यातील एकूण एक गद्यप्राय, व्यावहारिक, बोधपर रचनेसकट सर्व पद्य-प्रपंचाला, जर काव्य म्हणावयाचे असेल, तर फुल्यांच्या रचनेलाही काव्य म्हणण्याला कोणी खळखळ करू नये !

अर्थात एकूण विचाराच्या-धारणेच्या बाबतीत वास्तविक रामदास आणि जोतिबा हे अगदी दोन टोकावर आहेत. फुल्यांनी रामदासांवर सतत आणि अगदी कडकडून हल्ले केलेले आहेत. (गद्य आणि पद्य सर्व लिखाणांत) फुल्यांच्या लिखाणांतील रामदाससंबंधीचा प्रत्येक उल्लेख टीकापरच आहे; रामदासांच्या गौरवपर असा एकही शब्द फुल्यांच्या वाणीतून कधी चुकूनही बाहेर पडलेला नाही ! ही वस्तुस्थिती असली, तरी दोघांच्याही काव्यरचनेतील हेतूमागील साम्य मात्र सहज ध्यान्यात येण्यासारखे आहे.

जोतिबा आणि तुकोबा

त्यामानाने तुकारामाच्या रचनेबाबत जराशी वेगळी वस्तुस्थिती आहे. कारण तुकारामाची मूळ प्रेरणा-ऊर्मी ही अधिक भावनात्मक आहे. अंतरीची अखंड तळमळ-तगमग तुकारामाच्या शब्दा-शब्दांतून व्यक्त होते. त्यामधून वैयक्तिक भावनांचा कल्लोळ-त्यांचा उद्रेक सतत व्यक्त होताना दिसतो. अंतरंगातील तळमळ, खळबळ, वैयक्तिक सुखदुःखे, संसारांतील ताप-संताप, व्यवहारातील टक्के-टोणपे, इतर खडतर अनुभव यांची प्रतिबिंबे सतत तुकोबांच्या शब्दांतून चमकताना दिसतात. फुल्यांच्या काव्यरचनेत मात्र वैयक्तिक सुख-दुःखांचा, उद्रेक झालेला कुठेही आढळत नाही.

पण तुकोबाशी एका बाबतीत मात्र जोतिबांचे नाते नक्की जोडलेले आढळते. ते म्हणजे सामाजिक विषमता, जातीभेद, अन्याय, धर्ममार्तंडाबद्दल-त्यांच्या सर्वंकष दंभाबद्दलची चीड, संताप-या सर्वांचा स्फोट तुकोबाच्या अभंगांतून वारंवार झालेला दिसतो. आणि जोतिबांच्या रचनेमागील तर ती एक प्रमुख प्रेरणाच होती.

सामाजिक विषमता-अन्याय-जातिभेद यामुळे तुकाराम बतागतो,-भडाभडा अद्वातद्वा बोलतो; पण अखेर त्या विषम-व्यवस्थेपुढे-जातिभेदापुढे अगदी अगतिक

–असह्यप्राय होऊन जातो! त्या चातुर्वर्ण्याविरुद्ध सर्वंकष बंड पुकारण्याची तुकारामाची भूमिका नव्हती; आणि ती तशी असणे तेव्हा शक्यही नव्हते. कारण तो स्वतःला त्या चतुर्वर्ण्यग्रस्त जातिबद्ध समाजापासून वेगळे काढू शकत नव्हता! (पण हा अगदी वेगळ्याच चर्चेचा विषय होऊ शकेल.)

भाषाशैलीबद्दल–शब्दरचनेबाबत मात्र इतर कोणत्याही संतकवींपेक्षा तुकारामाशी फुल्यांचे सर्वांत जवळचे नाते जुळण्यासारखे आहे. जोतिबाचे अनेक 'अखंड' असे आहेत की, जे अगदी सहजपणे, तुकोबाच्या अभंगामध्ये अलगद बसतील आणि खुशाल खपून जातील!

कारण जोतिबा आणि तुकोबा यांच्या अगदी अंतरीच्या ऊर्मी आणि विशुद्ध भावना काही बाबतींत तरी साधर्म्य सांगणाऱ्या होत्या. त्याबाबतीत दोघेही अगदी आतल्या, आतडे तोडणाऱ्या भावनेने बोलत;–चिडीने-संतापाने उसळत. आणि अशा ऐन उद्रेकाच्या क्षणी बोलताना जिभेवर आपोआप आलेले शब्द, जसेच्या तसे खुशाल बाहेर येऊ देत! जिभेवर सहजपणे आलेला शब्द मागे परतविणे, तुकोबा आणि जोतिबा दोघांनाही साफ मंजूर नाही! यांतच त्याचे वैशिष्ट्य आहे आणि त्यातच त्यांचे सामर्थ्यही साठवलेले आहे! तथाकथित सभ्यता, शिष्टता, औचित्य, प्रौढत्व, –फार काय व्याकरण यांचेही भान दोघांनाही राहात नाही; आणि त्यांना त्याची पर्वाही नाही! पण म्हणूनच त्यांचे लिखाण एवढे प्रभावी झाले आहे. जरी ते मधून मधून खडबडीत, ओबडधोबड, असले तरीसुद्धा. कारण त्यांची प्रेरणा प्रामाणिक होती; तिचा उगम अंतरीच्या खोल ऊर्मीमधून झालेला होता. त्यामुळे त्या ऊर्मीच्या उद्रेकांत बाहेर पडलेले शब्द जरी कदाचित ओबडधोबड, खडबडीत असले तरी ते अस्सल होते.

—खाणीतून नुकत्याच काढलेल्या हिऱ्यासारखे टणक, खडबडीत, मातीचे काही कण अजूनही चिकटलेले; पण तरीही तेजस्वी!–त्यातही एक आगळे सौंदर्य होते; आणि विलक्षण सामर्थ्य तर होतेच होते. मात्र फुल्यांचे हे शब्दसामर्थ्य त्यांच्या गद्य लिखाणांतच अधिक प्रकर्षाने प्रकट झाले. (तुकोबाने गद्य लिखाण केलेच नाही. तेव्हा कोणीच गद्य लिहीत नसे, संतांचे सारे बोलणे काव्यातच!)

सर्व संतांचा–ज्ञानीयांचा राजा जो ज्ञानेश्वर त्याची आठवणसुद्धा जोतिबांच्या संदर्भात होत नाही; आणि होण्याचे कारणही नाही. कारण ज्ञानेश्वरांची काव्यकुळी काही वेगळीच आहे! संतकवींमध्ये असूनही अखेर ज्ञानोबाराय त्या सर्वांपासून वेगळेच!

अखंड–रचनेमधील विविध विषय

फुल्यांची बहुतेक पद्य–रचना सोप्या 'अखंड' अभंगवाणीमध्ये केलेली आहे. त्यांतही बहुतेक 'अखंड' रचना, आपले महत्त्वाचे विचार सामान्य जनापर्यंत

पोचविण्याच्या प्रचारकी–किंवा–मिशनरी हेतूनेच त्यांनी केलेली आहे. त्यांच्या 'अखंड' रचनेतील मुख्य विषय पाहिले तरी ही गोष्ट अगदी स्पष्ट होईल.

फुल्यांनी सत्यशोधक समाज स्थापन केला आणि त्यासाठी आधारभूत म्हणून 'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक' लिहिले. या पुस्तकाच्या प्रारंभी आणि शेवटी त्यांनी आपले 'अखंड' घातले आहेत. 'सत्य सर्वांचे आदी घर। सर्व धर्मांचे माहेर' असा त्याचा प्रारंभ आहे. पुस्तकाच्या शेवटी तर फुल्यांनी एक प्रदीर्घ अभंगाजली जोडून, सर्व मानव एक–सर्व समान आहेत, वंश–जाती–धर्म–देश इत्यादी सर्व भेद खोटे आहेत, हे महान सत्य परोपरीने विनवून सांगितले आहे.

'अखंड' म्हणून त्यांनी जी स्वतंत्र 'अभंग' रचना केली, त्यांचाही मुख्य भर मानवधर्मावर, त्यामधील समानतेवर, न्याय–शांती इत्यादींनी युक्त अशा सत्यधर्मावरच मुख्यतः आहे. धर्म-देश-वंश-जाती इत्यादींच्या आधारे जे कृत्रिम भेद माजविण्याचे प्रयत्न केले जातात, त्याविरुद्ध चिडीने त्यांनी लिहिले. स्त्री-पुरुष समानतेची ग्वाही पुन्हा पुन्हा दिलेली आहे. खिस्त-महंमद-मांग-ब्राह्मणाशी। धरावे पोटासी। बंधू परी। असे पुन्हा पुन्हा आवर्जून सांगितले आहे.

स्त्री-पुरुष समानतेबद्दल जोतिबांना सतत जिव्हाळा वाटत होता. तोही त्यांच्या या 'अखंड'–रचनेत अग्रक्रमाने अर्थातच पुन्हा पुन्हा व्यक्त झाला आहे. स्त्रीला त्यांनी 'मानवी' म्हटले आहे! पुरुष म्हणजे मानव; आणि स्त्री? ती 'मानवी' नव्हे काय? असा सवाल केवळ जोतिबांनाच सुचण्यासारखा आहे! 'कष्ट आणि कष्टकरी' याबद्दलचा जिव्हाळाही अखंड-रचनेत सतत व्यक्त झाला आहे. 'क्षत्रियांनो, कष्टकरी व्हावे', असा उच्चकुलीनांनासुद्धा जोतिबांचा आदेश आहे. कष्टाळू मानव,। शूद्र बंधु खरा। त्याचे हित करा। जोती म्हणे। अशा आशयाचे 'अखंड' कितीतरी सापडतील. कष्टाळू शूद्राचे। लक्ष्मी पाय दाबी। म्हणे ना कुणबी। त्यास कधी। असा जोतिबांचा आग्रह आहे.

कल्पनेचे देव। कोरिले उदंड। रचिले पाखंड। अशा शब्दात खोट्या मूर्तीपूजा-कांडावर फुल्यांनी पुन्हा पुन्हा आसूड उडविले आहेत.

जन्मजात विषमतेचे आणि त्यावर आधारलेल्या जाती-व्यवस्थेचे नेते म्हणून ब्राह्मणावरील फुल्यांचा राग अर्थातच या 'अखंड' रचनेमध्येही पुन्हा पुन्हा उफाळून आलेला दिसतो. पण 'आत्मपरीक्षण' या शीर्षकाखाली जोतिबांनी जे तेरा 'अखंड' लिहिले आहेत, त्यामध्ये ब्राह्मणांच्या मुख्य दोषावर त्यांनी बोट ठेवले असून सुधारणेचा मार्ग दाखविला आहे. आपल्या जन्मजात अहंकाराच्या तोऱ्यांत, ज्ञानाचे मक्तेदार ब्राह्मण 'आत्मपरीक्षण' विसरले आणि नवे ज्ञान-संशोधन यांचा मार्ग त्यांनी कसा कुंठीत करून टाकला, याचे जोतिबांनी परोपरीने प्रतिपादन केले आहे. वेदा मनु नाही। आत्मपरीक्षण। आर्यांस दूषण। जोती म्हणे। किंवा, आत्म-परीक्षण। हद्दपार करी। काळे पाणी जारी। जोती म्हणे। इत्यादी इत्यादी.

'सहिष्णुता' या शीर्षकाखाली स्वतंत्र 'अखंड' लिहून जोतिबांनी सहिष्णुतेची महती वर्णिली आहे. सत्य सोडूनिया। धर्मवादी होती। संग्रामी करिती। रक्तपात। किंवा, लढण्याचा कित्ता। संतांना घालिती। पिढीजादा देती। दुःख जगा। अशा आशयाच्या अखंडातून व्यक्त झालेला उपदेश, करावा तितका थोडाच ठरेल!

बंधु आर्यरावा। दयावान व्हावा;। जाळा टाकावा। मनुग्रंथ। अशी विनवणी जोतिबांनी ब्राह्मणांना केलेली बघून आज नवल वाटेल! त्याचप्रमाणे सांडु नका खिस्ती-। मुसलमानांस। मांगा-महारास। शूद्रासह। हा जोतिबांचा उपदेश तत्कालीन आणि नंतरच्या परंपराग्रस्त नेत्यांनी मानला असता तर?— हा प्रश्न आजही व्याकुल करणारा आहे!

'स्वच्छता' हा विषयसुद्धा जोतीबांना काव्यादेशाच्या योग्यतेचा वाटतो! शरीर, मन आणि वस्त्र यांच्या अंतबाह्य स्वच्छतेचा जो महिमा आणि ज्या उत्साहाने जोतिबांनी वर्णन केला आहे, तो 'अखंड' वाचला, तर कोणताही खराखुरा शुचिभूत ब्राह्मणसुद्धा चकित होईल! त्याच अखंडामध्ये जोतिबांनी अस्वच्छते-बद्दलची घृणा, ज्या शब्दांत व्यक्त केली आहे, त्यावरून तुकोबांचीच आठवण होईल! धर्ममार्तंड, ढोंगी गुरू, भोंदू बुवा यासंबंधीचे जोतिबाकृत 'अखंड' तुकोबांच्या अभंग-रचनेत सहज खपून जाण्यासारखे आहेत!

जोतिबा :—पहिला आधुनिक शिवशाहीर

शिवाजीवरील पोवाड्यासंबंधी परिशिष्ट क्रमांक दोनमध्ये सविस्तर लिहिलेच आहे. पण जोतिबांच्या एकूण काव्यरचनेचा विचार करताना या पोवाड्याच्या आणखी एका वैशिष्ट्याचा खास उल्लेख करणे आवश्यक आहे.

जुन्या शाहिरांनी परंपरागत पद्धतीने शिवचरित्र गाईले होते; शैली आणि आशय या दोन्ही दृष्टींनी ते पोवाडे काहीसे साचेबंद होत चालले होते. इंग्रजी अमदानी सुरू झाल्यानंतर सर्वच साहित्याकडे बघण्याची दृष्टी बदलू लागली. संस्कृत महाकाव्ये डोळ्यासमोर ठेवून मराठीतून महाकाव्ये किंवा आख्यान-काव्ये लिहिण्याची परंपरा जुनीच होती. अव्वल इंग्रजी शिकलेल्या आधुनिक सुशिक्षितांची इंग्रजी महाकाव्याचे वाचन थोडेफार सुरू केले होते. आता संस्कृत आणि जोडीला इंग्रजी महाकाव्ये वाचून मराठीमध्येही नव्या धर्तीची महाकाव्ये—आख्यानकाव्ये लिहिण्याची महत्त्वाकांक्षा अव्वल इंग्रजीमधील मराठी कवीमध्ये निर्माण होणे स्वाभाविक होते. या काव्याला शिवाजीइतका अनुरूप असा दुसरा नायक कोठून आढळणार! कुंटे यांनी त्या दृष्टीने प्रयत्न करून आपले 'राजा शिवाजी' हे काव्य निर्माण केले. महाकाव्य म्हणून-फार काय काव्य म्हणूनसुद्धा त्याच्या मूल्य मर्यादा स्पष्ट होत्या.

फुल्यांच्या उत्तर आयुष्यांतच हे काव्य लिहिले गेले. न्या. रानड्यांनी मराठी सत्तेचा उदय हा आपला सुप्रसिद्ध ग्रंथ लिहिल्यानंतरच खरोखर नव्या सुशिक्षितांना शिवकार्याचा नव्याने शोध आणि बोध झाला. लो. टिळकांनी शिवाजी उत्सवाला राष्ट्रीय महोत्सवाचे स्वरूप दिल्यानंतरच नव्या शाहीरांना शिवचरित्र गाण्याची स्फूर्ती मिळाली. पण या सर्व घटना फुल्यांच्या मृत्युनंतरच्या आहेत, हे ध्यानांत ठेवले पाहिजे.

शिवकार्याबद्दल फुल्याचे मूल्यमापन अगदी मूलगामी आणि रानडे-टिळकांपेक्षा वेगळे होते. ते मूल्यमापन त्यांनी रानडे-टिळकांपूर्वीच पंचवीस-तीस वर्षे केलेले होते, ही गोष्टही ध्यानांत ठेवली पाहिजे !

शिवकार्याचे नवे मूल्यमापन करूनच फुले थांबले नाहीत; तर त्यांनी शिवकार्याला आणि फुल्यांच्या शैलीला साजेल अशा लोकसाहित्याच्या माध्यमामधून म्हणजे पोवड्यातून शिवचरित्रही गायिले.

आधुनिक दृष्टीने शिवकार्याचे मूल्यमापन करणारा आणि शिवचरित्र पोवाड्यांतून गाणारा पहिला आधुनिक शिवशाहीर म्हणून जोतीबा फुल्यांचाच उल्लेख मराठी साहित्याच्या इतिहासातही होणे आवश्यक आहे, ही गोष्ट आवर्जून सांगितली पाहिजे.

दस्यूचा पोवाडा

पोवाड्याबद्दलच बोलावयाचे तर फुल्यांनी आणखीही एक पोवाडा लिहिला आहे–'दस्यूं'चा पोवाडा'! दस्यू म्हणजे भारतामधील मूळ आदीवासी–नंतर दास झालेले. या आदीवासी दस्यूंवर पोवाडा लिहिण्याची कल्पना फक्त जोतिबा फुल्यांनाच सुचू शकते ! दलित, गुलाम, अतिशूद्र जमातीलाच नायक कल्पून, त्या विषयावर पोवाडा लिहिणे म्हणजे पोवाड्याच्या परंपरागत आशयामध्ये एक क्रांतिकारक बदल करण्याचाच प्रयत्न होता ! या पोवाड्यांत आर्य आक्रमकांनी गुलाम केलेल्या मूळ देशी जमाती–त्यांच्या परंपरा–त्यांचा इतिहास–त्यांचे वीरपुरुष–यांच्या वीर–गाथा गाण्याचा जोतिबांचा प्रयत्न दिसतो. आपल्या इतर गद्य-पद्य लिखाणांत असा प्रयत्न जोतिबांनी पुन्हा पुन्हा केलेला आहे.

ब्राह्मणाचे कसब

फुल्याचे 'ब्राह्मणाचे कसब' हे सुप्रसिद्ध पुस्तक तर संपूर्णपणे पद्यांमध्येच रचलेले आहे ! त्यामध्येही दस्यूंच्या पोवड्याचाच विषय पुन्हा आणि अधिक तपशीलवार आलेला आहे. शिवाय, रचनेच्या दृष्टीनेही ते पद्य-लिखाण अधिक जोमदार, प्रासादिक आणि प्रभावी उतरले आहे. त्यातील इतिहासकथनाचा भाग पोवाड्याच्या स्वरूपात आहे. याशिवाय, जोशी, भट, वैद्य यांच्या करणीचे

वर्णन करतानाही, पोवाड्याचा उपयोग उपहासपर –उपरोधपर केलेला आहे;–– ब्राह्मणांच्या बाकी करण्यांचे वर्णन सोप्या, खुमासदार, खुसखुशीत, शब्दात पण तीव्र उपरोधाने पुरेपूर भरलेले आहे. खरे म्हणजे एकूण ब्राम्हणापेक्षा भटा-भिक्षुकांच्या व्यावसायिक कारवायांवरच या रचनेत अगदी तपशीलवार झोड उठविलेली आहे. या रचनेमध्ये फुल्यांचा पद्यरचनेमागील हेतु अगदी स्पष्ट होतो. अधिक लोकापर्यंत आपले विचार खेडोपाडी पोचावे, ते कार्यकर्त्यांच्या स्मरणात राहून त्यांना प्रचारासाठी 'वाचा' मिळावी, हाच हेतू या रचनेमागे दिसतो.

जोतिबाकृत 'मानव' महंमद!

काव्यरचनेसाठी केवळ जोतिबांनाच सुचू शकतील असे काही विषय दाखविता येतील. उदाहरणार्थ, महंमदाला नायक कल्पून त्याच्या कार्याची महती गाणारी एक प्रदीर्घ पद्यरचना जोतिबांनी केलेली आहे! त्या रचनेच्या शीर्षकांमध्येही फुल्यांचे वैशिष्ट्य प्रकट होते. महंमद पैगंबराला, जोतिबा 'पैगंबर' न म्हणता 'मानव' महंमद म्हणून संबोधितात! त्या काव्यांत महंमदाच्या पैगंबरपणाचा (म्हणजे परमेश्वरी प्रेषितत्वाचा) अजिबात उल्लेखच नाही! उलट साधा 'माणूस' म्हणून त्याची महती जोतिबांनी वर्णिलेली आहे. जगात सर्व मानव समान आहेत; कुणी श्रेष्ठ नाही–कनिष्ठ नाही, ही महंमदप्रणीत मानवी समानता जोतिबांनी हिरीरीने उचलून धरली आहे. इतिहासाच्या विशिष्ट कालखंडात इस्लामचा जो चौफेर दिग्विजय झाला, त्याचे रहस्य फुल्यांच्या दृष्टीने त्यांनी सांगितले आहे. त्याचप्रमाणे मूर्तीपूजेविरुद्ध महंमदाने जी जबरदस्त मोहीम उभारली, तिचेही महत्त्व जोतिबांनी विशेषेकरून गौरविले आहे.

आणि क्रांतिकारक मंगलाष्टके–

फुल्यांनी आपल्या प्रेरणांनुसार ज्या अनेकविध चळवळी उभारल्या, त्यांच्या क्रमांत, जोतिबांनी इतरही काही, त्यांना आवश्यक वाटली त्याप्रमाणे पद्यरचना केलेली आहे. उदाहरणार्थ–मंगलाष्टके, आरत्या वगैरे.

तकाकथित काव्यगुणांच्या दृष्टीने फुलेकृत मंगलाष्टके साहित्य समीक्षकांना कदाचित् सामान्य वाटतील. पण अनेक लोकप्रिय प्रचलित रूढ मंगलाष्टकांना मंगलाष्टक तरी का म्हणावे हा, सवालही खचित विचारण्यासारखा आहे! 'गंगा–सिंधु–सरस्वती च यमुना' अशी हिंदुस्तानच्या भूगोलात सहज खपून जाण्याजोगी नद्यांची यादी किंवा 'लक्ष्मी, कौस्तुक, पारिजातक–सुधा–धन्वंतरी–चंद्रमा' इत्यादी चवदा रत्नांची नाममालिका धडाधड म्हणून शेवटी 'कुर्यात् सदा मंगलम्' म्हटले की, मराठी मंगलाष्टक तयार झाले, अशी ज्यांची समजूत असते, त्यांच्याबरोबर बोलण्याचा प्रश्नच नाही! पण पुरुषाचा (पिता व पती म्हणून) स्त्रीवरील निखालस मालकी हक्क

आणि स्त्रीची (कन्या आणि पत्नी म्हणून) तितकीच निखालस गुलामगिरी सिद्ध करणारे आणि तिला शास्त्रोक्त संस्कारांनी वज्रलेप करणारे संस्कृत विवाहमंत्र ज्या फुल्यांना केवळ असह्य वाटत होते व त्याविरुद्धच्या चिडीने–संतापाने ते बंड करून उठत होते. त्या फुल्यांनी जर नव्या क्रांतिकारक आशयाची मंगलाष्टके रचली असतील, त्यात स्त्री-पुरुष समानतेची आणि त्या समानतेवर आधारलेल्या वैवाहिक प्रीतीची खरीखुरी मंगलगीते जर जोतिबांनी रचली असतील तर तो क्रांतिकारक आशयाचा प्रयत्न समजून घेण्याची तसदी तरी घेऊन बघावी! मंगलाष्टकांच्याच जोडीला जोतिबांनी विवाहानंतर आशीर्वादपर गीतही रचलेले आहे. फुलेकृत सर्व आधुनिक विवाहसंस्कार समाप्त झाल्यानंतर जोतिबांनी शेवटी, त्यांना गवसलेल्या 'आदिसत्त्याची आरती'ही म्हटलेली आहे.

या शिवाय 'सत्सार' या मासिक पुस्तकात स्त्रियांवरील अन्यायासंबंधी फुल्यांनी अत्यंत जळजळीत लिखाण केलेले आहे. त्याच्या प्रारंभी जोतिबांनी एक 'आर्या' आणि सात 'दिंड्या' रचून घातल्या आहेत. 'आर्या–दिंड्या' या प्रायः पंडित कवींच्याच रचनेमध्ये प्रामुख्याने आढळणाऱ्या पद्य–रचनेचा उपयोग, जोतिबांनी फक्त याच ठिकाणी केलेला आढळतो.

"उदरी नऊ महिने ओझे वागविणाऱ्या स्त्रीवर गुरगुरणारा उपटसूळ" म्हणून संबोधून कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ बनलेल्या पुरुषावर या रचनेमध्ये प्रखर प्रहार केलेले आहेत.

परिशिष्ट । ६

आंबेडकरांच्या अगोदरचा आधुनिक महाराष्ट्रातील पहिला बौद्धजन : प्रा. धर्मानंद कोसांबी

आधुनिक महाराष्ट्रामध्ये बौद्धधर्माची किंवा बौद्ध विचारांशी संबंधित अशी जिवंत-अखंड परंपरा पुसटसुद्धा आढळत नाही. वास्तविक बौद्धधर्माच्या ऐन उत्कर्षाच्या आणि वैभवाच्या काळात महाराष्ट्र आणि महाराष्ट्रातील गिरी-कंदरांतील शेकडो गिरीगुंफा, केवळ भव्य-दिव्यता आणि सुंदरता यामुळेच नव्हे तर बौद्धधर्माची जिवंत धर्मपीठे म्हणून जगभर प्रसिद्धी पावलेली होती. पुढे बौद्धधर्माच्या ऱ्हास-काळात ही धर्मपीठे लोप पावली आणि भव्य-दिव्य सौंदर्याचा साक्षात्कार घडविणाऱ्या गिरी-गुंफा हिंस्र जनावरांची आणि दरोडेखोरांची आश्रयस्थाने म्हणूनच शेकडो वर्षे गजबजली !

हजार-दीड हजार वर्षांच्या विजनवासानंतर आंबेडकरांनी पुन्हा भारतामध्ये आणि महाराष्ट्रामध्ये बौद्धधर्माला परत मानाचे स्थान दिले !


पण आंबेडकरांनी घडविलेल्या ऐतिहासिक धर्म-चक्र-प्रवर्तनाचा विचार करण्यापूर्वी एक लहानशी नोंद आवर्जून केली पाहिजे. ती म्हणजे श्री. धर्मानंद कोसांबी यांची !

आंबेडकरांपूर्वी निदान ४० वर्षे श्री. कोसांबी यांना बुद्ध सापडला होता आणि त्यांनी नितांत श्रद्धेने पण तितक्याच चिकित्सकपणाने बुद्धाचा स्वीकार केला होता. श्री. कोसांबी हे एक काहीसे एकांडे पण अत्यंत बुद्धिमान विद्वान संशोधक होते. पण तसे संशोधक महाराष्ट्रात त्यावेळी काही कमी नव्हते; पण इतर कोणाला बुद्ध गवसू नये; गवसलाच तर त्याची त्यांनी अत्यंत हीन अवहेलनाच करावी, अशी तेव्हाची विद्वन्मान्य पद्धती होती ! अशा विद्वानांच्या मेळाव्यात आणि वावदुकांच्या

गदारोळात एक तपस्वी विद्वान् निघावा, त्याला बुद्धाचा शोध लागावा; त्याने संपूर्ण चिकित्सेनंतर बुद्धाचा मनोमन स्वीकार करावा आणि आपल्याला लाभलेला हा नवा प्रकाश त्याने नितांत निष्ठेने प्रकट करावा, याचे आज आश्चर्य वाटते ! श्री. कोसांबी यांनी बौद्धधर्माचा प्रचार सुरू करताच सर्व विद्वान् मंडळींच्या दृष्टीने ते महापातकच ठरले, आणि त्यांच्याविरुद्ध काहीकाळ एकच गदारोळ माजला ! आणि श्री. कोसांबी एक प्रकारे वाळीत पडले; तेव्हाच विद्वान मंडळी शांत झाली !

पण श्री. कोसांबी आणि त्यांचा बौद्ध-धर्म-स्वीकार हे सर्व केवळ वैयक्तिक स्वरुपाचेच ठरले ! त्यांची धर्मसाधना वैयक्तिक होती. बुद्ध-स्वीकार वैयक्तिक होता; आणि त्याचे परिणामही त्यांच्यापुरतेच मर्यादित राहिले ! त्यांना गुरुही नव्हता आणि एकसुद्धा शिष्य त्यांना कधी लाभला नाही ! तेव्हा त्यांच्या बौद्ध धर्म-स्वीकारामुळे त्यांच्या वैयक्तिक वर्तुळात एक लहानसे वादळ उठले असेल तेवढेच ! इतर कोणालाही त्याची दादसुद्धा लागली नाही !–मग कोणी दखल घेण्याचा प्रश्नच नव्हता.

आंबेडकरांनी केलेल्या धर्म-चक्र-प्रवर्तनानंतर एक प्रचंड वादळ उठले आणि केवळ त्यांचे लक्षावधी अनुयायीच नव्हे तर, सारा हिंदुसमाज हादरून–हेलावून गेला. केवळ वैचारिक क्षेत्रातच नव्हे तर एकूण सामाजिक–सांस्कृतिक–राजकीय क्षेत्रातही त्याचे स्थायी परिणाम घडून आले. आंबेडकरांनी घडविलेल्या या प्रचंड परिवर्तनाच्या पार्श्वभूमीवर कोसांबींचा प्रयत्न म्हणजे अक्षरशः सिंधुपुढे बिंदू ठरतो ! ब्राह्मण सुधारकांप्रमाणेच नवधर्म प्रचाराच्या बाबतीतही त्यांच्या मर्यादा यामुळे स्पष्ट होतात. तरीसुद्धा महाराष्ट्रातील बौद्ध धर्माच्या पुनरागमनाच्या इतिहासात तळटीपेमध्ये तरी श्री. कोसांबी यांचा उल्लेख आवर्जून केला पाहिजे. त्याच दृष्टीने हा आवश्यक उल्लेख.



REFBK-0020934